मा. मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय) 245
28 9

मासिकाचे नांव — अरुणमाला.

संपादक — मो० ग० रांगणेकर.

मासिक क्रमांक —

अंक —

(महिने)

९,१०,११,१२

सन — १९२५
१९२६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
मुद्दा मासिके (मुद्दल)

प्रा. ता. सातारा
सं.मा.क्र. २६५
ता. जावळी
जि. सातारा

२५
२६ जानेवारी.

महाराष्ट्र शासन शिक्षण संचालक (प्रा.)
ता.....
जिल्हा सातारा

अरुण माला.

वर्ष २.] सप्टेंबर १९२५ [अंक १.

अपूर्णत्वाची याचना.

वाढे ऐक कला बघे प्रतिदिनीं, हांसे मनीं यामिनी।
माझ्या कीं हृदयामधील तिमिरा लावील ही हांकुनी॥

झाला पूर्णहि चंद्र तो लवकरी, अंधार दूरी पळे।
पाहे ती दुसऱ्या दिनीं तिज कला तेथें कमी आढळे॥

आहे पर्वत फार उंच, विलसे सौंदर्य चौंहीकडे।
मानोनी मनिं पांथ पाहत चढे, झाडी, कडे वांकडे॥

पोंचोनी शिखरावरी करित तो दृष्टी जधीं खालतीं।
पाहूं काय म्हणे, दरीविण दिसे कांहीं न नेत्रांप्रती॥

जें जें गूढ जगांत या दिसतसे, कोडें पडे मानवा।
तें तें जीवन-नाटकास खुलवी, रंगीं रसीं वा नव्या॥

रंगो खेळ अखंड अंत असल्या ओघा जरी लाभला।
कोणा सौख्य जगांत रुक्ष सगळें भासेल मृत्यू भला॥

जें जें उंच दिसे क्षणीं पुढतिं तें खालीं पडे बापुडें।
मानूं यास सुदैव साध्य नच कीं हातीं जगीं सांपडे॥

कुमार

छटा २ री] सप्टेंबर [पृष्ठ १ ला



संपादक—मो. ग. रांगणेकर] [वा. व. ट. ख. सह २। रु.

किंमत ३ आणे.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं

जगविख्यात निवडक औषधें.




विद्युद्दामसमप्रभां मृगपति स्कंधस्थितां भीषणाम् ।
कन्याभिःकरवालखेट विलसद्धस्ताभिरासेवितां ॥
हस्तैश्चक्रदरालिखेट विशिखांश्चापं गुणंतर्जनीम् ॥
बिभ्राणामनलात्मिकांशिशिधरां दुर्गांत्रिनेत्रां भजे ॥ १ ॥

पत्ता:— कुळकर्णी ऍण्ड सन्स, मुंबई नं २.

ग्रंथ संग्रहालय

अनुक्रमणिका.

१ अपूर्णत्वाची याचना (क.) 'कुमार' २
२ प्रस्ताव (संपादकीय) ३
३ वस्तुस्थिति कीं स्वप्न ? (गोष्ट) ६
४ स्मारकाचा मान १२
५ तुमच्यांत असें तारुण्य आहे ? (श्री. 'सीता-कांत') १६
६ मुलांची मौज २२
७ नेहमींच्या गोष्टी २५
८ श्रीगणेशापासून—('विनोदलाल') २७
९ क्षणभंगुर (चा. कादंबरी) ३३



छाया चित्रांवर, मं. ४.

सात्विक करमणूक करून देशभक्तीची उज्वल ज्योत
प्रज्वलित करणाऱ्या

चटकदार कादंबऱ्या.

सचित्र आनंदमठ किं. १८४, चव्हाणी समशेर ! किं. १, सचित्र महाराणा प्रतापसिंह रु.१. वंगसूर्यास्त ! किं. १, चितोडचा वीर अरुण ! किं. ८१२, सुवर्णयुग. किं. ८१२, सती-परीक्षा. किं. ८१२. सचित्र. राष्ट्रोन्नति केव्हां होईल ? किं. ८८ सचित्र मधुर मीलन (दुसरी आवृत्ति) किं. ८८, प्रणयभंग ! किं. ८४, वरील कादंबऱ्यांचा सेट ६८८ त देऊं ट. ह. शिवाय. फुटकळ पुस्तकांस भर किंमत पडेल.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें-शहर.

अगदीं सोळा आणे !



चित्रकार:—श्री. वा. ल. धारगळकर.

प्रस्ताव.

कडवट परिस्थितीनें निराश झालेलें मन पुन्हां प्रसन्न करण्यासाठीं प्रेमळ वाचकांच्या रुपानें परमेश्वरच उभा राहिलेला पाहून आरंभीं त्या दयावंताचेच आह्मांला आभार मानले पाहिजेत. दुसऱ्या वर्षाच्या आनिश्चिततेमुळें आमच्या इच्छा जमिनदोस्त होऊन "अरुण" ह्मणजे चटकन चमकून एकदम गडप होणाऱ्या इतर माला-मासिकासारखाच हास्यास्पद प्रयत्न होणार ही भंडाऊन सोडणारी भीति निराधार टरली ही त्या करुणाघन जगदीशाचीच कृपा समजली पाहिजे. एरव्हीं मनोहर बाह्यांगावर हुरळणाऱ्या रसिक वाचकवर्गाची (!) 'अरुणा'च्या अंतरंगाकडे मारून मुटकून तरी सदय दृष्टि वळली असती कीं नाहीं याची शंकाच होती. आश्चर्य आणि तितकाच आनंद वाटतो तो एवढ्याचसाठीं कीं पूर्ववयांत पोरसवदा ह्मणून गणल्या जाणाऱ्या "अरुणा"कडे तुच्छतेनें फिरणारा प्रौढांचा दृष्टिक्षेप आतां 'उगीच' ह्मणून तरी तेथें थोडा वेळ स्थायिक होतो.

अग्रेसरत्वाचा मान पटकावण्याच्या सध्यांच्या तीक्ष्ण चढाओढींत आमच्या चिमुकल्या धाडसाचा टिकाव धरण्याचा अवधि वाचकवंदाच्या प्रेमळ साहाय्यावर सर्वस्वी अवलंबून आहे असें पुन्हां पुन्हां त्यांच्या कानींकपाळीं ओरडण्यांत काय अर्थ? झोपीं गेलेल्याला जागे करणें सुकर जातें; पण झोंपेच्या ढोंगाखालीं जागा असलेल्याला जागा करूं पहाणें मुष्किल होतें. आमच्या पहिल्या वर्षाची करामत ओळखून सुद्धां बुध्द्याच डोळ्यावर कातडे ओढणाऱ्यास कोण काय करणार?

प्रत्येक अंक मनपसंत असूनसुद्धां केवळ आपल्या लेखाला १२ व्या अंकापर्यंत स्थळ देण्यांत आलें नाहीं ह्मणून एका दोघां वर्गणीदारांची पुढें वर्गणीदार न रहाण्याबद्दल आलेलीं पत्रें वाचून वडयाचें तेल वांग्यावर काढण्याचा त्यांचा हा आंधळा राग अजब आश्चर्यकारक खरा असें वाटणे साहजिकच आहे. लेखाच्या बरेवाईटपणाकडे डोळेझांक करून केवळ लेखक वर्गणीदार आहे एवढ्यासाठीच त्याच्या लेखाला बेशक स्थळ देऊन लांचखाऊ स्वभावाचें दिग्दर्शन करणे निदान आह्मांला तरी आवडत नाहीं. अशानें टाकाऊ वाङ्मय निर्माण करण्याच्या नालायखीबरोबर मनाचा कमकुवतपणाहि दाखवल्याचा दोष पदरीं पडून लेखाच्या महत्वापेक्षा त्याच्या 'किंमती'लाच आह्मीं किंमत देतो असे होईल. हा दोष टाळण्यासाठीं तरी सहृदय वर्गणीदारानीं आह्मांला या भलत्या मोहाला बळी पाडण्याचे मनांत आणूं नये.

गेल्या वर्षाच्या दुप्पट आकार या वर्षी करण्याचा मानस होता. तो एवढ्या-साठींच कीं इतर माला-मासिकाच्या मानानें 'अरुणा'ची पानें थोडी दिसतात अशी कित्येकांकडून तक्रार आली म्हणून. पण तितक्याच खर्चांत दुप्पट आकार करणें म्हणजे अंक पातळ दिसून व्यवहारचतुर वाचकांना ओरड करण्यास जागा देणें. शिवाय मूळ शोभे-चाहि लोप होणें संभवनीय होतें. आणि म्हणूनच आकार दुप्पट करण्याचा बेत बदलून तो कांहींसा वाढविण्यांत आला आहे. परंतु ज्याला या 'धंद्या'ची माहिती आहे त्याला आम्हीं गेल्या वर्षांत दोन रुपयाच्या किंमतींत दिलेली जवळजवळ ६०० सुंदर मजकुरानें भरलेली ग्लेझ पृष्टें आणि १५-२० आर्टपेपरवरील चित्रें पाहून वर्गणीपेक्षांहि मजकूर जास्त किंमतीचा होता अशी त्याची खात्री होईल.

मासिक सुरू करतेवेळीं प्रथम तें लहान मुलांसाठींच काढावयाचें मुख्यतः ठरलें होतें. पण सद्यस्थितींत लहान मुलांच्या अभ्युदयार्थ आम्हांला उत्तेजन देणाऱ्या उदार मनांच्या रसिकांची वाण पडल्यामुळें आम्हीं लहान मुलांना फार थोडा भाग देऊन बाकी सर्वसाधा-रण वाचकांना आवडेल असा ठेवला होता. पण आतां लहान मुलांसाठीं चटकदार आणि त्यांच्या मेंदूनां चलन देणाऱ्या विषयांची निवड करून दर वेळीं कमींतकमी ८-१० पानें त्यांच्यासाठीं राखलीं आहेत. **त्यानां प्रोत्साहन देण्यासाठीं त्यांच्याकडून कांहीं गोष्टी आणि छोटे निबंध मागवून त्यांत उत्तम ठरेल त्याला एखादें उप-युक्त पुस्तक पाठविण्यांत येईल.** ही चुरस दर महिन्याला चालू ठेवली आहे. बाललेखकांना लेखनकलेची आवड उत्पन्न करण्यासाठीं आम्हीं शक्य ती खटपट करणार आहों. उदार रसिकानीं आम्हांला या कामांत अवश्य सहाय्य करावें. दोन, तीन अंकानंतर एखादी हास्यकारक चित्रमय गोष्टहि देण्यांत येणार आहे.

"क्षणभंगुर" या चटकदार कादंबरीची पृष्ठें वर्षाअखेर ती पूर्ण होईल, या मानानें दर अंकांत देण्यांत येतील. परंतु आठापेक्षां कमी पानें मुळींच देण्यांत येणार नाहींत. कादंबरीशिवाय चालू विषय कुठचाच नसणार. गेल्या वर्षी तसें केल्यामुळें आम्हांला कांहीं जणांकडून दूषण देण्यांत आलें. पण या वर्षी तशी खबरदारी घेण्यांत आली आहे.

गेल्या अंकांतल्या विनंतीवरून कांहीं कनवाळु वर्गणीदारांनीं कष्ट करून बरेच नवीन वर्गणीदार मिळवून दिले. इतर सहृदय वाचकहि त्याच मार्गाचा अवलंब करतील अशी आशा आहे. अंक दोन महिने पाठीं पडल्यामुळें आणि ते भरून काढणें शक्यच नसल्यामुळें ते दोन महिने सोडून २ रें वर्ष सप्टेंबरपासून सुरू केलें आहे. यापुढें अंक दर महिन्यास नियमित काढण्याचें ठरविलें आहे.

शेवटीं हें वर्ष आम्हांला आणि आमच्या वाचकांना सुखाचें जावो अशी त्या जग-नियंत्याकडे प्रार्थना करून हे प्रास्ताविक शब्द आटोपते घेतों. **—संपादक**

वस्तुस्थिति कीं स्वप्न ?

बी. ए. पास होऊन मला सहा, सात महिने लोटले होते. पण मी अजून रिकामाच होतों. नोकरीसाठीं मी कितीतरी खटपट केली. पण मुंबईसारख्या बेकार लोकांच्या दाट वस्तींत माझा अजून टिकाव लागला नव्हता. तसें म्हटलें तर मी ग्रॅज्युएट होतों. पण मुंबईंत शिक्षणाला विशेष मान नसल्यामुळें मॅट्रिकमध्यें नापास झालेल्या विद्यार्थ्यापेक्षां माझी किंमत कुठलाहि 'साहेब' जास्त समजत नव्हता. घरची स्थिति माझें शिक्षण पुढें चालवण्याइतकी समाधानकारक नसल्यामुळेंच मी या नोकरीच्या फंदांत पडलों होतों. एरव्हीं शाळेंत असतांना साहेबलोकांचा नोकरावरील जुलुम, पगारवाढीकडे डोळेझांक करून रात्रीं, बेरात्रीपर्यंत त्यांना कामाच्या रगाडयाखालीं पिळून काढण्याचा बळजबरीपणा, हरघडी 'डॅम' 'निग्गर' 'फूल' इत्यादि शिव्यानीं होणारी त्यांची छळवणूक वगैरे बातम्या ऐकून मी नोकरीचा पक्का द्वेष्टा आणि तितकाच गांधीचा 'स्टँच फॉलोअर'(कट्टा शिष्य) आहे हें प्रत्येकाला ठाऊक होतें. पण आतां प्रापंचिक परिस्थितीकडे दुर्लक्ष्य करणें अशक्य झाल्यामुळें माझ्या मताविरुद्ध मी नोकरीसारखें कटुकर्तव्य करण्याला तयार झालों होतों.

पण मी मोठया नाईलाजानें नोकरी करण्यास तयार झालों असलों तरी नोकरी कांहीं तितक्या आतुरतेनें माझी वाट पहात नव्हती. दहा वाजतां जेवलें कीं सकाळचा वेळ घालवून इंग्रजीचें कसब दाखवून 'साहेबा'ला खष करण्यासाठीं लिहून तयार केलेले अर्ज नीट गुंडाळी करून घेऊन सबंध 'कोट' पालथा घालण्यास निघावयाचे हा माझा आज जवळ जवळ पांच सहा महिने कार्यक्रमच होऊन बसला होता. पहाटें रस्त्यावरचा काळोख नाहींसा होण्यापूर्वीच हँगिंग गार्डनवर जातांना वाटेंत 'पोऱ्या' कडून टाइम्स घेणारें मीच पहिलें गिऱ्हाईक होतों. त्यांतल्या ' वॅंटेड'च्या जाहिराती वाचल्यावर चालू राजकारणावर नुसता दृष्टिक्षेप सुद्धां टाकण्यास मी राजी नव्हतों. स्वतःच्या योग्यतेची जाहिरात आढळल्यावर सुंदर वाक्यरचनेच्या लोभास बळी पडून मी चार पांच ' रूल्ड्' (आंखलेले) कागद नासवून नंतर एक मनाजोगता अर्ज तयार करून ऑफिसांत जात होतों. पण माझ्याहि अगोदर बेकार सुशिक्षितांची तेथें झुम्मड लागलेली पाहून व त्यांत 'बी. ए. ऑनर्स', 'एम. ए. फेल' वगैरे माझ्यापेक्षां वरच्या दर्जाचे उमेदवार पाहून मी पाठला पाय घेत होतों. तशांतहि धीर धरून मी पक्या रानटीपणानें 'साहेबा'च्या टेबलापर्यंत शिरकाव करून अर्ज त्याच्या सुपूर्द केला तरी दुसऱ्या दिवशीं त्याच्याकडून आलेल्या निराश उत्तरावरून मी दुसऱ्या ऑफिसांत हेलपाटे घालीत होतों.

सतत पांच महिने नोकरीसाठीं रखरखीत उन्हांतून वणवण फिरूनहि ती न मिळाल्यामुळें मी संतापून गेलों होतों. पण म्हणून मी माझ्या प्रयत्नांत मुळींच कसूर करीत नव्हतों. टाइम्स, क्रॉनिकलप्रमाणें मी केसरी, महाराष्ट्रहि लायब्ररींत जाऊन पाहूं लागलों. 'महाराष्ट्रा'साठीं दर सोमवारीं दुपारीं साडेबारा वाजतां आणि ' केसरी'साठीं दर बुधवारीं सकाळीं पावणेदहा वाजतां मी लायब्ररींत टपाल येण्याच्यावेळीं बरोबर हजर रहात असल्यामुळें लायब्ररीच्या 'क्लार्क'चा तर मी दाट परिचयाचा झालों होतों. त्या वारीं आणि त्या वेळीं मी लायब्ररींत आलों नाहीं कीं मी दुसरीकडे एखाद्या खातरीलायक नोकरीच्या. शोधार्थ गेलों होतों असें दुसऱ्या दिवशीं मी न विचारतांच मला पहातांच तो म्हणत असे.

नित्यनियमाप्रमाणें मी एका सोमवारीं दुपारीं, ' कोटांत ' जावयाचें नसल्यामुळें, लायब्ररींत गेलों. क्लार्कनें ' गुडनून ' म्हणतांच मीहि डोकीवरची टोपी जराशी काढून त्याच्याकडे हंसतमुखानें वाकडी मांन करून पाहिलें आणि खुर्चीवर बसून ' महाराष्ट्र ' हातांत घेतला. इतर मजकुरावरून झरझर नजर फिरवीत ' पाहिजे ' म्हणून मधून मधून झळकणाऱ्या ठळक जाहिरातीचें मी नीट निरीक्षण करूं लागलों. एकापाठून एक पानें उलटल्यावर शेवटचें एकच पान उलटावयाचें राहिलें. आणि तें उलटणार इतक्यांत उजव्या हाताच्या खालच्या कोपऱ्यांत ' पाहिजे ' या हेडिंगखाली असलेली जाहिरात वाचूं लागलों. जाहिरात छोटीशीच होती. खुद्द नागपुरांत +.+ हायस्कूलांत असिस्टंट मास्तरच्या जागेसाठीं गणित व इंग्लिश विषयांत प्रवीण असलेल्या एका बी. ए. झालेल्या गृहस्थाला शंभर रुपयावर नेमावयाचें होतें. मुंबईंत उमेदवारांच्या वाढत्या संख्येपुढें टिकाव लागणें जवळजवळ अशक्य कोटींतलें असल्यामुळें कुठेंतरी बाहेरगांवींच जाण्याचें मी गेल्या महिन्या, दीडमहिन्यापासून ठरवलें होतें. मी बाहेरगांवच्या ठिकाणीं चार, पांच वेळां जाहिरात पाहून अर्ज पाठवले होते. पण प्रत्येक वेळीं माझी निराशा झाली होती. म्हणून 'महाराष्ट्रां'तली ही जाहिरात पाहून मला पहिलेपणाचा आनंद होणें शक्यच नव्हतें. आणि म्हणून मी घरीं जाऊन नेहमीच्याच उत्तराची अपेक्षा करून अर्ज रवाना केला. त्या भरंवशावर विलंबून रहाण्याइतकी माझ्या मनाची खात्री नसल्यामुळें मी उत्तर येईपर्यंत रिकामा न बसतां 'वॅंटेडच्या' जाहिराती धुंडाळतच बसलो होतों.

चौथ्या दिवशीं मी ' कोटां 'तून साडेचार, पावणेपांचच्या सुमारास दमून घरीं येतों तर टेबलावर माझ्या नांवाचें एक पाकिट पडलेलें. मी झटकन तें फोडून उघडलें आणि आंतल्या कागदाची घडी उलगडून मजकुरावरून नजर टाकली. आज पांच, सहा महिन्यांची माझी तपश्चर्या अखेर फळाला आली. मला ताबडतोब निघून हजर रहाण्याबद्दल त्यांत लिहिलें होतें. आनंदातिरेकानें माझें अंग जोरानें थरारलें आणि त्या धक्क्यानें टेबलावर ठेवलेल्या दिव्यानें टेबलावरून खालीं उडी घेतली. कांचाचा खळ्ळ् आवाज ऐकून आंतून आई धाऊन आली.

" काय झालं रे ? फोडलास वाटतं दिवा ? " तिनें जरा रागानेंच म्हटलें.

" जाऊंदे ग आई; पण हें बघ मला नागपूरला टाकलेल्या अर्जाचें ताबडतोब निघून येण्याबद्दल उत्तर आलें आहे. "

" खरं कीं काय ? " दिव्याचा प्रश्न तसाच राहून तिनें माझ्याजवळ येत म्हटलें.

" खरं म्हणजे ? हें पहाना. पण तुला कुठें म्हणा इंग्रजी वाचतां येतं आहे. "

" पगार काय आहे त्या जागेला ? "

" शंभर. "

" फार आहे ना रे ! पण काम कसलं ? "

" मास्तरचं. "

" म्हणजे घसा फोडायचं ना ? त्यापेक्षां रिकामाच बसेनास उगीच. पोरांपुढें ओरडून रक्त आटवायचं कपाळीं मास्तराच्या. "

" होय, तें खरं आहे; पण मी तसा खेडेगांवांतल्या एखाद्या तात्यापंतोजीसारखा मास्तर नाहीं आणि मला घसाफोड करायला लावणारी पहिली, दुसरीची पोरंही नाहींत. जागा चांगल्या हुद्याची आहे. "

" पण कुठें जायचं म्हणालास ? "

" नागपूरला "

" मुंबईपासून वरंच लांब कीं रे ! जेवणाखाण्याचे हाल होतील रे तुझे तिथें. तें खानावळींतलं अन्न कां तुझ्या पचनी पडणार ? त्या शेजारच्या रमावन्संचा तो चुलत दीर आहेना नासकाला ? त्यानं म्हणे खाणावळींतल्या जेवणानं आपली प्रकृति पुर्वीच्या निम्म्यानं सुद्धां राहिली नाहीं म्हणून लिहिलं आहे असं सांगत होत्या त्या. आणि बाई खरंच असेल तें ! तें दर घासागणीक भातांत सांपडणारे वाटाण्याएवढे दगड, तो अर्धा कच्चा शिजवलेला भात, ती पातळ पाण्यासारखी आमटी अन् ती भाजी ! अंगावर शहारे येतात ती वर्णनं ऐकून ! आणि तें अन्न कां तूं खाणार ? घरचं जेवण जेवण्याची संवय झालेल्या तुला तें जेवण कां पचणार ? उगीच शरीराचे हाल. त्यापेक्षां राहिनास कां इकडेच. आज सहा महिने राहिलास तसा इथें नोकरी लागेपर्यंत आणखी कांहीं महिने राहशील. "

आणखी तिनें बरेंच चरहाट वळवलें. पण मी तर मुंबईला अगदीं कंटाळून गेलों होतों. आणि आईच्या समजूतीप्रमाणें मला आणखी कांहीं महिन्यानीं मुंबईतच नोकरी लागेल याच्यावर विश्वास ठेवायला मी तरी मुळींच तयार नव्हतों. मुंबईतल्या वाढत्या बेकारीची आईला काय कल्पना असणार ? आणि म्हणूनच ती तसें म्हणत होती. पण माझा तेथें जाण्याचा निश्चयच झाला होता आणि तो कोणासाठींहि बदलणें शक्य नव्हतें.

संध्याकाळीं बाबा ऑफिसांतून आल्यावर मी सांगण्याच्या पूर्वीच माझ्या अर्जाचा निकाल सांगून त्याबरोबरच रमावन्संच्या चुलत दिराचा खाणावळींतला अनुभव सांगून मला नागपूरला जाऊं न देण्याचा तिनें हट्ट धरला. बाबांना जरी तिचें म्हणणें पटत होतें तरी मी अशी सुसंधी दवडूं नये अशाच मताचे ते होते. आणि अखेर बाबांनी आईला नीट समजाऊन सांगितल्यावर आणि माझ्याकडून चार दिवसाआड पत्र पाठवण्याचें व सुटींत घरीं येण्याचे तीनतीनदां वचन घेतल्यावर तिनें मला जाण्यास मोठ्या कष्टानें परवानगी दिली.

मुंबईची नोकरीसाठीं करावी लागणारी खटपट आतां कायमची दुरावल्यामुळें मला विशेषच आनंद होत होता आणि त्या आनंदांत मग्न असल्यामुळें गाडी एकापाठून एक किती स्टेशनें पाठीं घालीत होती हें बराच वेळ माझ्या लक्षांतच आलें नाहीं. नागपुरला जाण्याची माझी ही पहिलीच खेप असल्यामुळें आणि त्यांतल्या त्यांत आगगाडींतून इतका दूरचा प्रवास करण्याची माझी हौस आज ही अशा तऱ्हेनें फिटत असल्यामुळें माझें अंतःकरण आनंदानें भरून आलें होतें आणि त्या भरांत मी इतकीं वर्षें सहवासांत घालवलेल्या आईची, बाबाची आणि छोट्या पद्माची आठवणहि विसरून गेलों. पण त्या आनंदाबरोबर प्रथम प्रथम खिडकींतून निसर्गाची बाहेरची शोभा पाहण्यांत माझें मन जरी रमून गेलें होतें तरी तेंच तच पहाण्यानें अखेर कंटाळा येऊन मी माझे हँडबॅगमधलें 'भयंकर दिव्य' हें पुस्तक काढून वाचूं लागलों. पण कसले तरी विचार करण्याकडेच माझें मन त्यावेळीं दंग असल्यामुळे आणि डब्यांत बसलेल्या उतारूंच्या गोंगाटामुळें माझें तिकडे लक्ष्यच लागेना. माझ्या बाकाच्या समोर एक साधारणसा उतार वयाचा गृहस्थ चंची सोडून अडकित्त्यानें सुपारी फोडीत बसला होता. तो माझ्याकडे एकसारखा टक लावून पहात होता हे माझ्या दोन, तीनदां लक्ष्यांत आलें. पण मी तिकडे विशेषसें लक्ष्य दिलें नाहीं. पण वाचण्यांतहि मन रमत नसल्यामुळें मी पुस्तक कंटाळूनच बाजूला टाकलें आणि डोक्यावरची टोपी काढून खिडकीवर कोंपर ठेऊन उगीच डब्यांतल्या माणसांकडे पाहूं लागलों. त्या मनुष्याला माझा वेळ जात नाहीं हें लक्ष्यांत आल्यासारखें दिसलें. त्यानें डाव्या हातांत कातरलेली सुपारी पुढें करून हंसत हंसत म्हटलें, "घ्या."

"छेः नको." मी म्हटलें.

"कां ? खात नाहीं ?"

"छेः छेः तसं कांहीं नाहीं. पण आतां विशेषशी गरज नाहीं."

"बरं. ठीक आहे." त्यानें ती आपल्या तोंडांत टाकीत म्हटलें. नंतर आडकित्ता चंचींत ठेऊन ती गुंडाळून आपल्या भल्या मोठ्या खिशांत ठेवतांना सुपारी तोंडांत असल्यामुळें जरा बोबड्या स्वरांत म्हटलें,

" कुठें जायला निघाला ? "

" नागपूरला. "

" तें घर वाटतं तुमचं ? मुंबईंत कांहीं कामासाठीं....."

" छेः छेः मी मुंबईचाच. नागपूरला नोकरीसाठीं जातों आहे. "

" नोकरीसाठीं ? हो. हो. बरोबर आहे, मुंबईंत नोकरी मिळणं म्हणजे महा मुष्कील होऊन बसलं आहे. मग तुमच्यासारख्यांनी बाहेरगांवीं जाऊन नोकरी करायची नाहीं तर काय ? आला, कठीण काळ आला. " त्यानें खिडकींतून सुपारीचे कण थुंकींत म्हटलें. आपल्या उपरण्यानेंच तोंड पुसून त्यानें पुन्हां विचारलें,

" कसली नोकरी आहे ? "

" 'असिस्टंट टीचर'ची हायस्कुलांत. "

" वः छान. पगार ? "

" शभर. "

" ठीक आहे पगार. ग्रॅज्युएट असाल बहुतेक ? "

" हं. यंदाच बी. ए. झालो. "

" पाहिलंत ? तुमच्यासारखा बी. ए. झालेल्यांची ही अशी स्थिति. काळ फिरला. दुसरें काय ? तुमची मंडळी मुंबईलाच आहे वाटतं ? "

" होय. मंडळी अशी फार नाहीं. बाबा, आई आणि धाकटी बहिण. "

" वडील कुठें असतात ? "

" इंपिरीयल बँकेंत. "

" आपल्या वडिलांचं नांव काय ? राग मानूं नका बरं मी बारीकसारीक बातमी विचारतो म्हणून. " तो मनुष्य हंसत हंसत म्हणाला. मला या त्याच्या ' भिडस्त ' स्वभावाचें हंसूं आलें. विडी आणि पानसुपारी घरच्या कुटुंबाचीसुद्धां माहिती काढण्यासाठीं रेल्वेच्या प्रवासांत कशी उपयोगी पडतात तें मला जरी ऐकून माहिती होतें तरी आज प्रत्यक्ष अनुभवामुळें मौज वाटून मनांतल्या मनांत त्या विचारानें हंसूं येऊं लागलें. पण चेहऱ्यावर तें दाखवणें हें सभ्यतेचा अतिक्रम करण्यासारखें आहे असें वाटून मी त्याला उत्तरादाखल म्हटलें,

" वडिलांचं नांव माधवराव विष्णु साने. "

" अं ? " त्यानें एकदम दचकून म्हटलें.

" माधवराव विष्णु साने. कां ? तुमची आणि बाबांची ओळख आहे वाटतं ? "

" छेः छेः ओळख कुठली हो असणार ? नांव कुठेतरी ऐकल्यासारखं वाटलं. "

" अस्सं. "

नंतर त्यानेंहि मी न विचारतां आपली माहिती मला सांगितली. त्याला एकंदर तीन मुली आणि एक सहा सात वर्षांचा मुलगा इतकींच अपत्यें होतीं. त्यापैकीं दोघा मुलींची लग्नें झाली असून तिसरी लग्नाची होती. मुंबईंत बिऱ्हाड आणावयाचें असल्यामुळें आणि जमलें तर तिसऱ्या मुलीसाठीं नवरा मुलगा पहावयाचा असल्यामुळें तो मुंबईला आला होता आणि आतां जागा ठरवून तो परत आपल्या गांवीं जात होता. एवढी माहिती सांगायला त्यानें नाहीं म्हटलें तरी दीड तास लावला.तो दीड तास कधीं गेला हेंसुद्धां मला कळलें नाहीं.

बऱ्याच वेळानें त्या गृहस्थाचे उतरण्याचें स्टेशन जवळ आल्यामुळें त्यानें आपला रुमाल वगैरे बांधण्यास सुरुवात केली. सामान म्हणजे फक्त एक ट्रंक व एक छोटीशी बॅग एवढेंच होतें. थोडया वेळानें स्टेशन आल्यावर त्यानें बॅग हातांत घेतली आणि ' येतो हं, ओळख ठेवा ' असें म्हणून तो ट्रंक हमालाच्या डोक्यावर देऊन गाडीखालीं उतरला. पुन्हां मानेनेंच हंसल्यासारखें करून त्यानें ' जातो ' म्हणून सांगितलें. तो मनुष्य दिसेनासा झाल्यावर मीहि उतारुंच्या गडबडीकडे पहात त्याच्याबद्दल विचार करूं लागलो.

× × ×

नागपूर स्टेशनवर मी जवळजवळ रात्रीं दोन अडिचच्या सुमारास पोहोंचलों. त्या स्टेशनवर उतरणारे अवघे पांच, सहाच उतारू होते. मी कधींच प्रवास केला नसल्यामुळें नागपूरला मला इतक्या मध्यान्ह रात्रीं उतरावें लागेल हें मला ठाऊक नव्हतें. पण आतां प्रसंगच ओढवला. पोर्टरकडून मी माझी ट्रंक खालीं उतरवून घेतली आणि हातांत बॅग घेऊन स्टेशनच्या बाहेर आलों. अवघी एकच गाडी उभी होती. मी पोर्टरला आंत ट्रंक ठेवण्यास सांगून मी बॅग घेऊन आंत बसलों.

" कुठं जायाच शेट ? " गाडीवाल्यानें गाडी हाकण्याच्या तयारीनें विचारलें.

" हायस्कूलांत. "

" पण शेट, आतां तें बंद झालय. "

इतक्या रात्रीं तें उघडें असणेंच असंभवनीय होतें. मग आतां जावयाचें कोठें तेंच मला कळेना. नागपूर स्टेशन दिवसा येईल व मग तडक शाळेंत प्रिन्सिपॉलना भेटून आपली सोय करून घ्यावयाची असें मी निघतांना ठरवलें होतें. पण आतां काय ? शाळेच्या पत्त्याशिवाय मला आणखी कोणाचाच पत्ता ठाऊक नव्हता. आणि आतां तर दरवाजे बंद झालेले. कुठें रात्रभर पडण्यासाठीं तरी जागा मिळेल कीं नाहीं ही भ्रांत पडून मी गाडीवाल्याला विचारलें,

" काय रे, एखादी धर्मशाळा वगैरे आहे का रे कोठें ? "

" धर्मशाळा ? हव्या तेवढया. मोठमोठे बंगलेसुद्धां रिकामे आहेत. तुम्हीं तिकडे जाऊन राहिलांत तरी कोणी नाहीं विचारणार. "

" म्हणजे ? " मी आश्चर्यानें विचारलें.

" म्हणजे काय राव ? अख्या नागपुरांत प्लेगानं कहर—"

" प्लेग ? " त्यानें आपलें वाक्य पुरें करण्यापूर्वीच मी मोठ्यानें विचारलें.

" होय साहेब. आज महिना, दोन महिने सारखा प्लेग चालू आहे. नागपूर नुसतं ओस पडलं आहे मोठमोठे बंगले अन् घरं स्मशानवाणी शून्य झालीं आहेत. "

प्लेग या नुसत्या शब्दानांच मी इतका घाबरत होतों ! मग प्रत्यक्ष आतां आपण होऊन असल्या जागेत उडी घेतल्यावर माझी काय स्थिति झाली असेल ? त्या काळोख्या रात्रीं, अनोळखी गांवांत, निर्जन रस्त्यावर मी सारी परिस्थिति विसरून उभा आहे हेंच जवळजवळ मी विसरून गेलों. मी प्रत्यक्ष प्लेगच्या गांवांत आलों आहे हा विचारच इतका भयानक होता ! त्यापेक्षां मुंबईंतले नोकरीचे हेलपाटे बरे होते असें शंभरदां तरी माझ्या मनांत आलें असेल. नोकरीसाठीं जिवावर पाणी सोडण्याचा मूर्खपणा कोण करील ? पण मी नोकरीसाठींच आलों होतों आणि तेथें रुजू होणें म्हणजे आपला मरणकाल आपणच ओढवून घेण्यासारखें होतें. शंभर रुपयांवर पाणी सोडून पुन्हां मुंबईला आणखी वर्ष सहा महिने रिकामपणांत काढण्याला माझें आशाखोर मन तयार असणेंच शक्य नव्हतें. शंभर रुपयांच्या जागेवर मी जितका मोहवश झालो होतों तितकीच प्लेगच्या कहराची बातमी ऐकून माझ्या छातीची धडधड स्पष्ट ऐकूं येण्याइतकी जोरानें होत होती. हें मला पूर्वीच कळतें तर ! आशाच नसल्यावर अपयशाच्या जाणिवेचा मनावर फारसा परिणाम होत नसतो. पण यश आल्यावर एखादी अपरिहार्य अडचण उद्भवून त्याच्यावर तिलांजली दण्याचा प्रसंग ओढवला म्हणजे यशःप्राप्ती झालेली असल्यामुळें विशेष दुःख होतें. मला नोकरीच मिळाली नसती म्हणजे मला संवयीमुळें कांहींच दुःख वाटलें नसतें; पण सारें कांहीं ठाकठीक होऊन नोकरीवर रुजू होण्यासाठीं नागपूरला आल्यावर प्लेगची अडचण मध्यें येऊन निराश करूं लागल्यावर मला विशेष दुःख वाटूं लागलें. शंभर रुपयांचा मोह सोडणें हें माझ्या भित्र्या मनाला धीट करण्याइतकेंच कठीण होतें. नागपूरच्या प्लेगची मला बातमी कळणें पूर्वी शक्य होतें. ज्या ' महाराष्ट्रांत ' मला नोकरीची रिकामी जागा दिसली त्यांतच ' इहवृत्त ' या सदरांत प्लेगबद्दल माहिती येणें शक्य होतें. पण ' पाहिजे ' या शब्दाइतका सबंध अंकांत माझा कुठचाहि शब्द परिचयाचा आणि तितकाच प्यारा नसल्यामुळें 'इहवृत्ता'कडे माझी नजर कशी फिरकणार ? मी पूर्वीच पाहिलें असतें—

" मग काय राव ? कुठें चालला ? " मी माझ्या विचाराच्या तंद्रींतच स्तब्ध राहिलेलों पाहून गाडीवाल्यानें मला आपल्या भसाड्या सुरांत विचारलें.

" अं ? " मीं एकदम दचकून भानावर येऊन विचारलें.

" मीं तुम्हांला एक चांगलं घर दावतों. चला, बसा गाडींत. "

बऱ्याच वेळानें एका साधारणशा मोठ्या दिसणाऱ्या घरापुढें गाडी थांबली. मी त्याला विचारण्यापूर्वींच त्यानें आपल्या बैठकीवरून खालीं उडी मारली आणि म्हटलें,

" हा बंगला बरा हाय. इकडंच उतरा."

" घरांत कोणी आहे ? "

" तें ठावं नाय. पण खालचं बिऱ्हाड तर केव्हांच निघून गेलय. "

" ठीक आहे. हें सामान ने आंत. " असें म्हणून मी खालीं उतरलों आणि दरवाजाजवळ आलों. दरवाजा उघडाच होता. मी झरकन काडी ओढून आंत पाहिलें. समोरच जिना होता. डाव्या हाताला दरवाजा होता. समोरच लांबट, रिकामी जागा असून डाव्या हाताला आणखी तीन दरवाजे होते. आणि—

पण इतक्यांत काडी विझली; गाडीवाल्यानें माझें सामान आणून त्या जिन्याखालीं ठेवलें आणि भाडें चुकतें होतांच तो निघून गेला.आतां मी त्या स्मशानासारख्या दिसणाऱ्या निस्तब्ध जागेंत एकटाच राहिलों. सारें भयाण दिसत होतें. आणि त्यांतल्यात्यांत मनांत प्लेगचा विचार भंडाऊन सोडीत असल्यामुळें त्या भयाणतेंत विशेषच भर पडत होती.

माझ्या ट्रंकेंत एक मेणबत्तीचा पुडा होता. त्यांतली एक मेणबत्ती काढून मी पेटवली. त्या अस्पष्ट उजेडानें तिथली भयाणता जास्तच वाढवली; तरी मी माझा दरक्षणीं कोंडला जाणारा श्वास धीटपणानें सोडीत होतों. मी थोडावेळ तेथेंच माझ्या ट्रंकीवर बसलों. सबंध इमारत आतां माझ्या ताब्यांत होती. तळमजल्याच्या कोंदट व कुजक्या हवेंत झोपण्यापेक्षां वरच्या मजल्यासारख्या हवेशीर व उघड्या जागेंत पडणेंच चांगलें असा विचार करून मी मेणबत्ती उचलली आणि धैर्य धरून जिन्याची एक एक पायरी चढूं लागलों. वरहि जवळजवळ खालच्यासारख्याच खोल्या वगैरे होत्या. मी मेणबत्ती पुढें धरून एक एक खोली डोळ्याखालून घालवली.आणखी एकच मजला राहिला. जिना चढून मी त्याहि मजल्यावर आलों. तेथें खालच्या मजल्यापेक्षां कांहीं निराळीच रचना आहे असें मला वाटलें. मी उजव्या हाताच्या खोलींत पाऊल टाकलें. आणि सहज एक दृष्टिक्षेप टाकला. समोरचें दार अर्धवट बंद होतें. मी मेणबत्तीच्या बाजूला वाऱ्याच्या निवारणार्थ दुसरा हात धरून तिकडे कशी रचना आहे तें पहाण्यासाठीं पुढें पाऊल टाकणार इतक्यांत कसलासा आवाज मला ऐकूं आला. मी एकदम दचकलों. अजूनपर्यंत टिकाव धरलेलें धैर्य त्या आवाजानें चटकन् नाहींसें होऊन अंगांतले कपडे घामाने अगदीं ओले होऊन गेले. त्या निर्मनुष्य वस्तींत हा आवाज कसला झाला तें मला कळेना. माझा भुतासमंधावर जवळ जवळ मुळींच विश्वास नव्हता. पण त्यावेळीं तोहि विचार माझ्या मनांत उद्भवून भयानें माझ्या हाताला कांपरे सुटलें आणि हातांतली मेणबत्ती खालीं पडून जिकडे तिकडे काळोख

झाला. माझ्या छातीची धडधड मला स्पष्टपणें ऐकूं येत होती. मला खालची मेणबत्ती उचलून पुन्हां ती पेटविण्याइतकेंसुद्धां धैर्य झालें नाहीं.

मी पुन्हां पहिल्यासारखा आवाज ऐकला. पुन्हां एकदां ऐकला. जास्त लक्षपूर्वक ऐकल्यावर तो आवाज कोणाच्या तरी कण्हण्याचा असावा असा मला संशय आला. माझी भूतासंबंधाची भिती बरीचशी नाहींशी झाली आणि मी तो आवाज ऐकूं येत असलेल्या दिशेकडे कान देऊन ऐकूं लागलों. कोणीतरी कण्हत होता ही आणखी दोन, तीन वेळां आवाज ऐकून माझी खात्री झाली. खोलींत सबंध काळोख असल्यामुळें समोरच्या दाराच्या फटींतून अस्पष्ट उजेडाची तिरीप येत असलेली मला दिसूं लागली. त्या दिशेलाच तें कण्हणारें माणूस असावें असा मी तर्क करून हळुहळुं मांजराच्या पावलांनीं दारापर्यंत गेलों व हळुंच ते उघडलें. त्याचा कर्र् असा आवाज ऐकून मी क्षणभर दचकलों. पण पुन्हां धीर धरून दरवाजाबाहेर आलों. माझ्या उजव्या हाताला समोर आणखी एक दरवाजा होता. त्या खोलीबाहेर पडलेल्या कांहींशा उजेडावरून कण्हणारें माणूस याच खोलींत असावें असा मी निष्कर्ष काढला आणि हळु हळु त्या दरवाजासमोर जाऊन उभा राहिलों. आंत एका बिछान्यावर कोणीसा पुरुष अस्ताव्यस्त स्थितींत पडला होता आणि त्याच्या उशाजवळ त्याच्याकडे करुण नजरेनें पाहात एक स्त्री बसली होती. तो पुरुष एकसारखा कण्हत होता. मला त्याची ती हृदयद्रावक स्थिती पाहावेना, आणि मी पुढें पाऊल टाकणार इतक्यांत त्या स्त्रीचीच माझ्याकडे नजर जाऊन ती एकदम कांपऱ्या स्वरांत म्हणाली,

"माझ्यावर दया करा. एक पेलाभर पाणी तरी यांच्यासाठीं आणा. मी तुमचे उपकार विसरणार नाहीं. घरांत पाण्याचा एक थेंबसुद्धां शिल्लक नाहीं. घशाला अगदीं कोरड पडली आहे. तुम्हीं एवढी दया—"

पण मी पुढचे शब्द ऐकायला राहिलोंच नाहीं. मी माझ्यावरोवर मुंबईहून आणलेली पाण्याची बाटली तशीच माझ्या बॅगमध्यें पडली होती. मी जिन्याच्या दोन, दोन, तीन, तीन पायऱ्या एकदम उतरून खालीं आलों आणि पुन्हां ती बाटली लगबगीनें ॅगमधून काढून वर आलों. मी बाजूच्याच चमच्यांचून त्या मरणाच्या पंथाला लागलेल्या रोग्याच्या तोंडांत चार पांच वेळां पाणी घातलें; त्यामुळें त्याला बरीच हुशारी वाटत असल्यासारखें त्या बाईला वाटून तिचाहि चेहरा जरा प्रफुल्लीत झाला. पण तिला काय ठाऊक कीं ज्योत विझण्यापूर्वी ती उजळपणानें पेटायचीच !

"तीं दोन मुलें तिकडे तशीं पडली आहेत. यांनाहि प्लेग झाला आहे. अरेरे ! काय माझं फुटकं नशीब !" ती डोळ्याला पदर लाऊन रडूं लागली. तिनें दाखवलेल्या दिशेकडे मीहि पहिलें. कोपऱ्यांत दोन जवळ जवळ सात, आठ वर्षांची मुलें मरून पडली होती. त्या कुटुंबांतला तिसराहि जीव आतां पांच दहा मिनिटांचा सोबती होता. रहत

राहिलेल्या स्त्रीवर दुःखाचा पर्वत कोसळणार होता. अशी किती तरी कुटुंबें प्लेगच्या विशाल उदरांत गडप झालीं असतील आणि अशा या शहरांत आपण मुद्दाम मुंबईहून नोकरी करण्यासाठीं आलों आहों. मी दुसऱ्याच दिवशीं तेथून निघून जाण्याचा निश्चय केला. पण आज—

इतक्यांत त्या मनुष्याला उचकी लागली. मी एकदम त्या मुलांकडून त्याच्याकडे दृष्टि वळवतो, तों काय ! सगळा कारभार आटोपला. तिलाहि हें कळतांच तिनें जो मोठ्यानें हंबरडा फोडला ! अजूनपर्यंत दोन पोटच्या पोरांच्या मरणाचें दुःख तिनें सहन केलें. पण आतां तिचा दुःखावेग अश्रूंच्या वाटेनें जोरजोरानें बाहेर पडूं लागला. त्या निःस्तब्ध जागेंत तिच्या रडण्याचा केवढा तरी प्रतिध्वनि होऊं लागला. मला तिचें तें भेसूर रडणें अगदीं ऐकवेना. पण त्यावेळीं मला तिचें सांत्वन करणेंहि सर्वस्वी अशक्य होतें. अश्रूच्या वाटेनें तिचें जितकें दुःख ओसरेल त्याच्या निम्यानेंहि माझ्या सांत्वनपर शब्दांनीं ओसरणार नाहीं हें मला ठाऊक होतें आणि म्हणून मी खिडकीजवळ शून्य मनानें उभा राहून रस्त्यावर व मधून मधून आंतल्या हलक्कल्लोळाकडे पहात होतों.

बाहेर पहांटेची पक्ष्यांची किलकिलाट नुकतीच सुरू झाली होती. नागपूरासारख्या शहरांत रस्त्यावर त्यावेळीं चिटपाखरूंहि दिसत नव्हतें. त्या स्त्रीचा शोक आणखी जवळ जवळ पाऊण, एक तास सारखा चालला होता. नंतर त्यांत थोडासा विरंगुळा पडल्यावर मी तिची समजूत करूं लागलों. जवळजवळ एक तास खटपट केल्यावर तिचें रडणें थांबलें. पण मधून मधून एकदम ती जोराचे हुंदके देत होती.

उजाडल्यामुळें प्रेतांची व्यवस्था करण्यासाठीं मीं घराबाहेर पडलों. माहिती करून घेत घेत मी जवळजवळ सबंध शहर पालथे घातलें, तेव्हां संध्याकाळीं पांच, साडेपांचच्या सुमारास मोठया मुष्किलीनें कांहीं माणसें व प्रेतयात्रेचें सामान घेऊन आलों. नवऱ्याचें शव उचलतांना तर तिनें इतका शोक केला कीं निदान माझें तरी अंतःकरण पिळवटून निघालें. मी तिच्या सोबतीला राहून बरोबरच्या माणसांना प्रेताची व्यवस्था करण्यास सांगितलें. रडून रडून तिचे अश्रू आटून गेले होते आणि आतां तिचे डोळे निस्तेज दिसूं लागले. चेहऱ्यावर फिक्कटपणाची कितीतरी झांक मारूं लागली.

नागपूरचा मला एका दिवसाचा बराच अनुभव आला. सबंध नागपूरांत कितीतरी बी. ए. असतांना मला मुंबईत नोकरीवर रुजू होण्याचें पत्र आलें त्यावेळीं मला जितका आनंद झाला तितक्याच आतुरतेनें मी आतां पुन्हां मुंबईस कधीं पोहोंचतों असे मला होऊन गेलें. त्या संध्याकाळचीच गाडी धरावयाचा मी बेत केला. त्या स्त्रीचें नातेवाईक कोणीच नव्हतें. मला तिला एकटींच ठेऊन परत जाणें अगदीं आवडेना. तिला तेथेंच ठेऊन जाणें मला अगदीं निष्ठूरपणाचें दिसूं लागलें. मी तिला तसें विचारलें.

प्रथम ती कबूल होत नव्हती. पण तिची सारी परिस्थिति मी तिला उघड रीतीनें सांगतांच ती अखेर कबूल झाली. तिनें आवश्यक वस्तू एका ट्रंकमध्यें भरल्या आणि मी गाडी बोलाऊन तींत सर्व सामान भरून स्टेशनाची वाट धरली.

जवळजवळ धमणगांवला आल्यावर मी खालीं उतरलों. कांहीं खाद्यपदार्थ घेऊन मी परत डब्याजवळ येतो तों नागपूरला येतांना मला जो गृहस्थ भेटला होता तो आणि त्याच्याबरोबर एक लहान मुलगा, एक साधारण ३५-३६ वर्षांची स्त्री आणि एक सोळा सतरा वर्षांची तरुण मुलगी एवढीं आमच्या समोरच्या बाकांवर बसलेलीं. मी आंत चढून बरोबरच्या स्त्रीकडे ते खाद्यपदार्थ दिले आणि माझ्या जागेवर बसलों. इतक्यांत त्या मनुष्याचीच माझ्याकडे नजर जाऊन ते एकदम म्हणाले,

" ओहो, नागपूरला गेला होतां ना तुम्हीं ? "

" हो. पण-पण—"

" मग इतक्यांत परत परतला ते ? "

" नागपूरला प्लेगनें धुमाकूळ मांडून सोडला आहे. "

" माय गॉड ! मग तुम्हीं मला वाटतं दुसऱ्या दिवशींच निघाला असाल ? "

" होय. "

" च्. " त्यांनीं पानाला चुना लावतां लावतां म्हटलें. मी इतका मितभाषणी म्हणून मला बाबा आणि आई नेहमीं बोलत. पण त्यावेळीं नुकत्याच परिचय झालेल्या गृहस्थाशीं खूब बोलावें असें मला वाटूं लागलें. कां कुणास ठाऊक ! मी माझ्याबरोबरच्या स्त्रीच्या करुण कहाणीची सारी हकीगत त्यांना सांगितली. पण अजमासाबाहेर मी त्याला लांबण लावली. मी इतक्या अघळपघळपणानें कां बोलतो आहे तें माझें मलाच कळेना. कारण हा माझा स्वभाव नव्हता.

बायकाबायकांचें फार लवकर जमतें हें कांहीं खोटें नाहीं. माझ्याबरोबरच्या स्त्रीची आणि त्या गृहस्थाच्या बायकोची ओळख होऊन त्यांचे तिच्यावर ओढवलेल्या दुःखदायक प्रसंगावर बोलणें चाललें होतें. तो गृहस्थ बोलतां बोलतां त्या पहाटेच्या वाऱ्यावर कधीं झोंपला कोण जाणें ! मी बॅगमधलें पुस्तक काढून खिडकीला टेकून वाचीत पडलों. पुस्तकावर लक्ष्य होतें इतकेंच. पण वाचलेलें वाक्य कांहीं मला कळत नव्हतें. अगदीं कंटाळा आला होता. पण रिकामा बसण्याचा कंटाळा आला होता म्हणूनच डोळ्यापुढें मी पुस्तक ठेवलें होतें. मध्येंच पुस्तकाच्या अक्षरावरून माझी नजर वर गेली. तों समोर ती त्या गृहस्थाची तरुण मुलगी बसली होती. माझी तिच्याकडे दृष्टी गेली त्याच वेळीं तिनें माझ्याकडे पाहिलें. मी चटकन पुन्हां पुस्तकाकडे डोळे लावले. पण पहिल्यापेक्षांही माझी आतां विलक्षण स्थिति झाली. प्रथम वाक्य तरी वाचलें जात होते. पण आतां

तेवढ्यापर्यंत मजलच गाठेना. एकएका वाक्यावरून मी चार, पांच वेळां नजर फिरवीत होतों. मी आत्मसंयमन केलें, तरी पुन्हां माझी नजर पुस्तकावरून पलिकडे पाहूं लागली. पुन्हां आमची दृष्टिभेट झाली.मला वाटलें नव्हतें कीं ती त्याचवेळीं माझ्याकडे पाहील.आणि मला वाटतें तिलाही माझी नजर तेव्हां वर होईल असें वाटलें नसावें. आतां माझें पुस्तकाकडे लक्ष्य लागणेंच शक्य होईना. तिचीही अतिशय चमत्कारिक स्थिति होऊन ती खिडकीबाहेर पाहूं लागली. मीहि पुस्तक मिटून बॅगेत ठेविलें आणि उठून बसून खिडकीबाहेर पाहूं लागलों. अस्पष्ट उजेडांत दूरदूरची घरें वरवर कुठें दिसत होती. डोंगरावर दाट धुक्याची छाया पडल्यामुळें वरच्या कडा तेवढ्या साधारण काळसर दिसत होत्या. मध्येंच कुठें तरी उजाड जागेसारखें दिसत होतें, तर कांहीं वेळानें हिरवीगार वनश्री दिसून मन प्रसन्न होत होतें. पहाटेचा थंड वारा अंगाला झोंबत होता आणि त्या निस्तब्ध वातावरणांत गाडीचा खडखडाट कानाला अगदीं गोड लागत होता.

आणि त्या प्रसन्न वातावरणानें माझ्या मनांत कसल्याशा गोड विचाराचा उगम झाला.

× × ×

मला मुंबईला येऊन आठ, नऊ दिवस झाले होते. घरांत माझ्या येण्यानें आईला आणि बाबानां अतिशय आनंद झाला. पण-पण माझी मनाःस्थिति कांहीं निराळीच झाली होती आणि आईला तें कळलें असावें असें मला तिच्या दोन, तीन वेळां विचारलेल्या प्रश्नावरून वाटलें.

मी त्या गृहस्थाचें नांव आणि पत्ता बोलतां बोलतां विचारून घेतला होता. आणि मला कुठेंही जावयाचे असले तरी मी त्या घरावरूनच जात असे. अगदीं विरुद्ध दिशा असली तरी मला त्या घराजवळून ती जवळची वाट वाटे. दोन वेळां मी त्या घराकडे डोळे वळवून जातांना मला खिडकींत ती तरुण मुलगी दिसली आणि अगदीं खरें सांगावयाचें म्हणजे एकदां मी कांहींसा दूर गेल्यावर सहज पाठी वळून पाहिलें तों—

मी धाडकन पलंगावरून खालीं पडलों आणि त्या आवाजानें आई खोलींत धांवत आली. माझेहि डोळे एकदम उघडले.

" काय झालें रे ? "

" कांहीं नाहीं—कांहीं नाहीं. " मी उठत उठत म्हटलें.

" कुठं लागलं बिगलं नाहीं ना ? स्वप्न पडलं वाटतं एखादं ?"

" हं. "

माझें हें सारें स्वप्नच होतें. पलंगावर दुपारीं पडल्या पडल्या माझा डोळा लागला आणि त्यांत मी लायब्ररींत जाऊन 'महाराष्ट्रांत' 'पाहिजे' ही जाहिरात वाचल्यापासून तों तहत मी पाठी वळून पाहिल्यावर 'ती' माझ्याकडे पहात आहे हें आढळल्यापर्यंत माझें

स्वप्न लांबलें आणि मी मान वळवून पहातांना पलंगावरून खालीं पडलों नसतों तर माझ्या स्वप्नाचा शेवट किती गोड झाला असता ! पण–पण तें स्वप्न होतें हें खरें आणि अगदीं ऐन रंगांत माझ्या खालीं पडण्यानें बिघाड आला हेंहि खरें. खरोखरच मी नागपूरला नोकरीवर रुजूं होण्यासाठीं गेल्यानंतर प्लेगमुळें पुन्हां परत मुंबईला यावें लागलें असतें तर मला जितकें दुःख वाटलें असतें त्यापेक्षां कितीतरी पट दुसऱ्या 'गोड' प्रसंगाचा कांहीच शेवट न झाल्यामुळें मला दुःख वाटलें.

दुसऱ्या दिवशीं मी नित्यनियमाप्रमाणें लायब्ररींत गेल्यावर 'महाराष्ट्रांत' 'पाहिजे' या सदराखालीं मला हुबेहुब माझ्या स्वप्नाप्रमाणें जाहिरात आढळली. हा विलक्षण योगायोग पाहून खरोखर मी विस्मयचकित झालों. शहर तेंच, पगार तोच आणि शाळाहि तीच. मला कितीतरी आश्चर्य वाटलें. पण नेहमींप्रमाणें मी त्या जागेवर अर्ज केल्यावर मला त्या जागेवर रुजू होण्याचें पत्र आलेलें पाहून तर माझ्या आश्चर्यांत भरच पडली. मात्र तेथें गेल्यावर तेथें प्लेग नसलेला पाहून आणि नंतर क्रमवारीनें स्वप्नांत पाहिलेले प्रसंग घडणें अशक्य कोटींतले असल्याबद्दल खात्री पटून मला मात्र वाईट वाटलें आणि म्हणूनच त्या स्वप्नांतील बारिकसारिक गोष्ट सांगण्याइतकी ती आठवण माझ्या मनावर वज्रलेप होऊन राहिली.

दरिद्री परिस्थितींत गुरफटलेल्या कंगालानें एखादी महत्वाकांक्षा धरली तर तो मूर्खपणा समजला जातो आणि एखाद्या राजानें ती धरली तर त्याचा गौरव होतो.

—मॅसिंजर.

फुटलेली कांचसुद्धां एक वेळ जोडतां येईल, पण बायकांची अब्रू गेली म्हणजे कधीं परत येत नाहीं. —श्री. कृ. कोल्हटकर. (मतिविकार).

गुलाबाचें सौगंधिक फूल कुस्करून त्याच्या पाकळ्या चारी दिशांना फेकल्या तरी प्रत्येक पाकळीला गुलाबाचा वास हा यावयाचाच. —टी. मूर.

स्त्रियांच्या मनोवृत्तीची परिक्षा पहाण्याचा मत्सरजागृतीइतका अचुक उपाय दुसरा कोणताही नाहीं. —रा. ग. गडकरी. (भावबंधन)

पहाट ही दिवसाचा उगम दाखवते आणि बालपण मोठेंपणीचें भवितव्य सांगतें.

—मिल्टन.

दारिद्र्यानं मन दुष्ट होतं तें असंच. माणसाच्या अंगीं वाटेल तो दोष उत्पन्न करण्याची ताकद फक्त एका दारिद्र्यांत आहे. —भा. वि. वरेरकर (हाच मुलाचा बाप).



स्नानविधी.

अरुण-माला

महाराष्ट्र-शारदेचें

दिवंगत लाडकें पुत्ररत्न.



प. वा. राम गणेश गडकरी.

स्मारकाचा मान

वाङ्मयाच्या राज्यांत इतकी वढतीची जागा मिळण्याचा मोठा मान प. वा. गडकरी यांच्याच वांटयास प्रथम आला यापेक्षां त्यांच्या यशस्वितेची दुसरी निशाणी ती कोणती ? त्यांच्यापूर्वी दिवंगत झालेल्या इतर सुप्रसिद्ध वैभवशाली वाग्भटांची स्मारकें न होतां कै. गडकरी यानीं तो मान मिळवला यावरून त्यांनीं जनतेला आपल्या उत्कृष्ट भाषा-शैलीनें, कल्पनेच्या रम्य भराऱ्यांनीं, अर्थपूर्ण कोटयांच्या चपळ लीलांनीं व स्वभावचित्र रेखाटण्याच्या असामान्य चातुर्यानें किती भारून टाकलें आहे हें सहज कळण्यासारखे आहे. आजकाल त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास हें मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवण्याचें, कोटयांची कला शिकण्याचें आणि कल्पनाकाशांत स्वैर भटकण्याचें शिक्षण मिळण्याचें सुलभ साधन बनलें आहे. उठला लेखक गडकरी भाषेच्या वळणावर जाण्याचा प्रयत्न करतांना दिसतो. त्यांच्या वाङ्मयाच्या अति अभ्यासानें त्यांच्या कल्पना, त्यांचीं हुबेहुब वाक्यें लेखकाच्या नकळतपणानें त्याच्या हातून कागदावर रेखाटलीं जातात त्याप्रमाणेंच भाषेच्या अनुकरणाच्या मागे लागून त्या उन्मादांत भलतीसलतीं अर्थहीन वाक्येंहि त्याच्या हातून लिहिलीं जातात. पण नवशिक्या लेखकानें अंधपणानेंसुद्धां अनुकरण करण्याइतकी कै. गडकरी यांच्या सुंदर भाषेची त्यांच्यावर छाप पडलेली दिसते. आणि यांतच त्यांच्या यशाचें बीज दडलें आहे. कांहीं पुराण्या महाशयांच्या अंतःकरणांत कै. गडकऱ्यासारख्या नव्या अमदानींतल्या तरुण व मर्यादित लेखकाचे इतके गोडवे गाइले जावे यामुळें बेफाम संतापानें जो पेट घेतला आहे त्याचा उगम पुराणमताभिमानी वयस्कतेंत तरी असावा, प्रौढ अहंमन्यतेंत तरी असावा अगर नैसर्गिक मत्सरग्रस्तेंत तरी असावा, असा तर्क केल्यास तो निराधार ठरणार नाहीं. कांहीं लोकांच्या मतांला महत्वशून्य मानलें तरी उभ्या जगाचें एकमत झाल्यानंतर एखाद्या टवाळखोर निंदक चौकडीनें प्रसिद्धावलेल्या पुरुषावर शिंतोडे उडवणें तिच्या मत्सरग्रस्त स्वभावाचें निदर्शकच बनतें.

कै. गडकऱ्यांनी आपल्या हयातींत काय कामगिरी केली तें आतां नव्यानें सांगणें अनावश्यक आहे. रामकवींच्या कवितांतील गूढ कल्पनाआड दडलेल्या अर्थाची माधुरी ज्यांनीं चाखली, बाळकरामांच्या विनोदप्रचुर कोटीबाज लिखाणानें ज्यांची हंसून हंसून मुरकुंडी वळवली, आणि गडकऱ्यांच्या नाटयवाङ्मयांतल्या हंसवणाऱ्या आणि क्षणार्धांत रडवणाऱ्या अशा लागोपाठ आनंदी आणि करुण प्रसंगांतले असाधारण कसब ज्यानां पूर्णपणें

कळून आलें त्यानीं त्यांचा अभिमान धरला ही कांहीं कोणी त्यांच्यावर आग पाखडण्यासारखी वाईट गोष्ट झाली नाहीं. चुरशीच्या सामन्यांत सरळ मार्गाप्रमाणेंच वाममार्गाचा समावेश होतो. आणि त्यांच्याइतकें विजयशाली बनण्याची महत्त्वाकांक्षा न धरतां कुचेष्टेनें प्रतिष्ठा वाढवण्याच्या फोल प्रयत्नाकडे निरर्थक धांव घेणें किती मूर्खपणाचें आहे ?

कै. गडकऱ्यांची 'भावबंधन,एकच प्याला,पुण्यप्रभाव, प्रेमसंन्यास, राजसंन्यास, वेड्याचा बाजार' हीं नाटकें, " वाग्वैजयंति " हा त्यांचा कवितासंग्रह आणि त्यांचे पुस्तकरुपानें प्रसिद्ध झालेले विनोदी लेख वाचले नसतील असा स्वभाषाप्रिय एखादा महाराष्ट्रीय सांपडणार नाहीं असें जवळजवळ खात्रीपूर्वक वाटतें, आणि अशा या वागीशाला आमरण जिवंत ठेवण्यासाठीं आणि त्याच्या हयातींतल्या कर्तबगारीचा गौरव करून हिंदुस्थान देश गुणाचा किती चाहता आहे हें सर्वांच्या निदर्शनास आणण्यासाठीं त्याचें स्मारक करणें जरूर आहे. या कामीं कै. गडकरी यांचे मित्र श्री. भा. वि. वरेरकर, श्री. न. ग. कमतनूरकर यांच्या सहकार्यानें उत्साहानें पुढें सरले आहेत आणि महाराष्ट्रवाचकांची कै. गडकऱ्यांवरील निःसीम भक्ति पाहतां ते त्यांना हस्तेपरहस्ते हातभार लावतील अशी आशा करावयास बरीच जागा आहे. सिंहगडावर गेलें कीं जसा ऐतिहासिक स्मृतिचिन्हांबद्दल एक तऱ्हेचा भाविक आनंद आणि आदर वाटतो, तसेंच कै. गडकऱ्यांचें स्मारक आदरणीय व्हावें आणि पुढच्या पिढीला कै. गडकऱ्यांबद्दल एक तऱ्हेचा ऐतिहासिक भाविकपणा वाटावा अशी प्रत्येकाची इच्छा असली तर ती शक्यतेला सोडून आहे असें कोणी म्हणेलसें दिसत नाहीं. योग्यायोग्यतेचा प्रश्न विचारांत घेतला तरी त्यांची तितकी योग्यता नसून त्यांचे इतकें स्तोम अनुयायी भक्तांच्या अंधपणानें नाहक माजवलें आहे असा एखाद्या दुढ्ढाचार्यानें कल्लोळ केला तर तें कोणाला पटेल? त्यांच्या योग्यतेचा प्रश्न जगाने सोडवला आहे. राष्ट्रीय पुढाऱ्यांत मतभिन्नत्वामुळें एखाद्याला असाधारण महत्त्वाचा मान देतांना खडाजंगी होते. तरी तसें कै. गडकऱ्यांच्या वाङमयसेवेबद्दल कांहींच बोलतां येणार नाहीं. तो प्रश्न वाङमयविषयक असल्यामुळें दुमत होण्याचें कांहींच कारण नाहीं. कित्येकांचें पित्त खवळतें तें हाडीमासीं खिळलेल्या मत्सराला फांटा देऊन महाराष्ट्रानें त्यांच्या गुणाचा इतका बंडखोरपणानें गौरव केला या कारणामुळें. पण कै. गडकऱ्यांनीं आपल्या प्रतिभेच्या जादुगारीनें लोकांना इतकें भारून टाकलें आहे कीं त्यांना आपला पिढिजाद स्वभावसुद्धां टाकून द्यावा लागला. आणि म्हणूनच कै. गडकऱ्यांच्या स्मारकासाठीं रसिक आणि गुणग्राहक महाराष्ट्र वाटेल ती झीज सोशील अशी आशा करण्याइतकी खात्री वाटते आहे.

घडयाळ दिवसांतील आणि चाळिशी आयुष्यांतील गतकाळ दाखवते. बायकांच्या दागिन्यांचा व्यंगें लपविण्यांत जसा उपयोग होतो, तसा पुरुषांच्या या दागिन्यांचा होत नसून उलट व्यंगें उघडी पाडण्यांत मात्र होतो. —**श्री. कृ. कोल्हटकर.** (मतिविकार)

तुमच्यांत असें तारुण्य आहे ?

(लेखक--श्री. सीता-कान्त, सं० नवजीवन माला.)

म्हाताऱ्या ययाति राजाला तारुण्य पाहिजे होतें.

त्याला अजून जगांतल्या पुष्कळशा सुखांचा उपभोग घ्यावयाचा होता; त्याला म्हातारपणांतल्या दुबळेपणाचा वैताग आला होता; म्हातारपणांतल्या नालायकीचा त्याला कंटाळा आला होता आणि त्याला तें सळाळणाऱ्या रक्ताचें, जोमदार आचारविचारांचें तारुण्य पाहिजे होतें.

पुरूनें—ययातीच्या तरुण मुलानें-पुत्रधर्म स्मरून आपल्या वृद्ध पित्याला आपलें तारुण्य दिलें आणि आपण वृद्ध बनला.

ही महाभारतांतली एक कथा आहे. मोठी मार्मिक आहे आणि अर्थपूर्ण आहे. तरुणांनीं मनन करण्यासारखी आहे.

जगांत तारुण्य नको आहे कोणाला ? प्रत्येक वृद्धाला, दुबळ्याला आणि दैववाद्याला तारुण्य पाहिजेच असतें.

जगांत तारुण्य मागणारांचा दुष्काळ नाहीं, दुष्काळ देऊं शकणारांचा आहे. ययाति राजाप्रमाणें तारुण्यांतील सर्व कांहीं सुखोपभोग भोगण्यास हपापलेल्या वृद्धांचा जगांत तोटा नाहीं. तोटा फक्त असें तारुण्य देऊं इच्छिणारांचा आणि देऊं शकणारांचा.

अशा ह्या तारुण्यासाठीं हपापलेल्या लोकांस तारुण्य देण्याचें भाग्य फक्त तरुणांचेंच आहे, हें सामर्थ्य फक्त तरुणांतच असूं शकेल, हा अधिकार फक्त तरुणांचाच आहे.

तारुण्यच मागावयाचें तर तें तरुणांजवळ मागावयाचें नाहीं तर कोणाजवळ मागावयाचें ? तारुण्यच शोधावयाचें असेल तर तें तरुण समाजांत शोधावयाचें नाहीं तर काय आपलें धुळीस मिळालेलें तारुण्य शोधण्याकरितां सदैव खालीं कंबरेंत वांकलेल्या वृद्धांच्या समाजांत शोधावयाचें ?

तारुण्य केवळ वृद्ध माणसानांच पाहिजे असतें असें नाहीं;

रूढीच्या विषारी द्रव्यांच्या बाधीनें समाजपुरुषाचे सांधे धरतात व त्याचें वृद्धापकालीन जीवित मोठें कष्टप्रद होतें.

पारतंत्र्याच्या सर्वभक्षक पाण्डुरोगानें राष्ट्रपुरुषांचें वार्धक्य त्याला यमयातना जिवंतपणीं भोगायला लावतें.

यांत्रिक आचारमार्ग आणि कुजट विचारमार्ग ह्यांनीं धर्मपुरुषांची यकृत आणि कवलू हीं दोन्हीं बिघडून धर्मपुरुष वृद्धापकाळानें मरणोन्मुख होऊं लागतो.

म्हातारपण हें असें व्यक्तीला येतें, राष्ट्राला येतें, समाजाला येतें, धर्माला येतें; प्रत्येक व्यक्तीला आणि संस्थेला येतें व अशा प्रत्येक व्यक्तीला व संस्थेला पुन्हां तारुण्य यावें अशी इच्छा असते.

हें असें तारुण्य देण्याचें भाग्य, सामर्थ्य आणि साहस फक्त तरुणांतच असूं शकेल.

पण तरुण कोण आणि तारुण्य म्हणजे काय ?

पुरुनें ययातीला तारुण्य दिलें. पण जवळ होतें म्हणून दिलें आणि खरेंखुरें तारुण्य दिलें. नुसता वयानें लहानपणा दिला नाहीं. नुसता वयाचा लहानपणा घेऊन ययातीला करायचें होतें काय ?

जगांतल्या सगळ्या कांहीं सुखांचा उपभोग घ्यावयाला बळकट शरीर आणि बळकट मन हीं लागत असतात. ययातीला हींच पाहिजे होतीं व पुरूनें त्याला तींच दिलीं.

सुखाच्या शोधासाठीं त्रिभुवन पालथें घालतां येईल असे पाय ययातीला पाहिजे होते ते पुरूनें त्याला दिले.

जें जें कांहीं जिभेवरून खालीं येईल तें तें पचवून भस्म करून टाकण्याचें सामर्थ्य ययातीला पाहिजे होतें आणि पुरूनें तें त्याला दिलें.

सुखोपभोगासाठीं जरूर तर वाळूचे कण रगडून तेल काढीन असें मनगटाचें बळ ययातीला पाहिजे होतें आणि ते पुरूनें त्याला पुरविलें.

आपल्या सुखोपभोगाच्या आड जो जो म्हणून येईल त्याला स्वतः दंड करण्यास समर्थ असे पिळदार दंड ययातीला पाहिजे होते व पुरूनें ते त्याला दिले.

ययातीला अशी भरदार छाती पाहिजे होती कीं, त्याच्यापुढें 'कृतांतकटकामलज्वर ध्वजा' फडकावीत काळाला पुढें पाऊल टाकण्याची छातीच झाली नसती. जगांतले सर्व सुखोपभोग मी मिळवूं शकेन आणि पचवूं शकेन अशी हिंमत, अशी आत्मश्रद्धा आणि अशी शक्ति ययातीला पाहिजे होती. ययातीला शरीरसामर्थ्य आणि मनसामर्थ्य हीं पाहिजे होती. आणि पुरूनें तीं त्याला परविलीं. जवळ होतीं म्हणून दिलीं. पुरूजवळ तारुण्य होतें म्हणून त्यानें वृद्धाला तारुण्य दिलें.

अरुणाच्या तरुण वाचकानों !

आपणाजवळ अशी तारुण्याची याचना करणारे ययाति कितीतरी आहेत. त्यांची याचना पूर्ण करण्याची इच्छा तुमच्यांत आहे काय ? इच्छा असली तरी सामर्थ्य आहे काय ?

आजकाल आपले लाजिरवाणें परावलंबी वृद्धत्व घालविण्यासाठीं राष्ट्रपुरुष तरुणांच्या तोंडाकडे पाहतो आहे. आजकाल परधर्मांत किंवा अज्ञानांत लोळणाऱ्या अस्पृश्यानां हात

देऊन वर घेणाऱ्या पोलादी मनगटाच्या तरुणासाठीं धर्म आशाळभूतपणानें चोहोंकडे पाहात आहे. आजकाल पूजनीय आणि पूज्यमूर्ती आणि संरक्षणीय व पावित्र्यमूर्ती अबला गुंडांच्या अत्याचारापासून संरक्षण व्हावें म्हणून वृद्ध हिंदुसमाज तरुण कधीं होतो तें पाहत आहेत.

आजकाल एशियांत आणि युरोपांत, प्रत्यक्ष आपल्या देशांत व आपल्या समाजांत, फार काय आपल्या गांवांत आणि घरांत वार्धक्य वोकाळलें आहे आणि तारुण्यासाठीं सगळे कांहीं अडून राहिलें आहे.

तुमच्यांत असें तारुण्य आहे काय ?

तुम्हीं शरीरानें बळकट आणि मनानें बळकट आहांत काय ? पडेल त्या कामाचा बोजा उठवायला तुमची गर्दन बळकट आहे ? अत्याचाऱ्याचें मनगट धरायला तुमच्या मनगटांत जोर आहे ? येईल त्या प्रसंगाला तोंड द्यायला तुमची निधडी छाती तयार आहे ? नसेल तर मग तुम्हीं तरुण कसले ?

जो मनगटाचा बळकट आणि छातीचा निधडा, तत्वासाठीं आग्रही आणि मनानें निग्रही, प्रसंगांना पुरून उरणारा आणि सुखानां खेंचून आपणाकडे ओढणारा तोच तरुण-

शरीराला असें सामर्थ्य व्यायामानें मिळतें आणि मनाला असें सामर्थ्य यमनियम पाळण्यानें मिळतें. शरीर व्यायामानें कमावलें पाहिजे आणि मन आत्मसंयमनानें कमावलें पाहिजे.

शरीर बळकट झाल्यानें मन निग्रही बनतें आणि निग्रही मनाचा मनुष्य झटपट शरीरसामर्थ्य कमावतो आणि त्याचा दसपट उपयोग करून घेतो. आणि अशा रीतीनें जो शरीरानें व मनानें बळकट होतो तोच तरुण, तोच वृद्ध जगाला तारुण्य देऊन स्वतः वृद्धत्व पत्करील, तोच जगाला सुधारण्याच्या अविश्रांत श्रमानीं स्वतः श्रमीत होईल.

तरुणानों, आधीं तुम्हीं तरुण बना.

आणि ह्या तुमच्या तारुण्याची याचना करणाऱ्यानां मग तरुण बनवा.

स्वामी विवेकानंद एके ठिकाणीं म्हणतात–"मनाचा दुबळेपणा हा स्वभाव गुलामगिरीचा पाया आहे. सुदृढता हेंच जीवित आणि दौर्बल्य हाच मृत्यु. मनोबल हेंच सुखसर्वस्व, हेंच चिरंतन जिवित, हेंच अमरत्व. दुबळेपणा हाच रोग, दुःख आणि मृत्यु."

दुसरीकडे स्वामीजी ह्याला पुरवणीवजा उद्गार काढतात, " तरुणानों, तुमचें रक्त पाण्याहून पातळ होऊन गेलें आहे. तुमचा मेंदु नरम आणि तुमचें शरीर अशक्त झालें आहे. देशाच्या त्या अवस्थेंत तुमच्या हातून काय होणार ? "

" शरीरमाद्यम् खलु धर्म साधनम् " हें वचन तरुणानीं कधींहि विसरूं नये. माझ्या तरुण मित्रानों,माझा तुम्हांस एकच उपदेश आहे. तो हाच कीं, आधीं शारीरिक बळ मिळवा. "

मुलांची मौज.

खऱ्याचा जय.

(लेखक—**वा. का. भणगे.**)

शंकर आणि पार्वती स्वर्गांतून आपल्या आवडत्या दोन लहान मुलांकडे नेहमीं पहात असत; ते दोघे राजपुत्र असून सख्खे भाऊभाऊ होते.मोठ्याचें नांव चंद्रसेन होतें आणि दुसऱ्याचें नांव कृष्णकुमार होतें. त्यापैकीं चंद्रसेन पार्वतीला आवडत असे आणि कृष्णकुमारावर शंकराचें प्रेम होतें. त्या दोघांना तीं मुलें आपल्याजवळ असावीत असें वाटे आणि म्हणून तीं दोघें साधा वेष घेऊन त्यांच्या वाड्यापासून चार पांच कोसावर येऊन उतरलीं.

एकदां दोघेहि राजपुत्र नेहमींप्रमाणें समुद्रांत होडी टाकून वल्हवीत निघाले. समुद्र शांत असतां त्यांची होडी वेगानें एका दिशेस वहात चालली आणि अखेर शंकर आणि पार्वती असलेल्या ठिकाणीं येऊन थांबली. त्याबरोबर शंकर आणि पार्वती यांनीं आपापल्या आवडीच्या मुलाला होडींतून उचलून घेतलें. तेथें ते दोघेहि राजपुत्र बरेच दिवस राहिले. पण अखेर पार्वती शंकराला म्हणाली, " आपण या दोघांना आज इतके दिवस रहावून घेतलें हें बरें नाहीं. त्यांच्या आईबापांना किती दुःख होत असेल ? "

शंकराला तें पटलें आणि त्या दोघानीं त्यानां पुन्हां होडींत बसवून ती पाण्यांत ढकलली. ते पुन्हां पहिल्या ठिकाणीं येतांच कृष्णकुमारानें एकदम किनाऱ्यावर उडी मारली आणि चंद्रसेन उतरण्यापूर्वीच त्यानें ती होडी पुन्हां जोरानें पाण्यांत ढकलली. याचवेळीं जोराचा वारा वाहूं लागून ती होडी वहात वहात शेवटीं एका शेतकऱ्याच्या दृष्टीस पडली आणि त्यानें त्याला उचलून आणून त्याचें पालन केलें.

राजा कांहीं दिवसानीं मेल्यामुळें व वडील राजपुत्र--चंद्रसेन कुठें नाहींसा झाल्यामुळें कृष्णकुमार गादीवर बसला.तो अतिशय मत्सरी स्वभावाचा असल्यामुळें कोणी चंद्रसेनाबद्दल चांगलें बोलल्यास त्याला तो कडक शासन करी. चंद्रसेन कांहीं वर्षांनीं मोठा झाल्यावर त्याला आपल्या

स्वतःच्या घरीं जाण्याची इच्छा झाली. आपला धाकटा भाऊ आपण मेल्याचो खोटी बातमी उठवून राज्यावर बसला हें त्यानें ऐकलें असल्यामुळें तो वेष पालटून त्या राज्यांत आला आणि त्यानें खटपट करून राजवाडयांतच पहारेकऱ्याची नोकरी धरली.

कांहीं दिवसानीं शंकर आणि पार्वती यांना आपल्या जुन्या आवडत्या मुलांची आठवण झाली. त्यावेळीं शंकरानें आपला आवडता कृष्णकुमार राज्यावर बसलेला पाहून पार्वतीला म्हटलें, " पहा, मला जो मुलगा आवडत होता तो आतां राजा झाला आहे आणि तुझा आवडता चंद्रसेन अगदीं दरिद्री बनला आहे. " त्यावर पार्वतीनें उत्तर दिलें, " कृष्णकुमारनें राज्य मिळवलें तें वाईट मार्गानें. त्यापेक्षां चंद्रसेन गरीब स्थितींत असला तरी तो अगदीं सरळ मार्गानें वागतो आहे " शंकरानें ह्मटलें, " कृष्णकुमार जर खरोखर वाईट मार्गानें चालत असेल तर मी खालीं जाऊन स्वतः पाहून येतो. " असें ह्मणून तो एका संन्याशाचा वेष घेऊन राजवाडयांत आला. कृष्णकुमार नुकताच राजवाडयाबाहेर पडत होता. त्यानें त्याला पहातांच कृष्णकुमार एकदम दचकला. कांहीं महिन्यापूर्वी एका ज्योतिषानें त्याचा हात पाहून सांगितलें होतें कीं पांढऱ्या शुभ्र दाढीच्या, करडया रंगाची कफनी अंगांत घातलेल्या आणि हातांत एक काळी उंच काठी घेतलेल्या संन्याशाकडून तुला मरण येईल. तेव्हां कृष्णकुमारनें आपल्यासमोर तसाच संन्यासी पहातांच मोठयानें ओरडून ह्मटलें, " कोण आहेस तूं ? "

पण संन्याशानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तेव्हां त्यानें आपल्या नोकरानां त्याला एका अंधारकोठडींत घालून एका खांबाला घट्ट आवळून बांधण्यास सांगितलें आणि त्याच्या दोन्ही बाजूला लांकडें ठेऊन आग पेटवली. आगीच्या ज्वाला संन्याशाच्या (शंकराच्या) अंगाला लागत. पण त्याला त्यापासून अपाय होत नव्हता.

असा तो सात दिवस अन्नपाण्याशिवाय राहिला. पण आठव्या दिवशीं चंद्रसेनानें गुपचुप त्याला एक चपाती आणि पाणी आणून दिलें. दुसऱ्या दिवशीं कृष्णकुमार शंकराकडे येऊन त्याला हंसूं लागला. त्याबरोबर शंकरानें त्याला " तूं ताबडतोब मरशील " असा शाप दिला. त्यामुळें चिडून

कृष्णकुमारानें आपली तरवार बाहेर काढली आणि त्याच्या अंगावर धांवला. पण इतक्यांत बाजूच्या दोन आगीच्या प्रकाशापेक्षां संन्याशाच्या जागीं जास्त चकचकीत प्रकाश दिसूं लागून त्याला खांबाला बांधून टाकलेले दोर तुटून जमिनीवर पडले. तो चमत्कारिक देखावा पाहून कृष्णकुमार अगदीं घाबरून गेला आणि एकएक पाय पाठीं घेऊं लागला. पण इतक्यांत पायांत पाय अडखळून तो खालीं पडणार इतक्यांत त्या गडबडींत हातांतल्या तरवारीचें टोंक त्याच्या पोटांत खुपसलें जाऊन तो ताबडतोब ठार झाला.

शंकराला पाणी देऊन त्याची तहान भागवल्यामुळें त्यानें तें राज्य चंद्रसेनाला दिलें.

" गुलाब "

मुलगा—गुलाब सुंदर नाजुक फुलला पुष्पांचा राजा ।
रम्य दिसे किति ताई, मजला काढुन तो दे ना ! ॥

उंच उंच या फांद्या, मजला कंटक खुपती हे ।
परमेशानें पसरविले कां कांट्यांचें जाळें ? ॥

जाइजुईच्या वेलीवरतीं सुंदर हंसरि फुलें ।
देवाजीच्या घरची किंवा हंसती रम्य मुलें ॥

कांट्यांनीं नच तयां वेढिलें गुलाब पुष्पानां ।
कांट्यांच्या या भाल्यांचा कां त्रासच तो त्यांना ? ॥

ताई—हौसेसाठीं काढुनि कोणी सुवास घेतात ।
तुडवुनि टाकिति पायदळीं नच क्षिति कसली त्यांस ॥

उंच उंच फांद्यांचे असती बुरुज भोंवताली ।
पानांचे वाडे हे उठले बघ वरती खालीं ॥

गुलाब राजा दुखविल कोणी विचार देवाला ।
कांट्यांच्या भाल्यांचा किल्ला रहावया दिधला ॥

'उत्तम' कांहीं त्यावर डोळे फिरती काळाचे ।
रक्षण त्याचें करावयाला प्रयत्न देवाचे ॥

'किशोर'

नेहमींच्याच गोष्टी

(लहान मुलांसाठीं)

दिवस, महिना आणि वर्ष.

अगदीं पूर्वीं वेळ मोजण्याचे तीनच प्रकार होते: दिवस, महिना आणि वर्ष. त्यांपैकीं दिवस आणि वर्ष कळण्याला विशेष सोपें जातें. आकाशावर एकाच ठिकाणीं सूर्याचें दोन वेळां दर्शन होण्यामधला जो वेळ त्याला पूर्वीच्या माणसांनीं दिवस हें नांव दिलें. आणि ही गोष्ट सहज लक्ष्यांत येण्यासारखी असल्यामुळें वेळ कसा मोजावा हें त्यामुळें प्रथमच त्यांना कळून आलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सूर्याभोंवतीं एक प्रदक्षिणा घालण्याला पृथ्वीला जो अवधी लागतो त्याला वर्ष असें म्हणतात. हा शोधहि पूर्वी कांहीं हुषार माणसांनीं लावला होता.

नंतर जवळजवळ चार आठवड्यांत चंद्र नियमानें कमी अधिक आकाराचा होतो हें त्यांना दिसून आल्यामुळें त्यांनीं तो वेळ मोजून त्याला महिना हें नांव दिलें.

इतिहास लिहिण्यापूर्वी वेळ मोजण्याचे असे हे तीनच प्रकार होते. नंतर कांहीं शोधकांनीं घड्याळ तयार केल्यावर बारीक सारीक वेळ मोजण्यासाठीं सेकंद, मिनिट, तास हे प्रकार सुरूं झाले.

मनुष्याला दोन डोळे कां असतात ?

मनुष्याच्या दोन डोळ्यांत, अगदीं मध्यबिंदूपासून मोजलें तर, अडीच इंचांचें अंतर असतें. आणि म्हणून एखाद्या वस्तूकडे पहातांना दोन्ही डोळ्यांना त्या वस्तूंत थोडा फरक दिसतो. उदाहरणार्थ, आपण एक ' लेबल ' लावलेलें वाटोळें भांडें समोर टेबलावर, तें ' लेबल ' अर्धें दृष्टीआड होईल अशा रीतीनें ठेवावें. आतां आपण डावा डोळा मिटून फक्त उजव्या डोळ्यानेंच त्या ' लेबल ' कडे पाहिल्यास त्याचा जास्त मजकूर वाचतां येतो आणि उजवा डोळा मिटून डाव्या डोळ्यानें तें ' लेबल ' पाहिल्यास पहिल्यापेक्षां थोडा कमी मजकूर दिसतो. उजव्या डोळ्यानें भांड्याचा उजवी बाजू जास्त दिसते आणि डाव्या डोळ्यानें डावी बाजू जास्त दिसते.

म्हणजे दोन्ही डोळ्यांनीं मिळून आपणाला भांड्याचा अर्ध्यापेक्षां जास्त भाग दिसतो. म्हणजेच दोन्हीं डोळ्यांना तें भांडें सबंध दिसूं शकतें.

स्लेट पेन्सिलीनें पाटीवर कां लिहितां येतें, आणि कागदावर कां येत नाहीं ?

स्लेट पेन्सिलीनें पाटीवर लिहितां येतें याचें कारण पाटी कठीण असल्यामुळें पेन्सिलीचा तिच्यावर दाब बसतांच ती झिजूं शकते. पण तसें कागदाचें नाहीं. आपण जर कागदावर लिहिण्यासाठीं पेन्सिल जोरानें दाबली तर कागद मात्र फाटतो. पण पाटीसुद्धां नुसती कठीण असून चालत नाहीं. तर थोडासा खरखरीतपणाहि पाहिजे असतो. कांच कठीण असली तरी त्याच्यावर स्लेटपेन्सिलीनें लिहितां येत नाहीं तें एवढ्यासाठींच कीं पेन्सिलीचें टोंक झिजण्याइतकासुद्धां त्यांत खरखरीतपणा नसतो.

झोपेंत ऐकतां येतें कीं नाहीं ?

आवाज बराच मोठा असला तर आपण तो ऐकून दचकून जागे होतों. मनुष्य कसलें तरी गुंगीचें औषध घेऊन झोंपल्यास कितीही मोठा आवाज झाला तरी तो जागा होत नाहीं. साध्या आवाजानें मनुष्य जागा होत नाहीं याचें कारण त्याचा मेंदू अगदीं मंद झालेला असतो. तो आवाज कानाच्या पडद्यावर आपटून तेथून स्नायूंच्या सहाय्यानें मेंदूपर्यंत जाऊन पोहोंचला तरी विश्रांति घेत पडलेला मेंदू तिकडे विशेषसें लक्ष देत नाहीं. शिवाय पहाटेच्या सुमारास आपणास जागें करण्यासाठीं जितका मोठा आवाज लागतो त्यापेक्षां झोपल्यानंतर कांहीं वेळानें आपणांस जागें करण्यास फार मोठ्या आवाजाची जरुरी असते. म्हणून झोंप लागल्यानंतरची काहीं वेळच खऱ्या विश्रांतिची व गाढ असते. केव्हां केव्हां आपण झोपेंत जरी आवाज ऐकला असला तरी सगळा मेंदू जागा होण्याऐवजीं कांहींसा भाग जागा होतो आणि आपणांस कांहीं जीं स्वप्नें पडत असतात त्यांचा उगम आवाजामुळेंच होतो.

डोळे बंद ठेवल्यावर सरळ कां चालतां येत नाहीं ?

याचें कारण आपणास शरीराचा तोल संभाळणें जड जातें हें होय ? शरीराचा तोल संभाळण्यास आपणास डोळ्यांचा अतिशय उपयोग होतो हें प्रत्येकाला ठाऊक आहेच. आणि ते बंद असले म्हणजे तोल झुकून डाव्या आणि उजव्या बाजूला जात असतो. अर्थात तोल सावरण्यासाठीं आपणास त्या दिशेनें पाऊल टाकावें लागतें. आणि अशा रीतीनें सरळ चालत जाणें आपणांस अशक्य होतें.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं झालेली विधवा आमच्या समाजाला पाहवते, पण अविवाहित प्रौढ कुमारिका मात्र आमच्या समाजांत मुळींच दिसत नाहींत

भा. वि. वरेरकर (हाच मुलाचा बाप)



श्रीगणेशापासून....

लेखांक १ ला

ले. श्री. विनोदलाल.

" आलं छापून एकदांचं. "

लेखक होण्याची महत्वाकांक्षा मनांत येऊन ती बरीच दृढमूल होऊं लागल्यानंतर जेव्हां लेखक या नव्या दृष्टीनें एखादा मनुष्य जगाकडे पाहूं लागतो तेव्हां जॅानसन साहेबांच्या रासेलसप्रमाणें सर्व जग त्याला नवेंनवेंच भासूं लागतें. कुठचाही धंदा त्या धंद्याच्या श्रीगणेशापासून उत्पन्न होतो हें एक व्यवहारशास्त्रांतील महातत्व आहे. हा गणेशपूजनाचा प्रश्न भाषेच्या किंवा धर्माच्या दृष्टीनें मराठी भाषेंत आणि हिंदुधर्मांत वारंवार उपस्थित होतो. कुठेंहि गेलें तरी हा गणेशपूजेचा श्रीगणेशा कोणालाहि चुकला नाहीं. एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष श्रीगणेशाच्या प्राणप्रतिष्ठेच्या वेळीं सुद्धां हा गणेशपूजेचा प्रश्न सर्वारंभीं येणाऱ्या तांदुळाप्रमाणें सर्वांच्या अगोदर येतो. विघ्नहर्त्याच्या प्राणप्रतिष्ठेच्या वेळीं विघ्न येऊं नये म्हणून प्रथम त्याचेंच पूजन करण्यांत येतें या प्रचलित रूढीवरून आपलेच कायदे आपणच डोळ्यांत तेल घालून पाळूं पहाणाऱ्या एखाद्या दक्ष राजाची आठवण झाल्यास नवल नाहीं. लेखक या दृष्टीनें पुढें येण्याला लिपीची तोंडओळख करून घ्यावी लागते आणि गरीब बिचाऱ्या लेखकाला यावेळीं अगदीं अक्षरशः श्रीगणेशाची मध्यस्थी मिळवावी लागते. कुठच्याहि वाङमयविषयक कार्याला आरंभ करतांना पूर्वीचे जुने जुने कवी, लेखक, कादंबरीकार गणेशाच्या सोंडेप्रमाणेंच लांबलचक तऱ्हेनें त्याचें स्तवन करीत असत, ते त्याचें हें ऋण आपण आमरण विसरतां नये ही जाणीव मनांत बाळगूनच करीत असत यांत शंका नाहीं. पण सध्यांच्या ' नवें पाहोनी जुनें विस्मरण्या'च्या युगांत तें सर्व नष्ट झालें याबद्दल कितीहि खेद केला तरी तो थोडाच आहे. असो.

लेखक हे शब्दच मनांत आल्यावर आपल्या विचारांवर एक जादूची कांडी फिरून ते सर्वस्व एका विशिष्ट दिशेनेंच वाहूं लागल्याचें भावी लेखकाला आढळून येतें. तो कागदांच्या रिमांचा ढीग, ते होल्डर्स, ती पेनें, त्या टांचण्या, ती स्टेशनरी, हें सर्व

सामान समोर घेऊन डोक्याला होल्डर लावून विचारांत मग्न होऊन बसलेला, चष्मा लावलेला व केसांचा भांग काढलेला तो लेखक, (यांत अर्थांतच थोडा फरक आहे. गद्य लिहिणारा लेखक आणि पद्य लिहिणारा कवी यांच्या स्वरूपांत व पोशाखांत जमीनअस्मानाचा फरक असतो ही गोष्ट येथें विसरून चालावयाचें नाहीं.) तो छापखाना, ते कंपॉझिटर्स,तो खटयाळ एडिटर, त्याच्याकडे घालाव्या लागणाऱ्या त्या खेपा, तीं प्रुफें, ते छापखान्यांतले घंदेवाईक (Technical) शब्द, वगैरेंचें मूर्तिमंत चित्र लेखक या शब्दाच्या उच्चारानें त्याच्या डोळ्यांसमोर उभें राहतें.हातांत पेन घेऊन पांढऱ्यावर कांहींतरी काळें केल्यानंतर तें छापखान्याच्या ठशांनीं कायमचें काळें होईपर्यंत वाटेंत उभ्या राहणाऱ्या या अनेक अडचणी मनश्चक्षूंसमोर नाचूं लागल्यावर व त्यांची वर्णनें ऐकायला येऊं लागल्यानंतर बाललेखकाला पहिल्या झटक्याबरोबर जरी थोडीशी भिती व उद्वेग वाटला तरी या महत्वाकांक्षेमुळें बाललेखकाचें चिमुकलें अंतःकरण मनाला गुदगुल्या करणाऱ्या एका आनंदानें धाड्धाड् उडत असते. यावेळीं त्याच्यापुढें फक्त एकच प्रश्न पडलेला असतो आणि तो म्हणजे आपली कृती कशाही तऱ्हेनें एकदां 'छापून' आली म्हणजे गंगेंत घोडे न्हालें ! या छापून येण्याचें वेड त्यावेळीं त्याच्या डोक्यांत एवढया जोरानें थैमान घालीत असतें कीं कसल्याहि अडीअडचणींचे डोंगर, लायकीचा प्रश्न, वगैरे गोष्टी तो चटसाऱ्या विसरून जातो. कुत्र्या मांजराऱ्या गोष्टीपासून तों तहत " प्रभात काळची ती वेळ होती. " वगैरे वर्णनांनीं सुरवात झालेल्या लहान लहान प्रकरणांच्या कादंबऱ्यांपर्यंतच त्याच्या दृष्टीचा टापू असतो आणि हें सर्व लेखन एकदां छापून आलें म्हणजे ' मिळविली ' असेंच त्याला वाटत असतें.

कवी आणि लेखक यापैकीं कुठच्या बाजूला वळावें हा प्रश्न याच वेळीं बाललेखकाच्या मनापुढें पुनः उभा रहातो. थोडयाशाच लिहिण्यानें कवी म्हणून चारचौघांपुढें येण्याचा बराच संभव असल्यामुळें व स्थूलमानानें पहातां कवीला वाङ्मयाच्या जगांत बराच मान असल्यामुळें ,हा मोह त्याला पहिल्याप्रथम आवरेनासा होतो. आसपास कोणी नाहीं असें पाहून पुष्कळशी खोडाखोड करून मराठी भाषेबरोबर भांडण्यांत त्यावेळीं त्याचा बराच वेळ खर्ची पडतो व शेवटीं शेवटीं तो कमालीचा निराश होऊन 'आपली ही बाजूच नव्हे, कवी होण्यापेक्षां लेखक या दृष्टीनेंच आपल्या हातून बरीच कामगिरी होणार आहे' असा आंबट विचार करून तो ही बाजू सोडून देतो. या लढाईंत त्या मानानें त्याचा मार्ग थोडासा भिन्न होत जातो. पण कवीपेक्षां लेखकच हल्लीं अधिक महाग विकतो हें त्याला संपादकांकडे घालाव्या लागणाऱ्या

बऱ्याचशा हेलपाट्यावरून कळून येतें व नंतर तो एक निराश किंवा पिसाळलेला कवी बनतो.

आपली कृति छापून येण्यासाठीं बाललेखक करीत असलेली तडफड मोठी मजेची असते. ज्या नियतकालिकांत आपलें नांव चमकावें अशी त्याची इच्छा असते त्या नियतकालिकाचा तो प्रथम वर्गणीदार होतो,आणि वर्गणीचे पैसे व आपल्या लेखाचे कागद एका लांबच लांब करुणपूर्ण भाषेंत संपादकाला पत्र लिहून एकदमच तो पाठवून देतो. त्याचा हा बाण त्या पत्रांत त्यानें वापरलेल्या सर्व करुण व हृदयद्रावक शब्दांपेक्षांहि त्यानें पाठविलेल्या वर्गणीच्या पैशाच्या चकचकाटानें विशेष जोरानें लागूं पडतो. या पत्रांत बहुत करून खालील मासल्याचा मजकूर सांपडतो.

" मी आपल्या सुप्रसिद्ध व अत्यंत लोकप्रिय...चा वर्गणीदार होऊं इच्छितों सोबत आपल्या...साठीं माझ्या अल्पमतिप्रमाणें मी करूं इच्छिणाऱ्या वाङ्मयसेवेचें दृश्य फल म्हणून.....लेख आपल्याकडे पाठवित आहे. त्याला सवडी प्रमाणें जरूर स्थळ द्याल अशी आशा आहे. माझा लेख आपण प्रसिद्ध केल्यास वाङ्मयाची एकनिष्टपणानें सेवा करूं इच्छिणाऱ्या एका तरुणास पुढें आणल्याचें श्रेय आपण मिळवाल अशी आशा आहे. वगैरे वगैरे...पत्राचें उत्तर जरूर जरूर पाठवावें. "

अशा मासल्याच्या पत्रांत लेखकानें केलेली मासिकाची व संपादकाची स्तुति यामुळें संपादकाला आनंदानें गुदमरल्यासारखें होतें, लेखकाची केविलवाणी व अगतिक स्थिति पाहून त्याला त्याच्याबद्दल दया वाटूं लागते; वर्गणीची रक्कम पाहून या दयेचें अकारण मित्रत्वांत रुपांतर होतें आणि पत्रांत असलेल्या ' जरूर जरूर ' या शब्दांमुळें सर्व वस्तुस्थिति लक्षांत येऊन त्याच्या तोंडून लेख पाहिल्याशिवायहि 'बस्स, टाकूं छापून बिचाऱ्याचा लेख ' असे उद्गार आपोआप बाहेर पडतात.

या बाबतींत थोडी देखील दिरंगाई किंवा कालावधी लागलेला बाललेखकाला खपत नाहीं व त्याचा जीव आपल्या कृतीच्या भावी परिणामाबद्दल खालींवर होऊं लागतो. आपली पहिली कृति त्याला अमूल्य वाटत असल्यामुळें त्याच्या अनेक नक्कला त्याच्याजवळ असतातच; यामुळें लेख नाहींसा होईल ही त्याला भीति नसतेच, परंतु सदर कृति आपल्या नांवानें छापून येणार आहे कीं नाहीं,वगैरे गोष्टी रात्रंदिवस त्याला भंडावून सोडीत असतात. प्रथम तो बरींच जोडकाडें संपादकाला पाठवतो व एकाचेंही उत्तर न आल्यास तो संपादकाची भेट घेण्याचा प्रयत्न करतो. चांगला नीटनेटका पोषाख व बरेचसे लेखकाच्या तोंडीं शोभणारे प्रौढ शब्द, या सामुग्रीनिशीं संपादकांच्या भेटीला जाण्यासाठीं तो बाहेर पडतो. पुष्कळदां संपादक न भेटल्यामुळें ज्याच्या कपाळीं

निराशा हींच अक्षरें ब्रह्मदेवानें लिहून ठेवलेलीं आहेत असा हा बाललेखक संपादकाला मनांत शिव्या देत व त्यालाच पुढें मागें आपल्याकडे हेलपाटे घालण्यास लावण्याची भीष्म-प्रतिज्ञा करून चरफडत घरीं येतो. संपादक ऑफिसांत भेटणें आणि तेंहि एकटे भेटणें हा आपल्या भावी यशाचा शुभशकुन आहे असें त्याच्याकडून समजण्यांत येतें. संपादक भेटून नमस्कारचमत्काराचा विधी झाल्यावर बहुतकरून पुढीलप्रमाणें संवाद होतो.

ले.—माझी वर्गणी आपल्याला पोंचलीच असेल !

सं.—होय, कालच आपली मनिऑर्डर मिळाली.

ले—आणखीही वर्गणीदार मिळवण्याचा मी आपल्यासाठीं प्रयत्न करीत आहे.

सं.—होय का ? (थोडया खुर्षींत येऊन) आमच्या मासिकाबद्दल आपलें काय मत आहे ? ”

ले—(आशाळभूतपणानें) वाः! खरंच सध्यांच्या मासिकांच्या बुजबुजाटांत आपलेंच मासिक काय तें एक नांव घेण्याजोगें आणि सर्वांगसुंदर असें आहे असें माझें तर मत आहे.

सं—(थोडा वेळ आपली ‘योग्यता’ विसरून) आपण चहा घेत असाल बहुत करून ?

ले—(काय उत्तर द्यावें असा प्रश्न पडून पण आनंदानें) होय, होय, मागवा दोन पेले. हे घ्या पैसे.

सं—(पैसे घ्यावे कीं नाहीं असा प्रश्न पडून पण शेवटीं पैसे खिशांत घालीत) छेः हें वाईट केलंत बुवा तुम्हीं.

ले.—(आपल्या लेखाबद्दलच असेल असें वाटून) काय— ? ? ?

सं.—(हंसत) नव्हे, म्हटलं हे पैसे तुम्हीं देणं बरं नाहीं—”

ले.—(डोंगरावरून जीव दरींत पडल्याप्रमाणें वाटून व एक लांबलचक सुस्कारा टाकून) अं, कशाचं, त्यांत काय एवढं मोठं ? आम्हांला तरी तुमच्या-बरोबर चहा पिण्याला भाग्यच लागतं.

इतर गप्पा झाल्यावर चहा घेत असतांना—

ले.—(फांशीची शिक्षा कमी करून दुसरी कसलीहि शिक्षा द्यावी असें दाख-वणाऱ्या खुनी इसमाच्या मुद्रेनें व अंतःकरणानें) अं—अं—तुम्ही आपण—आपण आपणाकडे मी वर्गणीबरोबर पाठविलेला तो माझा लहानसा आपला असाच—तसा विशेष नाहीं—माझा तो लेख आपणाला मिळालाच असेल.

सं.–(बेफिकिरीच्या गंभीरपणानें) हं, हं, तो हा...नाहीं का ? मिळालाय खरा एक.

ले.–(चांचरत) कसा...का...काय वा...वाटला तो ?

सं.–(एखाद्या उन्मत्त असुराप्रमाणें) " छे, हो, वाचून कुठें पाहिला आहे तो मी ! सवड आहे कुणाला ? ती पहा त्या कोपऱ्यांत केवढी रास आहे लेखांची ? एवढया या ढीगाची वासलात लावायला तरी बराच अवधी लागणार. "

ले.–(त्या राशीप्रमाणेंच निर्जिव चेहेऱ्यानें) पण–पण माझा लेख जरा पाहिला असता तर तेवढं चांगलं झालं असतं. आमच्या घरीं तो सर्वांना फार आवडला आहे आणि त्या ह्यांनीं सुद्धां तो फार वाखाणला आहे.

सं.–(थोडयाशा दयेनें) होय, होय, तुमचा लेख मी उद्यां जरूर जरूर पाहीन. बाकीच्याप्रमाणें सरसकट बारा टक्के सर्वांकडेच वागून उपयोगी नाहीं आम्हाला. आम्हाला कोरडी सहानुभूति दाखविणाऱ्यापेक्षां आमच्या उपयोगी पडणाऱ्या माणसांकडे आह्मांला पहिल्याप्रथम लक्ष द्यावं लागतं.

ले.–(अस्मानालाच आपटल्याच्या आनंदानें) हं, होय, तेंही खरं आहे..." अशा तऱ्हेचे संवाद नेहमीं बरेच लांबत असतात आणि ते लांबण्याच्या थोडयाशा कालांत लेखकाला आयुष्यांतल्या सर्व तऱ्हेच्या संकटांत किंवा आनंदकारक प्रसंगांत अनुभवण्यास मिळणाऱ्या भावनांचा परिचय होतो. अशा तऱ्हेच्या उभयपक्षीं आनंदपर्यवसायी प्रसंगांच्या शेवटीं लेखक हटकून आपल्याला माहीत असलेल्या सर्व मासिकांच्या नांवांची यादी संपादकाकडे देतो, त्या सर्वांना आपण पत्र लिहून व्ही पी. स्वीकारण्याबद्दलची विनंति करण्याचें आश्वासन देऊन त्या सर्वांना व्ही. पी. करण्याबद्दल सांगतो व जर कदाचित् दुर्दैवानें व्ही. पी. नाकारण्यांत आली तर त्याचे सर्व पैसे आपण भरण्याचा निश्चय जाहीर करीत करीत कार्यालयांतून निघून जातो.

पण हें सवाई शिकंदर नशीब सर्वांच्याच वांटयाला येतें असें नाहीं. अशा बाबतींत संपादकांच्या मग्रुरपणामुळें लेखकाची नकारानें बोलवण करण्यांत आल्यावर लेखकाला त्या नियतकालिकाबद्दल व त्याच्या संपादकाबद्दल एवढा त्वेष व संताप येतो कीं आपण एका वर्षाची वर्गणी भरली आहे हें विसरून तो " यापुढें आपल्याला अंक पाठविण्यांत येऊं नयेत, त्याचें दर्शनही मला असह्य होतें. " अशा मजकुराचें ' खरमरीत' पत्र लिहून संपादकांच्या अंगावर जणूं अग्निवर्षावच करतो.

अखेर एकदांचा तो पहिला सोम्याचा दिवस उजाडतो. आपला लेख छापायला गेल्याचें कळल्यावर हा आनंद त्याच्या लहानशा अंतःकरणांत मावेनासा होतो आणि

त्या तशा मनाच्या प्रसन्न स्थितींत त्याचा एखादा हाडवैरी जरी त्याच्या समोरून जाऊं लागला तरी "जुनें जाऊं द्या मरणालागुन" अशा वृत्तीनें तो त्याच्याबरोबर आपण होऊन सख्य करतो आणि आपलें हें मनाचा कोंडमारा करणारें गुह्य एकदां त्याच्या-समोर ओकून आपल्या छातीवरचें दडपण उतरतो. मनुष्याच्या आयुष्यांतल्या अनंत आनंदाच्या प्रसंगांपैकीं लेखक होऊं इच्छिणाऱ्या एखाद्या बाललेखकास आपला लेख छापून येणार असल्याबद्दलचें संपादकाकडून येणारें पत्र हा एक प्रसंग आहे.

एवढ्या दीर्घ तपश्चर्येनंतर व संशयास्पद स्थितीचा असह्य मनस्ताप भोगल्या-नंतर देवदयेनें पोष्टमन लेखकाच्या इच्छित मासिकाचा अंक आणून त्याला देतो. कांपऱ्या हातांनीं तो फोडून त्याची पानें परतीत असतांना पहिल्या प्रथम त्याला त्याचा स्वतःचाच तेवढा लेख सांपडत नाहीं आणि अशा वेळीं आपल्याला फसवि-ल्याबद्दल मनांतल्या मनांत संतापून बिचाऱ्या सर्व जगाचा सकारण मित्र व शत्रू असणाऱ्या संपादकाला तो एखादें इरसाल विशेषण लावणार तोंच--

त्याचें नांव त्याला दिसावयास लागून त्याच्या तोंडून एकदम उद्गार बाहेर पडतात. "**आलं छापून एकदांचं.**"

उतावळ्या धाडसापेक्षां संधी साधून शत्रूवर घाव घालणें हेंच शिपाईबाण्याचें खरें लक्षण आहे.—**शेक्सपियर.**

लक्ष्मी कित्येक पिढ्या एकाच घराण्याला चिकटून राहिलेली आम्हीं पाहिली आहे; पण विद्वानाचा मुलगा बुद्धिहीन अशी उदाहरणें पावलोपावलीं दृष्टीस पडतात.

कृ. प्र. खाडिलकर (विद्याहरण)

जिन्हाळ्याच्या माणसांना एका तासाचा विभक्तपणा महिन्यासारखा भासतो, एक दिवस म्हणजे त्यांना एक वर्ष वाटतें आणि विभक्तपणाचा कांहीं काळ म्हणजे त्यांना एखादें युग वाटतें—**ड्रायडन.**

या अंकाचें बाह्यांग

महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचे असलेले सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सा. ल. हळ-दणकर यांनीं करून दिल्याबद्दल आम्हीं त्यांचे अत्यंत आभारी आहों. चित्राची कल्पना त्यांची स्वतःची असून चित्रांतील स्त्रीला जुन्या चित्रकलेनें (Oriental Art) पेहेराव चढवला आहे.



क्षणभंगुर

प्रकरण १ लें.

पहिली ओळख

मला जवळजवळ खात्रीनें आठवतें कीं तो दिवस रविवार होता. त्या दिवशीं दुपारीं मी स्वयंवर—गंधर्वांचा हातखंडा खेळ–माझ्या एका मित्राच्या अत्याग्रहामुळें पहायला गेलों होतों. मी तें नाटक पूर्वी पाहिलें नव्हतें असें नाहीं. पण 'स्वयंवर' नाटकाची दुसरी तिसरी आवृत्ति झाली तरी प्रत्येक वेळीं त्यांत नवी खुमारी आढळून येते अशीच त्या नाटकांची मौज आहे. आणि 'स्वयंवरा'चें यशोबीज नाटककर्त्यापेक्षां गंधर्वांच्या गोड गायकी गळ्यांत मला विशेष दिसत होतें. पदांच्या सुंदर चाली आणि बालगंधर्वांचा सुरेल गळा या मनोहर मिलाफांत श्रोत्यांना आपल्या पैशाचें चीज झाल्याचें समाधान होई आणि मी पुन्हां तें नाटक पहायला गेलों तें तरी गंधर्वांच्या कर्णमधुर गाण्याला मोहवश होऊनच.

त्या रात्रीं मी जवळ जवळ अकरा, सव्वा अकराच्या सुमारास घरीं आलों.गंधर्वांच्या नाटकाचें हें असेंच असतें हें मला ठाऊक असल्यामुळें मी गणूला खाणावळींतून डबा आणूं नको म्हणून सकाळींच सांगितलें होतें आणि येतांना गोखल्याला उदार आश्रय देऊन आलों होतों.कोट,टोपी काढून ठेऊन पंख्यानें वारा घेत मी इझिचेअरवर नुकत्याच ऐकलेल्या ताजातवान्या गाण्यांचे आठवतील तसे चरण गुणगुणत पडलों होतों. थोडया वेळानें माझ्या मनानें काय घेतलें कोणास माहित ! तोंडाची गुणगुण माझ्या नकळत थांबून प्रभाकराबद्दल आणि त्याच्या घरांतल्या इतर माणसांबद्दल विचार करण्यात माझें मन कधीं रंगून गेलें मला कळलेंच नाहीं. केव्हां केव्हां कारण नसतांना माझ्या विचाराचा ओघ इतर व्यवसायावरून त्या मंडळीबद्दल विचार करण्याकडे वळत असे.असें कां होतें तें माझें मलाच कळत नव्हतें. नुकतीच ओळख झालेल्या माणसांबद्दल सहज रिकामपणीं विचार करण्याकडे मनुष्याची स्वभावतः प्रवृत्ति असली तरी माझ्या–प्रभाकराच्या ओळखीला उणे पुरे सहा, सात महिने झाल्यामुळें तो अगर त्याच्या घरांतली इतर मंडळी माझ्या विचाराचा विषय होण्याइतकी कांहीं नव्या ओळखीची नव्हती. शिवाय माझ्या मनमोकळ्या स्वभावामुळें प्रभाकराबरोबरच अण्णा, वसंत, त्याची आई, शालिनी,आत्या यांच्याशीं माझी अगदीं घरच्यासारखी घसण झाली होती. आणि म्हणूनच कित्येकांना मी त्या मंडळीच्या फार जुन्या परिचयाचा आहे असें वाटे. असें असतांना कांहीं माझ्या मनाची त्या मंडळीबद्दल विचार करण्याकडे

वारंवार तंद्री लागणें स्वभावानुसार नव्हतें. पण कसेंहि झालें तरी इतक्या दाट परिचयानंतर सुद्धां त्यांच्याबद्दल विचार करण्याची माझ्या मनाला ओढ लागत असे हें कांहीं खोटें नाहीं.

त्या तंद्रींत माझा केव्हां डोळा लागला तें माझें मलाच कळलें नाहीं. जवळजवळ साडे बारा, पाऊणला कोणीसें दाराला जोरानें धक्के दिल्यामुळें आणि त्या अर्धवट झोंपेंत 'जयवंत, जयवंत' म्हणून बाहेरून कोणीतरी हांका मारीत असल्याचा भास झाल्यामुळें मी दचकून जागा झालों. त्यावेळीं मीं विचाराच्या तंद्रींत इझिचेअरवरच पंखा छातीवर टाकून पडलों होतों हें माझ्या लक्षांत आलें. पुन्हां बाहेरून माझ्या नांवानें मारलेली हांक मी ऐकली आणि तो प्रभाकराचाच आवाज हें ओळखून इतक्या मध्यान्ह रात्रीं तो येण्याचें कारण काय याचें आश्चर्य करीत मी उठून दरवाजाचा अडसर काढला. प्रभाकरानें बरोवर आणलेल्या फाणसाचा खोलींत आणि त्याच्या तोंडावर प्रकाश पडला. त्याचा साधारणसा घाबरट चेहरा पाहून मी उतावळेपणानें एकदम विचारलें,

"कायरे प्रभा, इतक्या रात्रीचा कुठें आलास?"

"चल खालीं अगोदर. कपडे घाल झटकन."

"कां रे? कोणी घरीं आजारी..."

"वसंत तळमळतो आहे रे तापानें. कपडे घालून चल घरीं." असें म्हणून तो बाहेर पडला. मी झटकन कोट टोपी चढवून दाराला कुलुप लावीत म्हणालों,

"काय झालं रे एकाएकीं ताप यायला?"

"ताप यायला कारण तूं. दुसरं काय?"

"मी?" मी त्याच्याकडे डोळे विस्फारून पहात विचारलें.

"हं. तूं त्याला दोन दिवस भेटला नाहींस ना? बस्स.एवढंच त्याच्या तापाचं कारण."

मला वसंताच्या आजारीपणाचें कारण ऐकून अचंबा वाटला. माझी त्याची दोन दिवस गांठ पडली नाहीं हें त्याच्या तापाचें कारण असूं शकेल हें कोणाला खरेंसुद्धां वाटणार नाहीं. आधल्या सबंध दिवशीं मी ठाण्याला काकाकडेच होतों आणि मी सकाळीं घरीं गेलों होतों तेव्हां वसंत अण्णाबरोबर बाहेर गेला होता. पण म्हणून त्याचा त्याच्या मनावर इतका परिणाम होईल हें, खरोखरींच तसें नसतें, तर मलासुद्धां स्वप्नांत खरें वाटलें नसतें. पण तशी खरोखरच स्थिति होती; आणि त्याचें आश्चर्य मानण्याबरोवरच माझ्या ह्या मंडळीला आणि त्यांतल्यात्यांत छोट्या वसंताला इतका लळा लागलेला पाहून मला साभिमान आनंद वाटला. प्रभाकराच्या घरीं जाण्याच्या माझ्या रोजच्या नियमांत अपरिहार्य अडचण उद्भवून एखादा दिवस खंड पडला तर दुसऱ्या दिवशीं हा 'गुन्हा' परत होऊं न देण्यासाठीं त्याची समजावण करतांना माझ्या नाकीं नऊ येत. पण त्याला माझा इतका लळा लागला असला तरी माझ्या दोन दिवसाच्या गैरहजेरीनें त्याच्या कोवळ्या मनावर

इतका जवर आघात होईल असें मला कधींच वाटलें नव्हतें. आणि म्हणूनच मला प्रभाकराचे शब्द ऐकून इतकें नवल वाटलें. पूर्वजन्मींच्या निकट नात्याखेरीज इतका जिव्हाळा दोन परक्या माणसाला कसा असणार ? माझ्या मनांत हा विचार चटकन डोकाऊन गेला.

खालून एक रिकामी व्हिक्टोरिया जात होती. मी आणि प्रभाकर आंत बसलों. मी माझ्या मनाशींच आश्चर्य मानीत होतों कीं, निवळ परिचयापेक्षां त्या मंडळीशीं माझा जास्त जिव्हाळ्याचा संबंध आहे हें मला यापूर्वी कसें कळलें नाहीं ! कदाचित तसा प्रत्यक्ष प्रसंग घडला नव्हता म्हणून मी त्या बाबतींत अज्ञात होतों असेन असें मी तात्पुरतें माझें समाधान केलें आणि प्रभाकराकडे वळून माझ्या तोंडून चटकन उद्गार निघाले,

" प्रभा, नात्याव्यतिरिक्त तिव्हाइतांना आपल्याबद्दल इतका आपलेपणा वाटणं ही किती आनंदाची गोष्ट आहे नाहीं ? "

" हं. "

प्रभाकरानें माझा प्रश्न ऐकूनच उत्तर दिलें होतें कीं नाहीं कोण जाणे ! पण त्याच्या त्या विलक्षण स्थितींत मी त्याला असा कांहींतरी प्रश्न काय विचारला याचें माझें मलाच आश्चर्य वाटून मी स्तब्ध राहिलों. माझ्या तशा त्या प्रश्नाला उत्तर देण्याइतकी त्याची शांत मन:स्थिति नव्हती हें बऱ्याच उशीरानें माझ्या लक्ष्यांत आलें. पण मी तो प्रश्न त्याला विचारला तो तरी त्या विचाराच्या तंद्रींतच.

" बस, खडा कर. " असें म्हणून मी गाडीवाल्याच्या हातावर अधेली ठेवली आणि ओटयावर स्लीपर काढून घाईघाईनें वसंत निजलेल्या खोलींत आलों. वसंताच्या उशागतीं आत्या आणि आई बसल्या होत्या, शालिनी त्याच्या पायाजवळ बसली होती आणि अण्णा बाजूच्याच विछान्याला टेंकून वसले होते. मी आंत शिरतांच त्यांच्या मलुल चेहऱ्यावर कांहींशी प्रफुल्लितपणाची झांक मारली. मी त्याच्या उशाजवळ जाऊन बसलों आणि ताप किती आहे तें पहाण्यासाठीं त्याच्या कपाळाला हात लावला. त्याबरोबर माझ्या हाताला जोराचा चटका बसला. ताप कमींतकमी साडेचार, पांचपर्यंत होता हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें होतें. माझ्या हाताचा त्याला स्पर्श झाल्यामुळेंच कीं काय तो पुन्हां वडबडूं लागला.

"नाना कुठें आहेत ? काल नाहीं आले अन् आजहि आले नाहींत. दादा, तूं जाऊन त्यांना बोलावून आण ना रे ! अण्णा, तुम्हीं रामाला तरी पाठवा हो. ते आले कीं नाहीं म्हणजे मी त्यांच्याशीं गडी फू करणार. अगदीं बोलणार नाहीं. ते आले कां नाहींत ? नाना—ना—"

" वसंत, वसंत, झोंप पाहूं आतां स्वस्थ. हा बघ, मी आलों आहे. आतां अगदीं बोलूं नकोस. स्वस्थ झोंप. "

मी बोललों तें ऐकण्याइतकी त्याला शुद्धि होती कीं नाहीं कोण जाणें ! पण मी असें म्हटल्यावर मात्र तोहि कुशीवर परतून स्वस्थ झोंपला.

" अण्णा, आई, तुम्हीं पडा आतां जरा बिछान्यावर. सव्वा वाजायला आला. शालीन, उगीच जाग्रण करण्यांत काय फायदा सगळ्यांनीं ? " वसंतला झोंप लागलेली पाहून मी म्हणालों. पण माझें कोणीच ऐकेनात. आणि ऐकणार तरी कसें ? त्यांनीं झोपायचें आणि मी जागत बसायचें हें त्यांना तरी कसें आवडेल ? मी जरी त्यांना कोणीं परका वाटत नसलों तरी घरांतला नात्याचा माणूस कांहीं खास नव्हतों. अर्थात मीच उलट त्यांना झोपण्यास सांगून वसंतासाठीं जागत बसायचें हें कांहींसें विचित्र होतें. रक्ताचें नातें आणि प्रेमाचें नातें यांतला भेदभाव तो हाच.

× × × ×

सुश्रांत झोपेमुळें वसंत सात, साडेसाताच्या सुमारास चांगलाच सावध होऊन त्याचा ताप सुद्धां पार हटला होता. मी प्रभाकराची थट्टा करण्यासाठीं हंसत हंसत म्हटलें,

" अहो, भावी डॉक्टरसाहेब, वसंताचा ताप हटवायला तुमच्या त्या जाडया जाडया पुस्तकांत कांहींच औषध सांपडलं नाहीं. पण मी आल्याबरोबर औषधाशिवाय त्याचा ताप कुठल्या कुठें पळाला. "

" डॉक्टर म्हणजे कांहीं धन्वंतरी नाहीं. आणि शिवाय कित्येक रोग असे आहेत कीं औषधापेक्षां दुसऱ्या क्षुल्लक उपायांनींच ते बरे होतात. इतकं कशाला ? मायेच्या माणसाभावीं वर्षानुवर्षे टिकलेलीं वेडं आणि जडलेले रोग त्यांच्या नुसत्या दृष्टिभेटींत सुद्धां बरे झाल्याचीं उदाहरणं कांहीं थोडींथोडकी नाहींत. त्यांच्या तापाचं मूळ कारणच नाहींसं झाल्यावर त्यांचा रोग तरी त्यांना कशाला जखडून रहाणार ? शारिरिक व्यथेवर डॉक्टरचं औषध आणि मानसिक रोगांवर हेतुपूर्तता हें रामबाण आहें. "

" डॉक्टरांची बाजू राखण्यासाठीं छान मखलाशी केलीस. " मला जरी त्याच्या बोलण्यांत कांहींच गैरवाजवी दिसत नव्हतें तरी त्याची थट्टा करण्यासाठीं मी मुद्दाम तसें म्हटलें होतें. पण प्रभाकराच्या स्वभावांत जर कुठची एखादी पठाडी गोम असेल तर तो त्याचा फाजील सरळपणा. त्याला एखाद्याच्या बोलण्यांतली खोंच कधींच कळत नसे इतका त्याचा साधासुधा स्वभाव होता. अप्रत्यक्ष थट्टेला तो गंभीर वादाचेंच रुप देई. सहज कळणाऱ्या साध्या, सरळ थट्टेंशिवाय गंभीर पेहेरावाच्या आड दडलेल्या थट्टेंत त्याला थट्टेचा अंश देखील दिसत नसे. त्याच्या या फाजील स्वभावसारल्यामुळें व्यवहारांतला भोळेपणाहि कारणपरत्वें त्याच्या पदरीं बांधला गेला होता. प्रसंगीं त्याचा इतका अतिरेक होई कीं या लबाड जगांत एखाद्या अट्टल भामटयाच्या मायापाशांत हें भोळें सावज गुरफटल्यास तो त्याला सफाई नागवील अशीहि अण्णा वगैरेना भीति पडे. एरव्हीं त्याच्या स्वभावांत एवढासुद्धां दोष ठेवण्यासारखें व्यंग नव्हतें. आणि हा त्याचा स्वभाव माझ्या पुऱ्या परिच-

याचा असल्यामुळेंच त्याच्या बोलण्यांत मला न पटण्यासारखें कांहींच नसतांसुद्धां त्याला चीड आणण्यासाठीं मी वरील वाक्य म्हटलें.

" मी म्हटलं तें तुला पटत नाहीं ? माणसं दुरावल्यामुळें हृदयाला जबर धक्का बसून विछान्याला खिळून गेलेलीं अगर उद्वेगानें डोकं फिरलेलीं माणसं त्याच माणसांच्या पुनर्दर्शनानं खडखडीत पूर्वस्थितीवर येतात हें निदान ऐकून तरी तुला माहित असलं पाहिजे होतं ! इतकं कशाला ? "आशा-निराशें" त 'लंके'चं कितीतरी वर्षं टिकलेलं वेड दृष्टिआड झालेल्या दोघा भावांच्या पुनर्दर्शनानं कोठच्या कोठें नाहींसं झालं, हें तरी तूं प्रत्यक्ष पाहिलंस ना ? " तो जरा कपाळाला आंठ्या घालून म्हणाला.

"छान, जगांतली तत्वं जर नाटकाकादंबऱ्यांतून दिसायला लागलीं तर मग आणखी काय पाहिजे ? एखाद्या अल्पवयस्क लेखकानं एखादं नाटक लिहून त्यांत आपल्या अल्प मतीप्रमाणें कांहीं तत्वांचा समावेश केला कीं मोठमोठ्यांनींसुद्धां तीं खरीं मानली पाहिजेत नाहीं ? जसं कांहीं नाटकं आणि कादंबऱ्या म्हणजे अज्ञात तत्वांची पैदास करणारी मूसच ! " मी टवाळखोरपणानें हंसत म्हटलें.

" मी असं कुठें म्हणतो आहे ? फक्त माझ्या म्हणण्याचा अर्थ तुझ्या लक्ष्यांत येण्यासाठीं मी एक उदाहरण दिलं. " तो चिडून म्हणाला.

" मग मी तुझं म्हणणं खोटं कुठें म्हणतो आहे ? "

" मग मी डॉक्टरची बाजू सांवरण्यासाठीं कांहींतरी मखलाशी केली असं तूं म्हणालास तो ? "

" अरे, ती तुझी थट्टा केली." मी त्याच्या पाठीवर थाप मारीत हंसत हंसत म्हटलें.

" छान, मला तसं अगोदर सांगायचं होतंस तरी ! म्हणजे मला विनाकारण चिडण्याची गरज तरी पडली नसती. "

" वा, मग थट्टेचं स्वारस्य कुठें राहिलं ? एवढा डॉक्टर व्हायला आलास आणि तुला थट्टामस्करी कळण्याइतकं ज्ञान असूं नये ?"

" नाहींतर काय ? आमच्या दादाला थट्टामस्करी कांहींच कळत नाहीं. अगदीं गांवचा भोळा जसा कांहीं. " शालिनी पेल्यातून वसंतासाठीं दूध आणतांना म्हणाली.

" या आल्या पंडिताबाई तुमचा कैवार घ्यायला. जया, तूं पुढें वकिलीची 'लाईन्' घे. तुला सुटत नसलेलीं कोडीं ही छान सोडवील. "

" म्हणजे ? माझा हिचा संबंध ? " मी बावरून विचारलें.

" कळेल बरं काय तो ! " असें म्हणून तो हंसत हंसत शालिनीकडे पहात आंघोळीसाठीं निघून गेला. मी कांहींशा आश्चर्यानें शालिनीकडे पाहिलें. पण तिनें चटकन नजर खालीं वळवून म्हटलें,

" वसंत, दूध घे पाहूं हें. "

" नाहीं जा, मी नाहीं घेणार. "

" असं काय करतोस ? "

" मी तुझ्याकडून नाहीं घेणार जा. नानाकडे दे पेला. "

" पहा कसा लबाड आहे तो. माझ्यापेक्षां नाना तुला जास्ती आवडतात नाहीं ? काल रात्रीं कसा घोष चालवला होता. दादा तर दोनदां जाऊन आला. पण दाराला टाळं होतं. "

" कुठून ? माझ्या घरून कां ? "

" हो. एकसारखा हा रडायला लागला. तेव्हां तो जाऊन आला खोलीवरून. "

" च्. मी रात्रीं अगोदर अकरानंतर घरीं आलों नाटकाहून. " मी तिच्या हातून पेला घेऊन त्याला दूध देत म्हणालो.

" म्हणजे इतका का उशीर झाला ? "

" मग गंधर्वांचं नाटक का साताला अन् आठाला संपायचं ? "

" छान रंग आला असेल, नाहीं ?"

" किती तरी. तें नाटकच तसं आहे. गंधर्वाच्या गळ्यांतून उतरणारं एकएक गाणं ऐकलं कीं अंत:करण इतकं आनंदून जातं ! त्याच्या गाण्यांत काय जादू आहे कळत नाहीं. खरंच, काल तूं आली असतीस नाटकाला म्हणजे कळलं असतं तुला. तें सांगून नाहीं कळायचं. "

" पण यायचं कसं ? अण्णांना नाटकाची मुळीं आवडच नाहीं, दादाची परीक्षा जवळ आली आहे, ऐनवेळीं वसंताला ताप आल्यामुळें आईहि तिकडे अडकली. "

" म्हणून काय झालं ? तूं कां नाहीं आलीस ? "

" वसंताला घरांत ताप आणि मी नाटकाला कशी येऊं ? शिवाय, इश्श, तें वाईट नाहीं का दिसत ? "

" काय वाईट दिसलं असतं ? "

" तुमच्याबरोबर जाणं. "

" का ? प्रभाकराबरोबर नसती का गेलीस ? "

" म्हणून काय झालं ? दादा आणि तुम्हीं काय सारखेच ? "

म्हणजे ? शालिनी माझ्यांत आणि प्रभाकरांत भेदभाव मानते तर ? आणि कां नाहीं मानणार ? प्रभाकर तिचा भाऊ होता. आणि मी परिस्थितीनें घडवून आणलेला एक त्यांच्या जिव्हाळ्याचा माणूस होतों. शालिनी प्रभाकराबरोबर गेली असली तर ती भावाबरोबर गेली असेंच कोणी म्हणतील पण ती माझ्याबरोवर आली असती तर--

मी तिला कांहीं उत्तर देणार इतक्यांत आत्या कशालाशी तिथें आली आणि माझे शब्द तोंडांतल्या तोंडांतच राहिले. पण ' दादा आणि तुम्ही काय सारखेच ? ' हें शालिनीचें वाक्य मात्र मला राहून राहून कसेसेंच वाटूं लागलें. तिला माझ्याबरोबर येण्यांत गैर काय वाटलें ? इतर मंडळी नसती कां माझ्याबरोवर आली ? मग शालिनीला तें वाईट कां दिसलें ? ती प्रभाकराबरोबर नसती का गेली ?

मी माझ्या मनालाच हा प्रश्न विचारला.

त्या दिवशीं मी नाहीं म्हटलें तरी सगळ्याच्या आग्रहासाठीं मला तिकडेच जेवण्यास रहावें लागलें. माझा आणि प्रभाकराच्या घरच्या माणसांचा परिचय झाल्यापासून मी तीन चार वेळां सणावारीं प्रभाकराकडे जेवायला राहिलों होतों. त्यामुळें आजहि माझा नकाराचा औपचारिकपणा चालण्यासारखा नव्हता. त्यांतल्यात्यांत मला शालिनीनेंहि आग्रह केल्यामुळें मला त्या सर्वांचें मन मुळींच मोडवेना. त्यापूर्वी तिनें किती वेळां तरी मला तसा आग्रह केला होता आणि प्रत्येक वेळीं मी हजार सबबी सांगून तिला नाखूष करीत असे. पण त्या दिवशीं तिच्या आग्रहाच्या पहिल्याच वाक्याला माझा रुकार मिळाल्यामुळें ती जराशी विस्मयचकित होऊन तसें कांहीं म्हणाली सुद्धां. माझें मलाच याचें कांहीं कमी आश्चर्य वाटलें नाहीं.

जेवणानंतर माझा वेळ जाईना म्हणून मी आणि शालिनी ' ब्रिज ' खेळत बाहेरच्या झोपाळ्यावर बसलों. प्रभाकर कुठेंसा बाहेर गेला होता. ' ब्रिज ' खेळण्यांत शालिनी कल्पनेबाहेर हुशार होती. आमचा डाव अगदीं ऐन रंगांत आला होता. इतक्यांत दुरून गणू घराच्या दिशेनें येतांना दिसला. कारणाशिवाय तो इकडे येणार नाहीं हें मला ठाऊक होतें. त्याच्या करवीं प्रभाकराकडे मी केव्हां केव्हां निरोप पाठवित असल्यामुळें त्याला तें घर चांगलें ठाऊक झालें होतें. आणि मी कुठेंहि सांपडलों नाहीं तर ' चुकलेला फकीर मशिदींत तरी सांपडावयाचा ' या न्यायानें मी प्रभाकराच्या घरीं हटकून सांपडणार ही त्याची खात्री असल्यामुळेंच तो इकडे आला असावा असें मला वाटलें.

" काय रे गणू ? " तो पायऱ्या चढतां चढतां मी विचारलें.

" ह्ये पतुर आलाय. " त्यानें हातांतलें पत्र माझ्या हातांत देत म्हटलें. पाकिटाच्या साधारणशा तांबसर रंगामुळें आणि वरच्या छापामुळें मी तें आमच्या घरून आलें होतें हें चटकन ओळखलें.मी तें घाईघाईनें फोडून झरकन सबंध वाचून टाकलें आणि तें मांडीवर ठेऊन समोरच्या खांबाकडे खिन्नपणानें पाहूं लागलों.

" कोणाचं पत्र आलंय ? " मीं बराच वेळ स्तब्ध बसलेलों पाहून शालिनीनें हळूच मला विचारलें.

" बाबांचं पत्र आलं आहे. हें घे, वाच. " मी तिच्या अंगावर तें फेकलें. तिनें तें वाचून त्याची घडी केली आणि पुन्हां पाकिटांत ठेवीत कापऱ्या स्वरांत म्हटलें,

" मग जाणार का नंदगांवला ? "

" काय करूं म्हणतेस ? " मी तिच्याकडे शुष्क नजरेनें पहात म्हटलें.

" मी काय सांगणार ? पत्रांत तर अवश्य ताबडतोब यायला सांगितलं आहे. "

" हो. आणि तशांत आज दुसऱ्या कोणी न लिहितां स्वतः बाबानींच पत्र लिहिलं आहे. तसंच कांहीं जरूरीचं काम असल्याशिवाय कांहीं ते मला पत्र लिहिणार नाहींत. शालिनी, तुला सुचते का एखादी युक्ति ? "

', युक्ति कसली ? "

" जाणं टाळण्याची. "

" असं कां ? तुम्हांला आपल्या घरच्या मंडळींना पहावंसं नाहीं वाटत ? "

" हो, पण तितकंच तुम्हां सर्वांना सोडून जाणं जिवावर येतं आहे. "

" अं ? ' शालिनीनें चटकन मान वर करून विचारलें.

" खरंच शालिनी, तुम्हां सर्वांना सोडून—दोन महिन्याकरितां कां असेना जायचं म्हणजे जिवावर येतं. सुचते का एखादी युक्ति ? "

पण शालिनी कसली युक्ति सुचवणार ? युक्ति सुचली तरी हें मरण टाळतां येणें शक्यच नव्हतें. बाबांना नाहीं येत म्हणून लिहिलें तर एखादी सबब सांगितलीच पाहिजे. पण सबब तरी सांगणार कसली ? अगदीं खरें खरें लिहायला माझा कोणी कांहीं हात धरीत नव्हता. पण माझें मलाच तें कसेसेंच वाटूं लागलें. कारण मी जरी बाबानां माझा आणि प्रभाकरांच्या मंडळीचा किती जिव्हाळ्याचा संबंध आहे हें सर्व शक्य शब्दांनीं लिहिलें तरी प्रत्यक्षाशिवाय तें त्यांना कितीसें पटेल ? हृदयाची खरी स्थिति लेखकानें उत्कृष्ट भाषा-शैलीनें वर्णन केली तरी ती तिऱ्हाईत मनाला त्याच्याइतकीच पटेल असें म्हणणें अप्रस्तुत होतें. लग्नापुढच्या गोड आयुष्याच्या पहिल्या प्रहरांत पत्नीविरहाच्या अकालीं बसलेल्या ठोकरीनें वैतागलेल्या प्रणयी जिवांची कशी तळमळ होते ती नाणावलेल्या लेखकाच्या रसवंतीनें वर्णन करूनहि कित्येकांना कळण्याला जड जाते याचें कारण हेंच. अर्थात मी माझें हृदय पत्रांत वदवलें तरी त्याची पूर्ण जाणीव बाबांच्या मनाला होईल कीं नाहीं याचा मला संशयच वाटूं लागला. बाबांची फसवणूक करून—

पण फसवणुक तरी कोणत्या तऱ्हेची करणार ? परीक्षा पार पडली असल्यामुळें ती सबब देतां आली नसती. तापाची लंगडी सबब पुढें करावी तर घाबरून स्वतः बाबा आणि आईच इथें यायला उठतील आणि सारें बेंड बाहेर फुटेल. खरें कारण सांगण्यापासून कांहींच निष्पन्न झालें नसतें. कारण प्रभाकर, अण्णा वगैरेशीं जरी मी प्रेमाच्या नात्यानें बांधला गेलों होतों तरी माझे बाबा, आई, धाकटी प्रभा वगैरे सर्वांशीं माझा रक्ताचा संबंध होता. अर्थात परिस्थितीनें उत्पन्न झालेल्या प्रेमाच्या माणसापेक्षां माझी मूळ रक्त-मासाचीं माणसेंच माझ्या जास्त जिव्हाळ्याची असणें बरोबरच होतें.

पण फसवणुक तरी कोणत्या तऱ्हेची करणार ? परीक्षा पार पडली असल्यामुळें ती सबब देतां आली नसती. तापाची लंगडी सबब पुढें करावी तर घाबरून स्वतः बाबा आणि आईच इथें यायला उठतील आणि सारें बेंड बाहेर फुटेल. खरें कारण सांगण्यापासून कांहींच निष्पन्न झालें नसतें. कारण प्रभाकर, अण्णा वगैरेशीं जरी मी प्रेमाच्या नात्यानें बांधला गेलों होतों तरी माझे बाबा, आई, धाकटी प्रभा वगैरे सर्वांशीं माझा रक्ताचा संबंध होता. अर्थात परिस्थितीनें उत्पन्न झालेल्या प्रेमाच्या माणसापेक्षां माझी मूळ रक्त-मासाचीं माणसेंच माझ्या जास्त जिव्हाळ्याची असणें बरोबरच होतें.

बाललेखकांची करामत.

खाशी युक्ति

(लेखक म. रा. देव.)

एका शेतकऱ्याकडे एक घोडा होता. तो आतां म्हातारा झाल्यामुळें त्याच्याकडून पूर्वीसारखें काम होईना. तेव्हां शेतकरी त्याला म्हणाला, " तूं आतां अगदीं म्हातारा झालास आणि तुझा मला कांहींच उपयोग नाहीं. मी तुला फुकट तरी का पोसावें ? तूं आतां माझ्याकडून निघून जा. " असें म्हणून त्यानें तबेल्याचा दरवाजा उघडला. तो घोडा विश्वासू व आज्ञाधारक असल्यामुळें खिन्न मनानें तेथून बाहेर पडला आणि भटकत भटकत एका रानांत आला. पावसापासून आणि थंडीपासून आपलें संरक्षण करण्यासाठीं तो एका मोठ्या झाडाच्या तळाशीं बसला. कांहीं वेळानें तेथें एक कोल्हा आला आणि म्हणाला, " काय रे, इतका खिन्न चेहरा करून कां बसला आहेस ? " घोडा म्हणाला, "काय सांगू तुला ? माझ्या धन्यानें मी म्हातारा झालेलों पाहून मला तबेल्याबाहेर घालवून दिलें आणि म्हटलें कीं सिंहापेक्षांहि शक्तिमान होऊन परत आलास तरच तुला पुर्वीप्रमाणें खावयास व प्यावयास देईन. " त्याचें भाषण ऐकून कोल्हा म्हणाला, " मला एक युक्ति सुचते आहे. तूं असें मेल्याचें सोंग घेऊन पड. " घोडयानें त्याप्रमाणें केलें आणि कोल्हा तेथून कांहीं अंतरावर असलेल्या एका सिंहाकडे जाऊन म्हणाला, "सिंहराज, मी तुमच्यासाठीं एक शिकार आणली आहे. तो पहा, तिकडे एक घोडा मरून पडला आहे. चला तुम्हीं माझ्याबरोबर. " सिंह आनंदानें त्याच्याबरोबर तिकडे गेला. तेव्हां कोल्ह्यानें म्हटलें, "याला आतां इकडेच खाण्यापेक्षां तुमच्या गुहेंत जाऊन त्याला खाल्लेंत तर बरें होईल. तुम्हांला त्याला स्वस्थपणानें खातां येईल. तेव्हां तुम्हीं खालीं पडा. मी तुमच्या शेपटाला त्याचें शेपूट बांधतो व मग तुम्हीं त्याला फरपटत ओढीत न्या. " सिंहानें त्याप्रमाणें केल्यावर कोल्ह्यानें त्याला फसवून त्याचे दोन्हीं पाय घोडयाच्या शेपटीला घट्ट आवळून बांधले व घोडयाला खूण केली. त्याबरोबर तो उठून धांऊं लागला. सिंह दगडाला आपटल्यामुळें मोठमोठ्यानें ओरडला. पण घोडा तिकडे लक्ष न देतां तडक आपल्या धन्याकडे आला. धन्यानें तें पाहतांच घोडा सिंहापेक्षां शक्तिमान बनून आला आहे अशी त्याची खात्री होऊन त्यानें त्याला पुन्हां पूर्वीप्रमाणें वागवण्यास सुरुवात केली.

परीचा सूड

(ले. कृ. के. बेंद्रे)

एक म्हातारा: धनगर मेंढरें चरावयास सोडून आपण आपली मुरली काढून वाजवूं लागला. थोडया वेळानें त्याच्या मुरलीचा आवाज इतका मधुर निघूं लागला कीं त्या आवाजाला भुलून एक स्वर्गांतली परी त्याच्या पुढयांत येऊन उभी राहिली व म्हणाली, "माझ्याशीं तूं लग्न करतोस का ?" धनगर एकदम आनंदानें हो म्हणाला. तेव्हां तिनें आपल्या हातांतली आंगठी त्याच्या बोटांत घातली. त्याबरोबर तो एक सुंदर, तरुण राजपुत्र दिसूं लागला. तिच्याबरोबर जाण्यापूर्वी त्यानें प्रथम आपल्या मित्रमंडळीस भेटून येण्याची इच्छा दर्शविली. तेव्हां तिनें त्याच्याबरोबर सोळा सफेद घोडे दिले. रस्त्यांतून जातांना त्याला त्या नगराच्या राजाची मुलगी समोरून येतांना दिसली. तिनें त्याला पाहून आपल्या राजवाडयांत बोलावलें. तिचें सुंदर रुप पाहून आणि थोडया दिवसांनी हीच राणी होणार या विचारानें त्याला तिच्याशीं लग्न करण्याची इच्छा झाली. आणि आजूबाजूला कोणी नाहीं असें पाहून तो तिला म्हणाला, " तूं माझ्याबरोबर लग्न करशील कां ?"

पण हे शब्द उच्चारल्याबरोबर त्या तरुण आणि सुंदर राजपुत्राठिकाणीं एक फाटक्या वस्त्राचा म्हातारा धनगर दिसूं लागला. राजकन्येनें त्याला पहातांच आपल्या नोकरांना हांक मारून म्हटलें, " हा कोण म्हातारा, घाणेरडा माणूस इकडे आला ? त्याला बाहेर हांकून लावा. "

नोकरानीं त्याला राजवाडयाबाहेर घालवून दिलें.त्यानें पूर्वीच्या ठिकाणीं जाऊन त्या परीचा बराच शोध केला. पण ती त्याला कुठेंच आढळली नाहीं. आणि त्या परीशीं विश्वासघात केल्यामुळें तो पुन्हां मेंढरें राखणारा धनगरच होऊन राहिला.

—o—

बक्षिस बक्षिस बक्षिस

" खेडेगांवांत रहाणें चांगलें कीं शहरांत रहाणें चांगलें ? "

या विषयावर अरुणमालेच्या दोन पानांत पुरेल एवढा निबंध १३ वर्षांच्या आंतील मुलांनीं पाठवावा. त्यांत जो चांगला ठरेल तो पुढील अंकांत देण्यांत येईल व त्याला एक रुपया किंमतीचीं एक अगर दोन सुंदर उपयोगी पुस्तकें पाठविण्यांत येतील. मुदत २५ सप्टेंबरपर्यंत. लेखक वर्गणीदारच पाहिजे. नसल्यास त्यानें वर्गणीदार झालें पाहिजे.

कोडें.

(लहान मुलांसाठीं)

शब्द बनवून पाठवा

" आकाश " या शब्दापासून " बाजार " आणि " गुलाब " या शब्दापासून " सयाजी " असे शब्द बनवून पाठवा. शब्द बनविण्याची रीतः—" आकाश " या शब्दाचें कुठचेंहि एक अक्षर गाळावयाचें व त्याबद्दल दुसरें एखादें घालावयाचें. पण तें असें कीं त्या शब्दाचा नंतरसुद्धां कांहीं तरी अर्थ झाला पाहिजे. उगीच कांहीं तरी अक्षर योजून चालणार नाहीं. नंतर पुन्हां त्यांतलें एखादें अक्षर बदलून तेथें दुसरें घालावें. पुन्हां एखादें बदलून दुसरें त्या ठिकाणीं घालावें. असें " बाजार " या शब्दापर्यंत अक्षरें बदलत गेलें पाहिजे. लक्षांत ठेवण्याची गोष्ट म्हणजे अक्षर बदलल्यावर त्या शब्दाला कांहीं तरी अर्थ असला पाहिजे. उदाहरणार्थ " माकड " या शब्दांत " मा " बदलून तेथें " रो " हें अक्षर घातलें तर " रोकड " या शब्दाचा अर्थ होतो. त्याप्रमाणें " आकाश " या शब्दापासून " बाजार " आणि " गुलाब " पासून " सयाजी " हे शब्द बनवून पाठवावे. (पुढील अंकीं उत्तरें)

उत्तरें द्या

मलानों !

१ तुह्मांला शाळेंत जाणें आवडतें कीं घरीं रहाणें आवडतें ?

२ तुम्हांला आई विशेष आवडते कीं बाबा विशेष आवडतात ?

३ तुम्हांला मोठेपणीं कोण व्हावेंसें वाटतें व तें कां ?


४ तुम्हांला लहानच रहाणें आवडतें कीं मोठें व्हावेंसें वाटतें ?

५ समुद्रकिनारीं चटकन पांच वस्तू कुठच्या कुठच्या आढळतील ?

६ शाळेंत मास्तरांनीं छडी मारली तर तुम्हीं त्यांच्यावर रागवाल कीं नाहीं ?

(वरील ६ प्रश्नांचीं उत्तरें फक्त मुलानींच पाठवावी. मोठ्या माणसानीं त्यांना लिहून देऊं नयेत. ज्याची उत्तरें बरोबर व नीट कारणें दाखवून लिहिलेलीं असतील त्याचें नांव व ती उत्तरें पुढील अंकीं छापून प्रसिद्ध करण्यांत येतील. उत्तरें तीन अगर चार वाक्यांत असावी. **फक्त वर्गणीदारांनींच उत्तरें पाठवावीं.**)

पैशांचा योग्य मोबदला




स्वदेशी स्टेशनरी.

लेटरपेपर, पाकिटें वगैरेची रॅक, कागद ठेवण्याचे स्टिंगचे ट्रे, ब्लॉटर, तऱ्हतऱ्हेच्या दौती, झांकण्याचे चावी कुलुपासह कॅबिनेट्स्, लेटर बॉक्सिस वगैरे वगैरे.

लांकडी रंगित खेळ.

मुलांमुलींचे सर्व प्रकारचे खेळ, पाट, शिसवी देव्हारे, फणेरी पेट्या, खडाव, काठ्या, वाळ्याचे पंखे वगैरे



उत्तम, टिकाऊ, कापडी पट्टे.

चारी बाजूंनी पुस्तकें बांधून नतां येतात. किं. ६ आणे.

"U-F-K" 4-WAY BOOK STRAP

शिवाय चाकु, वस्तरे, कागद, पेन्सिल्स, पेपरवेट्स्, खुंट्या वगैरे वगैरे वस्तु मिळण्याचें

एकच ठिकाण:—व्ही. प्रभा आणि कंपनी.

नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई,

मेंदुचे विकार व डोकें दुखणें यावर.

किं. १-२-०,] **ब्राम्ही तेल** [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा:—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळंत काढा:—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळकडू:—उपजल्यापासून देण्यास योग्य किं. ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायणें वगैरे औषधें तयार आहेत. एक आणा आला असतां रुग्ण पत्रिका लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचना:—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांचा खप वाढल्यामुळें नक्कल सुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळीं या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयौंषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.
दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने

शर्टची बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोत्याची रु. ५; आंगठी रु. १; सल्ले जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. २॥; घडाळ्याचा छेडा रु. ३;

केंस काळे करण्याचा साबण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्याच्या बॉक्सला रु. १॥.

इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुड्यासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. अमृतवाडी, गिरगांव, मुंबई.

३२ वर्षें परीक्षा घेऊन शंका असेल तर नमुना फुकट मागवा. सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें.

सुधासिंधु

कफ, खोकला, पटकी, दमा, शूल, संग्रहणी, अतिसार, पोट दुखणें, जुलाब, वांती वगैरे रोगांवर अनुपान शिवाय स्वादिष्ट औषध. किंमत प्रत्येक बाटलीस ८ आणे, पोष्टखर्च १ ते २ पर्यंत ७ आणे.

दद्रुगज केसरी

गजकर्णाचें औषध

हेंही सरकारांतून रजिष्टर झालेलें औषध आहे. हें कांहीं त्रासाशिवाय २४ तासाच्या आंत आपला गुण दाखविणारें आहे. किंमत ४ आ. पोष्ट खर्च १ ते २ पर्यंत ७ आणे. एकदम १२ बाटल्या घेतल्यास २। रु. पोष्टखर्च माफ.

बालसुधा

मुलांस सर्दी, खोकला, आणि अपचन हें कधींही होऊं देत नाहीं. हें मुलांस बलवान करणारें गोड औषध आहे. किंमत १२ आणे. पोष्टखर्च ७ आणे.

आमची औषधें सर्व औषधें विकणाऱ्याजवळ मिळतात. कदाचित् तेथें न मिळाल्यास आमचे कडेस पत्र पाठवून मागवावें. पूर्ण माहिती करितां मोठा क्याटलॉग फुकट पाठवूं.

पत्ता:— **सुखसंचारक कंपनी, मथुरा.**

आमचा एजंट—**नरोत्तम गिरिधर** आ.कं. शेख मेमन स्ट्रीट, **मुंबई नं.२**

अशक्त मुलें सशक्त व गुटगुटीत होण्यास

डोंगरे

यांचें

बालामृत

देणें हाच एक खात्रीचा उपाय होय.

त्वरा) **जंगी लूट** (करा

खात्रीचीं बक्षिसें

रेल्वे रेग्युलेटर घड्याळ–३ वर्षें बरोबर टाईम देणारें खात्रीचें घड्याळ किं. ४॥ रु. बरोबर छेडा फुकट.

रिष्टवॉच फॅन्सी, साधें रु.५. सेकंडचें रु.५॥. चांदीचें रु. १० रिडियमचेंरु.६.

दद्रुचें नाशक गजकर्ण, खरूजवर रामबाण मलम, किं. ४ आणे २४ डब्यांवर खिशांतलें घड्याळ. ३६ डब्यांवर रिष्टवॉच फुकट. बक्षीस नको अस-ल्यास १॥। रु. डझन. **किंग जॉर्ज कॉरोनेशन कं.** मुंबई नं. ४.

कडकी व शक्तीवर ४२ वनस्पतींचा गोड



अशक्त मलें, स्त्रिया व पुरुषांना शरीर धष्टपुष्ट आणि सशक्त होण्यास हा काढा वापरा. किं १। रु.

पर्ल आणि कंपनी,

राणीचा बाग, मुंबई.

अमृतांजन (रजिस्टर्ड.)

हें ठणका, कळा, वेदना इत्यादि व्याधींवर अचूक गुणकारी आहे. आज २५ वर्षें याच्या एकसारख्या वाढत्या खपावरून याची सहज कल्पना होते. लाखों कुटुंबें आज अमृतांजन वापरीत आहेत. कारण तें सर्व प्रकारच्या वेदना, मुरगुळणें, संधिवात, कफ, सूज आणि अशा प्रकारच्या पुष्कळ व्याधी निखालस



बऱ्या करितें. ह्मणून ज्यांनी तें अद्याप अनुभवलें नसेल त्यांनीं खात्री करून घ्यावी. किंमत १० आणे.व्ही. पी. खर्च निराळा.

दंतमंजन.

या मजेदार दंतमंजनानें दांत शुभ्र होतात. रक्त वाहणें थांबतें. हिरड्या मजबूत होतात व वास मधुर येतो. प्रत्येक ड. किं. २ आणे **सर्व दुकानदारांकडे मिळेल.** अगर

अमृतांजन डेपो, १०९ फ्रीयररोड, मुंबई.

आर्यमहौषधालय. मु. पो. आंजलें.

प्रोप्रायटर–डॉ. रंगनाथ कृष्णशास्त्री बिवलकर, एल् एच. एम्. एस्.

कोकण प्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगप्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.

स्वर्णधात्री तैल हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, इ० वनस्पतींचीं सत्वें आणि उपयुक्त तैलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ. रोगांस जलद आराम पडतो. केशांस चोळिल्यानें केश काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक, लांब व मृदु होऊन मेंदू शत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध, खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यचा दाह, हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा. किं. १। रु.

थंडगार नेत्रांजन:—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, कांच वगैरे डोळ्याचे एकंदर विकार ताबडतोब-बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. ड. १॥ रुपया.

कर्णस्त्रावनाशक अप्रतीम तैल:—यानें कानचे सर्व प्रकारचे व्रण तत्संबंधी इतर विकार त्वरित बरे होतात. बा. १ रु.

दंतरक्षक पूड—ही दत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आ.

सूचना:—वरील औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचेचाळीस वर्षांत त्यचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला असून त्यांचा नेहेमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर खात्री पटेलच. औषधें माहितीच्या खड्यांसह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. प्रकृतिमान कळविल्यास रोग निदान व योग्य चिकित्साही कळवूं. आमचीं औषधें वगैरे माल मागविणें, तो खालील बिनचूक पत्त्यावरच मागवावा.

कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य.

मु. पो. आंजलें, ता. दापोली, जि. रत्नागिरी.

Dr. J. D. Kulkarni's Success Makers.

अखिल हिंदुस्थानांत अत्यंत नांवाजलेलीं पहिलींच.

कोणत्याही जातीच्या व सांथीच्या तापांवर

—विद्वान व नामांकित डॉक्टरांनीं अत्यंत वाखाणलेलीं—

डॉ. जे. डी. कुळकर्णी

यांचीं

सर्वांग सुंदर-शास्त्रीय.पद्धतशीर-अत्यंत सोईस्कर औषधें.

फिवरॉल. सर्व जातींच्या व सांथीच्या तापांवर अग्रतीम. "आंगांत ताप असतांना द्यावयाचें." किं. रु. १।

मलेरिन. मलेरिया-एंग्यू हिंवतापाचा जिवंत काळ एग्यूमिक्श्चर. " आंगांत ताप नसतांना द्यावयाचें. " किं. रु. १।

मलेरिन नं २. अल्पमोली पण खात्रीपूर्वक, अत्यंत गुणी एग्यूमिक्श्चर. "सर्वत्रांस सारखेंच सर्वोत्कृष्ट गुणावह." किं. १२ आणे.

या औषधांची सर्वत्र फार ख्याति असून एकटचा मुंबई शहरांतच १०००० पेक्षां जास्त कुटुंबांत यांचा संग्रह व गरजपरत्वें वापर असतो. इतर " निवडक " औषधांचा ७५ पानांचा सचित्र क्याटलाग १ आण्याचीं तिकिटें आल्यास मोफत पाठवूं. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन.

तारेचा पत्ता:—"ॐकारोदय" "Om Karodaya" Bombay.

पोष्टाचा पत्ता:—कुळकर्णी ॲण्ड सन्स, मुंबई नं. २.

डॉ. एन्. व्ही. कुळकर्णी यांचीं अनुभविक शास्त्रशुद्ध औषधें–



च्यवनप्राश.

(Improved Formula)

शक्ति, बुद्धि, कांती आणि वीर्य वाढविणारें **महान धातुपौष्टिक** औषध. धातुविकार, स्वप्नावस्था व दुबळेपणा. अशक्तता, कडकी व खोकला वगैरे विकार बरे करून शरीर जोमदार व तेजःपुंज बनवितो एक रत्तल बरणी किं. रु. ५ अ. र: २॥ रु.

द्राक्षासव (Extra quality) सारक,पाचक, पौष्टिक तरतरी आणणारें स्वादिष्ट औषध. दमा, खोकला, कफ, सर्दी वगैरे विकार बरे करून भूक सपाटून वाढवितें. १॥ रत्तल बा. १८१२; १ र. वा. १। रु. अर्धा रत्तल बा. ८११.

नवीन औषध (रजिस्टर्ड) कितीही दिवसाचा नवा अगर जुना मलेरिया ताप यानें खात्रीनें जातो. या औषधानें मलेरियाचा ताप जाण्याची आम्हीं हमी देतों. बा. किं. १॥. रु.

पिपरीन (रजिस्टर्ड) कॉलऱ्यावर रामबाण औषध. १।२ भागांत उलटी व जुलाब बंद होतात; आमांशावरहि चांगला उपयोग होतो. बा. किं. १। रु.

पॅकिंग व पोष्टखर्च निराळा.

मागविण्याचा पता:—**आयुर्वेदिक मेडिकल वर्क्स, मुंबई नं. १२**

Printed by **A. A. Moramkar** at his Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar Bombay 2.
and Published by **M. G. Rangnekar** at the **Arun** Office, 2nd Bhatwadi, Girgaum, Bombay 4.



संपादक—मो. ग. रांगणेकर] [वा. व. ट. ख. सह २। रु.

किंमत ३ आणे.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं

जगविख्यात निवडक औषधें.



विद्युद्दामसमप्रभां मृगपति स्कंधस्थितां भीषणाम् ।
कन्याभिःकरवालखेट विलसद्धस्ताभिरासेवितां ॥
हस्तैश्चक्रदरालिखेट विशिखांश्चापं गुणंतर्जनीम् ॥
बिभ्राणामनलात्मिकांशिशिधरां दुर्गात्रिनेत्रां भजे ॥ १ ॥


पत्ता:—कुळकर्णी ॲण्ड सन्स, मुंबई नं २.

सावंतवाडीचें साप्ताहिक

खास अंक] **वैनतेय** [खास अंक

या पत्राचा दुसऱ्या वर्षाचा पहिला अंक आक्टोबरअखेर निघणार आहे. त्यांत अनेक विद्वानांचे लेख येणार असून अंक सर्वांगसुंदर निघणार आहे. या पत्रांत सामाजिक, विनोदी, टीकात्मक लेख, विस्तृत परीक्षणें वगैरे लेख येत असतात. संस्थानच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं तद्विषयक निर्भीड चर्चा होत असल्यामुळें दूर देशीं रहाणाऱ्या सावंतवाडीच्या प्रजाजनांचें **वैनतेय** फार आवडीचें पत्र आहे. वार्षिक वर्गणी ३ रु. व्ही. पी. नें ३८५.

व्यवस्थापक—'वैनतेय' सावंतवाडी.



सात्विक करमणूक करून देशभक्तीची उज्वल ज्योत प्रज्वलित करणाऱ्या

चटकदार कादंबऱ्या.

सचित्र आनंदमठ किं. १८४, चव्हाणी समशेर! किं. १, सचित्र महाराणा प्रतापसिंह रु. १ वंगसूर्यास्त! किं. १, चितोडचा वीर अरुण! किं ८१२, सुवर्णयुग. किं. ८१२, सती–परीक्षा. कि., ८१२, सचित्र. राष्ट्रोन्नति केव्हां होईल? किं. ८८, सचित्र मधुर मीलन (दुसरी आवृत्ति) किं. ८८, प्रणटभंग! किं. ८४, वरील कादंबऱ्यांचा सेट ६८८ त देऊं ट. ह. शिवाय. फुटकळ पुस्तकांस भर किंमत पडेल.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें–शहर.

अनुक्रमणिका.

१ आई (कविता) श्री. रामतनय १

२ ईश्वरी संकेत. (सं. गोष्ट) श्री. शां. अ. सबनीस २

३ मुलांची मौज़. ९

४ मुलींचा संसार १६

५ श्रीगणेशापासून—(लेखांक. २) श्री. विनोदलाल १७

६ अंदरकी बात (विनोदी प्रहसन) ले. मंगळमूर्ति २५

७ स्वैरविहार पूर्णानंद ३२

८ क्षणभंगुर (चालू कादंबरी) ९

९ पाँच आणि अभिप्राय... ... ... ४३

बक्षिसासाठीं:—

अरुणाच्या बाललेखकांनीं यंदा आपापली दिवाळीची सुट्टी कशात-हेनें घालविली या विषयावर **अरुणाच्या** २५ ओळी होतील एवढा निबंध लिहून पाठवावा. ज्याचा निबंध सर्वांत चांगला ठरेल त्याला एक सुंदर पुस्तक नेहमींप्रमाणें बक्षिसादाखल पाठविण्यांत येईल. बक्षिसासाठीं १२ वर्षांखालील बाल-लेखकांनींच प्रयत्न केला पाहिजे व तो **अरुणाचा** वर्गणीदार असला पाहिजे ही अट निबंध पाठवितांना जरूर लक्षांत ठेवावी.

अरुण माला.

वर्ष २.] आक्टोंबर १९२५ [अंक २.

आई

आई हें वच कर्णरंध्रें शिरतां हेलावलें मानस ।
आईचें वच ऐकुनी लगबगे धावोनि ये पाडस ॥

आई, बालपणीं तुवां पढविलें, बोधा-मृता पाजिलें ।
आई, प्रेम करावयास मजला तूं तूंच गे बोधिलें ॥ १ ॥

आई जागृति दे स्मृतीस, करिते उद्दीप्त देहांतरीं ।
आईचे वव जागती अचुक ते पक्षी तरू-कोटरीं ॥

आई, हिंडविलें कडेवरति तूं, धेवोनि खांद्यावरी ।
आई, त्वत्स्मृति मानसा अनुदिनीं माझ्या विदीर्णा करी ॥ २ ॥

आई सद्गुरुराज एक म्हणुनी टाहोच कीं फोडितो ।
आई संकटिं साद घालुनि कुणी चिंतानला साहतो ॥

आई विठ्ठल माउली म्हणुनिया बाहे तुकाराम तो ।
'आई विठ्ठल' प्रेम व्यक्त करण्या शब्दास या योजितो ॥ ३ ॥

—रामतनय.

ईश्वरी संकेत.

ले.—श्री. शां. अ. सबनीस.

संध्याकाळची वेळ. आपल्या झोंपडीच्या अंगणांत दौलतराव शिलेदार आपल्या बायकोबरोबर गोष्टी बोलत बसले होते. त्यांच्या जवळच त्यांचा १०–१२ वर्षांचा मुलगा महादु होता. तळ्यावर सारस पक्ष्याचें जोडपें बसलें होतें. अंगणांत एक तुळसी वृंदावन होतें व त्याच्या सभोंवतीं कांहीं फुलझाडें लावलीं होतीं. संध्याकाळच्या मंद प्रकाशांत एक एकान्तवासी तारा पूर्व क्षितीजावर बाकीच्यांच्या अगोदर येऊन दिमाखानें चमकत होता. ते दिवस पावसाळ्याचे असल्यामुळें सगळीकडे हिरवागार देखावा दिसत होता.

" या वर्षी पाऊसपाणी चांगलं आहे, तर यंदा आमच्या महादूचं लग्न उरकून घेऊंया.. कसं काय महादू ? " दौलतराव उद्गारले.

" कांहीं नको आहे. भारीच आडदांडपणा करतो हल्लीं. दिवसभर आपला गीलोड व आपण या रानांतून त्या रानांत भटकत असतो. आज सकाळचीच गोष्ट.. इकडून शेतावर जाणं झालं होतं. या तळ्याकाठीं एक साळुंकीचं जोडपं बसलं होतं. इतक्यांत स्वारी कुठुनशी आली व गोफणींतून एक दगड त्या पक्ष्यावर मारला. बिचाऱ्यानं एकदां पंख फडफडावले व मान तिरपी करून खालीं पडला. " ताराबाई उत्तरादाखल म्हणाल्या.

" त्याच्यांत काय झालं ? लहानपणीं असे मर्दपणाचे खेळ खेळल्याशिवाय का मोठेपणीं अंगीं मर्दपणा येणार आहे ? महाराज सुद्धां लहानपणीं रानांतून भटकत होते व शिकार करीत होते. " दौलतराव आपल्या मुलाचा बाजू घेऊन बोलले.

" पण महाराज काहीं असहाय्य पक्षांना मारीत नसतील ? " ताराबाई म्हणाल्या.

" महाराज झाले म्हणून काय झालं ? ते काय पहिल्यांदाच कूर श्वापदांची शिकार करावयास गेले कीं काय ? पहिल्यांदा लहान श्वापदांचा शिकार केल्याशिवाय का मोठी शिकार साधणार आहे ?" दौलतराव म्हणाले.

" कसली शिकार अन् कसलं काय ? त्यांच्यांतला नर मेल्याबरोबर मादीनं जो आक्रोश केला तो ऐकून मला तर बाई अगदीं कसंसच झालं. त्या चिमुकल्या हृद-

यांतून भडभडा रक्त पडतांना पाहून माझ्या हृदयाचं पाणी पाणी झालं. त्या त्याच्या काळ्या भोर डोळ्यावर प्रेतकळा पसरलेली असल्यामुळं ते फार भेसूर दिसत होते. त्यांच्याकडे पाहून कितीतरी शंका कुशंकांनीं मला घेरलं.'' ताराबाई अगदीं कळवळ्यानें म्हणाल्या.

''अशा कुशंका आणि शंका त्या काय काय आल्या ?'' शिलेदारांनीं आपल्या बायकोस विचारलें.

''कांहीं नाहीं. इकडची नोकरी ही अशी धोक्याची...पण नकोच बाई भलतंच कांहीं तरी. वाईटाचा मुळीं विचारच नको. देवाच्या दयेनं इडा पीडा टळो म्हणजे झालं.'' ताराबाई म्हणाल्या.

इतक्यांत तो सर्वांअगोदर उगवून आपला दिमाख दाखविणारा तारा तुटून पडला ! पण कोणाचेंच तिकडे लक्ष्य नव्हतें.

''असं अगदीं वेडयासारखं करायला काय झालं ? ही नोकरी मी काय आजच करतों आहे ? आज शिवाजी महाराजांची नोकरी करून मला कमींत कमी १०—१५ वर्षं झालीं. किती तरी जिवावरच्या प्रसंगांतून जगदंबेच्या कृपेनं पार पडलों. असं असतांना उगीच शंका कुशंका काढीत कशाला बसतेस ?'' शिलेदार म्हणाले. अशा रीतीनें थोडा वेळ गोष्टी बोलणें झाल्यावर शिलेदारांनां दुरून कोणीतरी येत असल्याचा भास झाला. तेव्हां त्यांनीं महादूस कोण आहे तें पाहून येण्यास सांगितलें. शिलेदारांनी सांगितल्याबरोबर शेतांच्या बांधांवरून उडया मारीत मारीत महादू जाऊ लागला. हरिणाच्या पाडसाप्रमाणें आपल्या पाडसास उडया मारीत जातानां पाहून उभयतां मातापितरांचे डोळे आनंदानें भरून आले.

थोडयाच वेळानें महादू परत आला आणि म्हणाला, '' शिदुकाका येत आहेत.'' तो इतकें म्हणतो आहे तोंच त्याच्या मागोमाग एक घोडयावर बसलेला शिपाई गडी दिसूं लागला. आपला घोडा जवळच्या झाडाला बांधून शिदुकाका शिलेदार बसले होते तिकडे आले. शिलेदारानां एक मुजरा करून ते म्हणाले, ''दादा, परत कामाची वर्दी आली आहे. आपल्या हुकुमाप्रमाणें आजुबाजूला टेहळायला गेलों होतों, त्या वेळीं मोंगलांचा खजिना सुलतानपूराहून निघून तुळजापुराला जाणार आहे अशा बातमी लागली आहे. त्यांच्याबरोबर सरासरीं पंचविस शिपाई असतील.''

''शिकार साधण्यासारखी आहे. पाहूंया काय होतं तें. आपल्या मंडळीस तयार राहायला सांगा.'' दौलतराव शिलेदार म्हणाले.

* * * * *

आमच्या गोष्टीचा काळ शिवाजी महाराजांच्या वेळचा आहे हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. त्यावेळीं महाराष्ट्रावर स्वातंत्र्यसूर्याची उबदार किरणें पडत नव्हतीं, तरी पण त्याची पूर्वचिन्हें दिसत होतीं. शिवाजी महाराजांच्या पराक्रमानें व मुत्सद्देगिरीनें विजापूरकरांना चांगलाच धाक पडला होता. ठिकठिकाणीं आलेले शिलेदार व त्यांच्या हाताखालीं कांहीं मावळे गडी ठेऊन त्यांनीं विजापूरकरांच्या खजिन्यावर हल्ला करावयाचा सपाटा चालविला होता. वातमी काढ-यासाठीं ठिकठिकाणीं हेर बहुरुप्याचीं सोंगें घेऊन फिरत असत. आमचे दौलतराव शिलेदार असल्याच शिलेदारांपैकीं एक होते. ते अगदीं बालपणापासून महाराजांबरोबर होते. त्यांनीं आपल्या बिजलीचें पाणी अनेक वेळां यवनास दाखविलें होतें. निसर्गातील बिजली ज्याप्रमाणें ढगाचें हृदय फोडते त्याप्रमाणेंच त्यांची तलवार यवन साम्राज्याच्या हृदयाचे लचके तोडीत असे. त्यांच्या घरांत एकंदर माणसें फक्त तीनच. ते स्वतः, त्यांची पत्नी राधाबाई, व मुलगा महादू. नवराबायको दोन्ही एकमेकांना अनुरूप असल्यामुळें तीं अगदीं आनंदांत राहत असत. सोनवली म्हणजे खेडेगांव तें केवढें ! त्यांत साऱ्या पांच पंचवीस मावळ्यांच्या झोंपड्या होत्या. आतांहि त्यांत विशेष सुधारणा झालेली नाहीं. फक्त चहाच्या दुकानाची एक नवी झोंपडी त्या गांवांत बांधली गेली आहे इतकेंच. पण तें असो; त्याच्याशीं आपल्याला कांहीं पहावयाचें कारण नाहीं. त्याच लहानशा गांवांत शिलेदार चांगल्या मानानें राहत असत.

"पण आपणाला अगदीं गेलंच पाहिजे का ?" सकाळच्या वेळीं ताराबाई शिलेदारांना विचारीत होती. बाहेर १५-१७ मावळे गडी हातांत भाले आणि कमरेला तलवारी लटकावून उभे होते.

"आज तूं असं काय चालवलं आहेस ?" शिलेदारांनी विचारलें.

"आज मला अगदीं चमत्कारीक वाटतं आहे." ताराबाई म्हणाल्या.

"हा वेडे !" असें म्हणून शिलेदार--

शेवटीं ताराबाई म्हणाल्या, "नाहीं. मी आपल्या कर्तव्याच्या आड कधींच येणार नाहीं. मी झालें तरी आपली धर्मपत्नी आहे." ताराबाई खिन्नपणानें पण उसना खोटपणा आणून म्हणाल्या.

दोन बद्ध जीवांची ताटातूट होतांना किती केविलवाणी परिस्थिति उत्पन्न होते तें लिहिणें शक्य आहे का ? ढगांच्या मधून चमकून जाणाऱ्या झरेचं वर्णन कोण करूं शकेल ? सहज लीलेनें व मधुरतेनें चमकून जाणाऱ्या झरेचें वर्णन करणें ज्याप्रमाणें

शक्य नाहीं, त्याप्रमाणेंच प्रेमी जीवाच्या विरहजन्य व्यार्धीचें वर्णन करणें शक्तीबाहेरचें आहे. ढगांतील झरा ज्याप्रमाणें थोडा वेळ टिकते त्याचप्रमाणें प्रेमळ युग्मांच्या चोरट्या प्रेमाचा निरोपहि फार वेळ टिकत नाहीं; पण ढगांच्या क्षणिक झरेंत जी नवाई खेळते त्याच्यापेक्षां अधिक खुलावट त्यांत भरलेली असते. असो. शिलेदारांनी आपल्या पत्नीचा निरोप घेतला व ते बाकीच्या मंडळीस घेऊन संकेत स्थलीं जावयास निघाले. शिलदार आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें मंडळीला सरळ रस्त्यानें न नेतां आडवाटेनें नेत होते. दौलतराव दृष्टिआड होईपर्यंत ताराबाई डोळ्यांत पंचप्राण दाटवून तिकडे पहात होती.

कांहीं वेळ अशा रीतीनें प्रवास केल्यावर ते आपल्या संकेत स्थळीं आले. आजूबाजूला दाट झाडी पसरली होती. दोन्हीं बाजूला मोठमोठ वटवृक्ष उभे होते. सगळीकडे स्तब्धता पसरली होती. मधूनमधून फक्त खडकांतून वाहून जाणाऱ्या निर्झरांचं खळखळणें व पानांचें सळसळणें ऐकूं येत होतें. अशा स्थितींत कांहीं वेळ त्या ठिकाणीं दबा धरून बसल्यावर लांबून कोणीतरी येत असल्याचा चाहूल त्यानां ऐकूं येऊं लागली. यवनाकडचाच मंडळी येत होती हें दौलतरावांनी ताडलें. शत्रुसैन्य जसजसें दृष्टीच्या टप्प्यांत येऊं लागलें तसतशी दौलतरावांकडची मंडळी जास्त सावधगिरीनें लपूं लागली. त्यांची मंडळी थोडी असल्यामुळें एकदम छापा घालून खजिना काबीज करण्याचा दौलतरावांचा बेत होता. मंडळी जशा अगदीं जवळ आली तसा दौलतरावांनीं आपल्या मंडळीस उठण्याचा इशारा दिला. त्याबरोबर सर्व मंडळी भराभर आपल्या तरवारी नग्या करून यवनावर तुटून पडली. दौलतराव व यवनाचा सेनापती मोहबतखान या दोघांचा लढाई जुंपली. दौलतरावांची व त्यांची लढाई चालत असतांना कमनशिबानें दौलतरावांच्या घोड्याला वार लागून ते खालीं पडले. तरी देखील ते शौर्यानें लढत होत व आपल्या सैन्याला उत्तेजनपर शब्दांनीं उत्साह आणित होते. पण सेनापती जेव्हां त्या दंगलींत कोठें दिसेनात व त्यांचा घोडा पडलेला दिसला तेव्हां दौलतरावांच्या लोकांनीं कच खाल्ली. दौलतरावांनीं पुष्कळ खटपट केली; पण त्यांचें छोटेखानी सैन्य फांकलें तें फांकलेंच. शेवटीं लढतां लढतां एक वार वर्मीं बसून ते खालीं पडले व प्रतिपक्षाकडून त्यांना कैद करण्यांत आलें.

* * * * *

संध्याकाळचा वेळ ! आपण मिळविलेल्या जयाच्या आनंदानें बेहोष होऊन यवनसेनेनें आपला मोर्चा सोनवली गांवाकडे वळवला. शिलेदारांना कैद करून अगोदरच

सुलतानपुराला पाठविलें होतें. मोंगल सेना ज्यावेळीं गांवांत शिरली, त्या वेळीं ताराबाई सचिंत मुद्रेनें आपल्या अंगणांत बसल्या होत्या. त्यांच्याकडे एका शिपायाची पापी नजर वळून तो "ओ मेरी प्यारी" करीत पुढें आला. त्याच्यावरोवर त्याच्या मागून बाकीचे लोकहि तिकडे वळले. महादू दारांतच उभा होता. त्यानें धांटाईनें विचारलें, "कोन है ?"

त्यावरोवर एका शिपायानें उद्दामपणानें "तेरा बाप है !" म्हणून उत्तर दिलें. महादूच्या हातांत त्याची गोफण होतीच. तिनें नेम धरून त्यानें एक दगड त्या उद्दाम शिपायाच्या मस्तकावर मारला. दगड डोक्यावर इतक्या जोरानें बसला कीं त्यावरोवर तो शिपाई निश्चेष्ट पडला. पण बाजूला उभ्या असलेल्या एका आडदांड शिपायानें पुढें सरून आपली तलवार त्या शूर मुलाच्या पवित्र रक्तांत भिजवली. विचाऱ्यानें एक मर्मभेदक किंकाळी फोडली. दऱ्याखोऱ्यांनीं सुद्धां त्याचा प्रतिध्वनि करून आपलें दुःख प्रदर्शन केलें. पण त्या शिपायाच्या हृदयाच्या कठोरपणापुढें त्याचें कांहींच चाललें नाहीं. ती स्थिति पाहून "शाबास बाळा, आज आपल्या घराण्याची अब्रू तूं कायम राखलीस." असें म्हणून हातांतला खंजीर आवेशानें उगारून ताराबाई त्या शिपायांवर तुटून पडल्या. आपल्या पतीबरोबर शिळोप्याच्या गोष्टी बोलणाऱ्या व विभक्तपणाच्या वेळीं नाईलाजानें गरीब बनलेल्या ताराबाई याच का ? त्यांचा तो आवेश पाहून त्या यवनांच्या शरिरांतलें रक्त क्षणभर गोठून गेलें; पण तें क्षणिकच. दुसऱ्या क्षणीं तो हरामखोर आपले हात पसरून 'मेरी प्यारी' करीत पुढें आला. "हरामखोरा, अहाऱ्य अबलांवर अशा रीतीनें जुलूम करण्यास तुला कसर कांहींच वाटत नाहीं ? माझ्या नखाला सुद्धां जर हात लावलास तर कोल्ह्या कुत्र्यांच्या दाढेंत जाऊन पडशील. एक पाऊल पुढें घाल, म्हणजे हा खंजीर तुझ्या किंवा माझ्या कोणाच्या तरी छातींत गेलाच म्हणून समज." पण अशा धमकावणीला भीक घालण्याइतका तो कच्चा नव्हता. तो परत पुढें येण्याचा प्रयत्न करूं लागला. तो एका पावलाच्या अंतरावर येतांच ताराबाईनीं तो खंजीर आपल्या छातींत खुपसला व तीं वेशुद्ध होऊन खालीं पडली. ताराबाईची आतां आशा नाहीं असें पाहून ते लांडगे गांवांत दुसरें कांहीं भक्ष्य मिळतें कीं काय म्हणून पहावयास निघून गेले. गांवांत घरोघर असाच धुमाकूळ चालला असल्यामुळें ताराबाईच्या तोंडांत पाणी घालावयास देखील कोणी नव्हतें.

* * * * *

चार महिन्यानंतरची गोष्ट. मोंगल बादशहाकडून शह देववून शिवाजी महाराजांनी शहाजी राजांची सुटका करून घेतली होती व राजे हयात असेतोपर्यंत विजापूर-

करांच्या राज्यांत दंगाधोपा करणार नाहीं असें कबूल केल्यावरून लढाईंत पकडलेल्या लोकांस सोडून देण्यांत आलें होतें. त्यांतच आमच्या दौलतराव शिलेदारांचीहि सुटका झाली हें वेगळें सांगावयास नकोच.

शिलेदारांना गांवांतल्या लोकांकडून दंग्याची हकीगत कळली. ताराबाईंच्या त्या हृदयद्रावक अंताची हकीगत ऐकून त्यांच्यावर अगदीं आकाश कोसळल्यासारखें झालें होतें. त्या गांवांत आतां त्यांना राहणें शक्यच नव्हतें. ज्या गांवांत त्यानीं आपल्या प्रेमळ पत्नीबरोबर इतकीं वर्षें घालविली होतीं त्या गांवांत आतां त्यांना पत्नीविरहित आयुष्य कंठणें शक्यच नव्हतें. गांवांतला प्रत्येक कोंपरा त्यांना आपल्या प्रेमळ पत्नीची आठवण देत होता. गांवांत दोन दिवस राहिल्यावर ते रायगडावर महाराजांस भेटून आतां त्यांजकडून कायमची रजा घ्यावयास जाण्यासाठीं निघाले. सोनवलीकडून रायगडावर जाण्यास त्यावेळीं एक दिवस लागत असे. एक दिवस पायीं प्रवास करून संध्याकाळच्या वेळीं ते एका गांवाजवळ आले. ते गांवाजवळ आले तेव्हां त्यांना जवळच्या झाडींत कोणीतरी मोठ्यानें ओरडत असल्याचा भास झाला. ते जरा पुढें गेले तों त्यांनीं कोणीतरी मोठ्यानें " हरामखोरा, तुझी जीभ आतांच्या आतां गळून पडो !" असे बेफामपणानें शब्द उच्चारलेले ऐकले. यावरून कोणीतरी नीच मनुष्य एखाद्या असहाय्य अबलेवर जुलूम करीत असावा असें वाटल्यावरून आपलीं शस्त्रास्त्रें पाजळून दौलतराव पुढें सरसावले. ते पुढें जाऊन पाहतात तर एक वेडी रस्त्याच्या कडेला उभी राहून वरील वाक्य ओरडत आहे. ते जवळ जाऊन तिला "काय आहे ?" म्हणून विचारूं लागले. त्याबरोबर " खबरदार माझं नांव घेशील तर !" असें उत्तर त्या वेडीकडून त्यांना मिळालें.

त्या वेडीचा तो आवेश पाहून दौलतराव क्षणभर विस्मित झाले. नंतर कांहीं वेळ गेल्यावर ती म्हणाली, " तुम्ही कोण ? आम्हीं त्या पलीकडच्या देवळाजवळच्या झोंपडींत राहतों." तिचें हें बोलणें ऐकून दौलतरावास वाटलें कीं बिचारीला फक्त वेडाचा मधूनमधून झटका येत असेल; म्हणून ते तिला वेगवेगळे प्रश्न करूं लागले. तिची तिनें असंभाव्य उत्तरें देण्यास सुरवात केली. ते अशा रीतीनें तेथें उभे आहेत इतक्यांत एक लहान आठ, नऊ वर्षांची मुलगी त्या वेडीजवळ आली व तिला ओढून घेऊन जाऊं लागली. दौलतरावांनांहि तहान लागली असल्यामुळें पाणी मिळाल्यास पहावें या उद्देशानें तेहि त्यांच्या मागोमाग जाऊं लागले. झोंपडीच्या दारांत एक कुणबी उभा होता. त्याच्याकडून पिण्यास पाणी घेतल्यावर त्याला त्यांनीं विचारलें, " काय हो, ही वेडी येथें किती दिवस आहे ?" "झाले जवळजवळ चार महिने. मी रानांत लांकडे

आणावयास गेलों होतों त्यावेळीं तिला एका ओढयाच्या कांठीं रक्तानें माखलेली पाहिली. बिचारी कोणी तरी असहाय्य अबला यवनांच्या तडाख्यांत सांपडून तिची अशी अवस्था झाली असावी असें मला वाटून मा तिला घरीं आणली व कांहीं औषधोपचार केले; व तेव्हांपासून ती आतां इथेंच असते. माझ्या मुलीचं व तिचं बरं जमतं.'' त्या मनुष्यानें उत्तर दिलें.

'' जखम कुठें बरं झाली होती ?'' दौलतरावांनीं विचारलें.

''जखम छातींत झाली होती. कसल्या तरी——''पण पुढची वाक्यें ऐकावयाला दौलतराव तेथें उभे होते कुठें ? त्यांना कसली तरी शंका आल्यावरून ते तडक देवळाकडे वळले. वेडी देवळाच्या आंतल्या गाभाऱ्यांत बसली होती. ती मुलगी बाहेर खेळत होती. दौलतराव आंत गेल्याबरोबर त्यांच्या कानांत पुढील शब्द पडले.

''पण काय, आपण अगदीं गेलंच पाहिजे का ?''

झालें. आलेल्या शंकेचें निरसन झालें. ते एकदम ''तारे——क'' असें म्हणून देवळांत शिरले. वेडीला पुन्हां वेडाची लहर आली. ती बडबडूं लागली. ''हरोमखोरा, नामर्द शिवुडर्या, खबरदार माझं नांव घेशील तर.'' वेडाच्या लहरींत ओळख दिल्यास कदाचित् अनिष्ट परिणाम घडून येईल असें वाटून दौलतराव जरा बाजूला सरकले. वेडी पुन्हां बोलूं लागली. '' एक पाऊल पुढें घालशील तर पहा, हा खंजीर तुझ्या किंवा माझ्या कोणाच्या तरी छातींत गेलाच म्हणून समज.'' असें म्हणून तिनें आवेशानें आपला हात पुढें केला. तों तिचा तोल जाऊन ती खालीं पडली. दौलतराव पुढ जाऊन पाहतात तर त्यांना त्या वेडीच्या चेहऱ्यांत व आपल्या प्रेमळ पत्नीच्या चेहऱ्यांत फार साम्य दिसून आलें. पण आतां त्याचा उपयोग काय ? वाऱ्याच्या झुळकेनें देवळांत मिणमिण करून पेटणारा दिवा विझला होता व सगळीकडे काळोख पसरला होता. वेडीच्या जखमेंतून थोडेसें रक्त पडलें होतें व त्यानें देवालयाचे संगमरवरी दगड रंगले होते. जवळच्या देवळांतील नौबत पूजेचा वेळ झाल्याचें दाखवीत होती.

× × × × ×

दौलतराव हल्लीं कुठें असतात तें कोणासच ठाऊक नाहीं. सोनवलीच्या लोकांचा मात्र ताराबाईचा मृत्यू त्या दंग्यांतच झाला अशी समजूत आहे.

———

मुलांची मौज.

दिवाळीचा आनंद.

मुलांनीं फारच हट्ट घेतल्यामुळें रमाकाकूंनीं यशवंत आणि दिनू यांना बोहऱ्याच्या दुकानांतून फटाक्यांचा एक एक पेटी आणण्यासाठीं दोन दोन आणे दिले. नारायणराव दर वर्षीं दिवाळीच्या सणांत पुष्कळ दारुसामान आणीत. पण दारुकामाच्या पायीं पुष्कळ पैसा उधळून जातो व सर्व पैसे जळून गेल्याप्रमाणेंच होतात म्हणून या वर्षीं त्यांनीं घरांत कसल्याच तऱ्हेचें दारुसामान कोणी आणूं नये म्हणून सर्वांना सांगितलें होतें. परंतु इतर मुलें जशी दिवाळी जवळ येत चालली तसतसे फटाके उडवूं लागलीं आणि यशवंत व दिनू यांनाहि फटाके उडविण्याचा मोह पडला. आपल्या वडिलांजवळ कितीहि हट्ट घेतला तरी ते आपल्याला फटाके आणून द्यावयाचे नाहींत म्हणून त्यांनीं रमाकाकूंकडे जाऊन फटाक्यांसाठीं हट्ट घेतला. रमाकाकूंनीं पहिल्याप्रथम पुष्कळ आढेओढे घेतले. पण शेवटीं त्यांना दोन, दोन आणे काढून गुपचुप फटाक आणण्यासाठीं दिले.

हातांत पैसे पडल्यावर दोघेहि दुकानाकडे धांवले. त्या दुकानाजवळ एक आंधळा मुलगा 'बाबा, एक पैसा द्या' म्हणून ओरडत होता. यशवंत व दिनू दुकानाजवळ आल्याचा चाहूल लागून त्या मुलानें 'गरीबाला पैसे द्या' अशी त्यांची प्रार्थना केली. यशवंतानें त्याच्याकडे लक्षहि न देतां आपल्या पैशाचे फटाके विकत घेतले. दिनूहि तसेंच करणार होता. पण एक क्षणभर त्याला विचार पडला. 'बाबा, आज दोन दिवस मी उपाशी आहे. मला धर्म कराल तर देव तुमचं कल्याण करील.' या त्या मुलाच्या शब्दामुळें व तो आंधळा असल्यामुळें त्याला त्याची दया आली व आपण आतां वडिलांच्या नकळत चोरून हे जे फटाके घेणार आहोंत त्याबद्दल या गरीब मुलासच आपल्याजवळचे पैसे द्यावे असा विचार करून त्यानें आपल्याजवळचे दोन आणे त्या आंधळ्या मुलास दिले.

यशवंत चोरून फटाके मारीत असतां नारायणराव त्या ठिकाणीं आले व त्यांनीं त्याला आपली आज्ञा मोडल्याबद्दल खरपूस चोप दिला व दिनूचीहि हकिकत त्यांना समजल्यामुळें त्यांनीं दिनूला एक चांगलें पुस्तक दिवाळीसाठीं बक्षिस दिलें.

दिवाळीच्या दिवसांत आपण फटाके मारल्याबद्दल व आपल्याला बक्षिस न मिळाल्याबद्दल यशवंताला वाईट वाटत होतें व आपण आपल्या वडिलांची आज्ञा पाळली व फटाके घेण्याचा मोह आवरून त्या आंधळ्या मुलाला मदत केली म्हणून दिनूला आनंद होत होता. माझ्या मित्रांनों, फटाके घेऊन आपले पैसे जाळून टाकण्यापेक्षां ते गरीबांना दान केले तर केवढा बरें आपल्याला आनंद वाटेल !

शहरांत राहणें चांगलें कीं खेडेगांवांत राहणें चांगलें ?

ले:—कु. शिरीन खं. धैर्यवान.

(गेल्या अंकांत मागविलेल्या निबंधांत खालील निबंध बरा ठरल्यामुळें लेखिकेस ' **मुलींची सीता** ' हें १। रु. किंमतीचें पुस्तक बक्षिस दिलें आहे.—सं.)

वरील विषयावर लिहितांना प्रथम दोन्हीं ठिकाणची रहाणी दाखवून मग त्याची तुलना करून कोठलें चांगलें हें ठरविलें पाहिजे.

प्रथम खेडेगांवांत राहणें म्हणजे कसें.—सांप्रत खेडेगांव म्हणजे जवळ जवळ शहरांतील व्यवस्थेप्रमाणें झालें आहे. जागजागीं सखल प्रदेश करून गृहवस्ती वाढविण्याची सोय दयाळू सरकारानें करण्याचें आरंभिलें आहे. तेव्हां अशा ठिकाणीं राहिल्यानें बरेच फायदे होतात. शारिरीक व तसेच मानसिक फायदे होतात. खेडयांत राहिल्यामुळें मुख्य फायदा हा आहे कीं तेथील घरें एक अथवा दोन मजल्यापेक्षां अधिक उंच नसल्यामुळें तेथील हवा मोकळी असते व तेणेंकरून शरीरप्रकृति निरोगी राहाते. दुसरें नोकरी धंद्यावर जाणाऱ्या लोकांना आगगाडी अथवा आगबोटीनें दुसऱ्या शहरीं

(अर्थात मुंबई शहरीं) जावयाचें असल्यामुळें त्याची वेळ साधण्याकरितां नियमित वेळीं उठावे लागतें व त्याचप्रमाणें संध्याकाळीं घरीं परत येतांना नेहमींच्या वेळीं येऊन लवकर झोंपावें लागतें आणि त्यामुळें एक प्रकारचा नियमितपणा व वक्तशीरपणा मनुष्याच्या अंगीं जडतोच व शरीर चांगलें राहाते. तिसरें, खेडयापाडयांत शहराप्रमाणें इतर करमणुकीची साधनें नसल्यामुळें विनाकारण पैशाचा व्यय होत नाहीं व तेवढा त्याचा पैसा वांचतो. ह्याशिवाय खेडयांत राहिल्यामुळें दुसरे बरेच फायदे होतात. खेडयांत आपली मालकीची जमीन असल्यामुळें व ती सुपीक असल्याकारणानें तेथें आपल्याला शेतकी अथवा भाजीपाला, फुलझाडें वगैरेची लागवड करतां येते; व व्यापाराच्या दृष्टीनें आपणाला त्या बाजूनें फायदा करतां येतो. तसेच फुरसतीच्या किंवा सुटीच्या दिवशीं शेतांत अथवा मळयांत सहल करण्याची संधी मिळते व कदाचित् तें खेडें समुद्रकिनारीं असलें तर शहराप्रमाणें समुद्रकिनारीं फिरावयास देखील मिळतें. असे अनेक फायदे खेडेगांवीं राहण्यापासून होतात. आतां शहरांत राहण्याविषयीं म्हटलें म्हणजे सर्व उलट प्रकार असतो. शहरांत मोठमोठीं व उंच घरें व तीं सुद्धां जवळजवळ असल्यामुळें स्वच्छ हवा मिळत नाहीं व त्यामुळें रोगराई होऊन शरीरप्रकृती बिघडते. नोकरीच्या कचऱ्या जवळपास असल्यामुळें ट्रामगाडी, घोडयाची गाडी अथवा मोटर गाडीनें जाण्याची व्यवस्था होते; म्हणून नियमीतपणाला व वक्तशीरपणाला आळा पडतो. करमणुकीची बरीच साधनें असल्यामुळें—उदाहरणार्थ, सिनेमा हॉटेलें, नाटकें,—पैशांचा दुरुपयोग होऊन निजणें, उठणें, बसणें वगैरे अनियमितपणानें होतात व त्यामुळें शरीर सुदृढ राहत नाहीं. शेतकीसारखा उपयुक्त धंदा शिकतां येत नाहीं. फक्त शहरांत समुद्रासारख्या ठिकाणीं दररोज सकाळ संध्याकाळ फेरफटका करावयास मिळतो इतकाच काय तो अधिक फायदा म्हणतां येईल. ह्यावरून शहरांत राहण्यापेक्षां खेडेगांवांत राहणें अधिक चांगलें व फायदेशीर आहे हें सहज लक्षांत येईल.

आतां वर सांगितलेल्या गोष्टीखेरीज कांहीं गोष्टींचा विचार केल्यास असें आढळून येईल कीं शहरांत राहिल्यामुळें थोडा विशेष फायदा होतो. उदाहरणार्थ, शहरांत आजारीपणाच्या वेळीं औषधोपचाराची व्यवस्था तात्काळ करितां येते; कारण शहराच्या ठिकाणीं दवाखाने, इस्पितळें वगैरेची सोय असल्यामुळें थोडक्याच वेळांत अशा जागीं औषधाण्याची तजवीज केली जाते. परंतु जेवढी ही व्यवस्था लवकर करण्यांत येते तेवढ्याच अपघात वगैरे घडून येणाऱ्या गोष्टीहि जास्त प्रमाणांत घडतात आणि ह्याचें कारण शहरांत लोकसंख्या जास्त असते व गाडीघोडे, मोटर, ट्रामव आणि रस्त्यानें जाणाऱ्या लोकांच्या मनस्वी गर्दीमुळे वर सांगितलेल्या अपघाताच्या गोष्टी घडून यतात.

तसेंच शहरांत धंदा खेडेगांवापेक्षां अधिक चांगल्या प्रमाणांत असल्यामुळें तरतऱ्हेचें चैनीचे पदार्थ—म्हणजे कपडे, ऐषआरामाचें सुवासिक जिन्नस व उंची खाद्यें व पेयें वाटेल त्यावेळीं मिळतात व त्यामुळें खर्चाची बाब वाढत्या प्रमाणावर जाऊन पैशांचा दुरुपयोग होतो व शेवटीं कर्ज होण्याची पाळी येऊन अति वाईट स्थिति व अनिष्ट परिणाम घडतात. परंतु ह्या सर्व गोष्टी पैशाच्या जिवावर होत असल्यामुळें कदाचित् श्रीमंत लोकांच्या दृष्टीनें शहरांत राहणें चांगलें होईल, परंतु मध्यम व गरीब स्थितीच्या लोकांना सांप्रतच्या खेडेगांवांतच राहाणें जास्त श्रेयकर व फायदेशीर होईल.

गेल्या अंकांतील प्रश्नांचीं उत्तरें.

(गेल्या अंकीं मुलांचे खरे विचार कळण्यासाठीं विचारलेल्या सहा प्रश्नांचीं बऱ्याच जणांकडून उत्तरें आलीं. पण कित्येकांचीं उत्तरें असमाधानकारक व कांहींचीं वाजवीपेक्षां जास्त लांबलचक आहेत. त्यांतल्या त्यांत कांहींशा चांगलीं उत्तरें निवडून काढलेलीं अशीं खालील आहेत.

—संपादक)

(ले. कुमार भालचंद्र)

(१) माझ्या लहानपणीं खेळण्याची व मजेंत वेळ घालवण्याची इतरां-सारखी मला संवय असल्यामुळें प्रथम प्रथम शाळेत जाऊन निमूटपणें एका जागेवर बसून रहाणें कंटाळवाणें वाटे. पण आतां शिक्ष्याची गोडी लागूं लागल्यामुळें मला शाळेंत जावसेंच वाटतें.

(२) मला आई आणि बाबा दोघेंहि आवडतात. पण खरें सांगावयाचें म्हणजे मला आईच जास्त आवडते. कां तें कांहीं मला कळत नाहीं. कदाचित् मला वाटतें भूक वगैरे लागली म्हणजे आईच आम्हांला खाऊ देत असल्यामुळें माझ्या मनावर तसा परिणाम झाला असेल.

(३) समुद्रकिनारीं चटकन आढळणाऱ्या पांच वस्तु म्हणजे दगड, शिंपल्या, रेती, पाणी आणि फेंस या होत.

(४) मला वाटतें माझ्याप्रमाणें इतरांनासुद्धां मास्तरनीं शाळेंत छडी मारली म्हणजे त्यांचा संताप येत असेल. आपण चुकतों म्हणून आपणाला मास्तर शिक्षा करतात हें जरी खरें आहे तरी त्यावेळेपुरता तरी त्यांचा राग येतो. पण मला वाटतें त्यांच्यावर रागावणें बरें नाहीं.

(५) पुष्कळ वडिल माणसांकडून त्यानां पुन्हां लहान व्हावेसें वाटतें असें मी ऐकतों; पण मी कधीं मोठा होईन असें मला झालें आहे. मोठें झालें म्हणजे आपणाला कोणी रागावणार नाहीं आणि हवें तसें वागतां येईल. मग त्यानां पुन्हां लहान व्हावेसें कां वाटतें, तेंच मला कळत नाहीं.

(६) मला मोठेपणीं कोणी तरी मोठें व्हावेसें वाटतें. त्यामुळें सर्वजण मला मान देतील आणि मीहि मग माझ्या हातून होण्यासारखी मदत गोरगरिबानां करीन. मला वाटतें मी डॉक्टर झालों तर मज्ञ दोन्ही हेतु साधतील.

कोडयाचें उत्तर

गेल्या अंकांतील कोडयाचें उत्तरः—

(१)	आ	का	श	(२)	गु	ला	ब
	आ	का	र		गु	ला	म
	आ	जा	र		स	ला	म
	बा	जा	र		स	या	म
					स	या	जी

दोन्हीं कोडयाचीं उत्तरें फक्त र. वि. परुळकर, कु. शिरीन खं. धैर्यवान, द. भा. तेंडुलकर व गो. मा. देशपांडे यानीं बरोबर पाठवलीं आहेत.

नवीन कोडें

मी चौपाटीवर वाळूंत बसलो होतों. कांहीं वेळानें वाऱ्यानें उडत उडत एक चिटोरें माझ्या पायाकडे येऊन पडलें. त्यांतली कांहीं अक्षरें पुसून गेली होतीं. पण मी तें पत्र आहे हें ओळखलें. मला त्याचा अर्थ कळेना. तुम्हांपैकीं कोणीं सांगतील का ? तें पत्र असें होतें.:—

+य र++त,

++त

७–३–२३

तुझे +त्र पों++. +ज+र स+ज+. मा+ +ल वा++व+ +ता. तूं इ++ +स+स +र ब+ झालें +स+. का+ आं+ +र+ज के+. तु+ +र फा+ +ठव+ +ली. ++ची +ण+ +का आ+व. डचा+ प++ आ+. +ग मी ++क+ ++न. आ++ खू+ +ज–

पुढें कागद फाटल्यामुळें मला कांहींच कळलें नाहीं, पण एवढयाचा अर्थ कोणीतरी लिहून पाठवावा. खुणांच्या ठिकाणीं अक्षरें घातलीं म्हणजे सर्व पत्राचा अर्थ लागेल असें मला वाटतें.


कसें फसविलें ?

(मं. रा. वकील)

एका रानांत एक लहानसा तलाव हेता. तेथें एक हत्तीचा कळप रोज पाणी पिण्यासाठीं येत असे, पण त्यांच्या वाटेवर एक सशाचा कळप होता. ते हत्ती क्रूरपणानें त्या लहान प्राण्यांना आपल्या पायांनी तुडवून प्राणास मुकवीत.असें बरेच दिवस झाल्यावर पुढें सशांना तें सहन होईना व शेवटीं त्यानीं आपली एक सभा भरवली. त्यांच्यापैकीं एका म्हाताऱ्या सशानें त्या हत्तींच्या मुख्याला जाऊन भेटण्याचें ठरवलें व त्यांचा रोजचा येण्याचा वेळ जसा जवळ आला तसा तो तेथल्या एका मोठ्या खडकावर बसला आणि मोठ्यानें म्हणाला, " मी चंद्राकडून वर्कील म्हणून इकडे आलों आहे. हा तलाव त्याच्या मालकीचा असून तो सशाचा कळप म्हणजे त्यानें या तलावाचें रक्षण करण्यासाठीं ठेवलेलें सैन्य आहे. तेव्हां तुम्हीं यापुढें या तलावाकडे येतां कामा नयें अशी त्यांची इच्छा आहे. " त्यावर हत्तींचा मुख्य म्हणाला, " आम्हीं कोणाचेंच ऐकणार नाहीं. आम्हीं रोज इकडे पाणी पिण्यासाठीं येणार. "

" बरें आहे. तुम्हीं आज रात्रीं या तलावावर या; म्हणजे या तलावांत चंद्र कसा संतापून बसला आहे तें तुम्हांला दिसेल. " तो ससा म्हणाला.

ते हत्ती पुन्हां रात्रीं तेथें आले. चंद्राचा झगझगीत प्रकाश वाऱ्याने वरखालीं होणाऱ्या तलावांतल्या पाण्यावर पडल्यामुळें चंद्र खरोखरच संतापला आहे असें समजून सर्व हत्ती घांवत सुटले व पुन्हां त्या तलावावर कधींच आले नाहींत.



मुलींचा संसार

१ ॲल्युमिनीयमचीं भांडीं स्वयंपाकाच्या वेळीं नेहमीं वापरल्यामुळें तळाला अगदीं काळीं पडतात. तीं दोन तास सोडावॉटरमध्यें उकळून नंतर वाळू आणि साबू यांच्या सहाय्यानें, तळाचा काळेपणा नाहींसा होऊन, कोरी करकरीत करतां येतात.

२ दूध, पीठ अगर उष्णतेमुळें घट्ट होणारे इतर पदार्थ असलेलीं भांडीं गरम पाण्यांत कधींहि ठेऊं नयेत. नाहींतर तीं साफ करण्यास फार श्रम पडतात.

३ तूपा-तेलाचे पदार्थ असलेलीं भांडीं अगर बशा कधीं थंड पाण्यानें धुऊं नयेत. तुपांच्या जिनसांत चरबी असल्यामुळें ती गरम पाण्यानेंच नाहींशी करतां येते. थंड पाण्याचा कांहींच उपयोग होत नाहीं.

४ सकाळीं नळाचें पाणी भरण्यापूर्वी प्रथम थोडा वेळ तें पाणी कशांतहि घेऊं नये. सबंध रात्रभर तें नळाच्या शिशाच्या 'पाइप'मध्यें कोंडलें गेलें असल्यामुळें स्वच्छ नसतें. थोडेसें पाणी वाहूं देऊन नंतर तें भांडयांत भरणें आरोग्याच्या दृष्टीनें हितावह असतें.


५ कित्येक स्त्रियांना पुरुषाप्रमाणें ब्रशानें दांत घांसण्याची संवय असते. पण त्याची नीट निगा राखली नाहीं तर एखादा दंतरोग उद्भवतो. ब्रशाचें काम झाल्यावर साधारणशा गरम पाण्यानें साबणाचा फेंस करून ब्रश साफ धुवावा आणि नंतर थंड पाण्यांत खळखळून पुसून ठेवावा.

६ दुपारच्या वेळीं पुरुषमंडळी घरांत नसतांना छातींत थंडी होऊन ती असह्य होऊं लागली म्हणजे मोहऱ्या वाटून त्यानें छाती शेकल्यास फायदेशीर होतें. दांत दुखूं लागले म्हणजे सुद्धां मोहऱ्या कानाच्या पाठीं जराशा घांसल्यास दांत दुखणें थांबतें.

७ कपडे धुतांना पाण्यांत मूठभर मीठ घातल्यास कपडे सुकल्यावर सुरकुत्या पडून गोठल्यासारखे होत नाहींत.

८ सकाळीं बटाटे सोलून ते तसेच पाण्यांत ठेवल्यास आंत लिंबू पिळून त्याचे थोडे थेंब टाकावे. म्हणजे संध्याकाळपर्यंत बटाट्याचा पिवळसर रंग जशाचा तसा कायम रहातो.

— —



राजा संभाजी.

सुप्रसिद्ध युनायटेड पिक्चर सिंडिकेटचा वरील चित्रपट येथील मॅजेस्टिक सिनेमात लवकरच दाखविण्यांत येणार आहे.



दीपावलि. चित्रकार–श्री.वा. ल. धारगळकर.



श्रीगणेशापासून.....

लेखांक २ रा.

ले. श्री. **विनोदलाल.**

उथळ पाण्याचा खळखळाट

लेखकाचें टोपण नांव किंवा सबंध नांव याच्या वर किंवा खालीं एकदांची त्याची कविता, गोष्ट, निबंध किंवा दुसरें कांहीं तरी व तेंहि कुठें तरी 'छापून' आलें कीं बाललेखकाला आपण एक कसली तरी पायरी वर चढल्यासारखें वाटूं लागतें. व्यासापासून सुरू झालेल्या जुन्या लेखकाच्या मालिकेमध्यें आपणहि ओंवलें गेलों आहों अशा कल्पनेनें आपल्या मालिकेंतील सर्व चांगल्या चांगल्या वाग्भटांची तो गणना करूं लागतो व 'छापून' आल्यामुळें त्यांचा व आपला दर्जा जवळजवळ समानच झाला अशी गोड कल्पना आपल्याशींच करून घेऊन तो सर्व जगाकडे आपल्याला प्राप्त झालेल्या या नव्या दृष्टीनें बघूं लागतो.

लेखक होऊं इच्छिणाऱ्या बाललेखकाची ही पहिली महत्त्वाकांक्षा अशा तऱ्हेनें एकदांचा सफल झाली तरी तो आरंभ्या मूळाला विसरत नाहीं. वेदांतामध्येंही 'मूळ विसरूं नका' अशा तऱ्हेचा उपदेश असल्याचं म्हातारीं माणसें सांगतात. पण त्याच्याहि अगोदर हा उपदेश या लेखकाला पटल्यासारखा वाटतो. आपल्या प्रसिद्धीचा उगम जिथून झाला असें त्याला वाटत असेल तिथेंच आतां बराच वेळ घुटमळत रहाणें त्याचें कर्तव्य असतें व हें कर्तव्य तो योग्य तऱ्हेनें बजावण्याच्या मार्गालाहि लागलेला असतो. या वेळीं आपल्यापुढें अतिशय विस्तृत कार्यक्षेत्र पसरलें आहे अशा कल्पनेनें त्यानें तें पार पडून जाण्यासाठीं चंग बांधलेला असतो. कथालेखन, कादंबरीलेखन, निबंध-लेखन, टीकालेखन, विनोद, नाट्य वगैरे वाङ्मयाचीं विविध अंगें त्याच्या डोळ्यांपुढून चित्रपटाप्रमाणें भराभर हालत जातात व आपली आवडती बाजू कोणती, ईश्वरानें आपणांस जन्माला घालतेवेळीं वाङ्मयाच्या कुठच्या अंगाची वाढ आपल्या हातून

व्हावी असें ठरविलें असावें व आपण कुटचा विषय हातीं घेतला असतां त्यांत आपणास यश येईल या गोष्टीकडे त्याचें लक्ष्य लागून रहातें.

पण हा फरक त्याच्या मानसिक रचनेंत पडत असतो. तो पडेपर्यंत त्याच्या वृत्तीमध्येंहि बराच फरक पडत चाललेला अगदीं वरवर पाहाणाऱ्यालासुद्धां दिसून येतो. छापखाना ही काय चीज असते याचा परिचय होण्याचा त्याचा हाच वेळ असतो. छापण्याची कला निघाल्यामुळें सर्व भाषांच्या वाङ्मयावर काय उपकार झाले असतील ते जरी नक्की सांगतां येण्यासारखें नसलें तरी बाललेखकाला आपल्याविषयीं दुसऱ्याची कल्पना कांहींतरी जगावेगळी करून देण्यामध्यें त्याचे अतिशय उपकार होतात हें येथें छातीठोकपणानें सांगायला हरकत नाहीं. संपादकाच्या कचेरींत बसण्याचा योग आल्यामुळें (लेखकाबरोबर एकादा संपादक पहिल्याप्रथम जेवढया कठोरपणानें वागतो तेवढाच तो पुढें पुढें सदर लेखक हा त्याच्या लेखकवर्गापैकीं एक बनल्यामुळें मऊ पडत जातो. इतकेंच नव्हे पण त्यांची दोस्ती नंतर एवढी वाढत जाते कीं नंतर ते दोघेहि आपल्या प्रथम भेटीच्या प्रसंगाची आठवण काढून हंसत रहातात. या हंसण्यांत अर्थातच् संपादकांकडून आपली बाजू लंगडी असतां देखील त्यावेळीं त्यानें दाखविलेल्या अरेरावीची आठवण होऊन लेखकाच्या मनांत उत्पन्न झालेल्या तिरस्काराचंहि भर असते.) व छापखान्यांतहि शिरकाव करण्याची पर्वणी एकादे वेळीं लाभल्यामुळें या दोन्ही ठिकाणीं मिळालेल्या माहितीचा उपयोग तो आपल्या एखाद्या ओळखीच्या इसमास घाबरवून टाकण्यामध्यें करण्यास मुळींसुद्धां कचरत नाहीं. लेख म्हणजे काय, छापणें म्हणजे काय, भाषा म्हणजे काय आणि वाङ्मय म्हणजे काय पदार्थ आहे याबद्दल पाणिनीला शंकराकडून मिळालेल्या व्याकरणाच्या सूत्रांएवढीच माहिती असणारा एखादा बावळट माणूस जर या लेखकापुढें उभा राहिला तर या लेखकाच्या तोंडून वारंवार उच्चारल्या जाणाऱ्या, टाईप, ट्रेडल, हँडप्रेस, फौंड्री, कंपोज, पायका, प्रुफ, ग्रेट प्रायमर, बॉडी, केसी, अखंड, डिग्री, क्राऊन, रॉयल, डेमी अष्टपत्री, सेरिया, वगैरे शब्दांनीं त्याला ज्वालामुखींतून उडणाऱ्या राखेच्या ढिगाखालीं अगदीं खोलपर्यंत आपण दाबले जात आहोंत असें वाटूं लागतें व कांहीं दिवसांपूर्वी आपल्या बरोबर गोटयांनीं खेळणारा आपला लंगोटीयार आज जगामधल्या केवढया तरी मोठयांत मोठया पदवीला चढला आहे असें त्याला वाटूं लागतें. अशा तऱ्हेनें भेटेल त्या ओळखीच्या माणसाला चीत करण्याचा बाललेखकाचा हा काळ असतो.

याच काळांत त्याच्या डोक्यांत एक कल्पना काहूर करून सोडीत असते. रामा नांवाचा एक मुलगा रस्त्यांतून जात असतां त्याला वाटेंत एक रुपया मिळाला

व तो तो उचलून घेणार इतक्यांत कृष्णा त्या ठिकाणीं येऊन,'हा माल आमचा नव्हे' वगैरे उपदेश त्याला करतो व ते दोघेहि तो रुमया तिथेंच टाकून पुढें चालूं लागतात,' अशाच तऱ्हेची किंवा ' एका शतकऱ्याला रामा नांवाचा एक चांगला व गोविंदा नांवाचा एक वाईट (अशा गोष्टींत बाललेखकांकडून मराठी शाळेंतल्या उत्तम गुण, स्थळ, भावनादर्शक वस्तूविषयीं चांगला व नीच वस्तूंच्या विशेषणाच्या कामीं वाईट या विशेषणांचा वैपुल्यानें उपयोग करण्यांत येतो) मुलगा असतो. रामा चर असतो व गोविंदा अर्थात् चांगला असतो रामाच्या वाईट गुणांमुळें त्याला त्याचा बाप हांकून लावतो व गोविंदाला आपली सर्व मिळकत (वडिलोपार्जित कीं स्वकष्टार्जित व त्यांबद्दल काय कायदे असतात याचें या वयांत मूळ लेखकालाच अज्ञान असल्यामुळें अशा ठिकाणीं बाप, अर्थात् देणाराच,कायदा व प्रिव्ही कौन्सिलचा निकाल यांच्या जागीं असतो.) देतो' अशा तऱ्हेच्या **प्रामाणिकपणा** किंवा **चोरी करूं नये** असे मथळे असलेले लेख या लेखकाच्या नांवावर जरी आले असले तरी आपल्यापुढें येणारी प्रत्येक व्यक्ति आपल्याला सदर लेखावरूनच ओळखीत असावी व तिला त्याच्यामुळें आपल्याबद्दल पूज्य-बुद्धी वाटत असावी अशी त्याची भोळी पण प्रामाणिक समजूत असते.बापानें रागानें मारलेल्या हांकेच्या स्वरांत त्याला (बापाला) या आपल्या कर्तव्गारीचं जाणीव असल्यामुळें कोमलपणा मिश्र झालेला आहे व आईनें जेवायासाठीं बोलावलें असतांना तिच्या त्या शब्दांतहि तिला आपल्याबद्दलचा अभिमान वाटत असल्याचा सूर स्पष्ट उमटतो आहे असें सदर लेखकाला वाटतें. आपल्या माहितीचें जग एकीकडे, आपण एकीकडे व आपल्याला जगानें ओळखण्यासाठीं ज्याकडे दृष्टि फेंकावी तो आपला लेख किंवा ती आपल्या ज्ञानाची साक्ष, या दोन टोकांच्यामध्यें आहे असेंच त्याच्या दृष्टीला दिसत असतें. कोणीहि ओळखीचा इसम दूरवर दिसला कीं बाललेखकाचें विचारयंत्र लगेच सुरू होतें. दुसऱ्याच्या डोक्यांत आपणाला पाहून काय विचार चालले असतील याचा फोटो आपल्या कल्पनेप्रमाणें तो घेऊं लागतो. या फोटोंत बहुधा पुढीलप्रमाणें शब्दचित्र दिसूं लागतें.

" काय प्रतिभावान लेखक आहे ! खरोखर असलींच माणसें जन्माला यावीं. आमच्यामध्यें हा इतके दिवस होता पण आम्हांला त्याची खरी खरी योग्यता कळली नाहीं व आम्हीं त्याच्याबरोबर बरोबरीच्या नात्यानें वागून त्याच्याशीं हसलों, खेळलों देखील.कित्येक वेळां आम्हीं त्याचा अपमानहि केला आणि स्वतःचा त्याच्या संगतीनें फायदा करून घेण्याची आलेली संधि गमावली.पण सोनें तें सोनें. तें जरी उकिरड्यावर पडलें तरी त्याचा परीक्षक आला कीं तो त्याचें खरें मोल जाहीर करतो व मग

पितळ म्हणून झिडकारून देणाऱ्या आमच्यासारख्या गाजरगारख्यांना पश्चात्ताप होतो. आमच्या अभाग्यांच्या घरीं आलेल्या या कामधेनूची योग्यता आम्हांला कळली नाहीं हेंच खरें. आतां याच्या लेखाबद्दल विचार करूं. त्याचा....मध्यें 'छापून' आलेल्या गोष्टींतला नायक रामा. किती छानदार रंगवला आहे कॅरेक्टर त्याचा! उगीच नाहीं 'छापून' आला तो! सबंध एक पान म्हणजे जवळ जवळ ५–६ हजार पानें छापलीं गेलीं तीं ती तशीच होती म्हणून. आतां याच्यासारख्या माणसाबरोबर बोलतांनाहि पुष्कळ जपून बोललं पाहिजे. पूर्वीसारख्या सलगीनें याच्याशीं वागणें म्हणजे स्वतः असभ्यपणाचा दोष पदरीं घेण्यासारखा आहे. वगैरे वगैरे" समोरून येणाऱ्या इसमाच्या डोक्यांत आपल्याबद्दल अशा तऱ्हेचे विचार चालत असतील असें वाटून जेव्हां तो इसम जवळ येतो व दोघांचेहि नमस्कार चमस्कार होतात त्यावेळीं आमच्या बाल-लेखकानें केलेल्या प्रतिनमस्कारांत, 'मी किती जरी मोठा असलों तरी मी तुम्हांला विसरणार नाहीं. माझ्या ज्ञानाला विनयाची जोड मीं दिली आहे' अशा तऱ्हेच्या विचारांचा ध्वनि असतो.

लोकांच्या मनांत आपल्याबद्दल मोठेपणाची कल्पना उत्पन्न करण्याचे प्रयत्न चालूं असतांच मोठ्या म्हणून समजल्या जाणाऱ्या लोकांची व आपली ओळख व्हावी अशीहि इच्छा त्याचा पिच्छा पुरवते, व त्या दिशेनें त्याचे प्रयत्न चालू होतात. रोज नित्यनेमानें नमस्कार करणें, एखाद्या मध्यस्थाच्या मार्फत घरीं जाणें व स्वतःची ओळख करून देणें, स्वतःच तेलंगी बाणा करणें वगैरे प्रकारांचा या गोष्टीच्या सिद्धीसाठीं अवलंब केला जातो. पण स्वतःशीं अशा तऱ्हेचा माणूस एखादा शब्द बोलला किंवा स्वतःकडे पाहून हंसला तर कपिलाषष्ठीचा योग समजणारा हा मनुष्य इतरांबरोबरच्या खासगी संभाषणांत, 'अमक्यातमक्याकडे बोलत बसलों होतों,' 'अमूक मला सोडीनाच मुळीं' वगैरे कल्पनेंतच शक्य असणाऱ्या गोष्टी सांगत असतो. चारचौघां-बरोबर रस्त्यावरून जातांना जर असा माणूस वाटेंत भेटला तर, "पाहिलंत, मी जरा बोलत उभें रहाण्याची इच्छा असल्याचं नुसतं दाखविलं असतं तरी माझे कित्येक तास त्यानं खर्ची घातले असते; पण मी होऊनच जरा घाईत असल्याचं दाखविलं म्हणून बरं." वगैरे शब्द उच्चारल्याशिवाय तो कधीं चुकायचा नाहीं.

मानसिक श्रमामुळें डोक्याला अतिशय त्रास होतो व त्याचा प्रकृतीवर परिणाम होत असल्यामुळें डॉक्टरलोक लेखकवर्गाला मानसिक श्रम करूं देत नाहींत असा-हि शोध बहुधा नाटकांच्या प्रस्तावनांतून लागल्यामुळें जरा कांहीं सर्दी, खोकला झाला

कीं हा प्राणी डॉक्टरच्या दवाखान्यांत जातो व तेथें त्यांचा खालीलप्रमाणें संवाद होतो.

डॉ.—काय होतं आपणाला ?

ले.—काल रात्रीं थोडा ताप आला होता.

डॉ.—मलेरिया असेल कदाचित् ?

ले.—छे, छे, तशा तऱ्हेचा ताप असेलसं वाटत नाहीं मला. ताप येण्यापूर्वी डोकं नुसतं घणाचे घाव मारल्याप्रमाणें दुखत होतं.

डॉ.—मलेरियाच्या तापांत डोकं दुखण्याचीहि सिंप्टम्स् होतात.

ले.—ताप येण्याच्यापूर्वी किंवा तो गेल्यावर, उत्साह कसा तो रहात नाहीं; नेहमीं गळून गेल्यासारखं वाटतं. हातांत लेखणीहि उचलून धरवत नाहीं. प्रेससाठीं मॅटर लिहीन लिहीन म्हणतों तोहि अडकून पडल्यासारखा होतो आणि बरींच कामं अशींच भिजत पडून रहातात.

डॉ.—(आश्चर्यातिरेकानें) म्हणजे आपण लेखक आहां वाटतं ?

ले.—कसला ? आपला उगीच कांहींतरी खरडतों आणि तें होतं प्रसिद्ध झालं.

डॉ.—हं, मग सांगा बघूं डोकं दुखतं त्यावेळीं डोळेहि जड होतात का ?

ले.—अगदीं अस्संच.

डॉ.—आणि मेंदू मऊ झाल्यासारखा वाटतो.

ले.—होय हो; केससुद्धां गळून पडूं लागले आहेत.

डॉ.—खरंच कीं काय ? मग याचो हेळसांड आतां याउपर करणं डेंजरस आहे. मग आतां मला वाटतं तुमचा ताप केव्हांतरी येणारा नसून तो बहुधा नेहमींच अंगांत असावा.

ले.—हो, जवळजवळ तसंच. हाडं सगळीं ठणकत असतात.

डॉ.—मग माझं ऐकाच तुम्हीं. हें सगळं होतं तें ब्रेनवर अतिशय प्रेशर (दाब) पडल्यामुळें. याची निग्लेक्ट आतां केली तर तुमच्या ब्रेनवर त्याचा फार वाईट इफेक्ट होईल. मीं तुम्हांला एक चांगलं ब्रेन आणि बरव्हाईन टॉनिक प्रिस्क्राईब करतों. पण तुम्हीं एका गोष्टीला मात्र जपलं पाहिजे आणि तें म्हणजे ब्रेन-वर्क मुळींसुद्धां करतां नये. हो, असं जर केलंत तर आमच्या औषधांचा उपयोग; नाहीं तर त्यांचा काय उपयोग ?

ले.--पण डॉक्टर, तें जमणं शक्य दिसत नाहीं हो मला. आमची लाईनच मुळीं अशी पडली आहे कीं ब्रेनवर्क घेतलं नाहीं तर मुळीं भागायचंच नाहीं. तुमच्या म्हणण्याप्रमाणं वागण्याचं करावं तर मूळ प्रकृतीवरच गदा ! मग याला काय मधला मार्ग सुचत आहे तुम्हांला तर सुचवा मला.

डॉ.--मधला मार्ग कसला सांगणार ? मधला मार्ग आतां एवढाच राहिला कीं डोक्याला मध्यम श्रम द्यावे. पण हें पहा मी सांगतों तें तुमच्या बऱ्याचंच सांगतों. प्रकृति चांगली असली तर आणखीहि लिहाल; पण प्रकृति एकदां ढांसळली कीं मनांत असूनसुद्धां करणं होत नाहीं.

ले.--होय, तें कबूल आहे. पण तूर्त औषध तरी द्या लिहून. पाहूं तुमच्या म्हणण्याप्रमाणं कितपत वागतां येतं तें. ”

डॉक्टराकडून एकदां आपल्या प्रकृतीचे मनाजोगतें निदान करवून घेऊन लेखकाची स्वारी हंसतमुखानें बाहेर पडते. बिचाऱ्याच्या मेंदूवर हा वेळपर्यंत दाब पडून त्याचें स्वास्थ्य बिघडण्यास कारण म्हणजे त्यानें लिहिलेल्या रामा गोविंदाच्याच गोष्टी ! हे व अशाच तऱ्हेचे फरक ‘ छापून ’ आल्यानंतर बाललेखकाच्या वृत्तींत पडत किंवा पडले असतां आपल्या वाङ्मय वेडयक (बाललेखकाला वरचेवर उच्चारण्याची भुरळ घालणारा हा वाङ्मय म्हणजे एक बडा शब्द वाटतो. मराठी भाषेंतील शब्दांत ङ हें अक्षर असलेले शब्द थोडे आहेत. बहुधा नाहींतच.म्हणून ह्या वाङ्मय शब्दाचे त्याला फार महत्त्व असतें.) कामगिरीसाठीं आलेल्या टपालांत येणाऱ्या व आलेल्या ग्रंथांत्या वाङ्मयांतील सर्व अंगांचें निरीक्षण करीत असतो आणि त्याच्या डोळ्यांपुढें हटकून कथालेखनाचें अंग येतें. कवितेनंतर बाललेखकाला मोह घालणारी दुसरी गोष्ट म्हणजे लघुकथालेखन ही होय. वृत्त, चाल, मात्रा वगैरेंच्या अडथळ्याची पर्वा न करता काव्याचा किल्ला सर करणाऱ्या बाललेखकाच्या पदरीं निराशच पडली म्हणजे तो गद्याकडे वळतो हें पूर्वीं सांगितलेंच आहे. याच्याशिवाय एका पानांत दोन किंवा त्याहुन अधीकहि येणाऱ्या कावळ्या कुत्र्यांच्या कथा यावेळीं त्याला बऱ्याच कमी दर्जाच्या वाटूं लागतात, हेंहि एक कारण त्याला दहा दहा, पंधरा पंधरा पानांच्या लघुकथा लिहिण्याचा मोह पाडण्यास कारणीभूत होतें. कवितेबरोबर झगडून जरी तो निराश झालेला असला तरी त्याच्या काव्याचा कैफ अजून उतरलेला नसतो. या पुढच्या लेखनांत पहिल्या पहिल्यानें तो तारे, चांदण्या, निसर्ग, आकाश, शून्य, लता, फुल, मुल या शब्दांशिवाय लेखणीच उचलत नाहीं. वाटेल ह्या ऋतूंत व दिवसा किंवा

रात्रीं त्याला एकाच वेळीं लतेवर फूल दिसतें, घरांत किंवा बागेंत मुल दिसतें व आकाशाकडे नजर गेली असतां तारा किंवा चांदणी दिसते. जग हें भेसूर आहे, कंटकमय आहे, नाना प्रकारच्या पापांनीं बुजबुजलेलें आहे वगैरे वगैरे शोध या वेळींच त्याला लागल्यामुळें त्याच्या कथालेखनाचा कल पहिल्याप्रथम सामाजिक गोष्टींकडे व त्यांतहि ट्रॅजेडी किंवा शोकपर्यवसायी गोष्टीकडे वळत जात असतो.अशा वेळीं त्याच्या गोष्टीची सुरवात एकाद्या कुटुंबांतील माणसाच्या मृत्यूनें होते. ती वेळ बहुधा रात्रीची असते. आकाशांतील किमानपक्षीं एक तरी तारा त्यावेळीं तुटून पडलेला लेखक पहातो. सोसाटयाचा वाराहि त्याच वेळीं सुटून, झाडाची एक मोडून पडलेली फांदीहि त्याच्या नजरेंतून सुटत नाहीं; वेलीवरचें एक फूलहि बरोबर याच वेळीं कुठूनसें येऊन त्याच्या पायापुढें पडतें आणि हे तीनहि प्रसंग एकसमय वच्छेदेंकरून घडून येत असतां 'एका पडक्या भिकार घरांतून आक्रोशाचा हृदयविदारक आवाज' त्याला ऐकूं येऊन त्याच्या डोळयांतून दोन चार कढत अश्रुबिंदुहि त्यावेळींच खालीं पडतात.

आकाशांतला तारा, लतेवरचें फूल, झाडाची फांदी, मेलेला मनुष्य आणि लेखकाच्या डोळयांतले अश्रू यांचा वर्ग त्याच्या दृष्टीनें एकच असतो. ह्या सर्व गोष्टी स्वाहा झाल्यावर लेखकाच्या दृष्टीनें त्या सर्व शून्यांतच विलीन होत असतात. अशा गोष्टींच्यापुढें त्या गोष्टींतील कुटुंबावर लेखकाच्या डोक्यांतून उत्पन्न झालेली नाना तऱ्हेचीं शक्य व अशक्य कोटींतील संकटें कोसळत जातात व त्या कुटुंबांतील प्रत्येक माणूस, कोणी पोलिसांनीं खुनाचा आळ आणल्यामुळें, तर दुसरें बांधकाम चाललेल्या इमारतीचा दगड पडून, तर तिसरें नुसत्या मानसिक धक्क्यानेंच, तर चवथें केवळ लेखकाचीच इच्छा म्हणून अशा तऱ्हेनें एकामागून एक भरत जातें व अखेर 'या पापी व फसव्या जगांत राहून त्याचे असह्य जुलूम सहन करण्यासाठीं' कोणीच शिल्लक उरत नाहीं.

यापुढची पायरी म्हणजे गुप्त पोलिसांच्या कथांची. बाललेखकाच्या चिमुकल्या डोक्याला आपल्या मेंदूंतून वाटेल तशी विश्वामित्री सृष्टि उत्पन्न करण्याला अशा तऱ्हेच्या गोष्टीमध्यें पुष्कळच अवसर सांपडलेला असतो. शिवाय पात्रांचें साहित्यहि फारसें न लागल्यामुळें प्रत्येकाला वेगवेगळ्या स्वरूपांत रंगविण्याची त्याला आवश्यकता भासत नाहीं. एखादा बावुराव, एखादें प्रणयी युगुल, एकादा रेम्याडोक्या पोलिस ऑफिसर, एखादा व्हिलन किंवा त्याची टोळी आणि एकादा खून किंवा तशीच मोठी दांडगी चोरी असें साहित्य मुख्यतः या गोष्टींना लागतें. अशा गोष्टींची

सुरवात ' भयंकर खून ' किंवा ' बँकेवर दरवडा ' यांनीं होऊन शेवट ' धाकटचा मधुकराचे पाये घेत मनोहर-चंद्रिका गच्चीवर उभीं राहिलीं असतां ' किंवा 'वावासाहेबांनीं आपली प्राणाधिक कन्या विमला प्रभाकर.ला अर्पण करून स्वतःच्या धंद्यांत त्याला भागिदार करून घेतलें व सर्व इस्टेट प्रभाकर-विमलेच्या नांवानें करून दिली,' अशा स्वरुपांत होतो. अर्थात लेखकाला आपल्या अद्भुतरसाला मध्यंतरीच्या प्रकरणांतच भरपूर वांव द्यावयाला मिळतो.

या प्रकरणांत मोटारींची धांवपळ व पाठलाग, पिस्तुलांचे बार, रस्त्यांतल्या रस्त्यांत गडप होणारा व तेथून पांच मैलांवरच्या एका इमारतींत शांतपणें सिगारेटचा धूर सोडीत बसणारा व्हिलन, एकाच बुक्कीनें पंधरा असामींनां लोळवणारा व लाथेसरशीं लोखंडी दरवाजा फोडून इमारतीच्या छपरावरून पंधरा फुटांवर असलेल्या नारळीच्या झाडाच्या शेंडयावर उडी मारून आपली सुटका करून घेणारा बाबुराव, पिस्तुल आपल्यावर रोंखलें असतांना, ' मला अगोदर ठार करा ' ' मी स्वतः अगोदर स्वर्गीं जाणार ' वगैरे भाषणें करीत राहून एकमेकांना हातांत बेडया असूनहि आलिंगनें देणारीं मधुकर-मालती, वगैरे वगैरे लेखकानें उत्पन्न केलेलें ' रंकाचें वैभव ' असतें. यांतल्या कुठल्याहि पात्रावर परमेश्वराचा कोप होणार नाहीं, कोणाच्याहि मार्गांत निसर्गाचे अडथळे येणार नाहींत किंवा कोणीहि कसल्याच आधिभौतिक, आधिदैविक गोष्टीला हार जाणार नाहीं. कारण या सर्वांचा कर्ताकरविता म्हणजे एक लेखकच. फक्त त्याच्याच इच्छेनें पडत्या इमारती स्थिर राहतील, सुरळीत चाललेल्या आगगाडया एकमेकांवर आपटतील किंवा विमानांतून समुद्राच्या अथांग सागरांत पडलेला व पोहतां न येणारा नायकहि वांचूं शकेल. एवंच, या खऱ्या गोष्टी होण्यास कारण ' यत्कृपा तमहं वदे परमानंद लेखकम्. '

अंदरकी बात.

(लेखक—'मंगळमूर्ति')

प्रवेश १ ला.

(स्थळ—चौपाटीचें वाळवंट.पात्रें——कॉलेजांतली पोरें. विषय—वाटेल तो.)

दामुअण्णा:—(वादग्रस्त विषय उत्पन्न झाल्यावर आपलें म्हणणें मुद्देसूद आहे या खात्रीनें वक्ता जितक्या जोरानें टेबलावर मुठ आपटील तितक्या जोरानें 'नादशून्य' वाळवंटावर वळलेल्या मुठी आपटून) मी म्हणतों तुझं म्हणणं चूक आहे. मी म्हणतों तसं कां होऊं नये ? अं ? मी म्हणतों तसं कां होऊं नये ?

दिवाकर—(जगांतली सारीं गूढ तत्वें फक्त आपणा एकट्यालाच कळलीं आहेत अशा मुद्रेनें) कारण मी तसं म्हणतों म्हणून.

दामुअण्णा:—पण तूं म्हणजे कोणी एखादा हा नाहींस.

दिवाकर:—(बलूनचें अस्तित्व सिद्ध करणाऱ्या लंबवर्तुळ चेहऱ्यानें) मी कोण नाहीं ?

दामुअण्णा:—(पूर्वीइतक्याच बेफामपणानें) कोण म्हणजे ? तूं कांहीं कोणी हा लागून राहिला नाहींस तूं म्हणतोस तें अगदीं खरं असायला. (भरमसाट टीकाकाराच्या बेभान बेतालपणानें) मी म्हणतों, तुझ्या म्हणण्यांत काडीचा देखील तथ्यांश नाहीं.

दिवाकर:—(अस्पृश्याच्या स्पर्शानें चवताळलेल्या कर्मठ ब्राह्मणासारखा उभा-आडवा चेहरा करून) आणि मी म्हणतों तशी प्रत्यक्ष तुझ्याकडूनच वागणुक झाली तर ?

दामुअण्णा:—काय वाटेल तें हरीन. (दिग्विजयी वीराच्या नजरेनें सर्वांकडे पहातो.)

दिवाकर:—(अखेरचा निकाल देणाऱ्या जज्जासारखा गंभीर चेहरा करून) ठीक आहे. माझं म्हणणं असं आहे कीं प्रत्यक्ष लग्नाचा प्रसंग असला तरी वधूची

निवड आपण करणार असें बापाला सांगण्याइतका धीटपणा आपल्या—आतां तुझ्या-अंगीं येणार नाहीं. आणि तूं म्हणतोस कीं——

दामुअण्णा:—(पुतळ्यापेक्षांहि गंभीर चेहरा करून) कीं माझ्या बाबतींत तरी मी तसं होऊं देणार नाहीं. (काळोख पडल्यामुळें एक एक जण घरीं जाण्या-साठीं उठतो. दामुअण्णा आणि दिवाकर एकदमच उठतात आणि एकमेकांकडे चवताळ-लेल्या दोन मांजरासारखें पहातात.)

प्रवेश २ रा

(स्थळ——दामुअण्णांचें घर. काळ——त्या वेळानंतर १ महिन्यानें. आजी समईजवळ वाती करीत बसली आहे. समोर बॉटनीचें भरभक्कम पुस्तक ठेऊन पुस्तकाच्या विषयासारखाच नीरस चेहरा करून दामुअण्णा बसला आहे.)

आजी:——(एक वेळ नातवाबद्दल वाटणाऱ्या प्रेमळपणानें, एक वेळ वडिलां-च्या अवज्ञेबद्दल कानउघाडणी करण्यासाठीं कठोरपणानें, एक वेळ स्वतःच्या पांढऱ्या केसाची जाणीव होऊन अधिकारानें,एक वेळ सध्यांच्या उर्मट 'पोरां'ची आणि आपल्या काळांतल्या मर्यादशील मुलांची तुलना करतांना फाजील शिक्षणाचे तोटे सांगून सुनेला छेडण्याच्या संतापानें आजी बोलतांना, दामुअण्णा चेहरा निर्विकार करून,पण समुद्राच्या तळाशीं दम कोंडून बसणें म्हणजे काय, एका उंच डोंगरावरून पाय घसरून गडगडत खालीं येणें म्हणजे काय, अमावास्येच्या मध्यान्ह रात्रीं स्मशानाजवळून एकटेच येणें म्हणजे काय, वगैरे प्रसंग अनुभवीत असतो.) हे पहा दामू, तूं का एखादा वेडा आहेस ? लगीन करायला तुला काय झालं ? तो शेजारच्या ठमाताईंचा विशा पाहि-लास ना ? तुझ्यासारखा तोसुद्धां मी लगीन करणार नाहीं म्हणून म्हणत होता. पण आतां बायकोसाठीं हपापलेला आहे. आतां त्याला या उतार वयांत कोण पोर देतो? त्यावेळीं लगीन झालं असतं तर आतां एखादं नातवंडसुद्धां पाहिलं असतं ! आतां पसतावतोय्. तूं का तसा वेडा आहेस? वडीलधारी माणसं सांगतात त्याला हो म्हणावं. आपणच शहाणं म्हणून कसं चालेल ? आम्हांला कांहीं तरी कळत असतं तुझ्यापेक्षां. तुझ्यापेक्षां आम्हीं कितीतरी पावसाळे जास्त घालवले आहेत. वडील माणसांच्या मना-विरुद्ध करणं बरं का ? रामसुद्धां चौदा वर्से वनांत जा म्हणून दशरथानं सांगतांच हूं कीं चूं न करतां निघून गेला. आणि तुम्हीं ही अशी पोरं.

आमच्या वेळचीं मुलं आईबापानीं एखादी गोष्ट करायला सांगितली तर मान वर करीत नव्हतीं. (मेलेल्या आशाच्या आठवणीनें टाकल्या जाणाऱ्या जड निःश्वासासारखें करून) नाहीं--नाहीं--ही 'काळीजं' बरं. पोरानां नसतं शिक्षण मिळतं तें 'काळीज' तरी कसलं ? तरी मी गणूला सांगत होतें पोराला तें 'काळीज' कीं काय त्यांत घालूं नको म्हणून. पण तो त्य वेळीं म्हणाला पोराला शिकायची आवड आहे, शिकूं द्या त्याला. आतां घे म्हणावं हें शिक्षण. त्यापेक्षां दगड राहिलेलं काय वाईट ? असलं शिक्षण मिळत असेल तर हीं 'काळीजं' हवींत कशाला ? चार बुकं वाचायला आलीं खडाखड म्हणजे झालं. या 'काळजां'ची गरज काय ? आमच्या वेळीं कुठें होतीं 'काळजं' ? म्हणून का कोणी उगाशी मेलं ? पण नाहीं. व्हायचं तें व्हायचंच. घ्या म्हणावं ' काळिजं. ' तिकडे कायं शिकवतात तर वडील माणसांचं ऐकूं नका, त्यांनीं हो म्हटलं तर तुम्हीं नाहीं म्हणा. होय ना रे दामू? (दामुअण्णाला श्वास कोंडल्यासारखें वाटतें.) आमच्या म्हाताऱ्या माणसाच्या शब्दाला कांहींच किंमत नाहीं. आम्हीं म्हणजे रस्त्यावरचा उकिरडा. नाहीं ? माझं म्हातारीचं म्हणून तरी ऐक. ती पोर घरांत आली तर लक्ष्मी नांदेल घरांत लक्ष्मी. जा, आतां झोंप जा. मी सांगितलं त्याचा विचार कर थोडा. जा. (कांहीं वेळ सगळे सांधे धरल्यासारखी दामूअण्णाचीं हालचाल होत नाहीं. पण बऱ्याच वेळानें 'गडगडाट' थांबला असल्याची खात्री होऊन तो सजीव होऊं लागतो.)

प्रवेश ३ रा.

(स्थळ--माजघर. दामुअण्णा पाठावर बसला असून पुढें ताट आहे. आई वाढतां वाढतां बोलते आहे आणि दामुअण्णा ब्रह्म म्हणजे काय, ओंकाराचा उगम कुठून होतो, ईश्वर खरोखरीच आहे काय, माया ही काय आहे, हें विश्व किती लांब पसरलें आहे वगैरे प्रश्नांचा विचार करण्यासारखी गंभीर मुद्रा करून ताटांतल्या गरम गरम पदार्थांच्या वाफेकडे पहात आहे.)

आई:--(कोर्टांत आपली फिर्याद दाखल करणाऱ्या फिर्यादीसारखी मुद्रा करून) एवढा ' कालेजां'त जायला लागलास आणि लग्न करायला कबूल नाहींस ? कोणाला हें कळलं तर ते हंसतील आम्हांला अन् तुलाहि. मी तरी एकटीनं किती रावायचं घरांत ? हाताशीं नको का कुणी ? तुला काय, चार घांस गिळायला मिळाले म्हणजे झालं. पण सारा पसारा आटपतांना आमच्या काय नाकीं

नऊ यंतात तं तुला कुठून कळणार ? तुझ्यासाठीं नसलं तरी आमच्या सोईस.ठीं तूं लग्न केलं पाहिजेस. एवढा ताडासारखा वाढलास, काय तो बी. ए. कीं फि. ए. होणार, अन इतकं तुला कळायची अक्कल नाहीं ? कोणाला सांगितलं तर खरं सुद्धां वाटणार नाहीं त्याला. विती वितीएवढीं जाडी पुस्तकं वाचली म्हणजे झालं नाहीं ? थोडंसं व्यवहार चं ज्ञान असावं लागतं. एवढीं जाडी पुस्तकं का जाळायचीं आहेत ? तीं शिकलीं म्हणजे कांहीं सगळं झालं नाहीं. शेवटीं संसार हा केलाच पाहिजेना ? संसाराशिवाय का कुठें जग चाललं आहे ? आतां ' इकडंच ' पाहिनास ! चार विंग्रजी बुकं झालीं असतील नसतील. मग तूंच कोण एवढा मोठा ? आतां कांहीं तूं लहान नाहींस. आतां घरचा संसार तूं पाहिला पाहिजेस. आम्हीं कां तुझ्या जन्माला पुरलों आहों ? आम्हीं पिकलेलीं पानं कधीं गळून पडूं, कळणार नाहीं. (दामुअण्णा अगदीं गळून पडल्यासारख्या चेहऱ्यानें आईकडे पहतो.)—असं वाईट वाटून घेऊन कसं चालेल ? आमचा भरंवसा सांगतां येणार नाहीं, म्हणून तर तुला आम्हीं परोपरीनं लगीन करायला सांगतों आहों. बरं पोर तरी अशी तशी काळीवेंद्री आहे का ? चांगली ठसठशीत दिसते. कामाधामालाहि तशी. घरांत कसला समारंभ झाला तर शंभर पानं वाढून काढील. पण हूं कीं चूं करायची नाहीं. शिवाय पोर अगदीं सरळ अन् साधी. ती अंग दाखवणारीं पातळ पातळं नको, दागिन्यांचा सोस नाहीं, तें रस्त्यावरून फिदीफिदी हंसण्याचं कधीं ठाऊक नाहीं कीं कांहीं नाहीं. मग तुला त्या पोरींत काय कमी दिसलं ? ती पोर नाकारायला तुला तिच्यांत काय उणं दिसलं ? अं ? तुला परवां सासुबाईनीं इतकं सांगितलं तरी तूं गप्प. म्हटलं आपणहि सांगून पहावं. (एकदम उमाळा आल्यासारखें करून) हें बघ दामू, तूं आतां अगदीं नाहीं म्हणूं नकोस. येत्या मार्गेसरांत पोर आणूं आपण घरांत. मला बघ, तिची अगदीं ओढ लागली आहे. माझा दामू माझ्या शब्दाबाहेर नाहीं असं मी सगळ्यांना सांगत असते. आतां तूं अगदीं नाहीं म्हणूं नकोस. मी 'इकडे' सांगते तयारीला लागायला. चल आटप, 'कालेजांत' जायची वेळ झाली. जेव, चल. (दामुअण्णा तिच्या उमाळ्यानें विरघळतो, आणि ताटांतल्या पक्वान्नाचें पृथक्करण—ॲनेलय्सिस्—करीत एक एक क्षीत तोंडांत घालतो.)

प्रवेश ४ था.

(स्थळ—गणपतरावांची झोंपण्याची खोली. गणपतराव पलंगावर लोडाला टेंकून पंख्यानें वारा घेत आहेत. समोर भिंतीला टेंकून दामुअण्णा हद्दपारीची शिक्षा

ठोठावलेल्या कैद्याप्रमाणें चेहरा करून उभा आहे. गणपतराव अध्यक्षासारखे गंभीर; दामुअण्णा राजकारणांतल्या महत्वाच्या प्रश्नाचा खल करणाऱ्या मंत्रीमंडळाइतका गंभीर)

गणपतराव:—तुला ती पोर आवडत नाहीं कीं मुळीं तुला लग्नच करायचं नाहीं आहे ? हो, एकदां कळलं म्हणजे बरं. नाहींतर कोणाला तरी आम्हीं अगदीं खात्रीचं म्हणून वचन द्यायचं आणि तुमच्यासारख्यांकडून आम्हांला लग्न करीत नाहीं असे जबाब मिळायचे ! त्यांत काय राहिली आमची शोभा ? आमच्या भोळ्या मनाला वाटावं आमचे चिरंजीव आमच्या शब्दाबाहेर जाणार नाहींत. आणि त्या विश्वासावर आम्हीं एखाद्याला त्याची मुलगी सून करून घेतों म्हणून वचन द्यायचं; आणि नंतर हें असं. मला निदान तुझ्याबद्दल तरी खात्री वाटत होती. पण तुला तर अस्मानाला हात पोंचल्यासारखं वाटतं आहे. आम्हीं वडिलधारीं माणसं सांगतो तें अगदीं मूर्खपणाचं. आम्हीं अगदीं अक्कलशून्य, 'रॉट्न् फूल्स;' होय कीं नाहीं ? (दामुअण्णाला ब्रह्मांड आठवनें.) चूक झाली ती आमचीच. आम्हीं मारे हौसेनें 'कॉलेजांत' घातलं. कां तर चारचौघांत मानमरातब मिळावी, आम्हांलाहि त्यानं आराम वाटावा. कोणी स्तुति केलेली ऐकली कीं आम्हांलाहि आमच्या पैशाचं चीज झाल्यासारखं वाटावं.पण—पण आतां हें असं. कोणाला कळलं तर तोंड वर करूं द्यायचे नाहींत बरं. कोणी तरी आपण अमुक म्हणून बोट दाखवायची आमची हौस ही अशी फिटायची.'पोराला कॉलेजांत घालून चढवला आणि त्यानं चांगली डोक्यावर मिरी वाटलीं म्हणून आणखी चारचौघांनीं आमच्याकडे बोट दाखवून आम्हांला प्रसिद्धीला आणायचं. यांत काय राहिली आमची शोभा ? तुमच्यासारख्या कॉलेजांतलं उच्च शिक्षण मिळालेल्या तरुणांनीं जर अशा रीतीनें वागायला सुरवात केली तर मग राहिलं काय आणखी ? आतां पुढें आपल्या मुलाला कॉलेजांत घालायलादेखील कोणी कबूल होणार नाहीं. कॉलेजांत पोरं गेल्यावर ती आपल्या कह्यांत रहात नसतात हें जर त्यांना कळलं तर जाणूनबुजून कोण आपल्या मुलाला कॉलेजांत घालील ? इतक्या थराला गोष्ट येईल असं मला वाटलं नव्हतं; म्हणून मी अजूनपर्यंत बेफिकीर होतों. वाटलं कीं दामू असं करणार नाहीं. पण दिसतं तसं नसतं त्याचं हें प्रत्यंतर. कॉलेजांत गेलं कीं ही अशीं शिंगं फुटूं लागतात. सगळं जग अगदीं तुच्छ वाटूं लागतं. आपण म्हणजे अत्यंत अक्कलवान, हुशार, मुत्सद्दी, बुद्धिवान, आणि बाकी सारे मूर्ख, अडाणी, ढ, अशिक्षित पशू. असंच कीं नाहीं ? (दामुअण्णाला जमिनींत गडप झालेल्या सीतेची आठवण होते.) आम्हीं आपली चारच बुकं शिकलों आहों आणि

तुम्हीं कॉलेजांत जाऊन बी. ए. पर्यंत मजल गांठली आहे. तेव्हां तुम्हांला अक्कल जास्त आणि आम्हीं मुर्खांतले मूर्ख. पण मुर्खांनों, तुम्हांला इतकं कळत नाहीं कीं बी. ए. अन एम. ए. झालं म्हणजेच कांहीं संसाराचं ज्ञान येतं असं नाहीं ! असं असतं तर सगळ्याचे संसार ओस पडले असते. तूं स्वतःला शहाणा समजूं नकोस. जगांत तुझ्यापेक्षां शहाणे पुष्कळ आहेत. माझं कांहीं वर वाईट होईपर्यंत तरी तूं तुझा मुखत्यार नाहींस. मग वाटेल तसा धिंगाणा घाल, काय वाटल तें कर. पण मी असेंपर्यंत तरी तुझे नसते ढंग चालूं देणार नाहीं घरांत. सगळं काहीं माझ्या म्हणण्याप्रमाणें झालं पाहिजे. काय समजलं ? आहे कीं नाहीं कबूल ? (दामुअण्णा 'फ्रीजिंग पॉइंट' पर्यंत गार पडत जातो.) चल, शेवटचं उत्तर दे; नाहीं तर तुला दाही दिशा मोकळ्या आहेत. घरांतून गेलास तरी बेहत्तर. पण असले ढंग कधीं चालूं देणार नाहीं. (खरोखरच घरांतून निघून भयाण रानांत, रात्रींच्या वेळीं, उर धडधडत असतांना, एखाद्या भुकेल्या वाघानें अंगावर उडी टाकून आपणाला फाडफाडून खाऊन टाकल्यासारखें दामुअण्णाला वाटतें.)

प्रवेश ५ वा

(स्थळ—वाळकेश्वरावरील बंगला. गडबड—लग्नसमारंभांतल्या बायकाच्या किंकाळ्यांची, पोरांच्या आरडाओरडीची आणि चौघडेवाल्याच्या बेसूर पिपारीची. गोंधळ—मध्यस्थाच्या व अगदीं खाशांतल्या मंडळीच्या धांवपळीचा. दामुअण्णा पिवळें पितांबर नेसून आणि कपाळाला बाशिंग बांधून उभा. मध्यें दोन पंचे गांठवून केलेला ' अंतरपाट. ' त्याच्या पलिकडे 'कोणीसें' उभें. दोन्हीं बाजूला दोन्ही पक्ष.)

भट:—लक्ष्मी कौस्तुभ पारिजातक सुरा.....(वगैरे वगैरे. नंतर गडबडींत कोणाला कांहींच ऐकतां येत नाहीं) सावधान.....सावधान.....सावधान.

एक जण:—(अस्मानाच्या गडगडाटाला सवाल देणाऱ्या वनराजाच्या डरकाळणीची हुबेहुब नक्कल करून) वाजवारेSSSवाजवा.

(अंतरपाट दूर करून दामुअण्णांची सहचारिणी त्याच्या गळ्यांत माळ घालते. तो पुढें हात करणार इतक्यांत समोर दिवाकर विजयाच्या प्रफुल्ल चेहेऱ्यानें दिसतो. दामुअण्णा बिचकतो. क्रिकेटमध्यें पहिल्याच बॉलाला बळी पडलेल्या कॅप्टनसारखा चेहेरा करतो. नंतर क्रमाक्रमानें नुकतेंच कोणाचें तरी प्रेत पोंचवून आल्या-

सारखा, युनिव्हर्सिटीतून चौथ्या वर्षीहि मॅट्रिकमध्यें अपयश आल्याची बातमी घरीं घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्यासारखा आणि अखेर गाऱ्यामुळें भजी व गंडेरी बसण्यापर्यंतची पाळी आलेल्या मुख्य स्त्रीनटासारखा चेहरा पडत पडत जाऊन अखेर ध्यानस्थ ऋषीसारखें आपलें अस्तित्व विसरण्यापर्यंत दामुअण्णाची मजल जाते. मंडळींत गडबड सुरू होते. त्याचे हात आपल्या हातांत घेऊन भट बळजबरीनें वधूच्या गळ्यांत माळ घालतो. पाणी, पाणी,म्हणून सर्वजण हुकुम सोडतात. सर्वांना कोणी कोणाचें ऐकावें हा प्रश्न पडतो व शेवटपर्यंत पाणी येत नाहीं. बऱ्याच वेळानें गुंगींतून शुद्धीवर आलेल्या माणसासारखी दामुअण्णाची स्थिति होते व सर्वांच्या जिवांत जीव येतो. तो शुद्धीवर आल्यावरहि बराच वेळ 'पाणी पाणी' ही ओरड चालूं असते. पण दामुअण्णाची 'अंदरकी बात' फारच थोडयांनां कळते.

आनंद, आरोग्य व आकांक्षा ह्यांची वाढ करून नवजीवन देणारीं

श्री. सीताकान्त ह्यांचीं पुस्तक.

आत्मोन्नति–आनंद, आरोग्य व आकांक्षा हें ह्या पुस्तकाचें ब्रीदवाक्य आहे. अत्यंत स्फूर्तिप्रद, व्यवहारोपयोगी व सुंदर किं. १ रु. **डॉक्टरांकडे तरी जा** !–आरोग्यविषयक पांच मनोरंजक व विनोदी गोष्टी. किं. ८८ सचित्र **खुनी श्रीमंती**-अगदीं नवीन धर्तीची सामाजिक, शास्त्रीय पण बहारीची कादंबरी किं. ८१२ ट. ख. निराळा.

सीताराम शिवराम लोटलीकर.

सँढर्स्ट रोड, टोपीवाल्यांची वाडी,

वनिताविश्रामासमोर, मुंबई नं.४

स्वैर विहार.

(ले. पूर्णानंद)

स्वाति नक्षत्रावर शिंपल्यावर निसर्गदेवीनें टाकलेले अश्रू दुःखाचे किंवा सुखाचे हें कळूं नये म्हणून अफाट सागर त्यांना आपल्या पोटांत दडवून ठेवतो व कोणी विचारावयास आल्यास त्यांस शिंपल्यांतील मोती काढून दाखवितो.

× × ×

एकमेकांशीं अपरिचित अशा व्यक्तींच्या हृदयांत तेच ते विचार कां घोळत असतात याचें कारण मानसशास्त्रवेत्त्याला सांगतां येण्यासारखें आहे काय ?

× × ×

परोपकारी पुष्पांना एकच दिवसाचें आयुष्य असावें, व स्वार्थसाधु मानवाला मात्र पुष्कळ आयुष्य लाभावें, असा विधात्याच्या सृष्टींत पंक्तिप्रपंच कां असावा बरें?

× × ×

इतिहासाची पुनरावृत्ति होते असें म्हणतात; तर मग गतसुखाचा काळ पुनः परतून कां बरें येत नाहीं ?

× × ×

जगांत विषमता असण्याचें कारण काय ?

× × ×

मानव स्वकृत्याची शेखी उच्च स्वरानें जगभर गात असतो, मग अनंतकाल-पर्यंत नियमित कार्यक्रम करणाऱ्या निसर्गानें स्तब्धता कां बरावी ?

× × ×

अनंत सागराच्या उदरांतील मोत्यें मानवाला काढतां येतात, मग आकाशींच्या तेजस्वी तारकाच त्याच्या हातीं कां लागूं नयेत ?

× × ×

पण शेवटीं मला खडा मारून पहावासा वाटला. मी संध्याकाळीं घरीं गेल्यानंतर खूब विचार करून एक लांबलचक पत्र बाबांना लिहिलें आणि त्यांत सर्व गोष्टी मी मोकळेपणानें लिहून टाकल्या. पण तिसऱ्या दिवशींच मला त्यांचें एक पत्र आलें. त्यांत मी पूर्वी कल्पना केल्याप्रमाणेंच सर्व कांहीं होतें. "त्या मंडळीला तुझ्या जाण्यानें वाईट वाटेल म्हणतोस, मग तूं येत नाहींस हें वाचून आम्हांला किती वाईट वाटेल? कां तुझ्या मतें त्यानांच तेवढया सुखदुःखाच्या भावना आहेत व आम्हांला हृदयच नाहीं?"

वगैरे वगैरे बाबानीं माझ्यावर बरेच ताशेरे झाडले होते. मी ते पत्र नेऊन प्रभाकराला, शालिनीला दाखवलें.मी त्यांना आतां दोन महिने भेटणार नाहीं हें लक्ष्यांत येतांच त्यानां फार फार वाईट वाटलें.वसंत आतां हिंडू फिरूं लागला होता.त्याला ही गोष्ट कळतांच तर त्यानें आपल्या चिमुकल्या हातांनीं माझ्या कमरेभोंवतीं विळखा घालून मला जाऊ न देण्याचा निश्चयच केला. त्याची समजूत करतां करतां मला पुरेवाट झाली.

अखेर जाण्याचा दिवस उजाडला. मी आवश्यक वस्तूंची बांधाबांध केली, गणूनें खाणावळींतून आणलेला डबा उघडून कसेबसे दोन, चार घांस पोटांत कोंबले आणि हात धुवून कपडे चढवले. गणूनें गाडी आंणतांच मी माझी एक ट्रंक, बॅग आणि बिछाना आंत नेऊन ठेवण्यास त्याला सांगितलें व मी खोलीला टाळें लावून खालीं उतरलों. गणूच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले होते. मी त्याला लवकर येण्याचें आश्वासन देऊन त्याच्या हातावर एक रुपया ठेवला आणि गाडीवाल्याला गाडी हांकण्यास सांगितलें. गाडी सुरू होतांच मी पाठचा पडदा वर करून पाठीं पाहूं लागलों. तों गणू गाडीकडे एकाग्रतेनें पहात उभा राहिला होता. मी त्याला गाडींतून खूण केली व पडदा खालीं करून समोर पाहूं लागलों. यापेक्षांहि मोठें संकट अजून मला पुढें पार पाडावयाचें होतें. गाडीवाल्याला मी प्रभाकराच्या घरचा पत्ता देऊन थोडा वेळ तेथें गाडी उभी करण्यास सांगितलें होतें. त्याप्रमाणें थोडयाच वेळांत गाडी घरासमोर उभी राहिली आणि मी गाडीबाहेर उडी टाकून आंत गेलों. दिवाणखान्यांत एकटीच शालिनी बसली होती. मला पहातांच घाईघाईनें ती माझ्याजवळ आली आणि तिनें एकदम माझा हात धरला.

पूर्वी अनेक वेळां आम्हीं एकमेकांच्या नकळत एकमेकांनां स्पर्श केला असेल. पण आज शालिनीनें माझा जाणूनबूजून हात धरतांच माझ्या अंगावर एकाएकीं शहारे आले. तिच्या मनावर याचा काय परिणाम झाला तें मला कळलें नाहीं. परंतु वस्तुस्थितीचा उमज पडूनहि ज्याअर्थी तिनें हात न सोडतां उलट अधिक जोराने ते आपल्या हातांत आवळून धरले त्याअर्थी तिनें सहज कोणतीहि भावना मनांत न येतां माझे हात धरले असावेत असा माझा तात्पुरता समज झाला हें खास.

एक दोन क्षण ती आपल्या पायाकडेच पहात राहिल्यावर तिनें मान उचलून भरल्या डोळ्यांनीं माझ्याकडे पाहिलें आणि सद्गदित् कंठानें विचारलें,

" आतां फिरून केव्हां येणार ?"

" शक्य तितक्या लवकर. शालिनी, मला तिकडे तुमच्याशिवाय करमणार नाहीं आणि तुम्हां सर्वांना माझ्याशिवाय करमणार नाहीं, हें का मला ठाऊक नाहीं ? असं असून मी तिकडे फार दिवस राहणं संभवेल कसं ?"

" मन रमविणारं तेथें एखादं माणूस असलं मग आमची आठवण होईल कीं नाहीं याची भीतीच वाटायला लागली आहे."

मन रमविणारें माणूस ? शालिनीच्या या बोलण्याचा अर्थ काय ? तेथें माझें मन रमवणारें माणूस कोण होतें ? आई, बाबा, मधू कीं प्रभा ? त्यांना वर्षभर पाहिलें नाहीं म्हणून कदाचित् प्रेमाचा उमाळा येऊन पहिले कांहीं दिवस मला तिथें बरें वाटेल. हें जरी खरें असलें तरी तेथें माझें मन रमवणारें व तिची आठवण बुजवणारें माणूस कोण होतें ? कां तिनें कांहीं भलतासलता संशय घेतला ?

मी माझा डावा हात सोडवून तिच्या खांद्यावर ठेवीत ठेवीत म्हणालों,

" शालीन, काय एखाद्या वेडयासारखी बोललीस ? तुझी आठवण बुजवणारं माणूस कोण आहे ? तिकडे प्रथम प्रथम माझे दिवस जरा बरे जातील. पण म्हणून मी तुला विसरेन कसा ? वेडयासारखी कांहीं तरी शंका घेतलीस. "

माझ्या उत्तरानें तिला जरा बरें वाटलेंसें दिसलें. तिनें पदरानें आपले डोळे पुसून स्वच्छ केले आणि क्षणभर कसलासा विचार करून तिनें मला विचारलें,

"पत्र पाठवायचं होईल ना ? "

तिची बोलण्याची तऱ्हा मला कांहीं निराळीच भासली.

" होय. दर दोन दिवसांनीं मी एक एक पत्र लिहीन. पण तुझंहि मला दोन दिवसांनीं एकएक पत्र आलं पाहिजे हो ! "

" मी दोन दोन दिवसांनीं पत्र लिहिन. निदान प्रयत्न तरी करीन. "

" प्रयत्न कां ? " मी डाव्या हातानें तिचा खांदा हलवीत म्हटलें.

" कारण तें वाईट नाहीं कां दिसणार ?"

वाईट ? हेंच वाक्य चार दिवसांपूर्वी मी वसंताजवळ बसून त्याला दूध पाजीत असतांना आणि ती जवळ बसली असतांना 'तूं माझ्याबरोबर काल नाटकाला आली असतीस तर ?' असें मी विचारलें असतांना तिनें उत्तरादाखल उच्चारलें होतें. तिच्या या अशा

बोलण्याचा मला अर्थ कळेना. मी तिला ताबडतोब विचारणार होतों कीं प्रभाकर गांवीं गेला असता तर तूं त्याला पत्रें लिहिली नसतीस का ! पण लगेच अशाच तऱ्हेचा मी तिला चार दिवसांपूर्वी प्रश्न विचारला होता आणि तिनें 'दादा आणि तुम्हीं सारखेच का?' या प्रश्नानेंच मला उत्तर दिलें होतें हें माझ्या लक्षांत आलें. मी तिला आणखी कांहीं विचारणार इतक्यांत आंतून वसंत उडया मारीत आला आणि 'नाना आले, नाना आले' असें ओरडून त्यानें माझें आगमन जाहीर केलें.

झालें. अर्थातच शालिनीच्या खांद्यावरून मी हात काढून वसंताजवळ गेलों आणि त्याला वर उचलून त्याचा पटकन् एक मुका घेतला. प्रभाकर, अण्णा, वसंतची आई, आत्या वगैरे बाहेर आलीं. माझ्याकडे व शालिनीकडे पाहून अण्णानीं वसंतच्या आईकडे पाहून डोळे मिचकावलेले माझ्या दृष्टींतून निसटलें नाहीं. पण मी तिकडे पाहिलें न पाहिलेसें केलें.

" काय हो, नाना, चाललेत ? आतां परत केव्हां येणार ? शालू, नाना आले म्हणून आंत सांगायला येऊं नये का ?"

"बाबानीं मला दोन महिन्यांनीं परत इथें यायला सांगितलं आहे. पण मी महिन्या, दीड महिन्यापेक्षां जास्त कांहीं तेथें राहणार नाहीं."

" आणि रहायचा प्रसंगच आला तर ?" अण्णानीं हंसत हंसत डोळे मिचकावीत विचारलें. वसंतची आई आणि आत्या अण्णांच्या या प्रश्नानें हंसूं लागली.

मी त्यांच्याकडे वेडयासारखें पहात विचारलें,

" तसा कसा प्रसंग येईल ?"

" कसा म्हणजे ? तिकडे गेल्यावर कदाचित् तुम्हांला कळेल. आम्हांला निदान आमंत्रणपत्रिका तरी पाठवा बरं ! "

अण्णांच्या बोलण्याचा प्रथम मला अर्थ कळेना. पण त्यांच्या आतांच्या आणि पहिल्या वाक्यांचा मनांतल्या मनांत मेळ बसवल्यानंतर मला सर्व कांहीं कळून चुकलें. मी अण्णांकडे पाहून हंसलों आणि सर्वांची नजर चुकवण्याचा प्रयत्न करीत मी हळुच शालिनीकडे पाहिलें. तीहि कांहींशा आश्चर्याच्या अश्रुभरित डोळयांनीं माझ्याकडे पहात होती. कदाचित् अण्णांचें बोलणें खरें ठरण्याचा तिला संशय आला असेल. पण शालिनीला ठाऊक नव्हतें कीं—

मला उशीर होईल म्हणून मी त्यांचा लवकर निरोप घेतला आणि बाहेर येऊन गाडींत बसलों. माझ्याबरोबरच सर्व बाहेर ओटयावर आलीं होतीं. मी गाडींत जाऊन बसतांच वसंत रडूं लागला त्याबरोबर त्याला मी आपल्याकडे आणण्यास शालिनीला

ओरडून सांगितलें. शालिनी अगदीं गाडीजवळ आली आणि ती वसंताला आपल्या कडेवरून माझ्याकडे देण्यासाठीं पुढें वांकली. त्यावेळीं मला काय वाटलें कुणास ठाऊक! मी सारी परिस्थिति विसरून गेलों. वसंताला घेतांघेतांच मी तिच्या तोंडाजवळ आपलें तोड नेलें आणि—

शालिनी लाजून खालीं पाहूं लागली. मी वसंताचा एक गोडसा मुका घेऊन त्याला परत शालिनीजवळ दिलें आणि तिच्याकडे एक ओझरता कटाक्ष फेंकला. तावडतोब मी गाडीवाल्याला गाडी हांकण्यास सांगण्यासाठीं तोंड वर उचललें; तों तो गालांतल्या गालांत माझ्याकडे पाहून हंसत होता. माझी मलाच लाज वाटूं लागली. मी कांहीं न बोलतां त्याला गाडी हांकण्यास खूण केली.

माझी गाडी दृष्टिआड होईपर्यंत शालिनी एकसारखी तिकडे पहात होती.

प्रकरण २ रें.

उद्वेग.

गाडी झरझर वेगानें चालली होती. पण त्याच्यापेक्षांहि जास्त वेगानें माझ्या मनांत विचारांचो गर्दी उसळत होती. त्या सर्व मंडळीला सोडून जातांना मला जितकें वाईट वाटत होतें तितकाच मला माझ्या हातून घडलेल्या अनपेक्षित प्रकारामुळें साश्चर्य अननुभूत आनंद वाटत होता. मी एकसारखा त्याच गोष्टीचा विचार करीत होतों. जें धाडस आपण या उभ्या वर्षा, सहा महिन्यांत केलें नाहीं तें आज करण्याइतकें धीट कसें बनलों? परन्तु खरें म्हटलें तर आजच्यासारखें धाडस करण्याचें पूर्वी माझ्या कधींच मनांत आलें नव्हतें. त्या घटकेपर्यंत तसली भावना माझ्या मनाला शिवलीच नव्हती. मग एकाएकीं असली विचित्र गोष्ट करण्याइतकी माझी मजल कशी गेली?

मी माझी टोपी बाकांवर काढून ठेवली आणि घाम पुशीत झरझर दृष्टिआड होणाऱ्या निसर्गाच्या मनोरम देखाव्यांकडे शून्य मनानें पाहूं लागलों. पहातां पहात चटकन माझ्या मनांत एक विचार चमकला. शालिनीसुद्धां आज आल्याशीं कांहीं निराळ्याच तऱ्हेनें वागली हें माझ्या लक्ष्यांत आलें. तिनें पूर्वी कधीं जाणून बुजून माझे दोन्ही हात आपल्या हातांत धरले नव्हते, अगर त्या नजरेने माझ्याकडे कधीं पाहिलें नव्हतें. त्या तऱ्हेची भाषाहि तिनें पूर्वी कधीं बोललेली मला आठवेना.

मग आजच्या ती अशा तऱ्हेनें कां वागली ? कां मी जाणून म्हणून संबंध यावीत दडवलेलें गुह्य तिला पुढें गुप्त राहूं देणें अशक्य झालें ?

मला हेंच कारण खरें वाटूं लागलें. आणि माझ्या मनांत लपलेली भावना तिच्या भावनेनें जागी होऊन मला आजचें धाडस करण्याइतकें धैर्य आलें अशी माझी ठाम समजूत झाली. पण असें असूनहि मी हें धाडस केलें कसें याचेंच मला राहून राहून आश्चर्य वाटत होतें. उत्तर मिळालें असतांन.सुद्धां तोच प्रश्न मनाला विचारण्यांत कधीं कधीं मौज वाटूं लागत असते.

त्या गोड विचारांत माझा किती वेळ गेला कोण जाणे ! पण कुठल्याशा स्टेशनावर बऱ्याच वेळानें गाडी उभी राहिली आणि एक ख्रिश्चन आपली ट्रंक पुढें लोटून वर चढला. गाडींत आमच्या दोघांशिवाय कोणीच नव्हतें. पण तो ख्रिश्चन माझ्या डब्यांत आला हें सुद्धां मला खपलें नाहीं. माझ्याशिवाय त्या डब्यांत कोणीहि येऊं नये असें मला वाटत होतें. मला शक्य तों भरपूर एकांत पाहिजे होता. त्यामुळें मी त्याच्याबरोबर एक शब्दहि बोलण्याच्या भरीस न पडतां मान फिरवून खिडकीबाहेर पाहूं लागलों. एकापेक्षां एक सुंदर देखावे बाहेर दृष्टीस पडत होते. साडेसहासाताचा सुमार असल्यामुळें रम्य क्षितिजाकडे कोणालाहि पहातच रहावेसें वाटलें असतें. मी निराळ्या मनःस्थितींत असतों तर संध्याकाळच्या शोभिवंत देखाव्यांनीं माझी बरीच करमणूक झाली असती. निसर्गाचें रम्य स्वरूप पाहून माझ्या काव्यमय मनाची अत्यंत आल्हादकारक स्थिति झाली असती. पण मी त्यावेळीं शुद्धीवर होतों कीं नव्हतों कोणास ठाऊक ! मी जरी खिडकीबाहेर पहात होतों तरी माझ्या मनाला मात्र बाह्य प्रदेशाची कांहींच जाणीव नव्हती. मध्येंच एकाएकीं वाऱ्याचा मोठा झोत जोरानें तोंडावर येऊन बसला म्हणजे मी गुदमरून एकदम मान फिरवून डब्यांत पाही; त्यावेळीं तो ख्रिश्चन माझ्याकडे कांहींतरी बोलण्याची इच्छा करतो आहे हें त्याच्या चेहऱ्यावरून मी ताडत असे. पण लगेच मी दुसऱ्या एखाद्या विचारांत गढून गेलों म्हणजे मी तें विसरून पूर्ववत् खिडकीबाहेर तोंड वळवून बसत असें. त्या ख्रिश्चनला विचारायला कांहींच खाद्य नसल्यामुळें त्याला स्तब्ध बसण्याचा कंटाळा येत होता. वेळ घालवण्यासाठीं त्यानें किती तरी सिगारेट्स् ओढून फस्त केल्या होत्या.

मी माझ्याच विचारांत दंग होऊन गेलों असतां एकदम तो माझ्याजवळ आला आणि 'मिस्टर' म्हणून मला त्यानें हालवलें. त्याबरोबर मी दचकून एकदम काय' म्हणून त्याला विचारलें.

" Your ring, please. " जमिनीवर पडलेली आंगठी उचलून माझ्यापुढें करीत तो खिश्चन म्हणाला. मी माझ्या हाताकडे पाहूं लागलों तों माझ्या बोटांत खरोखरीच आंगठी नव्हती. आंगठी ढिली होती म्हणून 'कांहीं खालीं पडली नव्हती. मी विचाराच्या भरांत ती कधीं बोटांतून काढली आणि ती जमिनीवर कधीं पडली याचें मला भानच नव्हतें. मी माझ्या मनाच्या झालेल्या विलक्षण स्थितीबद्दल स्वतःशींच हंसलों.

" Thanks. " मी त्याच्या हातांतून आंगठी घेत म्हणालों,

तो जरासा हंसला आणि वेळ घालव-यासाठीं बोलत माझ्या शेजारींच बसला. त्याला आंगठीचें छानच कारण मिळालें होतें. मीहि मग विचार करण्याच्या भानगडीस न पडतां त्याच्यावरोबर इंग्लिशमध्यें गप्पा मारूं लागलों.

तो खिश्चन बराच बोलका होता. आपली माहिती त्यानें मी न विचारतांच बराच पाल्हाळ लाऊन सांगितली आणि मलाहि प्रश्न कर करून भंडावून माझी सगळी माहिती काढली. शेवटीं त्यानें मला विचारलें,

" Are You married ? (तुमचं लग्न झालं आहे काय ?)"

"Not as yet. (अजूनपर्यंत नाहीं.) " मी हंसत हंसत उत्तर दिलें.

"कॉलेजमधीं कुठें जमला नाय् ?" त्यानें सिगारेटचें टोंक बाकावर आपटीत व हंसत मोडक्या तोडक्या मराठींत विचारलें. त्याच्या प्रश्नाचा गर्भितार्थ जाणून मी हंसूं लागलों. त्याबरोबर तोहि मोठमोठ्यानें हंसूं लागला. पण त्याच्या या प्रश्नानें मी प्रथम जरी हंसलों तरी त्याचा अर्थ लक्ष्यांत येतांच मी गंभीर मुद्रा करून विचारांत गढून गेलों.

कॉलेजमध्यें शिकण्यासाठीं जावयाचें कीं पुढचीं लग्नें जमव-यासाठीं ? मी आजवर वाचलें होतें. पण त्यामुळें प्रत्येक मनुष्याचो प्रत्येक 'कॉलेजस्टूडंट'बद्दल तशाच तऱ्हेची समजूत झाली असेल अशी माझी कल्पना नव्हती. पण तो बोलला त्यांत चूक काय होती, याचा मी मनाशींच विचार करूं लागलों. कॉलेजमध्यें जमलें नाहीं तरी दुसरीकडे--

माझ्या डोळ्यासमोर शालिनीचो रम्य मूर्ति उभी राहिली. आज किती आश्चर्यांच्या गोष्टी घडल्या ? तिनें आपल्या गोंडस हातांत माझ हात घट्ट आवळून धरले; मी जाणार म्हणून तिच्या डोळ्यांत अश्रुबिंदु चमकले; मी जाणूनबुजून तिच्या खांद्यावर हात ठेवला; अण्णा माझ्या लग्नाबद्दल अप्रत्यक्ष रीतीनें बोलले; आणि शेवटचा रम्य प्रसंग—मी बिनदिक्कत शालिनीच्या ओठांची माऊकी घेतली. माझें अंग

एकदम थरारलें. या सर्व अनपेक्षित, आश्चर्यकारक गोष्टी आज घडून आल्या आणि त्या सर्वांनी माझ्या मनाला चलन दिलें. मला ते गोड प्रसंग अजून या घटकेला आटवताहेत.

"Well, Mr. Kale, I am to get down here now,on the next station" (बरं. मिष्टर काळे, मी आतां उतरतों पुढच्या स्टेशनावर.) " तो खिश्चन बाकावरून उठत शेकहँड करण्यासाठीं आपला हात पुढें करून म्हणाला.

" आं–काय ? You are going ? (तुम्हीं चाललेत ?) " मी दचकून जागा होऊन विचारलें आणि बाहेर पाहूं लागलों. गाडीचा वेग कमी कमी होत शेवटीं ती उभी राहिली.

" I hope you won't forget me (मला विसरूं नका, बरं !) ' तो खालीं उतरत उतरत म्हणाला. मीहि उठून दारापर्यंत गेलों. पुन्हां त्यानें माझा हात धरून मला शेकहँड केली आणि आपली ट्रंक एका हमालाकडे देऊन आपण ' गेट 'मधून बाहेर पडला.

गाडी चालूं होतांच प्रथम कांहीं वेळ त्या खिश्चनबद्दल विचार केल्यावर मी ' बेडिंग ' सोडून बाकावर पसरलें आणि उशावर डाकें टेकून काळोखांत अस्पष्ट दिसणारीं उंच उंच झाडे पहात पडलों. झाडाकडे पहात होतों इतकेंच; पण पुन्हां एकांत मिळाल्यामुळें माझे विचार करण्याचें काम ' पुढें चालूं ' झालें. या एका वर्षांत घरांत बऱ्याच सुधारणा झाल्या असतील असें मला वाटूं लागलें. घरासमोरचे छोटें अंगण, पिछाडीची छोटी बाग, घराबाजूचेंच तें विस्तीर्ण वडाचें झाड, तो गाईंचा गोठा,–सर्व सर्व कांहीं माझ्या नजरेसमोर उभें राहूं लागलें, आणि एका वर्षानंतर मी आज घरीं जातों आहे हा विचार मनांत येतांच माझ्या अंगावर आनंदाचा कांटा उभा राहिला. जन्मगांव कोणालाहि फार प्रिय वाटत असतें. त्यांत मुंबई पुण्यांतल्या मौजा नसल्या, आकाशाला भिडणाऱ्या भव्य इमारती नसल्या अगर दिव्याबत्त्यांचा लखलखाट नसला, तरी खेडेगांवांत जें कांहीं असतें त्यांतच मन रमतें. तेथील निसर्गसंदर देखाव्यानीं जितका अल्हाद वाटतो तो येथील करमणुकीच्या कृत्रिम ठिकाणीं मिळत नसतो. निदान बाकावर पडल्या पडल्या माझी तरी तशी समजूत होत चालली होती. गांवाला पोहोंचण्यापूर्वीच फक्त कल्पनेनें उभारलेल्या गांवाच्या चित्राबद्दलच जर मला इतका आनंद वाटत होता तर तेथें पोहोंचल्यावर माझी काय स्थिति होईल हा विचार माझ्या मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं.

पहांटे साडेपांच, सहाच्या सुमारास गाडी नंदगांव स्टेशनवर थांबली. त्यावेळीं मी अर्ध्यामुर्ध्या झोपेंत होतों. पोर्टरसच्या आरडाओरडीनें मी चटकन जागा झालों

आणि एका पोर्टरला हांक मारून सामान उतरण्यास सांगितलें. मी चौकस नजरेनें कोणी आला आहे कीं काय हें पाहूं लागलों. येणारें माणूस म्हणजे एक मधू अगर बाबा. पण त्यांच्यापैकीं कोणीच दिसेना. मला वाटलें कदाचित् पहाटें गाडी यावयाची म्हणून आणि शिवाय आमचें घरहि स्टेशनपासून बरेंच दूर असल्यामुळें कोणी आलें नसेल. पण लगेच माझ्या मूर्खपणाचे मला हंसूं यऊं लागलें. मी जर गांवीं येण्यापूर्वी त्यांना पत्रच लिहिलें नव्हतें तर मी येणार आहे हें त्यानां कळणार तरी कसें ? बाबानीं माझी कानउघाडणी करण्यासाठीं पत्र पाठविल्यानंतर मी उत्तर वगैरे देण्याच्या भानगडींत न पडतां सामानाची बांधाबांध करून स्टेशनचा मार्ग धरला होता. त्यानां पत्र लिहिण्याचें मी विसरूनच गेलों होतों हें आतां माझ्या लक्षांत आलें. अर्थात मी अकस्मात घरीं जातांच मोठी मौज उडेल या विचारानें मला हंसूं येऊं लागलें. प्रभा तर आनंदानें उडया मारिल आणि बाबा आणि आई 'येण्यापूर्वी पत्र कां लिहिलें नाहींस ? ' म्हणून लटक्या रागानें मला गेल्याबरोबर बोलतील, या पुढच्या प्रसंगाचीं मला अगोदरच स्वप्नें पडूं लागलीं.

टांग्यांत सामान ठेवल्यावर मी पोर्टरच्या हातावर चार आणे ठेवले व त्यानें 'शेट' म्हणून माझ्याकडे केविलवाण्या नजरेनें पहात पावली कपाळाला लावल्यावर मी एक आण्याचे नाणें त्याच्या अंगावर फेकून टांगेवाल्याला बैल हाकण्यास सांगितले.

काय झालें कोणास ठाउक ! पण टांग्यांत बसल्यावर मला एकाएकीं अण्णाचे 'आम्हांला निदान आमंत्रण तरी करा बरं ! ' अशाच कांहींशा अर्थाचें वाक्य डोळ्यापुढें उभें राहिलें. ताबडतोब त्यावेळीं त्यांचें मिस्किलपणाचे हसणे माझ्या कानांत घुमूं लागलें आणि शालिनीचा रडवा आणि कांहींसा आश्चर्याचा चेहरा माझ्या नजरेसमोर खडा राहिला. मी मनांतल्या मनांत त्या वाक्याचा आणि बाबानीं सुटीचें निमित्त करून मला गांवीं येण्यासाठीं लिहिलेल्या पत्राचा कांहीं संबंध आहे कीं काय हें पाहूं लागलों. आईनें आणि बाबानीं माझ्या लग्नाचें कुठें जमवलें आहे कीं काय अशी मला भीति वाटूं लागली. लग्नाबद्दल मला कळवून गांवीं येण्यासाठीं पत्र धाडलें तर मी कदाचित् इतर सुशिक्षितां-सारखा 'मला एवढ्यांत लग्न करावयाचें नाहीं ' असा ठराविक रोखठोक जबाब देईन अशी भीति वाटल्यामुळे बाबांनीं कदाचित् ही अशी ' टूम 'काढली असेल असें मला वाटूं लागलें. एकदां घरीं गेलों म्हणजे कांहीं झालें तरी मला त्यांच्या आज्ञेस मान तुकावलीच पाहिजे, त्यांच्या बोलण्याविरुद्ध एक चकार शब्द काढण्याचें सुद्धां मला धैर्य होणार नाहीं हें मला ठाऊक होतें. मी मुंबईला असतो आणि मला त्यांचा हेतु कळता तर माझ्या भित्रेपणाला कदाचित् मी फांटा देऊन त्यांच्या विनंतीला नकार देण्याचा पत्रांत हिय्या केला असता. पण त्यांना तोंडावर उलट जबाब देणें माझ्या शक्ती बाहेरचें होतें.

माझ्या मनानें निर्माण केल्याप्रमाणें जर खरोखरीच तसा प्रसंग घडला तर पुढची तजवीज काय करावयाची याचा मी विचार करूं लागलों. आमच्या बाबांच्या तापट स्वभावाची मला पूर्ण जाणीव होती. मी त्यांच्या शब्दाबाहेर गेलों तर मला घराबाहेर पडायला विलंब लागणार नाहीं हें मला ठाऊक होतें. मग जाणूनबुजून उभ्या जन्मांत तेढ आणावयाची कीं त्यांनीं धरून आणलेल्या मुलीशीं जन्माचा संबध जोडावयाचा ? त्यांची अवज्ञा करणें म्हणजे घरासकट आई, मधु, प्रभाला मुकणें आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागणें म्हणजे—

शालिनीशीं माझ्या मनानें माझें जोडलेलें नवें नातें मी आठवूं लागलों. सबंध गाडींत केलेल्या विचारावरून माझी अशी ठाम खमजूत झाली होती कीं, तिचें आणि माझें जन्मभर जिव्हाळ्याचें—अगदीं निकट नात्याचें नातें असावें, अशी आह्मां दोघांचीहि इच्छा आहे. शालिनीला आणि मला या भावनेची अगदीं एकाच वेळीं, एकमेकांच्या ओठांच्या एकाच स्पर्शानें आठवण झाली हीहि माझ्या मनाची ठाम समजूत झाली. मग ती मी इतक्या लवकर—चोविस तासांच्याहि अवधीपूर्वी नामशेष करावी हें मला पटेना. बाबा लग्नाचा प्रश्न काढणार खास आणि आपण आपल्या आज्ञाधारक स्वभावानुसार त्याला मान तुकावणार हेंहि खास. मग अर्थात माझ्या शालिनीच्या मनाची सांगड तुटणार आणि आम्हीं दोघेहि जन्मभर रडणार हेंहि ठरलेलेंच तर!

याला काय उपाय काढावा हें मला सुचना. पण पुढें मला विचार करण्यास अवधीच नव्हता. टांगेवाल्यानें आमच्या घरासमोर टांगा थांबवला व खालीं उतरून तो मंडळ सामान उतरूं लागला. मी माझ्या विचारतंद्रींतून जागा झालों आणि ' अं घर आलं' असें पुटपुटत खालीं उतरलों.बैलाच्या गळ्यांतल्या घुंगुरवाळ्यानें कोणाच्या तरी आगमनाची वर्दी घरांत लागलीच होती. बाबा बाहेर येतांच त्यांनीं मला पाहिलें आणि 'जया आला हं.' असें मोठ्यानें म्हणत ते आंत गेले. त्याबरोबर आई, प्रभा, मधू वगैरे झटकन् बाहेर आलीं. मधूनें पुढें येऊन माझी बॅग आणि 'बेडिंग' हातांत घेतले आणि टांगेवाल्यानें ट्रंक डोक्यावर घेऊन आंत ओटयावर आणून भिंतीला टेकून ठेवली.

खेडेगांवांत जेवण मुंबईसारखें थोडेंच दहाच्या ठोक्याला मिळणार ! आईकडून मी चहा आणि फराळाचें घेऊन माझ्या पोटांतला क्षुधाग्नि शांत केला आणि बाहेर आलों. पण प्रभा माझ्याभोंवतीं घोटाळत मला सबंध वर्षाची हालहवाल सांगत होती. बागेंत नवीन नवीन फुलें लावलीं आहेत, गाईचें लहानगें वासरूं आतां मोठें दिसतें

आहे, मनी मांजरीला चार पोरें झालीं आहेत, आपण सध्यां रामभाऊ मास्तरच्या शाळेंत दुसरींत आहों वगैरे प्रत्येक बारीक सारीक गोष्टीची तिनें मला झडती दिली.

जेवण वगैरे झाल्यानंतर, आम्हीं सर्व अशाच गोष्टीं करूं लागलों. मला राहून राहून एकाच गोष्टीची भीति वाटत होती कीं आई अगर बाबा माझ्या लग्नाची गोष्ट काढतात कीं काय! पण मी शिकंदर नशिबाचा असल्यामुळें म्हणा अगर दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा, त्या बैठकींत कांहीं माझ्या लग्नाबद्दल बोलणें निघालें नाहीं. बाबांनीं माझ्या अभ्यासा-वषयीं चौकशी केली, व मीहि 'परिक्षा पास होण्याची आशा करायला बरीच जागा आहे' असें त्यांना सांगितलें. आणि तें कांहीं खोटें नव्हतें. नंतर बोलतां बोलतां माझ्या 'नव्या ओळखी'च्या माणसाबद्दल बोलणें निघालें आणि माझ्या पत्रास उद्देशून बाबानीं मला बरेच टोमणे दिले. आईनें माझ्याकडून त्यांच्या घरांत कोणकोण मंडळी आहेत वगैरे प्रश्न करतांच मला चटकन् शालिनीला पत्र लिहिण्याची आठवण झाली. मी आईला झटपट सगळी माहिती सांगितली आणि तिथून उठून जाण्यासाठीं चुळबुळ करूं लागलों. अखेर आईच्या तें लक्षांत येऊन ती म्हणाली,

"तुला इथें पोहोंचल्याची मित्रांना पत्र लिहायचीं असतील ना? मग जा तर."

मी पडत्या फळाची आज्ञा घेऊन तेथून निसटलों आणि खोलीला आंतून कडी लावून मधूच्या टेबलाजवळ जाऊन बसलों. मला सलगीचे असे जवळ जवळ मुळींच मित्र नव्हते म्हटलें तरी चालेल. अर्थात् माझ्या मित्रांपैकीं मला कोणालाच पत्र लिहावयाचें नव्हतें. एक प्रभाकराचें घर म्हणजे माझें 'सर्वस्व' होतें. पण माझ्यापुढें एक मोठा प्रश्न उभा राहिला तो हाच कीं आतां पत्र लिहावें कोणाला? शालिनीला आपण पोहोंचल्याचें पत्र लिहिलें तर तें कसें दिसेल? अण्णाची आई, प्रभाकर वगैरेना काय वाटेल? एखाद-वेळीं ते तिची पत्रावरून थट्टा तरी करतील अगर चिडून जाऊन माझ्याबद्दल आपलें मत वाईट तरी करून घेतील. कारण मी त्यांच्या घरीं शालिनीशीं कितीहि सलगीनें वागत असलों तरी मी तिला पत्र लिहिणें म्हणजे त्यांच्या मतें कसें दिसेल याची मला भिती वाटूं लागली. शालिनीला मी पत्र लिहायला बसलों तरी नुकतेंच नवीन जडलेलें गुप्त नातें बंडखोर-पणानें मला फक्त सुखरूप पोहोंचल्याचें पत्र पाठविण्यास कधींच 'परवानगी' देणार नाहीं. हें मला ठाऊक होतें 'त्या' प्रसंगाची मला आठवण होऊन तिला तसल्याच तऱ्हेचें पत्र लिहिण्याचा मोह अनावर होणार याबद्दल मला तिळमात्र शंका नव्हती. मी कितीहि खटपट केली तरी एखादा निराळाच शब्द—म्हणजे जो माझ्यासारख्या तरुण, अविवाहित 'कॉलेजस्टूडंट'नें शालिनीसारख्या कुमारिकेला लिहूं नये—मला नकळत अगर जाणून बुजून माझ्या लेखणीनें कागदावर लिहिला जाईल अशी मला साधार भिती वाटूं लागली.

पोंच व अभिप्राय

हिंदुत्व. (प्र. गणेश महादेव आणि कं. गिरगांव, मुंबई) या मूळ इंग्रजी पुस्तकाचें डॉ. सावरकर यांनीं मराठींत भाषांतर केलें आहे. डॉ. सावरकरांच्या भाषा-प्रभुत्वामुळें मूळ कल्पना तितक्याच जोरदारपणानें मराठींत उतरल्या आहेत. 'हिंदुत्व' या शब्दाची व्याख्या कंटाळवाण्या विस्तारानें वर्णिली असली तरी सांगोपांग रीतीनें स्पष्ट केली आहे. परधर्मियांच्या मतांप्रमाणें आपलीं मतें बनवणाऱ्या हिंदूंनीं हें पुस्तक एक वेळ तरी वाचून आपल्या आचार-विचारांचो उसनवारो टाकून द्यावी असें त्यांस आग्रहाचें सांगणें आहे. नाटक कादंबऱ्यांना सोकावलेल्या वाचकांना या तात्विक पुस्तकांत अर्थातच रुक्षतेचाच जेथेंतेथें भास होईल. किं. रु. १

लोकमित्र (खानापूर–बेळगांव वा. व. २ रुपये) ३५व्या वर्षाचा १ला अंक कांहींशा सुधारणानीं प्रसिद्ध झालेला आहे. श्री. ना. ह. आपटे यांची 'गमतीची गोष्ट' गमतीची तितकीच बोधप्रद आहे. श्री. सीता-कान्त यांचा 'हा दुबळेपणा सोडा' हा लेख उत्कृष्ट आहे. इतर कांहीं लेखहि बरे आहेत. आमच्याप्रमाणेंच 'महिला मनोरंजन' व 'मुलांचें जग' हीं दोन सदरें 'लोकमित्रांत' सुरू झालीं आहेत. या नवीन सुधारणांनीं 'लोकमित्रा'ला बरेंच चांगलें स्वरुप आलें आहे असें वाटतें.

मंदार-पुष्प-माला (नांदेड. सं. निजाम) वर्षांतून केव्हांतरी चार अंक प्रसिद्ध करणारी ही एक नवीनच माला निघालेली आहे. एक गोष्ट, चार कविता आणि आणखी दोन, तीन लेख १ ल्या पुष्पांत आले आहेत. अर्थातच सरस अगर सुरस ग्रंथमालेसारखीं पुस्तकें प्रसिद्ध करणारी ही माला नसून मासिकाच्या धोरणाची पण वर्षांतून फक्त चारच पुष्पें गुंफलीं जाणारी ही माला आहे. अंकाची किंमत ६ आणे फार आहे असें वाटतें.

पद्य-मुक्ता माला, खुशी श्रीमंति, वऱ्हाड-शाळापत्रकाचा खास अंक, स्वयंसेवकाचा खास मातृअंक, राष्ट्रीय मेळ्याचो पद्यावली, समाजसेवक (मासिक) वगैरे पोहोंचलीं. पाठविणारांचे आभारी आहों.

मेंदुचे विकार व डोकें दुखणें यावर,

किं. १-२-०,] **ब्राम्ही तेल** [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा:—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.

बाळंत काढा:—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.

बाळकडू:—उपजल्यापासून देण्यास योग्य किं. ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायणें वगैरे औषधें तयार आहेत. एक आणा आला असतां रुग्ण पत्रिका लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचना:—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांचा खप वाढल्यामुळें नक्कल सुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळीं या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आर्यौषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.

दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने

शर्टची बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोत्याची रु. ५; आंगठी रु. १; सळे जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. २॥; घडाळ्याचा छेडा रु. ३;

केंस काळे करण्याचा साबण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्याच्या बॉक्सला रु. १॥.

इमिटेशन मोतीं.


हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथीसाठ ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुड्यासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. अमृतवाडी, गिरगांव, मुंबई.

खास अंक] **वैनतेय** [खास अंक

या पत्राचा दुसऱ्या वर्षाचा पहिला अंक आक्टोबरअखेर निघणार आहे. त्यांत अनेक विद्वानांचे लेख येणार असून अंक सर्वांगसुंदर निघणार आहे. या पत्रांत सामाजिक, विनोदी, टीकात्मक लेख, विस्तृत परीक्षणें वगैरे लेख येत असतात. संस्थानच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं तद्विषयक निर्भीड चर्चा होत असल्यामुळें दूर देशीं रहाणाऱ्या सावंतवाडीच्या प्रजाजनांचें **वैनतेय** फार आव डीचें पत्र आहे. वार्षिक वर्गणी ३ रु. व्ही. पी. ने ३८५.

व्यवस्थापक—' वैनतेय ' सावंतवाडी.



सात्विक करमणूक करून देशभक्तीची उज्वल ज्योत प्रज्वलित करणाऱ्या

चटकदार कादंबऱ्या.

सचित्र आनंदमठ किं. १८४, चव्हाणी समशेर! किं. १, सचित्र महाराणा प्रतापसिंह रु. १ वंगसूर्यास्त! किं. १, चितोडचा वीर अरुण! किं ८१२, सुवर्णयुग. किं. ८१२, सती–परीक्षा. कि., ८१२, सचित्र. राष्ट्रोन्नति केव्हां होईल? किं. ८८, सचित्र मधुर मीलन (दुसरी आवृत्ति) किं. ८८, प्रणट-भंग! किं. ८४, वरील कादंबऱ्यांचा सेट ६८८ त देऊं ट. ह. शिवाह. फुटकळ पुस्तकांस भर किंमत पडेल.

प्रो. ज्ञानमित्र, शनवार, पुणें–शहर.

अनुक्रमणिका.

१ आई (कविता) श्री. रामतनय १

२ ईश्वरी संकेत. (सं. गोष्ट) श्री. शां. अ. सबनीस २

३ मुलांची मौज. ९

४ मुलींचा संसार १६

५ श्रीगणेशापासून—(लेखांक. २) श्री. विनोदलाल १७

६ अंदरकी बात (विनोदी प्रहसन) ले. मंगळमूर्ति २५

७ स्वैरविहार पूर्णानंद ३२

८ क्षणभंगुर (चालू कादंबरी) ९

९ पाँच आणि अभिप्राय... ... ... ४३

बक्षिसासाठीं:—

अरुणाच्या बाललेखकांनीं यंदा आपापली दिवाळीची सुट्टी कशात्‌हेनें घालविली या विषयावर **अरुणाच्या** २५ ओळी होतील एवढा निबंध लिहून पाठवावा. ज्याचा निबंध सर्वांत चांगला ठरेल त्याला एक सुंदर पुस्तक नेहमींप्रमाणें बक्षिसादाखल पाठविण्यांत येईल. बक्षिसासाठीं १२ वर्षांखालील बाल-लेखकांनींच प्रयत्न केला पाहिजे व तो **अरुणाचा** वर्गणीदार असला पाहिजे ही अट निबंध पाठवितांना जरूर लक्षांत ठेवावी.

संपादक—मो. ग. रांगणेकर] [वा. व. ट. ख. सह २। रु.

किंमत ३ आणे.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं

जगविख्यात निवडक औषधें.



विद्युद्दामसमप्रभां मृगपति स्कंधस्थितां भीषणाम् ।
कन्याभिःकरवालखेट विलसद्धस्ताभिरासेवितां ॥
हस्तैश्चक्रदरालिखेट शिशिखांश्चापं गुणंतर्जनीम् ॥
बिभ्राणामनलात्मिकांशिशिधरां दुर्गांत्रिनेत्रां भजे ॥ १ ॥

पत्ता:—कुळकर्णी ॲण्ड सन्स, मुंबई नं. २.

अद्भुत ! अद्वितीय चमत्कारिक !

कविविनोद वैद्यभूषण पं० ठाकुरदत्त शर्मा वैद्य यांनीं बनविलेली.

[Registered] # अमृतधारा [रजिस्टर्ड]

अमृतधाराची जितकी प्रशंसा वास्तवीकपणें होत आहे, तेवढी जर लिहावयास बसलों तर मोठे ग्रंथ भरून जातील. परतु संक्षिप्त रूपानें पाहणें असल्यास "अमृत" नांवाचें मराठी पुस्तक फुकट मागवून वाचून पाहणें. खरोखर आजपर्यंत एक सुद्धां औषधी अमृतधारेच्या जोडीची निघाली नाहीं. आश्चर्याची गोष्ट आहे व कांहीं लोक हें एकदम खरेही मानीत नाहींत कीं, एकच औषधी सर्व रोगांवर चालते तरी कशी? शिवाय गुणहि तात्काळ वाटतो.

अमृतधारा ज्या ज्या रोगांवर चालते त्यांची नामावली.

प्रत्येक प्रकारचा ताप, अतिसार, संग्रहणी, रक्तातिसार, अजीर्ण, अरुचि, महामारी, हग ओक, मुळव्याध, पांडु, कावीळ, खोकला, श्वास, क्षय, उचकी, वांती, रक्तसर्दि, ओकारी, मुर्च्छा, भ्रम, अपस्मार [फेंफरे] अम्लवात, शूळ, आनाह, उदररोग, गुल्म, शोथ, कंठमाळा, गलगंड, भगंदर, पर्मा, गर्मी, वातरोग, पित्तरोग, कफरोग, ओष्ट सुजणें, दांत दुखणें, दांतांस पाणी लागणें, दंतरोग, मुखपाक, हिरड्या सुजणें व दुखणें, कंठरोग, कर्णस्राव, कर्णकंड, नजळा, वेदना, नेत्ररोग, लहान मुलांचा ताप, खोकला, अतिसारादि रोग, सर्प, विंचू, मधमाशी, मुंगी, इत्यादिकांचे विषारी दंश, अफू, सोमल इत्यादिचें विष, प्लेग, पार्श्वशुक, न्यूमोनिया, शंका लासूर, गजकर्ण, नायटे, इसब, खाज, पुळ्या, सांधे गुढगे, पोटऱ्या किंवा मांड्या, दांत दुखणे इ०

गृहस्थहो विचार तर करा !

असें औषध प्रत्येक मनुष्याच्या खिशांत प्रत्येक ऋतूंत घरांत देश परदेश सर्वत्र सर्व काल असलें पाहिजे नको कां ? कोणास माहीत आहे कीं कधीं काय होतें ? अशा प्रसंगाच्या वेळीं जें काम हें औषध देतें त्याच्या मानानें याची किंमत कांहींच नाहीं.

" अमृतधारे " ची प्रशंसा जितकी आह्मी करतों त्याच्यापेक्षां कितीतरी पटीनें 'अमृतधारा' घेणारे करतात. आमच्या जवळ २१ हजार सर्टिफिकीटें आहेत. आपणसुद्धां एकदां मागवून अनुभव घेऊन प्रशंसकांच्या मंडळीत सामील होणें. किं. रु. २८८;

नमुन्याच्या लहान बाटलीचे आठ आणे; अर्ध्या बाटलीचा १। रु. पत्रव्यवहार बालबोध भाषेंत करणें, मोडीत करूं नये.


म्यानेजर—अमृतधारा औषधालय, अमृतधारा भवन, अमृतधारा रोड, अमृतधारा डाकखाना, लाहोर. पत्र किंवा तार पाठविणें असल्यास फक्त एवढा पत्ता पुरे आहे—

" अमृतधारा ९७ लाहोर " [३४६]

एजंट—गुलाम हुसैन वल्ली महमद देवजी पीर भाई मिंसन परिन्सीस स्ट्रीट मुम्बई २

अनुक्रमणिका.

१	**पंजरस्थ शुकास** (कविता)	श्री. ग. ना. ताम्हणे	१
२	**कसावकरणो** (गोष्ट)	. . ...	२
३	**मुलांची मौज.**	... .	१३
४	**मुलींचा संसार**	... .	१९
५	**आदर्श**—(गोष्ट) 'कुसुमचंद्र'	. .	२१
६	**श्रीगणेशापासून**—श्री. 'विनोदलाल'	. .	२४
७	**नाट्यकला**	... .	३०
८	**क्षणभंगुर**—(चालू कादंबरी)	. .	१९
९	**पाँच व अभिप्राय**	... .	३३



तरुणांना धंद्यांची चटक लावणारा औद्योगिक ग्रथ.

सुगंधी शिक्षक ह्मणजे पर्फ्यूमरी इंस्ट्रक्टर.

यांत धंदा यशस्वी कसा करावा याची गुरुकिल्ली दाखवून सुगंधी तेलें, अर्क, पोमेड्स, फिटने, उदबत्त्या, इत्यादि अल्प भांडवलांत घरचेघरीं तयार करितां येऊन रोज १०-१५ रुपये मिळवितां येण्याजोगी **सप्रमाण** व **गुप्त** माहिती मागवून **धंदा** करा ! **पैसा** मिळवा ! किंमत १ रुपया; व्ही. पी. १०६; **धंदे शिक्षक** किंमत ०८; **बूट पॉलिश** शिक्षक किंमत०८; सचित्र **गिल्डिंग** शिक्षक किंमत ०१२; **चार पुस्तकें** व्ही. पी. नें ३०३.

पत्ता--**प्रो ज्ञानमित्र**, शनवार पेठ, पुणे सिटी.



बुद्धदेवाचें भविष्यकथन,

[रा. मुणगेकर यानीं तयार केलेल्या पुतळ्यावरून]



वाचन मग्ना.

अरुणा माला.

वर्ष २.] नोव्हेंबर १९२५ [अंक ३.

पंजरस्थ शुकास

कशी तुला रुचती ॥ विहगा ! गोड गायनें तीं ? ॥
स्वतंत्रता तव नष्ट जाहली काय न तुज खंती ? ॥ ध्रु० ॥

स्वैरपणानें उडणें फिरणें ब्रीद तुझें असतां ॥ विहंगा ॥
पंजरस्थ होउनी राहणें कसें रुचे आतां ? ॥ विहंगा ॥
परदास्याचें दुःख न वाटे काय तुझ्या चित्ता ? ॥ विहंगा ॥
हाय ! जाहली अशामुळें तव स्वत्वाचीं माती ॥ कशी तुला० ॥१॥

स्वकीय संगति त्यजुनी आतां मानवास भजसी ॥ शुका रे ॥
गोड गायनें तुष्ट करावें यांत सौख्य वरिसी ॥ सर्वदा ॥
"छान" म्हणोनी मान तुकवितां आनंदित होसी ॥ विहंगा ॥
पाथावरती दगड पाडुनी घतलास हातीं ॥ कशी तुला० ॥ २ ॥

पुरे करी तव झोंप शुका ! ही, जागृत हो पुरता ॥ विहंगा ॥
स्वातंत्र्याच्या वातावरणीं घालिं झेंप आतां ॥ त्वरेनें ॥
सृष्टीच्या गायका ! उघळि मग त्वदमोलिक गीता ॥ सुखानें ॥
आम्हि उगवते शाहिर गाऊं सख्या त्याच रीतीं ॥ कशी तुला० ॥ ३ ॥

—ग. ना. ताम्हणे

कसाबकरणी.

मोहना रहात होती तें एक झोंपडीवजा जर्जर्ण घर होतें. घरावर कांहीं अवशेष अर्धमोडकीं कौलें होतीं आणि एकंदर रचना घरासारखी होती म्हणून मोहनेच्या निवासस्थानाला 'घर' म्हणावयाचें-इतकेंच. एरव्हीं झोंपडी हें नांव विशेष अन्वर्थक झालें असतें. त्या घरांत फक्त मोहना आणि तिची वयस्क आजी एवढीं दोनच माणसें असल्यामुळें त्यांना त्या अर्धमेल्या घरांत आपला तुटपुंजा संसार थाटतां आला होता. खानदानी अगर कांहींशा सुखवस्तु घराण्यांत कुंवार तरुणीला घराबाहेर पडण्याचा कधींच प्रसंग न आल्यामुळें तिच्या अंगीं साहजिकच लज्जाशीलतेचा प्रादुर्भाव होतो. परंतु घरचा व्यवहार मोहनेलाच उरकावा लागत असल्यामुळें ती बरीच धीट बनली होती.

मोहनेच्या घरापासून कांहींशा अंतरावर भय्याशेटजींचे घर होतें. त्यांची सावकार म्हणून व विशषतः त्यांच्या अवाढव्य शरीरयष्टीवद्दल गांवांत पुष्कळ प्रसिद्धि होती. कुळांच्या घरांवरून नांगर फिरवून त्यांनीं त्या ठिकाणीं स्वतःसाठीं टुमदार दुमजली हवेली उठविली होती. सबंध गांवांत त्यांच्याइतका श्रीमंत सावकार दुसरा एकहि नव्हता आणि म्हणूनच त्यांची गांवांत विशेष प्रसिद्धि होती.

सकाळीं आठ, साडे आठाचा सुमार होता. भय्याशेटजी रोजच्या संवयीप्रमाणे वरच्या छोटेखानी गच्चींत टाकलेल्या खुर्चींवर बसले होते. शेजारींच गांवचे उपाध्ये—भय्याशेटजींचे 'प्रा. से.' गुंडोपंत गांवांतल्या उप्याअधिकाचा 'रिपोर्ट' सांगण्यासाठीं येऊन बसले होते. भय्याशेटजींच्या सगळ्या मित्रमंडळींत त्यांचा पंतांवर विशेष लोभ होता. याचें कारण फारसें कठीण नव्हतें. गांवांत आपल्याविषयीं लोकमत काय आहे, आपल्याविरुद्ध कोणाचा कसला कट चालला आहे कीं काय, गळ्याखालीं उतरतां येण्यासारखी एखादी बिनवारशी इस्टेट आहे कीं काय यापासून तों आपल्या या उतार वयांत आपल्या गलेलठ्ठ शरिराचा, धडावर चिकटवलेल्या छोटयाशा बटोळ्या गरगरीत डोक्याचा, बटबटीत डोळ्यांचा आणि सुटलेल्या पोटाचा तिटकारा न करतां कोणी एखादी नवयौवना सुंदर तरुणी माळ घालण्यास तयार आहे कीं काय या व इतर बऱ्याच बारीक सारीक गोष्टींपर्यंत साद्यंत 'रिपोर्ट' गुंडोपंताइतका भैय्याशेटजींना

दुसऱ्या कोणाकडूनच मिळत नसे. आणि हेंच त्यांचें गुंडोपंतावरील विशेष मेहेरनजरीचें कारण होतें.

"ती–ती पाहिलीत ? " चहाचा कप तोंडाला लावतां लावतां मध्येंच थांबून गुंडोपंत एका विवक्षित ठिकाणीं पहात भय्याशेटजींना उद्देशून उद्गारले.

"कोण, कोण ? " भय्याशेटजी आपलें अवास्तव शरीर टेकलेल्या खुर्चीपासून जरासें पुढें करून आपले मोठाले डोळे जास्तच विस्फारीत करून म्हणाले.

"ती–ती शेजारची मोहना. पाहिलीत ? " भय्याशेटजी चहाचा कप जवळच्या स्टुलावर ठेऊन दोन्ही हात पुढें कठड्यावर टेकून बाहेर पाहूं लागले. त्यांचें बटबटीत डोळे जास्त विस्फारत चालल्यामुळें आतां ते अगदीं डोळ्याच्या चौकटीवर चिकटवल्या-सारखे दिसूं लागले. त्यांच्या खडकाळ चेहऱ्याच्या घट्ट कातडीवर कधीं न दिसणारें हास्य दिसूं लागलें. गुंडोपंतांची कावेबाज नजर त्यांना कळूं न देतां त्यांच्या चेहऱ्या-वर लागली होती. त्यांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या अविर्भावावरून मनकवडया गुंडो-पतानां त्यांचें मनोगत स्पष्टपणानें कळून आलें.पण तसें कळूं न देतां गुंडोपंत म्हणाले, " मोहनेच्या आजीला एकदां ताकीद दिली पाहिजे, कीं त्यांच्या घराबाजूंचीं झाडं अगदीं सुकलीं आहेत. त्यांच्या फांद्या तोडीत नसल्यामुळें सगळा पाचोळा वाऱ्यानें भिरकाऊन या अंगणांत पडतो. "

गुंडोपंत इतके बोलले खरें. पण भय्याशेटजींच्या कानीं त्यांचे शब्द पडले कीं नाहींत कोण जाणे! त्यांची नजर विहिरींतून पाणी काढीत असलेल्या मोहनेकडे सारखी लागली असून त्यांच्या चेहऱ्याच्या टणक कातडयावर महत्प्रयत्नानें एक ओशरती सुरकती पडली होती. गुडगुडी ओढून अर्धवट भाजल्यासारखे झालेल जाड व राकट ओठ एकमेकांपासून किंचित् विभक्त होऊन तोंडाचें बोळकें दिसत होतें. त्यांचा श्वासही निरोध होऊन आजूबाजूच्या परिस्थितीबद्दल ते पूर्ण अज्ञात होते. त्यांची नजर एकसारखी मोहनेवर लागली होती. गुंडोपंतांनीं आपलें बोलणें त्यांनीं ऐकलें नाहीं हें ओळखलें. त्यानींहि आपली नजर त्यांच्याकडून मोहनेकडे वळवली. मो न भरलेली कळशी कमरेवर घेऊन परत आपल्या घरीं जात होती. तिच्या चालीबरोबर भैय्याशेटजींची नजरही फिरत होती. अखेर ती आपल्या घराच्या दरवाजांतून आंत जाऊन दृष्टीबाहेर झाल्यावर भैय्याशेटजी पूर्वस्थितीवर आले. त्यांनी मोठ्या मुष्किलीनें आपलें धडाला चिकटवलेलें डोकें गुंडोपंतांकडे वळवीत म्हटलें,

"गुंडोपंत ! "

"सरकार ! "

दोघेहि एकमेकांकडे टक लावून पहात राहिले. गुंडोपंतांची तीक्ष्ण नजर भैय्या-शेटजींच्या गरगरीत डोळ्यांतून आरपार त्यांच्या हृदयांत शिरली. भैय्याशेटजींना जें कांहीं सांगावयाचें होतें तें गुंडोपंताना न सांगतांच कळलें.

" पंत, खरंच, जमेल का ? "

" काय ? " गुंडोपंतांनीं जाणूनबुजून डोळ्यावर कातडें आणून विस्मयचकित झाल्यासारखें करून विचारलें.

" मोहनेकडे डाव साधेल का ? "

" हं: हं: असं होय ? " पंतांनीं आपल्या मडक्यांत आतांच या स्पष्टपणामुळें प्रकाश पडल्यासारखा अविर्भाव केला.

" तुमची अक्कल काम करील का ? पहा, फत्ते झाली तर तुम्हांला सोन्यानें मढवून काढीन. "

गुंडोपंतानां आतांच सोन्यानें मढवल्यासारखें वाटलें. त्यांनीं मोहनेच्या घराकडे अर्धएक मिनिट टक लावून पाहिलें आणि म्हटलें,

" सरकारला गांव किती वचकून आहे, ठाऊक नाहीं ? "

" बरं मग ! "

" मग काय ? मोहना मिळणं न मिळणं सर्वस्वी आपल्या हातांत आहे. "

" तें कसं काय ? "

" हें पहा. त्यांच्या झोंपडीच्या आसपास बरींच झाडं आहेत. त्यांच्या फांद्या तोडल्या नसल्यामुळें त्यांची वाळलेलीं पानं जमिनीवर पडून नंतर वाऱ्याच्या लाटेबरोबर तो सगळा पाचोळा या आपल्या वाडयाच्या अंगणांत पडतो. इतर कुळांनीं कधींच फांद्या तोडून साफसूफ केलं आहे. तेव्हां——"

" हं, हं, तेव्हां तिला जेरीला आणून कबुली मिळवावी म्हणतां ? आहे, कमाल आहे आपल्या बुद्धिमत्तेची. " असें हंसत हंसत म्हणून त्यांनीं आपल्या गलेलठ्ठ हातांनीं गुंडोपंतांच्या हाडकुळ्या पाठीवर थाप मारली. खास सरकारस्वारीची शाबासकी मिळविण्याचा मान गुंडोपंतांना मिळाल्यामुळें त्यानां दोन मुठीं मांस चढलें.

मोहना—

आजीनें इतकें सांगितलें खरें, पण तिकडे जायचें कसें ? माझी जरी लांबून त्याच्यावर नजर गेली तरी अंगाचा थरकांप होतो. मग अगदीं दोन पावलांवर

जाऊन त्याच्याकडे हात पसरायच कसे ? एखाद्या किळसवाण्या पशूकडे सुद्धां पहावतें, पण त्याच्या ओंगळ चेहऱ्याकडे बघवत सुद्धां नाहीं. त्याचे ते बटबटीत डोळे, धडावर चिकटवलेलें तें मुंडकें, तो जाडाभरडा चेहरा, आणि तें किळसवाणें शरीर — इश्श्. आणि त्याच्यापुढें उभें राहून हात पसरायचा ! त्याच्या क्रूर चेहऱ्याकडे पाहिलें कीं अगदीं भेदरून गेल्यासारखें वाटतें. त्याच्या पुढ्यांत उभें राहिल्यावर तो काय करील कोण जाणें ! कसा एकसारखा घराच्या खिडकींतून टवकारून पहात असतो. तो अन् तो मेला गुंडया. मेल्यानें सगळा कचरा वाडयाच्या अंगणांत येतो म्हणून झाडांच्या फांद्या गडी माणसांकडून तोडायला लावून आम्हांला भुर्दंड भरायला लावला. मेल्याचें कद्धीं कद्धीं बरें होणार नाहीं. मला काहीं कळत नाहीं असें नाहीं. पण काय करायचें ? त्या राक्षसापुढें जायला अगदीं धीर होत नाहीं. काहीं विटंबना केली तर धाऊन यायला देखील कोणी नाहीं. माझी मला कसलीच काळजी वाटत नाहीं. पण आजीला उपास पडायला लागले म्हणून मला एकदां त्या निर्दयापुढें जाऊन उभें रहावेसें वाटतें. काय करावें मला कांहींच कळत नाहीं. त्याच्यापुढें जाऊन उभी रहायला मला अगदीं धीर होत नव्हता. मी कर कर विचार केला. पण माझी विचारमग्न स्थिति पाहून आजी-नेंच पुन्हां मला बोलावून आणून म्हटलें, " मोहने ! तुला जायला अजून का धीर होत नाहीं ? तुझी हा दशा पाहून मला म्हातारीला अगदीं भडभडून येतं ग ! माझ्यासाठीं तुझं कांहीं बरंवाईट झालं तर तें माझ्या दृष्टिआड झाल्यामुळं तरी दुःख करायला जागा रहाणार नाहीं. पण अशा डोळ्यादेखत तुझी हालअपेष्टा होत असलेली मला कशी ग पहावेल ? माझ्या म्हातारीचं मेलं काय ! पिकलं पान. मी उपाशी राहून राम म्हटलं तर 'कोणाचा कांहीं तोटा नाहीं. पण तुझ्यासारखी तरणी-ताठी पोर अन् तिचे हे अन्नासाठीं होत असलेले हाल मला कसे ग पहावतील, मोहने ? जा, तूं कसला सुद्धां विचार करूं नको. अग, देवाला तरी कांहीं दया आहे ना ? "

आजी इतक्या कळवळयानें पुन्हां बोललेली पाहून मग मी जाण्याचा निश्चय केला. आजी माझ्यासाठीं मला जायला सांगत होती, पण मी मात्र तिच्यासाठीं जाण्याला तयार होऊन उसना धीटपणा आंगीं आणला. मला माझी विशेषशी फिकीर वाटत नव्हती. पण तिचे हाल मला बघवत नसत. अन्नाशिवाय रहाण्याचें माझ्याइतकें तिच्या अंगीं त्राण आणि शक्ति नव्हती. आणि म्हणूनच माझ्या मनाविरुद्धची गोष्ट करायला मी तयार झालें.

हृदय धडधडणाऱ्या स्थितींत मी चेहऱ्यावर उसनें धैर्य आणून त्याच्या अंगणांत शिरकाव केला. बाहेरच शिपाई उभा होता. मी त्याला भैय्याशेटजीला भेटायचें आहे

असें सांगतांच तो मगरूरपणानें मला हिडिसफिडीस करूं लागला. पण मी आजीची मूर्ति पुढें ठेऊन तिथून एक पाऊलसुद्धां पाठीं न फिरण्याचा निश्चयच केला होता. पण इतक्यांत त्या उद्दाम शिपायाच्या मोठमोठ्यानें बोलण्याच्या आवाजानें कीं माझ्या आवाजानें कोणाला ठाऊक, पण भैय्याशेटजी आपल्या अवाढव्य शरिराचा तोल संभाळीत बाहेर आले आणि मला पहातांच त्यांचा चेहरा एकदम खुलून आला. त्यानें त्या मगरूर शिपायाला रागानें बोलून मला मोठ्या अदबीनें आंत येण्यास सांगितलें. कुळाला इतक्या सौम्यगुणानें वागवल्याचें कधींच दृष्टीस पडलें नसल्यामुळें त्या शिपायाच्या चेहऱ्यावर आश्चर्याचा भाव उत्पन्न झाला असला तरी मला भैय्याशेटजीच्या मनोगताची नीट परीक्षा झाली असल्यामुळें त्याच्या अदबीच्या वागण्यांत सौजन्यापेक्षां इच्छासाधनाचाच भारी भाग होता हें कळून आलें होतें. मी घाबरत्या मनाला धीर देत त्याच्या पाठून आंत गेल्यें. कधीं मनांत नसूनसुद्धां माझ्या इच्छे विरुद्ध मला आज त्याच्यापुढें इतक्या निकटवर्ती उभें रहाण्याचा प्रसंग आला होता. एका खुर्चीवर बसून त्यानें नेच्याची नळी तोंडांत घेतली व हंसण्याचा अविर्भाव चेहेऱ्यावर आणण्याचा शक्य तो प्रयत्न करीत टक लाऊन तो माझ्याकडे पाहूं लागला. मी जरी श्वास कोंडून घेऊन, नजर पायाच्या अंगठ्यावर लाऊन उभी होतें तरी तो माझ्याकडे टक लाऊन पहातो आहे हें मला कळत होतें. मी बराच वेळ त्याची बोलण्याची वाट पाहिली. पण तो माझें रूप न्याहाळण्यांतच गुंग झालेला पाहून मी माझी सारी शक्ति एकवटून " मला पांच रुपये उसनवार पाहिजेत " असे कसेबसे शब्द तोंडाबाहेर काढले. त्यानें ते ऐकले कीं नाहींत कोण जाणे ! पण त्याचें त्यावर कांहींच उत्तर न आलेलें पाहून त्यानें माझें वाक्य ऐकलें कीं नाहीं हें पाहण्यासाठीं मोठ्या धैर्यानें पायाच्या अंगठ्यावरची नजर मी जरा वर उचलली. त्याची माझी दृष्टीभेट होतांच त्यानें आपलें बोळकें पसरून हंसल्यासारखें केलें व म्हटलें, " मोहने, तूं फार सुंदर आहेस ग ! " त्याच्या ह्या वाक्यानें मी अगदीं गर्भगळीत होऊन गेलें. येण्यापूर्वी शंका आल्यासारखाच प्रसंग ओढवतो कीं काय अशी मला भिती पडली. मला श्वास सुद्धां टाकतां येईना.

" मोहने, तूं या कपड्यांत दिसतेस त्यापेक्षां नव्या कपड्यांनीं फारच सुरेख दिसशील. मी तुला एक छानसं पातळ देतों अं." असें म्हणून आपलें अवजड शरीर खुर्चीवरून उठवून जमीन हादरून टाकणाऱ्या पावलांनीं चालत तो आंतल्या खोलींत गेला आणि त्यानें एक नवें कोरें गुलाबी रंगाचें पातळ आणलें.

" चल, शेजारच्या खोलींत जाऊन हें पातळ नेसून ये. आणि मग तुला किती पैसे उसने पाहिजेत ते माग. "

मी एवढया भयंकर संकटांत सांपडलें ! त्याच्याकडे नुसती दृष्टी वळवून पहायला सुद्धां नाखूष असलेली मी त्यानें दिलेलें पातळ अंगावर लेण्याइतकी कवुली देईन ही एरव्हीं कुठल्याहि प्रसंगीं अशक्य कोटींतली गोष्ट होती. त्याच्या हातची वस्तु स्वीकारून त्याला मिंधी होण्याइतकी मी सहजवश भोळी भाबडी स्त्री नव्हतें. मी अकिंचन असतांहि वस्त्रा-दागिन्याला लालचावलेल्या स्त्रीसुलभ स्वभावाची स्त्री नव्हत्यें. पण—पण करायचें काय ? माझी आजी होती. तिच्या पोटापाण्याची जबाबदारी वयापेक्षां सबलत्वामुळेंच माझ्यावर विशेष पडली होती. अगदीं स्पष्ट सांगण्यचें म्हणजे मी सकारण निर्लज्ज बनलें. त्याला माझ्या संमतीचें सानंद आश्चर्य वाटलें. पण त्याच्या हातचें वस्त्र नेसतांना माझ्या अंतःकरणाला सहस्त्रावधि वृश्चिकवेदना होत होत्या. मी खोलींतून बाहेर येऊन त्या नव्या वस्त्रांत त्याच्यापुढें उभी रहातांच त्याला आनंदाच्या उकळया फुटूं लागल्या. पण त्याच्या आनंदाच्या प्रत्यक पायरीबरोबर माझ्या मनोवेदनाची वाढ होत होती. पण त्या वेदना दुसऱ्या कोणाला कळणार ?

सबंध जगाची मालकी आपल्याकडे आली आहे इतक्या आनंदानें त्यानें म्हटलें, " तुला किती रक्कम हवी ? "

" पांच रुपये. " दर क्षणाला त्याच्याबद्दल साशंक होत असलेल्या मनाला स्थिराव्ून मी उत्तर दिलें.

" बस ? जा, हे वीस रुपये घेऊन जा. चल; तूं छान छोकरी आहेस. "

मला त्याचा असा संताप आला होता ! पण—पण मी तो आवरून त्याच्याकडून फक्त पांचच रुपये घेऊन बाहेर पडलें. शिकारी कुत्र्याच्या तावडींतून निसटून निःशंक झालेल्या भ्यालेल्या हरिणीसारखें माझें मन स्वस्थ झालें आणि कसलाहि दुःसह प्रसंग न घडतां मोकळेपणानें सुटल्याबद्दल मी देवाचे किती तरी आभार मानले.

मी त्याच्या विनंतीचा अव्हेर केला नाहीं याचा त्याच्या मनावर किती तरी उलट परिणाम झाला. मी त्याच्या मनाप्रमाणें वागलें, याचा त्यानें मी त्याला वश असल्याचाच तर्क केला. कारण वरच्या प्रकारानंतर ३-४ दिवसांनीं जेव्हां गुंडोपंत येऊन मानभावीपणानें गोडगोड बोलून साखर पेरण्याचा प्रयत्न करूं लागला तेव्हांच माझ्या त्यावेळच्या संमतिदर्शक वर्तनानें त्याचा किती चुकीचा तर्क झाला आहे हें मला कळलें. मला त्या गुंडयाचा इतका राग आला कीं त्याला फाडकन् उत्तर देऊन गप्प बसवणार होतें. पण मी जागतेपणानें प्रसंग ओळखून गप्प राहिलें. आजवर भैय्यासेटजीनें कतीजणांच्या घरादारांवरून नांगर फिरवून त्यांना देशोधडीला लावलें आणि शिव्या

शाप घेतले तें मला ठाऊक होतें. त्यांची जुलुमजबरदस्ती क्षम्य नसली तरी दुबळ्या गांवाला मुकाट्यानें ती सहन करावी लागत होती. माझ्या अनावर मनाला मी बाध आणला नसता तर दुसऱ्या दिवशीं आमच्या झोपडीचा उ ला सुरला मोडका आधार नाहींसा व्हायला वेळ लागला नसता हें मला ठाऊक होतें.

पण अखेर व्हायचें तेंच झालें. गुंडोपंताच्या सकाळ-संध्याकाळ आमच्या घरीं वाऱ्या होऊं लागून त्याची आजीसमोर कटकट होऊं लागलेली पाहून अखेर भान न राहून मी एकदम म्हणाल्यें, "हें पहा, गुंडोपंत, तुमची ही रोजची कटकट ऐकून आमचे कान किटून गेले. आजीनं आतांपावेतों दम धरला, पण मी आतां तुमच्या तोंडावर सांगते तुम्हीं इथून चालते व्हा आणि पुन्हां असली कटकट करायची असेल तर परत पाय ठेऊं नका इथं. तुम्हीं तर टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठीं त्राटेल ती वकीवाईट गोष्ट करायला तयार असलेले नीच; पण त्या एवढ्या थेरडयाला अक्कल नाहीं अशी मागणी करायला? उतारवयांत बाकीच्यांना अक्कल येते तर या थेरडयाची ती चुलींत जायला लागली. गांवचा श्रीमंत अन् सत्ताधारी झाला म्हणून स्मशानांत जायच्यावेळीं लग्नाची तयारी करायला त्याला शरम वाटत नाहीं? जा, असं मी सांगते म्हणून जाऊन त्याला सांगा जा."

माझ्या अंगांत त्यावेळीं इतका आवेश कुठून आला कोणास ठाऊक! आजी तर पुढच्या भीतीनेंच कीं काय मधून मधून 'पोरी उगी राहा' म्हणून मला दटावीत होती. पण मी तिकडे दुर्लक्ष्य केलें आणि मनाला वाटेल तें बोलून घेतलें. गुंडोपंत मात्र माझ्या त्या स्पष्टवक्तेपणामुळें इतका संतापून गेला! त्यानें आपलें उपरणें सांवरून नेटं घेतलें आणि नाकिरीचा डबी कनवटीला लावीत रागानें बेफाम होऊन बाहेर पडला. त्यावेळीं बोलायचें हें तें मी बोलून घेतल्यामुळें माझ्या मनाला बराच मोकळेपणा वाटूं लागला. पण त्यामुळें घडलेल्या प्रकाराबद्दल किंचित् विचार करण्याइतकें स्वास्थ्य मिळाल्यामुळें हा ज्वालामुखी पर्वत कसा आणि कधीं पेट घेईल हा भयदायक प्रश्न डोळ्यापुढें उभा राहिला. भ्र्याशेटजीसारखा कसाई आमचें अबलत्व आणि निराधारत्व पाहून सुद्धां आमचा अमानुष छळ करील हें माझ्या बऱ्याच उशिरां लक्ष्यांत आलें. मी त्यावेळीं किती किती तरी रडले. पण——

शरत—

गांवांतल्या प्रमुखांत वरिष्ठ म्हणून माझे बाबा गणले जातात आणि मी त्यांचा मुलगा म्हणून कारणपरत्वें मला गांवांत मान मिळतो हें मला ठाऊक होतें. असल्या खोट्या मानाला भाळून मीहि बाबांसारखें वर्तन करूं लागलों तर गांव जरी परोक्ष

नाहीं तरी अपरोक्ष तरी निंद्यलच; पण माझें मलाच काय वाटेल हा मी नेहमीं माझ्या मनालाच प्रश्न विचारी. गांवांतले लोक बाबांना मान देतात तो राजीखुशीनें कीं बळजबरीनें ते मला सहज दिसून येत होतें. मी कॉलेजांतील उच्च शिक्षण घेत असतांना सुद्धां बाबांच्या कसाबकरणीला विरोध न करणें म्हणजे त्यांच्या निष्ठूरपणाला उत्तेजन देणाऱ्या गुंडोपंतांसारख्या तोंडपुजाइतकाच गुन्हेगार आणि पातकी ठरणें असें मला वाटे. माझ्या मनाच्या टोंचणीमुळें मी जरी स्वतःशींच बाबांची प्रत्येक निंद्य मसलत हाणून पाडण्याचा बेत करी. तरी पण प्रत्यक्ष त्यांच्या तोंडावर तितक्या धीटपणानें मला बोलतां येत नव्हतें. पण मोहनेच्या व तिच्या आजीच्या बाबतींत अंधपणानें त्यांनीं केलेला अन्याय मुळींच क्षम्य अगर माझ्या मनाचा नेभळटपणा कायम ठेवण्याइतका नाहीं असें मला एकसारखें वाटत होतें. मोहना आणि तिची अबल आजी झोंपडींत असतांसुद्धां गवताच्या गंजी टाकून त्याला आग लावणें ही कमालीच्या कठोरपणाची आगळीक आहे हें एखादें लहान पोरसुद्धां कबूल करील. मी त्यावेळीं तेथें गेलों अन् त्या दोघानां तेथून आगींतून बाहेर काढलें म्हणून ठीक. नाहीं तर त्या दोघांची तेथें जळून राख झाली असती, तरी कोणी मनांत असूनसुद्धां बाबांच्या भयास्तव पुढें सरला नसता. मोहना ! मोहना किती सुंदर आहे ! तिच्या सारखें फुल जळून जाण्याचा विचार मन इतकं थरारून सोडतो ! मी जाणून बुजून बाबांचा राग अंगावर घेतला आहे आणि त्याबद्दल बाबांचा राग सहन–

"शरत !"

माझ्या मनांत इतका विचार डोकावतो न डोकावतो इतक्यांत बाबांचीच हांक माझ्या कानावर पडली. मी धीम्या पावलांनीं त्यांच्या रुढें मूग गिळून न बसतां निर्भय मनानें सडेतोड उत्तरें द्यायचो असें ठरवून त्यांच्या खोलींत गेलों.

"शरत ! तूं माझा केवढा गुन्हा केला आहेस तुला ठाऊक आहे ?"

' गुन्हा ? कुठचा ?" मी निर्दोष चेहरा करून विचारलें.

"कुठचा म्हणून विचारतोस ? मोहनेला आणि आजीला झोंपडींतून काढून तूं कुठं ठेवलं आहेस ? तुला तिथं जायला कुणी सांगितलं होतं ?"

"मी त्या वाटेनं माझ्यां दोघां तिघां मित्रांबरोबर सहज फेरफटक्याला जातांना झोंपडीला आग लागलेली दिसली, म्हणून तिथं गेलों तों हीं दोघं आंत.मी आणि माझे मित्र मिळून त्या दोघानां आगींतून बाहेर काढलं अन् इथंच एका चांगल्याशा निवाऱ्याच्या ठिकाणीं ठेवलं आहे." आपल्या प्रतिपक्षाबद्दल मी–त्यांच्या मुलानें इतकी झोड सोसून

त्यांचो बरदास्त ठेवणें ही बातमी म्हणजे त्यांच्या मूळ रागाच्या आगींत तेल ओतून भडकवण्यासारखीच होती. पण मा तसें बोलण्यास मुळींच कचरलों नाहीं.

" शरत ! तुला अगदीं स्पष्ट स्पष्ट सांगतो. मीच माझं वैर साधण्यासाठीं —त्या मस्तवाल पोरटीचो रग जिरवण्यासाठीं तिच्या मोडक्या तोडक्या रहात्या घराला आग लावली होती. ती पोर माझ्या ताब्यांत आली पाहिजे. शरत, ध्यानांत धर; उद्यां संध्याकाळच्या आंत ती पोर या घरांत आली पाहिजे. यापेक्षांहि स्पष्ट सांगायचं म्हणजे ती या घरांतली—या कुटुंबांतली एक झाली पाहिजे. तिला घेऊन आल्याशिवाय पुन्हां या घराची पायरी चढूं नकोस. चल, नीघ. "

बाबांच्या म्हणण्यांत काय अर्थ ध्वनित होत होता तें मला कळत होतें. मोहनेला कुटुंबांतील एक करायची म्हणजे कशी ? बाबांपेक्षां मीच जर मोह—

माहना—

'खाण तशी माती' ही म्हण कांहीं अगदीं खरी मानतां येणार नाहीं. कदाचित् अपवादानेंच ती सत्य मानली जात असेल. भैय्याशेटजीच्या पोटीं शरतसारख्या रत्नाचो निरज व्हावी हें उदाहरण त्या म्हणीला अपवादात्मक नाहीं का ? सभोंवताली त्या जळत्या गवताच्या गंजो पाहून आणि आगीनें जळून पडणारा घराचा एक एक भाग पाहून मी तर जिवाची आशाच सोडली होती. एकदां मला वाटे कीं आजीहि माझ्याबरोबर जळून मरावी; म्हणजे माझ्या विरक्तपणाचें तिला दुःखहि करायला नको आणि या कठोर जगाच्या जांचण्याहि सहन करायला नकोत. पण मरणाचा—आणि त्यांतल्या त्यांत जळून मरणाचा विचारच मनाचा इतका थरकांप करतो ! जगाच्या त्रास चुकवण्यासाठीं तिचा माझ्याबरोबरच मोक्षमोक्ष व्हावा असें जरी मला वाटे तरी तिला जळतांना पाहून मला काय वाटलें असतें कोण जाणें ! त्यावेळीं देवासारख्या धाऊन आलेल्या शरतबद्दल मला काय वाटलें तें माझें मलाच आतां आठवेनासें झालें आहे. तमासगीरासारखे इतके लोक सभोंवती जमा होते; पण एकानें सुद्धां पुढें येण्याइतका उदारपणा दाखविला नाहीं.म्हणूनच आगीच्या ज्वाळांचो पर्वा न करतां मला आणि आजीला पाठुंगळी मारून आमचें मरण टाळणारे शरत मला देवासारखे वाटूं लागले आहेत. शरत ! शरत ! कोळशाच्या खाणींत हिरा सांपडतो हें कांहीं खोटें नाहीं. भैय्यासाहेबासारख्या कसाबाच्या पोटीं तुमच्यासारखें उदार रत्न निर्माण झालें म्हणूनच तुमच्याबद्दल मला उपकारकाबद्दल वाटणाऱ्या आदरापेक्षां जास्त आदर वाटतो आहे. माझा आणि आजीचा जीव वांचवून मला शरतनीं उपकृत केलें

म्हणून मला आदर वाटत होताच; पण कांहींच ऋणानुबंध नसतांना भैय्याशेटजीची फिकिर न करतां माझ्यासाठीं त्यानीं इतके कष्ट सोसले म्हणून मला त्यांच्यावरून जीव ओवाळून टाकावासा वाटे. रात्रीं तर माझ्या मनांत सरकन् एक विचार चमकून गेला कीं शरत मा—

संध्याकाळीं सहा, साडेसहाचा सुमार होता. भैय्याशेटजी आपल्या बैठकीवर बसले होते. त्यांच्या अवीट अंगाचा बराचसा भाग ऐटबाज पोषाखानें झांकल्यामुळें त्यांची बरीचशी लाज राखली होती. कडक कॉलरमुळें त्यांना मान होती कीं नव्हती हें त्रयस्थाला कळणेंच शक्य नव्हतें. त्यांच्याजवळ दहा, पंधरा कदमावर उभे राहिलें तरी सेंटचा घमघमाट नाकांत भरत होता. त्यांनीं आपल्या शरीरांतले वैगुण्य झांकण्याचा प्रत्येक शक्य प्रयत्न केला होता. आणि त्याला कारणहि तसेंच दांडगें होतें. शरत येण्याची वेळ पाव घटकेवर आली होती. शरत आज्ञाधारक आहे हें भैय्याशेटजी पूर्ण ओळखून होते; आणि म्हणूनच तो इतक्यांत मोहनेसह परत येईल असा त्यांचा खात्रीचा अंदाज होता. त्याचोच वाट पहात ते बसले होते.

इतक्यांत गुंडोपंत धापा टाकीत तेथें आले. त्यानां इतका दम लागला होता, कीं किती वेळ तरी त्यांच्या तोंडून शब्दच निघेना. त्यांची ही विलक्षण स्थिति पाहून भैय्याशेटजी त्याच्याकडे आ वासून पाहूं लागले.

"सरकार, असे स्तब्ध बसला काय ? अहो, उठा." बोलण्याइतक्या पूर्वस्थितीवर आल्यावर त्यानीं कसेबसे एवढे शब्द उच्चारले.

" अहो, उठा काय ? इतक्यांत शरत मोहनेला घेऊन येईल; अन् उठायला काय सांगतां ? "

" अहो, कसला शरत अन् कसली मोहना घेऊन बसलांत ? शरतनीं सारा घोंटाळा केला. "

"शरतनं ? कसला घोंटाळा ? वेड तर नाहीं लागलं तुम्हांला ? "

"अहो, वेड काय ? शरतनें तुमच्याऐवजीं स्वतःच मोहनेशीं लग्न लावलं."

"काय ? " आपल्या अवाढव्य शरिराबद्दल पूर्ण बेफिक्रीर राहून भैय्याशेटजी ताडकन उठून उभे राहिले.

" अन् माझ्या त्या विष्ण्यानं—तो माझा पुतण्या—त्यांचं लग्न लाऊन दिलं. हरामखोर ! " गुंडोपंतानीं आपलें वाक्य पुरें केलें.

इतक्यांत शरत, त्याच्यापाठून मोहना आणि विष्णुभट असे तिघेजण आंत आले.

"शरत !" भैय्याशेटजी आकाशगताळ एक करण्याच्या स्वरांत ओरडले.

"बाबा, तुम्हीं सांगितल्याप्रमाणं २४ तासांच्या आंत मोहनेला आणलं आहे. इतकंच नाहीं, तर तिला आमच्या कुटुंबांतील एक माणूस केलं आहे." शरत मिस्किलपणानें हंसत हंसत म्हणाला.

"शरत ! हरामखोर, आत्तांच्या आतां माझ्या घरां—" पुढें त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना. संतापानें ते बेशुद्ध होऊन धाडकन् खालीं पडले.

× × ×

मोहनेच्या झोंपडीला आग लावून तिला हस्तगत करण्याची भय्याशेटजींची युक्ति कसाबकरणीची होती कीं अाशेवर जीव टांगलेल्या बापाची फसवणुक करण्याची शरतची कृति कसाबकरणीची होती हें वाचकांनींच ठरवावें !

हस्तलिखित मासिकांसाठीं—

बाललेखकांना उत्तेजन देण्याचें 'अरुणाचें मुख्य' ध्येय असल्यामुळें प्रकाशनाभावीं कांहीं शाळांकडून चालविण्यांत येत असलेल्या हस्तलिखित मासिकांतील उत्कृष्ट लेख प्रकाशांत येत नाहींत. अशा मासिकांतील शिक्षकांनीं चांगले ठरवलेले लेख 'अरुणा'कडे पाठविल्यास त्यांस स्थळ देण्यांत येईल.

—संपादक.

मुलांची मौज

पोपटाची स्वामिनिष्ठा.

एका शहरांत एकदां एक मोठा भूकंप झाला. शहरांतील सर्व इमारती जमिन हादरल्यामुळें खालीं कोसळून इमारतींतील बरींच माणसेंही त्या दगडा-मातीच्या ढिगाखालीं चेंगरलीं. शहरांत सगळीकडे मोडक्या तोडक्या इमारती व त्याखालीं चेंगरलेल्या लोकांच्या आरोळ्या याशिवाय कांहींच दिसत व ऐकूं येत नव्हतें.

इमारतींच्या ढिगाखालीं सांपडलेल्या माणसांची सुटका करण्यासाठीं सैन्यांतले शिपाई खोरीं कुदळीं घेऊन एकसारखे खण खण खणीत होते. खणतां खणतां त्यांना त्या मातीच्या ढिगांतून कोणीतरी कर्कश आवाजानें ओरडत असल्याचें ऐकूं आलें. त्यांनीं आवाजाच्या बाजूनें खणून पाहिलें, तों त्यांना एक पोपट आपल्या पिंजऱ्यांत अडकलेला असून अर्धमेल्या स्थितींत आहे असें आढळून आलें. त्यांनीं त्याला वर काढला व त्याची पिंजऱ्यांतून सुटका केली. पण उडून जाण्याऐवजीं तो त्या ढिगावर जाऊन बसला व पूर्वीप्रमाणें ओरडूं लागला. असें दोन तीनदां झालें म्हणून ते शिपाई तो ढिग खणूं लागले. थोडेंसें खणल्यावर एक मुलगी बेशुद्ध असलेली त्यांना आढळून आली. त्यांनीं तिला वर काढून शुद्धीवर आणलें. तो पोपट त्या मुलीचा असल्यामुळें त्यानें तिला अशा तऱ्हेनें मदत केली.

" दिवाळीची सुट्टी कशी घालविली ! "

(गेल्या अंकांतील ' बक्षिसाचा विषय. ' प्रस्तुत लेखकास " सुखाचा मूलमंत्र." ही व्यायामविषयक कादंबरी बक्षिसादाखल देण्यांत आली.)

लेखकः- **वि. श्री. मेहेंदळे.**

दिवाळी येण्यापूर्वी ती केव्हां येते म्हणून आम्हां सर्वांना उत्सुकता लागली होती. शाळेला सुट्टी मिळाल्यापासून आम्हीं एक एक दिवस मोजत होतों. सुट्टी पडण्यापूर्वी आम्हांला मास्तरांनीं फटाके वाजवल्यापासून

होणारे तोटे सांगितले असल्यामुळें व आम्हांलाहि ते पटल्यामुळें आम्हीं दोघां तिघां मित्रांनीं फटाके न वाजवण्याचें एकमेकांशीं कबूल केलें होतें. पण दिवाळी जशी दोन दिवसांवर आली आणि आमच्या गल्लींत व इतर ठिकाणीं फटाक्याचा आवाज माझ्या कानीं पडूं लागला तेव्हां मला अगदीं रहावेना आणि शेवटीं मी बाबांच्या पाठीं लागून फटाक्या आणवल्याच. माझ्याबरोबर फटाक्या न वाजवण्याची शपथ घेतलेल्या दोघां मित्रांचीहि माझ्याप्रमाणेंच स्थिति झाली.

दिवाळी जेव्हां दुसऱ्या दिवशीं ठेपली तेव्हां रात्रीं मला आनंदाच्या गुदगुल्या होत होत्या. 'उद्यां दिवाळी,' हे शब्द मला आपल्याशींच मोठ-मोठ्यानें बोलावे असें वाटूं लागलें. अखेर एकदां तो दिवस उजाडला. दिवस उजाडला कसला ? पहाटे तीन, सव्वा तीनपासूनच फटाक्याची गडबड सुरूं झाली आणि मी झोंपेंतून त्या आवाजानें एकदम जागा होऊन उठलों. त्या दिवशीं मी पोटभर फटाक्या वाजवल्या. फराळ तयार होतांना माझ्या त्याच्यावर पूर्वीपासूनच केवढ्या तरी उड्या पडत. पण सकाळीं फराळसुद्धां मी कसा तरी आटोपून घेऊन फटाक्या वाजवण्यांत रमलों.आतां जरी मला फटाक्यांत विनाकारण पैसे खर्च झाले असें वाटतें आहे, तरी त्यावेळीं असला विचारच मनांत आला नव्हता.

दिवाळीचे दोन, तीन दिवस मौजेंत गेले, तरी अजून ९ दिवस शिल्लक होते. तेव्हां मी आणि तिघां चौघां मित्रांनीं वसईचा किल्ला पाहाण्यास जाण्याचें ठरवून एका डब्यांत खूबसा फराळ घेतला आणि बाबांच्या परवा-नगीनें पहांटेच्या गाडीनें आम्हीं वसईला निघून आलों. आम्हीं पुस्तकांत वसईच्या किल्ल्याबद्दल जी माहिती वाचली होती त्यामुळेंच आम्हीं तो किल्ला पाहण्यास गेलों होतों. पण त्या ठिकाणीं किल्ल्याच्या नुसत्या भिंती आणि पुरुषभर उंचीचें गवत वाढलेलें पाहून आमची बरीच निराशा झाली.

दिवाळीचे राहिलेले दिवसही आम्हीं सर्वांनीं मौजेंत काढले. भाऊबिजे-दिवशीं मी ताईला (माझ्या वडील बहिणीला) तीन रुपये ओंवाळणी घातली आणि तिनें मला चांदीचे वटन दिले. मिळून दोहोंकडून कसे गेले बाबांचेच !

दिवाळी येण्यापूर्वी 'असें करावयाचें, तसें करावयाचें' असा मी बेत करीत बसला होता. पण ती संपून शाळेंत जाण्याचा दिवस येऊन ठेपला तेव्हा मी दिवाळींत माझ्या मनासारखें काय काय केलें तेंच मला कळेना.

पुढील अंकासाठीं बक्षिसाचा विषय

कुठल्याहि चांगल्या विषयावर दोन पानांचा एक सुंदर गोष्ट पाठवावी. गोष्ट लहान मुलांसाठीं पाहिजे असल्यामुळें भाषा सरळ व साधी असावी. नेहमींच्या अटीप्रमाणें वर्गणीदाराचें वय १२ वर्षांपर्यंत असावें.

गेल्या अंकांतील कोडयाचें उत्तर

सुरत–७–३–२३

प्रिय रमाकांत,

तुझें पत्र पोंचलें. मजकूर समजला. माझा काल वाढदिवस होता. तूं इकडे असतास तर बरें झालें असतें. काल आम्हीं फार मौज केली. तुझी फार फार आठवण झाली. आमची आणखी एका आठवडयानें परीक्षा आहे. मग मी तुझ्याकडे येईन. आपण खूब मौज––

उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नावें:–

द. कृ. नेरुरकर (सोलापूर), वि. शं. दळवी (मुंबई), र. श्री नाईक (रत्नागिरी), वैजाप्पा च. तिगडी (कडोली), शां. क. टांककर (वेंगुर्ले), जे. एफ्. डिसोजा (सा. वार्डा) कु. सीताबाई ना. मांद्रेकर (रत्नागिरी). एन. पी. मोरे. (हिंगणघाट). बाकी बऱ्याच जणांचीं उत्तरें अर्धवट बरोबर आहेत म्हणून नांवें छापलीं नाहींत.

नवें कोडें.

१	२	३	×	४.
×	५	×	६	७
८	९	१०	×	×
११	×	१२	१३	१४
×	१५	१६	×	×

आंकडयांच्या ठिकाणीं अक्षर घालून शब्द बनवा. मात्र त्याला कांहीं अर्थ पाहिजे. उभे अगर आडवे पाहिले असतां दोघांचाही अर्थ होईल अशा अक्षरांचाच उपयोग करावा. फुल्या काढलेल्या आहेत त्या ठिकाणीं जागा रिकामीच सोडावी. उत्तरें १४ वर्षाच्या आंतील वर्गणीदारांनीं पाठवावीं.

आगगाडी

आपल्या देशांत आगगाडी सुरू होऊन शंभर वर्षें झालीं. आगगाडी पहिल्या प्रथम ज्यावेळीं सुरू करण्यांत आली त्यावेळीं गैरसमजामुळें व आगगाडींतून प्रवास केला असतां आपलां धर्म बुडतो वगैरे खोटया कल्पनांनीं पुष्कळ लोकांनीं तिचा घ्यावा तसा फायदा घेतला नाहीं. शिवाय कुठचीही गोष्ट ज्याप्रमाणें सुरवातीला पूर्णावस्थेला पोंचलेली नसते त्याप्रमाणें पहिल्या प्रथम ज्या आगगाडया आपल्या प्रांतांतून सुरू झाल्या त्यांच्या कारभारांत बराचसा गोंधळ व अव्यवस्था असल्यामुळें लोकांचा हा गैरसमज कांहीं दिवस तसाच राहिला. पण पुढें पुढें आगगाडीच्या कारभारांतील गोंधळ व चुका नाहींशा होत गेल्या व लोकांनाही आगगाडीपासून होणारे फायदे व तिच्यामुळें किती जलदीनें व थोडया खर्चांत प्रवास होतो तें कळून चुकलें व नंतर नंतर त्यांच्या मनांतल्या गैरसमजाच्या कल्पना नाहींशा होऊन आगगाडींतून प्रवास करण्यांत त्यांना कांहींच वाटेनासें झालें. इतकेंच नव्हें तर उलट मौज वाटूं लागली. आगगाडी कशी असते तें 'अरुणा'च्या बालवाचकांपैकीं पुष्कळांनीं पाहिलें असेल. पुष्कळांनीं तींतून थोडा फार प्रवास केला असेल, कित्येकांनीं ती नुसती रूळां-


वरून धांवत जातांना पाहिली असेल व ज्या कोणी तींतून प्रवास केला नसल किंवा ती पाहिलीहीं नसेल त्यांना निदान चित्रावरून तरी तिची कल्पना होत असेल. त्याप्रमाणेंच पाण्याचा वाफ करून त्या वाफेच्या जोरानें आगगाडी चालवितां यते हेंही बहुतेक सर्वांस कळलें असेल. आगगाडीमध्यें कशीं यंत्रें असतात, त्यांच एकमेकांशीं काय संबंध असतात, तीं कशीं चालतात वगैरे गोष्टींची आमच्या बालवाचकांना माहिती करून देण्याऐवजीं आगगाडीबद्दल कांहीं मनोरंजक माहिती सांगितलेलीच त्यांना अधिक आवडेल असें वाटतें.

हिंदुस्थानांतील आगगाडयांचा सर्वांत जास्ती वेग म्हणजे दर तासास ५५ ते ६० मैलपर्यंत आहे. 'लोकल'—म्हणजे नेहमीं एका ठराविक ठिकाणाहून दुसऱ्या ठराविक ठिकाणापर्यंत मधलीं स्टेशनें करीत व उतारुंची नेआण करीत राहणाऱ्या ज्या आगगाडया असतात त्यांचा वेग दर तासास २५ ते ३० मैलांपेक्षां जास्ती नसतो. आगगाडया रुळांवरून धांवत जात असतां वळणा वळणाच्या रुळांवरून त्या वाटेल तशा वळतात म्हणून त्यांचा ड्रायव्हर त्यांना आपल्या जवळच्या यंत्राच्या सहाय्यानें वळवितो असें पुष्कळांना वाटत असेल. पण ती त्यांची समजूत चुकीची आहे. ड्रायव्हरजवळ अशा तऱ्हेचें आगगाडया वळविण्याचें यंत्र नसतें. ड्रायव्हरचें काम म्हणजे आगगाडी चालू करणें आणि हवेच्या दाबाचा ब्रेक लावून ती थांबविणें हें होय. सायकलींना ब्रेक असतो तो पुष्कळांनीं पाहिला असेल. तो हातांनीं वर ओढला म्हणजे त्याच्या चाकाजवळच्या रबरी पट्टया चाकावर बसतात व चाकाला अडथळा होतो. आगगाडयांचा ब्रेक असा नसतो. आगगाडीच्या चाकांवर हवेचा दाब टाकला म्हणजे हा ब्रेक लागू पडतो व चाकें हळू हळू थांबतात. पण अगदीं पूर्ण वेगांत असलेली गाडी ब्रेक लावल्यापासून सुमारें पाव मैलाच्या आंत थांबवितां येते. ब्रेक लावला असतां एकदम गाडी थांबणें शक्य नसतें. आणि असे ब्रेक एकदम जोरानें लावले तर ब्रेक व चाकें एकमेकांवर जोरानें घांसली जाऊन त्यामुळें गाडयांना पुष्कळ वेळां आगही लागते.

आतां गाडी सुरूं झाल्यापासून ती थांबेपर्यंत वाटेंतलीं जीं वळणें असतात त्यांवरून गाडयांचीं चाकें आपोआप रुळांच्या वळणांप्रमाणें वळत जातात. एका लाइनीवरून दुसऱ्या लाइनीवर गाडी नेण्याचें काम सांधेवाल्याचें असतें व रूळ फिरवून तो हें काम करतो.

आगगाडया चालविण्यासाठीं वाफेची जरूरी आहे हें वर सांगितलेंच आहे. आगगाडयांना वाफ करण्यासाठीं पाण्याची जरूरी असते व प्रत्येक इंजिनबरोबर हें पाण्यांचें टांकें असतें. या टाक्यांत जास्तींत जास्ती ४००० गॅलन पाणी ठेवतां येतें. आगगाडी एक मैल जावयाला यांतील सुमारें ३६ गॅलन पाण्याची वाफ लागते. म्हणजे एक गॅलन पाण्याची जी वाफ होते तिच्या शक्तीनें आगगाडी ५० यार्ड जाऊं शकते. याप्रमाणेंच कोळशाचेंही आहे. साधारण मध्यम तऱ्हेच्या गाडीच्या इंजिनाला एका तासाला सुमारें १ टन कोळसा लागतो. एका ठिकाणीं पाणी व कोळसा भरून घेऊन मध्यें कोठेंही न थांबतां मध्यम वेगानें जर एखाद्या आगगाडीला जावयाचें असेल तर ती सुमारें १०० मैल प्रवास करीपर्यंत हा पाण्याचा व कोळशाचा साठा तिला पुरेल. नंतर मात्र तिला पाणी व कोळसा घेण्यासाठीं एखाद्या ठिकाणीं थांबावें लागेल.

आपण ज्या आगगाडया नेहमीं पाहतों त्यांची पुढचीं इंजिनें विलायतेंतून किंवा इतर दुसऱ्या देशांतून आणण्यांत येतात. हिंदुस्थानांत अजून कुठेंचही इंजिनें तयार होत नाहींत. या इंजिनाला प्रत्येकीं सुमारें ८ ते १० हजार पौंड म्हणजे दीड लाख रुपये पडतात. केवढी ही जबरदस्त किंमत ! या इंजिनांचे वजन ३०० पासून ४०० टन असतें. परंतु आगबोटींतूनही एवढया प्रचंड वजनांची इंजिनें आणतां येतात.



"आई ही हितकर्ती कीं वैरीण ?"

(सौ. जनाबाई ऐनापुरे.)

मातेचीं कर्तव्यें मूल असलेल्या आयांना मीं सांगितलीं पाहिजेत असें नाहीं. दुसऱ्यानीं सांगण्यापेक्षां त्यांनां स्वतःच्या मुलांसाठीं काय काय केलें पाहिजे तें जास्त कळत असतें. पण मी माझ्या दोन, तीन मैत्रिणींची आपल्या मुलांबद्दलची आस्था पाहून त्यांच्या या मायेला प्रेम हें नांव द्यावें कीं वैर हें नांव द्यावें हेंच कळेना. आईला आपल्या मुलांबद्दल वैर कसें वाटेल असें म्हणून माझ्या वाचकभगिनी मला दोषही द्यायला कमी करणार नाहींत. पण मी सांगतें त्यांत कांहीं तथ्य आहे कीं नाहीं तें त्यानींच ठरवावें.

आपण एखादे वेळीं पहातों कीं, आईला फक्त एकच मूल असतें आणि ती त्याला जीवापाड जपत असते. त्याचें बालवय आहे हें जाणून त्याला आनंद वाटेल अशी प्रत्येक गोष्ट करावयाला ती त्याला मुभा देते. कांहींशा सरळ अर्थानें सांगायचें म्हणजे त्याचा प्रत्येक शब्द आई झेलते. त्यामुळें त्या मुलाचा स्वभाव त्याला नकळत हट्टी बनत जातो. कालांतरानें त्याला आपला कुठचाहि शब्द खालीं पडतां कामा नये असंच वाटत जाते. आणि तसा एखादा प्रसंग आला तर तो आकाश पातळ एक करून तो आपला हट्ट तडीस नेईल. अशा वळणाच्या मुलांबद्दल मोठेपणीं सुस्वभावी होण्याची अपेक्षा कुठल्या आधारावर करावी ? स्वतः आईनेंच त्याचा प्रत्येक हट्ट पुरवण्याचा त्याला संवय लावली म्हणजे मग त्यानें तरी एखादी मनाविरुद्ध गोष्ट घडली असतां ;स्तब्ध कां राहावें ? त्याला आईनें लहानपणापासून जसें वळण लावलें असेल तसा त्याचा स्वभाव बनत जाणार. झाडाची वल कोवळेंपणांतच वळवावी तशा वळत जाते. अशा स्थितींत लहानपणापासून त्याला वाईट वळण लाऊन त्याच्या सबंध जन्माचें थोडें फार नुकसान करणारी आई त्याची वैरीण ठरत नाहीं काय ? बालवयांत कौतुकासाठीं त्याचा

हट्ट पुरवतांना भविष्यकाळाबद्दल थोडा तरी विचार प्रत्येक आईनें करावयाला नको काय? तें मुल का कायमचें लहानच रहाणार आहे? त्याचें पुढचें आयुष्य सुखांत जावें म्हणून बालपणींच त्याला कांहींसें दाबांत ठेवणें श्रेयस्कर आणि खऱ्या कळकळीचें लक्षण आहे. पुढच्या सुखाच्या गोड आशेसाठीं लहान वयांत त्याच्याशीं कांहींसें कठोरपणानें वागून त्याला चांगली शिस्त लावली तरच मातेचें आपल्या मुलावर खरें-खुरें प्रेम आहे असें होईल. लहान वयांत मुलांना स्वच्छंदानें हवें तसें वागूं द्यावें असा आपणाला मोह होतो खरा. पण भविष्यकाळ डोळ्यापुढें ठेऊन त्यांच्याशीं मनाविरुद्ध कांहींसें कठोरपणाचें वर्तन ठेवावें लागतें. शेतकरी सुद्धां पुढच्या गोड फळासाठीं प्रथम रात्रंदिवस राबत असतो. अशा रीतीनें वागलें असतां आईवर निष्ठूरपणाचा आरोप न येतां उलट खरें आईचें कर्तव्य काय तें फक्त तिलाच कळलें आहे असें समजावें. आपल्या मुलाचें अनहित कुठली आई इच्छिल? मग अशा वेळीं बालवयांत मुलाचें कोडकौतुक पुरविणारी आई मुलाच्या खऱ्या कळकळीची होईल कीं पुढच्या आशेनें जाणूनबुजून लहान वयांत मुलाशीं निष्ठूरपणानें वागणारी आई मुलाच्या खऱ्या कळकळीची होईल तें प्रत्येक मातेनें आपल्या मनाशींच ठरवावें.

असें जरी आहे तरी मातेनें मुलाशीं वागतांना मर्यादेबाहर कठोरपणानें वागूं नयें. अशानें सोन्याची अंडी घालणाऱ्या कोंबडीला ठार मारून तिच्या पोटीं असलेल्या अंड्यांची आशा करणाऱ्या मूर्ख स्त्रीसारखें होईल. मुलांचे पुढचें आयुष्य जास्त सुखांत जावें म्हणून बालपणीं त्यांच्याशीं जास्त निष्ठुरपणानें वागणें उपहासास्पद ठरेल. कारण बालपणीं मुलांचें मन फार कोवळें असतें. त्यावर संस्कार करावे तसे त थोडे फार पुढें कायम रहातात. कठोरपणानें त्यांच्या कोवळ्या भावना दुखावल्या तर त्याचा कदाचित् जन्मभरही मागमूस न जातां त्यांचें आयुष्य निष्प्रेम व दुःखी बनेल. त्यानां कांहीं बाबतींत मोकळेपणाहि बराच दिला पाहिजे.

मला प्रत्यक्ष उदाहरणं पाहून जें काय वाटलें तें मी सांगितलें आहे. मुलांच्या लाडांतच गुंतलेल्या मातांनीं यापुढें तरी काळजी घ्यावी अशी माझी कळकळीची विनंति आहे.

आदर्श

(विषयवैचित्र्यासाठीं आम्हीं निरनिराळीं सदरें ठेविलीं असलीं तरी या अंकापासून हें नवीन सदर काढण्यांत येत आहे. यांत दर अंकांत मनुष्य-स्वभाव-निदर्शक असा एक लघु-गोष्ट देण्यांत येईल. या अंकांत दिलली खालील 'मालिनी' ही गोष्ट म्हणण्यापेक्षां दृश्यकाव्य म्हणणेंच विशेष शोभेल. सर्वसाधारण वाचकांना या दृश्यकाव्यांत कांहींच दिसलें नाहीं तरी भावनाप्रवण कोमल मनानां यानें ओशरता चटका लागणें संभवनीय आहे. या 'आदर्शांत' मनुष्य-स्वभाव प्रतिबिंबित झालेला दिसेल. आमचा हा नवीन सुधारणा वाचकांना आवडेल अशी आशा आहे—**संपादक**)

मालिनी

(ले. कुसुमचंद्र)

रविवारचा दिवस. मला सुटी होती. नेहमींच्या रिवाजाप्रमाणें मी माझ्या मित्रांना भेटावयास व आठवडयाच्या चार इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्यास जात असे. आठ दिवसांनी मी माझ्या मित्रमंडळींत मोकळया मनानें मजेंत वेळ घालवीत असतांना मला एक प्रकारचा अननुभुत आनंद वाटत असे. विशेषतः माझ्या मित्राचीं चिमकुलीं गोंडस भावंडें, मुलें, व त्यांची निर्विकार कोमल मुखकमलें पाहून सबंध आठवडयांत एखादे वेळेस वाटणारा कामाचा मानसिक व शारिरिक शीण कुठच्या कुठें नाहींसा होत असे. त्या चिमुकल्या हास्यवदनी बालकांच्या निरनिराळ्या विचित्र, कधीं कधीं अवर्णनीय अशा लीला पाहून मन अगदीं त्या बालमनांत तद्रूप होऊन जात असतें. आजहि मी माझ्या एका मित्राकडे गेलों होतों. भाऊसाहेब—माझा मित्र टाइप-रायटींगचे काम करीत बसला होता. मी येतांच तो म्हणाला,

"काय रे, आलास ? आज तुझा रविवार. किती ठिकाणीं चहाच पेले झोंकून आलास ? "

मी फक्त हंसल्यासारखें केलें. इतक्यांत एक इझिचेअर होती. आमची स्वारी टेबलावरचा 'संडे क्रॉनिकल' घेऊन वाचीत राहिली. भाऊचें टायपरायटींगचें काम जोरांत चालूं होतेंच.

" काय रे ! गप्प कां बसलास ? कांहींतरी बोल." काम करतां करतां भाऊ म्हणाला.

" तूं काम करतो आहेस आणि मी मात्र रिकामटेकडयासारखा गप्पा मारून तुझ्या कामांत व्यत्यय आणूं होय ? उलट तूं तुझं काम लवकर आटोपून माझ्याशीं मोकळेपणानें बोलायला चटकन मोकळा होशील. "

" वेडा आहेस झालं. " असें हंसून उत्तर देऊन भाऊ कामाला लागला. त्याच्या तोंडावरून तो कसल्या तरी बिकट परिस्थितीस, दुःखास अगदीं कसून तोंड देत आहेसें वाटत होतें. मी पुन्हां क्रॉनिकल वाचूं लागलों. माझे पाय जमिनीवर आंथरलेल्या सतरंजीवर होते. मी माझ्या डोळ्यापुढें क्रॉनिकल घेऊन वाचीत असल्यामुळें पुढें किंवा पायाजवळ कोण आहे हें कळण्यास मार्ग नव्हता. थोडा वेळ असाच गेला. माझ्या पायाला कुणा तरी लहान मुलाचा विळखा पडलेला दिसला. त्या नाजुक हाताचा स्पर्श माझ्या पायांना होतांच मी वर्तमानपत्र टेबलावर फेंकून दिलें व खालीं पाहू लागलों; तों भाऊचा तीन चार वर्षांची माळी ! मालिनी सतरंजीवर स्वस्थ एखाद्या गंभीर, पोक्त, विचारी माणसासारखी बघत बघत माझ्या पायांना विळखा घालून खालच्या मानेनं गप्प राहिली होती. सदा हंसतमुख दिसणारा मालीचा चहरा आजच पहिल्याप्रथम इतका उदास, दुःखी, गंभीर असा मी पाहिला. एका अज्ञ बालिकेच्या चेहऱ्यावर इतकी चमत्कारिक गंभीरता पाहून मला एक प्रकारचें कौतुक वाटलें. तिला दुसरें तिसरें कांहींहि न विचारतां एखाद्याची तिच्या त्या कौतुकास्पद चेहऱ्यावर सारी भूकतहान विसरून दृष्टी खिळून राहिल्यास नवल नव्हतें ! भाऊचें काम चालूच होतें. त्याला मालीच्या ह्या स्थितीचें कारण विचारावें कीं ती आजारोबिजारी आहे कीं काय ? असाहि प्रश्न विचारण्याचें माझ्या मनांत आलें. पण मी गप्प राहिलों. मालीच्या चेहऱ्यानें माझ्या चित्ताला इतकी एकाग्रता कां आणली ?

"माले, तूं अशी मलूल कां ? " मी चटकन् तिला उचलून वर घेण्यासाठीं प्रश्न केला. माली माझ्या मांडीवर बसण्यास राजी नव्हती. तिनें माझ्या पायाला बळकट विळखा घातला. कां तें कुणास ठाऊक ! यावेळीं मालीचा चेहरा विशेष चमत्कारिक व दुःखी दिसला. त्या अजाण बालिकेच्या चेहऱ्यावरचे तें अकाल गांभीर्य पाहून मला बरेंच आश्चर्य वाटलें.

" भाऊ, मालीला काय झालं ? ती अशी मलूल कां ? "

" तिची धाकटी बहीण कालच तिला सोडून गेली म्हणून ! "

मी चमकलों. भाऊची बायको गरोदर होती; तिला मुलगी झाली व तीनच दिवसांनीं ती देवाघरीं निघून गेली होती. मी सबंध अठवड्यांत भाऊकडें आलों नाहीं. मला मालीच्या नवीन बहिणीच्या जन्ममरणाची बातमी आजच अगदीं नवीन होती. मी स्तंभीत झालों. मला मालीच्या बालमनाची कल्पना करवेना ! चिमुकली माली तीनचार दिवसाच्या बहिणीच्या सहवासाचा कायमचा विरह होतांच इतकी कष्टी, हताश, दुर्मुखलेली होईल ही कल्पनाही माझ्या मनाला पटण्यासारखी नव्हती. पण मालीच्या विलक्षण बुद्धिमत्तेची तारीफ करावी तितकी थोडीच होती.

शेवटीं मालीला मी बळेंच उचलून वर घेतलें. ती माझ्या मांडीवर बसली खरी. पण तिला वर माझ्या तोंडाकडे पाहावेसें वाटेना. तिचा चेहरा मी हातानें वर केला. तिच्या डोळ्यांत अश्रुबिंदू चमकत होते. माझ्याही डोळ्यांत नकळत पाणी आलें. मालीच्या सुकुमार गालावरून वेगानें धांवणारे अश्रूसर पहात मी स्थिर मनानें बराच वेळ राहिलों. माली कांहीं वेळानें खेळायला म्हणून गेली. पण ती खेळत नव्हती. उजव्या हाताचें चिमकुलें बोट तिच्या मुखांत होतें आणि डाव्या हातांत कसलेसें खेळणें होतें. ती बाहेरच्या दरवाजांत सचिंत उभी होती. कुणीसा तिला प्रश्न केला, " माले, नवीन बाळ कुठें गेलें ?"

" देवाच्या घरीं." मालीचें दुःखीत स्वरांत उत्तर ऐकूं आलें.

पोंच व अभिप्राय.

"शांताबाई"(जिवनस्मृति) पुस्तक पोहोंचलें. स्थलाभावीं अभिप्राय पुढें देण्यांत येईल.

वैनतेय (सं. मे. द. शिरोडकर, सावंतवाडी. वा. व. रु. ३-१३-०)

दुसऱ्या वर्षाचा १ ला अंक खास अंक म्हणून निघाला आहे. कांहींसे विषयहि खास अंकास शोभण्यासारखे आहेत. श्री. य. न. केळकर यांचा ' टिका आणि टीकाकार ' हा विनोदी लेख उत्कृष्ट असून श्री. वि. स. खांडेकर यांची 'मातृहत्या' गोष्टहि चटकदार आहे. वैनतेयास २ रें वर्षहि सुखाचें जावो असें आम्हीं इच्छितों.

खुनी श्रीमंति– (ले.––'सीता-कांत.' प्र. वि. वि. लेले, मधुकर ऑफिस, मुंबई ४.) ' अरुणमाले'च्या वाचकांना सुपरिचित असलेल्या श्री 'सीता-कांत' यांच्या चटकदार लेखणींतून ही छोटी कादंबरी उतरली आहे. श्री. 'सीताकांतां'च्या लेखणींत आकर्षकपणा विशेष असल्यामुळें कादंबरी मनोरम झाली आहे. निदान तरुण विद्यार्थ्यानीं तरी ती अवश्य वाचण्यासारखी आहे.

श्रीगणेशापासून.....

(लेखांक ३ रा)

ले. श्री. विनोदलाल

गतानुगतिक

नवरसांपैकीं इतर सर्वांपेक्षां अद्भुत रस.ची छाप बालमनावर अधिक पडत असल्यामुळें या अद्भुत रसपरिपोषक गोष्टींमध्यें बाललेखक पुष्कळ दिवस गुंगून जातो. परंतु ही त्याची गुंगीही आस्ते आस्ते उतरत जाते, आणि एका फुलावरून दुसऱ्या फुलावर उडत जाणाऱ्या फुलपांखरासारख्या चंचल स्वभावामुळें त्याची दृष्टी दुसऱ्या विषयाकडे वळते. यासाठीं अखिल जगांतील पाप, अनाचार, आणि इतर घाणेरड्या गोष्टी उजेडांत आणून समाजकार्याला मदत करण्यासाठीं बाललेखक त्यांच्यावर प्रथमच घसरलेला असतो. पण अशा गोष्टींनीं समाजाची फक्त काळीकुट्ट बाजूच रंगविली जात असल्यामुळें एखाद्या भावनाप्रधान मनुष्याच्या अंतःकरणाला त्यामुळें धक्का बसणें सहाजिकच आहे, अशी आपली समजूत करून घेऊन तो आनंदपर्यवसायी कथांकडे वळतो. मराठी लघुकथा अशी संज्ञा असणाऱ्या कथांमध्यें शेंकडा नव्वदांवर प्रेमकथांचाच भरणा असल्यामुळें अशा तऱ्हेच्या आनंदपर्यवसायी किंवा त्याच्या मताप्रमाणें समाजाची चांगली बाजू दाखविणाऱ्या कथांमध्यें प्रेमकथांनाच अग्रपूजेचा मान मिळतो. समाज, रूढीबंधनें या चमत्कारिक शब्दांचा उच्चार याच वेळीं त्यांच्या तोंडून वारंवार होत असतो आणि या सर्वांवर मोहीम करून युग पालटण्यासाठीं जन्मास आलेल्या समाज-धुरीणांच्या मालिकेंत जाऊन बसावें ही इच्छाही याच वेळीं त्याच्या पूर्वापेक्षां जरा मोठ्या झालेल्या मनांत थैमान घालूं लागलेली असते.

प्रेमकथांमध्यें विवाहित जोडपें तो कधींही दाखविणार नाहीं. या कथा सज-विण्याचा त्याचा मालमसाला ठरीव वस्तूंचा व ठरीव पद्धतीनें तयार केलेला असतो. अशा कथांचा लेखक मुंबईचा नसला तरी मुंबईमध्यें हँगिंग गार्डन म्हणून तरुण-तरुं-

णींची भेट करून देऊन पुढें त्या भेट चे रुपांतर त्यांच्या लग्नांत करणारा एक मध्यस्थ" प्राणी असतो याचा त्याला चांगली जाणीव असते. अशा कथांचे नायक-नायिका हीं दोघेही हटकून एका कॉलजांतली असावयाचा असतात. दोघांवरही ब्रम्हदेवानें सुंदर स्वरूपाची पूर्ण खैरात केलेली असते. दोघांचेहां आईबाप कोणीतरी अत्यंत श्रीमंत व सुशिक्षित रावसाहेब किंवा रावबहादुर असणें फार जरूर असते आणि अशा स्थितींत त्यांचे पसारांवर प्रेम बसणें ओघानेंच प्राप्त झालेलें असतें. आतां संकटाशिवाय प्रेमांत मजा येत नाहीं, या नियमचा अपमान करून पूर्वपरंपरेवर लाथ मारण्याइतकें धैर्य लेखकाच्या अंगी नसल्यामुळें तो या रावसाहेब किंवा रावबहादुर यांमध्यें जुन्या वैराची एक ठिणगी फुंकून टाकतो आणि प्रेम उष्ण(warm love) कसें असतें याचा अनुभवें आपण निर्मिलेल्या जोडप्यास आणून देतों.

प्रेम या शब्दाची व्याख्या बाललेखकानें यावेळीं अशी केलेली असते:—मनोहर चंद्रिकेकडे पाहूं लागला कीं चंद्रिका लाजते आणि चद्रिका 'आपली व्हावी' अशी मनोहरची इच्छा असते. ह्मणजे मनोहर आणि चंद्रिकेमध्यें एक नवीन भाव उत्पन्न झालेला असतो. " या नाम प्रेम. " उभय रावबहादुरांचा स्वभाव हट्टी पडल्यामुळें मनोहर-चंद्रिका यांना कोणाच्याही बागेंत परस्परांच्या भेटी घ्यावयास मिळत नाहींत आणि पुस्तकांची अदलाबदल करतांना पत्रद्वारें होणाऱ्या प्रेमविनियमामुळें कुठें तरी पळून जावयाचें तर त्यांचें अगदीं ठरून गेलेलें असतें. पण या जोडप्याला पळून जावयास मदत केल्यास आपण स्वतः फौजदारी कायद्याच्या कचाट्यांत सांपडून चावडीवर जाऊं किंवा पळून गेल्यावर शर्टचा सोन्याचीं बटणें, हातांतील रिस्टवॉच आणि हातांतील व गळ्यांतील दागिने उभय नायक-नायिकेला विकण्याचा प्रसंग येऊन तोंडाला लावण्यासाठीं पावडरचा एक डबा घ्यावयास त्यांच्याजवळ पैसे रहाणार नाहींत असें वाटून लेखक हें निकरावर आलेलें प्रकरण मोठ्या खुबीनें मिटवून टाकतो. चंद्रिकेला अपघात होतांना मनोहर तिला वांचवतो आणि तें दृश्य पाहून तेथेंच हजर असलेल्या रावबहादुरांच्या मनांतील सर्व किल्मीष जाऊन ते मनोहरचा हात चंद्रिकेचा हातांत देतात. नायकाच्या बापाच्या मनांतील वैमनस्याचा अग्नि विझविण्यास सबळ कारण न दिसल्यामुळें तो त्या अपघातांत प्रथमच सांपडून ठार झालेला असतो.

प्रेमकथांच्या विविध बाजूंपैकीं ही एक बाजू या ठिकाणीं खलास होऊन गेल्यावर दुसऱ्या स्वार्थत्यागाच्या प्रेमकथा सुरू होतात. या कथांतील नायक किंवा नायिका यांच्यापैकीं एक कोणी तरी संख्येनें अधिक असतें. दोन नायकांना प्रेम करण्यास

एक सरोजिनी किंवा दोघां नायिकांना आपलें प्रेमसर्वस्व पायीं वहाण्याला एखादा प्रभाकर अशा कथांत वांटून दिलेला असतो. आतां या लॉटरीमध्यें दोघांचेंही नशीब उघडविणें लेखकाला शक्य होत नाहीं; ह्मणून किंवा बहुपत्नित्व व बहुपतित्व ह्या चाली त्याला अनार्य वाटतात ह्मणून या संख्येंतील विषम नाहींसा करून उरलेल्यांची तोंडमिळवणी करून देण्यास त्याला यापैकीं एकाच्या मनांत एकाएकीं उपरति उत्पन्न करून द्यावी लागते. "त्याच्या (किंवा तिच्या) डोळ्यावरचा भ्रम नाहींसा होऊन त्याला (किंवा तिला) एक प्रकारची विलक्षण भावना मनांत यावयास लागली होती. आपण पूर्वीपासून कांहीं तरी चुकी करीत आलों असून ती चुकी सुधारण्याचा मार्ग आपणास आतां मिळाला असें त्याला (किंवा तिला) वाटूं लागलें आणि ईश्वर त्या दोघांना सुखी ठेवो, आपण त्यांच्या मार्गांत अडथळा करणें इष्ट नाहीं" अशा तऱ्हेची मनस्थिती करून देऊन पुरुष असल्यास लेखक त्याच्या गळ्यांत समाजकार्याचें लोढणें अडकवून टाकतो आणि त्याच्याकडून आजन्म ब्रह्मचारी रहाण्याचें आश्वासन घेतो. उलटपक्षीं भग्नहृदय झालेल्या लीलेसाठीं आजन्म कुमारिका रहाण्याच्या अटीवर त्यानें एक शाळा उघडलेली असते. असो. आतां ही लीलेची शाळा चालविण्यास नव्हे तर मुलींकडून फी न घेतां उलट त्यांच्या शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठीं त्यांना बक्षिसें देऊन ती चालविण्यास अगर कफनी घातलेल्या विश्वनाथाला या गांवाहून त्या गावीं लेक्चरें देण्यासाठीं जाण्यास आगगाडीच्या तिकिटापुरते पैसे त्यांच्याजवळ असावे लागतात ह्या गोष्टी लेखकाच्या डोक्यांतून निसटल्या नसतात. आणि बिचारी विश्वनाथाची आई एकटी असल्यामुळें तिला लोकांची दळणीकांडणीं करून पोट भरावें लागतें ह्याही गोष्टी तो उघड्या डोळ्यांनीं बघत असतो. पण अशा प्रकारांना तो तरी काय करणार ? एकदां ठरला नियम तो ठरला. त्याच्याआड त्याला तरी कसें जातां येईल ? हा नियम मोडून तो विश्वनाथाला इंपिरियल बँकेंत पन्नास रुपयांची नोकरीही लावून देण्यास तयार होणार नाहीं अगर लिलेची माळ दुसऱ्या कोणाच्या तरी गळ्यांत घालून तिच्यामागें पोराबाळांचे लेंढार लाऊन देण्याचेंही पाप करण्यास तो कबूल होणार नाहीं. संकटें आलीं आणि कसलीही परिस्थिती प्राप्त झाली तरी भग्नहृदय झालेल्या तरुणानें देशकार्याला आपणाला वाहून घेतलेंच पाहिजे आणि भग्नहृदय नायिकेनें किमानपक्षीं एक तरी गरीबासाठीं शाळा अगर सूतिकागृह चालविलें पाहिजे. हे नियम ब्रह्मदेवाच्यानेंही मोडवणार नाहींत, मग साध्यासिध्या लेखकाचा काय पाड !

प्रेमकथाचें यापुढील तिसरें एक प्रमुख अंग असतें आणि त्याला ठोकळ मानानें पिस्तुलांच्या प्रेमकथा हें नांव प्राप्त झालेलें असतें. अशा तऱ्हेच्या कथांना सामाजिक

किंवा ऐतिहासिक यापैकीं कसलाहीं वेष केवळ नांवें बदलल्यानें देतां येतो. शस्त्रें वापरण्यास मिळालेलं परवानगी ही गोष्ट कदाचित या तऱ्हेच्या कथांना उत्पादक स्थानीं असते. ऐतिहासिक व सामाजिक यांच्यामध्यें अंतर ठेवण्यास या शस्त्रांचा परवाना कारणीभूत होत असतो आणि तो परवाना दूर झाला कीं अशा तऱ्हेच्या सामाजिक किंवा ऐतिहासिक प्रेमकथांत कांहींच भेद उरत नाहीं. अर्ध ऐतिहासिक किंवा अर्ध सामाजिक या सदरांत घालण्याच्या या कथा असतात. या कथांमधील "घनःश्यामानें सुशिलेला पळवून नेल्यावर तिला एका वाड्याच्या आंत बंदोबस्तानें ठेवलें होतें. आपल्यावर भलतासलता प्रसंग ओढवला तर हातांतील हिरकणी खाऊन प्राणत्याग करण्याचा तिनें निश्चय केला होता. संध्याकाळीं घनःश्यामानें आंत येऊन 'माझ्यावर प्रेम करायला तूं कबूल आहेस काय?' असा प्रश्न विचारतांच सुशिलेनें त्याला नकारच दिला. तेव्हां चवताळून घनश्याम पुढें जाणार तोंच खोलीवर एक जोराचा धक्का बसला आणि दाराच्या चिंधड्या होऊन वसंत एकदम आंत आला. त्याला पाहतांच घनःश्याम शरमून गेला."

या वाक्यांना केवळ नांवाचा बदल करून पुढीलप्रमाणें ऐतिहासक स्वरूप देतां येईल.

"खानानें ताऱ्याला पळवून नेल्यावर तिला आपल्या किल्यांतील वाड्याच्या तळघरांत बंदोबस्तानें ठेवलें होतें. आपल्यावर भलतासलता प्रसंग ओढवला तर लपवून ठेवलेला जंबिया खुपसून प्राणत्याग करण्याचा तिनें निश्चय केला होता. संध्याकाळीं खान आंत आल्यावर त्यानें 'काय अजूनही तुझा विचार पालटला नाहीं ना?' असा प्रश्न ताऱ्याला करतांच तिनें आपला नकारच दिला. तेव्हां चवताळून खान पुढें जाणार तोंच "हर हर महादेव" हे शब्द त्याच्या कानीं पडले आणि रक्तानें न्हालेला मुरारराव दार फोडून आंत आला. त्याला पाहतांच खानाची पांचावर धारण बसली." येणेप्रमाणें सामाजिकाच्या ऐतिहासिक किंवा ऐतिहासिकाच्या सामाजिक बनविण्याजोग्या कथांचा दर्जा प्रेमकथांमध्यें बराच वर असतो.

या भानगडींतून अर्धवट मोकळा झाल्यावर ऐतिहासिक बाजूकडे त्याचें मन धावूं लागतें. ऐतिहासिक कथा म्हटल्या म्हणजे एक लांब टोपी घालणारा आणि लांब नाक असलेला शिवाजी त्याच्या दृष्टीसमोर येतो. त्याचे ते मावळे, ते मराठे, ते किल्लेदार, ते मोंगल, ते विजापुरकर, ते तानाजी, बाजी, येसाजी, ती मिरा, ती तारा, तीं जंगलें,, त्या घोडदौडी वगैरे गोष्टी डोळ्यांसमोर उभ्या रहातात. मोंगलाला

साह्य करणारा वृद्ध व मानी किल्लेदार शवटीं शिवाजीला मिळतो हेंच या कथांतून लेखकाला सांगावयाचें असतें आणि त्यासाठीं तो किल्लेदाराच्या मुलीवर संकट आणून तिला एखाद्या खानाच्या हवालीं करतो व शवटीं शिवाजीच्या एका सरदाराकडून तिला सोडवून त्याचें तिच्याबरोबर लग्न करून देऊन आपल्या जबाबदारींतून मोकळा होतो आणि म्हाताऱ्या किल्लेदाराला आपसुख सर्व किला या एका गोष्टीमुळेंच शिवाजीला देण्यास भाग पाडतो. वास्तविक यावेळीं कथांच्या नियमाप्रमाणें शिवाजीचें किल्लेदाराच्या मुलीशींच लग्न व्हावयास पाहिजे; पण हा नियम इतर कांहीं शिष्टांकडून मोडला गेला असल्यामुळें व ऐतिहासिक कथांमधील फक्त शिवाजीच्याच चरित्राची संपूर्णपणें माहिती सर्वांस असल्यामुळें त्याच्यावर आपली प्रतिभा लादणें लेखकास जड जातें. इतर व्यक्तींमध्यें वाटतील तेवढीं प्रेम-रहस्यें उत्पन्न करून तीं त्यांना निस्तारायला लावण्यांत ऐतिहासिक कथांचा लेखक कधींही कसूर करीत नाहीं. अशा वेळीं शिवाजीचें काम म्हणजे नायकानें नायिकेला खानाच्या तावडींतून सोडविलें असतां टलिफोन केल्याप्रमाणें रायगडाहून अचूक त्या ठिकाणीं येऊन त्यांचे हात एकमेकांच्या हातांत देणें आणि "नांदा सौख्यभरें" असा आशिर्वाद देणें हें होय. या जोडप्यांचें पोट केवळ प्रेमानें भरतां येणें शक्य नाहीं असें वाटून लेखक केव्हां केव्हां शिवाजीकडून त्यांना एखादी जहागीर किंवा बहुतांशीं सदर जिंकलेल्या किल्लयाची किल्लेदारीच देऊन टाकतो.

एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाणाऱ्या सुरवंटाप्रमाणें ग्रंथपर्यंत लेखकाला बऱ्याच अवस्थांतून जावें लागतें. आणि त्याचा त्याच्या मनोरचनेवरही बराच परिणाम होत गेलेला असतो. पहिल्याप्रथम जगांत दर पावलागणिक कांटेच कांटे लागत आहेत ("छापून" येण्याचा कंटकमय मार्ग लागत असल्यामुळें नव्हे) असें समजून संसाराला विटून वैराग्य प्राप्त झालेल्या संन्याशाच्या मनःस्थितींतील बाललेखकाचें रूपांतर या पुढील अवस्थेंत आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारीक गोष्टींमधील खलिफामध्यें किंवा हवेंत किल्ले उठविणाऱ्या शोख महंमदामध्यें होतें. जगाच्या पापी सहवासामुळें क्षतविक्षत झालेल्या त्याच्या अंतःकरणाच्या जखमेला हें अद्भुत-रसाचें गुंगा आणणारें औषध मिळाल्यामुळेंच त्याला पुढील अवस्थांतर करण्यास सोपें जातें. सर्व जग हें प्रेममय आहे, जगांतील प्रत्येक ठाकठीक पोषाख करणारा तरुण आपल्या प्रेमपात्राची भेट घेण्यासाठीं बागेंत जात आहे, आपल्या 'पोटापाण्याचा प्रश्न' कोणालाच नसून सर्व जगभर प्रेमालापाच्या ध्वनींचाच प्रतिध्वनि निघत आहे वगैरे वगैरे त्याच्या कल्पना सुरू असतात. कवितेची उपासना करतां करतां कोलांटी उडी

खाल्ल्यामुळें सांडून गेलेल्या त्याच्या कमंडलूंतील काव्यरसाचे उरले सुरले थेंब या वेळीं तो जगावर टाकत असतो. आपल्या कथांतील नायकांप्रमाणे आपण स्वतःही कोणावर तरी प्रेम करूं लागावें अशी कल्पना मनांत येऊन त्याचें अंतःकरण धडधडूं लागतें आणि कोणावर तरी प्रेम हें करावयाचेंच हा निश्चय ठरल्यानंतर तो आपल्या प्रेमविषयाला पात्र होण्यासाठीं कोण 'माणूस' निर्माण करावें याचा विचार करीत राहतो. लहानपणीं आपण ज्यांच्यामध्यें वागलों त्या त्या सर्व 'माणसां'ची तो एक यादी तयार करतो आणि त्या यादींतील माणसांपैकीं कोणीही माणूस आसपास दिसण्यासारखें नसलें तर प्रेमकथांच्या पोटनियमांप्रमाणें अनोळखी शेजाऱ्याच्या घरावर आगली आशाळभूत दृष्टी फेंकावयालाही त्याची तयारी असते. अशा तऱ्हेच्या खटपटींत असतांना तोंडओळखीऐवजीं तोंड रंगवून घेण्याचेही प्रसंग त्याच्यावर आल्याशिवाय रहात नाहींत. पण संकटांशिवाय प्रेमाला मजा नाहीं हें सत्य त्रिकालाबाधित आहे.

घडयाळ दिवसांतील आणि चाळिशी आयुष्यांतील गतकाल दाखविते. वायकांच्या दागिन्यांचा व्यंगें लपविण्यांत जसा उपयोग होतो, तसा पुरुषांच्या या दागिन्यांचा होत नसून उलट व्यंगें उघडीं पाडण्यांत मात्र होतो—**मतिविकार**

अशा विषम जोडण्यांत प्रेम उत्पन्न तरी कसें व्हावें ? प्रेम असतें तेथें वैषम्य असलें तरी तें नाहींसें होतें; परंतु वैषम्य असलें म्हणजे आधीं असलेलें प्रेमहि विलय पावूं लागतें !

—मतिविकार (श्री. श्री. कृ कोल्हटकर)

मी आज प्रथमच एखादी गोष्ट केली कीं तिला लहर म्हणतीस, उद्यां तीच केली म्हणजे संवय म्हणतील, ती अनेकांनी केली म्हणजे नवीन मार्ग म्हणतील आणि तीच अनेक पिढ्यांनीं केली म्हणजे झाली रूढि या नांवास पात्र !—मतिविकार.

नाट्यकला

नाट्यकलेची आवड असणें

ही गैरवाजवी गोष्ट आहे कीं काय या प्रश्नाचें समर्पक उत्तर देतांना त्यांत दुमत होणें शक्य आहे. जुनाट कल्पना आणि आचार-विचार रोमरोमांत खिळून गेलेल्या पुराणपुरुषांनां नाटकांत जाणें, नाटक पाहणें, किंवहुना नाट्यकलेची आवड असणें हा एक अक्षम्य गुन्हा वाटेल. उलटपक्षीं पुरुषपणाचें अस्तित्व दर्शवणाऱ्या मिशांना 'हद्दपारीचा' शिक्षा ठोठावून स्त्रैण व्यक्त करूं पहाणाऱ्या रसिक तरुणानां नाट्यकलेंत स्वर्गानंद वाटतो. पुर्वोक्त पुराणपुरुष अति सोंवळेपणा-मुळें दोषीत ठरतात तर उत्तरोक्त तरुण रसिकांचो नाट्यकलेबद्दल अत्यावड दोषार्ह ठरते. नाट्यकलेचें कला या दृष्टीनें चित्रकलेइतकें अगर संगीतकलेइतकेंच महत्व आहे. ती अस्पर्श्य मानणारे जुन्या मताचे पुरस्कर्ते जितके निंद्य ठरले जातील तितकाच तरुण मंडळीचा अति उदे उदेपणा तिरस्करणीय व कलेचा विचका उडवणारा होईल. कुठल्याहि गोष्टीबद्दल अवास्तव स्तुति केली कीं त्याचें महत्व वाढावयाचें राहून उलट खुंटतें मात्र ! तीच स्थिति बव्हंशी नाट्यकलेची झाली आहे. कुठल्याहि दुसऱ्या कलेइतकेंच तिचें महत्व आहे. देशांतल्या इतर विद्यमान कला जितक्या देशोत्कर्षक असतात तितकीच नाट्यकलेनेंहि त्यांत थोडीशी भर पडूं शकते. कुठल्याहि देशाचें महत्व अस्तित्वांत असलेल्या आणि शिखराला पोंचलेल्या कलांवर अवलंबून असतें ही गोष्ट सत्य मानली तर नाट्यकलेकडे तिरस्काराचा कटाक्ष फेंकणें केव्हांहि न्याय्य ठरणार नाहीं.

नाटकांत जाणें, नाटक पाहण, आंणि नाट्यकलेची आवड असणें यांपैकीं पहिल्याबद्दल एकमताचा निर्णय नसला तरी पुढल्या दोन गोष्टीबद्दल सर्वसाधारण जनसमाजांत फारसें दुमत होणार नाहीं. पहिल्या प्रकाराबद्दल कांहींजणांकडून आक्षेप घेतले जातात यांचें कारण तसेंच महत्वाचें आहे. चित्रकलेचें शिक्षण घेण्यासाठीं शाळेंत जाणें गैर मानलें जात नसून उत्तेजनार्ह होतें; मग नाट्यकलेच्या आवडीमुळें नाटक मंडळींत जाणें निंद्य कां गणलें जाते ? दोन्ही कला आपापल्या परीनें सारख्याच श्रेष्ठ आहेत. असें असतांना पहिल्याबद्दल आस्था आणि दुसऱ्याबद्दल अनास्था वाटण्याचें कारण काय ? कलेच्या दृष्टीनें नाट्यकलाहि चित्रकलेइतकीच सभ्य आहे. पण तिचे अविकृत स्वरूप होऊन आजकाल ती उपेक्षणीय ठरण्यास जास्त जबाबदार नटांनाच धरावें लागेल. नाट्यकलेची आवड म्हणून त्या कलेचें शिक्षण घेण्यास सरसावल्यावर मुळांतल्या शुद्ध हेतूची उचलबांगडी करून कलेला धंद्याचें हिणकस स्वरूप देऊन पोटा-

पाण्याचे दुबळें साधन म्हणून तिकडे पहाणें अगदीं गैरवाजवी आणि कमालीच्या टाकाऊपणाचें निदर्शक आहे. कलेकडे इतक्या दरिद्री कटाक्षानें पहाणें स्वतःच्या आणि पर्यायानें सबंध देशाच्या कंगालपणाचें आणि अहिताचें लक्षण आहे. देशाचें दारिद्र्य कलेला इतकें कंगाल ठरविण्यांतच समावते असें म्हटलें तर तें सत्याला सोडून आहे असें कोण म्हणेल ? इतर कला इतक्या महत्वाच्या ठरत असतांना नाट्यकला तेवढीच महत्वशून्य कां ठरावी ?

कलेला प्रोत्साहन मिळविण्यासाठीं प्रथम लोकांवर त्याचें शुद्धत्व आणि महत्व ठसवावें लागतें; आणि त्यासाठीं त्या कार्याचे पुढारी स्वतःच तितके कार्यक्षम असावें लागतात. नाहींतर ऐन इंग्लिश सूटींत व्यासपीठावरून खादी-चरख्याच्या बेमर्याद गप्पा झोंकणाऱ्या वक्त्याच्या भाषणाइतकीच नाट्यकलेची महती वर्णणाऱ्या बेहिमती नेत्यांचा कंटाळी बफायदा आणि विघातक होईल. नाट्यकलेच्या नेत्यांच्या बडबडीपूर्वी कदाचित् कोणाचें त्याबद्दल चांगलें मत असेल तर तें त्यांच्या या कृतिशून्य वर्तनानें बदलण्याचा संभव मात्र जास्त.

नाट्यकलेची आवड क्षम्य व उत्तेजनहि नसून इतर कलांपेक्षां तिला टाकाऊ हिणकसपणाचें रूप देणाऱ्या कांहीं जुन्या परंपरेच्या अभिमान्यांचा हा रूढ समज कांहींसा अज्ञानमूलक धरला तरी त्याच्या पोटीं वरेंचसें सत्य आहे हें विचारांतीं कबूल करणें भाग आहे. नटांना 'नाटकी' या व्याजोक्तीनें संबोधण्यांत मुळाशीं त्यांच्या अंगीं जडलल अवगुण दर्शविण्याचा त्यांचा उद्देश असतो. एखादा विचारवंत मनुष्य नाटककंपनींत शिरणें हें सुद्धां त्याच्या अक्कलमंदतेचें अवलक्षण समजलें जातें. त्याच्या मूळाशीं त्याचें नाट्यकलाप्रेम असलें तरी कुठल्याहि सबबीवर त्यांच्या रूढ समजुतींत माघार घेण्यास त्यांचा तयारी नसते. याच कारण त्यांचा अट्टाहास नसून जुन्या परंपरेच्या अंधानुकरणानें आणि प्रत्यक्ष पाहिलेल्या अगर अप्रत्यक्ष ऐकिवांत आलेल्या गोष्टींवरून असा ग्रह त्यांच्या हृदयांत मूळ धरून बसलला असतो.याबाबत त्यांच्या दुराग्रहाचा तिरस्कार करण्यापेक्षां त्यांचा असा ग्रह होण्यास कारणीभूत झालेल्या दुर्गुणाबद्दल विचार करणेंच विशष शहाणपणाचें दिसेल. नाटक पहाणें ही त्याच्या अपकर्षाची पहिली पायरी, त्याचो नाट्यकलेबद्दलची वाढती आवड ही त्याच्या ऱ्हासाची दुसरी पायर आणि अखेर नाटककंपनींत शिरणें हा त्याच्या दुर्गुणाचा कडेलोट. वृष्टीपूर्वीच्या काळ्या कुट्ट मघर शाप्रमाणें नाटक पहाण्याची पहिली खेप ही त्याच्या भावी अज्ञात अपकर्षाची सूचक ठरते. नाटक कंपनींत जाणें म्हणजे ज्ञात नसलेल्या अवगुणांची ओळख करून घेण्याच्या संपर्कानें स्वतःच्या नैतिक बलाचा ऱ्हास करून तिरस्करणीय बनणें या त्या या प्रचलित समजुतींत कितीसा भाग भ्रममूलक व

असत्य मानतां येईल ? दिवंगत नटांची गोष्ट अलाहिदा ठेवली तरी विद्यमान नटांत मनावर मालकी गाजवून अवगुणांचा अपसंसर्ग न आणणारे सभ्य व रंगदेवतेची शुद्ध स्वरुपांत सेवा करणारे निर्व्यसनी नट कितीसे आढळांत येतील ? नाटयकलेवरील निर्व्याज प्रेमानें रंगदेवतेचे पायिक बनून आपलें आयुष्य खर्ची घालणारे नट, नक्की प्रमाणांत सांगतां आले नाहींत, तरी त्यांची या महाराष्ट्रांत चर चर्शा वाण पडेल. पोटाची टिचभर खळगी भरण्यासाठीं इतर कोणतेंहि साधन उपलब्ध नसल्यामुळें अखेर नाटककंपनींत जाणें हें त्यानीं नाटयकलेला दिलेलें हिणकस स्वरुप त्यांच्या कमकुवत मनाचें निदर्शक आणि कंगाल भारतभूमीचें दुर्दैवच नाहीं तर काय ? अल्पशिक्षणामुळें खर्डेघाशी सुद्धां त्यानां योग्यतेची वाटते आणि नाटयकला हें त्यांच्यासारख्या अपरिपक्व बुद्धिच्या अज्ञान माणसांच्या पोटाचें साधन वाटतें. खर्डेघाशांपेक्षांहि नाटयकला नीच ! नाटयकलेची इतकी कवडी किंमत होण्यास जबाबदार कोण? त्यांचा असा समज होण्यास कारण काय ?

नाटयकलेची आवड असणें हें केव्हांहि दोषार्ह ठरत नाहीं. मन ज्यावेळीं एखाद्या संत्रस्त परिस्थितींत सांपडते तेव्हां विचारानें मनाला आलेला शीण घालवून अस्वस्थ मन उल्हसित व्हावें म्हणून गाणें गुणगुणणें, वाचनाचा व्यासंग ठेवणें, चित्रकलेकडे झुकणें इत्यादि चित्तवेधक करमणुकींकडे जसा कल जातो त्याप्रमाणेंच नाटयकलेच्या मनोरम अभ्यासांत औदासिन्याचा विसर पाडण्याइतकी शक्ति आहे, हें निर्विवाद आहे. मनुष्य कितीहि वेदाभ्यासजड अगर अरसिक संन्यस्त वृत्तीचा असला तरी त्याच्या आयुष्यांत असा एखादा दारुण दुर्विलासाचा प्रसंग ओढवतो कीं त्यावेळीं त्याला त्याच्या नीरस आयुष्याचा कंटाळा वाटून नवजीवन-संचारार्थ (Recreation) कसल्या तरी चटकदार चित्तवेधक साधनाची त्याला आवश्यकता भासूं लागते. सर्वसाधारण जनसमुदायाला नाटकाची जितकी आवड असलेली दिसून येईल तितकी त्यानां इतर करमणुकींच्या साधनांची नाहीं. इतर कलांत ज्या स्वारस्याचा सामान्य मनःप्रवृत्तीच्या लोकसमुदायाला अभाव दिसतो त्याचें अस्तित्व नाटयकलेंत असल्यामुळें तिनेंच जास्त जनमनरंजन होऊं शकतें. आणि हेंच तिच्या विशेष लोकप्रियतेला कारण आहे. नाटयकलेबद्दल तिटकारा वाटणारे परंपराप्रिय सोंवळ पुरुष अल्पसंख्य आहत. पण त्याचें पूर्ण निर्मूलन करून नाटयकलेला इतर श्रेष्ठ गणल्या गेलेल्या कलांच्या ओळींत बसवून तिचें महत्व सप्रमाण सिद्ध करण्याकरितां नाटयकलाप्रेमी रसिकांनीं व विशेषतः नटांनी परिश्रम घेतले तर भविष्यकाळच्या इतिहासांत या नेत्यांना बराचसा अग्रेसरत्वाचा मान मिळण्यास प्रत्यवाय नाहीं.

तिला पत्र न लिहितां फक्त प्रभाकरालाच लिहावें तर त्याला माझें मन कबुल होईना. आणि तशांत तिनें मला पत्र पाठविण्याबद्दल मुद्दाम विनंती केली होती. तिला पत्र लिहिलें नाहीं तर तें तिच्या मनाला फार लागून राहिल आणि कदाचित् तिनें मी जाण्याच्या वेळीं काढलेल्या शंकेला अशानें तिचें मन बळकटी आणील अशी मला भिती वाटूं लागली. अशा स्थितींत काय करावें हेंच मला सुचेना.

त्यावेळीं जवळ जवळ तीन वाजले होते. घरापाठीमागें तयार केलेल्या बागेंत यावेळीं ऊन आहे कीं काय हें मी पाहून आलों. बागेंत फुलझाडेंच नसून कडेला आंब्या-फणसांचीहि मोठमोठीं झाडें असल्यामुळें बागेंत बरीच सांवली होती. आणि जेथें बांक ठेवलें होतें तेथें तर उनाचें किरण सुद्धां नव्हतें. मी परत खोलींत येऊन एक कार्ड, नोटपेपर, दौत, टांक, पाकीट आणि एक पॅड घेऊन गुपचुप पायाचा आवाज न करतां बाकाकडे येऊन ठेपलों. प्रभाकरला एक झरझर कार्ड खरडलें आणि तें ब्लॉटींग पेपरनें टिपून वाजूला ठवलें. शालिनीच्या बाबतींत काय करावें तें माझें अजून ठरेना. मी तिला पत्र लिहिलें तर बाकीच्या मंडळीला काय वाटेल हीच मला भिंती वाटत होती. अखेर मी मन घट्ट करून नोटपेपर पुढ्यांत घेतला आणि दौतींत टांक बुडवून विचार करूं लागलों. सुरवात कशा करावी इकडे पुन्हां आडकाठी आली. शालिनीला विशेषण कुठचें लावावयाचें ? शालिनीला 'शालिनी' या शब्दापूर्वी कांहींतरी लिहिलें पाहिजेच होतें.

मी एक कादंबरी वाचली होती. त्यांत थेट असाच एक प्रसंग लेखकानें घातला होता. त्या कादंबरींतल्या नायकालाहि नायिकेला लग्न होण्यापूर्वी पत्र पाठवायचें होतें. परंतु त्याला आशेला एक तरी जागा होती तें जोडें काव्यमय होतें. शिवाय त्यांचें लग्न जवळ जवळ ठरण्यांतच जमा होतें. तेव्हां अर्थात नायकाला तिच्या नांवापूर्वी × × हें विशेषण लावण्याचा अधिकार होता. निदान त्याचा या कृतीच्या तिरस्कार करणारें कोणीच नव्हतें.

पण माझी स्थिति तशी नव्हती. मी त्याच नमुन्याचें पत्र लिहिलें आणि अण्णानीं अगर प्रभाकरानें तें वाचण्यास मागितलें तर——तर——?

अशा संत्रस्त मनःस्थितींत मी बराच वेळ काढला. या धाडसाकडे धांव घेतली तर ती परिणामीं विघातक होईल कीं त्यांतून मी सफै सुटेन या द्वयींत मी बराच वेळ घुटमळल्यावर अखेर माझ्या प्रेमी मनानेंच आघाडी मारून मी माझ्या मनासंत असें एक पत्र लिहून टाकलें.

कृ. सा. न. वि. वि.　　मुंबई

आपलें पत्र पोहोंचलें. अण्णा, दादा, आई मला पत्रांत काय आहे म्हणून विचारूं लागलीं. पण मी काय सांगणार? फक्त 'पोहोंचल्याचेंच लिहिलें आहे' असें मी त्यांना सांगितलें. पण आमचा दादा कसला छट्! भोळा म्हणतों खरा, पण त्यावेळीं त्यानें मला इतकं भंडाऊन सोडलं आणि माझी अशी थट्टा केली! मी तर माझ्या खोलींत जाऊन दाराला कडी घालून आंत आपल्या पत्राच्या आवृत्त्यावर आवृत्त्या करीत बसलें. दादा माझ्याकडे वाचायला म्हणून पत्र मागूं लागला. पण मी बाई, देऊं कशी? अखेर तो गप्प बसला, तेव्हां कुठें माझी सुटका झाली.

आपणांला तिकडे करमत नाहीं म्हणतां, मग इकडे कधीं येणार? वसंत तर आतां सारा दिवस रडत असतो. त्याचं आपलं एकच पालुपद कीं 'नानाला आणा.' आतां आम्हीं नानाला आणणार कुठून? मग त्याची समजूत करतां करतां पुरे वाट होते.

दादा अलीकडे अभ्यासांत गढून असतो. त्याची परिक्षा अगदीं जवळ आली आहे. फार फार तर ५–६ महिने राहिले असतील. अण्णा, आई, आत्या वगैरे सर्व मंडळी खुशाल आहे. आपल्याकडची खुशाली कळविल्याशिवाय राहूं नये बरं!

आतां आणखीं काय लिहूं?

आपली,

शालिनी.

शालिनीचें अक्षर मोठें असल्यामुळें मला प्रथमदर्शनी तें पत्र लांबलचक दिसलें होतें. परंतु मला तें वाचायला दोन मिनिटेंसुद्धां लागलीं नाहींत. तिनें एवढें लहान पत्र लिहिलें म्हणून मी मनांतल्या मनांत तिच्यावर फार रागावलों. 'आतां आणखीं काय लिहूं?' म्हणून ती मला विचारते! लिहायला काय थोडें थोडकें होतें? आणखी ज्या कांहीं चार ओळी खरडल्या त्यांत सुद्धां रुक्ष गद्य. घरच्या मंडळीबद्दल लिहून पत्र भरून काढलें होतें. त्यांच्याबद्दल दोन ओळी लिहिल्या असत्या म्हणजे पुरे होतें.

मला तिचा भारी राग आला. मी तिला इतकें काव्यमय, प्रेमपूर्ण पत्र लिहिलें आणि तिनें असलें साधें व्यावहारिक पत्र लिहावें अं? मला तिच्या घरच्या मंडळींची भिती वाटत असूनसुद्धां मी जिवाचा धडा करून तिला सुंदर व प्रेममय पत्र लिहिलें होतें. तिला तसलें पत्र लिहायला कोणाची भिती वाटली? माझ्या नांवानें आलेलें पत्र कोणी फोडलें नसतें अगर त्यांतील मजकूर कळवण्याविषयीं कोणी माझ्यामागें कटकटहि लावली नसती, हें का तिला ठाऊक नाहीं? मला कशा तऱ्हेचीं पत्रें आवडतात हें तिला माझ्या स्वतःच्या पत्रावरून नाहीं का कळलें? मग असें असून तिनें असली साधी, रुक्ष भाषा कां वापरली? कां पत्र लिहिण्याची ही पहिलीच खेप म्हणून? संबंध

पत्रांत माझ्या नांवाचा उल्लेखसुद्धां नाहीं याची मला तर फारच चीड आली. तिला माझें नांव लिहिण्याची लाज का वाटली ? ती पत्र लिहित होती मलाच. मग तिनें मला तितकें तरी सुख कां लागूं दिलें नाहीं ? सुरुवातीचा आणि शेवटचा मायना अगदीं ओझरत्या ओळखीच्या माणसांनीं एकमेकाला लिहिल्यासारखा.

तिच्या सबंध पत्रांत 'पहिलेपणा' नव्हता. पहिल्या पत्रांत 'पहिलेपणाचें' कांहींच स्वारस्य नाहीं म्हणून मी अगदीं अस्वस्थ झालों. शालिनीच्या पहिल्या पत्राच्या मजकुराबद्दल जो मी ठोकळ मानानें अंदाज केला होता तो पूर्णपणें खोटा ठरला. माझ्या पत्राला उत्तर म्हणून तिचें माझ्याचसारखा सुरस लिखाणानें पत्र येईल अशी मी अटकळ केली होती. प्रणयी जोडप्यांतील नव्या नवाईची पहिलीं पत्रें मी इंग्रिश व कांहीं मराठी कादंबऱ्यांतून वाचलीं होतीं. पण शालिनीनें पाठविलेल्या पत्रानें माझी पूर्ण निराशा केली. मी डोक्यावर टोपी चढविली व कोट अंगांत चढवीत चढवीत खोलीबाहेर पडलों आणि विचारानें भडकलेलें डोकें शांत करण्यासाठीं नदीकिनाऱ्यावर जाऊन उदासवाण्या स्थितींत एका होडीआड बसलों.

प्रकरण ३ रें.

नवीन नातें.

त्या रात्रीं आठ, सव्वा आठच्या सुमारास मी नदीकिनाऱ्यावरून परतलों. वाळूतून येतां येतां एक तरुण नाखवा आणि त्याच्याबरोबर एक तरुण कोळयाची मुलगी एकमेकाच्या संगतींत मोकळेपणानें हंसत बोलत आपल्या झोपडीकडे परतत होती. मी त्यांच्या सुखाचा हेवा करूं लागलों; पण त्याच वेळीं मी त्यांच्या त्या रासवट प्रेमाला दिव्य हें नांव दिलें. तो तरुण नाखवा कॉलेजांत शिकला नव्हता अगर त्या दोघांपैकीं एकालाहि 'रोमान्स' म्हणजे काय हें ठाऊक नव्हतें. दोघांची ताटतूट झाली तर त्या दोघांपैकीं एकालाहि दुसऱ्याला काव्यमय पत्र लिहितां आलें नसतें. तरी पण त्यांचें प्रेम निर्भेळ, सात्विक होतें. तें जोडपें खेडवळ होतें तरी त्यांना दिव्य प्रेमाचा आस्वाद घेतां येत होता. मग मी इतका सुशिक्षित असतांना, बऱ्यावाईट गोष्टींची छाननी करण्याइतकी अक्कलहुशारी माझ्याकडे असतांना मीच अशा कष्टमय स्थितींत कां खितपत पडलों आहे ?

माझा दोष मला कळून आला. त्या तरुण नाखवानें त्या मुलीकडून कवितामय पत्राची कधींच अपेक्षा केली नसती. हा विचारच त्याच्या मनांत आला नसता. मी सुशिक्षित व कादंबऱ्या वाचून तरबेज झालों असल्यामुळें शालिनीकडून तसल्या पत्राची अपेक्षा केली होती; आणि ती जेव्हां खोटी ठरली तेव्हां माझें मन अस्वस्थ झालें. यापेक्षां त्या तरुण जोडप्याचें खेडवळ प्रेम किती सुखावह ?

मी जिना चढून तडक माडीवरील माझ्या खोलींत गेलों, आणि तेथें कपडे वगैरे काढून आतां कसल्याहि गोष्टीचा विचार म्हणून करावयाचा नाहीं असा निश्चय करून हातपाय धुण्यासाठीं खालीं आलों. जिना उतरून स्वयंपाकघरावरून पलीकडच्या ओटीवर जाणार इतक्यांत बाबांचें एक ओझरतें वाक्य माझ्या कानावर आलें आणि मी तेथेंच थबकून उभा राहिलों.

" त्यांत त्याची कसली परवानगी घ्यायची? तो लग्न करायला कां नाकबूल होणार? यमूंत कसला काडीचा तरी दोष आहे? "

" पण आमच्या नजरेला तिच्यांत दोष आढळला नाहीं म्हणून त्याच्या मनाला ती उतरेल कीं नाहीं हें कसं सांगतां यईल? " आई म्हणाली.

" म्हणजे तो आतां रस्त्यावरची एखादी पोर आणून म्हणूं लागला कीं मी हिच्याशीं लग्न करणार म्हणून, मग आम्हीं 'खुशाल कर' म्हणून त्याला आनंदानें परवानगी द्यायची वाटतं? हे नसते चाळे मी नाहीं चालूं देणार. लाथ मारून घरांतून हांकून टाकीन. त्याला देशमुखांच्या यमूशीं लग्न हें केलंच पाहिजे. " बाबा रागानें म्हणाले. त्यांच्या त्या बोलण्यांत आत्मनिर्धाराची किती तरी झांक मारत होती.

मला या दोन तीन वाक्यांवरून माझ्यावर ओढवणाऱ्या प्रसंगाचें धोरण बांधतां आलें. अण्णानीं उच्चारलेल्या वाक्याचा मला पडताळा आला. मला जी शंका आली होती तीच अखेर खरी ठरली. मी पाठल्या दारानेंच परत माडीवर माझ्या खोलींत गेलों आणि खुर्चीवर बसून शून्य मनानें डाव्या हातावर डोकें टेकून खिडकीच्या बाहेर पाहूं लागलों. शालिनीनें केलेल्या आघातावर हा आणखी दुसरा फटका बसला. पहिल्या आघातावर मलमपट्टी लावतां आली असती, पण दुसरा आघात बराच खोल होता. शालिनीनें केलेल्या अपराधची भरपाई करतां आली असती; पण बाबांच्या इच्छेबाहेर गेलों तर घर मुकावयाचें.

आतां शालिनीबद्दल विचार करतांना माझा माथेफिरूपणा कमी कमी होऊं लागला. पहिल्या उद्वेगांत माझ्या मनाचा तिच्याबद्दल जो निराळा ग्रह झाला होता तो आतां पार नाहींसा होत चालला. माझी मनस्थिति काव्यमय असतांना तिचें पत्र आलें; आणि म्हणूनच माझ्या दृष्टीला तें रुक्ष भासलें. बाबांच्या आज्ञेला मान तुकावून देशमुखांच्या यमूशीं लग्न करण्यासाठीं बोहल्यावर उभें रहावयाचें! असला जुलुमाचा रामराम माझ्यासारख्या स्वतंत्र बाण्याच्या तरुणानें करून पुढचें आयुष्य कंटाळवाण्या, विषम परिस्थितींत काढावयाचें? देशमुखांच्या यमूशीं माझी अजून नजरभेटसुद्धां झाली नाहीं. असल्या बिनओळखीच्या माणसाशीं जन्माची गांठ घालावयाची आणि तरुण

वयांतल्या गोड आशांचो नुसती आठवण करून निरशेचें निःश्वास सोडीतच सबंध जन्म काढावयाचा, असलें निष्प्रेम, निर्जीव जिणें जगून तरी काय करावयाचें ?

माझा स्वतंत्र बाणा खडबडून जागा झाला. असा दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारा मी नाहीं याची मला आठवण झाली. बाबांचा करारी स्वभाव माझ्यांत उतरला नाहीं तर मी त्यांचा मुलगा कसला ? पुढच्या आयुष्याचें वेळापत्रक जें मी माझ्या मनःपटावर कल्पनेच्या लेखणीनें लिहून ठेवलें आहे तें यमूच्या निर्जीव संगतींत कितीसें पार पडेल ?

प्रभा मला जेवायला बोलवायला आली, तेव्हां मला आज भूक नाहीं असा तिच्याकरवीं मी निरोप धाडला. माझ्या निरोपानें आई वर आली आणि माझें डोकें वगैरे दुखतें कीं काय याची चौकशी करूं लागली. त्यावर मी हुषार असल्याचें दाखवून उडवाउडवीचो उत्तरें दिली आणि कशीतरी तिची बोलवण केली.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच माझी भेट घ्यावयाला बाहेर कोणी आला असल्याचें मधु आंत येऊन सांगूं लागला. मी आश्चर्य करीत त्याच्याबरोबर बाहेर आलों. एक मध्यम वयाचा मनुष्य ओटयावर हातांत छत्री घेऊन उभा होता. मला पहातांच त्यानें हातांतल्या छत्रीसकट हात वर करून मला नमस्कार केला. मीहि प्रतिनमस्कार करून त्याला खुर्चीवर बसावयास सांगितलें.

" आपण मुंबईहून आला असं कळलं तेव्हां आलों इकडे. " खेडयांतल्या खेडयांत एखादी गोष्ट किती लवकर पसरते याचें हें उघड प्रत्यंतर होतें.

" कोण आपण ? आगलं मुंबईला कोणी आहे वाटतं ? "

" होय. तुम्हीं मुंबईत कुठें रहातां ?"

" गिरगांवांत. "

" गिरगांवांत का ? च्. भग तुम्हांला गांवदेवीवरचे प्रधान ठाऊक नसतील ! विष्णुपंत प्रधान." तिऱ्हाइताला याचा हा जिज्ञासूक प्रश्न वेडगळपणाचा दिसला असता. गिरगांवांत रहाणाऱ्याला, मुंबईत रहाण्याच्या नात्यावर, गांवदेवीला रहाणारा एखादा मनुष्य ठाऊक असणें शक्य नाहीं इतका लांबलचक पोंच खेडवळाला असणें शक्य नव्हतें. माझी व विष्णुपंत प्रधानाची ओळख होती ही गोष्ट निराळी; पण असा प्रश्न विचारण्याला त्याला तसा कांहींच आधार नव्हता.

" विष्णुपंत प्रधान ? अगणा म्हणतात त्यानां ! तेच ना ? "

" हं, हं, तेच. आपल्या ओळखीचे आहेत का ते ? "

" ओळखीचे कां ? चांगले दाट ओळखीचे आहेत." आणखी मी बरेंच चऱ्हाट वळवणार होतों. पण माझ मलाच तें विचित्र आहे असें वाटून मी फक्त हंसलो.

" अस्सं ! मग तिथली काय खबर आहे ? वसंत कसा काय आहे ? अण्णा, शालीन खुशाल आहेत ना ? "

" होय; वसंतला जरासा ताप आला होता--पण तो आतां बरा आहे."

" त्याला कशानं ताप आला होता ? "

" ताप ? हवेंत जरा फेरबदल झाला म्हणजे लहान मुलांच्या प्रकृतींत फेर पडायचाच." मी खरेंकारण लपवून ठेवून म्हटलें. कारण त्याला तें खरें वाटलें असतें कीं नाहीं याची मला शंकाच वाटली.

" अस्सं. शालिनीच्या लग्नाचं कुठें जमलं का ? "

हा तिऱ्हाईत मनुष्य इतकी खोदून खोदून त्यांच्याकडची वातमी कां विचारतो आहे हें मला कळेना. मी त्याला विचारलें,

" तुमचं त्या घराण्याशीं बरंच निकटचं नातं दिसतं ! "

" होय तर; मी शालीनचा मामा. आज मी वर्षभर गेलो नाहीं तिकडे. त्यांचं पत्र येतं पंधरवडयांतून एखादं. "

त्या मनुष्याशीं अप्रत्यक्षपणानें मजेंहि आतां नातें उत्पन्न झाल्यामुळें मी मधूस चहा आणण्यास सांगितलें. चहा घेतल्यानंतर त्यानें इकडच्या तिकडच्या गोष्टी काढल्या आणि जाण्याचा वेळ होतांच त्यानें मला आपला पत्ता देऊन आपल्या घरीं बोलावलें. मीहि त्याच्या विनंतीला रुकार दिला. शालिनीच्या नात्याच्या प्रत्येक माणसाकडे आतां मनमोकळेपणानें वागण्याचा माझा हक्कच होता.

दुपारीं चहा घेऊन झाल्यावर घरीं कंटाळा येऊं लागला म्हणून मी कपडे केले आणि 'वॉकिंग स्टिक्' हातांत घेऊन कुठें तरी जावें म्हणून घराबाहेर पडलों. रस्त्यावरून जातांना कित्येक खेडवळ माणसें माझ्याकडे पहातच उभीं रहात. मी म्हणजे कांहीं 'सूट' घालून युरोपियन ड्रेसमध्यें घराबाहेर पडलों नव्हतों. परंतु रामकृष्ण मिलचें तें तलम धोतर, पुन्हां तें नसण्याची पद्धत, तांबडया रेघांचा शर्ट, वर शेक्सपियर कॉलर, अमेरीकन कट्चा सर्जचा कोट, आणि पायांत मद्रासी वहाणा यामुळें मी त्यांना कांहींसा गांववेगळा दिसत होतों. आणि म्हणूनच ते माझ्याकडे कांहींशा विस्मयानें पहात रस्त्यांत उभे रहात. रस्त्यावरच्या घराच्या ओटयावर अगर खिडकींत कोणी असलें तर हांक मारून घरांतली सारी माणसें तें माणूस जवळ आणीत असे. असा निदान दोनदां तरी प्रसंग आला, आणि मला त्यांच्या या खेडवळपणाचें हंसू आलें.

मी बराच चालत गेलों. आज मी सगळा गांव फिरून घेण्याचा बेत केला होता. पण जातां जातां मला शालीनच्या मामाची आठवण झाली, आणि मी माझ्या

खिशांतला पत्ता काढून वाचूं लागलों. आजूबाजूला पहातों तों मी अगदीं बरोबर त्यांच्या घरासमोरच उभा राहिलेला. मला सर्व खुणा पटतांच मी अंगणांतून आंत गेलों. बाहेर एक बांक होता. बाहेर कोणीच दिसलें नसल्यामुळें आतां काय करावें या विचारांत मी होतों. इतक्यांत आंतून सुताचें विणकाम करीत एक तरुण –१५-१६ वर्षांची 'मुलगी' बाहेर आली. ती आपल्या उद्योगांतच अगदीं दंग होती. उंबरठ्यावरून पाऊल टाकतां टाकतां तिला ठेंच लागली आणि अइ ऽ ऽ असें म्हण• तानांच तिची नजर चटकन माझ्याकडे गेली. मला पाहिल्याबरोबर झटकन् पदर सावरून 'कोण पाहिजे ?' म्हणून तिनें मला सवाल केला.

मी शुद्धीवर येऊन म्हणालों, "माधवराव आहेत का घरांत ?"

"होय, बसा हं. मी बोलवते त्यांना." असें म्हणत कांहींशा अल्लड चालीनें ती आंत गेली. मला पहाण्यापूर्वी तिची कामाकडे लागलेली एकतानता, ठेंच लागतांच तिची माझ्यावर गेलेली विस्मयाची नजर आणि मला परक्याला पहातांच लगबगीनें पदर सावरून 'कोण पाहिजे' म्हणून विचारतांना तिची झालेली धांदल वगैरे सर्व प्रकार मला एकसारखे पुन्हां पुन्हां डोळ्यापुढें आणावेसे वाटूं लागलें. पण इतक्यांत माधवराव बाहेर आले.

"वः; अगदीं सांगितल्याबरहुकूम आलेत."

"मी जात होतों गांव हिंडायला म्हणून. पण इथं रस्त्यावर आल्यावर चटकन तुमच्याकडे येण्याची आठवण झाली."

"अस्सं, अस्सं. कुसुम, अग कुसुम, आमच्या या पाहुण्यानां चहा आण पाहूं."

"छेः छेः नुकताच घेऊन आलों घरून."

"अहो, तुम्हीं मुंबईचीं माणसं. मला काय ठाऊक नाहीं ? नाक्यानाक्या-वरच्या हॉटेलांतून तुमच्या दिवशीं किमानपक्षीं चार, पांच खेपा तरी व्हायच्याच." त्यानीं हंसत हंसत म्हटलें. मला काय किंवा दुसऱ्या कोणाला काय तें पटण्यासारखेंच होतें.दर दोन दुकानांपुढें लागणाऱ्या हॉटेलांच्या तडाक्यांतून सुटणें––

इतक्यांत माझ्या ओळखीचें पहिलें 'माणूस' एका हातांत बशी पेला आणि दुसऱ्या हातांत चिवडयाचा बशी घेऊन बाहेर आलें. त्या माणसाचें नांव कुसुम हें मला नुकतेंच कळलें होतें. माधवरावांच्या हातांत पेला बशी देतांना तिनें तिरव्या नजरेनें माझ्याकडे ओझरतें पाहिलें हें माझ्या नजरेंतून निसटलें नाहीं. पण तें सहज असेल असें मला वाटलें. आणि तसें वाटणें सहाजिकच होते.

" काय ग, चिवडा आणलास ? पहिल्याच खेपेला पाहुण्यांनां तिखट करायचं ? शालीनीच्या घरासारखा आमच्या घराशींहि यांचा दाट संबंध जोडायचा आहे बरं ?"

माधवरावांच्या या वाक्यानें माझें अंग थोडेसें थरारलें आणि मी नजरेच्या टोंकानें माधवरावांशेजारीं उभ्या असलेल्या कुसुमकडे पाहिलें. तिच्या—माझ्या नजरेची प्रथम-भेट झाली तेव्हां तिच्या नजरेंत मला कसलीशी जादू दिसली. ती तावडतोब तेथून जाण्यास निघाली. जातां जातां तिनें मला पाहिलें न पाहिलेसें केलें.

" ही एक आणि दुसरा यशवंत; यांच्याशिवाय मला जवळच्या नात्याचं असं कोणींच नाहीं म्हटलं तरी चालेल. या सगळ्या घरांत आम्हीं सारीं तिघं माणसं आहोंत. "

" यशवंत कुठें बाहेर गेला आहे वाटतं ? "

" होय, शाळेंत गेला आहे. इंग्रजी ६ व्या इयत्तेंत आहे. येईल एवढयांत शाळेंतून. तुम्हीं इंटरमध्यें आहां नाहीं ? "

" हो. " चहाचा घोट घेत मी म्हणालो.

" आणि प्रभाकरच्या डॉक्टरीच्या परिक्षेचं हें शेवटचं वर्ष ना ? "

" होय. पांच एक महिन्यानीं परीक्षा होणार त्याची. "

" अस्सं; मग सुटलों बुवा मी."

" म्हणजे ? " तोंडाला लावलेली बशी खालीं करून मी विचारलें.

" परिक्षा झाली कीं एकदां कुसुमशीं लग्न लावायला तो मोकळा—अर्र् हातांतला पेला पडला. " पण त्यानीं इतकें म्हणण्यापूर्वीच माझ्या उजव्या हातांतला पेला खालीं पडून त्याचे तुकडे झाले आणि उरलेला चहा जमिनीवर सांडला. मी माझ्या डाव्या हातांतील बशी खालीं बांकावर ठेवली. माझी गोंधळलेली स्थिति पाहून माधवरावांनीं विचारलें,

" काय हो झालं ? "

" असाच माझा हात कधीं कधीं लटलट थरथरतो. आणि अशा वेळीं हातांत कांहींच वळ रहात नाहीं. पेला कधीं पडला हें सुद्धां मला कळलं नाहीं " माझें म्हणणें त्यांना पटलें. पण मी काय बोललों आणि कां बोललों तें माझें मलाच कळेना.

पेल्याच्या आवाजानें कुसुम घाईघाईनें बाहेर आली. पेला फुटलेला पहातांच तिनें कांचा एका ठिकाणी गोळा केल्या आणि त्या अंगणाच्या एका टोकाला टाकून ती माधवरावांजवळ आली.

" चहा आणूं का ?" तिनें मला संबोधून पण माधवरावांकडे पहात विचारलें.

" नको, नको, कांहीं फार सांडला नाहीं. " मी माधवरावांकडे आणि तिच्याकडे पहात म्हणालों.

इतक्यांत यशवंत शाळेंतून आला. येतां येतां तो माझ्याकडे टक लाऊन पहात होता.

" काय रे, यशवंत, ओळखलं नाहींस मला ? " मी त्याच्याकडे पहात हंसतां हंसत विचारलें.

' हो, मी मुंबईला आलों होतों त्यावेळीं तुम्हांला प्रभाकरबरोबर त्यांच्या घरीं पाहिलं आहे एकदोनदां. बाबा सकाळीं सांगत होते तुम्हीं इथें आलां आहां म्हणून. तुम्ही आलां नसता तर मी तुमच्या घरीं येणार होतों आतां. "

" मग चल कीं आतांच. "

" आलों हं " असें म्हणून यशवंत पुस्तकें ठेवण्यासाठीं आंत गेला. थोडया वेळानें कोट बदलून तो बाहेर आला. आणि आम्हीं दोघेहि जाण्यास निघालों. माधवरावांना नमस्कार करून मी पायरीवरच्या वहाणा पायांत घातल्या आणि उंबरठयाजवळ उभ्या असलेल्या कुसुमला मानेनेंच किंचित् हंसून ' जातों ' अशा अर्थाची खूण केली. तिनेंहि त्याच भाषेंत मला उत्तर दिलें आणि मी हातांतली काठी फिरवीत यशवंतबरोबर खालीं उतरलों. तिला मानेनें तरी ' जातों ' असें म्हणण्याचा निर्लज्ज धीटपणा माझ्या मनांत एकाएकीं कसा उद्भवला याचें मला नंतर बरेंच आश्चर्य वाटूं लागलें. मुंबईहून निघतांना व्हिक्टोरियांत घडलेल्या प्रसंगानें तर माझ्या आचार विचारांत क्रांति घडून आली नसेल ना; असेंहि मला राहून राहून वाटूं लागलें.

× × ×

मला त्या दिवसाचा मूर्खपणा आठवला कीं अजून माझें मलाच आश्चर्य वाटतें. रात्रीं दीड दोन वाजेपर्यंत कांहीं माझा डोळ्याला डोळा लागला नाहीं. डोळ्यांसमोर कुसुमची मूर्ति उभी राहून मला झोंप येऊं देत नव्हती. कुसुमचें प्रभाकराशीं लग्न होणार आहे हें माधवरावांनीं सांगतांच माझ्या हाताला कंप सुटून हातांतला पेला खालीं जमिनीवर पडला. मी कांहींतरी सबब सांगून वेळ मारून नेली, परंतु त्या गोष्टीचा विचार करूं लागतांच माझी अशी त्यावेळीं विलक्षण स्थिती कां झाली हें मला बऱ्याच वेळानें कळून आलें. मी तिला पहाण्यापूर्वी जर मला कोणी तिचें प्रभा-

करशीं लग्न होणार म्हणून सांगितलें असतें तर त्याचा माझ्या मनावर कांहींच परिणाम झाला नसता. पण तिला पाहिल्यानंतर मला काय झालें कुणास ठाऊक ! माधवरावांनीं ती प्रभाकरची पत्नी होणार हें सांगतांच माझ्या हृदयाला एकदम धक्का बसला.माझ्या हातांतून पेला पडला याचें खरें कारण माधवरावांना मुळींच कळवलें नाहीं,आणि तें कळणें शक्यहि नव्हतें. माझ्या मनाला त्यांच्या वाक्यानें धक्का बसला असेल असा त्यांना कां म्हणून संशय यावा ? तसें कांहींच कारण नव्हतें.

मला स्वतःला मात्र माझा वागणूक बरोचशी विचित्र भासूं लागली. मी कुसुमकडे कुठल्या दृष्टीनें पहात होतों ? शालीनला काय वाटेल ? अशा चंचल मनानें माझें मलाच कितीसें सुख होईल ?

शालिनीची आठवण होतांच तिला पत्र धाडण्याचें आपण विसरलों हें माझ्या लक्षांत आलें. मी लगेच बिछान्यावरून उठलों आणि टेबलाजवळच्या खुर्चीवर बसून मालवलेला दिवा पेटवला. प्रथम मला काय लिहावें हेंच सुचेना. पण तिच्या पत्राची आठवण होतांच मी तिला लहान पत्र पाठवण्याबद्दल बरेंच लटक्या रागानें लिहिलें व हें पत्र पोहोंचल्यानंतर एक लांबलचक उत्तर पाठवण्यास तिला लिहिलें. नंतर एकाएकीं मला माझ्या लग्नाबद्दल बाबांचें व आईचें आडून ऐकलेलें भाषण आठवलें आणि तें तिला पत्रद्वारें कळवावें कीं नाहीं याचा निर्णय करण्यासाठीं पांच दहा मिनिटें डोक्याला शीण दिला. एकदां वाटे लिहावें, एकदां वाटे लिहूं नये. ही गोष्ट कां तिला कळवण्यासारखी होती ? मला कांहीं बाबांनीं अगर आईनीं अजून प्रत्यक्षपणें या बाबतींत विचारलें नव्हतें. तेव्हां या गोष्टीबद्दल तिला कळवून काय उपयोग ? उगीच तिला हुरहुर मात्र लागून रहावयाची आणि—आणि कदाचित् तें वाचून तिच्या मनाला जबर धक्का बसेल.

मी हें अगदीं विसरून गेलों होतों. आतां तिचें माझें नातें आम्हां एकमेकांना तरी खास कळून चुकलें असतांना माझ्या लग्नाचें जमलेलें तिला कळणें अपायकारक होतें. तिच्या कोंवळ्या अंतःकरणाला अशानें खोल जखम होईल अशी मला भीती वाटूं लागली आणि मी तो विचार रद्द करून लग्नाबद्दल एक चकार शब्दसुद्धां लिहिला नाहीं. पत्रांत कुसुमचा मात्र उडता उल्लेख केला असून मी त्या मंडळीच्या चांगल्या परिचयाचा झालों आहे एवढेंच लिहिलें होतें.

पोंच व अभिप्राय

खास अंक-

किर्लोस्कर खबर (किर्लोस्करवाडी, सातारा) हा खास अंक दिवाळीचा म्हणून निघाला आहे कीं जाहिरातींचा म्हणून निघाला आहे असा अंक हातांत घेतल्यावर प्रथम मोठा प्रश्न पडतो. गेल्या वर्षाचा दिवाळी अंक व हा खास अंक यांत जर्मीन अस्मानाचें अंतर आहे, असें खुद्द रा. शंकरराव किर्लोस्करांना सुद्धां मनांतून वाटत असेल. " दिवाळीच्या फराळानंतर असल्या 'खास' अंकानें वाचकांचें 'मन उल्हसित' होईल " असें संपादकांना वाटलें कीं काय ?

वऱ्हाड शाळापत्रक (उमरावती, वऱ्हाड) पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त हा खास अंक निघाला असून आंत जवळजवळ ३५० पानांचा मजकूर व चित्रें आहेत. कांहीं लेख व कविता फारच सुंदर आहेत. प्रयत्न घाडसाचा आहे हें निर्विवाद आहे.

स्वयंसेवक (फोंडा, गोंवा) या मासिकाचा खास 'मातृअंक' प्रो. वा. म. जोशी, प्रो. व. ना. नाईक, श्रीमती काशीबाई कानिटकर, सौ. कमलाबाईसाहेब किबे या व इतर वाग्भट-विदुषींनीं उत्कृष्ट तऱ्हेनें सजवला आहे. 'ह्मजी बा खंय गेली ?' हा गोंव्याच्या भाषेंतील लेख हृदयस्पर्शी आहे हें कोणीही तज्ज्ञ कबूल करील. मातेची थोरवी या अंकांतील निरनिराळ्या लेखांवरून चांगल्या रीतीनें प्रत्ययास येते.

प्रभुप्रभात (मुंबई) खास अंकांच्या धामधुमींत याहि ज्ञातिविषयक मासिकानें नित्य नियमाप्रमाणें दिवाळीचा खास अंक काढला आहे. यांत ३ गोष्टी व त्या ज्ञातींतील लेखकांचे लेख व ज्ञातींतील दिवंगत-विद्यमान पुढाऱ्यांचे फोटो व श्री. धुरंधर यांची कांहीं चित्रें आलीं आहेत. मासिक ज्ञातिविषयक असल्यामुळें संपादकांचें या वाजवी धाडसाबद्दल विशेष अभिनंदन केलें पाहिजे.

स्वराज्याचें परिवर्तन(प्र. गणेश म. आणि कंपनी, मुंबई) चार आण्यांच्या अल्प मोलांत दर महिन्यास १५० पानांवर मजकूर देणाऱ्या 'चार आणे मालेनें' आपल्या धाडसाची कमाल करून पाश्चात्त्य ग्रंथप्रकाशकांशीं तोड करण्यासाठींच कीं काय 'खास अंक' म्हणून श्री. नाथमाधव यांच्या चित्ताकर्षक लिखाणाची सुमारें ४७५ पानांची कादंबरी अवघ्या १रुपयाच्या व वर्गणीदारांस ८ आण्याच्या किंमतींत दिली आहे. मराठेशाहीचा इतिहास आधींच मनोरंजक; आणि त्यांत श्री. नाथमाधवांसारखे कसलेले कादंबरीकार तिचे कर्ते असल्यामुळें कादंबरी अत्यंत मनोरंजक झाली आहे यांत फारसें दुमत होणें शक्य नाहीं असें वाटतें.

मेंदुचे विकार व डोकें दुखणें यावर.

किं. १-२-०,] ब्राम्ही तेल [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा:—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळंत काढा:—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळकडू:—उपजल्यापासून देण्यास योग्य किं. ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायणें वगैरे औषधें तयार आहेत: एक आणा आला असतां रुग्ण पत्रिका लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचना:—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांच खप वाढल्यामुळें नक्कल सुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळीं या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयौंषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.
दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने

शर्टची बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोत्याची रु. ५; आंगठी रु. १; सल्ले जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. २॥; घडाळ्याचा छेडा रु. ३;

केंस काळे करण्याचा सावण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्यान्च्या बॉक्सला रु. १॥.

इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथीसाठ ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुड्यासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. अमृतवाडी, गिरगांव, मुंबई.

३२ वर्षें परीक्षा घेऊन शंका असेल तर नमुना फुकट मागवा. सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें.

सुधासिंधु

कफ, खोकला, पटकी, दमा, शूल, संग्रहणी, अतिसार, पोट दुखणें, जुलाब, वांती वगैरे रोगांवर अनुपान शिवाय स्वादिष्ट औषध. किंमत प्रत्येक बाटलीस ८ आणे, पोष्टखर्च १ ते २ पर्यंत ७ आणे.

दद्रुगजकेसरी

गजकर्णाचें औषध

हेंही सरकारांतून रजिष्टर झालेलें औषध आहे. हें कांहीं त्रासाशिवाय २४ त्रासाच्या आंत आपला गुण दाखविणारें आहे. किंमत ४ आ. पोष्ट खर्च ते २ पर्यंत ७ आणे. एकदम १२ बाटल्या घेतल्यास २। रु. पोष्टखर्च माफ.

बालसुधा

मुलांस सर्दी, खोकला, आणि अपचन हें कधींही होऊं देत नाहीं. हें मुलांस बलवान करणारें गोड औषध आहे. किंमत १२ आणे. पोष्टखर्च ७ आणे.

आमची औषधें सर्व औषधें विकणाऱ्याजवळ मिळतात. कदाचित् तेथें न मळाल्यास आमचे कडेस पत्र पाठवून मागवावें. पूर्ण माहिती करितां मोठ क्याटलॉग फुकट पाठवूं.

पत्ता:— **सुखसंचारक कंपनी, मथुरा.**

आमचा एजंट—**नरोत्तम गिरिधर** आ.कं. शेख मेमन स्ट्रीट, **मुंबई नं.२**



त्वरा) **जंगी लूट** (करा

खात्रीचीं बक्षिसें

रेल्वे रेग्युलेटर .घडयाळ–३ वर्षें बरोबर टाईम देणारें खात्रीचें घडयाळ किं. ४॥ रु. बरोबर छेडा फुकट.

रिष्टवॉच फॅन्सी, साधें रु.५. सेकंडचें रु.५॥. चांदीचें रु. १० रिडियमचेंरु.६.

दद्रुचें नाशक गजकर्ण, खरूजवर रामबाण मलम, किं. ४ आणे २४ डब्यांवर खिशांतलें घडयाळ. ३६ डब्यांवर रिष्टवॉच फुकट. बक्षीस नको अस-ल्यास १॥। रु. डझन. **किंग जॉर्ज कॉरोनेशन कं.** मुंबई नं. ४.

कडकी व शक्तीवर ४२ वनस्पतींचा गोड



अशक्त मलें, स्त्रिया व पुरुषांना शरीर धष्टपुष्ट आणि सशक्त होण्यास हा काढ वापरा. किं १। रु.

पर्ल आणि कंपनी,

राणीचा बाग, मुंबई.

अमृतांजन (रजिस्टर्ड.)

हें ठणका, कळा, वेदना इत्यादि व्याधींवर अचूक गुणकारी आहे. आज २५ वर्षें याच्या एकसारख्या वाढत्या खपावरून याची सहज कल्पना होते लाखों कुटुंबें आज अमृतांजन वापरीत आहेत. कारण तें सर्व प्रकारच्या वेदना मुरगुळणें, संधिवात, कफ, सूज आणि अशा प्रकारच्या पुष्कळ व्याधी निखालस




बऱ्या करितें. म्हणून ज्यांनी तें अद्याप अनुभवलें नसेल त्यांनीं खात्री करून घ्यावी. किंमत १० आणे .व्ही. पी. खर्च निराळा.

दंतमंजन.

या मजेदार दंतमंजनानें दांत शुभ्र होतात. रक्त वाहणें थांबतें. हिरड्या मजबूत होतात व वास मधुर येतो. प्रत्येक ड. किं. २ आणे **सर्व दुकानदारांकडे मिळेल.** अगर

अमृतांजन डेपो, १०९ फ्रीयररोड, मुंबई.

पैशांचा योग्य मोबदला.



स्वदेशी स्टेशनरी लेटरपेपर, पाकिटें वगैरेची रॅक, कागद ठेवण्याचे स्प्रिंगचे ट्रे, ब्लॉटर, तऱ्हतऱ्हेच्या दौती झांकण्याचे चावी कुलुपासह कॅबिनेट्स् लेटर बॉक्सिस वगैरे वगैरे.

मुलांमुलींचे

लांकडी रंगीत खेळ.

शिशवी फणेरी पेट्या, **चंदनाच्या** फण्या व तऱ्हेतऱ्हेचे कोरींव काम. देवादिकांच्या मूर्ति वगैरे वगैरे.

रेशमी, सुती व गरम कपडे धुण्याचा उत्तम विलायतीच्या तोडीचा एकच स्वदेशी

निर्मलीन साबण.

वापरून तरा पहा !

व्ही. प्रभा आणि कंपनी.

नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.

आर्यमहौषधालय. मु. पो. आंजलें.

प्रोप्रायटर–डॉ. रंगनाथ कृष्णशास्त्री बिवलकर, एल् एच. एम्. एस्.

कोकण प्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगप्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.

स्वर्णधात्री तैल हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, इ० वनस्पतींचा सत्वें आणि उपयुक्त तैलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ. रोगांस जलद आराम पडतो. केशांस चोळिल्यानें केश काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक, लांब व मृदु होऊन मेंदू शत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध, खरूज, गजकर्ण, शिवें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यचा दाह, हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा. किं. १। रु.

थंडगार नेत्रांजन:—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, कांच वगैरे डोळ्याचे एकंदर विकार ताबडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडचार होते ड. १॥ रुपया.

कर्णस्त्रावनाशक अप्रतीम तैल:—यानें कानचे सर्व प्रकारचे व्रण तत्संबंधी इतर विकार त्वरित बरे होतात. बा. १ रु.

दंतरक्षक पूड—ही दत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आ.

सूचना:—वरील औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचेचाळीस वर्षांत त्याचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला असून त्यांचा नेहेमी व फारच खप होत आहे. अनुभवानंतर खात्री पटेलच. औषधें माहितीच्या खड्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपालखर्च वेगळा घाऊक घणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. प्रकृतिमान कळविल्यास रोग निदान व योग्य चिकित्साही कळवूं. आमचीं औषधें वगैरे माल मागविणें, तो खालील विनचूक पत्त्यावरच मागवावा.

कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य.

मु.आंजलें, ता. दापोली, जि. रत्नागिरी

Dr. J. D. Kulkarni's Success Makers.

अखिल हिंदुस्थानांत अत्यंत नांवाजलेलीं पहिलींच.

कोणत्याही जातीच्या व सांथीच्या तापांवर

—विद्वान व नामांकित डॉक्टरांनीं अत्यंत वाखाणलेलीं—

डॉ. जे. डी. कुळकर्णी

यांचीं

सर्वांत सुंदर, शास्त्रीय, पद्धतशीर, अत्यंत सोईस्कर औषधें.

फिवरॉल. सर्व जातींच्या व सांथीच्या तापांवर अप्रतीम. "अंगांत ताप असतांना द्यावयाचे." किं. रु. १।

मलेरिन. मलेरिया-एग्यू हिंवतापाचा जिवंत काळ एग्यूमिक्श्चर. "अंगांत ताप नसतांना द्यावयाचें." किं. रु. १।

मलेरिन नं २. अल्पमोली पण खात्रीपूर्वक, अत्यंत गुणी ॲग्यूमिक्श्चर. "सर्वांस सारखेंच सर्वोत्कृष्ट गुणावह." किं. १२ आणे.

या औषधांची सर्वत्र फार ख्याति असून एकटचा मुंबई शहरांतच १०००० पेक्षां जास्त कुटुंबांत यांचा संग्रह व गरजपरत्वें वापर असतो. इतर "निवडक" औषधांचा ७५ पानांचा सचित्र कॅटलाग १ आण्याचीं तिकिटें आल्यास मोफत पाठवूं. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन.

तारेचा पत्ता:—"ॐकारोदय" 'Om Karodaya" Bombay.

पोष्टाचा पत्ता:—**कुळकर्णी ॲण्ड सन्स, मुंबई नं. २.**

डॉ. एन्. व्ही. कुळकर्णी यांचीं अनुभविक शास्त्रशुद्ध औषधें.



च्यवनप्राश.

(Improved Formula)

शक्ति, बुद्धि, कांती आणि वीर्य वाढविणारें **महान धातुपौष्टिक** औषध. धातुविकार, स्वप्नावस्था व दुःखंपणा, अशक्तता, कडकी व खोकला वगैरे विकार करून शरीर जोमदार व तेजःपुंज बनवितें. एक रत्तल बरणी कि. रु. ५ अ. र. २॥ रु.

द्राक्षासव

(Extra Quality)

सारक, पाचक, पौष्टिक, तरतरी आणणारें स्वादिष्ट औषध. दमा, खोकला, कफ, सर्दी वगैरे विकार बरे करून भूक खपाटून वाढवितें. १॥ रत्तल बा. १८१२; १ र. बा. १। रु. अर्धा रत्तल बा. ८।१.

नवीन औषध (रजिस्टर्ड) कितीही दिवसाचा नवा अगर जुना मलेरिया ताप यानें खात्रीनें जातो. या औषधानें मलेरियाचा ताप जाण्याची आम्ही हमी देतों. बा. कि. १॥ रु.

पिपरीन (रजिस्टर्ड) कॉलऱ्यावर रामबाण औषध. १।२ भागांत उलटी व जुलाब बंद होतात; आमांशावरहि चांगला उपयोग होतो. बा. कि. १। रु.

पॅकिंग व पोष्टखर्च निराळा.

मागविण्याचा पत्ता:—**आयुर्वेदिक मेडिकल वर्क्स, मुंबई नं. १२**

Printed by **A. A. Moramkar** at his Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar Bombay 2.
and Published by **M. G. Rangnekar** at the **Arun** Office, 2nd Bhatwadi, Girgaum, Bombay 4.



किंमत ३ आणे.

संपादक—मो. ग. रांगणेकर
अरुण कार्यालय,
२ री भटवाडी, मुंबई ४.

वा. व. ट. ख.
२। रुपये.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं
जगाविख्यात "निवडक औषधें."

नं. १ **फिवरॉल**–सर्व जातींच्या साध्या-दोषी–विषारी-मुदती–सांथीच्या तापांवर अप्रतिम. किं. रु. १॥

नं. ५ **मलेरिन**–अखिल हिंदुस्थानांतील पहिलेंच सर्वश्रेष्ठ–अत्यंत सोईस्कर ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. १।-

नं. ६ **मलेरिन नं २**–अल्पमोली पण खात्रीपूर्वक अत्यंत गुणी ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. ।॥-

नं. १४ **हिस्टेरिन**–स्त्रियांच्या हिस्टेरिया–उन्माद–गुल्मादिकांवर सर्वोत्कृष्ट. किं. रु. ३

नं. १५ **थॅमिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट–हट्टी–प्राणघातक दम्यावरअमोलिक. किं. रु. ३

नं. १९ **जर्मिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट हट्टी-हाडींमासीं खिळलेल्या उपदंश गर्मीवर. किं. रु. ३

नं. २० **सँटोल**–प्रमेह--परम्यावर; लघवीची आग–तिडिक–जळजळ ५।६ तासांत बंद ! किं. रु. ३॥

नं. ३९ **एलिक्झीर शिलाजित कंपाउंड**–सर्व प्रकारच्या मूत्रदोषादि विकारांवर. किं. रु. ३

नं. ४२ **रास्ना कॉर्डियल**–अर्धांगवायू-पक्षाघात,कटिशूल, संधि– आमवातादिकांवर. किं. रु. ३

नं. ४८ **मस्तकशूळावर रामबाण वडया**-असह्य मस्तकशूळ-अर्धशिशी ५ मिनिटांत बंद ! किं रु. ।॥-

नं. ४९ **वीर्योटोन गुटिका**–सर्वांग सुंदर धातुपौष्टिक; रक्त-मांस-मेदू-बलवर्धक. किं. रु. २॥-

नं. ५० **चैतन्योटोन गुटिका**–ग्रॅंथिविनयुक्त; मर्दाईवर जगप्रसिद्ध निर्वाणीचा उपाय. किं. रु. ६

नं. ५१ **चैतन्योटोन तेल**–मर्दाईवर तात्कालिक व चिरकालिक बाह्योपचार किं. रु. ५

नं. ५४ **एलिक्झोर ऍन्टी कन्व्हलशन**–लहान मुलांच्या आंकडीवर प्रतिज्ञेचें औषध. किं. रु. २

नं ७८ **वेदिक पेन बाम**–वातहारक, दुःखशामक, सूजनाशक, झटपट– चिरकालिक गुण. किं. रु. -।॥-

मोठा सचित्र क्याटलाग व नविन वर्षाचें सर्वांगसुंदर क्यालेंडर १ आण्याचें तिकिट पाठविल्यास मोफत पाठवूं.

कुळकर्णी ऍण्ड सन्स, मुं नं. २.

अद्भुत! अद्वितीय! चमत्कारिक!

कविविनोद वैद्यभूषण पं० ठाकुरदत्त शर्मा वैद्य यांनीं बनविलेली.

Registered] # अमृतधारा [रजिस्टर्ड]

अमृतधाराची जितकी प्रशंसा वास्तवीकपणें होत आहे, तेवढी जर लिहावयास बसलों तर मोठे ग्रंथ भरून जातील. परंतु संक्षिप्त रूपानें पाहणें असल्यास "अमृत" नांवाचें मराठी पुस्तक फुकट मागवून वाचून पाहणें. खरोखर आजपर्यंत एक सुद्धां औषधी अमृतधारेच्या जोडीची निघाली नाहीं. आश्चर्याची गोष्ट आहे व कांहीं लोक हें एकदम खरेंही मानीत नाहींत कीं, एकच औषधी सर्व रोगांवर चालते तरी कशी? शिवाय गुणहि तात्काळ वाटतो.

अमृतधारा ज्या ज्या रोगांवर चालते त्यांची नामावली.

प्रत्येक प्रकारचा ताप, अतिसार, संग्रहणी, रक्तातिसार, अजीर्ण, अरुचि, महामारी, हगओक, मुळव्याध, पांडु, कावीळ, खोकला, श्वास, क्षय, उचकी, वांती, रक्तसर्दि, ओकारी, मुर्च्छा, भ्रम, अपस्मार [फेंफरे] अम्लवात, शूळ, आनाह, उदररोग, गुल्म, शोथ, कंठमाळा, गलगंड, भगंदर, पर्मा, गर्मी, वातरोग, पित्तरोग, कफरोग, ओष्ट सुजणें, दांत दुखणें, दांतांस पाणी लागणें, दंतरोग, मुखपाक, हिरड्या सुजणें व दुखणें, कंठरोग, कर्णस्राव, कर्णकंड, नजळा, वेदना, नेत्ररोग, लहान मुलांचा ताप, खोकला, अतिसारादि रोग, सर्प, विंचू, मधमाशी, मुंगी, इत्यादिकांचे विषारी दंश, अफू, सोमल इत्यादिंचें विष, प्लेग, पार्श्वशुक, न्यूमोनिया, शंका लासूर, गजकर्ण, नायटे, इसब, खाज, पुळ्या, सांधे, गुढगे, पोटऱ्या किंवा मांड्या, दांत दुखण इ०

गृहस्थहो विचार तर करा!

असें औषध प्रत्येक मनुष्याच्या खिशांत प्रत्येक ऋतूंत घरांत देश परदेश सर्वत्र सर्व काल असलें पाहिजे नको का? कोणास माहीत आहे कीं कधीं काय होते? अशा प्रसंगाच्या वेळीं जे काम हें औषध देतें त्याच्या मानानें याची किंमत कांहींच नाहीं.

" अमृतधारे " ची प्रशंसा जितकी आम्ही करतों त्याच्यापेक्षां कितीतरी पटीनें 'अमृतधारा' घणारे करतात. आमच्या जवळ २१ हजार सर्टिफिकीटें आहेत. आपणसुद्धां एकदां मागवून अनुभव घेऊन प्रशंसकांच्या मंडळीत सामील होणें. किं. रु. २४८;

नमुन्याच्या लहान बाटलीचे आठ आणे; अर्ध्या बाटलीचा १। रु. पत्रव्यवहार बालबोध मध्यें करणें, मोडींत करूं नये.


मॅनेजर—अमृतधारा औषधालय, अमृतधारा भवन, अमृतधारा रोड, अमृतधारा डाकखाना, लाहोर. पत्र किंवा तार पाठविणें असल्यास फक्त एवढा पत्ता पुरे आहे—

" अमृतधारा ९७ लाहोर " [३४६]

एजंट—गुलाम हुसैन वल्ली महमद देवजी पीर भाई मिंसन परिन्सीस स्ट्रीट मुम्बई २

अनुक्रमणिका

१	**नवल** (कविता) श्री. आ.कृ. टेकाडे. .	...		१
२	**क्रांतिकारक** (सं गोष्ट) श्री. प. श्री. देशपांडे		...	२
३	**मुलांची मौज.** ...	...	...	१४
४	**पोंच व अभिप्राय**(नाटयछटा) ...		...	२०
५	**वाराणशी** (कविता) ' कुमार ' ...		...	२२
६	**मुलींचा संसार** (विवाह-बंधनें) . .		...	२३
७	**आदर्श** (ऋणानुबंध) ...		...	२५
८	**नाट्यकला** ...	...	...	२९
९	**साभार स्वीकार** ...	...	...	३२
१०	**क्षणभंगुर—**(चालू कादंबरी) . .		...	२९
११	**मार्गक्रमण—**' मार्गदर्शक ' ...		...	४३



यशोमंदाद्वाराची गुरुकिल्ली हस्तगत करून घेणं असल्यास

योगविद्याभूषण, डॉ. सुरतकर, एम. टी. डी. यांच्या

दिव्य लेखणींतून उतरलेलें

आत्मद्योतनोपचार शिक्षक.

ह्या पौर्वात्य व पाश्चात्य अनेक ग्रंथाधारानें लिहिलेल्या पुस्तकांचा अभ्यास करा ! म्हणजे तुमच्या ऐच्छिक वस्तु तुम्हाला सहज प्राप्त होतील. अनेक दुर्धर रोग तुमचे तुम्हास नष्ट करतां येतील ! दुर्गुणांचा नाश करून पैसा व सद्गुणांची प्राप्ति करून घेतां येईल. तुमचे शत्रुदेखील मित्र होतील ! प्रयत्न करा ! यशस्वी व्हा ! किंमत १॥ व व्ही. पी. १॥।=

प्रो. ज्ञानमित्र, शनवार. पुणे सिटी.

लायकी–नालायकीचा प्रश्न फक्त जननी आणि जन्मभूमि यांच्या प्रेमाचा वारसा मिळवितांच काय तो पुढें येत नाहीं. एक पुत्र बेचाळीस कुळें उद्धारणारा असतो आणि एक पुत्र बेचाळीस कुळें बुडवणारा असतो. पण जन्मदात्रीकडे बोट करून दोघां· नाहि सारख्याच हक्कानें म्हणतां येतें कीं ही माझी आई ! तीच गोष्ट जन्मभूमीची.

—एकच प्याला.

फोटोग्राफर
श्री. ए. आर. राजाध्यक्ष

हा कोणाचा बाइ बोलका बाळ ?
बोलतो मधुर किति बोल.

अरुण माला.

वर्ष २.] डिसेंबर १९२५ [अंक ४.

नवल

[श्री. आनंदराव कृष्णाजी टेकाडे, नागपूर]

(अजि अंकुर हा० या चालीवर)

हा कोणाचा बाइ बोलका बाळ
बोलतो मधुर किति बोल
जरि याची ही वाल बोबडी वाणी
तरि गोड साखरेहूनी
नच अर्थ दिसे बोलण्यांत जरि कांहीं
आनंद मनाला होई
हृदयास तोष जें देई
काय अर्थ कारण नाहीं
तो सहजपणें का होई
परि हेतुविना घडुनि कसें तें येई
हें नवल वाटतें बाई.

क्रांतिकारक !

[ले. प. श्री. देशपांडे.

वारा सों सों करीत वहात होता. झाडा झुडुपांना लाथाडून विजयमदानें मत्त झालेल्या एखाद्या सम्राटाप्रमाणें तो वाटेल तिकडे संचार करीत होता. त्याच्या पराक्रमानें पराजित होऊन कालवश होणाऱ्या वृक्षांच्या कड् कड् अशा अतःकालच्या हृदयभेदी आरोळ्या ऐकूं येत होत्या. नभांगणांत तडित् क्षणांत येथें तर क्षणांत तेथें नृत्यिकेसारखी नाचत होती. मेघ आपल्या धड्धड् आवाजानें तिच्या नृत्याला ताल धरीत होते. मधुन मधुन पावसाच्या सरी जोरानें पडत होत्या. विश्वावर पसरलेल्या अंधाराचा भीषण दर्या खवळून गेला होता. प्रलयकालच जवळ आला कीं काय म्हणून प्राणिमात्र भयभीत झाले होते.

अशा भयंकर तुफानांत वडगांवच्या एका टोंकाला असलेल्या एका खोपटाची कोण दुर्दशा उडाली होती ! त्याचें छप्पर वाऱ्याच्या जोरामुळें त्याबरोबरच उडून जाण्याचा प्रयत्न करीत होतें. कूड आपल्या सोबत्याचें अनुकरण करण्याकरितां धडपडत होतें. पण भक्कम खांबांच्या पुढें त्यांचें कांहींच चालेना. खोपटांत हल्ल्यावर हल्ले करणाऱ्या वाऱ्याशीं तोंड देत एक दिवा मिण मिण जळत होता. त्याजवळ विजेच्या कडकडाटानें आणि वाऱ्याच्या सोसाट्यानें घाबरून गेलेला एक दहा बारा वर्षांचा मुलगा घोंगडीच्या एका फटकुरावर बसला होता. तो वस्त्ररहित असल्यामुळें त्याचें सर्व शरीर स्पष्ट दिसत होतें. त्याच्याकडे पहातांच बालपणाच्या पहिल्या प्रहरांत असणाऱ्या नैसर्गिक सुदृढतेची त्याच्यावर पूर्ण अवकृपा झालेली दिसत होती. त्याचे लांब वाढलेले केस पाठीवर पडले होतें. डोळे काळजीनें ग्रासलेल्या एखाद्या वृद्धाप्रमाणें खोल गेले होते. सभोंवतालच्या टेकड्यामुळें मध्यंतरीच सखल झालेल्या प्रदेशासारखीं गालाचीं हाडें वर येऊन त्यांना खळगे पडले होते. नाक मुखावरील इतर हाडांशीं स्पर्धा करण्याकरितांच कीं काय उंच झालें होतें. ओठ पांढरे फटफटीत दिसत होते. त्याची मान बकराजाप्रमाणें कृश झाली होती. एखाद्या शरीरशास्त्रज्ञाला मनुष्याची छाती व बरगड्या यांचीं हाडें किती असतात हें जर प्रत्यक्ष मोजून अनुभवानें पहावयाचें असेल तर तें त्याला त्याच्या शरिरावरून सहज करतां आलें असतें. भुकेमुळें आंत गेलेल्या पोटानें तर त्याला अधिक मदत केली असती. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्या मुलाचे शरीर जवळ जवळ मानवी देहाचा एक सांपळाच होता.

वाऱ्याशीं झगडतां झगडतां थकून गेलेली दिव्याची ज्योत मृत्युपंथ हलके हलके आक्रमूं लागली. आपल्या असहाय्य स्थितींत तिची तरी आपणाला सोबत

असावी या विचारानें ती तेवत राहण्याकरितां कांहीं तरी प्रयत्न करावा म्हणून तो मुलगा उठूं लागला. पण उभें राहण्याचा प्रयत्न करतांच त्याचे कृश पाय कांपूं लागून तो धाड्कन खालीं पडला. त्यानें पुनः उठण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ. दुर्दैव त्याच्या पाठीस हात धुवून लागलें होतें ! त्याला त्याची ही दीन स्थिति कमी दुःखदायक वाटली म्हणूनच कीं काय वाऱ्याच्या एका जोराच्या झुळुकेबरोबर दिव्यानें राम म्हटलें . अंधार ! अंधार ! चोहोंकडे अंधार पसरला ! त्यानें भीतीनें फोडलेली एक करुण किंकाळी क्षणभर आजूबाजूला दुमदुमली आणि जिकडे तिकडे शांत झालें.

पहांट सुरु झाली. पूर्वेकडे तांबडें फुटलें. दिग्देवतांनीं भास्कराच्या आगमनाकरितां गगनांत गुलालाच्या मुठी उधळून दिल्या आहेत असें वाटूं लागलें. थोडयाच वेळांत सूर्यनारायणाची स्वारी क्षितिजावर आरूढ झाली. कोवळें रविकिरण वडगांवच्या सभोंवताली असलेल्या शेतवाडीवर खेळूं लागले. गाईच्या हंबरडयानें आणि गुराख्यांच्या मुरलीच्या गोड स्वानें वातावरण दुमदुमून गेलें. शेतकरी विळे कोयते घेऊन आपापल्या शेतांकडे कामाकरितां जऊं लागल. अशा प्रकारें रात्रीच्या भयंकर तुफानानंतर सृष्टींतील जीवमात्रांनीं जणुं नवजीवन धारण केलें आहे असें भासूं लागलें.

अशा वेळेला रात्रीं भीतीनें घाबरून झोंपी गेलेला तो मुलगा जागा झाला. त्यानें एकवार सभोंवताली दृष्टी फेंकली. पंचमहाभूतांनीं रात्रीं धारण केलेलें उग्र स्वरुप आतां टाकून दिलें होतें. चराचरांत नव आनंदाची उर्मि उसळली होती. ती पहातांच त्याची मुद्रा एक क्षणभर आनंदित झाली. पण लगेच दुःखी विचारांची छाया तिच्यावर दिसूं लागली. तो कांहीं वेळ अगदीं सचिंत बसला. त्याच्या वयाला न शोभणाऱ्या विचारांच्या वाऱ्यांनीं त्याच्या हृदयसागरावर उंच उंच लाटा उसळवून, त्या आपली मर्यादा उल्लंघण्याकरितां आटोकाट प्रयत्न करीत आहेत, असें त्याच्या डोळ्यांत दिसणारे अश्रुबिंदू सांगत होते. शेवटीं त्यानें कांहीं तरी विचार ठरविला, आपले डोळे पुसले आणि उठण्याचा प्रयत्न केला. पण मनानें सोडलेले हुकूम त्याच्या पायांनीं मानण्याचें साफ नाकारलें. तो पुनः खालीं बसला. थोडा वेळ निघून गेला. आतां तो शरिरांतील सर्व शक्ति एकवटून उभा राहिला आणि गांवच्या रोखानें चालूं लागला.

गांवाकडे जाणारी पायवाट माळावरून जात होती. तिच्या दोहों बाजूंना ढोपरभर गवत वाढलें होतें. तो मुलगा त्यामधूनच आपला मार्ग करा तरी

आक्रमित होता. थोडासा चालून गेल्यावर त्याला थकवा आला. विसांवा घेण्याकरितां तो तेथेंच खालीं बसला. पण त्याच्यानें फार वेळ स्वस्थ बसवेना. तो पुनः आपला मार्ग हळु हळू चालूं लागला. असें करतां करतां तो एका घरासमोर आला.

घर गांवांतील मोठ्या रस्त्याला लागून होतें. तें दिसण्यांत टुमदार पण वैठेंच होतें. त्याला पुढें एक लांबच लांब पडवी असून त्यांत एक किराणा जिन्नसांचें दुकान दिसत होतें. ओटीवर शाईच्या काळ्या डागांनीं चित्रविचित्र झालेली एक गादी व दोन तक्के पडले होते. पेटी, जमाखर्चाच्या वह्यांचें एक दप्तर व एक कलमदान जवळच ठेवलें होतें. ओटीच्या पलीकडे प्रशस्त माजघर होतें. त्यांत एका भव्य देव्हाऱ्यासमोर सर्व देव एका मोठ्या ताम्हणांत काढून शरिरानें सुदृढ पण वर्णानें निमगोरे असलेले, धूतवस्त्र परिधान केलेले, चाळीस पन्नास वर्षांचे एक गृहस्थ दरवाज़ाकडे पाठ करून बसले होते. त्यांची शेंडी लांब असून पाठीवर रुळत होती. पुजा चालूं असतांच ते कसलें तरी स्तोत्र मोठमोठ्यानें म्हणत होते. माजघरानंतर मागील बाजूस पडवी असून त्यापुढें परसाला सुरवात झाली होती.

बराच वेळ झाला. तो मुलगा दाराशीं तिष्ठत उभाच होता. आंतून बाहेर येतांना कोणीही दिसेना. बिचारा निराश झाला आणि उभे राहून राहून पाय दमल्यामुळें पायरीच्या जवळच असलेल्या एका दगडावर टेंकला. त्याच्या दुःस्थितीचें भीषण चित्र त्याच्या डोळ्यापुढें नाचूं लागलें. त्याचें दर्शन सहन होईना म्हणून तो आपलें तोंड दोन्हीं हातांनीं झांकून घेऊन ओक्साबोक्शीं रडूं लागला. पण त्याचें समाधान कोण करणार ? जगांत गरिबांच्या दुःखांनीं द्रवणारा परमेश्वराशिवाय कोण असणार ? तो अशा स्थितींत किती तरी वेळ बसला होता. इतक्यांत माजघरांत पुजा करणारे ते गृहस्थ बाहेर आले. दुकानावर कोणीच नोकर हजर नसल्यामुळें त्यांनीं तावडतोब त्यांच्या बाप-आजा-पणजांच्या उद्धाराला सुरवात केली. हा सकाळचा पवित्र 'विधि' यथासांग पार पडल्यावर स्वारीची दृष्टि पायरीलगतच्या दगडावर बसलेल्या त्या मुलाकडे गेली. आधींच पेटलेला क्रोधाग्नि त्याला पहातांच अधिक प्रदिप्त झाला आणि ते गृहस्थ ओरडून म्हणाले,

" राम्या, गाढवा, तुझ्या बापानें ठेवली आहे का ती जागा बसायला ? चल, चालता हो बघूं येथून. "

त्या क्रुद्ध स्वरानें दचकून तो खाडकन् उभा राहिला आणि जोहार करून दीन वाणीनें म्हणाला,

"शेटजी, नका व्ह मला हकूनशान् लावूं. नका व्ह इतकं निर्दय व्हऊं. मांज्या गरिबीकड बगा. "

"म्हणे माझ्या गरिबीकडे बघा ! तुझ्या स्थितीकडे पाहून काय कींव येणार आहे ? तुम्हीं महारडीं केलेले उपकार चांगले फेडतां ! एखाद्या कुत्र्यावर उपकार करावे, पण तुम्हां महारडयांवर कधीं उपकार करूं नयेत शहाण्या माणसानं."

"शेटजी, त्योत मांजा काय व्ह अपराध ? मी काय पाप केलीया ? इतरांच्या पायीं मांजावर कां इनाकारन रागावतां ? " रामा अत्यंत लीनतेनें म्हणाला.

"अरे, इतरांच्याकरितां कशाला ? तुझ्या बापानंच काय केलं तें पहा. महारडाच लेकाचा तो ! मागितले माझ्याजवळ पैसे. दिले मी त्याला. वाटलं देईल हलके हलके. पण तो थोडाच बसला आहे आपल्या ब्रीदाला चुकायला ! मरतेसमयीं एक कपर्दिक तरी द्यायची होतीन त्यानं मला ! छे ! गुलामानं मला सगशल बुडवलं. त्याची आठवण झालीं कीं अंगाची आग होते आणि वाटतं या महारडयांना एकजात फांशी देऊन टाकावं ! राम्या, गाढवा, माझं पित्तु विनाकारण खवळवूं नकोस. चालता हो माझ्या समोरून." शेटजी संतापून म्हणाले.

" शेटजी, असं काय करता व्ह ? मांज्याकडे बगा. आज दोनं दिसांत गोलाभर अन्न न्हाय मांज्या पोटामंदी मांज्याच्यानि उभबी न्हावत न्हाय. काय बी खायासनि द्या. मराया टेकलोया." रामा अगदीं काकुळतीला येऊन म्हणाला. त्याचे पाय या वेळेला खरोखरच थरथर कांपत होते. तो कसा तरी जीवाचा धडा करून उभा होता.

" मरायला टेकला आहेस ? कसला मरतोस तूं ! तुम्हीं महरडीं वीष पाजलं तरी मरावयाचो नाहींत म्हणून तर हिंदुधर्माच्या मानगुटी बसलां आहांत. त्याच्या पावित्र्याला कलंक लावित आहांत. बाटून टाकला आहांत सारा धर्म ! तुमचा सत्यानाश होईल त्या दिवशीं सुटेल हिंदुधर्म तुमच्या त्रासांतून ! तुम्हांला जिवंत ठेवण्याची दुर्बुद्धि कशी सुचली आमच्या पूर्वजांना कोणास ठाऊक ! " शेटजींचा राग प्रत्येक क्षणाला वाढत चालला होता. तो कसा तरी आवरून ते परत म्हणाले,

"राम्या, आतां बऱ्या बोलानं जातोस का गडयाला बोलवून हांकलून लावूं ?"

" शेटजी, एक गोलाभर अन्न द्या. न्हाय, काय बी मागत न्हाय आनकी मी. " रामानें डोळयांत अश्रू आणून शेटजींना विनवलें. पण फत्तरापेक्षांही कठीण बनलेल्या शेटजींच्या अंतःकरणाला त्यानें पाझर कसा फुटणार ? उलट येवढासा ढोपरायेवढा पोर आपलें ऐकत नाहीं हें पाहून त्यांचा राग अनावर झाला. त्यांनीं गालिप्रदानाला सुरुवात केली. त्यांच्यासारखा गालिप्रदानपटु साऱ्या वडगांवांत

कोणीच नव्हता ! पण त्यांनीं चालूं केलेल्या नव्या जुन्या अश्लिल शद्वांच्या माऱ्यानें रामावर काडीइतकाही परिणाम झाला नाहीं.

"शेटजी, आतां मारनार आनि तारनार आपनच. मी हतून जरापून हलनार नाय. ह्यो उमरठ्यावर डोई ठेवूनशान् असा बसन्."' रामा निश्चयी स्वरांत म्हणाला.

त्यानें खरोखरच उंबरठ्यावर मस्तक ठेवलें. त्याच्या त्या कृतीनें शेटजींच्या क्रोधानलांत एक नवीनच आहुति पडल्यासारखी झाली. एका महारानें घराला केलेला स्पर्श त्यांच्यासारख्या धर्ममार्तंडाला कसा सहन होणार ? ते मोठ्यानें ओरडून म्हणाले,

"राम्या, हालतोस कीं नाहीं तेथून ?" रामानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. क्रोधातिरेकानें त्यांचें भान नाहींसें झालें. त्यांनीं जवळच असलेला सोटा घेऊन त्याच्याकडे जोरानें फेकला. सोट्यानें आपलें कार्य पार पाडलें ! रामाच्या कपाळावर जबर जखम होऊन त्याचें तोंड रक्तबंबाळ झालें. त्याला मूर्च्छा आली. त्याच्यानें जाग्यावरून हलवना. आपण केलेली शिक्षा अगदीं कमी आहे असें वाटून शेटजींनीं पुढें येऊन त्याला जोरानें लाथ मारली. तो गटारांत कोलवंडून पडला.

थोडयाच वेळांत रस्त्यानें जाणारी येणारी मंडळी तो प्रकार पाहून तेथें जमा झाली. रामाची ती अवस्था पाहून पुष्कळांना हळहळ वाटूं लागली. कित्येकांनीं तर शेटजीना मनांत शिव्याही दिल्या. पण कृतीच्या द्वारें आपले विचार व्यक्त करण्याला कोणीच धजला नाहीं. शेटजींच्या तोंडाचा पट्टा मात्र अद्याप पूर्ववत चालूं होता.

" कोण धोट झाली ही महारडीं ? आज घराची पायरी कीं चढायला लागलीं ! आज हटकलं नाहीं तर उद्यां आमच्या पानांत येऊन बसतील; सारा भ्रष्टाकार करून टाकतील. त्यांना अशीच चांगलीं टोणपली पाहिजेत. गय करून मुळींच उपयोग नाहीं. " बोलत बोलत ते रामाजवळ गेले.

" ए गध्या, मेला नाहींस काय मारानं ! उठ आणि चालायला लाग. पडलास काय इथं ? तुझ्या नांवानं स्नान करावं लागेल नां मला परत !"

ही त्यांची बडबड अशीच पुढें बराच वेळ चालली असती. पण इतक्यांत एक घोड्याची गाडी रस्त्यावर उभी राहिली. तिच्यांतून शरिरानें सडपातळ, वर्णानें गौर, पूर्ण पाश्चात्य पोषाख केलेले एक गृहस्थ बाहेर पडले. त्यांना पहातांच "किरिस्ताव साहेब" अशी कुजबूज जमलेल्या मंडळींत सुरू झाली. वाट देण्याकरितां ती बाजूला सरकली. रामा पडला होता तेथें ते आले. जखमेंतून रक्त भळभळ वहात आहे, रामा अस्ताव्यस्त पडला आहे हा देखावा दृष्टीस पडतांच त्यांची मुद्रा दुःखित

झाली. त्यांनीं एक चकार शब्दही न बोलतां नोकराच्या मदतीनें त्याला गाडींत उचलून ठेवलें आणि गाडी चालूं करण्यास हुकूम दिला. गाडी खड् खड् आवाज करीत निघून गेली.

× × × ×

रामाची जात महार होती. पण त्याचें मेहेतर घराणें वंशपरंपरेनें आलेल्या जमीनजुमल्यामुळें वडगांवासभोंवतालच्या गांवांतील जुन्या आणि वजनदार घराण्यांत गणलें जात असे. स्वराज्य–संस्थापनेच्या काळांत मेहतरांच्या घराण्यांतील अनेक वीर मर्दुमकीचीं कामें करून धारातीर्थीं पतन पावले होते. त्या घराण्यांतील एका पुरुषानें आपल्या शूरत्वाबद्दल एकदां एका किल्ल्याची किल्लेदारीही मिळविली होती. फार कशाला ? गेल्या महायुद्धांत रामाच्या वडिलांनीं आणि एका चुलत्यानें स्वतः रणांगणावर सरकारला केलेल्या मदतीनें पूर्वजांचा आनुवंशिक गुण आमच्यांतही आहे हें सिद्ध केलें होतें. युद्धसमाप्तीनंतर त्यांच्या मर्दुमकीचा गौरव करून सरकारनें त्यांना पदकें दिलीं होतीं. त्यामुळें या घराण्याला वडगांवांतच नव्हे तर इतर ठिकाणीं सुद्धां अधिक मान मिळूं लागला होता. पण क्षणांत रावाला रंक बनविणाऱ्या, नंदन वनाला वैराण वाळवंट बनवणाऱ्या दैवगतीच्या गहन फेऱ्यांत तें एकाएकीं सांपडलें.

वडगांवांत इन्फ्लुएन्झा सुरूं झाला. जिकडे तिकडे कहर उसळला. आज हा मेला, तो आजारी आहे याशिवाय गांवांत कोणतेंच बोलणें ऐकूं येईना. ज्या घराकडे पाहावें त्या घरासमोर फुटलेल्या मडक्याचे तुकडे, जळलेल्या गोवऱ्या, ओल्या कळकीच्या काठयांचे तुकडे याखेरीज कांहींच दिसत नसे. रात्रींबेरात्रीं वाटेल तेव्हां "जयराम, भाई राम" हा अशुभ ध्वनि ऐकूं येत असे. गांवकरी या सांथीनें तर अगदींच घाबरून गेले होते. तिला प्रतिबंध करण्याकरितां ज्याला जो उपाय सुचेल होता तो तो अमलांत आणीत होता. भाविक लोक हा ईश्वरी कोप समजून देवीला कौल लावण्यांत गर्क झाल. पण तिचा जोर कमी न होतां ती वाढतच चालली.

त्या राक्षसीचा घाड लौकरच मेहेतरांच्या घरावरही आली. तिच्या पहिल्या हल्ल्यांतच रामाचे वडील हनमंतराव आणि एक चुलता बळी पडले. त्याच्या आईनें आणि इतर मंडळींनीं त्यांच्यामागून तोच मार्ग स्वीकारला. रामासुद्धां या दुष्टेच्या कचाटयांत सांपडला होता. पण आयुष्याची दोरी बळकट असल्यामुळें यमराजाच्या पाशांना त्यानें दाद दिली नाहीं. परमेश्वरी इच्छेनें जगाच्या निर्दयपणाचे घाव सोसण्याकरितां तो जिवंत राहिला.

त्या भयंकर सांथीचा भर ओसरला. गांवांत जरा स्थीरस्थावर झालें. गांवांतील शिष्ट मंडळींना रामाच्या स्थितीकडे लक्ष देण्याला आतां सवड मिळाली. त्यांनीं

थोडयाच दिवसांत त्याच्या घरांतील कागदपत्रांची, जमिनजुमल्याची नीट तपासणी केली आणि त्याचा जवळचा कोणीच नातेवाईक जिवंत नसल्यामुळें गांवांत अतिशय संभावित व धार्मिक गणले जाणाऱ्या गणपतशेटजींच्या ताब्यांत सर्व देऊन ठेवलें.

गणपतशेटजी जातीनें वाणी होते. त्यांचें वडगांवांत एक किराणा जिन्नसांचें दुकान होतें; शिवाय ते सावकारीही करीत असत. व्याज घेण्याची त्यांची पद्धति फारच विलक्षण होती. त्यांच्या घरांत गेलेली कोणतीही गहाण वस्तु मालकाला परत मिळाली आहे असें कधींच घडत नसे ! तरी ही त्यांची फसवेगिरी व्यवहार-कुशलता या गोड नांवाखालीं दबली जात असे. वारंवारं ब्राम्हणभोजनें घालणें, चार चार तास देवपुजा करणें, सकाळ-संध्याकाळ देवळांत जाऊन देवापुढें कान उपटणें, थोबाडींत मारून घेणें हें ते कधीं कधीं सुद्धां चुकूं देत नसत. शिवाय पोथ्यापुराणां-तील दाखले त्यांच्या इतके मुखोद्गत असत कीं, एखादा पट्टीचा हरिदाससुद्धां त्यांच्यापुढें हात टेकील ! त्यांचें सोंवळें तर इतकें कडक असे कीं, महारचांभारांची सांवलीच काय, पण ते जर नुसते जवळून गेले तरी त्यांना सचैल स्नान करावें लागत असे. इतकी जय्यत तयारी असल्यावर अडाणी महार-कुणब्यांची तीन चारशें वस्ती असलेल्या वडगांवासारख्या गांवढचा गांवांत धर्मात्मे म्हणून त्यांची कीर्ति कां होणार नाहीं ? वासरांत लंगडी गाय शहाणी असतेच !

रामाचा जमिनजुमला वहिवाटीला आल्यानंतर लगेच शेटजींच्या तोंडाला पाणी सुटलें. तो सर्व आपल्या घशांत उतरतां येईल तर बरें होईल असें त्यांस वाटूं लागलें. कोणत्या उपायानें आपला इष्ट हेतु साध्य करावा याचा विचार करण्यांत ते गुंगून गेले. लौकरच त्यांच्या डोक्यांत एक अजब शक्कल आली. हनमंतरावांनीं (रामाचे वडिल) शेटजींकडून पूर्वी कधीं कांहीं रक्कम कर्जाऊ घेतली होती. ती सर्व फिटल्यानंतर त्यांच्या धार्मिकपणावर विसंबून, लिहून दिलेला रोखा त्यांनीं फाडून घेतला नव्हता. शेटजींना त्याची आठवण झाली. ताबडतोब त्यांनी जुनीं दप्तरें तपासून तो शोधून काढला. चक्रवाढ व्याजानें मोजदाद करून भली भक्कम रक्कम तयार केली; नंतर गांवांतील चार शिष्टांना आपल्या घरीं बोलावून आणून ते अगदीं साळसूदपणानें म्हणाले,

" हनमंतरावांचा आणि माझा फार घरोबा. आपल्याला माहितच आहे. म्हटलं ते आपले पैसे कशाला बुडवतील ! देतील केव्हां तरी ! त्यांच्या हातचा मळ आहे तो ! पण ते गेले मरून आणि माझी रक्कम देणं तसंच राहिलं. आतां तर इलाज नाहीं. मला आहे पैशांची गरज. तेव्हां म्हटलं चार मंडळींना जमवून पैसे

परत मिळण्याचा कांहीं उपाय निघाला तर पहावा. हो, आपण आपलं कांहीं तरी करून अपयशाचे धनी होणं बरं नाहीं.''

'' अहो, पण शेटजी, जिंदगीची सर्व तपासणी केली त्या वेळेलाच कां बोललां नाहींत आपण ? '' एका शिष्ठांनीं आढयतेनें प्रश्न केला.

'' मला कांहीं हृदय आहे कीं नाहीं ? हनमंतराव वारले नाहींत तोंच कर्जाची गोष्ट कशी काढूं ?'' शेटजी एकदम म्हणाले.

'' खरं आहे. खरं आहे. शेटजींच्यानं तसं कधींही करवणार नाहीं ! '' दुसरे एक शिष्ठ मान हलवित हलवित म्हणाले.

'' बरं, तें राहूंद्या. शेटजी, तुमची रक्कम तरी किती आहे ?'' तिसऱ्या एका गृहस्थांनीं पृच्छा केली.

'' होईल सात आठ हजार रुपये. '' शेटजींनीं उत्तर दिलें.

'' अबब ! रक्कम तर मोठी आहे. मला वाटतं हनमंतरावांची इतकी रोख रक्कम कांहीं शिल्लक नसेल. पण तुम्हांला तर पैशांची जरूरी आहे म्हणतां. तेव्हां तुम्हींच सुचवा काय व्यवस्था करावी ती. '' पूर्वीचे गृहस्थ म्हणाले.

'' आजच मला सर्व रोख रक्कम हवी आहे असं कांहीं नाहीं. हनमंतरावांचं घरदार, जमिनजुमला ह्या रकमेबद्दल मला मिळाला म्हणजे झालं. वाटलं तर रामाला जन्मभर पोसण्याची जबाबदारी मी आपल्यावर घेतों. तशी कांहीं माझी हरकत नाहीं. '' शेटजी अगदीं साधेपणाचा आव आणून म्हणाले.

'' आज सर्व मालमत्ता तुमच्या स्वाधीन करून उद्यां रामा वयांत आला आणि त्यानं आम्हांला विचारलं म्हणजे काय सांगूं आम्हीं ?'' शेटजींच्या मागणीनें चिडून जाऊन एक गृहस्थ म्हणाले.

'' रामराव, अहो, असे चिडून जाऊं नका. शेटजी म्हणतात तें बरोबर आहे. रामा वयांत येई तोंपर्यंत त्यांनीं आपली येवढी मोठी रक्कम बुडत कां ठेवावी ?''

अशा रीतीनें बराच वेळ खल केल्यानंतर शेटजींनीं हनमंतरावांच्या सर्व जिंदगीची व्यवस्था मालकाप्रमाणें पहावी असा ह्या मंडळींनीं आपल्या अगाध कायदेपांडित्याचा उपयोग करून (कारण ती सर्वच मंडळी कायदेपंडित होती !) एकमतानें निकाल जाहिर केला. शेटजींचा आनंद गगनांत मावेना. शेवटीं सर्वांच्या डोळ्यांत धूळ टाकून आपण विजयी झालों हें पाहून त्यांच्या हर्षक्षीरांला उकळ्या फुटूं लागल्या. पण रामरावांचा मिठाचा खडा तें नासून टाकिल ही भिती त्यांच्या हृदयांत मधून मधून डोकावत होती. सर्व मंडळी जावयास निघाली तेव्हां त्यांनीं रामरावाला खुणेनें मागें

राहण्यास सांगितलें. सभोंवार कोणी राहिलें नाहीं अशी खात्री झाल्यावर ते त्यांच्या-जवळ कानगोष्टी करूं लागले. त्या संपून जावयाच्या वेळेला शेटजींनीं त्यांच्या हातांत 'कांहींतरी' दिलें. ते आपल्या घरीं निघून गेले.

याप्रमाणें शेटजींचा मार्ग निष्कंटक झाला. त्यांना अडथळा करणारें आतां कोणींच राहिलें नाहीं. आपण कांहीं जरी केलें तरी आपले मुखत्यार आहोंत अशी त्यांची खात्री झाली. त्यांनीं तावडतोव रामाला त्याच्यासह त्या घरांतून काढून दूर गांवा-बाहेर असलेल्या आपल्या मालकीच्या एका खोपटांत राहण्यास सांगितलें व तें आपल्या ताब्यांत घेतलें. मात्र त्या वेळेला यथासांग विधि करून तें शुद्ध करण्याला ते विसरले नाहींत. यानंतर रामाकडे त्यांनीं ढुंकून सुद्धां पाहिलें नाहीं. स्वतःच्या माल-कीची जमीन असून रामाला दोन दोन दिवस उपवास पडूं लागले. त्याच्या घरीं नोकर असलेल्या लोकांपुढें भाकरीच्या एका तुकडयाकरितां तोंड वेंगाडण्याची पाळी त्याजवर आली. ज्याच्या घरांत प्रतिरात्रीं दिव्यांचा लखलखाट असे त्याला ह्या भयाण खोपटांत सोबत देणाऱ्या दिव्याकरितां भीक मागून तेल आणावें लागत असे. हरहर ! कोण ही विचित्र दैवगती ! अशा स्थतींतच तो शेटजींकडे आला होता.

× • × • × • × • ×

वीस वर्षें लोटलीं. रामाची आठवण वडगांवचे गांवकरी आज पार विसरून गेले होते. विस्मृतीच्या पडद्याआड त्याची मूर्ति अदृश्य झाली होती. त्यावेळीं चाळिशीपन्नाशीच्या घरांत असलेल्या मंडळींच्या चेहेऱ्यावर मृत्यूची शुभ्रपताका दिसूं लागली होती. शेटजींत तर फारच फरक पडला होता. त्यांचा ताठ शरिरयष्टी हल्लीं वांकली होती. त्यांचे पाय काठींच्या आधाराशिवाय काम करण्याचें नाकारूं लागले होते. हजारों केलेल्या खोटया सह्या डोळ्यापुढें नाचत असल्यामुळेंच कीं काय, त्यांच्या हातांना कंप सुटला होता. त्यांच्या गरगरीत डोळ्यांनीं मृत्यूच्या भयानें आंत दडी मारली होती. त्यांच्या पूर्वीच्या सतेज, भरदार गालांनीं सुरकुत्यांचा वेष धारण केला होता. एकंद-रींत त्यांच्यांत इतका फरक पडला होता कीं, पूर्वी त्यांना पहिलेल्या मनुष्याला आज हेच ते शेटजी असें छातीठोक सांगतां आलें नसतें.

सकाळची वेळ होती. शेटजी तोंडांत भरलेला पानतंबाखूचा बार चघळित गादीवर बसले होते. इतक्यांत नखशीखांत पाश्चात्य पोशाख केलेला, वर्णानें काळा, बांध्यानें ठेंगणा, पण पाणीदार डोळे असलेला एक तरुण पायरी चढून वर आला. "बाणपतशेटजी आहेत का ?" तरुणानें उच्च स्वरांत विचारलें. शेटजींनीं "मीच तो" असें उत्तर दिलें. ते काठीच्या आधारानें उठून उभे राहिले आणि "ए गोंद्या,

ए गोंद्या, साहेबांना खुर्ची आण. खुर्ची आण.'' म्हणून गडग्याला मोठमोठ्यानें हांक मारूं लागले. गोंद्यानें एक धूळ बसलेली, जुनीपुराणी खुर्ची आणतांच त्यांनीं ती आपल्या हातांतील रुमालानें झाडून साफ केली आणि आलेल्या तरुणास वर बसण्यास सांगितलें. आदरातिथ्याचा समारंभ अशा रीतीनें यथास्थित पार पडल्यानंतर ते बोलूं लागले.

" हें, हें, आपल्या सारख्यांचे पाय माझ्या घराला लागले हें माझं मोठं भाग्य आहे. आपल्यासारखी मंडळी माझ्या इथं फार क्वचित् येतात. बरं, साहेबांनीं आज माझ्या इथं कां येणं केलं ?''

" आपल्या इथं माझं एक अत्यंत महत्वाचं काम आहे.'' तरुणानें उत्तर दिलें.

" काय काम आहे आपलं ? सांगा तर खरं. '' शेटजीनीं पृच्छा केली.

" मला आपल्या गांवांतील एका गृहस्थासंबंधी माहिती विचारायची आहे. ''

"साहेबांना ती सहज मिळूं शकेल. गांवांतील कोणत्याही इसमाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतची सर्व हकीकत मला माहित आहे. नांव तर सांगावं त्याचं साहेबांनीं.''

" हनमंतराव मेहेतर.'' तो तरुण म्हणाला.

" हनमंतराव मेहेतर फार चांगला मनुष्य. आम्हीं परजातीचे असलों तरी त्यांचा आणि माझा अतिशय स्नेह. संपत्ति-संतति सर्व गोष्टी अनुकूल होत्या. पण दैव प्रतिकूल !'' बोलतां बोलतां शेटजींनीं एक दीर्घ निश्वास सोडला. " एकदां इन्फ्लुएन्झाच्या साथींत ते आणि त्यांच्या कुटुंबांतील सर्व मंडळी बळी पडली. नाहीं म्हणावयाला रामा नांवाचा एक त्यांचा मुलगा शिल्लक राहिला होता.''

" पण, त्याचं पुढं काय झालं ?'' त्या तरुणानें मध्येंच प्रश्न केला. या वेळीं त्याच्या मुद्रेंत एकाएकीं पडलेल्या फरकावरून कोणत्या तरी गतस्मृतीनें त्याच्या अंतःकरणांत खळबळ उडाली असावी हें स्पष्ट दिसत होतें.

"तोही त्या साथींत सांपडला होता. पण परमेश्वरानं माझ्या हाताला यश दिलं आणि तो यमराजाच्या पकडींतून सुटला. पुढं एका किरिस्तावाबरोबर तो कुठंसा निघून गेला म्हणतात. मी त्यांचा पुष्कळ तपास केला, पण कांहीं कळलं नाहीं. अशा प्रकारें प्रेमळ मित्राचं स्मृतिचिन्ह देखील परमेश्वरानं माझ्याजवळ ठेवलं नाहीं.'' शेटजींचा कंठ दुःखानें भरून आला असें दिसलें. ते जरा थांबले आणि पुनः म्हणाले, " साहेब आपल्याला त्याच्यासंबंधीं कांहीं माहिती आहे का हो ? ''

त्यांच्या या दुःखप्रदर्शनाकडे पाहून त्या तरुणाच्या दृष्टींत एक प्रकारचा तिरस्कार दिसत होता. पण ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली नाहीं.

"होय, तो हल्लीं इथं आपल्या गांवांत आला आहे." तरुणानें उत्तर दिलें.

"काय म्हणतां ? तो इथं गांवांत आला आहे ?" शेटजींनीं आश्चर्यानें विचारलें.

"तो इथं आला आहे. इतकंच नाहीं तर त्याला आपणांला भेटण्याचीही इच्छा होती. पण त्याच्या वडिलांची सर्व जिंदगी आपण गिळंकृत केलीत अशी त्याचा खात्री झाल्यामुळं तो चिडून गेला आहे." तरुणाचा आवाज आतां पूर्वीपेक्षां चढला होता.

"छे, छे, हो ! भलतंच कांहीं तरी ! मी हनमंतरावांचा इतका स्नेही ! आणि मित्रद्रोह कसा करीन ? गैरसमज ! निव्वळ गैरसमज दिला कोणी तरी करून त्याचा. तें कांहीं नाहीं. त्याला भेटून तो दूर केलाच पाहिजे. मग कसं करावं बरं ? हो, कारण माझ्यानं हल्लीं कुठं बाहेर जाववत नाहीं. त्याला एकदां घेऊन या इकडं."

" बघेन. पण आपण त्याला आपल्या घरांत घेतलं पाहिजे."

हें त्या तरुणाचें भाषण ऐकून शेटजी मोठ्या विचारांत पडले. आपण होऊन रामाला आणावयास सांगितलें. आतां होय म्हणावें तर महाराचा पोर घरांत येऊन सारा भ्रष्टाकार होणार. बरें नाहीं म्हणावें तर साहेबांना राग येणार. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी त्यांची चमत्कारिक स्थिति झाली. कांहीं वेळ स्तब्ध राहिल्यानंतर त्यांना कांहीं तरी सुचलें आणि ते एकदम म्हणाले,

" पण साहेब, तो किरिस्ताव झाला का हो ?"

" होय, शेटजी, येशूचा पवित्र धर्म त्यानं स्वीकारला आहे."

शेटजींची मुद्रा आनंदित झाली. एका महा संकटांतून आपण पार पडलों असें त्यांना वाटूं लागलें.

" असं जर असेल तर कांहींच हरकत नाहीं ! किरिस्ताव म्हणजे कांहीं महार नव्हे कीं मी त्याला घरांत येण्यास हरकत करीन. परधर्मानं तो पवित्र झाला आहे. आतां तो कांहीं महार राहिला नाहीं ! " ते झटकन् म्हणाले.

" शेटजी, त्याला आपण ओळखूं शकाल का ?" त्या तरुणानें प्रश्न केला.

" साहेब, त्यांत काय सांगायला पाहिजे ? मी त्याला सहज ओळखीन ! "

शेटजींची ही फाजिल खात्री पाहून तरुणाच्या चेहऱ्यावरचा तिरस्कार नाहींसा होऊन त्या ठिकाणीं किंचित् हास्यछटा दिसूं लागली.

" शेटजी, तें राहूं द्या. त्याच्यांत इतका फरक पडला आहे कीं, त्याला आपण केव्हांही ओळखूं शकणार नाहीं."

" अहो, ज्याला हजारों वेळां पाहिलं आहे तो पोरगा ओळखतां येणार नाहीं ? कितीही फरक झाला तरी चेहेऱ्यांत साम्य असेल ना ?"

" फार कशाला ! घे.डेमैदान जवळच आहे. सांगा. आपणासमोर कोण आहे हें आपण ओळखतां का ?" तरुणानें पृच्छा केली.

" आपण कोण असणार ? आपण साहेब आहांत ! आपण थोडेच रामा असूं शकणार आहांत ?" शेटजी म्हणाले.

" शेटजी, आपण ओळख विसरलांत. पण मीच हनमंतराव मेहेतरांचा मुलगा रामा." त्यानें त्यांच्याकडे तीव्र नजरेनें पहात म्हटलें. शेटजींनीं तरुणाकडे कांहीं वेळ निरखून पाहिलें आणि नंतर हंसत हंसत म्हटलें,

"साहेब,राग मानूं नका.आपला कांहीं तरी गैरसमज झाला असेल किंवा आपण तरी मला——" येथें ते एकदम थांबले. त्यांची जीभ अडखळली. त्यांना पुढील शब्द उच्चारण्याची छाती होईना. पण आपली ही धांदल तरुणाच्या लक्षांत येऊं नये म्हणून स्वतःला चटकन् सावरून घेऊन त्यांनीं बोलण्याला सुरुवात केली.

" बरं, तें असूं द्या. पण आपल्याजवळ कांहीं पुरावा आहे का हें सिद्ध करायला ?—नाहीं ! नाहीं ! तशी कांहीं गरज नाहीं. पण म्हटलं आपली चौकशी करावी. "

"शेटजी, पुरावा ? पुरावा पाहिजे ?" तो तरुण आतां चिडून बोलूं लागला. बोलतां बोलतां त्यानें एका हातानें आपल्या कपाळावरील केस वर केले आणि म्हटलें,

" हा घ्या पुरवा. वडिलोपार्जित जिनगी आपण लुबाडल्यानंतर अन्नाला मोताद होऊन मी एका भाकरीच्या तुकड्याकरितां आपल्या दारापुढं आलों असतां रागाच्या भरांत फेकलेल्या सोटयानं केलेली ही खूण पहा. पाहिलीत ही खूण ? आतां आपलं समाधान झालं ना ? रामाला महारडा म्हणून आपण काठीनं मारलं, पण तोच स्त्रिश्चन होऊन आल्यावर त्याला खुर्ची देत आहां ! त्यापुढं गोंडा घोळतां आहां ! शेटजी, हा फरक कशामुळं झाला ?"

शेटजी यावर काय उत्तर देणार ? ते त्या तरुणाकडे आ करून आश्चर्याने पहातच राहिले.

× ० × ० × ० × ० ×

महार म्हणून तिरस्काराला पात्र झालेला रामा स्त्रिश्चन होतांच शेटजींनीं त्याला योग्य मानापमानानें आपल्या घरांत खुर्ची दिली. शेटजींच्या स्वभावांतील ही क्रांति रामाच्या धर्मांतरानें त्याला दिलेल्या महत्वामुळें झाला कीं शटजींच्या वयोमानामुळें झाली ?

मुलांची मौज !

दुष्ट जादूगारीण.

(वि. रा. शिरूर.)

[या गोष्टीस, ती सर्वांत चांगली ठरल्यामुळें, श्री. चिं.वि. वैद्य कृत ' श्रीरामचरित्र ' हें पुस्तक बक्षिस दिलें आहे. —**संपादक**]

एक राजा होता. त्याच्या राजवाडयाजवळ एक मोठी बाग होती. राजकन्या त्या बागेंत एकटीच खेळून खेळून दमली होती. इतक्यांत तेथें एक म्हातारी बाई आली आणि म्हणाली, "राजकन्ये, मला गांवचा रस्ता दाखवतेस का ?" राजकन्येला तिची दया येऊन ती म्हणाली, " चल, मी तुला वाट दाखवतें." असें म्हणून राजकन्या आणि ती म्हातारी चालूं लागली. पुढें ती एका रानांत आल्याबरोबर म्हातारीनें एकदम त्या राजकन्येचा हात धरला आणि म्हटलें, "बरी माझ्या तडाक्यांत सांपडलीस ! आतां तुझे मी चांगले हाल करणार." असें ह्मणून तिनें त्या राजकन्येच्या अंगावरचे दागिने आणि कपडे काढून आपल्या अंगावर चढवले आणि एक फाटकें वस्त्र तिला दिलें. राजकन्या घाबरून तिच्याकडे पाहूं लागली. पण ती दुष्ट म्हातारी तिच्या रडव्या तोंडाकडे पाहून हंसूं लागली. तिनें आपल्या कनवटीची लहानशी डबी काढून तिच्यांतली पूड आपल्या तोंडाला लावल्याबरोबर ती राजकन्येसारखी बनली आणि तिला एकटीच त्या रानांत ठेऊन निघून गेली. राजकन्या कांहींशी धीट असल्यामुळें ती न रडतां लांब दिवा दिसत असलेल्या दिशेनें जाऊं लागली. अखेर ती त्या झोंपडीजवळ येऊन तेथें उभ्या असलेल्या एका म्हाताऱ्या मनुष्याला म्हणाली, " मला आजची रात्र झोंपडींत झोंपायला जागा द्याल का ?" म्हाताऱ्या मनुष्याला तिची दया आली आणि त्यानें तिला आंत आणून जेऊं घातलें. तिनें आपली हकिगत सांगतांच त्याला फार वाईट वाटलें आणि त्यानें म्हटलें, "तूं आतां जरी राजवाडयांत गेलीस तरी तूं राजकन्याच आहेस हें कोणीहि कबूल

करणार नाहीं. कारण तुझ्या अंगावर दागिनेहि नाहींत. ती दुष्ट म्हातारी आपल्या जादूच्या सहाय्यानें तुझ्यासारखी बनून राजवाडयांत गेला आहे. तेव्हां तूं तेथें जाऊन कांहींच उपयोग होणार नाहीं. तेव्हां तूं आतां माझ्याकडे रहा." राजकन्येनें त्याचें म्हणणें कबूल केलें. ती त्याच्या कामांत त्याला मदत करूं लागली. तो शेतावर गेला म्हणजे ती त्याच्यासाठीं जेवण वगैरे करून ठेवी.

कांहीं दिवसांनीं एकदां राजकन्या झाडाची फुलें तोडून परत घरांत येत असतांना एक पंख तुटल्यामुळें झाडावरून पडलेल्या कबुतराकडे तिची नजर गेली. तिला त्याची दया आली आणि तिनें त्याला आंत आणलें. खाऊ वगैरे घालून तिनें बरेच दिवस त्याचें पोषण केलें. अखेर तें कबुतर बरें होतांच तिनें त्याला बाहेर आणलें आणि त्याला कुरवाळून जमिनीवर ठेवलें. पण इतक्यांत चमत्कार होऊन तें कबुतर नाहींसें झालें आणि त्या ठिकाणीं एक सुंदर राजपुत्र दिसूं लागला. तो तिच्याकडे पाहून म्हणाला, " राजकन्ये, तुला ज्या म्हातारीनें असें फसवून गरीब केलें तसेंच तिनें मलाही फसवून एक कबुतर केले होतें. पण तूं आतां मला सोडवलेंस. मी आतां त्या म्हातारीपेक्षां बरीच जादू शिकलों आहे. तिची आतां चांगलीच खोडकी जिरवतों." असें म्हणून त्यानें आपल्या कमरेचें शिंग घेऊन वाजवलें. त्याबरोबर एकदम पांचशें शिपाई सभोंवतीं उत्पन्न झाले. त्यांपैकीं एकानें एक पांढरा घोडा आणून राजपुत्रापुढें उभा केला. त्याच्यावर त्यानें राजकन्येला बसवून आपण तिच्या पाठीं बसला आणि राजवाडयाजवळ आला. त्या दुष्ट जादुगिरीणीनें राजाला, प्रधानाला, राणीला निरनिराळ्या खोल्यांत कोंडून घातलें होतें आणि सर्व स्थिति पालटून टाकली होती.

राजपुत्रानें त्यांना कैदेंतून सोडवलें आणि शिपायांना त्या दुष्ट म्हातारीला पकडून आणण्यास सांगितलें. त्याबरोबर शिपायांनीं तिला धरून त्याच्यापुढें आणलें. तेव्हां राजपुत्रानें त्या राजकन्येला विचारलें, "आतां हिला काय शिक्षा करूं ?" राजकन्या दयाळू असल्यामुळें तिनें

तिला सोडून देण्यास सांगितलें, पण राजपुत्रानें तें कबूल केलें नाहीं. त्यानें तिच्या कनवटीची डबी काढून घेतली आणि जादूच्या सहाय्यानें तिला रस्त्यावरची एक भिकारीण करून टाकलें.

कुणास्तव ?

[एक लहान मुलगा थट्टेनें आपल्यानुकत्याच लग्न झालेल्या बहिणीस म्हणतो]

गुंफिसी
हार हा, मसी ?
कुणास्तव ताई ?
सांग, सांग, तूं लाजुं नको गे मनिं मुळिं ही. ॥ १ ॥

वीणिला
जाळिचा भला
कुणास्तव बाई-
हा रुमाल सुंदर ? बोलत कां गे नाहीं ! ॥ २ ॥

हालवा
केशरी तुंवा
कुणास्तव केला
मधु स्नेहयुक्त हा ताई, कथिं गे मजला ? ॥ ३ ॥

लाजसा
कशाला अशी
नांव घे ताई !
तें सांग सांगना गडे, मला लवलाही ! ॥ ४ ॥

* * *

काय रे !
करिसि तूं बरें !
चहाटळ भारी !
चल, दूर होइ, जा मजला ठाउक नाहीं ! ॥ ५ ॥

—कृष्णाकुमार

प्रश्न अणि उत्तर

१ लहान मूल कसें असतें ? — अजाण

२ बाहेर जातांना आपल्या खिशांत काय असतें ? — रुमाल

३ शब्दाच्या सुरवातीला न येणाऱ्या अक्षरांत — ण हें एक अक्षर आहे.

४ आपण कंजुष माणसाला काय म्हणतों ?—**मारवाडी**

५ लांबून ओळखतां येणारा रंग कोणता ?—**लाल**

उत्तराची पहिलीं अक्षरें एकीकडे केलीं म्हणजे **अ रु ण मा ला** हीं अक्षरें होतात. आहे कीं नाहीं मौज ? तुम्हांला येईल का अशी मौज करतां ?

वेडी गंगू

गंगूला शिकण्याची आवड मुळींच नव्हती. तिला आईनें आणि आजीनें किती सांगून पाहिलें; पण तिला लिहावाचावयास शिकणें आवडेना. ती एकदां एक पुस्तक घेऊन त्यांतलीं चित्रें मोठ्या उत्सुकतेनें पहात असतांना तिची आजी तिकडे आली आणि म्हणाली, " गंगू, तूं इतक्या आवडीनें तीं चित्रें बघतेस; पण तुलां बाजूला लिहिलेली गोष्ट वाचल्याशिवाय त्यांत काय कळणार ? तूं वाचायला शिकशील तेव्हां तुला त्यांचा अर्थ कळेल. "

गंगू म्हणाली, " न कळेना का ! मी चित्रें पाहीन आणि तूं गोष्ट वाचून सांग; म्हणजे मला त्यांचा अर्थ कळेल. "

आजी रागानें म्हणाली, " मी मुळींच वाचून दाखवणार नाहीं. तुला ती गोष्ट कळायची इच्छा असेल तर तूंच वाचायला शीक."

"आजी निघून गेल्यावर गंगू एखाद्या पोक्त माणसासारखा चेहरा करून वाचावयास कसें शिकावें याचा विचार करूं लागली. शेवटीं तिच्या डोक्यांत कल्पना आली कीं, "आजीनें चष्मा लावला म्हणजे तिला आपोआप वाचतां येतें. मग मी लावला तर मला वाचतां कां येणार नाहीं ?" असा विचार करून तिनें फडताळांतला आजीचा चष्मा आणला आणि तो नाकावर ठेवून ती पुढ्यांत पुस्तक घेऊन बसली. पण तिला चष्म्यांतून एक एक अक्षर अतिशय मोठें दिसूं लागलें. इतक्यांत तिकडे आजी आली आणि तिनें गंगूच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटलें, "अग वेडे ! चष्मा लावला म्हणजे का वाचतां येतें ? मी चष्मा लावतें मला डोळ्यांनीं अक्षरें नीट दिसत नाहींत म्हणून ! चष्मा लावला म्हणजे कांहीं वाचतां येत नाहीं. प्रथम आपण वाचावयास शिकलें पाहिजे. त्याशिवाय तुला त्या चित्राचा काय अर्थ कळणार ? प्रथम वाचायला शीक."

गंगूला आपला वेडेपणा कळून आला आणि ती रोज आजीकडे बसून शिकूं लागली. थोडयाच दिवसांत तिला नीट वाचतां येऊन तिला त्या चित्रांच्या गोष्टीचा अर्थ कळूं लागला.

कोडयाचें उत्तर.

(बऱ्याच उत्तरांपैकीं हें एक उत्तर आहे.)

ब	दा	म	×	रा
×	व	×	र	स
ग	णी	त	×	×
र्व	×	ब	र	णी
×	ना	क	×	×

या कोडयाबद्दल बऱ्याच जणांचा गैरसमज झाल्यामुळें बहुतेक सर्वांचीं उत्तरें चुकली आहेत. सबंध ओळीचा शब्द न बनवतां फुली येईपर्यंत असलेल्या अक्षरांचा शब्द बनवला पाहिजे होता. निरनिराळ्यांची निरनिराळीं उत्तरें आल्यामुळें नांवें छापलीं नाहींत.

नवें कोडें

१ १ १
७ ७ ७
९ ९ ९

या आकडयांतले कोणचेहि सहा आंकडे अशा रीतीनें खोडा कीं राहिलेल्या तीन आंकडयांची बेरीज २० होईल.

(उत्तरें फक्त १४ वर्षाच्या आंतील वर्गणीदारांनींच पाठवावीं.)

लिंबाच्या अंगीं किती गुण आहेत ?

एखाद्या निष्काळजी मुलाच्या कपडयावर आणि हातावर शाई सांडली तर त्या ठिकाणीं कांहीं वेळ लिंबाची शीर घांसावी म्हणजे डाग नाहींसा होतो. तसेंच लहान मुलांना फार खाण्याची अगर जेवण्याची संवय असल्यामुळें अजीर्ण होतें. अशा वेळीं गरम पाण्यांतून सकाळ-संध्याकाळ जेवणानंतर अर्ध्या तासानें लिंबाचा रस घ्यावा. त्यांतच साखर घालून झोपण्यापूर्वी लिंबाचें सरबत घेतलें तर छान झोंप लागते. कित्येक जुनीं नाणींसुद्धां लिंबाची शीर घांसून नवीं करतां येतात. याशिवाय आणखी पुष्कळ फायदे आहेत.

पोंच व अभिप्राय.

(नाट्यछटा)

--मूर्ख आहांत झालं ! अहो, आहे काय यांत ? असल्या साध्यासुध्या गोष्टींत जर आम्हांला डोकं खर्च करायचं पाळी आली तर मग आमचं अक्कल गेली कुठं ? --अहो, कसलं न् काय ? थोडंसं मुत्सद्दी धोरण असलं म्हंणजे बस् ; अभिप्राय द्यायला का कुठं अक्कल लागते ?--बरोबरच आहे. तुम्हांला तें मोठं कठीण दिसतं. पण आमच्या हातचा तो नुसता मळ आहे मळ ! पुस्तक आंतून बाहेरून पहायचं, लेखक कुठला कोण तें पहायचं आणि जरा इकडे तिकडे चाळायचं कीं बस, दोन मिनिटांत अभिप्राय तयार ! ! पुस्तक जरी कितीहि योग्यतेचं असलं तरी प्रथम आमच्या-सारख्यानां लेखकाकडेच विशेष लक्ष पुरवावं लागतं. तो जर आमच्या कंपूतलाच असेल तर त्याचं पुस्तक प्रसिद्ध व्हायच्यापूर्वीच आम्हीं त्यावरचा अभिप्राय तयार ठेऊं. त्यांत त्याची अवास्तव स्तुति करून ' असलं पुस्तक कधीं झालंच नाहीं ' असं सुद्धां म्हणायला कमी नाहीं करणार ! पण तेच जर त्यांच्या आमच्यांत विनसलेलं असेल--कसं म्हणून काय विचारतां ? अहो, तुम्हांला आम्हीं मोठे संपादक वाटलों म्हणून आम्हांलाहि पाणी पाजणारे--आय मीन--माप्यांत पहाणारे कांहीं थोडेथोडके कुटाळ नाहींत. कुठं आम्हीं पत्र पाठवून त्यानं वेगुमानपणानं लेख पाठवला नाहीं, विनसलं कीं नाहीं इथं ? या साऱ्या अपमानाचं उट्टं आम्हीं अभिप्राय देतेवेळीं काढून त्यांचा भरपूर सूड घेतो. अहो, आम्हीं म्हणजे नुसते साप आहों साप. जरा शेपटावर पाय पडला तर असले जहाल फूत्कार टाकूं कीं--वेडे आहांत झालं ! अहो, याला का कुठं योग्यता लागते ? जगांत तो मोठा दांडगा अन् प्रतिभावान् लेखक म्हणून प्रसिद्ध असला तरी आम्हीं संपादकीय खुर्चीवर बसलों आहों हें विसरून आम्हांला कसं चालेल ? तो जगांत उत्तम लेखक ठरला तरी अभिप्राय देते वेळीं आम्हांला आमचा खासगी संबंध नको का पहायला ? अहो, नुसतीं उडत उडत जरी त्याच्या खासगी वर्तनांतलीं एखादी गोम आमच्या कानावर आली तरी पुरे; तिचा उल्लेख त्या अभिप्रायांत केलाच. जगाला तें अगम्य गूढ वाटेना; आम्हीं आमच्या मनाशीं खूष. आम्हांला जगाशीं काय कर्तव्य आहे ?--चूक आहे; आम्हीं म्हणतों तुमची समजूत पार चुकीची आहे. कुजका अभिप्राय देऊन का कुठं आमची किंमत उतरते ? अहो, अभिप्राय कुत्सित आणि मनाला झोंबणारा दिला तरच आमची प्रसिद्धी होते. जगाची रीतच आहे ना अशी ! जगावेगळं गेलं कीं प्रसिद्धी पदरांत पडलीच. सगळ्या वर्तमानपत्रानीं पुस्तकाची हवी तशी स्तुति करून लेखकाची पाठ

थोपटली कीं आपण मुद्दामच तें पुस्तक गचाळ ठरवून लेखकानें पुन्हां हातांत लेखणी घ्यावयाचे श्रम करूं नयेत असं म्हणावं.— हो, हो, मनाला पटत नसलं तरीहि बेशक म्हणावं; कीं सगळ्यांची नजर आपणाकडे वळलीच. कारणाशिवाय प्रसिद्धी येते ती ही अशी. इतकं कशाला ? सध्यांच पहा ना. महात्मा गांधींना हजारांनीं भक्त आहेत; पण त्यांची मतं न पटून उघड उघड त्यानां विरोध करणाऱ्यांलाच सारं जग त्या हजार भक्तांपेक्षां जास्ती ओळखतं कीं नाहीं ? अहो, जगाचो रीतच आहे अशी. पुळचट अभिप्राय देऊन आपल्या नेभळटपणाचं प्रदर्शन मांडायचं, यांत कसली आली आहे संपादकाची करामत ? अभिप्राय द्यायचा म्हणजे कसा जोरकस आणि माणसं पाहून. पुस्तकाच्या अंतरंगापेक्षां लेखकाचं नांवगांव, जातकूळ, प्रस्तावनाकाराचा लौकिक आणि त्याच्या प्रस्तावनेंतली चुकून राहिलेली ओझरती मान्याचो जागा पाहून अभिप्राय द्यायला का कधीं सबंध पुस्तक वाचावं लागतं ? मी तर त्याला मूर्खांतला मूर्ख काढीन. अहो, हीं लक्षणं नवशिक्या संपादकांची. आमच्यांसारख्या बनलेल्या संपादकांच्या हातचा अभिप्राय देणं हा नुसता मंळ आहे मळ !

—" मंगळमूर्ति "

धार्मिक माणसांनींच नव्हे

तर गृहस्थ म्हणविणाऱ्या प्रत्येक हिंदूनें

आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास

अवश्य वाचला पाहिजे.

वाराणशी.

अनुपम ममता—मंगल गंगा—वर्षसि वाराणशी ।
पाप क्षालुनी दिव्य बंधनीं जोडिशि मज मुक्तिशीं ॥

क्रोध सदा मम खळखळ वाहे मलिन निर्झरापरी ।
घेउनि उदरीं शांत करिसि त्या गंगामाई खरी ॥

घरीं द्वारका, कृतक पिता मनिं दुराग्रहातें धरी ।
काळभैरवापरि मज मानी, द्वारीं स्थापिसि परी ॥

मेघ सोडुनी बिंदु उतरला झिडकारी वल्लरी ।
वाऱ्यावर हो वरात हृदयीं धरिसी शुक्तीपरी ॥

मी कीटक, तूं कलिका कोमल हृदयरसा वेंचिसी ।
दोषांची धन्यमाळा माझी उजळिशि बिजली जशी ॥

जीवनगृहिंचें विमल देवघर तव सहवासीं दिसे ।
क्षुद्र विकारीं भरल्या मनिं कीं विवेकदेवी हंसे ॥

खिन्न निराशा गुंतवि जालीं निश्चेतन तनु करी ।
तव मायेचा हात अंतरीं विद्युच्छक्ती भरी ॥

प्राणवायु तूं घेउनि जवळी या जलवायूप्रती ।
अंतर नाहीं दिधलें म्हणुनि जल दिसतें संप्रती ॥

निज जीवाचें आळें करुनी तूं जल मज पाजिलें ।
कांटेरी या म्हणुनि लतेवर फुलती कांहीं फुलें ॥

काय सांगणें काय मागणें भगिनी तुज लेंकरें ॥
तव मायेची शाल पाहतां स्वर्गगर्व ओसरे ॥

रत्नभूषणें नव पक्वान्नें धनिका लखलाभ तीं ।
शिळी भाकरी तव सांगातीं करि मज लक्ष्मीपती ॥

जन्म उदरिं तव येवो मग नच दारिद्र्याची कथा ।
तुझ्याच हातीं मृत्यु देव दे, तर सुख, नाहीं व्यथा ॥

कुमार

मुलींचा संसार

['विश्वभगिनी' बी. ए.

विवाह-बंधनें.

पुरुषांच्या बाबतींत विवाहाच्या संख्येबद्दल व वयोमर्यादेबद्दल फारसा निर्बंध नसला तरी स्त्रियांना रूढ नियमांनीं जखडून टाकलें आहे. उपवर मुलींमुळें दरिद्री परिस्थितींत गांजलेले वधुपिते जोपर्यंत हयात आहेत तोपर्यंत जख्खड सधन म्हाताऱ्यांना विवाहसुखाबद्दल निराश व्हायला नको. पुरुषांना विवाहसंख्येची मर्यादा नसली तरी स्त्रियांना मात्र एका लग्नानंतर लग्न करण्याची सक्त मनाई आहे. नीतिदृष्ट्या पाहिलें तर स्त्रियांचें शील पुरुषांपेक्षां या नियमाच्या बंधनामुळें जास्त पवित्र दिसून येईल. पुरुषांना स्वैर वागण्याची समाजाकडून बिनशर्त मुभा असल्यामुळें लग्न म्हणजे त्यांना पोरखेळ वाटतो. हें माझें वाक्य कांहींजणांच्या कानाला अगदीं कठोर लागेल; पण त्यांनीं देखीव व ऐकीव गोष्टीवरून निरीक्षण बुद्धीनें नीट विचार केला तर माझ्या म्हणण्यांत फोलपणापेक्षां बराचसा तथ्यांश सांपडेल. प्रथम पत्नीनिधनानंतर ब्रम्हचर्यावस्थेंत तारुण्याची उमदी उमर व पुढचें सारें आयुष्य काढण्याबद्दल ईश्वरसाक्ष खात्रीनिशीं कोण सांगूं शकेल ? मनुष्याचें मन मोहवश असतें आणि त्याला अनुसरून ऐन तारुण्यांत पत्निवियोगाचा घाला पडल्यामुळें पुन्हां संसारसुख उपभोगण्याकडे मनुष्याची मोहवश मनःप्रवृत्ति जाते हें निर्विवाद आहे. पत्नीच्या निधनामुळें पुरुषाला दुसऱ्या लग्नाची परवानगी असते; पण तोच पतिनिधनानंतर पत्नीला पुन्हां संसार-सुखासाठीं दुसरा नवरा करण्याला समाज कबुली देईल काय ? समाजाच्या कबुली-नाकबुलीचा प्रश्न बाजूला ठेवला तरी नीतिमत्तेच्या दृष्टीनें अशा अवमार्गानें स्त्रियानीं वागणें त्यांचें शील बिघडवणारें निंद्य कृत्य आहे. ही गोष्ट जरी खरी असली तरी समाजानें इतक्या अंधपणानें स्त्रियांना नियमबद्ध कां करावें व पुरुषजातीला स्वैर कां सोडावें ? मनुष्य मोहाला बळी पडतो ही गोष्ट पुरुषजातीबद्दल जर निर्विवाद पटते तर स्त्रीजात त्याला अपवाद कां असावी ? पुरुषाप्रमाणें स्त्रियांचेंहि मन सुंदर वस्तूनां भुलणें संभवनीयच आहे.

एखाद्या मनुष्यानें आपल्या अंतापर्यंत ५-६ लग्नें केली तरी लोक तीं उघड्या डोळ्यांनीं एक ब्रह्मि न काढतां पहातील; पण मोहाला बळी पडून एखाद्या तरुण बालविधवेचा जर स्वभावसुलभ आंडमार्गाकडे पाय वळला तर समाज तिच्यावर घारीसारखी झडप घालून वाभाडे काढील. स्त्रियांच्या बाबतींतच इतका अनुदारपणा समाज कां दाखवतो ? अकाल वैधव्यामुळें एखादी गतधवा तरुणी परक्या तरुणावर

जरी निःस्वार्थ प्रेम करूं लागली तरी तिच्या शुद्ध, सात्विक प्रेमाकडे डोळेझांक करून समाजाची उपहासात्मक 'काव काव' सुरूं होते. आणि एखाद्या धनिक जख्खड वृद्धानें सहाव्या लग्नाची तयारी केली तर त्याची राजरोस तरफदारी होते. एखाद्या कुटाळ तरुणानें एखाद्या तरुण स्त्रीला फसवून तिला आडमार्गीला लावलें तर ती समाजाकडून त्याज्य व निंद्य मानली जाते आणि तो निर्भयपणानें समाजांत संभावितांच्या नांवाखालीं वावरतो. अगदीं खरेंखुरें आणि स्पष्टपणानें सांगायचें म्हणजे रस्त्यावर दोन ओळखीची स्त्रीपुरुष मिनिटभर एकमेकाबरोबर बोलत राहिली तर हजार हिश्शांनीं जाणाऱ्या येणाऱ्यांची पुरुषापेक्षां त्या स्त्रीवरच कुटाळीची नजर जाते. यावरून समाज इतक्या कोत्या मनाचा बनला आहे असें म्हटलें तर आम्हीं स्त्रिया दोषी ठरूं काय? या उघड उघड दिसणाऱ्या गोष्टी आहेत. पुरुषांच्या ढोबळ दुर्वर्तनाकडे पूर्ण डोळेझांक आणि स्त्रियांच्या क्षुल्लक हालचालीबद्दल जोराचें अकांडतांडव पाहिलें म्हणजे समाज कोत्या मनाचा आहे असें आम्हीं तरी कां म्हणूं नये? आम्हीं तर देशांतल्या मोठमोठ्या पुढाऱ्यानां म्हणूं कीं, तुम्हीं सरकारकडून स्वातंत्र्य आणि समान-हक्क मागतानां प्रथम आपापसांतला हा कनिष्ठ-वरिष्ठपणाचा भेदभाव नाहींसा करा. समाजाची दृष्टी समतोल बनूं द्या. आणि स्त्रियांबरोबरच पुरुषांना विवाह-नियमांनीं जखडून हिंदुस्थानाचें शील पवित्र होऊं द्या. विवाहाच्या संख्या-मर्यादेबद्दल पुरुष-जातीला कांहींच निर्बंध नसल्यामुळें विवाहाचें उच्चत्व आणि महत्त्व नामशेष होऊन ती जी एक रोजच्या व्यवहारांतली कवडीमोल गोष्ट होऊन बसली आहे तिला आळा पडण्यासाठीं तरी समाजानें कांहीं नियम करणें अत्यावश्यक आहे. सबंध आयुष्यभर एक लग्न करूनच रहाण्याच्या नियमामुळें स्त्रीजातीला वैधव्यानंतर जसें आपलें मन ताब्यांत ठेऊन शुद्ध शीलानें वागतां येतें तसेंच पुरुषांच्या बाबतींत होणें अशक्य नाहीं. स्त्रियांइतकाच पुरुषानीं आपल्या मनावर ताबा ठेवला पाहिजे. स्त्रियांना लागूं असलेले नियम स्वतःसाठींच आहेत अशी मनाची पक्की खात्री करून घेऊन त्याप्रमाणें वागलें तर सध्यां वृद्धपणांत हौशी वरानें लग्न करून आपल्या तरण्याताठ्या पत्नीला सबंध आयुष्य वैधव्यदशेच्या दुःखाग्नींत होरपळत काढण्यासारखे प्रसंग तरी टळतील. आपल्या हौशीसाठीं, आपली उतारवयांतली गलित शरीरप्रकृति विसरून, एखाद्या तरुण मुलीचा गळा कापून बिचारीच्या सबंध आयुष्याचें रखरखीत, वैराण वाळवंट करण्याइतके कसाब जांबुवंत कांहीं थोडेथोडके नाहींत. विवाहबंधनानीं अशा गोष्टींना आळा पडल्यावर हतभागिनी गरीब मुलींच्या पाठचा हा त्रास तरी टळेल.

आदल्या जन्मीचे कांहीं लागेबांधे होते कीं काय कुणाला ठाऊक; पण रमाबाई बाबूला एक क्षणभरही दृष्टीआड होऊं देत नसत. रमाबाईंनीं बाबूसाठीं अगदीं जीव तोडावा असें त्यांचें कांहींच नातें नव्हतें. पण प्रत्यक्ष आईच्या कडेवर सुद्धां बाबूला जें सुख होत नसे त्याच सुखाचा पूर्ण उपभोग रमाबाईंच्या घरीं त्याला घ्यावयास मिळत असे. आणि रमाबाईंचीही बाबूवर आईपेक्षांही अधिक माया होती. त्याचे वाटेल ते लाड पुरवावयाचे, तो म्हणेल तो जिन्नस, म्हणेल त्यावेळीं हरउपायानें त्याला आणून द्यावयाचा हा जसा कांहीं रमाबाईंचा नियमच ठरून गेला होता. वामनरावसुद्धां या बाबतींत. त्यांचें म्हणणें अगदीं मुकाटयानें मान्य करीत, ही त्यांतल्या त्यांत मोठया आश्चर्याची गोष्ट होती. रमाबाईप्रमाणें जरी नाहीं तरी त्यांनाही ऑफिसांतूनें घरीं आल्यावर केव्हां एकदां बाबूला उचलून घेईन आणि आपल्या खिशांतील खाऊ त्याच्या तोंडांत घालीन असें होत असे. पण त्यांची उत्कंठा वाढविण्याचा प्रसंग त्यांच्यावर सहसा कधीं येत नसे. कारण संध्याकाळीं वामनराव घरीं यावयाची वेळ झाली कीं त्यांच्या खिशांतून खाऊ हस्तगत करण्यासाठीं बाबू दारावर नेहमीं त्यांची वाट बघत उभा असावयाचाच. वामनराव नेहमीं घरीं येतांना वाटेंत एका हलवायाच्या दुकानीं थांबत आणि बाबूच्या आवडीचा पदार्थ म्हणजे सर्व तऱ्हेच्या मिठाईंची मिसळ केलेली भेळ घेऊन घरीं वळत. हा त्यांचा रोजचाच क्रम असल्यामुळें हलवाईंही आपल्या दुकानीं त्यांची खोटी करीत नसे. " अर्धा-सेर भेळ " हे शब्द आणि अडीच आण्याचे पैसे अनुक्रमें त्यांच्या तोडांतून आणि खिशांतून बाहेर पडण्यापूर्वीच भेळीची आगाऊ बांधून तयार असलेली पुडी त्यांच्या हातीं पडे. बाबूचा हा रोजचा खुराक होता, पण याशिवाय चॉकोलेटचे लहान डबे, पेपरमिंटच्या पुडया, साखरेचे देव्हारे आणि कोंबडे वगैरे जिन्नस या पुडीबरोबर वामनराव केव्हां केव्हां आणीत; आणि हे जिन्नस विकत घेतांना, ते जिन्नस पाहिल्यावर बाबूला केवढा आनंद होईल, रात्रीं जेवायची वेळ झाल्यानंतरही कोणी घरचें माणूस येऊन मोठया वळजवरीनें त्याला घेऊन जाईपर्यंत तो आपल्याजवळच कसा गोष्टी बोलत राहील वगैरे कल्पना डोक्यांत येऊन त्यांच्या चेहेऱ्यावर वत्सल हास्याची छटा दिसूं लागे. बाबूनें मागितलेला जिन्नस घेऊन देत गेल्यानें बाबूच्या घरीं मुंबईतल्या तऱ्हेतऱ्हेच्या खेळांचें एक प्रदर्शनच मांडल्यासारखें दिसे. प्रदर्शनांतल्या वस्तु व्यवस्थित व चांगल्या शाबूत

असतात आणि या प्रदर्शनांतल्या सर्व वस्तु बावूच्या 'उद्योगी' स्वभावामुळें अर्धवट मोडलेल्या,फुटलेल्या असत, हाच काय तो हें प्रदर्शन व इतर प्रदर्शनें यांमधील फरक होता. या प्रदर्शनांतील प्रत्येक वस्तूला वेगवेगळा इतिहास होता. बावूच्या खेळांतील बंब मोडलेली आगबोट एकदां दुपारच्या वेळीं 'फणीपेपर' असा चमत्कारिक स्वर काढीत आलेल्या एका बोहोऱ्याकडून रडणाऱ्या बाबूसाठीं रमाबाईनीं विकत घेतली होती. बाबूच्या सर्व लीला शांतपणें सहन करून घेणारा बिनशेपटया सिंहही असाच एकदां वामनरावांनीं पावसांतून भिजत घरीं येतांना आपल्या ओव्हरकोटमधून लपवून आणला होता. "माझ्या खिशांतून एका माणसासाठीं मी काय जंमत आणलीय् ती त्यानीं नांव सांगून घ्यावी," असें वामनरावांनीं म्हणतांच बाबूनें पुष्कळ 'जंमती'ची नांवें घेतलीं, पण त्यांतील एकही खरें न ठरल्यामुळें या सर्वांवर रामबाण असें आपलें नेहमीचें शस्त्र त्यानें काढतांच सर्वस्वी पराभूत होऊन वामनरावांनीं हा सिंह बावूच्या पुढ्यांत फेंकला होता व त्याला एकदम पाहून पहिल्याप्रथम बाबू घाबरलाही होता. या सिंहानंतर बावूच्या संग्रहांतील पुढची वस्तु म्हणजे त्याची आगगाडी होय. नाताळच्या सणांत व्हाईटवे आणि लेडलॉ कंपनीनें आपल्या दुकानांत ख्रिस्टमस प्रेझेंटसाठीं ज्या ज्या वस्तू मांडून ठेवल्या होत्या त्यांमध्यें ही आगगाडी आणि तिची वाटोळी 'लाईन' होती आणि या लाइनीवरच एक चिमुकला बोगदा आणि एक स्टेशन होतें. डिसेंबरच्या आठव्या तारखेला वामनरावांचा पगार पडून ते फिरत फिरत घरीं चालले असतां एक क्षणभर त्या दुकानाकडे उभे राहिले. इतर खेळांवरून फिरणारी दृष्टि ही आगगाडी पाहतांच तिच्यावर स्थिरावली आणि खेळांतल्या आगगाडीला गती मिळण्यापूर्वीच त्यांच्या डोक्यांतील कल्पनेची आगगाडी सुरू झाली. आगगाडीची चावी फिरवीत बाबू बसला आहे आणि ती सुरू होतांच तो मोठमोठ्यानें टाळ्या वाजवीत नाचत आहे हें चित्र त्या आगगाडीशेजारींच त्यांच्या कल्पनेनें उभें केलें. ते तडक आंत गेले आणि त्यांनीं दुकानांतील एका नोकराला तिची किंमत विचारली. नोकरानें किंमत सांगतांच मुकाट्यानें त्यांनीं पाकीट उघडून पांचापांचाच्या तीन नोटा त्याच्या हातीं दिल्या आणि पैसे दिल्यानंतर 'कॅशमेमो' लिहून मिळेपर्यंत आणि त्या आगगाडीच्या भोंवती अगदीं फॅशनेबल पद्धतीनें पॅकिंग होईपर्यंत सुद्धां त्यांच्यानें दम धरवला नाहीं. 'कॅशमेमो' खिशांत कोंबून त्यांनीं आगगाडी हातांत घेतली आणि एकदांची धांवत्या ट्रॅम्वेंत उडी मारून ते स्थानापन्न झाले. ही आगगाडी मिळाल्यानंतर एक आठवडाभर बाबू यांच्यावर एकदांसुद्धां रागावला नाहीं. आतां या आगगाडीचा बोगदा, रूळ आणि

स्टेशन हीं तीन ठिकाणीं पडली होतीं. डोक्यावर हात मारतांच मार असह्य होऊन 'व्यँक व्यँक' असा शब्द करणाऱ्या चिनी कुत्र्यानें तर या सर्वांवर ताण केली होती. गाडीवर दिसलेला चिनी कुत्रा रमाबाईंजवळ दुप्पारी पैसे नसल्यामुळें त्यांना विकत घेतां आला नाहीं;पण बाबू रडण्याचा अगदीं थांबत नाहींसें पाहून संध्याकाळीं वामनराव घरीं आले असतां त्यांना अंगावरचे कपडे सुद्धां उतरूं न देतां रमाबाईनीं हा कुत्रा आणण्यास पाठविलें. आणि अंगांत थोडासा ताप आला होता तरी वामनरावही त्याच पावलीं दुकानांत गेले आणि त्यांनीं हा कुत्रा आणला. अशा तऱ्हेची प्रत्येक वस्तु आपली कहाणी सांगत असे.वामनराव आणि रमाबाई यांच्यावर बाबू कांहीं दिवस नजरेआड होण्याचें दुर्दैव फक्त दोंनदांच ओढवलें होतें. एकदां तो आपल्या चुलत भावाच्या लग्नासाठीं मुंबईंतच पण एका निराळ्या घरीं चार दिवस राहिला होता आणि एकदां आदल्या दिवशीं नळावर कांहीं भांडण झाल्यामुळें रमाबाईंजवळ बसलेल्या बाबूला मारीत आणि ओढीत त्याच्या आईनें नेऊन दोन दिवस त्याला "बाहेर गेलास तर जीव घेईन" ही दहशत घालून घरांत डांबून ठेवला होता. या दुसऱ्या प्रसंगीं मात्र रमाबाईंच्या डोळ्यांत अश्रू आले. त्यांना कसलीशी आठवण झाली. त्यांच्या डोळ्यांसमोर बाबूच्याच वयाचें आणि अगदीं त्याच्या सारखेंच दिसणारें एक मूल उभें राहिलें. एकदां त्या मुलावर आपला हक्क होता आणि आजही जर निष्ठूर काळ मध्यें पडला नसता तर तशीच स्थिति राहून आपल्या जवळून त्या बाळाला कोणीही परकी स्त्री हिसकून नेऊं शकली नसती, ह्या विचारांनीं त्यांना पुष्कळ वर्षांमागच्या अनेक स्मृतींची आठवण करून दिली आणि त्यांचें अंतःकरण उमाळ्यांनीं आणि हुंदक्यांनीं भरून आणलें. वामनरावांनीं आणलेली भेळीची पुडी त्या दिवशीं तशीच राहिली. वामनराव चहा घेत असतां ती पुडी सोडून तींतील जिलबीचे तुकडे निरनिराळे करून त्यांच्या तोंडांत मधून मधून घालावयाला त्या दिवशीं कोणीही नव्हतें. शेवटीं एकटें राहून वामनरावांचें डोकें दुखूं लागलें आणि दुःखदायक आठवणींनीं रमाबाईंच्याही डोक्यांत सणका मारूं लागल्या. पण समुद्रावर जाऊन वामनरावांना आपलें मस्तक थंड करतां आलें तसें रमाबाईंना करतां आलें नाहीं. त्या रात्रीं मात्र त्या दोघांनाही जेवण गेलें नाहीं. बिछान्यावर पडल्यावरही वामनराव आणि रमाबाई यांच्या मनःचक्षूंसमोर एक निराळेंच दृश्य दिसत होतें.

× × ×

बाबूच्या आईने त्याला त्यांच्याजवळून हिसकून नेलें त्यावेळीं त्यांना याच प्रसंगाची आठवण झाली. आपल्या वत्सल मातृहृदयाच्या चिंधड्या चिंधड्या करून आपल्या हातांत घट्ट धरून ठेवलेल्या बाबूला त्याच्या आईनें जोरानें ओढून नेल्यामुळें रमाबाईनां ज्या वेदना झाल्या त्यांची कल्पना सावित्रीबाईनांही आली. कारण कठोर काळानेंही एका रात्रीं त्यांच्या हातांतून बाबूला हिसकून नेलें. सावित्रीबाईनीं नेलेला बाबू पुनः रमाबाईंजवळ आला; पण काळानें नेलेला बाबू मात्र सावित्रीबाईजवळ येणें शक्य नव्हतें.

बाबूच्या खेळाकडे पाहून रमावाई आणि सावित्रीबाई यांना आपल्या अंतःकरणांतील ज्वालामुखीची सारखीच आंच लागली. .

हा अंक उशिरां निघाल्याबद्दल

आमच्या वाचकांनीं राग मानूं नये. सबळ कारणाशिवाय अंकाला विलंब लागला नाहीं ही त्यांनीं खात्री बाळगावी. **'अरुणा'**चा पुढचा अंक बराच लवकर निघेल व तेवढी मुदत भरून काढली जाईल.

—संपादक.

नाटयकला

नाटक कंपनींत जाणें

ही आजकाल नादानपणाची निंद्य गोष्ट गणली जाते हें नव्यानें सांगायला नको. आय. सी. एस. अगर बार-ॲट-लॉ होण्यासाठीं मायापाश झुगारून आपल्या मुलाला इंग्लंडसारख्या अपरिचित मोहनगरींत पाठवतांना मुलाचा बाप त्याच्या नितिमत्तेकडे काणाडोळा करून केवळ शैक्षणिक दृष्टीनेंच तिकडे पहात असतो. त्या नवख्या ठिकाणीं,मनमोहक चिजांची भूल पडून स्वच्छंदपणामुळें त्याच्या स्वभावसद्गुणाला धक्का पोंचेल ही भिती मनांत एखादे वेळीं डोकावून गेली असली तरी आत्मविश्वासावर भार ठेऊन तो बेफिकीर बनण्याचा प्रयत्न करून आपल्या मुलाला त्या परक्या देशांत पाठविण्याइतका धीट बनतो. मुलाच्या मोहवश मनामुळें तेथल्या चटकदार वस्तूंनीं त्याचा आपल्या मनावरचा ताबा उडून तो आपल्या आयुष्याची धुळदाण उडवील कीं काय याबद्दल जरी त्याचें मन संशयित असलें तरी त्याला परदेशी पाठवतांना, वरकरणी का होईना, पण तो बेफिकीर वृत्ति धारण करतो. हें संकट अज्ञात आणि अनिर्णयात्मक असल्यामुळें मुलाच्या पित्याला शंकाकुशंकांनीं पछाडलें तरी तो समाधानकारक प्रत्युत्तरांनीं आपल्या मनाला थारावतो. परंतु अशा स्वभावाच्या मनुष्यानें आपल्या आप्तांपैकीं एखाद्याचा नाटकांत जाण्याचा नुसता विचार असल्याचें ऐकलें तर लगेच त्याच्या डोळ्यांपुढें अखिल अवगुणांच्या मूर्तिमंत स्वरूपांत त्या आप्ताची मूर्ति चटकन उभी रहाते! त्याचा पूर्वस्वभाव कितीहि कित्ता घेण्यालायख असला-प्रत्यक्ष त्यानें स्वतःच त्याचा स्वभाव वाखाणला असला तरी-त्याच्या नुसत्या नाटकांत जाण्याच्या विचारानें त्याचे सारे सद्गुण भस्मसात् होतात आणि अस्तित्वांत असल्या-नसलेल्या दुर्गुणांचा तो प्रतिपुतळा बनतो. इतक्या नालायखीनें माणुसकींतून उठण्याला कारण काय तर फक्त त्याचा नाटकांत जाण्याचा विचार ! अनोळखी परदेशांत मुलाच्या मनोदौर्बल्याबद्दल साधार शंका घेण्यास प्रेमळ पित्याचें मन कांकूं करीत असलें तरी नाटकांबद्दल त्याचें हें मत दगडावरच्या रेखीव रेघेसारखें ठाम व कायम बनलेलें असतें. याबाबत शांत मनानें आणि विवेकबुद्धिनें विचार करणें सुद्धां त्याला अप्रयोजक वाटते. झाडाला जन्म दिला कीं त्याला पानें ही द्यावयाचीच, संध्यासमयाची वेळ झाली कीं सूर्यानें आपलें चंबुगवाळें आटोपलेंच पाहिजे, मनुष्यानें जन्माला आलें कीं मेलें हें पाहिजेच या व इतर गोष्टी निसर्गानें जितक्या नियमबद्ध करून टाकल्या आहेत त्यापेक्षां कंकणभर जास्तच ठामपणानें नाटककंपनींत--फक्त आवड म्हणून जरी-गेलें कीं

दुर्गुणाच्या भट्टींत पुरोपुर भाजून हें निघालेंच पाहिजे हा एक सिद्धांत मानवजातीनें कांहींसा परंपरेनें आणि बराचसा ऐकिव खोटयानाटया गोष्टीनें ठाम केला आहे. या सिद्धांतांत सोळा आणे तथ्य नसलें तरी सत्याचा बराच अंश आहे हें निर्विवाद आहे. पराचा पारवा करण्याच्या मनुष्यस्वभावामुळें त्याला अतिशयोक्तीचें स्वरूप आलें आहे इतकेंच.

नाटककंपनींत जातांना एखादें विशिष्ट व्यसन अंगीं जडवून घेण्याची प्रथम शपथ घ्यावी लागत नसते. एखादा दुर्गुण अंगीं लावून घेणें हा कांहीं नाटक-कंपनींत जाण्याचा परवाना नाहीं. असें असतानां त्या वातावर्णांत वावरतांना ते त्या दुर्गणांच्या आधीन कां होतात हा प्रश्न विचारणीय असला तरी फारसा आश्चर्य करण्यासारखा नाहीं. प्रथम अनोळखी असलेल्या अवगुणांची नाटककंपनींतच ओळख कां पटावी ही मात्र कांहींशी चमत्कारिक बाबत दिसते. साधारण अंदाजानें निष्कर्ष काढला तर रिकामपणाचा रिकामटेकडा उद्योग आणि कांहींशा रंगेल मित्रांची मैत्री हीं कारणें प्रामुख्याचीं वाटतात. नाटयकलेच्या रंगेल वातावरणांत हलक्या मनःप्रवृत्तीच्या मनुष्याची विवेकबुद्धि सारासार विचाराबद्दल मंद व जड बनून, तशाच चैनी करमणुकीकडे झुकते. नाटककंपनीच्या मायानगरींत मनावर ताबा ठेवण्याइतकें सबल नसलें म्हणजेच हलक्या-सलक्यांच्या नादीं लागून नसत्या नवनव्या व्यसनांची ओळख पटते व पूर्वस्वभाव नष्ट होऊन नाटकांत जाण्यापासून होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल लोकांना आरडाओरड करावयाला मुक्तद्वार सांपडते. या अधःपाताबद्दल परिस्थितीला दोष न देतां त्याचा त्यालाच स्वतःला जबाबदार धरलें पाहिजे. तो स्वतःच मनाचा कमकुवत नसता तर मग हलकट लोकांच्या तांडयांत सुद्धां त्याच्या सद्गुणाला धक्का पोंचणें शक्य नाहीं. अशा वेळीं परिस्थिति त्याच्या अपकर्षाबद्दल जबाबदार होत नसून त्याच्या मनाचा थिल्लर-पणा, आणि क्षुल्लक व्यसनाला आळा घालण्यास असमर्थ बनण्याइतका कमजोरपणा जबाब-दार आहे. भीतभीतच एखाद्या व्यसनाशीं झालेल्या पहिल्या ओळखीला बळीपडून त्याचें मन सवईनें त्या चैनीला चटावतें आणि या कळत्या पायावर त्याच्या भावी अधःपाताची नकळती इमारत रचत जाते. आतां प्रत्येक मनुष्याला आत्मसंयमन करण्याची शक्ति नसते ही गोष्ट खरी मानली तरी नाटय-शिक्षणाचा उदात्त हेतू मनांत बिंबवून नाटय-संस्थेंत शिरल्यावर त्या हेतूखातर तरी त्याला आपल्या मोहवश मनाला आटोक्याबाहेर जाऊंदिलें पाहिजे. भुरळ पाडणाऱ्या प्रत्येक मोहक वस्तुकडे ती आपल्या आयुष्याची धुळदाण उडवण्याच्या मूळाशीं आहे ही भयप्रद जाणीव सदोदित मनांत जागवून

आणि आपलें नाट्यशिक्षणाचें उद्दिष्ट डोळ्यापुढें ठेऊन पाहिलें म्हणजे त्याला त्याच्या मोहवश मनावर अपेक्षेबाहेर ताबा ठेवतां येणे अशक्य नाहीं. यानें जरी पूर्ण नाहीं तरी बरेचसें यश येणें संभवनीय आहे. मोहक वस्तुनां वश होणाऱ्या मनाला आटोक्यांत ठेऊन नाट्यकलेचें आयुष्यभर सात्विक तऱ्हेनें शिक्षण घेतलें तरच तें त्याला अभिमानास्पद आहे. नटांत तशी निम्में उदाहरणें निघालीं तरी सध्यांचा त्यांच्यावरचा दोषारोप सौम्य बनविणें शक्य जाईल.

इतर कोणत्याहि धंद्यापेक्षां पगारी नटांना नाट्यकलेचा धंदा अगदीं कमी दगदगीचा आहे. आणि यामुळें रिकामी फुरसत आणि मनाची स्वस्थता मिळाल्यामुळें क्षूद्र मनाच्या नटांना सतरा धंदे आणि अठरा व्यसनें आठवतात. आणि म्हणूनच नटापेक्षां खर्डेघाशा कारकुनाचा धंदा सदभिरुचीचा आणि सन्मानाचा गणला जातो. दिवसा आठ दहा तास राबणाऱ्या कारकुनापेक्षां आठवडयांतून दोन,तीन वेळां काम करणाऱ्या नटाचें नाटकी आयुष्य किती तरी सुखकारक! कारकुनाची विश्रांतीसाठीं कुरकुर आणि नटाची वेळ जाण्याची फिकीर ! कारकुनाला मनःस्वास्थ्य आणि विसांवा नसल्यामुळें आपल्या कामाव्यतिरिक्त इतर बाबतींचा विचार करण्यासच सवड नसते आणि म्हणून त्याला एखाद्या व्यसनाची ओळख पटणें कांहींसें जड जातें. उलटपक्षीं, नटाच्या वांटयाला भरपूर विश्रांती असल्यामुळें त्याला इतर बाबीबद्दल पूर्ण चर्चा करण्यास फावतें. अशा वेळीं मात्र जातीवंत नट आपल्या अभ्युदयासाठीं कष्ट घेतो आणि केवळ पोटापायीं 'नाटकी' बनलेला नट सतरा व्यसनांच्या तडाक्यांत गवसतो. आणि म्हणूनच नाटक कंपनींत जाणें ही गोष्ट गैर आहे असें म्हणतां येणार नाहीं. ज्याच्या त्याच्या कमजास्त ताकदीप्रमाणें त्याचें नाटककंपनींतील आयुष्य बरें वाईट जातें. व्यसनाधीन झालेल्या नटाबद्दल व्यक्तिशः तिरस्कार दाखवला तरी सबंध नाट्यकलेकडे त्याच तीव्रतेनें पहाणें केव्हांही न्याय्य होणार नाहीं. सैन्यांतला एक शिपाई प्रतिपक्षाला फितूर झाला म्हणून सरसहा सगळ्या सैनिकांची कत्तल करण्याइतकाच हा वेडेपणा आहे. शुद्ध, सात्विक स्वरुपाची रंगदेवतेची सेवा करण्याचा कोणी संकल्प केला तर तें तिरस्करणीय न मानतां त्याच्या शुद्धतेकडे पाहून त्याला प्रोत्साहन देणेंच योग्य ठरेल.

साभार स्वीकार

शांताबाई (जिवनस्मृति) छोटी छोटी निष्पाप बालरत्नें आपल्या अवाढव्य जा-मदारखान्यांत कायमची जमा करण्यासाठीं देव सुद्धां किती निष्ठूर उतावळेपणा करतो याचें अल्पवयी शांताबाईचें अकाल निधन हें एक उघड उघड प्रत्यंतर आहे. बाल-कीर्तनालंकृति शांताबाई ओंकार हिचें चरित्र निकट परिचयामुळें तिच्या मावशी काव्यकल्पकता श्री. सारजाबाई बापट यानीं मनाला भिडणाऱ्या अशा हृदयस्पर्शी भाषेंत आणि खऱ्या जिव्हाळ्यानें लिहिलें असून तें अत्यंत वाचनीय झालें आहे. इतक्या बालवयांत आस्थेवाईक आप्त-इष्टांबरोबरच सबंध मायभूमीला चटका लाऊन सुकिर्तीनें जिवंत रहाणें अलौकिकांतच मोडतें, नाहीं तर काय? (पत्ताः— म्यानेजर-धुंडिराज डेपो. १६५, शनवार पेठ, पुणें. किं. १२ आणे. चांगलें बाइंडिंग १ रु.)

सुमनगुच्छ (प्र. श्री. सदाशिव नरहर भावे. नाशिराबाद, पू. खानदेश.) ललित वाङमयांत कादंबऱ्यांची निपज होत नसेल इतकें सध्यां काव्याचें सुकाळ पीक आलें आहे. बऱ्यावाईटाची निवड न करतां केलेल्या सर्व कविता संग्रहीत करून छापून काढण्याची सध्यां वहिवाट निघाली आहे. तसेंच कांहींसें प्रस्तुत काव्यसंग्रहांत झालें आहे. भावनात्मक कवितांत 'व्यर्थ आशा' 'स्मृतिचित्र' इत्यादि दोन तीन कविता बऱ्या आहेत. बालगीतांत 'लपंडाव' व 'भितला ले भितला' या कविता चांगल्या आहेत. 'संध्याबाला' कवितेंतील 'सुवर्ण-बिछाना' यासारखे शब्द-प्रयोग हास्यास्पद आहेत. द्वितियावृत्तीचा सुयोग आला तर कवितांची निवड करावी अशी प्रेमाची विनंति आहे. किं. ५ आणे माफक आहे.

पद्य-मुक्ता-मालाः— (ले. श्री. श्री.म. जेरे. प्रकाशक—कृ. वि. क्षीरसागर, वकील, वीड, सं. निजाम.) निजाम संस्थानांत सुद्धां सध्यां वाङमय-वृद्धीचा यथा-मति प्रयत्न होत आहे हें अभिनंदनीय आहे. सदर पुस्तकांतील १७ आख्यानें हरि-दासांना व किर्तनकारांना बरीच उपयुक्त आहेत. किं. १ रुपया फार वाटत.

मनोहर माला. (सदाशिव, पुणें. वा. व. ट. हं. सह १ रु. १४ आणे) सध्यां माला मासिकांची इतकी भरमसाट पैदास होत आहे कीं त्यांच्या जनकांचें उद्दिष्ट वाङमय-अभिवृद्धी करण्याचेंच आहे कीं काय याबद्दल मन साशंक होतें. सदर मालेची मासिक पुस्तकासारखीच मांडणी असून त्यांत गोष्टी, वि. लेख, चालू कादंबरी व इतर गद्य-पद्य विषय येत असतात. केवळ मनोरंजन एवढेंच ध्येय असेल तर तें प्रस्तुत विषयांनीं सफल होईल यांत शंका नाहीं. वर्गणी माफक आहे.

प्रकरण ४ थें.

नदीकिनारीं.

या चार दिवसांत माधवराव, यशवंत आणि कुसुम यांच्याशीं माझी इतकी दाट ओळख झाली होती कीं दिवसाचे आठ,दहा तास तरी माझी त्यांच्याच घरीं बैठक असे. कधीं तीं तिघेहि असत,कधीं यशवंत नसे, तर कधीं माधवराव नसत.परंतु कुसुम आणि मी अशीं दोघेंचजण मात्र एकटीं सहसा नसूं. आणि मी घरीं विचार करूं लागलों कीं आम्हां दोघांचा थोडा वेळ सुद्धां एकांत सहवास असूं नये असेंच मला वाटे. कारण तसें झालें तर शालीनकडे माझा कानाडोळा होत जाईल अशीच मला भिती वाटत होती.

दुपारीं झोंपून उठल्यानंतर वेळ घालवण्यासाठीं मी मुंबईहून बरोबर आणलेल्या चार, पांच कादंबऱ्यांपैकीं 'वीरधवल' ही कादंबरी वाचीत पडलों होतों. त्यांतल्या अद्भुतरम्य प्रसंगानीं माझें चित्त इतकें वेधून गेलें होतें कीं जेव्हां अगदीं शेवटचें पान वाचून झालें तेव्हांच मी सत्यसृष्टींत जागा झालों. मला ती कादंबरी फारच आवडली. कादंबरी वाचून झाल्यानंतरही मी तसाच इझिचेअरवर पडून मनांतल्या मनांत त्यांतले प्रसंग आठवीत उगाच पानें चाळीत पडून राहिलों. पांचाचे ठोके ऐकतांच मी एकदम आश्चर्यचकित होऊन खुर्चीवरून उठलों व कादंबरी टेबलावर टाकून तोंड धुण्यास गेलों.

"काय रे, इतकी झोंप लागली होती ?" आईनें मला पाहून विचारलें.

"झोंप ? छेः; वाचीत पडलों होतों मी." मी म्हणालों.

"इतका दंग झाला होतास वाटतं ? प्रभा तुला दोनदां बोलवायला गेली. पण येऊन म्हणाली दादा खोलीला कडी घालून झोंपला असेल. आतां मीच येणार होतें उठवायला. चहा निऊन गेला अगदीं. जा, डोळ्याला पाणी लावून ये. तोंपर्यंत मी चहा ठेवतें चुलीवर गरम करायला."

मी इतका वाचण्यांत दंग झालों होतों याचें मला खरोखरच आश्चर्य वाटलें पण तो दोष माझा नसून कादंबरींतल्या चटकदारपणाचा होता असेंच मी समजलों. तोंड धुवून चहा घेतल्यावर मी बाहेर पडण्याच्या उद्देशानें कपडे चढवले आणि बाहेर ओटयावर आलों. पोष्टमन पत्र घेऊन येत होता. मी कांहींशा अधिकाराने चटकन् तें घेतलें आणि वर माझेंच नांव पाहून परत आंत येऊन खोलींत गेलों. घरच्या हस्ताक्षरावरून तें शालीनचेंच होतें हें मला कळण्यास उशीर लागला नाहीं. मी मोठया उत्साहानें पाकीट फाडून आंतील पत्र वाचूं लागलों.

मी त्या पत्राच्या आवृत्त्यावर आवृत्त्या केल्या. शालीनच्या पहिल्या पत्रांतली उणीव तिनें या पत्रांत दामदुप्पट्टीनें भरून काढली होती. माझ्या अपेक्षेबाहेर तिनें तें पत्र गोड भाषेंत लिहिलें होतें. त्यांत नाटकी भाषेचा लवलेश नसून खऱ्या प्रेमाचा जोरदार प्रवाह वहात होता. सुरवातीपासूनच तिच्या मनांत माझ्याबद्दल प्रेमाचें बी रुजलें होतें हें तिच्या कांहींशा संदिग्ध भाषेंत लिहिलेल्या एकदोन वाक्यांनीं मी पुरतें ताडलें आणि हें सुख तिच्या सहवासांत आजन्म भोगण्याइतका मी भाग्यवंत आहे कीं नाहीं हें माझ्या उजव्या हातावरील आडव्या उभ्या रेषांत ज्योतिष्याच्या मुद्रेनें पाहूं लागलों. तिच्या लिहिण्यांत इतका चटकदारपणा होता कीं पत्रांतलें प्रत्येक वाक्य आणि वाक्यांतला प्रत्येक शब्द डोळ्यांत जिवाची प्रभा दाटवून मी वाचीत होतों. क्षणभर मी मलाच विसरून गेलों.

शालीननें पहिल्या पत्रांत असली अनोळखी, परकेपणाची भाषा कां वापरली होती हें तिनें समर्पक रीतीनें विशद करून सांगितलें होतें. तिला अशी भीति वाटली कीं व्यवहाराची भाषा सोडून निराळ्याच तऱ्हेनें पत्र लिहिलें तर तें मला आवडेल कीं नाहीं, तें पत्र जर कोणा तिऱ्हाइताला सांपडलें तर त्याचा परिणाम काय होईल, अण्णांना ती मला असल्या तऱ्हेचीं पत्रें लिहिते असें कळलें तर तिची अवस्था काय होईल; या आणि दुसऱ्या नाना शंका कुशंकांनीं भंडावून सोडल्यामुळें तिनें पहिल्या पत्रांत तितकें धाडस केलें नव्हतें. एरव्हीं तिला तसें पत्र लिहावयाला नको होतें असें नाहीं. तिलासुद्धां तसलें नीरस पत्र लिहितांना किती तरी वाईट वाटत होतें.

मी उतावळेपणानें तिचें पहिलें पत्र मिळतांच तिच्यावर कसा संतापलों होतों याची आठवण होतांच माझ्या स्वभावालाच मी दोष दिला. मी तें पत्र पुन्हां एकदां वाचलें.पत्राच्या शेवटीं मनाला हुरहुर लावणारा एकच प्यारा होता. आणि तो म्हणजे "दादाचें अभ्यासावरून लक्ष उडालें असून महेश्वर नांवाच्या त्याच्या एका मित्राबरोबर सारा दिवस त्याचा फिरण्यांत जातो. महेश्वराची नजर कांहीं ठीक दिसत नाहीं. आमच्या घरीं दादाच्या खोलींत तो आणि दादा रोज बराच वेळ बडबडत बसतात. मला मात्र महेश्वराला पाहिला कीं बाई, अगदीं तिटकारा येतो. आमचा दादा आहे भोळा सांब. महेश्वर त्याला कसल्या खड्ड्यांत लोटील हें कांहीं सांगतां येणार नाहीं."

महेश्वराला मी चांगलाच ओळखीत होतों. तो शाळेंत जरी माझ्यापेक्षां दोन इयत्ता पुढें होता तरी मी आणि तो मिड्हीयसच्या परीक्षेंत एकदमच बसलों होतों. मिड्हीयस पास झाल्यानंतर मी 'आर्ट'च्या 'लाईन'ला गेलों आणि तो मेडिकल

कॉलेजमध्यें गेला. महेश्वराची आणि प्रभाकरची ओळख कशी झाली हें मला ठाऊक नव्हतें. पण त्याची संगत प्रभाकराला कधींच फायदेशीर होणार नाहीं, उलट झाला तर तोटाच होईल असें शालिनीप्रमाणें मलाही पत्र वाचतांच वाटूं लागलें. कारण महेश्वराबद्दल कधीं कोणी चांगलें मत द्यायला राजीच नसे.

साडे पांचाचा ठोका पडतांच मी एकदम खुर्चीवरून उठलों आणि पत्र पुन्हां पाकिटांत ठेऊन तें बाहेरच्या खिशांत ठेवीत फिरावयास जाण्यासाठीं बाहेर पडलों. कुठें जायचें याचा मला विचारच करावा लागला नाहीं. कारण आपण जरी अखेरची शिकस्त केली तरी आपल्या मनाविरुद्ध आपले पाय कुसुमच्या घराकडे वळणार हें जवळ जवळ ठरण्यांतच जमा होतें. मग मी तरी विशेष त्रास कां घ्यावा ?

ओटयावर कोणीच नव्हतें. मी वहाण काढून ठेऊन बेधडक आंत गेलों. मनाचा इतका मोकळेपणा ठेवण्यांत मला कसलाच प्रतिबंध नव्हता अगर मीहि लाजाळू स्वभावानें वागत नसे. कारण तें माझ्या स्वभावाविरुद्ध होतें. लहानपणापासूनच आईनें आणि बाबांनीं माझ्याबद्दल भाकीत करून ठेवलें होतें कीं कुठल्याही माणसाची माझ्याबरोबर जराशी ओळख झाली कीं एक, दोन दिवसांनंतर, एखाद्या तिऱ्हाइताला वाटावें कीं माझी त्या माणसाबरोबर जन्मापासूनची घसण असावी. आणि म्हणूनच उण्यापुऱ्या चार दिवसांच्या ओळखीच्या कुसुम-माधवरावांबरोबर मी जुन्या परिचयाच्या माणसासारखा आपुलकीच्या भावानें वागत होतों.

स्वयंपाकघरांत कुसुम धुवून आणलेले चहाचे पेले फडताळांत ठेवीत होती. पाठीं वळून मला पहातांच 'अग बाई' असें म्हणून ती माझ्याकडे हंसतमुखानें पाहूं लागली.

" काय, अगदीं वेळेवर आलों नाहीं ? " हातांतली काठी दोन्हीं हातांनीं वांकवीत मी म्हणालों. तिनें त्यांतला गर्भितार्थ ओळखून विचारलें,

" मग चहा देऊं का ? "

" म्हणजे, तें काय सांगायला पाहिजे ? " मी भिंतीला टेकून ठेवलेला पाट जमिनीवर घेऊन बसलों. तिनें फडताळांतून पेलाबशी काढली आणि चहा ओतून माझ्यापुढें ठेवला. तेथें आम्हीं दोघेचजण होतों. असा प्रसंग शक्य तों येऊं नये अशीच माझी इच्छा होती. पण त्यावेळीं मनावर ताबा ठेवून मुकाटयानें बाहेर जाण्याला माझें मन घेईना. येऊ नये तो प्रसंग आला कीं तो टाळण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं मनाची उलट तिकडेच ओढ जात असते.

" माधवराव कुठें बाहेर गेले ? " मी चहाचा घोट घेत घेत विचारलें,

" नाहीं, पाठच्या परसांत कायसं करताहेत. "

" आणि यशवंत ? शाळेंतून आला नाहीं कां अजून ? पावणेसहा वाजले. " मी उजव्या हातांत प्रेलाबशी घेऊन डाव्या हाताच्या रिस्टवॉचमध्यें पहात म्हटलें.

" शाळेंतून येऊन मित्राबरोबर कुठंसा गेला आहे. "

इतक्यांत माधवराव चिखल-मातीच्या हातानें आंत आले.

" काय, कधीं आलांत ?"

" हा आतांच आलों. पांच, दहा मिनिटं झालीं असतील. "

" अस्सं. कुसुम, माझ्या हातावर जरा पाणी घाल पाहूं. "

माधवराव हात धुवून बाहेर गेल्यावर मी आणि कुसूमहि त्यांच्यापाठून बाहेर गेलों.

" माधवराव, फिरायला येतां का ?" मी विचारलें.

" छेः अगदीं दमून गेलों आहे. केळ तोडायची होती, दोन तीन फुलझाडं लावायची होती; तें सारं काम उरकून आलों आहे. आतां मी अगदीं स्वस्थ पडणार आहें."

" असं म्हणतां ? मग मी एकटाच कशाला जाऊं ? एकट्याला अगदीं कंटाळा येतो."

" मग आमच्या कुसुमला घेऊन जा. काय ग ए, जा, फिरून ये. लाजायला नको. हे म्हणजे कांहीं आपला प्रभा नाहीं. रात्रीं कांहीं मला जेवायचं नाहीं. आज फक्त कॉफी आणि यशवंतासाठीं थोडासा शिरा केला कीं झालं काम. तेवढं आल्यानंतर कर जा."

प्रथम कुसुम कांकूं करूं लागली. पण मीहि आग्रह करतांच ती कबूल झाली. थोड्या वेळानें लुगडें बदलून ती बाहेर आली. त्यावेळीं ती मला इतकी मोहक भासली कीं अगदीं खरेंखुरें सांगावयाचें म्हणजे मला प्रभाकराच्या भाग्याबद्दल हेवा वाटूं लागला. त्याच क्षणीं शालीनचीही मूर्ति माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली. दोघांच्या वयांत फार फार तर तीन, चार महिन्यांचा फरक होता. दोघीहि वर्णानें अर्धवट गोऱ्या आणि नाकीं डोळीं नीटस होत्या. फरक इतकाच कीं इंदू तिच्यापेक्षां एक मूठभर उंच दिसत असल्यामुळें कृश दिसे आणि कुसुमचा बांधा ठेंगणा नाहीं आणि उंचहि नाहीं म्हणजे अगदीं मध्यम बांधेसूद होता आणि म्हणूनच मला वाटतें ती जास्त देखणी दिसे. ती पांढरें शुभ्र,काळ्या टिकल्यांचें लुगडें नेसली होती, अंगांत आभाळी रंगाचा पोलका होता आणि तोंड धुतल्यावर केसावरून फणी फिरवली

नसल्यामुळें पुढचे पुढचे तुटक कुरळे केस ओलेपणामुळें कपाळावर चिकटल्यासारखे दिसून ती फारच सुंदर दिसत होती. केव्हां केव्हां कृत्रिमतेपेक्षां सहजतेनें कपाळावर रुळणारे केस मूळ सौंदर्यांत जास्त भर कशी घालतात हें मला त्यावेळीं प्रत्यक्षामुळें पटलें.

पायांत मऊ गादीचे बायकी जोडे घालून ती माझ्याबरोबर फिरावयास जाण्यास निघाली.

× × × ×

कुसुमबरोबर मी एकटा असण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. आणि मला नदीकिनारीं एकटेंच फिरण्याचा कंटाळा म्हणून जोडीला कुसुम घेतली होती. परंतु आम्हीं दोघेंच एका बाजूला वाळूंत बसल्यामुळें माझ्या मनाची चमत्कारीक स्थिति होऊं लागली आणि तिच्याशीं काय बोलावें हेंच मला समजेना. पूर्वी एखाद वेळ तिच्या एकांत सहवासाची माझ्या मनांत कल्पना आली असलीतरी प्रत्यक्ष प्रसंग येतांच माझें मन बावरून गेलें. तिचें तें सहजसौंदर्य पाहून, वाऱ्याच्या झोतानें विसकटून भुरुभुरु उडणारे तिचे केस पाहून मी अगदीं तटस्थ झालों होतों. सभोंवार बऱ्याच अंतरापर्यंत मनुष्य दिसत नसल्यामुळें कदाचित् माझें मोहवश मन एखाद्या अविचाराला नकळत प्रवृत्त होईल या भीतीनें मी माझ्या मनाची उन्मादावस्था मोठ्या प्रयासानें दाबून ठेवीत होतों. सारी परिस्थिति अनुकूल असल्यामुळेंच माझें मन मला थोपवून धरावें लागत होतें. त्यावेळची ती एक अनिष्ट सुसंधी होती.

बराच वेळ आम्हीं दोघें मधून मधून निसर्गाची, संध्यासमयाची शोभा पहात वाळूवर बोटांनीं कसल्या तरी आकृति काढीत होतों. पण माझ्या बडबड्या स्वभावाला तें न साहून मी बोलण्याला सुरवात केली.

"शालीनच्या घरचं कोणाचं पत्र आलं होतं का ?"

"आज आठ दिवस नाहीं आलं. तुम्हांला आलं होतं का ?"

"हो. आजच शालीनचं पत्र आलं होतं."

"काय लिहिलं आहे ?"

"खुशाली लिहिली आहे."

" आणखी कांहीं नाहीं का लिहिलं ? पत्र आहे का खिशांत ?" कुसुमच्या चर्येवर कसल्या तरी चमत्कारिक विकारांची ओझरती छटा दिसून एकदम नाहींशी झाली, असें मला वाटलें.

"हो. खरंच. प्रभाकराबद्दल तिनं कांहीं लिहिलं आहे खरं."तिच्या दुसऱ्या प्रश्नाला उत्तर न देतां मी म्हणालों. कारण पत्र असूनसुद्धां तिला तें देणें म्हणजे मोठा मूर्खपणा झाला असता.

"काय लिहिलं आहे ?" यावेळीं तिच्या चेहऱ्यावर सभय उत्कंठा दिसत होती. प्रभाकराबद्दल इष्ट-अनिष्ट कांहींहि लिहिलें असलें तरी तिला त्याबद्दल औत्सुक्य वाटणें साहजिकच होतें.

"त्याचं अभ्यासावरून लक्ष उडालं असून महेश्वर नांवाच्या त्याच्या एका मित्राबरोबर त्याचा सबंध दिवस बडबडण्यांत आणि भटकण्यांत जातो."

" परिक्षेला किती महिने उरले आहेत ? "

" फार फार तर पांच सहा महिने. "

माझ्या उत्तरानें तिनें एक जड निःश्वास सोडला आणि खालच्या मानेनें वाळूवर उभी आडवी बोटें फिरवीत ती तिकडे एकाग्रतेनें पाहूं लागली.

वेळ जाऊं लागला तसतसें संध्याकाळचें सौंदर्य जास्त जास्त रमणीय दिसूं लागलें. मावळतें सूर्यबिंब जसजसें दृष्टीआड होऊं लागलें तसतशी आकाशांत निरनिराळ्या रंगाची येरझार सुरूं होऊन सभोंवतालच्या प्रदेशावर लाली पसरूं लागली. रंगीत आकाशाचें प्रतिबिंब नदीच्या रुंद पात्रांत पडून वाऱ्याच्या हेलकाव्याबरोबर अनेक अवर्णनीय रंगांची शोभा दिसूं लागली. माझें मन तर त्या देखाव्यानें इतकें प्रसन्न झालें कीं माझ्या तोंडून चटकन ' वाः छान' असें वाक्य निघालें.

" किती सुंदर देखावा आहे हा ! " मी कुसुमकडे वळून म्हटलें.

" काय ? " तिनें एखाद्या झोपेंतून जागे झालेल्या माणसासारखें दचकून विचारलें.

" समोर पहा, कसा सुंदर देखावा देवानें निर्माण केला आहे तो ! "

" हो, खरंच. ' तिनें शुष्क नजरेनें समोर पाहत म्हटलें.

" असलीं सुंदर दृश्यं घडीभर सुद्धां टिकणारीं नसतात म्हणूनच तीं देवानं इतकीं रमणीय बनवलीं आहेत. फुलांना मनुष्याचा अधाशी दृष्ट लागूं नये म्हणूनच परमेश्वरानं त्यांना अल्पायुषी बनवलं आहे असं कोणीसं म्हटलं आहे तें खोटं नाहीं ! तुला नाहीं असं वाटत ? "

" काय ?— होय. " ती कांहीं तरी बोलायचें म्हणून बोलली हे मी तेव्हांच ताडलें. तिनें माझा प्रश्न ऐकला होता कीं नाहीं याची....शंकाच होती. मी कांहीं तरी

विचारलें असें तिला वाटलें म्हणून तिनें उत्तरादाखल 'होय' हे शब्द उच्चारले होतें इतकेंच. आसपासच्या परिस्थितीबद्दल ती पूर्ण अज्ञात होती.

पांचएक मिनिटें मुकेपणांतच गेलीं. मला तें कसेसेंच वाटलें. अशा रमणीय वेळीं आम्हीं मुक्यामुक्यानेंच वेळ घालवावा हें भोंवतालच्या मनोहर परिस्थितीनें प्रसन्न झालेल्या माझ्या मनाला पसंत पडेना. मी तिला विचारलें,

"का? तूं बोलत नाहींस ती?"

"काय बोलायचं?" तिनें हंसऱ्या मुखानें माझ्याकडे पहात मला विचारलें.

"काय म्हणजे? वाटेल तें बोलावं!" मीहि हंसत हंसत म्हणालें.

"आणि बोलायचंच नसलं तर?"

"मग काय? बोलणंच खुंटलं."

या उत्तरानें तिला आणि मला हंसूं येऊं लागलें. या एकदोन वाक्यांतच तिची उदास मनःस्थिति पार मावळली असें मला वाटलें.

"या वेळचं निसर्गाचं सौंदर्य पाहून एखादा जातिवंत कवी अगदीं वेडावून जाईल नाहीं?"

"पण तुम्हीं तर कवि नाहीं ना?"

"नसलों तरी आतांपुरतां तरी मला ईश्वरानं कवी करावं असं वाटायला लागलं आहे. संध्याकाळची सुंदर सुप्रशांत वेळ, सृष्टीची खुलती शोभा, बाजूला वहाणारा नदीचा मंजूळ प्रवाह, सभोंवतालची दिव्य आनंदाची परिस्थिति आणि माझ्या शेजारीं बसलेली तुझ्यासारखी गोड चेहऱ्याची, हंसऱ्या मुखाची सौंदर्यखनि—"

आणि मी कुठेंतरी भटकत जाणार होतों; पण कसलासा 'खस्' असा आवाज झाला म्हणून मी थांबून सहज पाठीं वळून पाहिलें. यशवंत कांहींशा विलक्षण मुद्रेनें, विचित्र नजरेनें आम्हां दोघांकडे—विशेषतः कुसुमकडे रोखून पहात होता. त्याच्या बघण्यांत मला कांहीं निराळेंच भासलें आणि काव्याच्या ऐन भरांत माझ्या भरमसाट वहाणाऱ्या जिभेनेंच त्याच्या मुद्रेवर असली तिरस्काराची छटा आणली असावी अशी ओझरती शंका माझ्या मनांत आली. पण मी तसें त्याला कांहींच कळूं न देतां हंसत हंसत विचारलें,

"काय रे, यशवंत, तूं आपल्या मित्राबरोबर कुठंसा गेला होतास ना?"

पण माझ्या प्रश्नाला त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. कुसुमकडे वळून तो रागारागानें म्हणाला,

"कुसुम, घरीं येते आहेस, का इथंच रमली आहेस ?" मोठ्या शिकस्तीनें तो आपला राग आंवरीत होता हें त्याच्या चेहऱ्यावरून सहज दिसून येत होतें. कुसुमला त्याच्या बोलण्यांतलो खोंच कळली. ती माझ्याकडे निसटती नजर टाकून उठली आणि आपलें लुगडें हातानें झाडीत जाण्याच्या तयारीनें उभी राहिली. मीहि उठलों आणि आम्हीं तिघेंहि कोणाशीं एक चकार शब्द न बोलतां निमूटपणें चालूं लागलों. मी मधून मधून कुसुमकडे आणि यशवंतकडे त्यांना नकळत पहात होतों; पण त्यांचें माझ्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. मनांत विचारांचें तुफान झाल्यामुळें यशवंताची चालण्याची गतीसुद्धां बरीचशी जलद झाली होती. त्यांचें घर येतांच तीं दोघेंहि पायऱ्या चढून आंत जाऊं लागलीं. रस्त्यावरच एक क्षणभर मी उभा राहिलों आणि आतां वळणार इतक्यांत कुसुमनें हळूच वळून करुण चेहरा करून माझ्याकडे नजर फेंकली. मीहि तिच्याकडे त्याच मुद्रेनें पाहिलें आणि खिन्न मनानें झाल्या गोष्टीचा विचार करीत वाट चालूं लागलों.

प्रकरण ५ वें.

अनोळखी आघात.

मनाच्या अशा विषण्ण स्थितींत मी घरीं आलों.जेवतांना माझी मूकवृत्ति पाहून आईनेंसुद्धां विचारलें कीं,"जया, असा स्तब्ध का रे ? कसली काळजी लागली आहे ? पास होण्याची होय ?"

यावर बाबा म्हणाले, " पास होण्याची तो कां म्हणून काळजी करणार ? त्याचें पेपर तर छान गेले आहेत म्हणून तो सांगत होता. होय ना रे जया ?" मीहि 'होय' म्हटलें आणि जेवण संपवून हात, तोंड धुतलें आणि माडीवर माझ्या खोलींत जाऊन बसलों. आज असें काय झालें हेंच मला कळेना. माधवराव, कुसुम वगैरे मंडळीशीं माझी ओळख होऊन एक आठवडा सुद्धां उगापुरा लोटला नव्हता. आणि इतक्यांत यशवंताला माझ्याबद्दल भलता संशय वाटून—

पण तो संशय 'भलता' कसा होता ? त्यावेळीं मी पागलपणानें कांहींतरी बरळलों नव्हतों का ? तिऱ्हाइताच्या नजरेला संशयास्पद वाटण्यारखें तें दृश्य नव्हतें का ? कुसुमकडे मी कुठल्या दृष्टीनें पहात होतों ? कुसुम मला आवडत होती. यशवंत मला आवडत होता व माधवरावाबद्दलहि माझ्या मनांत प्रेम होतें. पण त्या दोघांच्या आणि कुसुमच्या प्रेमांत तफावत नव्हती का ? त्या दोघांचा व माझा दाट परीचय झाला होता; पण कुसुम मला निवळ परिचयाचीकडचें माणूस वाटत होतें.मग मी 'आपल्या' माणसाबद्दल तोंडांतून निराळेच शब्द काढले तर यशवंताला राग कां आला ?

मी थोडासा विचार करतांच मला असें वाटूं लागलें कीं कदाचित् दाट परिचयापेक्षां निराळेंच—जास्त जिव्हाळ्याचें नातें माझ्यांत आणि कुसुममध्यें निर्माण झालें आहे हें यशवंताला ठाऊक नव्हतें, म्हणून माझ्या शेवटल्या शेवटल्या एकदोन असंबद्ध वाक्यांचा भलताच विपर्यास करून माझ्याबद्दल त्याचें मन कलुषित झालें असावें. आणि हेंच मला बऱ्याच अंशीं शक्य वाटूं लागलें. त्या वेळचा सारी परिस्थितीच अशी गोड होती कीं माझ्यासारख्याच्या तोंडून त्यावेळीं तसलीं वाक्यें बाहेर पडलीं नसतीं तरच जरासें आश्चर्य करण्यासारखें होतें ! गजबजाट नसलेल्या अशा नदी-किनाऱ्यावर कुसुमसारखी नवयौवना शेजारी असतानां सायंसंध्येचो वेळ किती सुंदर भासते ! सारें वातावरण आनंदमय व उत्साहजनक असते. अशा वेळीं, तसल्या सुंदर परिस्थितींत, माझ्या तोंडून कुसुमला उद्देशून—शिकस्तीच्या प्रयत्नाला न जुमानतां एखादें विशेषणात्मक वाक्य निघालें तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय होतें ? पण यशवंताचें मन तें वाक्य ऐकून गढूळ झालें, याचें मात्र मला फार आश्चर्य वाटलें. पण तशा परिस्थितींत यशवंताचा निराळाच ग्रह होणें किती शक्य होतें याचा माझ्या एकांगी मनाला त्या वेळीं विचार शिवला नाहीं.

विचारानीं डोकें भडकून गेलें म्हणून सकाळीं झोंपून उठतांच मी नदीकिनाऱ्यावरची थंड हवा घ्यावी म्हणून घराबाहेर पडलों. जसजसा मी तो विचार डोक्यांतून धुडकाऊन लावण्याचा प्रयत्न करीत होतों तसतसा तो माझ्यापासून विभक्त होण्याला नाकबूल होता. किनाऱ्यावरच्या शांत हवेनें सुद्धां माझें भडकलेलें डोकें शांत होईना. मी त्या बाजूला फिरावयाला आलों हा सुद्धां मला माझा मूर्खपणा वाटूं लागला. माझ्या इच्छेविरुद्ध सुद्धां माझे डोळे काल मी आणि कुसुम बसलेल्या जागेकडे जात होते. कोणत्याहि दुःखद गोष्टीची विस्मृति पडण्यासाठीं त्या स्थलापासून प्रथम दूर-दृष्टिआड जावें लागतें, हें मला ठाऊक असतानां सुद्धां मी परत त्या ठिकाणींच जाणें म्हणजे माझा मूर्खपणाच नाहीं तर काय ?

तिथेंहि मन रमेना म्हणून मी परत घरीं जाण्यास निघालों. कुसुमच्या घरावरून जाण्याची मोह मोठ्या मुष्किलीनें आवरून मी एका दुसऱ्याच वाटेनें घरीं आलों. मी अंगणांत येतांच बाजूला उभा राहिलेला एक कुणब्याचा ८-९ वर्षांचा पोर पुढें येऊन मला आपादमस्तक पाहूं लागला आणि म्हणाला, "तुमचं नांव जयवंतराव व्हय ?"

"होय.का रे?" मी थांबून म्हणालों. पुन्हां एकदां त्यानें मला पाहून आपली खात्री करून घेतली आणि आपल्या मळक्या पैरणीच्या खिशांत ठेवलेली एक चिठी काढून म्हणाला, "ही चिठी दिली हाय."

मी ती चिठी घेऊन उघडली. आंत अवघ्या दोन तीन ओळी घाईघाईनें खरडल्या होत्या.

"कालच्या गोष्टीचा आपण राग मानूं नये. यशवंतानें बाबांना सारें सांगितलें आणि त्यांनांहि बराच राग आला आहे. मी सांगतें म्हणून आपण रागाऊं नये; पण आपण सध्यांच्या परिस्थितींत आमच्या घरीं न याल तर बरें.

आपली,

कुसुम.

मी आश्चर्यचकित होऊन त्या चिठीची घडी करीत करीत पोराला उद्देशून म्हणालों, "कायरे, उत्तर आणायला—"पण बाजूला तो पोर कुठेंच दिसेना. मी धांवत धांवत बाहेर रस्त्यावर गेलों आणि दूर पाहूं लागलों; पण तो कुणाच्याचा पोर कुठें बेपत्ताच झाला. मी पाठीं फिरून ती चिठी पुन्हां एकदां वाचली आणि तिची घडी करून खिशांत ठेवीत ठेवीत घरांत आलों.

× × × ×

मला आतां इथें रहावेंसेच वाटेना. मी केव्हां एकदां मुंबईला जाईन असें मला झालें. इकडे राहून तरी आतां काय फायदा होता ? ज्या घरीं माझा सवंध दिवस चैनीनें जात होता त्या घरीं जाण्याची आतां जवळ जवळ बंदीच झाली होती. माझें मन आतां कुसुमच्या घरीं जाण्याचें घेईनाच. तिनें तर चिठींत तसें लिहिलेंच होतें. पण शिवाय मी आतां तेथें जाणें म्हणजे कांहींसें विचित्रच आहे असें मला वाटूं लागलें होतें. यशवंत तर माझ्यावर कोपलेला, माधवरावांचें मन माझ्याबद्दल त्यानें कलुषित केलेलें, आणि कुसुम तर त्या दोघांच्या भयानें मनांत असून सुद्धां माझ्या बरोबर बोलण्यास धजणार नाहीं याबद्दल माझी खात्रीच होती. मग अशा स्थितींत तेथें जाऊन आपली शोभा करून घेण्यांत फायदा काय ?

आणखी चार दिवस गेले.मी मुंबईला निघून जाण्याचा नक्की निश्चय केला आणि दुपारीं चहा घेण्याच्या वेळीं ही गोष्ट बाबांच्या कानीं घालण्याचें मनाशीं ठरवलें. पण 'संकल्प आणि सिद्धी यांच्यामध्यें परमेश्वरी इच्छा उभी असते' हें मला त्यावेळीं ठाऊक नव्हतें.

मार्गक्रमण

[लेखक ' मार्गदर्शक '

(आयुष्याच्या मार्गक्रमणांत अडचणी व्या यावयाच्याच)

अडचण:--मोठमोठीं प्रौढ, वयस्क माणसें आपण मोठीं असल्याबद्दल दु:ख मानून बालपणाची इच्छा करतात. पण त्यांना त्यांत काय अधिक वाटतें तेंच कळत नाहीं. मोठेपणामुळें त्यांना जें महत्त्व मिळतें, त्यांना हरघडी आम्हांला दबकावण्याइतका जो अधिकार मिळतो, सध्यांच्या स्थितींत त्यांच्या हातांत जो पैसा खेळतो व त्याची मन मानेल तशी विल्हेवाट लावण्याइतकी जी मुखत्यारी मिळते त्याचा त्यांना या बालवयांत लाभ कसा होईल ? कोणाचें वर्चस्व नाहीं, भरपूर स्वतंत्रता मिळेल, हातांत मुबलक पैसा राहील आणि नाटकाला कां गेलास, सिनेमाला कां गेलास, म्हणून पदोपदीं आमच्या इच्छेआड येऊन आम्हांला रागानें बोलणारें कोणी नाहीं; असे एक का दोन अनेक फायदे आहेत. मग मोठ्यांना लहान व्हावेसें कां वाटतें ?

उपाय:--या अडचणींतून कसा निभाव काढावयाचा तें मी सांगतों. तुम्ही मोठ्या माणसांच्या स्वतंत्रतेबद्दल, त्यांच्या वर्चस्वाबद्दल आणि इतर फायदेशीर गोष्टींबद्दल जे विचार प्रदर्शित केले त्यावेळीं तुम्हां मुलांनीं त्यांच्या आपद्दांकडे आणि जबाबदारीकडे पार कानाडोळा केला. त्यांच्या हातांत मुबलक पेसा खेळत असला तरी आपण जर सगळा पैसा चैनींत उडवला तर आपलीं पोरेंबाळें काय करतील ही काळजी त्यांना असतेच ना ? अशा वेळीं कोठलीहि जबाबदारी नसलेली तुम्हीं बाळगोपाळ मंडळीच भाग्यशाली. तुमच्या हातांत पैसा नाहीं, म्हणून तुम्हांला कसलीच काळजी नाहीं. ते तुमच्यापेक्षां किती तरी दु:खीच म्हटलें पाहिजेत. शिवाय त्यांना जरी स्वतंत्रता मिळाली आहे तरी त्याचा, त्यांची मनें सुसंस्कृत व जगाचे टक्के टोणपे खाऊन अनुभवी बनलेलीं असल्यामुळें, दुरुपयोग होऊं न देण्याइतका स्वत:वर ते दाब ठेवतात. तितका तुमच्या अननुभवी मनांना ठेवतां येणार नाहीं. शिवाय तुम्हांला वडील माणसें जीं वारंवार दबकावतात ती तुमचें एखादें कृत्य गैरशिस्त व दोषमूलक वाटतें म्हणून. तुम्हांला तो निष्ठूरपणा दिसत असला तरी तो प्रेमळ निष्ठूरपणा आहे. तुम्हाला सुधारण्याची वडील माणसांवरच जबाबदारी आहे. म्हणजे प्रत्येक बाबतींत तुम्हीं जितके स्वच्छंदी व काळजीपासून मुक्त आहां, तितकेच ते काळजीनें व्याप्त असून त्यांच्याशिरावर कुटुंबाची जबाबदारी आहे. आणि अशा व्यावहारिक कंटाळवाण्या आयुष्यांत मन प्रसन्न रहात नसल्यामुळें त्यांना बालकांच्या निष्काळजी स्वच्छंदपणाची इच्छा होते आणि पुन्हां त्यांना लहान मूल व्हावेंसें वाटत.

मेंदुचे विकार व डोकें दुखणें यावर.

किं. १-२-०,] **ब्राम्ही तेल** [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा:—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळंत काढा:—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळकडू:—उपजल्यापासून देण्यास योग्य किं. ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा; रसायणें वगैरे औषधें तयार आहेत. एक आणा आला असतां रुग्ण पत्रिका, लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचना:—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांचा खप वाढल्यामुळें नक्कल सुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळीं या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयौषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.
दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने

शर्टची बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोत्याची रु. ५. आंगठी रु. १; सल्ले जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. २॥; घडाळ्याचा छेडा रु. ३;

केंस काळे करण्याचा साबण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्याच्या बॉक्सला रु. १॥

इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुड्यासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. अमृतवाडी, गिरगांव, मुंबई



किंमत ३ आणे.

संपादक—मो. ग. रांगणेकर

अरुण कार्यालय,
२ री भटवाडी, मुंबई ४.

वा. व. ट. ख.
२। रुपये.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं
जगाविख्यात "निवडक औषधें."

नं. १ **फिवरॉल**–सर्व जातींच्या साध्या-दोषी–विषारी-मुदती–सांथीच्या तापांवर अप्रतिम. किं. रु. १॥-

नं. ५ **मलेरिन**–अखिल हिंदुस्थानांतील पहिलेंच सर्वश्रेष्ठ–अत्यंत सोईस्कर ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. १।-

नं. ६ **मलेरिन नं २**–अल्पमोली पण खात्रीपूर्वक अत्यंत गुणी ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. ।।।-

नं. १४ **हिस्टेरिन**–स्त्रियांच्या हिस्टेरिया–उन्माद–गुल्मादिकांवर सर्वोत्कृष्ट. किं. रु. २

नं. १५ **थॅमिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट–हट्टी–प्राणघातक दम्यावरअमोलिक. किं. रु. ३

नं. १९ **जर्मिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट हट्टी-हाडींमासीं खिळलेल्या उपदंश गर्मीवर. किं. रु. ३

नं. २० **सँटोल**–प्रमेह--परम्यावर; लघवीची आग–तिडिक–जळजळ ५।६ तासांत बंद ! किं. रु. ३॥

नं. ३९ **एलिक्झीर शिलाजित कंपाउंड**–सर्व प्रकारच्या मूत्रदोषादि विकारांवर. किं. रु. ३

नं. ४२ **रास्ना कॉर्डियल**–अर्धांगवायू-पक्षाघात,कटिशूल, संधि– आमवातादिकांवर. किं. रु. ३

नं. ४८ **मस्तकशूळावर रामबाण वडया**-असह्य मस्तकशूळ-अर्धशिशी ५ मिनिटांत बंद ! किं रु. ।।।-

नं. ४९ **वीर्योटोन गुटिका**–सर्वांग सुंदर धातुपौष्टिक; रक्त-मांस-मेंदू-बलवर्धक. किं. रु. २॥-

नं. ५० **चैतन्योटोन गुटिका**–यॉहिंबिनयुक्त; मर्दाईवर जगप्रसिद्ध निर्वाणीचा उपाय. किं. रु. ६

नं. ५१ **चैतन्योटोन तेल**–मर्दाईवर तात्कालिक व चिरकालिक बाह्योपचार किं. रु. ५

नं. ५४ **एलिक्झोर ऍन्टी कन्व्हलशन**–लहान मुलांच्या आंकडीवर प्रतिज्ञेचें औषध. किं. रु. २

नं ७८ **वेदिक पेन बाम**–वातहारक, दुःखशामक, सूजनाशक, झटपट– चिरकालिक गुण. किं. रु. -।।।-

मोठा सचित्र क्याटलाग व नविन वर्षाचें सर्वांगसुंदर क्यालेंडर १ आण्याचें तिकिट पाठविल्यास मोफत पाठवूं.

कुळकर्णी ऍण्ड सन्स, मुंबई नं.२.

अद्भुत! अद्वितीय! चमत्कारिक!

कविविनोद वैद्यभूषण पं० ठाकुरदत्त शर्मा वैद्य यांनीं बनविलेली.

अमृतधारा

[रजिस्टर्ड egistered]

अमृतधाराची जितकी प्रशंसा वास्तवीकपणें होत आहे, तेवढी जर लिहावयास बसलों मोठे ग्रंथ भरून जातील. परंतु संक्षिप्त रूपानें पाहणें असल्यास "अमृत" नांवाचें मराठी पुस्तक फुकट मागवून वाचून पाहणें. खरोखर आजपर्यंत एक सुद्धां औषधी अमृतधारेच्या जोडीची निघाली नाहीं. आश्चर्याची गोष्ट आहे व कांहीं लोक हें एकदम खरेही मानीत नाहींत कीं, एकच औषधी सर्व रोगांवर चालते तरी कशी? शिवाय गूणहि तात्काळ वाटतो.

अमृतधारा ज्या ज्या रोगांवर चालते त्यांची नामावली.

प्रत्येक प्रकारचा ताप, अतिसार, संग्रहणी, रक्तातिसार, अजीर्ण, अरुचि, महामारी, हग, ओक, मूळव्याध, पांडु, कावीळ, खोकला, श्वास, क्षय, उचकी, वांती, रक्तसर्दि, ओकारी, मुर्च्छा, भ्रम, अपस्मार [फेंफरे] आम्लवात, शूळ, आनाह, उदररोग, गुल्म, शोथ, कंठमाळा, गलगंड, भगंदर, पर्मा, गर्मी, वातरोग, पित्तरोग, कफरोग, ओष्ट सुजणें, दांत दुखणें, दांतांस पाणी लागणें, दंतरोग, मुखपाक, हिरड्या सुजणें व दुखणें, कंठरोग, कर्णस्राव, कर्णकंड, नजळा, वेदना, नेत्ररोग, लहान मुलांचा ताप, खोकला, अतिसारादि रोग, सर्प, विंचू, मधमाशी, मुंगी, इत्यादिकांचे विषारी दंश, अफू, सोमल इत्यादिचें विष, प्लेग, पार्श्वशुक, न्यूमोनिया, शंका लासूर, गजकर्ण, नायटे, इसब, खाज, पुळ्या, सांधे गुढगे, पोटऱ्या किंवा मांड्या, दांत दुखणें इ०

गृहस्थहो विचार तर करा!

असें औषध प्रत्येक मनुष्याच्या खिशांत प्रत्येक ऋतूंत घरांत देश परदेश सर्वत्र सर्व काल असलें पाहिजे नको का? कोणास माहीत आहे कीं कधीं काय होतें? अशा प्रसंगाच्या वेळीं जें काम हें औषध देतें त्याच्या मानानें याची किंमत कांहींच नाहीं.

" अमृतधारे " ची प्रशंसा जितकी आम्ही करतों त्याच्यापेक्षां कितीतरी पटीनें 'अमृतधारा' घेणारे करतात. आमच्या जवळ २१ हजार सर्टिफिकीटें आहेत. आपणसुद्धां एकदां मागवून अनुभव घेऊन प्रशंसकांच्या मंडळींत सामील होणें. किं. रु. २८८;

नमुन्याच्या लहान बाटलीचे आठ आणे; अर्ध्या बाटलीचा १। रु. पत्रव्यवहार बालबोध मध्यें करणें, मोडींत करूं नये.

मॅनिजर—अमृतधारा औषधालय, अमृतधारा भुवन, अमृतधारा रोड, अमृतधारा डाकखाना, लाहोर. पत्र किंवा तार पाठविणे असल्यास फक्त एवढा पत्ता पुरे आहे—

" अमृतधारा ९७ लाहोर " [३४६]

एजंट—गुलाम हुसैन वल्ली महमद देवजी पीर भाई मिंसन परिन्सीस स्ट्रीट मुम्बई २—

अनुक्रमणिका

	१	**तिळगुळ** (कविता)	१
	२	**मायेचें वेड** (गोष्ट) ले. मो. ग. रांगणेकर ...	२
	३	**श्री. सयाजीराव महाराजांची मुलाखत** ...	१०
*	४	**सिंहगडचा सिंह** (कविता)	१६
	५	**मुलांची मौज**	१७
	६	**मुलींचा संसार**	२३
	७	**आदर्श** (नजरचूक) ले. वि. य. देसाई ...	२६
	८	**महत्वाकांक्षी नट** (नाटचछटा)	३०
	९	**वाग्रत्नाकर**	३१
	१०	**क्षणभंगुर**—(चालू कादंबरी)	३९
	११	**" महाराष्ट्राचें ऋण "**	४३

* हें चित्र **विविध-वृत्ताच्या खास अंकांत** रा.एम्.आर. चाफळकर यानीं प्रसिद्ध केले होतें त त्यानीं प्रसिद्ध करण्यास दिल्यावद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहों.

अहो ! बेपत्ता झा--ले !

नाहीं हो ! पत्ता बदलला

लिंग्रस ब्रदर्स,

गोवर्धनदास बिल्डिंग, पोर्च्युगीज चर्च, गिरगांव–मुंबई या ठिकाणीं गेले.

यशोमहाद्वाराची गुरुकिल्ली हस्तगत करून घेणें असल्यास

योगविद्याभूषण, डॉ. सुरतकर, एम. टी. डी. यांच्या दिव्य लेखणींतून उतरलेलें

आत्मद्योतनोपचार शिक्षक.

ह्या पौर्वात्य व पाश्चात्य अनेक ग्रंथाधारानें लिहिलेल्या पुस्तकाचा अभ्यास करा ! म्हणजे तुमच्या ऐच्छिक वस्तु तुम्हाला सहज प्राप्त होतील. अनेक दुर्धर रोग तुमचे तुम्हास नष्ट करतां येतील ! दुर्गुणांचा नाश करून पैसा व सद्गुणांची प्राप्ति करून घेतां येईल. तुमचे शत्रुदेखील मित्र होतील ! प्रयत्न करा ! यशस्वी व्हा ! किंमत १॥ व व्ही. पी. १।।।=

प्रो. ज्ञानमित्र, शनवार. पुणें सिटी.



श्री. सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या राज्यारोहणाच्या ५० व्या वाढदिवसाचा सुवर्णमहोत्सव मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला.

[By Courtsey of "Nava Kal"]



कोंडाण्यावर नाचत दिवट्या वीर मावळ्यांच्या। (पृष्ठ १६)

अरुण माला.

वर्ष २.] जानेवारी १९२६ [अंक ५.

तिळगुळ

सौख्याची मधु शर्करा पसरली जीवीत-तीलावर
प्रेमाचे वच ऐकुनी उमटला कांटा बरा त्यावर
हर्षाचा हलवा नवा मधुर हा प्रेमें करी सादर
'स्नेहाचे न तुटोत बंध कधिंही' प्रार्थी पदीं पामर.

मायेचें वेड

[मो. ग. रांगणेकर.

रात्र अर्धी अधिक उलटली होती. कभिन्न काळोखाच्या दाट आवरणाखालीं सृष्टीवर मोहनिद्रेचा अविच्छिन्न अंमल चालू होता. त्या सुखस्वप्नांच्या सुशांत वेळीं काळोखाच्या आवरणाखालीं असभ्य कामगिऱ्यांचा उरक करणाऱ्या प्रतिष्ठीत संभावितांखेरीज निर्हेतुक जागणें कोणालाही आवडलें नसतें. रात्रीच्या सहजसिद्ध थंडींत हंगामी थंडीची भर पडल्यामुळें रखरखीत उबदार कांबळ्यांत अगर मऊ मऊ अशा जाड ' रग ' मध्यें आपादमस्तक गुरफटून स्वस्थ मनानें झोंप घेतल्याशिवाय दुसरें कांहीं करणें शक्यच नव्हतें.

पण तशाही थंडींत, गारठलेल्या वातावरणानें मधून मधून कांपत जाडयाभरडया एका लुगडया–चोळीनिशीं सगुणा नारूच्या उशाशीं त्याच्याकडे टक लाऊन पहात बसली होती. इतक्या बेसुमार थंडींत तिला तशा स्थितींत जागतांना जात्या येत्या वाटसरानें पाहिलें असतें तर क्षणभर तोही तिच्या तन्मयतेकडे आश्चर्यानें पाहून पुढें चालता झाला असता. बाहेरच्या थंडीनें तिचें शरीर मधून मधून सकंप होई; पण तें तिच्या ध्यानीं मनीं देखील नव्हतें. यावेळीं ती आपल्या डोळ्यांत प्राण एकवटून नारूच्या चेहऱ्याकडे टक लाऊन पहात होती. तिच्या काल्पनीक सृष्टींत ती आणि नारू एवढया दोनच जीवांचें अस्तित्व होतें. त्यापलीकडे कशाचीही तिला शुद्ध नव्हती.

अर्धमैल अंतरावरच्या चावडीवर दोन वाजल्याचे ठोके पडले. सगुणा स्वप्नसृष्टींतून जागी होऊन उठली, आणि शेगडीवर ऊन करीत ठेवलेली दुधाची पातेली घेऊन परत त्याच्या उशाजवळ आली.

" नारू, बाळ, जागा आहेस ना ? ऊठ. दूध आणलं आहे. " सगुणा त्याच्या उशाशीं बसत बसत म्हणाली. त्याची हालचाल होत नसलेली पाहून तिनें पुन्हां त्याच्या कानाजवळ तोंड नेऊन हांक मारली.

" नारू ! " तरीही नारू स्तब्धच. तिनें पहिल्यापेक्षां कांहीं मोठया आवाजांत म्हटलें,

" नारू, बाळ, दूध आणलंय्. वेळ झाली दूध घेण्याची. मघाशी बाराला घेतलंस; त्याच्यावर कांहीं घेतलं नाहींस. ऊठ बाळ. एवढं घेऊन पुन्हां झोप स्वस्थ. "

इतक्याउपरहि त्याची कांहींच हालचाल होत नसलेली पाहून तिला जरा चमत्कारिक वाटलें. तिनें पुन्हां त्याला हालवून 'नारू' 'नारू' अशा हांका मारल्या. तिला कसेसेंच होऊं लागलें. तिनें त्याला इतक्या हांका मारल्या, इतक्या वेळां हलवून जागें करण्याचा प्रयत्न केला, तरी नारूकडून प्रत्युत्तरादाखल कांहींच हालचाल होत नसलेली पाहून तिच्या

मनांत नसते नसते कुतर्क येऊं लागले. स्वत:च्या मनाला स्वत:च समजवण्याचा प्रयत्न करतांना तिच्या पहिल्या आवाजापेक्षां ती मोठमोठ्यानें नारूला हांका मारूं लागली. नारू असा स्तब्ध कां तेंच तिला कळेना. तिनें हांका मारण्याचा जसजसा जास्त सपाटा लावला तसतशी त्याला नि:स्तब्ध पाहून तिच्या मनाची हुरहुर वाढूं लागली. अखेर तिला अगदीं रहावेना. तिनें घासलेट तेलाचा भिंतीला अडकवलेला मिणमिण जळणारा दिवा खालीं काढला आणि त्याच्या तोंडासमोर धरून पाहिला. तों काय! नारूचें तोंड कांहींसें उघडें असून त्यांतून त्याचे चिमणे दांत दिव्याच्या प्रकाशांत दिसत होते आणि त्याच्या चेहऱ्यावर प्रेतकळा आली होती. तिचा धीर सुटला. तिनें त्याच्या तोंडाजवळ तोंड नेऊन त्याच्या श्वासोच्छ्वासाच्या अनुरोधानें पाहिलें तों सारें सामसुम! तिच्या थरथरणाऱ्या निर्बल हातांतून दिवा खालीं पडला, आणि त्याच वेळीं "नारूSSS" हा हृदयाला पाझर आणणारा अर्धवट रडक्या सुरांत शब्द निघाला. त्या नि:स्तब्ध वातावरणांत "नारूSSS" हा शब्द घुमून त्याचा कोनाकोपऱ्यांतून प्रतिध्वनि होऊं लागला. सगुणा मोठमोठ्यानें रडूं लागली. तिच्या हृदयांतलें रक्त डोळ्यांवाटे अश्रूच्या रूपानें बाहेर पडतें कीं काय असें वाटूं लागलें. तिच्या सर्वस्वावर कठोर काळानें झडप घालतांच तिला ब्रह्मांड आठवलें. तिनें आपल्या पंचप्राणाच्या मोलाने मोजलेला नारू निर्दय दैव असें हातोहात नेऊं लागल्यावर तिच्या रडण्याला बेसुमार ऊत आला. 'नारू' या एका शब्दांत तिला जग व्यापलेलें दिसूं लागलें. नारूच्या निधनाबरोबर जगाचा जिवंतपणा जाऊन त्या उजाड प्रदेशांत आपण वणवण भटकत असल्यासारखें तिला वाटूं लागलें. नारूच्या नांवाने ती कंठशोष करूं लागली. आकाशांतल्या चांदण्यांनीहि तिच्या केविलवाण्या किंकाळ्यानीं पाझरून जाऊन रात्रीच्या काळ्या पडद्याआड आपलें तोंड लपवून मुळुमुळु रडण्यास सुरवात केली. नारूच्या निष्प्राण देहाला कवटाळून त्याच्या नांवानें ती टाहो फोडूं लागली.

रडतां रडतां ती एकदम थांबली. पहिल्या वेळींच तिच्या हातांतला दिवा पडून तो विझून गेला होता. तरी त्या काळोखांतच ती नारूच्या चेहऱ्याकडे रोखून पाहूं लागली. मिनिटभरानें तिनें त्याच्या गळ्याभोंवतीं हात घालून त्याला आपल्या छातीजवळ ओढलें आणि "छबकडया, अरे छबकडया, लबाडा, कुठं रे दडला होतास? मी सगळीकडे शोधलं; पण तूं कुठें नाहींसा झालास तो झालास. आतां मात्र तुला अगदीं सोडणार नाहीं. तुला कुठं जाऊं देणार नाहीं. अस्सा धरून ठेवीन. तूं अगदीं लबाड आहेस—तूं अगदी लुच्चा आहेस——" असे म्हणत म्हणतच ती त्याच्यासकट उभी राहिली आणि एकवार मोठ्यानें हंसून ती जोरानें दरवाजाच्या दिशेने धांवली.

"सगुणा!" दारांतूनच एकदम ध्वनि आला. सगुणेच्या बदललेल्या स्थित्यंतरांत तिच्या नांवानें मारलेली हांक तिच्या कानीं पडली नाहीं, तरी तिला हांक मारणारी व्यक्ति आड आल्यामुळें मात्र तिच्या बाहेर जाण्याला विरोध आला.

"सगुणा ! तूं ओरडलीस कां ? आणि हें तुझ्या हातांत कोण ? नारू ? अग, त्याला घेऊन कुठें जातेस या थंडींत ? बाहेर काळोख कोण पडला आहे ! चल आंत !"

"कोण तूं ? अरे, माझ्या बाळाला माझ्या हातून कोण हिसकाऊन घेईल ? त्याच्या नरडीचा घोंट घेईन. अक्राळविक्राळ काळाच्या पोटांत शिरून माझ्या बाळाला बाहेर काढीन. तूंच काळ काय ? ये, असा पुढें ये. माझ्या बाळाला हात तर लाव—"

"सगुणा, सगुणा ! मी तो शेजारचा गणपत. अशी काय करतेस वेडयासारखी ? चल आंत." गणपत तिला आंत नेण्याचा प्रयत्न करीत म्हणाला.

"काय म्हटलंस ? तूं नेणार बाळाला ? ने पाहूं कसा तो ! तुझा जीव घेईन. तुला काय वाटलं ? काळाचा काळ आला तरी माझ्या छबकडयाला त्याला हात लावायला देणार नाहीं. पुढें ये तर खरा, म्हणजे बघ अस्सा ज—ज— जीव घे —" असें आवेशानें म्हणतच सगुणा नारूला घट्ट कवटाळून एकदम दरवाजाबाहेर धांवत सुटली. तिच्या चक्कयानें गणपतहि घाबरून बाजूच्या भिंतीला आपटला. पण तिला त्या काळोख्या रात्रीं धांवत सुटतांना पाहून त्यानें स्वतःला सांवरून "सगुणा, सगुणा,पाठी फीर" असें म्हणत तो तिच्या पाठून धांवत सुटला. गणपतला दर क्षणाला भीति वाटत होती कीं सगुणा रस्त्यावर कुठें आपटून पडेल कीं काय ! ती इतक्या आवेशानें धांवत होती कीं गणपत पुरुषासारखा पुरुष असून सुद्धां त्याला तिला गांठणें दुर्घट झालें. रस्त्यावरच्या दगडाला सगुणा दोन, तीन वेळां ठेंचाळली. ती शुद्धीवर असती तर कडाक्याच्या थंडींतली ती जबर ठेंच तिला असह्य झाल्याशिवाय राहिली नसती. पण सगुणा पूर्ण बेभान आणि बेफाम झाली होती. तिच्या डोळ्यापुढें तिला कांहीं एक दिसत नव्हतें. ती कुठें तरी धांवत सुटली होती. त्या निस्तब्ध वातावरणांत " सगुणा, मागें फीर " हा ध्वनि दुप्पट जोरानें दुमदुमत होता. रस्त्यावरच्या घरांखालून जातांना त्या आवाजानें जागें होऊन खिडकींतून डोकावण्यापेक्षां कोणी अधिक असें कांहींच केलें नाहीं. गणपतला मदत करण्याच्या त्यांच्या सदय इच्छेआड कडाक्याची थंडी येत असावी असा तर्क करण्यास कांहींच हरकत नव्हती. पण त्याच बेफाम थंडीबद्दल गणपत पूर्ण बेफिकीर होता. सगुणेला गांठून तिला पाठीं फिरवण्याच्या विचारापुढें त्याला दुसरा कसलाच विचार सुचत नव्हता.

अखेर एका अडगळीच्या रस्त्यांत सगुणेला लागोपाठ दोन तीन दगडानां ठेंचा लागून ती नारूसकट धाडकन् खालीं पडली. रस्त्याच्या दुरुस्तीचें काम चालू असल्यामुळें रस्त्यावर पसरलेल्या काळ्या अणकुचीदार दगडांनीं तिच्या सर्वांगावर ओरखडे निघून ढोपरांतून व कोंपरांतून भळभळ रक्त वाहूं लागलें. ती अगदीं जखडल्यासारखी झाली. मैल अर्धमैल धांवण्याच्या श्रमानें आणि या भयंकर दुखापतीनें तिला ग्लानी आली. तिचा उठण्याचा प्रयत्न अयशस्वी होऊन ती त्या दगडांवर पडली.

गणपत पाठून धांवत धांवत आला आणि कोंपऱ्यांतल्या कंदिलाच्या अस्पष्ट प्रकाशांत सगुणा बेशुद्ध स्थितींत रक्ताच्या ओहोळांत पडलेली त्याच्या नजरेस पडली.

" कोण, सगुणा ?" त्यानें एकदम थबकून विचारलें आणि पाठचा पुढचा विचार न करतां नारूसकट तिला पाठुंगळी मारून पुन्हां आल्या वाटेनें जाण्यास सुरवात केली.

× × ×

" आक्का, ती बघ, वेली आली. अग ए वेले !"

"कृष्णा, गप ! त्या वेडीची थट्टा केलीस तर ती तुला घेऊन जाईल बघ !" आक्कानें त्याला दहशत घालून म्हटलें. समोर केस मोकळे सोडून अस्ताव्यस्त स्थितींत सगुणा म्लान वदनानें कृष्णाकडे पहात बसली होती. तिच्या मळक्या लुगड्यावर ठिकठिकाणीं रक्ताचें काळे डाग पडले असून तें एक दोन ठिकाणीं वीत अर्धवीत फाटलें होतें.

"काग आक्का, ती लोद इकले येऊन का बत्ते ?"

"ती तुला नेणार आहे म्हणून सांगत होती. तूं जातोस तिच्याबरोबर?" आक्कानें त्याच्या गळ्याभोंवतीं आपले हात सोडून हंसत हंसत म्हटलें.

"मी नाहीं दा दानाल. तूत दा." कृष्णा गाल फुगवून म्हणाला.

"पण तिला तूंच पाहिजेस."

" आनि आक्का, तित्या लुगल्यावर लक्त कथ ग थांदलं ? तिला कोनी काथीनं माल्लं होय ? "

" होय. तुला त्या दिवशीं आईनं मारलं होतं ना, तसं ! "

" मग ती काय माद्याथालकी थाकल मागते ? तुद्यापेक्थां केवली तली मोथी आहे आनि थाकल मागते ? वेली ग वेली ! " कृष्णा हंसत हंसत टाळ्या वाजवीत म्हणाला. त्याला टाळ्या पिटतांना आणि हंसता-नाचतांना पाहून सगुणेच्या दीनवाण्या मुद्रेवर हास्याची ओझरती लकेर दिसली. तो काय बोलला आणि आक्का काय बोलली हें तिला ऐकूं येत नसलें तरी त्याच्या मोकळ्या खुल्या हंसण्यानें आणि नाचण्या-बागडण्यानें तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. क्षणभर ती स्वतःचें पोळणारें दुःखहि विसरून गेली. याच स्वर्गानंदाचा तो पंधरा दिवसांपूर्वी अनुपम अनुभव घेत होती. अस्साच नारू उडथा मारीत असे, अस्साच खुल्या मनानें तो हंसत असे, आणि अशाच बोबडया बोलांनीं त्याच्या जिज्ञासू मनानें काढलेले प्रश्न तो तिला विचारीत असे. तिच्या डोळ्यासमोर ती एक एक आठवण उभी राहूं लागली. एकदां आपण अगदीं कावून गेल्यामुळें नारूनें भूक लागल्याचें सांगतांच आपण त्याला चापट मारली होती आणि तो मोठमोठ्यानें रडूं लागला म्हणून दुसरी चापट मारली होती, ही आठवण आठवतांच तिचे डोळे आंसवांनीं भरून आले. नारू तोंड वेंगाडून आपणांकडे भाकर मागतो आहे, आपण रागानें त्याच्या तोंडांत

चापट मारीत आहों, तो भोकांड पसरून रडत आहे, आपण संतापून पुन्हां त्याच्या कोवळ्या गालांवर चापट मारीत आहों, आणि तो पहिल्यापेक्षांहि मोठ्या आवाजानें रडतो आहे हें एकापाठून एक दृश्य आकाशांतल्या नवविध रंगाप्रमाणें तिच्या डोळ्यासमोरून जाऊं लागलें. त्या रागाच्या भरांत त्याला मारतांना हा आपणांला इतक्या लवकर अंतरणार आहे असें कळतें तर आपण त्याला हात तरी लावला असता काय या विचारानें तिच्या डोळ्यांतून अश्रूंचे ओघळ वाहूं लागले. तिचा हुंदका अनावर झाला. आणि त्याचा मोठ्यानें स्फोट होऊन ती रडूं लागली. जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरांना या वेडीची हकीकत ठाऊक असल्यामुळें त्यांच्याहि डोळ्यांत सहानुभूतीचे दोन अश्रू उभे रहात आणि ज्याला तिच्याबद्दल कांहींच माहीत नव्हतें त्याला ती एक मौजच वाटून टवाळकीच्या नजरेनें तिच्याकडे पाहून तो रस्ता सुधारीत असे. पण कृष्णाला ती रडावयाला लागलेली पाहून कसेसेंच वाटलें.

" का ग आक्का, ती वेली ललते का ? "

" तूं तिच्याबरोबर जात नाहींस ना, म्हणून रडते आहे. जातोस तूं ? "

" मग मी दातो आक्का, तिच्या बलोबल. ती एवली मोथी आन्नि माद्याथाती ललते ? दाऊ का ग आक्का ? " कृष्णानें तिच्या कमरेला विळखा घालून म्हटलें.

" आतां नको. उद्यां जा अं ! ती पहा चालली."

सगुणा डोळे चोळीत चोळीत निघून जात होती. किती दूरवर गेली तरी पाठीं वळून ती कृष्णाच्या अनुरोधानें त्याच्याकडे पहात होती.

हा सगुणेचा नित्यक्रम होता. पुत्रप्रेमाला इतक्या लवकर आंचवल्यामुळें तिच्या मनाला चटका बसून ती भ्रमिष्ट झाली होती. नारूचें अकाल निधन हा एक तिच्या हृदयावर जबरदस्त आघात होता. तिला लोक 'वेडी' या नांवानें संबोधत; पण तो वेडी नव्हती. तिचें मन नारूसाठीं वेडें झालें होतें. ती भ्रमिष्ट झाली होती. आणि त्या भ्रमिष्ट स्थितींत तिच्याकडून होणारी कृती सामान्य मनुष्याच्या राहणीला सोडून असल्यामुळें तिची वेडींत जिम्मा झाली होती. रस्त्यावर, घरांत, देवळांत, कुठेही उघडे नागडें,नारूच्या वयाचें एखादें पोर दिसलें कीं ती त्याच्याकडे डोळे भरून पाही आणि 'आपला नारू असाच होता' या विचारानें हृदय व्यथित झालें म्हणजे आपला मार्ग सुधारी. शेजारच्या गणपतीनें दिलेल्या अन्नाचा विचका करीत भुकेल्या अर्धभुकेल्या पोटानें ती वणवण फिरत राही. तिचें फिरणें वरवर पहाणाऱ्याला हेतुशून्य दिसले तरी तिच्या हृदींत सूक्ष्म बनून पहातां आलें असतें तर त्यांत ती नारूचा ठावठिकाणा धुंडाळते आहे असेंच दिसलें असत.

कृष्णाला पाहिल्यापासून मात्र तिचें मन त्याच्याभोंवतीं गुंगूं लागलें. नारूचा काळासांवळा वर्ण, त्याचा काटकुळेपणा, त्याचा बोबडा स्वर, आणि त्याचा चपळपणा या सर्वांचा सांठा तिला कृष्णाच्या ठिकाणीं दिसूं लागला. ती सकाळ संध्याकाळ तास अर्धा

तास तरी समोरच्या रस्त्यावरच्या झाडाखालीं बसून त्या घराच्या अंगणांत आणि ओसरी-वर कृष्णासाठीं ताटकळत बसे. तो दिसला, तो हंसला, तो आपल्या बोबडया शब्दांत बोलला कीं तिचें मन प्रसन्न होई, तिच्या मनाचें अर्धेअधिक समाधान होई.

× × ×

दिवसामागून दिवस जाऊं लागले. तिला एका ठराविक वेळीं कृष्णाच्या घरासमोर बसलेली लोक पाहू लागले. ती त्या वेळीं तेथें नसणें ही त्यानां असंभाव्य कोटींतील गोष्ट वाटूं लागली. लोकानां हा प्रकार जितका चमत्कारिक वाटे त्यापेक्षां कृष्णाच्या घरांतील मंडळीला ती वेडी आपल्या घरासमोरच येऊन कां बसत असावी हें एक मोठें गूढ वाटूं लागलें. एक दोन वेळां कृष्णाच्या वडिलानीं तिच्याकडे जाऊन 'बाई, तुला काय पाहिजे' असें सुद्धां विचारलें. पण त्यावर प्रत्युत्तरादाखल एक शब्दहि न बोलतां ती मुकाटयानें तेथून उठून वाट चालूं लागली. त्यानंतर तिला कसलाच प्रश्न विचारण्याचा कोणीहि पुन्हां प्रयत्न केला नाहीं. ती रोज त्यावेळीं तेथें बसली आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं कोणी तरी बाहेर ओटीवर येई; आणि तीहि तेथें बिनचुक बसलेली आढळे. याच्या मुळाशीं कांय आहे याबद्दल मात्र प्रत्येकजण अज्ञात होता.

तो दिवस शनिवार होता. कृष्णाची आक्का आणि आई आंत शिवणकाम करीत होत्या आणि कृष्णा बाहेर चित्राचे ठोकळे घेऊन त्याचें एक चित्र बनवित होता. बाजूला पत्र्यांचा केलेला बंगला वाऱ्याच्या झुळकीबरोबर आस्ते आस्ते ढांसळत होता. आजूबाजूला हातभर लांबीचा लाकडी घोडा, पुढचें एक चाक मोडकें असलेली मोटार, बाहुल्या वगैरे कृष्णाच्या दुपारच्या व्यवसायांतल्या सामानाचा अस्ताव्यस्त पसारा पडला होता. कृष्णा मात्र ठोकळ्याचें चित्र करण्यांत गढून गेला होता. त्यांत त्याला जरी कांहींच कळत नसलें तरी त्या कामांत पूर्ण रंगून गेल्यासारखा त्याचा चेहरा दिसत होता. बराच वेळ घासाघीस केली तरी चित्र बनत नसलेलें पाहून कृष्णाला संताप आला. त्यानें आपल्या हातांत माव-तील तितके ठोकळे घेऊन ते जमिनीवर जोरानें आपटले आणि आपण उठून उभा राहिला. पण पुढयांत पहातो तर पायरीजवळ वेडी बसलेली ! तिला इतक्या जवळ आलेली पाहून कृष्णा भयभीत झाला. तिच्याकडे पाठ करून घरांत जाण्याइतकेंसुद्धां त्याला धैर्य न होतां पाठल्या पाठींच आदळत आपटत तो आईकडे गेला. तिच्याकडची दृष्टि दुसरीकडे वळली तर ती पाठल्यापाठीं आपणास उचलून नेईल अशी त्याला भीति वाटली.

"आई, आई, ती बग वेली आली आंत. पायलीदवल बयली आहे. तल तली." असें म्हणून त्यानें आईचा पदर धरून ओढण्यास सुरवात केली. आईच्या आणि अक्काच्या विरोधाला न जुमानतां त्यानें दोघांनाहि 'खेचींत' बाहेर आणलें. त्या दोघांकडे पाहून सगुणेनें हंसल्यासारखें केलें. ती नेहमींसारखीच अस्ताव्यस्त स्थितींत असली तरी यावेळीं

तिच्या चेहऱ्यावर वेडेपणाची मुळींच झांक दिसत नसून चेहरा बराचसा केविलवाणा दिसत होता. त्यांतल्या त्यांत तिनें चेहऱ्यावर ओढून ताणून हंसें आणल्यामुळें तिचा चेहरा फारच रडवा दिसूं लागला.

" काय ग बाई, कांहीं काम का आहे तुझं ? " बराच वेळ ती स्तब्ध राहिलेली पाहून कृष्णाच्या आईनें तिला विचारलें. तिनें त्या प्रश्नानंतर तिच्याकडे एक वेळ पाहून कृष्णाकडे दृष्टि वळवली. कृष्णा आईच्या पदराआडून तिच्याकडे आश्चर्याच्या मुद्रेनें चोरून पहात होता. ती त्याच्याकडे पाहूं लागल्यावर ती आपणालाच मागते कीं काय अशी त्याला भीति पडली आणि त्यानें आपणांला तिच्या पदरांत जास्तच गुरफटून घेतलें. ती त्याच्याकडेच टक लाऊन पहात असलेली पाहून कृष्णाच्या आईनें प्रश्नसूचक मुद्रेनें आक्काकडे पाहिलें आणि पुन्हां म्हटलें,

" बाई, काय हवं तुला ? "

आळीपाळीनें तिच्याकडे आणि कृष्णाकडे पहात सगुणा म्हणाली, " नारू ! "

" नारू ? इकडे कोणी नारू नाहीं. " कृष्णाची आई म्हणाली.

" नारू ! नारू ! इकडे ये बाळ ! " सगुणा कृष्णाकडे बघून त्याला बोलवूं लागली.

" हा नारू नाहीं. याचं नांव कृष्णा. "

"कृष्णा ! नारू ! माझ्याबरोबर येतोस ? चल बाळ,तुला दूध देईन, खाऊ देईन;चल." सगुणा वर आली आणि त्याच्याकडे जाऊं लागली. कृष्णाची भीतीनें बोबडी बळली. वेडी आतां आपणांला खात्रीनें उचलून नेते अशी त्याची पक्की समजूत झाली आणि त्यानें किंकाळी मारून मोठ्यानें रडण्यास सुरवात केली.

" ए आईऽऽ गऽऽ वेली आली बग. " त्यानें रडतरडत म्हटलें. कृष्णाच्या आईला अगदीं चमत्कारिक वाटूं लागलें. ही वेडी म्हणावी तर आपण बोललेलें .तिला चांगलें कळतें; आणि नाहीं म्हणावी तर ती एखाद्या वेडीसारखीच वागते आहे. कृष्णा जास्तच जोरानें रडावयाला लागलेला पाहून ती म्हणाली, " बाई, तुझा नारू आमच्या घरीं नाहीं. हा आमचा मुलगा कृष्णा. तुझा नारू दुसरीकडे कुठेंतरी असेल. इथून जा तूं. "

" नारू, नारू, तूं नाहीं येत ? बाई, तुम्हीं माझा नारू नाहीं देत ? "

" बाई, कुठं आहे तुझा नारू ? हा आमचा. कृष्णा. " कृष्णाच्या आईनें तिची समजूत पाडण्याकरितां आपल्या पदराआड असलेल्या कृष्णाला बाहेर काढला. त्याबरोबर त्यानें घाबरून पुन्हां किंकाळी मारली. त्याला त्या वेडीची इतकी दहशत बसलेली पाहून कदाचित् तें दुष्परिणामकारक होईल या भीतीनें वेडीशीं बोलणें आटोपतें घेण्याचा विचार करून कृष्णाची आई म्हणाली, "बाई, तूं जा इथून. कृष्णाला उगीच भिववूं नकोस. "

कृष्णा आपल्याबरोबर येण्यास नाराज असलेला पाहून सगुणेच्या डोळ्यांतून खळकन् दोन अश्रुबिंदू पडले. तिचा चेहरा अगदीं खिन्न झाला. तिनें एकदां डोळे भरून कृष्णाकडे पाहिलें. कृष्णानेंही आपली आई आपणाला त्या वेडीकडे देत नाहीं या खात्रीनें पदराआडून हळूच डोकावून पाहिलें. त्याची व सगुणेची दृष्टादृष्ट होतांच सगुणेचे डोळे भरून आले आणि अखेर अखेर पाण्याच्या पडद्याआड त्याची छबी अदृश्य झाली. तिनें एक जड निःश्वास टाकला आणि अनावर झालेला हुंदका आवरण्याचा आटोकाट प्रयत्न करून भरल्या अंतःकरणानें ती तेथून निघून गेली.

× × ×

त्याच संध्याकाळीं गांवांत गवगवा होऊन ज्याच्या त्याच्या तोंडून एकच वाक्य ऐकूं येत होतें कीं, " वेडीनं विहिरींत जीव कीं हो दिला ! "

वेडीशीं निकट परिचित असलेल्या गणपतखेरीज प्रत्येकजण दुसऱ्याला विचारीत होता कीं, " वेडीनं विहिरींत जीव कां दिला ? "

प्रत्येकाला तें कारण अगम्य झालें होतें. पण विहिरीभोंवती मात्र शून्य एकांतांत शब्द घुमत होता..."नारू ! नारू ! "

"वाघ्या"

पुढील अंकांत

" त्रस्त समंध "

ही संपूर्ण गोष्ट

सौंदर्य

श्री. सयाजीराव महाराजांची मुलाखत

(मॉ. रिव्ह्यूच्या मार्च १९२४ च्या अंकांत **सँट निहालसिंग** या सुप्रसिद्ध लेखकानें महाराजांच्या घेतलेल्या मुलाखतीची हकिकत प्रसिद्ध झाली आहे. तिचेंच मराठींत खालील रुपांतर केलें आहे.—**संपादक**)

१९१० सालीं डिसेंबरचे अखेरअखेरचे दिवस होते. मी महर्षी दादाभाई नौरोजीबरोबर मुंबईपासून सुमारें वीस मैलांवर असलेल्या वेरसोवा या ठिकाणीं रहात होतों. त्याच वेळीं श्रीमंतांची स्वारी नेपीयन सी रोडवरील आपल्या बंगल्यांत रहात होती. माझी भेट घेण्याची त्यानीं इच्छा प्रदर्शित केल्याचें मला कळल्यावरून मी दुसऱ्या सकाळींच स्टेशनचो वाट धरली आणि त्यांच्या बंगल्यावर आलों. त्या बंगल्याची बांधणी आणि रचना मला इतकीं अप्रतिम वाटली कीं त्या तोडीचे मुंबईत फारच थोडे बंगले आढळतील असें मी अनुमान केलें.

बंगल्याच्या आवारांतून वर जाऊन तेथील भव्य दिवाणखान्यांत प्रवेश करतांच महाराजांची स्वारी कोचावरून उठली व सस्मित चेहऱ्यानें माझ्याशीं हस्तांदोलन करून मला त्यानीं शेजारच्या खुर्चीवर बसवलें. औपचारिक बोलणें झाल्यावर त्यानीं संभाषणासाठीं जगप्रवासाचा विषय काढला. श्रीमंत स्वतः नुकतेच युरोप वगैरे देश फिरून आले होते आणि मीहि स्वतः बऱ्याच देशांतून हिंडून आलों असल्यामुळें त्यानीं त्याच विषयावर संभाषणाला आरंभ केला असावा असें मला वाटलें. त्यांच्या डोक्यावर त्यांची नेहमींची छाटी, तांबडी पगडी होती आणि अंगांत कांहींसा पेशवेशाही शुभ्र अंगरखा होता. केस डोक्याबरोबर सपाट असून त्यांत कांहींशी करडेपणाची झांक मारत होती. पायांत तंग इजार असून पायांत चढाव होते.

" वर्तमानपत्री आयुष्य ही तुम्हांला फायद्याची वाव वाटते का ? " संभाषणाच्या ओघांत त्यानीं हा एक प्रश्न विचारला. " पैशाच्या दृष्टीनें तें किफायतशीर नसलें तरी समाजसेवा करून बरेंचसें पुण्य मात्र गांठीं बांधतां येतें." मी उत्तर दिलें.

" माझेंहि तसेंच मत आहे. पण इकडल्यापेक्षां युरोप-अमेरिकेंत हें आयुष्य फारच सुखदायक असतें; नाहीं ?"

" हें कांहीं खोटें नाहीं. "

माझ्या या उत्तरानंतर त्यानीं 'तुमचा एखाद्या वर्तमानपत्राशीं निकट संबंध आहे काय ? असल्यास तो कशा स्वरुपाचा ? त्यासाठीं तुम्हांला मिळणारा तनखा दरमाही असतो कीं आठवडयाचा असतो, कीं प्रत्येक लेखाचाच तुम्हांला मोबदला मिळतो ? ' या आणि इतर प्रश्नांची त्यानीं नुसती सरबत्ती सुरू केली. मात्र मधून मधून 'फक्त मला कांहीं माहिती असावी म्हणून मी हें विचारतो आहे हो ! ' असें एखादें समयसूचकतेनें वाक्य बोलल्याशिवाय ते रहात नसत. बोलतानां ते

आपल्या बोटानीं मिशाचीं टोकें पिळवटीत आणि मधून मधून त्यांच्या ओठावर आणि डोळ्यांत अन्वर्थक हंसूं चमके.

बराच वेळ त्यांच्या प्रश्नांची सविस्तर व समाधानकारक उत्तरें दिल्यावर शालीनतेनेंच पण कांहींसें हंसत हंसत 'मलाहि आपणांला कांहीं प्रश्न विचारावयाचे आहेत' असें मी सांगतांच त्यानीं त्याला आनंदानें अनुमोदन दिलें. माझ्या प्रश्नांची उत्तरें देतानां ते सावधगिरीनें शब्द मोजून बोलत; पण त्यांच्या उत्तरांत अर्धवटपणा मुळींच नव्हता. उलटपक्षीं दोन चार वेळां स्वतःचें मत सप्रमाण सिद्ध करतानां वाजवीपेक्षां जास्त बोलल्यासारखें त्यांना वाटल्यावरून त्यानीं 'हें माझें मत आहे; आपले त्याहून कदाचित् निराळें असणें संभाव्य आहे' असें म्हटलें. त्यांची बोलतानांची सावधगिरी पाहून माझ्या मनावर बरीच छाप पडली. नंतर युरोप व युनायटेड स्टेट्समधील सामाजिक संस्थांतील भेद, अमेरीकेच्या त्याबाबत प्रगतीचें मूळ, तिच्याकडून हिंदुस्थाननें शिकून घेण्यासारखें काय आहे याचा व इतर बाबतींचा कांहीं वेळ खल झाल्यावर मी त्यानां बडोद्याच्या राज्यव्यवस्थेबद्दल विचारलें; पण त्यानीं प्रत्यक्ष तिकडे समक्ष येऊन पहाण्याचें मला आमंत्रण दिलें आणि बाजूला उभे असलेल्या संपतरावांकडे (महाराजांचे बंधुराज व खानगी खात्याचे अधिपति) वळून माझी नीट व्यवस्था ठेवण्यास सांगितलें. मी या मेहेरवानीबद्दल त्यांचे कृतज्ञापूर्वक आभार मानल्यावर थोडयाच वेळानें ते उठून उभे राहिले. ते इतके ठेंगणे असतील अशी माझी त्यावेळपर्यंत कल्पना नव्हती. बसण्यावेळच्या त्यांच्या राजेशाही ऐटीमुळें त्यांचें ठेंगणेपण लक्षांत येत नसे. त्यांची शरीरयष्टि कांहींशी मजबूत असून चालणें, उभें रहाणें सारें दरबारी रुबाबाचें दिसे.

त्या पहिल्याच संभाषणावरून महाराजांचा स्वभाव मला कांहींसा तऱ्हेवाईक, गूढ वाटला. खऱ्याखोट्याच्या निवाडयांत निर्णयात्मक निकाल देतानां त्यांचें मन द्विधा होत असलें तरी मला त्यांचा स्वभाव कांहींसा करारी व निश्चयी असावासा वाटला. आपल्या विरुद्ध मतांचा पाडाव करून आपल्या मताचा पुरस्कार करतानां ते वाटेल त्या उपायाची योजना करीत असेंहि माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. यामळें त्यांच्या स्वभावाचें परिशीलन करणें मला बरेंच जड वाटलें.

× × ×

थोडयाच दिवसानीं मी बडोद्यास आलों. श्रीमंतांचा खास पाहुणा म्हणून माझी बडदास्तहि त्या इतमामाला साजेशी ठेवली गेली होती. बडोद्याला आल्याच्याच दिवशीं मला सरकारस्वारीकडून रात्रीच्या जेवणाचें निमंत्रण आलें, आणि मीहि तें आग्रहपूर्वक स्वीकारलें.

महाराणीसाहेबांच्या प्रथमदर्शनींच त्यांच्या भव्य कपाळावरून मला त्यांच्या बुद्धिमत्तेची साक्ष पटली. श्रीमंतांपेक्षां त्या मूठभर उंच असून त्यांच्यापेक्षां दहा वर्षांनीं तरुण दिसत होत्या. केसांचा भांग मध्यें पाडलेला असून दोन भुवयांच्या मध्यभागीं जरा वर बारीक कुंकुमतिलक दिसत होता. त्यांच्या मनांतील विचार त्यांच्या पाणीदार नजरेंत स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेले दिसत. असे अर्थबोधक डोळे मी महाराणीसाहेबांचेच प्रथमतः पाहिले. एखाद्या आनंददायक जुन्या प्रसंगाची हकीगत सांगतांना त्यांच्या डोळ्यांतहि हास्याची खुलावट दिसे, गंभीर विषयावर बोलतांना त्यांच्या डोळ्यांत गांभीर्य चमके, आणि अन्याय्य गोष्टींचा उहापोह करतांना त्यांचे डोळे तेजानें तळपत. त्यावेळीं त्या सोनेरी काठाची बहुमोल साडी नेसल्या असून गळ्यांतील टपोऱ्या मोत्यांची लांबलचक माळ तिच्यावरून घेतली होती. महाराजकुमारी इंदिराराजा—सध्यांची कुचविहारची दुर्दैवी विधवा महाराणी—त्यावेळीं १८–१९ वर्षांची असून तिच्यांत महाराज व महाराणी यांच्या चेहऱ्यांतील ठेवण एकवटली होती. चेहरा फारच मोहक व सुंदर असून बोलतांना त्यावर महाराजांच्या चेहऱ्याची विशेष झांक मारे.

जेवतांना मी महाराणीसाहेबांच्या उजव्या हाताला बसलों असून माझ्यासमोर महाराजकुमारी बसली होती. जेवतां जेवतां आमचें जगप्रवासाबद्दल बोलणें निघालें. महाराजांप्रमाणें फक्त मला प्रश्न विचारून समाधान मानण्याची महाराणीसाहेबांची वृत्ति नव्हती. मला प्रश्न विचारण्यापेक्षां स्वतःच बनवलेलीं मतें सांगण्याकडे त्यांच्या मनाचा मला विशेष कल दिसला. आमचें बोलणें चाललें असतांना महाराजकुमारी मधून मधून प्रवासाचें वर्णन अगर एखाद्या गोष्टीबद्दल आपलें मत सांगतांना ती, आम्हांला ती गोष्ट ठाऊक आहे कीं नाहीं याची बिलकूल पर्वा न करतां, सांगत असे. मध्येंच तिनें बोलण्याच्या ओघांत महाराणीनां लालभडक मिरच्यांची किती अत्यावड आहे हा विषय उपस्थित केला. एखाद्या सरदाराच्या घरीं अगर दुसरीकडे जेवावयास जातांना महाराणी आपल्या साडीच्या टोंकाला बिनदिक्कत मिरच्या बांधून नेतावेळची हकीकत खुलवून सांगतांना तिची व आम्हां दोघांची हंसून हंसून मुरकुंडी वळली. महाराणीसाहेबांना तर अतोनात हंसूं लोटलें.

× × ×

कांहीं दिवसांनंतर महाराजानीं मला आपल्याबरोबर 'लक्ष्मी-विलास' राजवाड्यांत कांहीं दिवस घालवण्यासाठीं 'गेस्ट हाऊस' (राजाच्या पाहुण्यांचें व्यवस्थागृह) मधून बोलवून नेलें. लक्ष्मी-विलास राजवाडा मोंगलकालीन राजवाड्यांच्या धर्तीवर उत्कृष्ट रीतीनें बांधला असून खोदीव काम तर तोंडांत बोट घालण्यासारखें अप्रतिम

आहे. राजवाडयांत प्रवेश केल्यावर प्रथम एक भव्य दरबार हॉल लागतो. फेनधवल फरसबंदी, रंगीबेरंगी छत, भिती-खांबांवरचें कोरीव काम आणि एकंदर त्या विशाल दिवाणखान्याची सजावट पाहून माझें मन सुप्रसन्न होऊन गेलें. पडदानशीन स्त्रियानां दरबारांतील समारंभ स्पष्टपणें दिसावा परंतु प्रेक्षकांच्या त्या नजरेआड होतील अशा तऱ्हेनें रचना केली आहे, तीसुद्धां कुशलतेची आहे. दरबार हॉलपासून कांहीं अंतरावर निरनिराळ्या खोल्या असून प्रत्येक खोली राजकारणाबद्दल, सन्मान्य पाहुण्यांचा सत्कार करण्याबद्दल वगैरे निरनिराळ्या कामासाठीं तदनुसार शृंगारलेली आहे. जिन्याच्या जवळील गुळगुळीत दगडी भिंतीवर सुंदर नक्षीदार असून कोपऱ्या-कोपऱ्यानीं इटालीयन कारागारानीं तयार केलेले पुतळे ठेवलेले होते.

पहिल्या मजल्यावरील खोल्यांत खास सरकारस्वारींच्या जेवण्याच्या, विश्रांतीच्या, पुस्तकालयाच्या, बिलियार्ड खेळण्याच्या वगैरे खोल्या असून वरच्या मजल्यावरहि बऱ्याच खोल्या आहेत. महाराणींच्या तैनातीस असलेल्या खोल्या पहिल्याच मजल्यावर महाराजांच्या पाठच्या बाजूस असून मध्यें लांबलचक जाड पडदे सोडलेले आहेत. राणीसाहेबांचा दरबार हॉल स्वतंत्र असून तो पश्चिकडच्या एका भव्य वाडयांत आहे. युवराज धैर्यशीलराव आणि राजकुमारी इंदिराराजा यांच्या ताब्यांत दुसरा मजला असून त्यांच्या आवडीप्रमाणें तो सजवलेला होता.

× × × ×

महाराजांचा दिनक्रम म्हणजे दिवस उजाडण्याच्या सुमारास उठणें, नंतर तावडतोब स्नान करून ब्राह्मणांना कांहीं द्रव्य देणें, नंतर कॉफीपान झाल्यावर नखशिखांत युरोपियन बनून आठाच्या सुमारास नित्यनियमानें घोडयावरून रपेट करणें. नऊ वाजण्याच्या सुमारास भरपूर व्यायाम करून आल्यावर ते आपले कपडे बदलून साधीं सफेद वस्त्रें परिधान करीत व नंतर वर्तमानपत्रें वाचण्यांत अगर कांहीं निवडक मंडळीबरोबर बोलण्याचालण्यांत वेळ घालवून अकरा वाजतां जेवण्यास उठत. मी त्यांच्याबरोबर राजवाडयांत गेल्यापासून बहुतेक रोज माझें त्यांचें बोलणें चाले. त्यांच्या खाजगी खोलींत ते व मी बसत असून त्यांच्या आयुष्यांतील मुख्य मुख्य घडामोडींबद्दल, त्यांच्या ध्येयाबद्दल वगैरे मी विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें माझ्या रोजनिशींत मीं उतरून घेत असे.

त्यांनी दिलेल्या माहितीवरून मला त्यांचें पूर्वचरित्र बरेंचसें कळलें. नाशीकजवळील कलवाना या छोटया खेडयांत १८६३ सालीं त्यांचा जन्म झाला असून १८७५ त ते बडोद्यास आले. त्यापूर्वी ते पूर्ण अक्षरशत्रू असले तरी बडोद्यास आल्यावर त्यानां काळजीपूर्वक शिक्षण देण्यांत येऊन १८८१ च्या अखेर अखेर सज्ञान स्थितींत आल्यावर ते तक्तनशीन झाले. राज्यव्यवस्थेस सुरवात करतांना त्यानीं सर

टी. माधवराव यांस पुन्हां दिवाण नेमून संस्थानांतील बऱ्याच संस्थांच्या चालकांची मुलाखत घेतली व अज्ञान प्रजेची अंधश्रद्धा, शिक्षणाची नावड व इतर बाबती दूर करण्यासाठीं अतोनात कष्टमेहनत करून, कलाहुन्नरला उत्तेजन देऊन बडोदें संस्थान उर्जितावस्थेस आणण्याचे शक्य ते प्रयत्न केले.

एवढी माहिती पाल्हाळ न लावतां व आत्मप्रौढीचा प्रत्येक प्रसंग टाळून अगदीं मोजक्या शब्दांत दिल्यावर आम्ही जेवणास उठलों. महाराजांच्या मुदपाकखान्यांत एक फ्रेंच तज्ज्ञ व त्याच्या हाताखालीं असलेल्या एका इंग्रज वटलरकडून स्वयंपाक करण्यांत येत असल्यामुळें महाराणी व राजकुमारी आमच्याबरोबर जेवणास नव्हती. कुमार धैर्यशीलराव आणि महाराजांच्या मर्जीतले कांहीं सन्मान्य पाहुणे मात्र नेहमीं आमच्या पंक्तीस असत. महाराजांचे खास डॉक्टर डॉ. सुमंत मेहता हे नेहमीं तेथें हजर असत. महाराज आपल्या नित्यपद्धतिप्रमाणें आपल्या पंक्तींतल्या माणसांबरोबर निरनिराळ्या विषयावर चर्चा करीत--पण उत्तरे देण्यापेक्षां प्रश्न विचारण्याकडेच त्यांचा ओढा असे---आणि मन त्यांत गुंतल्यामुळें त्यांचें जेवण त्यांच्या नकळत आहाराबाहेर होत असे. यामुळें डॉक्टरमजकूर त्यांच्या अजीर्णाचें नेहमीं परिमार्जन करतांना कंटाळलेले असल्यामुळें ते मधून मधून सभ्यपणाने पण कांहींशा आज्ञेवजा विनंतीनें त्यानां अत्याहाराचा उमज करून देत, व महाराज त्यांच्या विनंतीला रुकार देण्याच्या मिषानें त्यांच्याकडे किंचित् हंसून पाहून पुन्हां पूर्ववत् विचारांत निमग्न झाल्यावर खाण्याचा सपाटा लावीत. कॉफीपानाइतकें दुसरें कसलेंही पेय इतक्या जबर वेळां पितानां मी त्यानां पाहिलें नाहीं.

जेवणानंतर एखादा तास ते कोणाबरोबर तरी बिलियार्ड खेळत व एकाच्या सुमारास त्यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी रा. आंबेगांवकर यांच्याबरोबर अगर त्यांच्या ए. डी. कँपबरोबर कॉफी घेत. त्यानंतर निरनिराळ्या खात्यांचे मुख्याधिकारी संस्थानांतील कामकाज सांगण्यास राजवाड्यांत येत. सार्वजनिक संस्थांचा, धार्मिक गोष्टींचा व शिक्षणविषयक बाबतींचा ते विशेषेंकरून जास्त परामर्ष घेत, असें मला आढळून आलें.

साडेतीन, चारपर्यंत या बाबतींचा खल झाल्यावर ते चहा घेत व मी व ते इकडच्या-तिकडच्या गप्पा मारित बसूं. त्यांत एखादा तास गेल्यावर फ्लॅनेलचे कपडे घालून ते टेनिस कोर्टकडे जात व पाचारण केलेल्या गांवच्या प्रतिष्ठीत मंडळीबरोबर ते १॥-२ तास टेनिस खेळत व पुन्हां राजवाड्यांत आल्यावर आठाच्या सुमारास जेवण्यास बसत. एकदां संध्याकाळचें जेवण सर्व मिळून हिंदु पद्धतीनें जेवण्याचा महाराजांचा विचार होता. पण सर्व तयारी झाल्यावर अगदीं शेवटच्या घटकेला त्यांचा बेत अकस्मात फिरला आणि आम्हीं नेहमींप्रमाणें इंग्लिश पद्धतीनेंच जेवलों.

जेवणानंतर बिलियार्ड, बुद्धीबळ अगर पत्ते खेळण्यांत अकरा वाजत. महाराणी, राजकुमारी आणि कुमार धैर्यशीलराव झोंपण्यापूर्वी महाराजांना नमन करून आपापल्या खोलींत जात. मी व राजकुमार दुसऱ्या मजल्यावरील खोलींत झोंपत असूं. महाराजांची मनःस्थिति जेव्हां प्रक्षुब्ध झालेली असेल तेव्हां ते एका स्वतंत्र, खाजगी खोलींत झोंपत. पायाशीं एक नोकर पाय चेपीत बसून दिव्याच्या मंद प्रकाशांत त्यांचा जुना सेक्रेटरी एखादें पुस्तक वाचून दाखवीत असे. महाराजानां अशा ज्ञानामुळेंच बराच बहुश्रुतपणा आला आहे असा माझा समज आहे.

माझ्या तेथल्या तीन महिन्यांच्या हजेरींत महाराज दिवसाचा मोठा भाग घरच्या मंडळीपेक्षां कामकाजासाठीं बाहेरच खर्चित असलेले माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें.

× × ×

फेब्रुआरी-मार्चच्या दरम्यान मी त्यांच्याबरोबर काठेवाडांतील कांहीं गांवांत फिरलों. त्यावेळीं तेथील राज्यव्यवस्था पहातानां, अर्जदारांच्या कागाळ्या ऐकून त्यांना योग्य न्याय देण्याच्या वेळीं, निरनिराळ्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन तेथील सुव्यवस्थितपणाबद्दल खातरजमा करून घेतानां ते जे श्रम घेत तें पाहून मला अत्यंत आश्चर्य वाटलें. व त्याचवेळीं या कर्तव्यदक्ष राजाचें प्रजावात्सल्य दिसून आलें.

× × ×

माझ्या वडोद्याच्या भेटीनंतरची मात्र कांहीं वर्षें महाराजांना व महाराणीनां अत्यंत दुःखाचीं गेलीं. चार, पांच वर्षांनंतर त्यांचो वडील विधवा सून मृत्युमुखीं पडली आणि त्यानंतर लगेच कांहीं दिवसांनीं तृतीय चिरंजीव कुमार शिवाजीराव कालवश झाले. त्यावेळीं महाराज व महाराणी युरोपांत प्रवास करीत असल्यामुळें विधवा सुनेचें व मुलाचें अखेरचें दर्शन सुद्धां घेतां न आल्याचें त्यांना अतोनात दुःख वाटलें. १९२३ च्या सुमारास त्यांची एकुलती एक कन्या इंदिराराजा ऐन तारुण्यांत विधवा झाली आणि अल्पकालांत महाराजांचे द्वितिय चिरंजीव युवराज जयसिंगराव यांचें अकाल निधन झालें. श्रीमंतसरकार स्वतःच्या मनावर ताबा चालविण्याइतके प्रबल असले तरी उतार वयांतील या एकापाठून एक बसलेल्या लागोपाठ हृदयविदारक आघातांनीं त्यांच्या अंतःकरणाच्या चिंधड्या चिंधड्या उडवल्या.

नुकतीच कांहीं आठवड्यापूर्वी हिंदुस्थानास परत येतांना माझी-त्यांची लंडनच्या हायड् पार्क हॉटेलमध्यें गांठ पडली;त्यावेळीं त्यांचे केस वयोमानामुळें जवळ जवळ पूर्णपणें करडे बनलेले, चेहऱ्यावर उतारवयाच्या सुरकुत्या असलेल्या व चेहरा दुःखानें काळवंडलेला व उद्विग्न असा दिसला. प्रजेच्या सुखासाठीं जिवापाड मेहनत घेणाऱ्या या सदय अंतःकरणी राजावर ईश्वरानें अगदीं निष्ठूरपणा केला असें मला त्यावेळीं वाटलें,

सिंहगडचा सिंह.

विजय-पताका कुणा विराच्या धवल यशाची ही ।
दुर्गावरती नाचत मोदें, यशोगीत गाई ? ॥ १॥
दःखनचा सरदार मराठा, दःखनचा वीर ।
दःखनच्या सरजा राजाचा कलिजा रणधीर ॥ २ ॥
रसवंतीची माणिक मोतीं ज्या वीरावरती ।
उधळिलिं प्रेमें कवीश्वरांनीं, ज्या शूरावरती ॥ ३ ॥
देशभक्तिची, चैतन्याची, स्फूर्तीची ज्योत ।
रायगडाच्या देवाचें हें दिसे इथें तेज ॥ ४ ॥
सिंहगडाचा शूर सिंह हा, राष्ट्राचा प्राण ।
मावळच्या समशेरीचीही उभी इथें खूण ॥ ५
रायगडाच्या रियासतीचा प्यारा उमराव ।
निद्रित येथें शिवप्रभूंचा तानाजीराव ॥ ६ ॥

× × ×

कोंडाण्यावर नाचत दिवटया वीर मावळ्यांच्या ।
हरहर गर्जत पहाड, पर्वत, दऱ्या तमोनदिच्या ॥ ७ ॥
पतिव्रतेच्या पाविऱ्याला उजळविण्या पुण्य ।
पतिव्रतेचें चमके तेथें, तानाजी वंद्य ॥ ८ ॥
शर्थ जाहली तानाजीच्या शौर्याची तेथ ।
सोन्याच्या बोलांनीं बोलत बखरी सर्वत्र ॥ ९ ॥
उत्तरचे रजपूत सांगती दःखनची कीर्ती ।
शाहिर गाती कवनांमधुनी, स्फूर्ति जनां देती ॥ १० ॥

× × ×

" मराठि दौलत ओंवाळिन मी तानाजीवरुनी " ।
श्री शिव बोलत सिंहगडाच्या तानाजीसाठीं ॥११॥

मुलांची मौज

लोभी सावकार.

एके ऐन दुपारचे वेळीं, एक सावकार जेवण आटोपून आपल्या घरापुढच्या ओटयावर एका खुर्चीवर कोठलेसें पुस्तक वाचीत बसला असतां, एक शांत मुद्रेचा संन्याशी आपल्या घरावरून जात असतांना, सहज त्याची दृष्टी त्या संन्याशाकडे गेली. सावकाराच्या अंत:करणांत त्या संन्याशाविषयीं दया उत्पन्न झाली. म्हणून त्यानें त्या संन्याशाला आपल्याकडे बोलाविलें. संन्याशीही मनामध्यें खुष पावून त्या सावकारासमोर जाऊन उभा राहिला.

सावकारानें आपल्या एका नोकराला बोलाविलें, आणि त्या संन्याशाची जेवणाखाण्याची व्यवस्था करण्यास त्याला सांगितलें. संन्याशी त्या नोकराच्या पाठोपाठ गेला व यथेच्छ जेवण झाल्यावर पुन्हां सावकाराजवळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्याकरितां येऊन बसला. सावकारानें त्याचें वर्तन पाहून त्याला सात आठ दिवस आपल्या येथें ठेवून घेतलें.

जातेवेळीं संन्याशानें आपलें नांव रहावें म्हणून आपल्याजवळचा खलबत्ता सावकार नको म्हणत असतां देखील त्याच्या येथें ठेवून दिला.

त्या सावकाराला तबले वाजविण्याचा फार नाद होता. एके दिवशीं असाच सकाळचे प्रहरी तबले दुरुस्त करित असतां, तबल्याला मारण्याकरितां हातोडा वगैरे न सापडल्यानें, जवळच संन्याशानें दिलेला खलबत्ता पडला होता; तो घेऊन त्यानें आपलें काम सुरू केलें.

इतक्यांत रस्त्यावरून एक मोतीविक्या जात होता; त्यानें तेथें मोती विकतील या आशेनें. विचारपूस केली.सावकाराच्या नोकरांनीं त्याला सावकाराजवळ नेऊन उभे केलें. सावकारानें त्याजवळचें कांहीं मोती खरेदी करून, तो आपल्या कामीं लागला. मोतीविक्यानें तो खलबत्ता पाहातांच त्याला मोठें आश्चर्य वाटलें. म्हणून त्यानें त्या सावकाराजवळ २०० रुपायाला खलबत्ता देण्याबद्दल विचारपूस केली. ते शब्द ऐकतांच सावकाराच्या मनांत एकदम संशय उत्पन्न झाला, व त्याला असें वाटलें कीं, खलबत्त्यामध्यें कांहींतरी विशिष्ट गुण असल्याशिवाय त्यानें खलबत्ता एकदम २०० रुपयाला मागितला नसता. म्हणून

सावकारानेंही खलबत्ता देण्याचें नाकारिलें. जों जों सावकार खलबत्ता देण्याचें नाकारूं लागला, तों तों मोतीविक्या त्याची जास्त जास्त किंमत चढवूं लागला. शेवटीं सुमारें ५० हजार रुपये करूनही हा देत नाहीं, म्हणून त्यानें आपला मार्ग धरला. तो खलबत्ता पाचेचा असून मोतीविक्यानें त्याला चांगला ओळखला होता.

त्याच दिवशीं संध्याकाळी सावकारानें बाजारामध्यें खलबत्ता नेऊन त्याची किंमत करविली, तों त्याची एक लक्ष किंमत भरली. सावकाराला जास्त आशा सुटून त्यानें असा विचार केला कीं, आपल्या बाजारांत इतकी किंमत होते आहे, तर पुणें मुंबई यासारख्या शहरीं किती होईल ? म्हणून त्यानें तो खलबत्ता तिकडे नेला. तों तेथें दीड लक्ष किंमत भरली. सावकाराला अती आशा सुटून त्यानें तो खलबत्ता परदेशीं एका मोठ्या शहरीं पाठविला. तों तिकडून असें लिहून आलें कीं, तुमच्या खलबत्त्याची किंमत पांच रुपये झाली आहे. तर तुम्हांला किंमत पसंत पडल्यास रुपये पाठवूं अगर आपला खलबत्ता परत पाठवूं.

सावकाराच्या नापसंतीनें त्यानीं त्याच प्रकारचा दुसरा एक खलबत्ता करून त्या सावकाराकडे रवाना केला. खलबत्ता आल्यावर सावकारानें त्याची पुन्हां एकदां चौकशी केली; तों खरोखरच त्याची पांच रुपयेच किंमत झाली. बिचारा सावकार आपल्या अती लोभाला दोष देत गप्प बसला.

वा. खा. काकतकर.

कोड्याचें उत्तर

उत्तरें बरोबर पाठविणारांची नांवें:—रा. ना. श्री. नाईक, कु. वेणुबाई नाईक, रा. ग. देव, म. स. पाटील, वि. द. ओक, त्र्यं. ब. ऐनापुरे, य. आ. जोग, स. मु. मुजुमदार, वि. वा. डुकले, कु. प्रेमलता वि. दळवी.

•११
०००
००१

२०

नवें कोडें

प

कं ० ०

० व ०

० ० रा

०

'प' पासूनची **खालील** त्याच रेषेंत असलेलीं अक्षरें एका आडनांवाची आहेत. 'कं' पासून **खालील** ३ अक्षरें मिळून बायकांच्या हातांतील एक वस्तु आहे. अगदीं उजव्या हाताकडील **उभी** ३ अक्षरें घरांत अस्वच्छता बनवण्यास कारण होणारा एक पदार्थ आहे. व अगदीं मध्यभागाचीं **आडवीं** तीन अक्षरें मिळून पाण्यांतल्या माशाच्या अंगावर असलेली एक वस्तु होते.

(कोडयाचें उत्तर १४ वर्षां आंतील वर्गणीदारांनीच पाठवावें.)

'अरुणा'च्या बालवाचकांनों,

तुम्हीं 'अरुणा'च्या दर अंकांत येणाऱ्या कोडयाचें उत्तर पाठवण्याचा प्रयत्न करतां. केव्हां केव्हां तुमची उत्तरें बरोबर येतात, तर केव्हां केव्हां थोडीं चुकत असतात. तुम्हीं जसा कोडें सोडविण्याचा प्रयत्न करतां तसाच आतां नवीं नवीं कोडीं तयार करून पाठविण्याचा प्रयत्न करा. कोडें सोडविण्यापेक्षां तें तयार करणेंच विशेष महत्वाचें आणि कठीण काम आहे. नाहीं का? तुम्हांला हा बेत कसा काय आवडतो ? प्रयत्न करा आणि छानशीं कोडीं तयार करून पाठवा पाहूं !

तुमचा प्रेमळ मित्र,

संपादक—अरुण.

झाडापासून काय मिळतें ?—

असें जर तुम्हांला विचारलें तर तुम्हीं काय उत्तर द्याल ? एकजण म्हणेल आंब्याच्या झाडापासून आंबे मिळतात, फणसाच्या झाडापासून फणस मिळतात, आणि ज्या इतर झाडांपासून कांहींच मिळत नाहीं त्या झाडापासून निदान सावली तरी मिळते. छोटया मित्रांनों, तुमचीं हीं उत्तरें चुकीची नाहीत. पण तुम्हांला ठाऊक आहे ? झाडापासून फळें, पानें, लांकडे, सांवली याखेरीज आणखी एक वस्तु मिळते. पण ती वस्तु पाना-फळासारखीं दाखवतां येणार नाहीं. ओळखा पाहूं !—नाहीं येत ? मग मी सांगतों. तुम्हीं हरलांत असें कबूल करा अं !

झाडापासून अत्यंत फायदा म्हणजे थंडपणा ! भर उन्हांतून उघडया जागेंत फिरून मनुष्य दमला आणि नंतर झाडाच्या खालीं बसला म्हणजे सगळा शीण नाहींसा होऊन त्याचें मन प्रसन्न होतें. झाडाच्या सभोंवती जरी कितीहि कडक ऊन असलें तरी झाडाच्या खालीं अगदीं आश्चर्य करण्यासारखा थंडपणा असतो. याचें कारण म्हणजे झाडाच्या पानांत उष्णता शोषून घेण्याची शक्ति. सूर्याची उष्णता त्यांच्या स्वतःच्या पोषणासाठीं तीं शोषून घेतात आणि आपल्या अंगचा थंडपणा आजूबाजूस पसरून टाकतात. यामुळेंच कित्येक जण आपल्या घरांपुढें झाडें वगैरे लावतात. त्यांच्या अंगीं हवा शुद्ध करण्याची जशी शक्ति आहे तशीच आसपास गारवा आणण्याचीहि शक्ति आहे. लांबलचक रस्ते असले म्हणजे रस्त्याच्या दोन्हीं कडानां जीं आपण कुठें कुठें झाडें लावलेलीं पहातों तीं तरी रस्त्यावरच्या वाटसरांचे श्रम कमी करून त्यांना चालण्यापासून त्रास होऊं नये, याच कारणाकरितां. उन्हांतून चालून दमल्यावर विश्रांती घेण्यासाठीं एखाद्या घराच्या सावलींत बसण्यापेक्षां झाडाच्या सावलींत बसलें तर अगदीं थोडया वेळांत मनुष्य परत ताजातवाना होतो.

झाडाचा हा फायदा सर्वांपेक्षां जास्त नाहीं का ? झाडांसारखें तुम्हांला नाहीं का परोपकारी होतां येणार ?

प्राणायाम म्हणजे काय—

तें तुमच्यापैकीं कितीजणांना माहित आहे ? प्राणायाम म्हणजे श्वास कोंडून ठेवणें. अर्ध्या मिनिटापेक्षां जास्त वेळ श्वास कोंडून ठेवणारीं माणसें थोडीं आहेत. अर्ध्या मिनिटापर्यंत श्वास कोंडून ठेवणें ही सशक्तपणाची खूण आहे. अंगांत शक्ति येण्यासाठीं आपण जसे धांवतो, अगर कुस्ती खेळतो त्याचंप्रमाणें आपणाला धरवेल तितका वेळ श्वास कोंडून धरण्याचीहि संवय करावी. यासाठीं 'हुतुतू' चा खेळ खेळणें फार चांगलें ! गातानां सुद्धां श्वास कोंडण्याची संवय होते. पण फार वेळ श्वास कोंडण्याच्या भरीस पडूं नये हं ! नाहींतर काय होईल ठाऊक आहे ? 'इसापनीतीं' तील सोन्याचें अंडे घालणाऱ्या हौंसीला, तिच्या पोटांतील सगळी अंडी काढण्याच्या खुळ्या आशेनें, त्या मूर्ख धनिणीनें जसें कापलें तशाचसारखा वेडेपणा तुमच्या हातून घडेल.

संपत्तीचा सदुपयोग

(लेखक—र. वि. परुळकर.)

एका गावांत एकदां दुष्काळ पडला होता. त्या गावांत भिकारी पुष्कळ होते. त्यानां पोटापुरतें अन्न मिळेना. त्या भिकाऱ्यांमध्यें एक भिकारी होता, तो एकदां एका रस्त्याच्या कडेला एका झाडाच्या सावलींत बसला असतां त्याला असें वाटलें कीं, आपणाला दररोज थोडें थोडें अन्न मिळतें व आपली उपासमार होते.तर आपल्या नशीबांत जेवढें अन्न मिळावयाचे आहे,तें सर्व एकदम मिळावें म्हणून त्यानें देवाची प्रार्थना केली. तेव्हां देव एका उंटावर बसून पुष्कळ मोहोरा व द्रव्य घेऊन आला व त्या भिकाऱ्याला म्हणाला, "अरे बाबा, मला फार तहान लागली आहे. तर जरा माझा हा उंट धर. मी पाणी पिऊन येतो." असें म्हणून तो निघून गेला. बराच वेळ झाला तरी त्याचा पत्ता नाहीं, म्हणून त्या भिकाऱ्यानें तो उंट आपल्या घरांत नेऊन ठेवला व त्याची वाट बघत बसला. इतक्यांत देव स्वामीच्या रूपानें आला व म्हणाला,'तें द्रव्य तुझेंच आहे; तर तें तुझें तुला घे." असें म्हणून तो निघून गेला. इकडे त्या भिकाऱ्यानें दररोज सर्व भिकाऱ्यानां पोटभर जेवण घालावें. असें दररोज चाललें असतां

तें सर्व द्रव्य खपलें. तरी त्याला सर्वीकडून पैसे मिळत. तेव्हां तो एके दिवशीं त्याच शहाखालीं आला. इतक्यांत ते स्वामी तेथें आले. तेव्हां तो भिकारी म्हणाला, "माझें सर्व द्रव्य संपलें तरी मला कोठून तरी पैसे मिळतातच. हें असें कसें?" तेव्हां तो स्वामी त्याला म्हणाला "देवाला सर्व भिकाऱ्यांची काळजी आहे. तीच जर तूं घेतलीस तर बरेंच झालें."

आकाशांतील चांदण्या.

(गेल्या अंकांत जाहीर करून मागवलेल्या कवितेंत खालील कविता पसंत झाल्यामुळें लेखकास रा. ना. गं. लिमयेकृत स्फुट कवितांचें पुस्तक बक्षिसादाखल देण्यांत आलें.)

(रा. दत्तात्रय भा. तेंडुलकर.)

छोटा शरद:—विनुदादा, तांदन्या कशा वल

दोले मितकाविति बग थुंदल
आपन दाऊं तल, तिकले ले !
तल तूं ताईं, खेलू तिकले ॥
हतलो का ले दादा ! ताईं !
त्यांत्याथंगें खेलूं आम्मी
वलती दाने कथिन ग, नाहीं
थिल्या लाउनी दाऊं आम्मी ॥

विनुदादा:—वेडा, वेडा शरद आमुचा

किती कल्पना खुळ्या तयाच्या
शिडी लाउनी वर जाण्याच्या
चांदण्यासहित मग खेळाथाच्या ॥
खुळ्या, कशाला वरती जाऊं
आपण त्यांना इथेंच आणूं.
चला, या ग, ह्या पाण्यामाजीं
पहा शरद, स्था तळ्यांत जमती ॥

मुलींचा संसार.

[कुमारी सुमतीबाई दडकर.

" व्यर्थ आम्हां स्त्रियांचा जन्म. "

वरील उद्वेगपूर्ण उद्गार कित्येक स्त्रियांच्या तोंडून ऐकूं येत असतात. यावरून संसारांत त्यांना व्हावें तसें सुख होत नसावेंसें वाटतें. याचें कारण एक तर त्यांना आपला संसार सुखाचा करतां येत नसावा अगर कित्येक घरांत परंपरेनें चालत आलेल्या अंध रूढीची पुरुषांकडून पूर्णपणें अंमलबजावणी होत असते हें तरी असावें. स्त्रिया या आपल्या जणूं काय गुलामच, आपण सांगूं तसेंच त्यांनीं वागलें पाहिजे, अशी कित्येक पुरुषांची दृढतर समजूत झालेली असते. कोणत्याही बाबतींत बायकोचें म्हणून ऐकायचें नाहीं; कारण त्यांच्या बायकोपेक्षां त्यांचा शहाणपणा जास्त असतो. असतो हें खरें; परंतु बायकोनें सांगितलेली रास्त गोष्टही न ऐकतां हेकेखोरपणानें आपलेंच म्हणणें खरें करूं पहाण्याच्या इरेस पेटणें शहाणपणाचें होईल काय ?

ज्या पुरुषांच्या मनावर शिक्षणाचा संस्कार चांगल्या प्रकारें झालेला असतो, त्यांना स्त्रियांची खरी योग्यता कळलेली असते. म्हणूनच ते आपल्या पत्नीला बरोबरीच्या मित्राप्रमाणें वागवीत असतात. संसारांत तिची सल्ला घेऊन आपल्या संसाराचा गाडा योग्य मार्गानें हांकित असतात. अशांचा गरिबांचा संसारही सोन्याचा होतो आणि अक्षरशून्य नवऱ्यामुळें श्रीमंतींतहि तंटे बखेडे माजतात.

'कार्येषु मंत्री' पदाचा मान आपल्या पत्नीला देणाऱ्या पुरुषांना पहिल्यानें निर्दिष्ट केलेल्या—पहिल्या वर्गाच्या पुरुषांकडून 'बाईलबुध्या' अगर 'बाईलवेडा' अशाच तऱ्हेच्या बहुमानाच्या पदव्या बहाल मनानें अर्पण केल्या जातात. अशा पदव्या फक्त त्या पुरुषवर्गाकडूनच नव्हे तर स्त्रीवर्गा—सुसंस्कृत स्त्रिया सोडून—कडूनही दिल्या जातात. जुन्या काळापासून चालत आलेल्या रूढीचा संस्कार पहिल्या वर्गाच्या पुरुषांप्रमाणें या स्त्रियांच्याही मनावर पूर्णपणें बिंबलेला असतो. पुरुषांपेक्षां आपण अगदींच कमी दर्जाच्या असेंच स्वतः त्यांनाही वाटत असतें. कुठें मुलींच्या खेळामध्यें एखादा मुलगा गेला तर या स्त्रिया " चल बाळ ! आपण मुलींमध्यें खेळूं नये " असें म्हणून तेथून त्याला लगेच हुसकून लावतात. हाच प्रकार प्रत्यक्ष मुलींच्या जन्माच्या वेळीं हत्तीच्या नाकाचे अनुकरण करून वरील स्त्रियांकडून व्यक्त केला जातो. मातेच्या मायेला मुलगा व मुलगी दोन्हीं सारखींच. परंतु तिलाही पहिल्यानें जरासें वाईट वाटल्यावांचून रहात नाहीं. जणूं काय मुलगा त्यांना स्वर्गांत नेऊन बसवणार ! मुलगा झाला कीं भूमी उल्हासून चार अंगुळें वर येते व मुलगी झाली कीं दुःखानें चार

अंगुळें खालीं दडपते अशी वेडी समजूत आमच्या कित्येक स्त्रियांमध्यें प्रचलीत असलेली दिसून येते.

उपरीनिर्दिष्ट स्त्रियांनीं आपल्या मुलांच्या बालपणांतच स्त्रीजातीविषयीं तुच्छतेचें बीज रुजवून द्यावें यांत आश्चर्य वाटण्याचें कांहींच कारण नाहीं.

बायकोवर करडा अंमल चालविणारे पुरुष बऱ्याच बाबतींत स्त्रियांना मुळींच दाद लागूं देत नाहींत. "स्त्रियांना काय, आम्हीं देऊं तें ल्यावं, घालूं तें खावं, आणि स्वस्थ बसावं नसत्या उठाठेवी त्यांना काय कामाच्या ? त्यांत त्यांना काय समजतं ? बायकांचं शहाणपण चुलीपुरतं." असेंच त्यांना वाटत असतें. लहान मुलांना नव्यानेंच चालण्यास शिकवतांना खोलींतल्या खोलींतसुद्धां मातेच्या हाताचे अगर पांगुळगाडयाचें सहाय्य घ्यावें लागतें. परंतु तसेंच कांहीं दिवस चालून तेंच मूल कोणाच्याही सहाय्यावांचून प्रथम त्याच खोलींत, मग ओसरीवर, मग पुढील अंगणांतही सुरक्षितपणें जाऊं शकतें. तर मग चुलीच्या पुढयांत पाऊल टाकण्याचा ज्यांनां शहाणपणा आहे त्यांनां पुढील वातावरणांत पाऊल टाकण्याचा शहाणपणा नाहीं असें म्हणणें चुकीचें नाहीं का ? ठरेल. पुरुषांप्रमाणेंच त्यांनांही सुशिक्षणाची ढिगी मात्र हवी.

स्त्रिया शरीरसामर्थ्याच्या बाबतींत पुरुषापेक्षां साधारण अबला असतात खऱ्या; परंतु बुद्धीसामर्थ्यामध्यें मात्र त्या बऱ्याचशा पुरुषांच्या बरोबरीनेंच राहूं शकतात हें आतां स्त्रियांच्या सुदैवानें व सुसंस्कृत पुरुषाच्या प्रयत्नामुळें हळुहळु प्रत्ययास येत आहे.

ज्यावेळीं मनुष्यें रानटी स्थितींतून बाहेर निघून समाज व नंतर कुटुंबें करून राहूं लागलीं त्यावेळीं त्यांनीं श्रमविभागाचें तत्त्व ध्यानांत आणून संसारांतील कामाचे दोन भाग केले असावे. पुरुषांनीं संसारास लागणारे जिन्नस मिळवून आणावे व बायकांनीं घरकाम करून आणलेल्या जिन्नसांचा चांगल्या प्रकारें विनियोग करावा. कुणबी वगैरे कांहीं विशिष्ट समाज याला अपवाद आहेत हे खरें. कारण पुरुषांप्रमाणें त्यांच्या स्त्रियाही मोलमजुरी मिळवितात. असें असलें तरी देखील कुटुंबपोषणाची जबाबदारी पुरुषवर्गावरच असते.

स्वखुषीनें संसाराचा सर्व भार आपणावर घेऊनही हेकेखोरपणानें दुसऱ्याचें न ऐकतां योग्य ठिकाणीं खर्च करावा तिथें न करून भलत्याच ठिकाणीं केल्यामुळें खर्चाच्या बाबतींत वरील प्रकारच्या पुरुषांचा त्रेधा उडते. आणि मग त्याचा राग क्षुल्लकशा कारणांवरूनही बायकामुलांवर काढावयाचा. अशा कुटुंबांत कितीसें सुख-समाधान

नांदत असेल तें त्यांचें त्यांनाच ठाऊक. मुळींसुद्धां अन्याय नसतां सर्व कांहीं निमुटपणें सहन करून साध्वी पत्नी पतीचें मन आनंदीत ठेवण्यासाठीं कशी झटत असते ? स्त्रियांचे आज्ञाधारकपणा, सहनशीलता व पतिपरायणता हे गुण खरोखरच वाखाणण्यासारखे आहेत असें म्हणणें पक्षपाताचें होणार नाहीं.

कित्येक पुरुषांचीं मतें तर येथपर्यंत धाव ठोकतात कीं " बायकांनां शिकून काय आमच्यासारख्या नोकऱ्या करायच्या आहेत ? " नाहींत, स्त्रियांनां नोकऱ्या करायच्या नाहींत हें खरें. स्वभाविकपणेंच शिशुसंगोपनाची व गृहव्यवस्थेसंबंधीची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडत असते. ही जबाबदारी चांगल्या प्रकारें पार पाडण्यास त्यांनां शिक्षणाची आवश्यकता नाहीं काय ? आपल्या पुढील वातावरणांत काय चाललें आहे याची जाणीव प्रत्येकाला असणें कितीतरी अगत्याचें आहे. आतां पुरुषांपेक्षां स्त्रीशिक्षणाचा मार्ग जरा वेगळा आहे खरा. स्त्रियानां अशिक्षित, अज्ञानी ठेऊन आणखी वर त्यांनां मुर्ख, अडाणी वगैरे शेलकी शेलकी विशेषणें लावणें केव्हांही रास्त नाहीं.

कित्येक पुरुषांनां तर स्त्री हें लोढणें वाटत असतें. स्त्रियांनां सुशिक्षित केलें असतां ओढणें ओढण्याचा प्रसंग पुरुषांनां येतो कीं काय ? उलट सहकारितेनें कोणतेंही काम केलें असतां बरेंच सोपें होऊन घरच्या प्रत्येक बाबतींत पडणारी दगदग समूळ नाहींशी होते व बाहेरील उद्योगांत मन घालण्यास त्यांनां बरीच फुरसत मिळते.

सुखांत अगर दुःखांत, गरिबींत अगर श्रीमंतींत समभागी असणाऱ्या सहचरीला गृह–स्वातंत्र्याच्या बाबतींतही समभाग कां मिळूं नये ?

" यत्र नार्यस्तु पूज्यंते रमन्ते तत्र देवताः " या महावाक्याची या पहिल्या वर्गाच्या पुरुषांकडून इतकी घोकंपट्टी झालेली असते कीं झोपेंत देखील कोणीही पुरुष पटकन तें बोलून दाखविल; परंतु यांतील तत्त्व किती जणांकडून आचरिलें जात असेल बरें ?

(मनुष्य-स्वभाव-निदर्शक दृश्यचित्र)

(ले०—विश्वनाथ यशवंत देसाई.)

" हृदयशारदा ! हृदयेश्वरी ! माझी जीवनज्योती ! अहाहा, शिरिन्, कोणत्या शब्दांनीं तुझें वर्णन करूं ? सदा सर्वदा तुझ्या मूर्तीचें ध्यान, तुझ्या गुणाचा जप, तुझ्या त्या मधुरतर कोमल शब्दांचें.. .छे, माझ्यानें कांहीं आतां लिहवत नाहीं ! शिरीन्, मुक्या मनाचे अमोल मुके शब्द कागदावर असल्या मोडक्या तोडक्या शब्दांनीं उतरावयाचे म्हणजे-म्हणजे...छे, मला कांहीं सुचतच नाहीं....सुचत नाहीं, आठवत नाहीं....आठवतें तें एकच....शिरिन्, मला आठवतें तें एकच....तुझी ती मांगल्याची स्वर्गीय मूर्तीच ...." इतक्यांत 'दिवा' म्हणून मागें कोणीशी हांक मारली.मी दचकून मागें पाहिलें. तों पाठीशीं वसंत उभा ! झटकन् मी तो कागद खालच्या पॅडमध्यें लपविला व झोंपेंतून उठणाऱ्या मनुष्याप्रमाणें डोळे चोळीत उठलों व वसंताला खुर्ची सरकावून दिली.

" काय चाललें होतें ? "

" कांहीं नाहीं." मी जरा त्रासिक स्वरानें म्हटलें.

"नाहीं, तरी पण ?" वसंत जरा चीड आणणाऱ्या चेष्टेखोर स्वरानें म्हणाला.

"कपाळ तुझें ! तरी पण काय ? " मी रागाच्या आवेशांत बोललों. वसंत आमच्याकडे येत नसे असें नव्हे. दिवसांतून आमच्या घरीं त्याची एक खेप ही ठरलेलीच. त्यांतून रविवारीं तर दोन वाजतां स्वारी हजर. रविवारच असल्यामुळें तो दोन तीन वाजतां येणार हें मला माहित ! म्हणून १ वाजतां जेवण उरकल्याबरोबर 'कांहींतरी' लिहावयास बसलों. पण आज स्वारी १॥ वाजतांच पाठीशीं दत्त म्हणून उभी. माझ्या लिहिण्याच्या ऐन भरांत व्यत्यय आल्यामुळें माझ्या मनाचा अगदीं जळफळाट झाला होता आणि त्यांत आणखी वसंताच्या चेष्टेखोर प्रश्नांची भर ! मग काय ! माझ्या मुलुखमैदानी जिभेला बेछूट सवलत मिळाली.

" पत्र कोणाला लिहीत होतास ? " माझ्या शब्दांचा कांहीं एक उपयोग न होतां वसंत पुन्हां त्याच रीतीनें बोलूं लागला. "असलीं पत्रं ल्याहायला शिकलास काय आतां ? पण जर त्याचा कांहीं भलताच प्रकार झाला तर—संभाळ हं ! अहाहा, काय पण हृदयेश्वरी ! हृदयशारदा ! माझी जीवनज्योती ! अहाहा ! वाः रे, तुझी जीवनज्योति ! जशी कांहीं स्वर्गांतूनच उतरली नाही रे ? तुझी ती मांगल्याची स्वर्गीय मूर्ति....,.. "

पण त्याला पुढें बोलूं मिळालेंच नाहीं ! बेभान बनून मी त्याच्या खाडकन् थोबाडींत दिली व त्याला खुर्चीवरून ओढून फरपटत जिन्याकडे घेऊन गेलों. कसला आवाज

झाला म्हणून आई बाहेर आली, तों आमचें हें पैशाचिक दृश्य ! जिवास जीव देऊन राहाणाऱ्या आमच्या दोघांची ती अवस्था पाहातांच ती आमच्याकडे टकमका पाहातच राहिली ! पण मी वसंतला जिन्यावरून ढकलणार असें पाहातांच ती पुढें झाली. मला एका बाजूस ढकलून तिनें वसंताला चहा पिण्यास म्हणून आंत नेलें.

अरेरे ! काय झालें हें ! आज काय झालें हें ! ध्यानी मनीं नसतां आज हा विपरीत प्रकार होऊन गेला. वसंत माझा शाळा सोबती--माझ्या जिवाभावाचा मित्र; आणि आज त्याला त्याच्या एवढ्या निकट मैत्रीचा काय मोबदला मिळाला ? मग हा दोष कोणाचा ? माझा कीं वसंताचा ? छे–आतां काहीं मला कळत नाहीं–असेन ! मीहि दोषी असेन ! वसंत बोलला त्यांत गैर काय होतें ? पण तो उपदेश माझ्या मानी, तापट, अल्लड मनाला रुचला नाहीं न् त्याचें त्या चमत्कारिक प्रसंगांत शेवटीं पर्यवसान झालें ! अरेरे ! काय केलें हेंमी ? माझ्या प्राणापेक्षांहि प्यार वसंताचा मी असा अपमान करावा अं ! वसंत,वसंत--नाहीं,मला काहीं सुचत नाहीं–दिसत नाहीं...डोकें कसें भणाणून गेलें आहे !

छबडी कुमुद माझ्याजवळ येऊन "दादा, चहा प्यायला चल कीं ले" म्हणून बोबड्या बोलांनीं मला आंत येण्यास सांगत होती. एवढा वेळ नापत्ता झालेला टॅाम चहाची वेळ होतांच माझ्याशीं येऊन पायाला आपलें अंग घांसून चहाची वेळ मला सुचवित होता ! मनी मांजरीहि टॅामला मला चहासाठीं उठवण्यांत मदत करीत होती. पण आज कशाचाच उपयोग झाला नाहीं. सर्वांस झिडकारून मी टेबलावर डोकें टेकून बसलों. इतक्यांत माझ्या मनांत कांहीं आलें. मी ताबडतोब कोट टोपी चढविली आणि लगबगीनें बाहेर पडलों.

उत्कंठीत मनानें तडक वसंतच्या बिऱ्हाडीं गेलों; पण वसंत घरीं नाहीं असें कळलें. माझी जराशी निराशाच झाली. मीं तसाच बाहेर पडलों आणि वसंतासाठीं सबंध चौपाटी, हँगिंग गार्डन् सर्व पालथी घातली.पण मला वसंताचा ठावठिकाणा लागेना.माझें हृदय भरून आलें. वसंत मला आतां भेटणारच नाहीं का ? छे, माझा वसंत माझ्या इवल्याशा चुकीसाठीं नाहीं असें करणार. हृदयाच्या वेदनानीं वेडयापिशा बनलेल्या मन:स्थितींतच मी बराच वेळ भटकलों. वसंत नेहमीं जात असलेल्या गिरगांवांतल्या आर्ट सोसायटींत जाऊन पाहिलें; पण माझा वसंत कांहीं मला मिळेना ! कां कोणास ठाऊक ! खळकन माझ्या डोळ्यांत अश्रु आले. हृदय धडधड धडाडूं लागलें. सर्वांगास कापरें भरलें. माझ्यानें उभें देखील राहवेना. कसा बसा टॅ्म्वेचा आधार घेऊन एकदांचा घरीं आलों व डोकें दुखण्याचें निमित्त करून बिछान्यावर पडलों. सबंध १८ वर्षाच्या आयुष्यांत आजचाच काय तो मला काळमुखी, दु:खाचा दिवस दिसला ! सकाळीं उठून कोणाचें तोंड पाहिलें कोण जाणें ! जीव त्रासलेला; तशांत घरीं आल्याबरोबर केलेल्या कर्मासाठीं बाबांकडून हजेरी. बाबा मला केव्हांच बोलत

नसत. त्यामुळें आज ते एक दोन शब्द बोलले तेच मला किती तरी लागले! आईं "डोकें दुखतें का रे ? थोडें दूध आणूं का ?" म्हणून समाचाराला आली; पण त्यावेळीं मी टाळाटाळी करून तिला वाटेला लावलें. टॉम बिचारें मुकें जनावर ! आपला लाडका धनी झोंपला असें पाहातांच शेंपटी हालवीत व जीभ चाटीत तो पायांकडे येऊन केविलवाण्या मुद्रेनें पाहूं लागला. पण त्याला एका लाथेचें बक्षीस देऊन दूर लाविलें. मला सर्वांचाच तिटकारा आला ! माझाच जीव मला नकोसा झाला !

सकाळीं उठल्याबरोबर चहाकडे ढुंकूनही न पाहतां मी लिहावयास बसलों.

प्रिय वसंत—

आईच्या आवडत्या बाळानें आईचा अल्लडपणानें अपराध केला म्हणून ती थोडीच त्याला रागें भरते ? किती झालें तरी तें अल्लड बाळ ! त्याला काय समजतें मान आणि मरातब ? नैसर्गिक रीत्या बोबडया बोलांनीं तें कांहीं तरी–मनास येईल तें बोलतें–हसतें–फुगतें; पण आईंच्या मनावर त्याचा कांहीं परीणाम होतो का ? उलट तिला त्यापासून अत्यानंदच होतो !

वसंत, मी अजून अजाण बालकच आहे, असें समज. माझ्या अल्लड मनानें कांहीं तरी पोरकट पोरखेळ केला तर त्याचा तुला एवढा राग यावा का ? माझ्या तापट स्वभावाची तुला ओळख असतां तूंच असा हसवा धरलास तर तें शोभेल का ? वसंत, सांग कोणत्या शब्दांनीं तुझी क्षमा मागूं ? वसंत, सांग. एकच सांग. माझ्या—"

" काय, दिवाकर, काय चाललं आहे ? " हे शब्द ऐकूं येतांच मी खुर्चीवरून उठलों व वसंतला एकदम मिठी मारली. मी लिहित बसलों असतां तो कालच्याप्रमाणेंच आज मागें येऊन उभा राहिला. पण कालच्यांत आणि आजच्यांत किती फरक ? काल तो येतांच माझ्या कपाळास आंठी पडली तर आज आनंदानें हृदय फुटतें कीं काय असें मला वाटलें. वसंतच तो ! तो थोडाच माझ्यावर राग धरणार ? वसंताला काय करूं न् कुठें ठेऊं असें मला होऊन गेलें !

" काय चाललं होतं ? " वसंत हंसत हंसत विचारूं लागला.

" कांहीं नाहीं रे ! " मीही हंसत हंसत उत्तर दिलें ! वसंत टेबलाजवळ गेला व त्यानें तें पत्र वाचलें. वाचल्याबरोबर मात्र पोट धरधरून तो हंसूं लागला. " अजून पोरच आहेस रे ! पण तें जाऊं दे आतां अंSSS ?"

" पण वसंत, " मी मध्येंच उतावीळपणानें विचारलें. " वसंत, मला क्षमा करशील ना ? मागच्याप्रमाणेंच माझ्यावर निष्कपट प्रेम करशील ना ? होय म्हणना ! वसंत, सांग..."

" अरे, पण थांब थांब, मलाच तुझी उलट क्षमा मागायची आहे ! "

मी वसंतकडे टकमका ' आ' वासून पाहातच राहिलों. अपराधी सर्वस्वी मी असतां वसंत माझी क्षमा मागणार? ज्याचा अपराध केला त्यानेंच अपराध करणाऱ्याची क्षमा मागावयाची ! मी बुचकळ्यांतच पडलों !

" सांगतों ऐक. तूं तें पत्र लिहीत होतास ना? तें तूं खरोखरच त्या खुळ्या कल्पनेनें कोणाला तरी लिहितो आहेस असें मला वाटलें आणि म्हणून मी तुला थोडेसें टाकून बोललों. तूं माझ्या शोधाकरितां बाहेर गेल्यानंतर मी इकडे परत आलों व तें सर्व वाचलें.वेडया, जर तूं मला गोष्टींतला 'हीरो' आपल्या 'हिरॅाइन'ला तें पत्र लिहीत आहे असें पूर्वीच कळविलें असतेंस तर एवढया थराला प्रकार पोंचलाच नसता ! ती गोष्ट वाचतांच माझें मलाच हंसूं आलें. आणि खरेंच सागूं दिवा ? तुझ्या मनाला दुखवल्याबद्दल मला फार वाईट वाटलें. रात्रीं तुझें डोकें शांत असणार नाहीं हें मला माहीत म्हणून रात्रीं न येतां सकाळींच उठून आलों. पण ती तुझी गोष्ट कीं नाहीं फार छान साधली आहे बुवा!"

" हो, ते पहा त्या गोष्टीचे तुकडे. मी ती गोष्ट कालच फाडून टाकली ! तेवढें पत्र लिहिलेला मात्र कागद आहे. "

" छानच केलंस! फाडून काय फायदा झाला तुला ? "

" फायदा नाहीं; पण तोटा मात्र फार झाला. थांब हं ! मला एक मोठें काम आहे. टॉमीला अगोदर कुरवाळलं पाहिजे. काल कुमुदवर संतापलों होतों. तीहि जरा रुसून बसली आहे. तिचा एक पापा घेऊन तिला शांत करून येतो हं....."

झालें तें सारें नजरचुकीनेंच आणि समजूतीच्या घोटाळयानेंच झालें होतें.

(१४ वर्षांच्या आंतील वर्गणीदारांसाठीं)

बक्षिसाचा विषय

" अभ्यास व व्यायाम यांपैकीं तुम्हीं काय पसंत करालं व तें कां ? "

(निबंध १० दिवसांत लिहून पाठवावा.)

"—जायला सांगितलं म्हणजे काय गोष्ट झाली ? हा निघालों आतांच !—मला काय, ही कंपनी नाहीं दुसरी आहे. कुठंही जाऊन तोंडाला पिवडी फांसून काम केलं पाहिजे.—मग इथं काय आणि दुसरीकडे काय; सारखंच !—असंच करूं नकोस आणि तसंच कां केलंस ?—म्हणजे जशी कांहीं आम्ही नट मंडळी म्हणजे सरकशींतून धरून आणलेलीं जनावरं; आम्हांलाही यांच्याप्रमाणें थोडीफार अक्कल वाटली आहे ब्रह्मदेवानं हें जसं कांहीं लक्षांतच नाहीं यांच्या—आणि शिकवतांना सांगतात काय; तर म्हणे पहारेकऱ्याच्या जातीला एवढं ओरडणं शोभत नाहीं. आमचं ऐकायला बसलंय खेटर !—अरे बोलून चालून ऐतिहासिक नाटक; त्यांत थोडी फार आरडाओरड पाहिजेच जरूर ! एवढा मोठा गणपतराव जोशी; पण भीमदेवाच्या कामांत आवाजानं हंडया झुंबरंसुद्धां फुटून गेलीं तरी कमी करायचा नाहीं. थिएटर म्हणजे काय नुसतं मंत्रपुष्पाच्या गर्जनेसारखं दणाणून जायचं.—मालकांनींच गावं आणि ओरडावं असं कुठच्या तालीम मास्तरानं सांगितलं आहे ? स्टेजवर गायला जावं तर म्हणे थिएटर कोसळून पडेल आणि ॲक्टिंगच्यावेळीं या अडचणी ! चांगली चांगली मंडळी निघून गेली तरी मालकाचा तोरा मोठा विलक्षण ! कंपनीच्या पडत्या काळांत सांवरून धरायला पुढं यावं म्हणून कामं करायला लागलों—! यांच्या तीस टिकल्यांवर थोडंच माझं पोट अवलंबून आहे. म्हणजे आम्हांला जसं पुढं यायलाच नको ! गणपतरावाच्या सवाई ॲक्टर आणि केशवरावाच्या दीडपट गवई व्हायचं म्हणून निश्चय केला आणि कंपनींत आलों. बाजारमास्तराचं काम कर; केलं. हँडबिलं वाटायला राहा; कबूल. दरवाजावर तिकिटं चेक कर; त्यालाही तयारी. आणि पुढं पुढं रंगपटांत फर्निचर हालवायला राहून प्रत्यक्ष पहारेकऱ्याच्या पोशाखांत स्टेजवर आलों तेव्हां आतां ही अशी भाषा. आपण तर बुवा निश्चय केलाय् कीं ॲक्टिंग आणि गाणं यांत कुणाच्या बापाचंही ऐकायचं नाहीं. आमची आपली स्वतंत्र पद्धत ठेवायची ! मोठमोठ्या नटांचं असंच असतं. आतां याच स्टेजवर कामं करून टाळ्या पडूं लागल्या मग पुढं कंपनीची भागी मागेन म्हणून हीं मालकांची आतांपासूनचीं धोरणं कळतात म्हणावं मला. आतां काढली तर स्वतंत्रच कंपनी काढायची आणि एखाद्या वर्तमानपत्राला हातीं धरायचं; त्याच्याशिवाय भागणार नाहीं. आम्हांलाही म्हणावं थोडीशी अक्कल आहे. बघा आतां कसा फुटून जातों तो !

वाग्रत्नाकर

[निवडक अलिअलिकडच्या वाचनीय पुस्तकांची यादी]

(एकाच पाणबुडयाला समुद्राच्या तळाशीं बुडी मारून सगळीच रत्नें कशी सांपडतील ? म्हणूनच कांहीं बहुमोल रत्नांचा नामनिर्देश झाला नसला तर ती चुकी क्षम्य मानावी.]

श्यामसुंदर (श्री. श्रीपाद कृ. कोल्हटकर) विषयः——अस्पृश्यता-निवारण. वैशिष्ट्यः——उत्कृष्ट स्वभावपरिपोष, परिणामकारक भाषापद्धति, सुंदर सजावट. (कादंबरी)

दुटप्पी कीं दुहेरी ? (श्री. श्री. कृ.कोल्हटकर) विषयः——वाङमयविषयक, सामाजिक,राजकीय मतांचा उहापोह. वैशिष्ट्यः——सुसंगत व साग्र चर्चा, उत्कृष्ट भाषाशैली. (कादंबरी)

स्वराज्यावरील कादंबऱ्या (श्री. नाथमाधव) विषयः——स्वराज्याचा इतिहास. वैशिष्ट्यः——मनोरंजक रंगावट, सुटसुटीत भाषा, सुंदर स्वभावपरिपोष, चित्तवेधक प्रसंग, कथानकाची मनोहर मांडणी.

सुखाचा मूलमंत्र (श्री. नारायण ह. आपटे) विषयः—व्यायाम. वैशिष्ट्यः—सुंदर कथानक, सुसूत्र विचारसरणी, मनावर तत्वें पटवण्याची मार्मिक पद्धति, विषय बेचव असूनहि सुंदर रंगावट (कादंबरी)

संपूर्ण बाळकराम(कै. राम गणेश गडकरी) विषयः——विनोदी वाङमय. वैशिष्ट्यः——गर्भित पण भारदस्त विनोद, कल्पनेच्या स्वैर भराऱ्या, मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म निरीक्षण, उत्कृष्ट भाषाशैली. (विनोदी लेख)

कुलाब्याची दांडी (प्रो. ना. सी. फडके) विषयः—वास्तव आणि अवास्तव प्रेम यांतील भेद. वैशिष्ट्यः—चित्तवेधक कथानक, रम्य प्रसंग, सहजसुंदर भाषाशैली, सहजमनोहर स्वभावरेखन, तरुणांना मार्गदर्शक. (कादंबरी)

वेबंदशाही (श्री. वि. ह. औंधकर) विषयः—संभाजीचा काल. वैशिष्ट्यः—एकजात तडफदार ऐतिहासिक भाषा, इतिहासप्रसिद्ध कथानक, हृदय थरारून सोडणारे प्रसंग, योग्य स्वभावरेखन (ऐतिहासिक नाटक)

वाग्वैजयंति (कै. राम गणेश गडकरी) विषयः—काव्य. वैशिष्ट्यः—स्वैर कल्पना, सुंदर तत्वें, भावना उद्दीपित करण्याची हातोटी, विषयवैचित्र्य, नवरस. (कवितासंग्रह)

आत्मोन्नति (भी. सीताकांत) विषयः–शरीर–मनःस्वास्थ्य. वैशिष्ट्यः– शुद्ध, सात्विक विचारांची उत्पत्ति, मनांवर तत्वें बिंबवणारी सुंदर विचारसरणी, मनोहर प्रासंगिक उतारे. (संग्रहणीय पुस्तक)

ब्रह्मचर्य हेंच जीवन (स्वामी शिवानंद) विषयः–– सशरीर मनःस्वास्थ्य. वैशिष्ट्यः–तरुणांचें तारुण्य टिकवण्याचे सुलभ उपाय, मनावर ताबा ठेवण्याचें सामर्थ्य यांचें साग्र विवेचन. (संग्रहणीय पुस्तक)

लो. टिळकांच्या आठवणी व आख्यायिका (लो. टिळकांशीं संबंध आलेल्या व्यक्ति) विषय–आठवणी. वैशिष्ट्यः–निरनिराळ्या आठवणींवरून लोकमान्यांच्या स्वभावावद्दल व मतांबद्दल भरपूर माहिती, आल्हाददायक आठवणी. (संग्रहणीय पुस्तक)

भारतीय वीरकथा (रा. रा. चिं. वि. वैद्य) विषयः––महाभारत. वैशिष्ट्यः––भाषेचा रसाळपणा, मुख्य मुख्य पात्रांच्या स्वभावाची अधिकारपूर्ण भाषेंत केलेली छाननी व त्यांच्या चरित्र्यावर पाडलेला प्रकाश.

न्या मू. रानडे यांचें चरित्र (रा. रा. न. र. फाटक.) न्या. मू. रानडे यांच्या चरित्रांतील बारीक सारीक प्रसंगाची विश्वसनीय माहिती. न्यायमूर्तींबद्दल सर्व बाबतींत झालेला सर्वांगसुंदर चरित्र–ग्रंथ.

लो. टिळकांचें चरित्र (रा. रा. न. चिं. केळकर) लोकमान्य टिळकांचें आरंभापासून अखेरपर्यंतचें चरित्र. लोकमान्यांचा हिंदुस्थानांतील प्रमुख पुढाऱ्याशीं आलेला संबंध व त्यांच्याबद्दल थोडक्यांत माहिती. चर्चा.

उपासनी महाराजांचें चरित्र (श्री. नाथमाधव) सत्पुरुषांच्या चरित्राची साधारणावस्थेंतून परमोच्च पदापर्यंत कशी उत्क्रांति होत जाते याचें सुंदर चित्र. सत्पुरुष–चरित्र-ग्रंथामधील एक विश्वसनीय माहितीनें भरलेला चरित्रग्रंथ.

गडकरी (रा. साठे आणि डॉ. जोशी) विषयः–गडकऱ्यांच्या नाटकांच्या सर्वांगाची सविस्तर चर्चा. वैशिष्ट्य––नवीन नाटककारास मार्गदर्शक. नाटकांतील गुणदोषांचें मार्मिक विवेचन. (नाट्याभ्यासी जनांनां अत्यंत उपयुक्त)

(लहान मुलांमुलींसाठीं उपयुक्त पुस्तकांची यादी लवकरच देण्यांत येईल.)

" जया, या सुटींत आमच्या मनांतून तुझ्या लग्नाचं जुळवून आणायचं आहे. तुझं काय म्हणणं आहे ? " मी मुंबईला जाण्याची गोष्ट काढण्यापूर्वीच बाबानीं मला हा आगंतुक प्रश्न विचारला. जो प्रश्न मी टाळण्याचा प्रयत्न करीत होतों आणि ज्याच्याबद्दल मला अण्णांनीं पूर्वीच 'सूचना' देऊन ठेवली होती त्याच प्रश्नानें अखेर मला घेरलेंच. असला प्रश्न मला त्यावेळीं विचारला जाईल असें एखादें संशयास्पद कारण मला काहींच दिसून आलें नव्हतें. नाहीं म्हणायला दोन-चार दिवसांपूर्वी या गोष्टीचा होत असलेला खल आडून माझ्या कानीं आला होता तितकाच. पण तो आकस्मिक प्रश्न विचारलेला पाहून मी बावरूनच गेलों. मी स्तब्ध राहिलेला पाहून बाबा पुन्हां म्हणाले,

" तुझी कांहीं आडकाठी आहे का ? बोलत का नाहींस ? असल्या महत्वाच्या कामांत मुकेपणा उपयोगी नाहीं.-.-"

आणखी बाबा बरेचसें कांहीं बोलले. पण माझें त्यांच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. मी कांहीं निराळ्याच विचारांत गुंग होऊन गेलों होतों. जमिनीवर ठेवलेल्या पेल्याच्या काठावर उजव्या हाताच्या बोटानें टिचक्या मारीत मी विचार करूं लागलों, बाबानां आतां काय उत्तर द्यावयाचें ? रुकार देऊन त्यानीं पाहिलेली मुलगी मुक्यानें गळ्यांत बांधून घ्यावयाची कीं माझ्या मनांतलें सारें त्यांच्यापुढें धैर्य धरून ओकून टाकावयाचें ? मनांतलें गुह्य बाबानां सांगण्याइतका मला धीर होणें शक्यच नव्हतें. मात्र मला तसें फार फार वाटे. मग काय, मनांतल्या आशा मनांतच जिरवून बाबानीं शोधून काढलेल्या मुलीला संसारांतली सोबतीण बनवून सारें आयुष्य वैराण वाळवंट बनवूं ? माझ्या त्यावेळच्या परिस्थितींत ही केवढी भयंकर आपत्ती होती !

या गोष्टीला मी कबूल होणें शक्यच नव्हतें. अशा अरसिकतेंत उभां जन्म केवळ बाबांच्या रागासाठीं काढणें मला मुळींच पसंत नव्हतें. नीरस निष्प्रेम आयुष्यांत मौज कसली ? चौऱ्याऐंशीं फेऱ्यानंतर लाभणारा मनुष्यजन्म अशा बेचैन तऱ्हेनें घालवायचा ?

मग आतां हें जमणार कसें हें मला समजेना. बाबांच्या रागासाठीं मी वाटेल तीं धोंड गळ्यांत बांधून घेण्यास तयार नव्हतों आणि माझ्या मनांतली गुप्त गोष्ट बाबांना सांगण्याइतकें धैर्य माझ्या अंगीं नव्हतें.

आईचा शब्द ऐकून मी विचाराच्या तंद्रींतून जागा झालों. विचाराच्या भरांत पेल्यावर माझ्या बोटाच्या जोराजोरानें टिचक्या बसूं लागून तो एकदम कलंडला आणि आंतील सगळा चहा जमिनीवर सांडला. मी मुकाट्यानें पेला पुढें करून आणखी चहा घेतला आणि तो पिऊं लागलों.

* *

बाबानीं बराच वेळ वाट पाहिली आणि मला शेवटीं विचारलें, " तुझ्या तोंडाला याच वेळीं खीळ कशी पडली ? तुझ्यासारखा बोलका माणूस तर मी दुसरा पाहिलाच नव्हता. एवढयांत लग्न करायचं नसेल तर तसं सांग. त्यानां मी वाट पहायला सांगीन. त्यांची थांबायला हरकत नाहीं. "

बाबा फक्त "त्यांचा" "त्यानां" असे मोघमच शब्द बोलत होते. "ते" म्हणजे देशमुखच आहेत हें मी ओळखलें. कारण तें नांव मी त्या रात्रीं आडून ऐकलें होतें. पण त्याचें विशेषसें महत्व नव्हतें. बाबानां उत्तर काय द्यावयाचें हाच महत्वाचा प्रश्न यावेळीं माझ्या डोळयासमोर थयथयाट घालीत होता. शेवटीं मी नक्की ठरवलें कीं त्यानां मुंबईला गेल्यानंतर विचार करून पत्रानें कळवतों असें सांगावयाचें. कारण मी कुठेसें वाचलें होतें कीं, असल्या प्रश्नांची उत्तरें वडील माणसापुढें भिडेमुळें समक्ष रीतीनें तोंडीं सांगण्याइतकें धैर्य नसलें तर पत्रांत तितका मनमोकळेपणा ठेवतां येऊन आपल्या मनांतली गोष्ट स्पष्टपणें वडील माणसांच्या कानांवर घालतां येते.

मी तसेंच करावयाचें ठरवलें आणि मोठें धैर्य करून त्यानां सांगितलें, " विचार करून मुंबईस गेल्यावर लवकरच काय तें मी लिहून कळवीन. "

मी हे शब्द मोठया मुष्किलीनें तोंडांतून काढले. कारण कांहीं वेळानें माझें मलाच माझ्या धारिष्टाबद्दल आश्चर्य वाटूं लागलें. तेथून उठून जाण्याचा मी प्रयत्न करूं लागलों. पण कां कोण जाणें ! माझे पायच हालेनात. तेथें बसावयाचें तर मला आतां प्राणसंकट वाटूं लागलें. बाबा माझ्या उत्तरावर कांहींसें बोलणार होते; पण इतक्यांत बाहेर बाबानां बोलवायला कोणीसें आल्यामुळें बाबा उठून बाहेर गेले आणि मी सुटकेचा एक जड निःश्वास टाकला.

दुसऱ्या दिवशीं मी मुंबईला जाण्याचें नक्की ठरवलें. बाबानीं आणि आईनीं मला जाण्याला पुष्कळ आडकाठी केली. पण मी ' मला येथें करमत नाहीं. सारी मित्रमंडळी मुंबईंस चैनींत असतानां मी एकटयानेंच इकडे कंटाळवाण्या स्थितींत सारी रजा संपवावी हें मला पसंत नाहीं ' वगैरे वगैरे नसतीं कारणें सांगून मी माझी तेथून सुटका करून घेतली. पण जातानां संशयानें वाटतें--आईनें प्रभाकराच्या घरीं कोण कोण मंडळी आहे म्हणून मला पुन्हा विचारलेंच. तिला कसली भीति वाटत होती ?

'मधु मला स्टेशनवर पोहोंचवायला आला होता. त्याला मी पत्र वगैरे लिहिण्यास सांगितलें आणि इतक्यांत इंजिननें शिटी फुंकल्यामुळें मी डब्यांत चढून बांकावर बसलों. गाडी दृष्टीआड होईपर्यंत मधु तिकडे पहात होता, मी इतक्या लवकर परत गेलों म्हणून त्याला वाईट वाटणें साहजिक होतें. पण—

× × ×

मी निश्चयच करून टाकला होता कीं कुसुमचा म्हणून जरासुद्धां विचार करावयाचा नाहीं. आणि त्यासाठीं मी बॅगेमधली एखादी नॉव्हेल काढून माझें मन तेथें गुंतवण्याचाहि प्रयत्न करीत होतों. पण मानवी इच्छेशीं ईश्वरी इच्छेचा विरोध असतो हें कांहीं खोटें नाहीं. तसेंच जर नसतें तर पृथ्वींत दुःखाचीं केव्हांच उचलबांगडी होऊन पृथ्वी म्हणजे एक हंसरा बगिचाच होऊन बसला असता. मी जो जों माझ्या मनःचक्षुपुढून कुसुमची मूर्ति नाहींशी करण्याचा प्रयत्न करीत होतों, तों तों ती मला जास्त जास्तच भंडाऊन सोडीत होती. आपण अशा परिस्थितींत एखादे वेळीं सांपडत असतो कीं जी नावडती गोष्ट अगर दुःखद स्मृती नजरेसमोरून घालविण्याचा प्रयत्न करतो ती दुप्पट उमेदीनें आपल्या अडथळ्याशीं टक्कर देत असते आणि अखेर कंटाळून नाईलाजानें आपणांस तिला 'शरण' जावें लागतें. तीच माझी त्यावेळीं स्थिति झाली. कुसुमची आठवण म्हणजे कमिन्न आकाशांत क्षणभर चमकून विलीन झालेली क्षुल्लक चांदणी आहे, अशी मी माझ्या मनाची समजूत करण्याचा प्रयत्न करीत होतों. चुकून एखादी चांदणी चमकली म्हणून कांहीं आपण तिला आकाशांतल्या चिरस्थायी ताऱ्यांच्या जोडीला बसवीत नसतो असा मीच माझा समज पाडीत होतों—निदान त्या दिशेनें प्रयत्न तरी करीत होतों. पण तें जमेनाच.

मनमाड स्टेशनवर गाडी उभी राहिली आणि अजूनपर्यंत रिकाम्या असलेल्या डब्यांत ७—८ माणसें चढली. त्यांच्याबरोबर पाठून एक भिकारीणहि आपल्या लहान अर्भकासह वर चढली. तिचा विटाळ होऊं नये म्हणून जो तो तिला 'छुत छुत' करीत होता. त्यांत एक रुमालवाले सभ्य गृहस्थहि होते. त्यांनीं तर तिला एक शिवी हांसडून दूर सरण्यास सांगितलें. ते गृहस्थ मी कुठेंतरी पाहिल्यासारखें मला वाटूं लागले आणि थोडा मेंदूला ताण देतांच मुंबईत एका सार्वजनिक सभेंत 'अस्पृश्यता—निवारण' या लोकमान्य विषयावर दोन तासभर सुश्राव्य व्याख्यान देणारे व टाळ्यांच्या गजरांनीं विभूषित झालेले ते एक बडे व्याख्याते होते हें माझ्या ध्यानांत आलें. अस्पृश्यता-निवारणाचें महत्त्व कंठशोष करून प्रेक्षकांच्या मनावर बिंबवतांना प्रत्यक्ष उपदेशकांचें मन त्याला किती परके असतें हें मला त्यावेळीं दिसून आलें. समाजांत महत्त्वाच्या म्हणून गणल्या गेलेल्या व्यक्तींची खाजगी कारस्थानें किती काळीकुट्ट असतात यांचें तें सजीव चित्र होतें. समाजाच्या अंधदृष्टीची मला कींव आली, पण त्याच वेळीं असल्या पाजी माणसांचा किळसहि आला. लोकांची दृष्टि त्यांचीं काळोखांतली कृत्यें पहाण्याइतकी दूरवर पोंचत नाहीं म्हणून त्या व्यक्तींना उजळ माथ्यानें, महत्वाच्या मानानें नटून वावरतां येतें. माझी पांच मिनिटांपूर्वीची मनःस्थिति विसरून मी याच विचाराच्या लाटेंत तरंगूं लागलों.

ती भिकारीण रडवें तोंड करून माझ्या बाजूला वळली.तिची दीनवाणी स्थिति पाहून अगर त्या पाजी संभाविताची चीड येऊन कदाचित असेल--मला तिची दया आली आणि मी पलीकडे सरकून तिला बसण्यासाठीं म्हणून खिडकीजवळ जागा करून दिली. पण ती बांकावर न बसतां दोन बांकामध्यें पाय ठेवण्याठिकाणीं बसली. पलिकडच्या बाकावर खिडकीजवळ बसलेला एक 'सद्गृहस्थ' तिला झिडकारणार होता पण माझ्या कृतीबद्दल कांहींशी लाज वाटूनच कीं काय तो वेडेवाकडे तोंड करीत खिडकीपासून दूर सरून पलिकडे बसला. इराण्याच्या हॉटेलांत केक्स्-पाव खातांना आणि सिनेमाच्या थिएटरमध्यें दरवाजांतून अप-टू-डेट महार, चांभारानां खेटून जातांना त्यांना अस्पृश्यतेचा विसर पडतो कीं काय हा प्रश्न मी माझ्या मनालाच विचारला.

थोडा वेळ जाऊन सारें स्थिरस्थावर होतांच त्या भिकारणीनें गाण्यास सुरुवात केली. तिचा आवाज सुस्वर होता आणि तिची गाणें म्हणण्याची ढबहि सुरेख होती. डब्यांतली मंडळी नव्या ओळखीनें चाललेलें आपलें एकमेकांतलें भाषण थांबवून तिचें गाणें ऐकूं लागली.गाण्याचा विषय 'निष्ठूर जगानें दूर लोटलेल्या एका आश्रयहीन-विधवेची देवाजवळ फिर्याद' हा होता.त्यांत मुळचीच कारुण्याची छटा होती,आणि ती भिकारीण गाण्यांत रडलेल्या भावनेशी तद्रूप होऊन गात असल्यामुळें तें गाणें हृदयाला भेदत होतें. मघाशीं तिला हिडिसफिडीस करणारे गृहस्थहि तिच्या करुण गाण्यानें विरघळले. इतकेच नव्हें तर त्यानीं तिला आणखी गाणीं म्हणण्यास सांगून तिला शेवटीं आणा, दोन आणे 'दान'ही केले. मीहि तिच्या अंगावर एक चवली फेंकली. तिचें तोंड थोडेसें प्रफुल्लीत झालें आणि पुढल्याच स्टेशनावर ती उतरली. तिच्यापाठून तिच्या गाण्याबद्दल सर्वानीं बरीच वाखाणणी केली आणि पुन्हां ते आपापल्या विषयांत मग्न झाले. मघली ही वावटळ नाहींशी होतांच मीहि पूर्वपदावर आलों.

× × ×

बोरीबंदर स्टेशनवर उतरल्यावर आतां प्रथम खोलीवर जावें कीं इंदूच्या येथें तडक जावें याचा क्षणभर विचार करण्यासाठीं मी तेथेंच उभा राहिलों.

"शेट, चला," एक पोर्टर माझी ट्रंक, बॅग व बिछाना उचलून म्हणाला. त्याच्या त्या गळेपडूपणाबद्दल मी किंचित् हंसलों आणि बाहेर उभ्या असलेल्या एका व्हिक्टोरियांत सामान ठेवण्यास त्याला सांगितलें. त्याच्या हातावर पावली ठेऊन लॅमिंग्टन रोडवर टोपिवाल्याच्या चाळींत माझ्या रहात्या बिऱ्हाडीं जाण्याचें मी ठरवलें, आणि गाडीवाल्याला गाडी हांकण्यास सांगितली. गल्लीच्या नाक्यावर गाडी उभी रहा-

तांच मी वर माझ्या खोलींत सामान नेण्यासाठीं एखादा हमाल पाहूं लागलों. पण इतक्यांत गणूच खोली झाडून येत होता, त्याला मी हांक मारली. तो धांवत धांवत गाडीजवळ आला आणि त्यानें हंसतमुखानें आणि कांहींशा आश्चर्यानें विचारलें,

" शेट, इतक्या बेगी आलांत ?"

" होय. तिकडे करमेनाच मला--चल, हें सामान उचल. "

त्यानें ट्रंक डोक्यावर घेऊन त्यावर बिछाना ठेवला आणि हातांत बॅग घेऊन वर गेला.. मी खिशांतलें पाकीट काढून त्यांतला एक रुपया काढला आणि त्याला देण्यासाठीं वर पाहिलें.

" शेट, ओळख हाय काय गरिबाची ? " तो हंसत हंसत म्हणाला. माझ्या चटकन लक्षांत आलें कीं--कीं स्टेशनवर जाण्यासाठीं इंदूच्या घरून निघतांना जो 'प्रसंग' घडला त्यावेळीं मी त्याच गाडीवाल्याच्या गाडींत बसलों होतों. मला ती आठवण होतांच मी किंचित् लाजलों आणि त्याच्या हातावर रुपया ठेऊन कांहींसा घाईतच जिना चढून खोलींत आलों. कुलुप काढून मी दरवाजा उघडला आणि आंत गेलों. पाठोपाठ गणूहि आला आणि त्यानें कोंपऱ्यांत ट्रंक व बॅग ठेवली.

" काय रे गणू, प्रभाकराची काय खबरबात ? " मी कोट काढीत विचारलें.

" मला काय ठावं, शेट ? मी नाय बा गेलों तिकडं ! " मी गणूला हा काय म्हणून प्रश्न विचारला. याचें मला आश्चर्य वाटून माझ्या अधिऱ्या मनाबद्दल मला हंसूं आलें.

प्रकरण ६ वें.

उपरति

मी प्रभाकराच्या घरीं जाऊन सर्वांना एकदम आश्चर्यचकित करण्याचा बेत केला होता; आणि झालेंही तसेंच. मी जवळ जवळ दुपारीं तीनच्या सुमारास तिकडे गेलों. इंदू टेबलावर पसरण्याचा रुमाल विणित खिडकीजवळ बसली होती. तिची मजकडे पाठ असल्यामुळें तिला मी दिसलोंच नाहीं. मी मात्र एक क्षणभर तेथें उभें राहून तिच्याकडे एकाग्रतेनें पाहूं लागलों. तिनें त्याच दिवशीं डोकीवरून आंघोळ केली असल्यामुळें तिचे लांब भुरे केंस तिच्या पाठीवर रुळत होते. तिची खुर्चीवर बसण्याची सहजसुलभ ऐट अगदीं तासचे तास पहात उभे राहण्यासारखी होती. कुसुमला

इंदूशी ताडून पाहण्याचा मला मोह होऊं लागला. पण कुसुमला आतां साफ विसरून जाण्याचा मी निश्चय केला असल्यामुळें मी मोठ्या परिश्रमानें आत्मसंयमन केलें. इंदूला विस्मयचकित करण्यासाठीं स्लीपर काढून ठेऊन हलक्या पावलानें तिच्या पाठीं जाऊन उभा राहिलों. तिचें आपणाकडे लक्ष जात नाहींसें पाहून मी एकदम खांकरलों. तिच्या हातांतली विणकामाचा सुई आणि अर्धाअधिक विणलेला रुमाल हातांतून खालीं पडला आणि एकदम दचकून तिच्या तोंडून अस्पष्ट उद्गार निघाला. मला पाहून तिचा चेहरा फुलून गेला. माझ्या आकस्मिक आगमनानें तिला साश्चर्य निरतिशय आनंद झाला.

"मी किती घाबरलें पण!" हे तिच्या तोंडचे मला बरेच दिवस पारखे झालेले पहिले शब्द होते.

"काय झालं घाबरायला?" मी तिच्याकडे हंसत पहात म्हटलें.

"मी समजलें महेश्वरानं कालच्यासारखे.....!"

"काय?" मी मध्येंच भुंवया चढवून म्हणालों, "महेश्वरानं तुझ्याकडे कांहीं पाजीपणा केला होता?" एका क्षणांत माझी मनःस्थिति पार बदलून गेली.

"होय. काल दुपारीं याच वेळीं तो आला होता. त्यावेळीं मी घरांत एकटीच होतें. त्यानें पाठून एकदम माझे डोळे झांकले. म्हटलं आजहि त्यानं तसंच कांहीं केलं कीं काय?"

"ताई, ए ताई, चहा प्यायला—नाना, नाना, आई, नाना आले ग."

वसंत धांवत धांवत माझ्याकडे आला आणि त्यानें माझ्या कमरेभोंवतीं विळखा घातला. मला त्यानें ओढीत ओढीत घरांत नेलें आणि पाठून इंदूहि आली.

"हें काय नाना? एवढ्यांत आला? पत्रबित्र कांहींच लिहिलं नाहींत तें?" वसंतची आई आश्चर्यानें माझ्याकडे पहात मला विचारूं लागली.

"आलो झालं. तुम्हांला आश्चर्यचकित करायचं होतं मला. तेव्हां म्हटलं कांहीं न कळवतां यावं. तिकडे जातांना सुद्धां अगदीं असंच झालं."

"पण इतक्या लवकरसे आला?"

"तिकडे करमत नसेल." अण्णा इंदूकडे तिरप्या डोळ्यानें पहात म्हणाले. इंद् लाजून तिथून उठून बाहेर जाऊं लागली.

"काय ग इंदू, बाहेरशी चाललीस?" अण्णानीं हंसत हंसत विचारलें. मला ही थट्टा मनापासून आवडत होती पण मी त्यावेळीं सर्वांच्या पुढ्यांत लाजेनें चूर झालों.

" प्रभाकर कुठें आहे ? " मी विषय बदलण्यासाठीं म्हणालों.

" प्रभाकर ? असेल महेश्वराबरोबर गांव पालथा घालीत. " वसंतची आई विषण्ण स्वरांत म्हणाली. या आठ, दहा दिवसांत माझ्या गैरहजेरींत प्रभाकरचा स्वभाव पूर्णपणें पालटला कसा याचें मला राहून राहून आश्चर्य वाटूं लागलें. कुठल्या सुष्टदुष्ट रीतीनें महेश्वरानें त्याच्यावर पगडा बसवला असेल ?

झटकन् माझ्या डोक्यांत एक कल्पना चमकली. प्रभाकर व्यवहारांत फार भोळा होता. त्याच्या मनोदुर्गाच्या ह्या कच्च्या दगडाच्या बुरुजाचा महेश्वराला तर ठावठिकाणा कळला नसेल ! मला हा संशय बराच सयुक्तिक व साधार वाटूं लागला.

घरीं जाण्यापूर्वी मी इंदूला एकीकडे गांठून विचारलें, " इंदू, प्रभाकराच्या लग्नाचं अजून कुठं ठरलं नाहीं ना ? "

" हो, ठरलं आहे. पण थोडे दिवसापूर्वी बाबानीं त्याला तसं विचारलं होतं; तेव्हां त्यानं परिक्षा झाल्यावर पहातां येईल म्हणून सांगितलं होतं. "

" अस्सं. " प्रभाकराचें लग्न कोणाबरोबर जमलें आहे तें ठाऊक असूनसुद्धां मी असा मूर्खपणाचा काय प्रश्न विचारला ? कुसुम—

" तुला त्याच्याबद्दल काय वाटतं ? " कुसुमची आठवण नाहींशी करावी म्हणून मी कांहींतरी विचारलें.

" मला काय वाटणार ? तुमच्यासारख्यानं त्याला नीट ताळ्यावर आणलं तर कांहीं होईल. "

" तुझी तशी खात्री आहे ? "

" प्रयत्न करून पहायला काय हरकत आहे ? "

" बरं तर. मी बघतोंच जमतं तर. "

दहा, पंधरा दिवसांच्या वियोगानंतर इंदूला भेटण्यावेळच्या प्रसंगाची मी जी रूपरेखा आंखली होती ती अंशी अस्पष्ट बनली.

× × ×

मी या कुशीवरून त्या कुशीवर बिछान्यावर सारखा तळमळत पडलों होतों. झोंप म्हणून कशी ती येईनाच. महेश्वराबद्दलच्या विचारानें माझें सर्व मनःस्वास्थ्य नाहींसें झालें होतें. त्यानें इंदूशी असा लघळपणा केला आणि साध्याभोळ्या सद्गुणी प्रभाकराचें आयुष्य पार बदलून टाकलें.—म्हणजे काय ? महेश्वर म्हणजे गांवावरून ओवाळून टाकलेला अट्टल व्यसनी माणूस. असल्या गांवगुंडाला इंदूशीं—एका सभ्य घराण्यांतल्या उपवर मुलीशीं चेष्टा करण्याचा काय अधिकार ? असल्या पाजी, बेशरम, हरामखोर——

मी आपल्याशींच खूब चरफडलों. त्यावेळीं तो माझ्यासमोर असता तर मी त्याचा गळा दाबून जीव घेतला असता, इतका मी भडकून गेलों होतों. आणि चिडणार नाहीं तर काय ? आपल्या मालकीची वस्तु आपल्या गैरहजेरींत परक्या माणसानें बिनधोक उचलण्याचें धाष्टर्य करावें म्हणजे काय ?

मी मनांत विचार केला, आतां कुठल्या उपायानें महेश्वराचें त्या घरीं येणें जाणें बंद करावें ? त्या घराशीं—अर्थात प्रभाकराशीं त्याचा असलेला संबंध तोडून टाकल्याशिवाय आतां गत्यंतर नव्हतें. प्रभाकर म्हणजे आणखी थोडया काळानें त्या घराचा आधारस्तंभ होणार होता. आणि या आधारस्तंभाला महेश्वराची लागलेली कीड नाहींशी करून टाकल्याशिवाय पुढील आशा सफळ होणें अशक्य होतें. मी नंदगावला जाण्यापूर्वी मला किंवा कोणालाच प्रभाकराभोंवती असली वावटळ निर्माण होईल असें वाटलें नव्हतें. पण अज्ञाताच्या दाट पडद्याआड इश्वरानें कसल्या कसल्या गूढगोष्टी मनुष्याच्या दृष्टीपासून दडवून ठेवल्या आहेत त्या कशा कळणार ? भरवस्तीच्या राजरस्त्याचें स्मशान आणि राजवाडयाची झोंपडी ही अजब जादू परमेश्वराच्या हातांतल्या फाशांत सदा खेळत असते. दर क्षणाला मनुष्याचें भाग्य फांशाच्या उलथापालथीप्रमाणें पालटत असते.

मनुष्य केव्हां ना केव्हां अशा विलक्षण परिस्थितींत सांपडत असतो कीं त्यावेळीं त्याला स्वतःच्या मनाची समजूत करणें मुळींच शक्य होत नसतें. असला प्रसंग आयुष्यांत एकदांना एकदां तरी खास येतो. मी महेश्वराला विसरून जाण्याचा कितीतरी प्रयत्न करीत होतों. उन्हाळ्याचे दिवस असतांना सुद्धां मी पायापासून डोक्यापर्यंत पांघरूण लपेटून घेऊन डोळे घट्ट मिटून सर्व विचार नाहींसे करण्याचा प्रयत्न करीत होतों. मला वाटलें कीं डोळ्यावरून पांघरूण घेतलें म्हणजे महेश्वराची मूर्ति माझ्या दृष्टीआड होईल. माझे सर्व उपाय हरले; तेव्हां मी झटकन् उशाखालची आगपेटी घेऊन सर्रकन् काडी ओढली आणि टेबलावरचा दिवा खालीं घेऊन तो पेटवला. बाजूलाच कसलेसें एक पुस्तक धूळ खात पडलें होतें, तें उचलून घेऊन मी बिछान्यावर पडल्यापडल्याच तें वाचूं लागलों. धूळ झाडून मी पाहिलें तों तें भूगोलाचें एक जुनें पुराणें पुस्तक. मला त्यावेळीं माझें मन रमवणारें एखादें पुस्तक नको होतें. त्यावेळीं असल्याच नीरस पुस्तकाची आवश्यकता होती. मी त्याची एक दोन पानें वाचतांच माझ्यावर झोंपेचा अम्मल गाजूं लागला; आणि आणखी एक प्यारा वाचतांच मी तसाच छातीवर पुस्तक ठेऊन झोंपीं गेलों. सकाळपर्यंत दिव्यांतलें तेल संपून अखेर तो आपोआपच विझून गेला होता.

× × ×

सकाळपासून वसंत जो राणीच्या बागेंत जाण्याचा हट्ट घेऊन बसला होता तो मुळीं सोडीनाच. सर्वांनीं त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला;पण त्यानें म्हणून आपला शब्द पाठीं घेतला नाहीं. शेवटीं अण्णाच्या आणि आग्रहावरून जेवण वगैरे करून दुपारीं दोन, अडीचच्या सुमारास सर्व मंडळींनीं राणीचा बाग पाहण्यास जावयाचें ठरलें. मलाहि त्यानीं त्यांच्याच येथें जेवण्याचा आग्रह केला. खरें सांगावयाचें म्हणजे मलाहि खानावळींतल्या जेवण्याचा वीट येत होता. आणि म्हणून मी तें जेवण टाळण्याचे जे जे प्रसंग येतील ते मी दवडीत नसे. कधीं कधीं मी दिवसांतून एकदांच जेऊन दिवस काढीत असे तर कधीं कधीं बाहेरच कुठल्यातरी चांगल्याशा हॉटेलांत जाऊन खानावळींतलें जेवण जेवण्याचें संकट टाळीत असे. यामुळें अण्णानीं मला त्यांच्याच येथें जेवणास रहाण्यास सांगतांच मीहि त्यानां रुकार दिला.

जेवण वगैरे होऊन सारी आवराआवर झाल्यावर घराला कुलुप ठोकून आम्हीं घराबाहेर पडलों आणि ट्रामच्या जंक्शनपर्यंत सावलींतून चालत चालत आलों. प्रभाकरच्या इच्छेविरुद्ध त्याला मी बळजबरीनें आमच्याबरोबर नेलें होतें. त्याची मी कानउघाडणी करण्याचा आज बेत नक्की केला होता.

बागेंतली निरनिराळीं जनावरें पहाण्यांत सर्व मंडळी मग्न झाली होती. मी आणि प्रभाकर बाकीच्या मंडळीपासून बरेच पुढें गेलों होतों. पण आमचें मन त्या जनावरांना पाहण्यांत रमण्यासारखें नसल्यामुळें मी प्रभाकरला पाठी वळण्यास सांगितलें आणि अगदीं पलिकडच्या वाटेनें पाठी फिरून फाटकांतन बाहेर पडलों आणि जवळच्याच 'भायखळा रेस्टॉरंट' मध्यें जाऊन एका कोंपऱ्यांत बसलों. 'एक आनावाला केक्स, दो रॉसबेरी बरफ' पोऱ्याला आणण्यास सांगून मी 'तो' विषय कसा काढावा याचा मनांतल्या मनांत विचार करूं लागलों. मी नांदगांवहून आल्यापासून मला त्याच्याशीं एकांतांत बोलायला अजून-पर्यंत मिळालेंच नव्हतें. नियोजित प्रश्नाची चर्चा करण्यास मला ही संधी बरी वाटली.

"प्रभा, यावेळीं फर्स्ट क्लासमध्यें यायचा विचार आहे?" पोऱ्यानें आणून ठेवलेल्या 'डिश'मधून एक केकचा तुकडा उचलीत मी हंसत हंसत प्रभाकरला विचारलें.

"पाहूं काय होतं तें. अभ्यास जारीनें करतों आहे." प्रभाकरानें उघड उघड खोटें बोलण्याचा हिय्य केला हें मला कळावयाला उशीर लागला नाहीं.

"किती वेळ अभ्यास होतो दिवसांतून?"

"सरासरी ९–१० तास तरी होतोच होतो."

"मग महेश्वराबरोबर भटकायला वेळ कधीं सांपडतो?"

माझ्या प्रश्नानें तो एकदम दचकला आणि केकचा तोंडाकडे नेत असलेला हातांतला तुकडा तसाच राहून तो म्हणाला,

"अं?"

"महेश्वराबरोबर गांव भटकायला कधीं वेळ सांपडतो?" मी पुन्हां विचारलें.

तो कांहीं न बोलतां केकचा तुकडा 'डीश'मध्यें ठेऊन त्यानें पोऱ्यानें आणलेलें रॉसबिरीचें ग्लास तोंडाला लावलें. ती वेळ मला गमाऊन उपयोगी नव्हती.

"प्रभा, तूं माझ्यापेक्षां वयानें वडील आहेस, तुला मी तुझ्या परिस्थितीची जाणीव करून द्यावयाची म्हणजे कांहींसें विचित्रच आहे. महेश्वर किती mean nature चा (क्षुद्र मनोवृत्तीचा) मनुष्य आहे तुला ठाऊक नाहीं ? तुझ्यासारख्यानें त्याच्याशीं मैत्री ठेवणें हें तुला स्वतःलाच कितीसें बरें दिसतें ? विचार कर. बारा पंधरा दिवसांपूर्वी तूं कसा होतास आणि आज कसा आहेस ? तूं असा सरळ वाट सोडून आडमार्गाला जाऊं लागलास तर अण्णानां काय वाटेल ? तुझी आई काय म्हणेल ? अण्णापाठून सर्वांनां आधारासाठीं तुझ्याकडेच पहावं लागणार ना ? मग अशा स्थितींत तूं दिवस घालवूं लागलास तर पुढें होणार कसं ? प्रभाकर, सर्वांनां तुझ्याबद्दल निराश करून अखेरपर्यंत त्यांना तूं रडवणारच का ? तुझी परीक्षा आतां अगदीं जवळ आली आहे. आजपर्यंत अण्णानीं इतका पैसा खर्च केला त्याची भरपाई होण्याची ही वेळ आहे. त्यानीं तुझ्यासाठीं किती झीज सोसली त्याचा नुसता मनांत विचार आण; आणि तुझी सध्यांची वागणूक त्याच्याबरोबर ताडून पाहून तूं करतोस तें बरं कीं वाईट याची तुझी तूंच शहानिशा कर."

मी बोलत असतांना आणि बोलून झाल्यावरहि प्रभाकर टेबलावर ठेवलेल्या डाव्या हातावर हनुवटी ठेऊन एकाग्रतेनें एके ठिकाणीं पहात होता. त्याच्या मनांत काय चाललें आहे हें मला कळणें शक्यच नव्हतें. पण त्याच्या चेहऱ्यावर नीट बारकाईनें निरखून पहातांच अनुकुल परिणाम होत असावा असा मला संशय आल्याशिवाय राहिला नाहीं.

मी कांहीं वेळ गप्प राहिलों आणि एकदम आठवण होऊन प्रभाकरला विचारलें,

"प्रभाकर, मी एक गोष्ट तुला विचारूं का ?"

प्रभाकरानें आपली दृष्टि फिरवून माझ्याकडे प्रश्नसूचक दृष्टीनें पाहिलें.

"महेश्वरानें एवढ्या अल्पावधींत तुझ्यावर कुठल्या साधनानें पगडा बसवला ?"

पुन्हां तो कांहींच उत्तर देईना हें पाहून माझ्या मनांतला संशय फेडून टाकण्यासाठीं मी म्हटलें,

"प्रभाकर, तुझा स्वभाव आहे भोळा. या जगांत तुझ्यासारखेच सगळे भोळे असतील असं समजूं नकोस. महेश्वरासारखे कांहीं अट्टल भामटे या जगांत वावरत आहेत हें लक्षांत ठेव. मोहक भाषणानें तुला ते केव्हां कशीं पाडतील हें सुद्धां तुला कळणार नाहीं. असल्या अट्टलांची ओळख प्रथम पटवावी लागते. नंतर पटवून कांहींच उपयोग होत नसतो. मी पोक्तपणाचा आव आणून तुला उपदेश करतो आहे असं समजूं नको. प्रभा, मला महेश्वराचा स्वभाव चांगला पूर्वीपासून ठाऊक आहे. म्हणूनच मी तुला cautionदेऊन ठेवतों आहे. त्याच्या संगतींत कोणाचंच कधीं बरं झालं नाहीं आणि तुझंही बरं होणार नाहीं हेंहि मी आतांच सांगतों. त्याचा पाजी स्वभाव माझ्या पुरा ओळखीचा आहे. प्रत्यक्ष तुमच्या घरीं त्यानें पाजीपणा केला याची तुला बातमी आहे ?"

"महाराष्ट्राचें ऋण."

लोकोत्तर गणल्या गेलेल्या व्यक्तिचें असामान्यत्व विशिष्ट स्वरूपांत जगाच्या प्रत्ययास आल्यामुळेंच जगाला त्या अलौकिक वाटतात. रणांगणावरच्या निधड्या वीराच्या, भूतलावरील शापभ्रष्ट स्वर्गीय गंधर्वाच्या आणि शारदा मंदिरांतील वैभवशाली वाग्भटांच्या सुयशाची डंकानौबत तिन्ही लोकांत झडतानां त्यांत स्वरसाम्य आढळून आलें तरी प्रत्येक आघातांतून त्यांच्या विशिष्ट अलौकिकतेचा ध्वनि निघत असतो. कर्तबगार शिवराय, नाटय-गानसम्राट केशवराव-जोगळेकर यांच्या दिगंत यशाचें रणशिंग फुंकतानां, कृतज्ञ महाराष्ट्र कै. गडकऱ्यासारख्या यशवंत वाग्वीराचें गाजतगर्जत स्वागत करण्यास अणूरेणूंत उल्हसित झाला पाहिजे. कारण, कै. गडकरी वाङमयाच्या राज्यांतील मानमरातबीचे एक शूरवीर उमराव होते हें सत्य सर्वमान्य व सर्ववश्रुत आहे.

सामान्य मनुष्यापेक्षां वरचढ बुद्धिमत्ता आणि अलौकिक कल्पकता यानीं त्यानां असाधारण यशाबरोबर असामान्य व्यक्तित्व आणलें आहे ही गोष्ट नाकबूल करतां येणें शक्य नाहीं. प्रत्येक प्रसिद्ध व्यक्ति असामान्य असतेच असा धरबंद नसल्यामुळेंच कै. गडकऱ्यांचें हें दुहेरी दुर्मिळ यश त्यानां दुबळया मानवकोटींतून किंचित् वरच्या पायरीवर बसविण्याचा मोह गुणज्ञ महाराष्ट्रभाषाभिमान्यांच्या मनांत उत्पन्न करतें. त्यांच्या अलौकिकतेबद्दल विचार करतानां उंचावलेल्या कल्पनाकाशांत, सामान्य वस्तुस्थितीला सोडून, बुद्धिमत्तेनें दिपलेल्या मनाला इतर चांदण्यांच्या प्रभावळींत कै. गडकरी हा एक स्वयंप्रकाशित दिव्य तारा दिसतो. या सतेज ताऱ्याच्या तेजस्वी दिमाखानें दिपलेला महाराष्ट्र त्याच स्वयंतेजाचें स्मृतिचिन्ह दृश्य स्वरूपांत या मृत्युलोकांत ठेवण्यास माघार घेणार नाहीं. कारण **"महाराष्ट्र गुणग्राहक आहे."** महाराष्ट्राला कै. गडकऱ्यांची वाङ्मयविषयक अलोट कामगिरी ठाऊक आहे. महाराष्ट्राच्या उदयासाठीं झडगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा महाराष्ट्र ऋणी असला पाहिजे. पाश्चात्त्य वाग्वीरांचा वडेजाव आणि त्यांची दाही दिशानीं दरवळणारी कीर्ति पाहिली म्हणजे त्या बाबतींत महाराष्ट्राचें कोतेपण अजमावतां येतें. स्वदेशबांधवांच्या अनुपम यशाबद्दल निर्विकल्प मनानें गौरव करणें हें, साधकबाधक विचार केला तर, देशोन्नतीचे एक महत्वाचें कारण आहे असें म्हणतां येईल.

कविश्रेष्ठ गडकरी यांची निस्सीम सेवा स्मरून, त्यांचें चिरकाल स्मारक करून ऋण फेडणें हेंच आजकालच्या वृद्ध-तरुण महाराष्ट्रभाषाभिमान्यांचें कर्तव्यकर्म आहे.

मेंदुचे विकार व डोकें दुखणें यावर.

किं. १-२-०,] **ब्राम्ही तेल** [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा:—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.

बाळंत काढा:—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.

बाळकडू:—उपजल्यापासून देण्यास योग्य किं. ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा; रसायणें वगैरे औषधें तयार आहेत. एक आणा आला असतां रुग्ण पत्रिका, लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचना:—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांचा खप वाढल्यामुळें नक्कल सुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळीं या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयौषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.

दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने

शर्टची वटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोत्याची रु. ५ आंगठी रु. १; सल्ले जोडी रु. १॥; बांगडया जोडी रु. २॥; घडाळयाचा छेडा रु. ३;


केंस काळे करण्याचा साबण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्याच्या बॉक्सला रु. १॥.

इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुडयासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. अमृतवाडी, गिरगांव, मुंबई



किंमत ३ आणे.

संपादक—मो. ग. रांगणेकर

अरुण कार्यालय,
२ री भटवाडी, मुंबई ४.

वा. व. ट. ख.
२। रुपये.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं
जगाविख्यात "निवडक औषधें."

नं. १ **फिवरॉल**–सर्व जातींच्या साध्या-दोषी–विषारी-मुदती–सांथीच्या तापांवर अप्रतिम. किं. रु. १॥-

नं. ५ **मलेरिन**–अखिल हिंदुस्थानांतील पहिलेंच सर्वश्रेष्ठ–अत्यंत सोईस्कर ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. १।-

नं. ६ **मलेरिन नं २**–अल्पमोली पण खात्रीपूर्वक अत्यंत गुणी ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. ।।।-

नं. १४ **हिस्टेरिन**–स्त्रियांच्या हिस्टेरिया–उन्माद–गुल्मादिकांवर सर्वोत्कृष्ट. किं. रु. ३

नं. १५ **थॅमिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट–हट्टी–प्राणघातक दम्यावरअमोलिक. किं. रु. ३

नं. १९ **जर्मिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट हट्टी-हाडींमासीं खिळलेल्या उपदंश गर्मीवर. किं. रु. ३

नं. २० **सँटोल**–प्रमेह--परम्यावर; लघवीची आग–तिडिक–जळजळ ५।६ तासांत बंद ! किं. रु. ३॥

नं. ३९ **एलिक्झीर शिलाजित कंपाउंड**–सर्व प्रकारच्या मूत्रदोषादि विकारांवर. किं. रु. ३

नं. ४२ **रास्ना कॉर्डियल**–अर्धांगवायू-पक्षाघात,कटिशूल, संधि– आमवातादिकांवर. किं. रु. ३

नं. ४८ **मस्तकशूळावर रामबाण वडया**-असह्य मस्तकशूळ-अर्धशिशी ५ मिनिटांत बंद ! किं रु. ।।।-

नं. ४९ **वीर्योटोन गुटिका**–सर्वांग सुंदर धातुपौष्टिक; रक्त-मांस-मेदू-बलवर्धक. किं. रु. २॥-

नं. ५० **चैतन्योटोन गुटिका**–यॉहिंबिनयुक्त; मर्दाईवर जगप्रसिद्ध निर्वाणीचा उपाय. किं. रु. ६

नं. ५१ **चैतन्योटोन तेल**–मर्दाईवर तात्कालिक व चिरकालिक बाह्योपचार किं. रु. ५

नं. ५४ **एलिक्झोर ऍन्टी कन्व्हलशन**–लहान मुलांच्या आंकडीवर प्रतिज्ञेचें औषध. किं. रु. २

नं ७८ **वेदिक पेन बाम**–वातहारक, दुःखशामक, सूजनाशक, झटपट– चिरकालिक गुण. किं. रु. -।।।-

मोठा सचित्र क्याटलाग व नविन वर्षाचें सर्वांगसुंदर क्यालेंडर १ आण्याचें तिकिट पाठविल्यास मोफत पाठवूं.

कुळकर्णी ऍण्ड सन्स, मुंबई नं.२.

अद्भुत! अद्वितीय! चमत्कारिक!

कविविनोद वैद्यभूषण पं० ठाकुरदत्त शर्मा वैद्य यांनीं बनविलेली.

Registered] # अमृतधारा [रजिस्टर्ड]

अमृतधाराची जितकी प्रशंसा वास्तवीकपणें होत आहे, तेवढी जर लिहावयास बसलों तर मोठे ग्रंथ भरून जातील. परंतु संक्षिप्त रूपानें पाहणें असल्यास "अमृत" नांवाचें मराठी पुस्तक फुकट मागवून वाचून पाहणें. खरोखर आजपर्यंत एक सुद्धां औषधी अमृतधारेच्या जोडीची निघाली नाहीं. आश्चर्याची गोष्ट आहे व कांहीं लोक हें एकदम खरें ही मानीत नाहींत कीं, एकच औषधी सर्व रोगांवर चालते तरी कशी? शिवाय गूणहि तात्काळ वाटतो.

अमृतधारा ज्या ज्या रोगांवर चालते त्यांची नामावली.

प्रत्येक प्रकारचा ताप, अतिसार, संग्रहणी, रक्तातिसार, अजीर्ण, अरुचि, महामारी, हग, ओक, मूळव्याध, पांडु, कावीळ, खोकला, श्वास, क्षय, उचकी, वांती, रक्तसर्दि, ओकारी, मुर्च्छा, भ्रम, अपस्मार [फेंकरे] आम्लवात, शूळ, आनाह, उदररोग, गुल्म, शोथ, कंठमाळा, गलगंड, भगंदर, पर्मा, गर्मी, वातरोग, पित्तरोग, कफरोग, ओष्ट सुजणें, दांत दुखणें, दांतांस पाणी लागणें, दंतरोग, मुखपाक, हिरड्या सुजणें व दुखणें, कंठरोग, कर्णस्राव, कर्णकंड, नजळा, वेदना, नेत्ररोग, लहान मुलांचा ताप, खोकला, अतिसारादि रोग, सर्प, विंचू, मधमाशी, मुंगी, इत्यादिकांचे विषारी दंश, अफू, सोमल इत्यादिचें विष-प्लेग, पार्श्वशुक, न्यूमोनिया, शंका लासूर, गजकर्ण, नायटे, इसब, खाज, पुळ्या, सांधे गुढगे, पोट-या किंवा मांड्या, दांत दुखणें इ०

गृहस्थहो विचार तर करा!

असें औषध प्रत्येक मनुष्याच्या खिशांत प्रत्येक ऋतूंत घरांत देश परदेश सर्वत्र सर्व काल असलें पाहिजे नको का? कोणास माहीत आहे कीं कधीं काय होतें? अशा प्रसंगाच्या वेळीं जें काम हें औषध देतें त्याच्या मानानें याची किंमत कांहींच नाहीं.

" अमृतधारे " ची प्रशंसा जितकी आह्मी करतों त्याच्यापेक्षां कितीतरी पटीनें 'अमृतधारा' घेणारे करतात. आमच्या जवळ २१ हजार सर्टिफिकीटें आहेत. आपणसुद्धां एकदां मागवून अनुभव घेऊन प्रशंसकांच्या मंडळीत सामील होणें. किं. रु. २८८;

नमुन्याच्या लहान बाटलीचे आठ आणे; अर्ध्या बाटलीचा १। रु. पत्रव्यवहार बालबोध मध्यें करणें, मोडीत करूं नये.

मॅनेजर—अमृतधारा औषधालय, अमृतधारा भुवन, अमृतधारा रोड, अमृतधारा डाकखाना, लाहोर. पत्र किंवा तार पाठविणें असल्यास फक्त एवढा पत्ता पुरे आहे—

" अमृतधारा ९७ लाहोर " [३४६]

एजंट—गुलाम हुसैन वल्ली महमद देवजी पीर भाई मिंसन परिन्सीस स्ट्रीट मुम्बई २

अनुक्रमणिका

१ **मातृहीन अर्भकास** (कविता) श्री. 'केदार' ... १

२ **त्रस्त समंध** (सं. गोष्ट) श्री. चं. वि. वावडेकर ... २

३ **तडफ, तारुण्य**—श्री. 'सीताकांत' १३

४ **जगाची दृष्टि**—'विनोदलाल' १८

५ **मुलांची मौज** २०

६ **वाघ्या** (आदर्श) श्री. प्र. ग. गुप्ते २७

७ **मुलींचा संसार**—सौ. यमुनाबाई मिरजकर ... ३०

८ **सौंदर्य**—श्री. मो. ग. रांगणेकर ३२

९ **क्षणभंगुर**—(चालू कादंबरी) ४९

१० **पोंच व अभिप्राय** ४२

अहो ! बेपत्ता झा--ले !

नाहीं हो ! पत्ता बदलला

लिंग्रस ब्रदर्स,

गोवर्धनदास बिल्डिंग, पोर्च्युगीज चर्च, गिरगांव—मुंबई

या ठिकाणीं गेले.

यशोमहाद्वाराची गुरुकिल्ली हस्तगत करून घेणें असल्यास

योगविद्याभूषण, डॉ. सुरतकर, एम. टी. डी. यांच्या

दिव्य लेखणींतून उतरलेलें

आत्मद्योतनोपचार शिक्षक.

ह्या पौर्वात्य व पाश्चात्य अनेक ग्रंथाधारानें लिहिलेल्या पुस्तकाचा अभ्यास करा ! म्हणजे तुमच्या ऐच्छिक वस्तु तुम्हाला सहज प्राप्त होतील. अनेक दुर्धर रोग तुमचे तुम्हास नष्ट करतां येतील ! दुर्गुणांचा नाश करून पैसा व सद्गुणांची प्राप्ति करून घेतां येईल. तुमचे शत्रुदेखील मित्र होतील ! प्रयत्न करा ! यशस्वी व्हा ! किंमत १॥ व व्ही. पी. १॥।=

प्रो. ज्ञानमित्र, शनवार. पुणें सिटी.



"भिकारि कैसा ?"

अरुण माला.

वर्ष २.] फेब्रुवारी १९२६ [अंक ६.

मातृहीन अर्भकास

या टोंकाहुनि विश्व जें पसरलें, कोठें, किती लांबलें
विश्वाच्या पलिआड काय दडलें, बुद्धी जडा बावरे
मातेच्या हृद्-दर्पणीं निरखितां दृष्टीस ये तें तदां
दुर्दैवी छकुल्या ! कधीं लिखित हें भालीं सटीं भाग्य का ?॥

विद्वन्वर्य, धनीश याचिति प्रभू स्वसौख्य जें अक्षय
निर्हेतूक फिरे निबीड विजनीं वेडा, अभागी नर
ईशाच्या चरणीं नमून बसतो संसारत्यागी मुनी
सर्वांच्या मनिंमानसीं वसत ती मातृ-हृदाची गिती.॥

स्त्रबालयीं रमतां, मुदें विहरतां निष्ठूर दुर्भाग्य जें
तारुण्यीं रततां नितांत मधुरा जाची हृदीं न्यून जें
वार्धक्यींहि सुशांत कष्टित मना आशाळ दुःखी स्मृती
त्रैलोक्यीं न तुला--अमोल अवनीं ना अन्य मातेहुनी. ॥

÷ ÷ ÷

कोठेंहो बघ आस ती डंवरली नेत्रीं पुनर्दर्शना—
मातेच्या; शिशुतेंत हाय ! वठली ती वेल आल्हाददा. ॥

केदार.

त्रस्त समंध.

ले. श्री. चं. वि. बावडेकर

"विश्राम, अरे, पाहुण्यांच्या गाडया सगळ्या येऊन पोहोंचल्या ना? कोण गेला होता बघायला? — नाहीं तर तूंच जा आणि बघ त्यांना काय हवं नको तें. तीं माणसं आहेत अनोळखी, तेव्हां त्यांची सर्व व्यवस्था आम्हांलाच ठेवायला पाहिजे. का, खरं कीं नाहीं, जोशीबुवा?" जोशीबुवांकडे वळून शंकरअण्णांनीं विचारलें.

"खरं आहे अण्णा तुमचं म्हणणं. अहो, अशा बाबतींत आपल्या मानापानाच्या गोष्टी घटकाभर विसरून जाऊन पाहुण्यांची व्यवस्था लावणं भाग आहे आपल्याला. शिवाय हीं शहराचीं माणसं खेडयांत आलीं म्हणजे नवखेपणानं अगदीं बावरल्या बावरल्यासारखं करतात. त्यांना खेडं म्हणजे काय मोठी मजाच वाटते. आणि अण्णा, हें कांहीं मनुष्यस्वभावाला सोडून आहे असं नाहीं. आम्हांला नाहीं का शहरांत गेलं म्हणजे प्रथम चमत्कारिक होत? तशीच त्यांची गोष्ट आहे. ज्या परिस्थितींत माणसं नेहमीं वावरत असतात तिचा त्यांना नेहमींच्या सान्निध्यामुळें कंटाळा येतो. बरं, पण व्याही आज आले आणि आतां घनश्याम केव्हां येणार आहे?"

"घनश्यामचं कार्ड आलं मला; त्यांत दोन चार दिवसांत हजर होतोंच इथं असा मजकूर होता. पण कायरे विश्राम," विश्रामकडे वळून शंकरअण्णा म्हणाले, "भांडीं आणि लांकडं घेऊन सावित्रीला आणि सखूला पाठवलं आहेस ना खास बागेंत? नाहींतर मंडळी यायची आणि तिष्टत बसायची. चहा बिहा करतील म्हणा तयार. स्टोव्ह आणि बाकीचं सामान गेलं आहे पुढेंच. तूं आतां जातांना दूध घेऊन जा इथून आणि तिथं गेल्यावर पाहुण्यांच्या बरोबर लहान लहान मुलं असलीं तर त्यांना एका गाडींत घाल आणि इकडे घेऊन ये. पोरं काय रहाणार आहेत म्हणा तळमळत! त्यांनीं जरी नको म्हटलं तरी तूं ऐकूं नकोस. सगळ्यांना दे इथं पिटाळून." असें म्हणून त्यांनीं पुनः जोशीबुवांकडे पाहून म्हटलें, "ऐकलंत जोशीबुवा, आपण संध्याकाळीं उन्हं खालीं गेलीं म्हणजे आज जाऊं तिकडे. तुमची त्यांचीही ओळख आहेच म्हणा!"

"ओळख? हो, ओळख आहे तर!" किंचित् हंसून जोशीबुवांनीं म्हटलें. "घनश्यामाबरोबर मी एकदां गेलों होतों त्यांच्याकडे. त्यावेळीं त्यांनीं मला कांहीं दिवस आपल्याकडे राहाण्याचा आग्रहही केला होता. पण कामें फार निकडीचीं होतीं

म्हणून मला यावं लागलं इकडे त्यांचा आग्रह मोडून. चहा गरम ठेवण्याची ती गळ्यांत अडकवण्याची वाटली त्यांनींच घेऊन दिली ना मला ? आज जरूर जाऊं आपण. पण काय हो अण्णा, इतक्या लौकर कां बोलावलंत या मंडळीला तुम्हीं इकडे ? माघाला अझून चांगला महिना आहे. आणि हा चालला आहे तो नाताळ नाहीं का ? बाकी खर्चाची कुरकूर त्यांच्या तुमच्या सारख्यांच्या मागं नसायची.

" अहो, मी कुठं इतक्यांतच बोलावलं होतं त्यांना ? त्यांचंच पत्र आलं कीं सध्यां आपण कांहीं महिन्यांची रजा घेतली आहे; तेव्हां ह्या रजेंत कुठं तरी हवाशीर गावीं जाऊन राहाण्याचा आपला विचार आहे. घनश्यामनं त्यांना आमच्या गांवाचं नांव सुचविल्यामुळ इथंच मोठंसं घर मिळालं तर घेऊन ठेवा असं त्यांनीं कळवलं. बरंच झालं आले ते. आतां त्यांनाही हवापालट केल्यासारखं झालं. आम्हांलाही चार दिवस नव्या सूनबाईला घरीं आणून ठेवायला मिळून तिलाहि आमच्या मंडळीची ओळख करून दिल्यासारखं होईल. आतां घनश्याम आला कीं मग लागलं पाहिजे पुढच्या तयारीला. "

" पत्रिका बित्रिका तुम्हीं मुंबईच्या ज्योतिष्यांना दाखवल्या; पण मलाही एकदां दाखवा हं ! हीं नवीं ज्योतिष्याचीं खुळं आपणाला पसंत नाहींत. त्यांतल्या सुधारलेल्या पद्धतीनं सगळा गोंधळ उडून जातो. आणि आम्हांला इंग्रजी कळत नाहीं म्हणा—पण इंग्रजी ज्योतिष म्हणून कुणी ऐकलं होतं आजपर्यंत? अहो, त्या लोकांचीं हीं नुसती थेरं आहेत. आमच्या हिंदु लोकांत ज्योतिषशास्त्र आहे म्हणून आपलंही यांनीं ज्योतिषशास्त्र काढलं. पण आहे काय त्यांत कपाळ ? दुर्बिण लावली कीं फार तर ढग आणि तारे जवळ दिसतील आकाशांतले; पण दुर्बिणींतून नवीन ग्रह कसले शोधून काढलेत आणि त्यांचं ज्योतिष काय बनवलं? जें जें आपलं ऐकावं तें तें एक, एक नवलच ! रवी, चंद्र, शनी, मंगळ हे प्रबळ ग्रह सबळ असतांना यांचे युरेनीस, हर्ष वांकडे येऊन काय करणार ? —"

" जोशीबुवा, तुम्हांला पत्रिका जरूर दाखवूं. पण हें नवं ज्योतिष तुम्हांला माहित नाहीं. मला त्याचे ठोकताळे चांगले पटले आहेत. "

" हें पहा अण्णा, ज्योतिषशास्त्राचें म्हणजे असं आहे कीं, मनानं जी गोष्ट एकदां विश्वासपूर्वक खरी मानावी ती ग्रहांच्या बळापेक्षां मनाच्या बळानं अधिक लवकर घडून येते किंवा ती घडून येणार हें जसं कांहीं आपण नक्कीच ठरवून टाकलं असल्यामुळे आपल्या हातून नकळत किंवा उघड उघड ती घडून यायला मदत होते. तुमचा इंग्रजी विद्येवर अंमळ अधिक विश्वास आहे म्हणून तुम्हांला तसं वाटत असेल.झालं.बाकी त्यांत तथ्यांश असेल यथातथाच."

"तें कांहीं असो, पण मी आपला अनुभव सांगितला माझा—"

" अहो, पण आमच्याजवळ काय कमी अनुभव आहेत ?" शंकरअण्णांना थांबवून जोशीबुवा म्हणाले. " तसे अनुभव सांगायला गेले तर कादंबरीच व्हायची. तुम्हांला माहीत आहेच कीं, मागें आंब्यांचं झाड तोडतांना तो कदमाचा पोर झाडावरून पडला. तसं कांहीं म्हणण्यासारख लागलं नव्हतं त्याला. लेप लावणाऱ्यानं सुद्धां म्हटलं कीं चार दोन दिवसांत हाड सांधवून गेलं कीं पुनः झाडं तोडायला तयार होईल म्हणून. पण आमचा आपला विश्वास बसला नाहीं त्या बोलण्यावर. त्याचीपत्रिका दाखवायला आणली त्याच्या आईनं, तेव्हां तिला पिशाच्चबाध वगैरे आहे कीं नाहीं हें सांगतांना अंमळ ग्रहांवरून नजर फिरविली. तो काय सांगू अण्णा, तुम्हांला ? सगळे ग्रह असे उलटून पडले होते त्यावेळीं त्याच्यावर! मनांतच भाकीत केलं कीं हा आहे मृत्युयोग ! पोर कांहीं उठणं शक्य नाहीं त्या दुखण्यांतून. पण तें सांगावं कसं त्याच्या आईला ? आहे आईचं अन्तःकरण तें. काय करील आणि काय नाहीं याची कल्पना नाहीं शेवटीं उगीच कांहींतरी उतार सांगून दिली लावून तिला आणि त्याच वेळीं दोघा-चौघांना सांगून ठेवलं कीं पोराची कांहीं घडगत नाहीं म्हणून . अन् तसं झालंच कीं नाहीं शेवटीं ! अहो कणकीच्या कोंबासारखा दांडगा पोर. पण चार दिवसांत उडून गेला...

"पण नव्या ज्योतिषशास्त्राप्रमाणेंही त्याला मृत्यु आला असता तर ?"

"छे, छे, असं होणं शक्यच नाहीं. आमच्या उलटच तीं भविष्यं असतात असं मुळीं चालतच आलं आहे ना? आम्हीं पाऊस पडणार म्हणून सांगितलं कीं अवर्षण म्हणून तीं ज्योतीषं बोंबलायला लागतात. दुष्काळ म्हटला कीं सुबत्ता होणार असं बडबडूं लागतात आणि पाण्याची हाकाटी पडणार असं म्हणतांच पूर येणार म्हणून शंखध्वनी करायला चुकत नाहींत. आणि होतं मात्र आमच्या म्हणण्याप्रमाणं ! कारण पूर येणार असं त्यांनीं वर्तवलं असलं भविष्य; तरी पूर येण्यापूर्वी पहिले कांहीं दिवस असे तडफडून काढावे लागतात कीं त्याचं सव्याज उट्टं पुरांत वाहून जाऊन निघत..."

"मग त्या ज्योतिषाप्रमाणं घनश्यामाची आणि सुशिलेची जमलेली पत्रिका तुमच्या ज्योतिषानं तुम्हीं उलथीपालथी करून टाकणार आहांत कीं काय ?" शंकर-अण्णांनीं हंसत हंसत विचारलें.

' छे, तसं नाहीं म्हणत मी. त्यांचे नवे ग्रह कसलेहि असले तरी आमचे जुने ग्रह यांनी घेतलेलेच आहेत; तेव्हां त्यांनीं पत्रिका जुळवल्या तर त्या कांहीं आम्हांला मोडता येणार नाहींत. प्रश्न फक्त नव्या ग्रहांच्या बलिष्टपणाच्याच वेळीं उभा राहतो आणि त्या वेळीं मात्र आमची खडाजंगी उडते."

"मग थांबा हं; आपण आतांच थोडासा अनुभव घेऊं! मी येतो फडताळांतून त्या पत्रिकाच घेऊन." असें म्हणून शंकरअण्णा आंत निघून गेले. जोशीबुवांच्या चेहेऱ्यावर

समाधान दिसूं लागलें. थोडया वेळानें अण्णा बाहेर आले आणि हातांतल्या पत्रिका सतरंजीवर टाकून ते म्हणाले, " ह्या घ्या पत्रिका जोशीबुवा, आणि आकाशांतल्या नक्षत्रांचं आणि ह्या नक्षत्रासारख्या मुलांमुलींचं पटतंय् का बघा. " जोशीबुवांनीं अण्णांचाच चष्मा त्यांच्या जवळून घेतला आणि बराच वेळ ते त्या पत्रिकांकडे पाहात राहिले. शेवटीं पत्रिका पाहून झाल्यावर त्यांनीं त्या खालीं ठेवल्या आणि अंगाला आळोखेपिळोखे आणि जांभइ देत ते म्हणाले, " सगळं ठीक आहे अण्णा; पण-पण एकच गोष्ट वाईट आहे. वधु किंवा वर यांपैकीं कुणाला-कुणाला तरी अपमृत्यु-तशाचसारखं जवळ जवळ कांहीं तरी संकट आहे—"

" अपमृत्यु ? चूक झालीय् जोशीबुवा तुमची. " अण्णा मोठयानें म्हणाले, " अहो, एवढं कांहीं तरी चमत्कारिक असलं असतं तर बाकिच्यांनीं नसतं मला सांगितलं ? "

" असा मतभेद पुष्कळदां होतो. " जोशीबुवा शांतपणानें म्हणाले. " पण मला जें दिसलं तें मी सांगितलं. कदाचित् चुकेलही-नव्हे चुकावं अशी माझी इच्छा आहे. "

" हें काय ? " समोर रस्त्याकडे पाहून शंकरअण्णा म्हणाले, " ही एकच गाडी येतेय् ! आणि हांकतोय् कोण? कृष्णा वाटतं आपला? विश्रामानं पाठवून दिली वाटतं छोटी मंडळीकडे. थांबा हं मी घरांत वर्दी देऊन येतों. असें म्हणून शंकरअण्णा तेथून उठून आंत गेले. जोशीबुवांनीही आपली चंची कमरेला लावली आणि कोंपऱ्यांतला सोटा उचलून घेऊन ते आंत गेले. शंकरअण्णांना भेटून, " बरं अण्णा, मी जातों अतां. अजून बरींच कामं उरकायचीं आहेत. उशीर झाला. " असें म्हणून अण्णांचा निरोप घेऊन ते तेथून निघून गेले.

२] शंकरअण्णांची

व्याही मंडळी त्यांच्या गांवीं येऊन पंधरावीस दिवस होऊन गेले. त्या अवधींत घनःश्याम आणि त्याच्याबरोबर विनायकरावांचा शामराव हाहि येऊन पोंचला. दुपारीं जेवल्यानंतर पत्ते खेळावे आणि संध्याकाळीं फिरावयास जावें याशिवाय त्यांना दुसरा उद्योग नव्हता. घनश्यामाच्या लग्नाचा मुहूर्तहि नक्की होऊन हळुहळे मंडप घालण्याच्या कामाला सुरवात झाली. शंकरअण्णांचे ते दिवस अतिशय घाईचे जात होते. त्यांना दोन्हीं पक्षांच्या व्यवस्थेकडे लक्ष द्यावयाचें असल्यामुळें व आधींच त्यांचा स्वभाव बराच धांदल्या असल्यामुळें त्यांना फुरसत अशी केव्हांच मिळत नसे. विनायकरावांच्या घरून आपल्या घरीं व तेथून विनायकरावांकडे अशा निदान तीन चार फेऱ्या तरी त्यांच्या रोज होत असत. सुशिलेला पाहायला म्हणून आणून शंकरअण्णांच्या कुटुंबा तिला आपल्याकडेच ठेऊन घेतली होती.

"झाल्या यादा, आतां सुटलों एकदांचा या दगदगींतून." अण्णा बाहेरून आंत येत म्हणाले, त्यांनीं डोकीचा रुमाल काढून खुंटीला लावला आणि कोटही तेथेंच अडकवून ते आंत गेले. त्यांच्याबरोबरच बाहेरून आंत आलेले घनश्याम आणि शामराव हे ओटीवरून तडक माडीवर गेले. अण्णांनीं एकदां मागच्या बाजूला फेरी टाकली आणि ते देवघरांत आले. शंकरअण्णांचा चुलत चुलत पुतण्या देवाची पुजा करीत होता. त्याच्याकडे पाहून कांहींसें आठवल्यासारखें करून अण्णा म्हणाले. "ऐकलंस रघुनाथ, दुपारीं जेवल्यावर कामकऱ्यांच्या घरीं जाऊन त्यांना बोलावलं आहे मी म्हणून सांग; म्हणजे आज संध्याकाळपर्यंत सगळं अंगण खणून होईल. मग उद्यां पाणी शिंपडलं कीं परवाचा दिवस सुकायला आणि मग पुढचे दोन दिवस थोपटून सपाट करायला लागतील. वास्तविक एव्हांना हें काम झालं पाहिजे होतं; पण मला फावलं नाहीं तिकडे लक्ष द्यायला..... पण पण हें काय? हें काय?— रघुनाथ!—" अण्णा बोलायचे थांबले. ते घाबरल्यासारख्या चेहेऱ्यानें रघुनाथाकडे पाहूं लागले. रघुनाथ देव्हाऱ्यासमोर एकदम आडवा पडला होता. त्याचे डोळे तांबडेलाल व तारवटल्यासारखे झाले होते. देव्हाऱ्यांतल्या मूर्तीकडेच पडल्यापडल्या त्याने नजर लावली होती. 'हुं हुं' असा आवाज करीत तो मोठमोठ्यानें सुस्कारे टाकीत होता आणि बरोबरच हात पाय झाडीत होता. रघुनाथाचें तें स्वरुप भयंकर व रुद्र दिसत होतें.

"कृष्णा, विश्रामा, अरे कोण आहे तिकडे? जा, पळा लवकर आणि जोशीबुवांना घेऊन या जा कोणी तरी. त्यांना म्हणावं अण्णा आत्तां बोलावतो आहे. जा जा,पळा, जय देवी अंबे, कांहीं चूक झाली असेल तर ती पदरांत घे माउली, आणि काय अपराध झाला असेल तो बोलव तोंडांतून. अरे, नारळ•आणा लवकर पोरानों कुणी तरी ..." अण्णा ओरडत होते.

अण्णांच्या गडबडीनें आणि आरडाओरडीनें घरांतली सर्व मंडळी देवघरांत जमलीं होती. घनश्याम, शामराव अण्णांच्या जवळ उभे राहिले होते. दरवाज्यांत हात जोडून उभ्या राहिलेल्या पार्वतीबाईंच्या मागें सुशिलाही येऊन आंतल्या प्रकाराकडे डोकावीत होती. तिला त्या प्रकरणाचा उलगडा होईना. खेडेगांवांतल्या घरांत दिवसासुद्धां येणाऱ्या सर्प, फुरशीं असल्या सरपटणाऱ्या प्राण्यानीं तर पुजा करतांना रघुनाथाला दंश केला नसेल ना असें तिला वाटलें. पण सर्प चावला असतां वैद्य किंवा डॉक्टरला बोलवण्याऐवजी जोशीबुवाला अण्णा कां बोलावत आहेत व पार्वतीबाई हात जोडून कां उभ्या राहिल्या आहेत याची कल्पना प्रथम तिला झाली नाहीं.

"काय चूक झाली असेल बाई कुणाला ठाऊक! नाहीं तर इतके दिवस मुळींच वारादेखील नसतां आजच कसा अंगावर यावा कांहीं समजत नाहीं."

रघुनाथाची आई पार्वतीबाईंच्या कानाशीं पुटपुटली. अंगावर येणें म्हणजे खेडयांतल्या भुताटकीचा कांहीं तरी प्रकार असावा असें आतां सुशिलेला वाटलें. भयभीत मुद्रेनें पण उत्सुक अंत:करणानें ती रघुनाथाकडे डोकावून पाहूं लागली. रघुनाथाचें जोरजोरानें "हां हां हुं हुं." करणें व हातपाय झाडणें सुरूच होतें. सोंवळा मुगटा नेसलेली त्याची काळी शरीरयष्टी त्याच्या भयंकरपणाला अधिक खुलवित होती.

थोडया वेळानें जोशीबुवाहि घाईघाईनें येऊन पोहोंचले.देवघरांत जाऊन त्यांनीं अण्णाच्या हातांतला नारळ आपल्या हातीं घेतला आणि अतिशय गंभीर मुद्रा करून रघुनाथाच्या हातीं देत ते म्हणाले, " देवा, महाराजा, आज तुझं एकाएकीं येणं झालं. अशीच बाळकांवर कृपादृष्टी ठेवीत जा महाराजा ! तुझी कांहीं आगळीक झाली असेल आमच्या हातून तर महाराजा, चुकी बोलून दाखवा आम्हांला आणि ती पोटांत घालून आतांपर्यंत करित आलास तशीच अखंड कृपा करीत जा साहेबा, या घराण्यावर. तुझा तूं जास्त आहेसच. "

नारळ हातांत घट्ट धरून रघुनाथ अधिक जोरानें हातपाय झाडूं लागला आणि त्याच्या 'हां हां हुं हुं' चा स्वरहि अधिक वाढूं लागला. तो बोलत नाहींसें पाहून पुनः जोशीबुवा म्हणाले,

" देवा, कुळस्वामी, ही बघ सगळी मंडळी गुला शरण आली आहे. त्यांच्यावर कृपा कर भगवंता. " असें म्हणून जोशीबुवानीं रघुनाथापुढें साष्टांग नमस्कार घातला आणि शंकर अण्णांसह इतरांनींही त्यांचेंच अनुकरण केलें.

रघुनाथ एकदम उठला आणि पाठावर बसला. देवाच्यापुढें जमिनीवर नारळ आपटून श्वास टाकीत टाकीत तो मोठ्यानें म्हणाला,

" हें काय मांडलं आहे ? "

" काय ? काय झालं महाराजा ! काय चूक झाली असेल ती बोलून दाखव आणि क्षमा मागून घे साहेबा. " जोशीबुवा हात जोडून म्हणाले.

" घराचा धनी कुठं गेला ? " समंधानें प्रश्न केला.

" तूंच, तूंच धनी आहेस महाराजा या घराण्याचा ! आम्हीं बाळकं काय बोलणार तुझ्यासमोर..." जोशीबुवांनीं उत्तर दिलें.

" घराच्या मालकाला हजर...कर– "

जोशीबुवांनीं शंकरअण्णांच्या हाताला धरलें आणि त्यांनीं रघुनाथापुढें पुनः नमस्कार घातला. अण्णांच्या डोक्यावर समंधानें हात फिरविला आणि तारवटलेले डोळे त्यांच्याकडे लावून तो म्हणाला, " घराचा सत्यानास होणार...सत्यानास...कुळक्षय..."

" देवा, महाराजा, साहेबा, कुलस्वामी, काय बोलतेस हें ?" जोशीबुवांनीं मध्येंच विचारलें. शंकरअण्णा थिजल्यासारखे होऊन तटस्थ झाले.

" सत्यानास होणार ! एक रोपा नाहीं वाढायला देणार कुळांतला ! सगळं नाश पावणार–"

" महाराजा,शांत हो. काय दिसलं तुला तें सांग महाराजा. चूक सुधारून घेऊं. तुझ्याकडे कुटुंबाचं दुर्लक्ष झालं नाहीं..."

"बाहेरची माणसं कशाला आली ?" समंधानें 'हां हां हु हूं' करीत प्रश्न केला.

"बाहेरचीं कोणी नाहींत माणसं साहेबा, आहेत तीं तुझी लेकरं आहेत. त्यांच्यावर कृपादृष्टी ठेव म्हणजे झालं. "

" मला फसवतोस ? झाडाला काय हुकूम झाला होता मी येण्यापूर्वी ? "

" काय सांगितलें होतें तुम्हीं अण्णा रघुनाथाला ?" जोशीबुवांनीं अण्णांना विचारलें.

" कांहीं नाहीं.–हं, होय. अंगण खणण्यासाठीं कामकऱ्यांना बोलवायला त्याला म्हणत होतों तों–"

"लग्नाच्या खटपटीची तयारी होती महाराजा." जोशीबुवांनीं अण्णाचें उत्तर ऐकून समंधास म्हटलें.–

" हं हं लग्न...सत्यानास...तुम्हांला कुणी सांगितली ही पंचाईत ? "

"दया कर महाराजा ! हें काम तडीला ने. तूंच लेकरावर कोपलास तर कसं होणार त्याचं ?"

" हें लग्न...मी–घडूं देणार नाहीं. सत्यानास करीन, कुळक्षय करीन...कपाळावर कुऱ्हाड घालीन...जा स्वस्थ बसा..."

" देवा, देवा, महाराजा, भगवाना..."जोशीबुवा म्हणत होते. तोंच रघुनाथ एकदम धाडकन् खालीं पडून हात पाय झाडूं लागला. त्याचें हां हां हुं हूं कमी कमी होत गेलें, आणि थोडया वेळानें डोळे मिटून तो निपचित जमिनीवर पडला. जोशीबुवा आणि शंकर अण्णा त्याला वारा घालूं लागले. एकंदर झालेल्या प्रकारानें सर्वच जण स्तंभित झाल्यासारखे झाले. सुशिलेला हुंदका आल्यासारखा दिसला म्हणून तिला घेऊन पार्वतीबाई तेथून दुसरीकडे निघून गेल्या.

"अनिष्ट ग्रहांचं भविष्य प्रत्यक्ष मूळपुरुषानंच सांगितला. च् च् च् लग्न मोडलं! तर किती चमत्कारिक स्थिती होईल सर्वांची ?"जोशीबुवा अण्णाच्या कानांत पुटपुटले.

३] "यांत

मला एक अक्षरहि खरं वाटत नाहीं. ही ढोंगं आहेत असं माझं स्पष्ट मत आहे. तुला काय वाटतं ?". शामराव म्हणाला. रघुनाथाच्या अंगावरच्या समंधाची हकीगत धनयामाकडून शामरावाला कळली होती आणि त्या दिवशीं संध्याकाळी फिरावयाला जात

असतां त्या दोघांच्या या गोष्टीवर गप्पा चालल्या होत्या. शामरावाचा प्रश्न ऐकून घनश्याम म्हणाला,

" मला या प्रश्नावर ठराविक असं कांहींच उत्तर देतां येत नाहीं. खरं आणि खोटं, विश्वास आणि अविश्वास या दोन विरुद्ध गोष्टींत माझं मत मध्येंच लोंबकळत आहे. या देवपणाच्या वगैरे भानगडी लहानपणापासून मला माहित असल्यामुळें त्यावर माझा बराचसा विश्वास आहे आणि याच देवपणामध्यें जीं भांडणं लागलेलीं असतात त्यामुळें थोडा अविश्वासही उत्पन्न झाला तर तें अनैसर्गिक नाहीं. भूत–सृष्टीवर तरी तुझा विश्वास आहे कीं नाहीं ? "

" नाहीं, साफ नाहीं, भुतांचं अस्तित्वच मी मान्य करीत नाहीं."

"आमच्याकडचं एक असो; पण युरोपांत तरी जो स्पिरिच्युॲलिझमचा प्रश्न उत्पन्न झाला आहे आणि मोठमोठे शास्त्रज्ञ त्याचा कसून व्यासंग करीत आहेत त्यांत देखील कांहीं तथ्य नाहीं असंच तुला वाटतं आहे की काय ? "

"नाहीं–हो, पण क्षणभर भूतसृष्टीचं अस्तित्व मान्य करून चाललं तरीहि तिथें सुद्धां मीडियम्सच्या लबाडया कांहीं कमी उजेडांत येत नाहींत. युरोपांतले मीडियम्स आणि आपल्यांतलीं झाडं–दोन्हीहि सारखंच "

" पण आमचे लोक धर्मभोळे असल्यामुळें साहजिक त्यांच्या हातून लबाडया घडण्याचा संभव कमीच. "

" धर्मभोळेपणा इथून तिथून सगळीकडे सारखाच असतो. युरोप काय कमी धर्मभोळं आहे ? बरं, पण आतां तूं समंधाच्याच इच्छेप्रमाणं वागणार आहेस ? "

" नाहीं, या बाबतींत माझं मी नक्की करून ठेवलं आहे. समंधाच्या कोपाची मी पर्वा करणार नाहीं. "

" वाः ! वीर आहेस; खरा धर्मवीर आहेस. " थट्टेनें हंसून शामराव घनश्यामाच्या पाठीवर थाप मारीत म्हणाला. इतक्यांत एक कुणबी इसम तिथें आला. घनश्यामाबरोबर थोडेसें औपचारिक बोलून तो रामराम करून निघून गेला.

" आतां हेंच पहा. " शामरावकडे वळून घनश्याम म्हणाला. "आतां हा जो माणूस गेला, त्याचं नांव सखाराम पाटील. चेहेऱ्या मोहोऱ्यावरून माणूस गरीब आणि बावळट दिसतो. पण याच्याच अंगावर गांवचा देव उभा राहिल्यावर त्याच्यासमोर जाण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. एवढा भयंकर हा दिसूं लागतो. "

" अस्सं. या माणसावर देव उभा राहातो ? काय रे, या देवांना एखाद्या घरगुती प्रकरणांत हात घालतां येतो ? "

" हो, त्याला कांहीं हरकत नाहीं. बोलून चालून गांवचाच देव तो ! "

शामराव विचार करूं लागला. घनश्यामहि त्याच्याबरोबर चालूं लागला. वाटेंत या विषयावर त्यांनीं अधिक चर्चा केली नाहीं.

४]　　**समंधानें**

दिलेल्या धमकीमुळें अण्णा तर अगदीं घाबरूनच गेले होते. सर्वांनाच आतां काय करावें याचा प्रश्न पडला होता. आलेल्या संकटांतून मार्ग कसा काढावयाचा हें कोणालाच सुचेनासें झालें. ठरलेलें लग्न मोडणें कुणालाहि मान्य नव्हतें आणि तें शक्य दिसत नव्हतें. पण ... समंधाची धमकी एवढी विलक्षण होती कीं, देवभोळ्या अण्णांनीं मनांत त्याची अतिशयच भीति धरली होती. समंधाच्या प्रकरणानें सर्वांनांच वाईट वाटलें होतें. आपल्या अंगावर समंध उभा न राहता तर बरें झालें असतें असें रघुनाथानें बोलून दाखविलें. पण तें त्याच्या हातीं थोडेंच होतें. जोशीबुवांनीं आणि अण्णांनीं विचार करून पुनः एकदां समंध बोलावून त्याची प्रार्थना करून त्याच्याकडून परवानगी घ्यावयाचा निश्चय केला आणि गुरुवारीं समंधाला बोलावण्याचें ठरलें.

रघुनाथ आदल्या दिवशीं व्रतस्थ राहिला आणि त्या दिवशीं पूर्वीप्रमाणें अंघोळ करून समंध अंगावर आणण्याच्या तयारीनें देवाकडे पाहात बसला. अशा तऱ्हेनें समंध आणतां येत असतो. कुळाच्या समंधानें लग्नांत मोडता घातला म्हणून आज समंध काय सांगतो तें ऐकण्याला व त्याची समजूत पाडण्याला गांवचे चार चौघे मानकरी व आणखी कांहीं मंडळी अण्णांच्या ओटीवर येऊन बसली.

बराच वेळ जोशीबुवा वगैरेनीं प्रार्थना केल्यावर एकाएकीं रघुनाथ हातपाय झाडूं लागला व त्याच्या अंगावर आलेल्या समंधानें नारळासाठीं हात पुढें केला. नारळ हातांत दिल्यावर जोशीबुवा म्हणाले,

" देवा, महाराजा, गांवचे मानकरी आज तुझ्या दारांत येऊन तुझ्या हुकमाची फिरवणी मागताहेत...लेंकरांवर कृपा कर साहेबा. "

" अजून मंडळी गेली नाहीं ? माझ्या हद्दींतून सुरक्षित जायची वेळ माझ्या हुकमानं मी आणून दिली होती, आतां जिवाला अपाय..."

" असा संतापू नकोस साहेबा ! महापुरुषा, लग्नांतले ग्रह, पत्रिका सगळं बरोबर जमलं आहे. तुझ्या परवानगीचीच गरज आहे. " जोशीबुवांनीं हात जोडून म्हटलें.

" लग्न ? अरे, प्रेताचं लग्न कसलं लावतोस ? मुडदा होईल...झाडाच्या बहिणीबरोबर लग्न लावा..."

" स्-स्-स्-स्-झूट, झूट !" सर्व जण एकदम चपापल्यासारखे झाले. अण्णा, जोशीबुवा आणि गांवकर मंडळी सखारामाकडे पाहूं लागली. गांवच्या देवपणांत सखारामावर

गांवाचा देव उभा रहात असे. यावेळीं एकाएकीं तो हातांत कांहीं नसतां आपोआप उभा राहिला. चमत्कारिक हातवारे करीत, नाकपुड्या फुगवीत आणि डोळे तांबडेलाल करीत तो सुस्कारे सोडीत होता.

"काय रे, काय स् स् खोटीं देवपणं क...करायला पाहिजे ?" आपल्या कुणबाऊ भाषेंत सखारामाच्या अंगावरच्या देवानें विचारलें. जोशीबुवासह सर्व गांवकर मंडळींनीं व इतर माणसानीं देवाला नमस्कार केले.

" काय रे, माझ्या हद्दींत अशले फसवणुकीचे खेळ ? माझ्या...समंध कुठं आहे बोल, त्याला कर माझ्यापुढं बोलता. तूं काय समजलास ? माझ्या हद्दींत कशले चाळे मांडलेस ? कसलीं लग्नं मोडतोस ? स् स् स् स्..."

पण देवाच्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजीं रघुनाथ देव्हाऱ्यासमोर धाडकन् पडला आणि हातपाय झाडूं लागला. देवाच्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजीं त्याच्या अंगावरचा समंध जाऊं लागला. थोड्या वेळानें रघुनाथ निपचित पडला.

"खुशाल लग्न करा." देव बोलूं लागला, "समंधाच्या नांवावर फसवणाऱ्याला सात दिवसांत देवपण दाखवतों.देवापुढें कबूल करायला लावतों.स् स् स्..." सखाराम देव्हाऱ्यासमोर बसला. नारळ उचलून घेऊन त्यानें तो अण्णांच्या हातांत दिला आणि सर्वांकडून नमस्कार करून घेतल्यावर त्याच्या अंगावरचा देव निघून गेला.

रात्रीं सपाटून ताप भरला. चार दिवस झाले तरी त्याचा ताप हटण्याचें चिन्ह दिसेना. तापामध्यें तो एकसारखा बडबडत होता. पांचव्या दिवशीं त्याचा ताप थोडासा उतरला. शंकरअण्णा त्याच्याजवळच बसले होते. अण्णाकडे पाहून हलक्या व क्षीण स्वरांत रघुनाथानें हांक मारली. " अण्णा ! "

" काय ? आतां कसं वाटतंय् तुला ? " अण्णांनीं विचारलें.

" मला कसलं आतां बरं वाटणार ?" रघुनाथ घाबरलेल्या आवाजांत म्हणाला. " पण अण्णा, मी स्वतः होऊन नाहीं ढोंग केलं. समंध आणायला मला जोशीबुवानीं सांगितलं.—"

" कोणी ? जोशीबुवांनीं ?" अण्णांनीं आश्चर्याच्या भरांत विचारलें.

" होय; जोशीबुवांनीच. अण्णा, मावशीच्या सखूचं लग्न आप्पाबरोबर व्हावं अशी तिची इच्छा होती. आणि मीहि तिला तसं आश्वासन दिलं होतं. जोशीबुवाबरोबर सहज बोलतांना त्यांनीं मला ही समंधाची कल्पना सांगितली—"

"तरीच, तरीच !" अण्णा मध्येंच म्हणाले. "तरीच मला त्यांनीं हें लग्न मोडणार असं भविष्य सांगितलं. ठीक ठीक. पण जोशीबुवाला यांत फायदा कसला ?"

"समंधानं झाडाच्या बहिणीबरोबर लग्न करण्याचा हुकूम करावा आणि हें लग्न झालं म्हणजे शंभर रुपये जोशीबुवांना द्यावे असं त्यांनीं कबूल करून घेतलं होतं."

"पण हे शंभर रुपये तरी तूं कुठून देणार होतास ?"

"मी देणार नव्हतों. मावशीकडून हुंडा न घेतां हें लग्न झालं असतं आणि नंतर मावशीकडूनच एखादा दागिना मोडून मी जोशीबुवांनां पैसे देणार होतों."

"अस्सं. रघुनाथ, किती उलटया काळजाचा माणूस आहेस तूं !"

"अण्णा, मला आतां क्षमा करा. मी सर्वांचाच अपराध केला आहे. आतां देवाच्या म्हणण्याप्रमाणें——"

"चल वेडया, आतां तसं कांहीं सुद्धां मनांत आणूं नकोस. लौकरच बरा होशील. वाटलं तर देवाची माफी मागून त्याचं तीर्थ आणूं. तूं कबूल केलंस हेंच देवाला पावलं—"

"पण देव उभा राहून मला तीर्थ देईल ?"

"आजच करून पाहूं उभा. आतां तूं झोंप मुकाटयानं." असें म्हणून अण्णा तेथून निघून गेले.

रघुनाथाच्या 'समंधा'ची परीक्षा पाहण्यासाठीं सखारामाकडून शामरावानें खोटाच 'देव' उभा केला होता.त्याच्या अटकळीप्रमाणं समंध खोटा ठरतांच अण्णांना त्यानें आपली युक्ति सांगितली आणि देवही खोटा होता हें दाखवून दिलें. सखाराम मात्र खोटा देव उभा करण्यास प्रथम कबूल झाला नाहीं; पण खोटया समंधाच्या ढोंगामुळें आलेली आपत्ति टाळण्यासाठीं आपण म्हणतों त्याप्रमाणें घडणें किती जरूर आहे हें दाखवून दिल्यावर सखाराम कबूल झाला. रघुनाथाच्या समजुतीसाठीं अण्णांनीं तीर्थ आणून देतांच थोडयाच दिवसांनीं रघुनाथ खडखडीत बरा झाला. जोशीबुवा मात्र नंतर अण्णांकडे फिरकले नाहींत.

तडफ, तारुण्य

(ले. श्री सीता–कान्त, सं. नवजीवन माला, मुंबई नं. ४)

केवढी मोठी महत्त्वाकांक्षा !

कुंभकर्ण कांहीं रडया, दुबळा आणि भेकड नव्हता. त्याची महत्त्वाकांक्षा दांडगी होती; त्याची कर्तबगारी जबर होती; त्याची हिंमत कडवी होती. आणि म्हणूनच त्यानें आपल्या तीव्र तपश्चर्येच्या बळावर परमेश्वराला प्रसन्न केलें. त्याला परमेश्वराजवळ इंद्रपद मागावयाचें होतें. तो मनुष्यांचा शास्ता होऊन तेवढयांत संतुष्ट राहण्यास तयार नव्हता. त्याला ह्या जगाचें साम्राज्य अपुरें वाटत होतें. त्याला देवांचा शास्ता होण्याची महत्त्वाकांक्षा होती. भूलोकावर साम्राज्य गाजविण्याऐवजीं स्वर्गावर साम्राज्य गाजविण्याची हिंमत त्यानें धरली होती.

कुंभकर्णाच्या कर्तबगारीमुळें परमेश्वर खूष झाला आणि त्याला 'वर माग' म्हणून म्हणाला आणि कुंभकर्णानें वर मागितला. पण इंद्रपद मागण्याऐवजीं त्यानें निद्रापद मागितलें. आणि त्यानें जें मागितलें तें परमेश्वराने त्याला देऊन टाकलें.

पण सारा खटाटोप मातीमोल !

कुंभकर्ण असा मोठा महत्वाकांक्ष, इतका मोठा कर्तबगार, असा हिंमतबहादर पण तो आतां ताणून झोंपा काढूं लागला आणि त्याच्या बरोबर त्याची महत्वाकांक्षा, त्याची कर्तबगारी, त्याची हिंमत हीं सारीं झोंपी गेलीं. साधें मानवांचें राज्य त्याला मिळण्याची पंचाईत झाली; मग देवांचें साम्राज्य मिळणार कोठून ? पृथ्वीवर राज्य चालविण्याचा योग येणें त्याला अशक्य झालें त्याला स्वर्गाचें राज्य चालविण्याची संधी स्वप्नांत तरी मिळणें शक्य आहे का ?

आपणापैकीं बरेचसे लोक

ह्या कुंभकर्णाचे भाऊ

शोभतील असेच असतात. ते वर्षांतून सहा महिनें झोंपतात व एकदां उठून स्नानभोजन उरकून पुन्हां सहा महिने झोंपी जातात असा कांहीं त्याचा अर्थ नव्हें ! त्याचा अर्थ इतकाच कीं आपल्यापैकी किती तरी लोकांचा वेळ झोंपेत आणि झोंपेची सल्खी धाकटी बहिण गुंगी, सल्खा भाऊ जाडय हीं खाऊन टाकतात.

आपण आधीं बहुधा झोंपतोंच फार; फार झोंपलों नाहीं तरी अंथरुणांत गुंगींत अर्धवट जागृतींत लोळण्यांतच किती तरी वेळ घालवितो. येवढयावरच भागतें तरी पुरवतें. पण

आपली कुंभकर्णी झोंप येवढ्यावर भारीच सुटणार ? भरपूर झोंप, त्याला शोभेशी व पुरवणीवजा गुंगी इतक्यावरच आपला हा कुंभकर्णी ग्रंथ आटोपत नाहीं. त्यांत आणखी

थकवा, कंटाळा आणि जाडय

ह्या त्रिविध करंटेपणाची भर पडते.

" छे बुवा, आतां मीं अगदीं थकून गेलों आहे" असें म्हणून आपण सकाळचें काम खुशाल संध्याकाळसाठीं राखून ठेवतों.

" आतांच काय घाई आहे ? पहातां येईल सावकाश" असें म्हणून आम्हीं आजचें काम बेमुर्वतपणें उद्यांवर ढकलतों.

" अलीकडे अंगांत कामाचा हुरुप नाहींसा झालेला आहे. तसें कांहीं होत नाहीं म्हणा ! पण अंगांत जाडय आलें आहे. काम तडफेनें होत नाहीं" असें म्हणून आपण नवनवी मोठमोठीं जबाबदारीची कामें अंगावर घ्यायला भितों.

आपले वैदिक पूर्वज महातेजस्वी होते. ते म्हणत –" ह्या आपल्या भूमींत मीं अधिक श्रेष्ठ, अधिक बलवान असा होऊन रहात आहे. तसाच मी विजयी, समर्थ व प्रत्येक दिशेमध्यें सामर्थ्य गाजविणारा आहे."

ही आत्मश्रद्धा, ही महत्वाकांक्षा, ही प्रार्थना किती तेजस्वी आहे ? आणि आमची स्वतःची महत्वाकांक्षा कांहीं लंगडी असते किंवा दुबळी असते असें नाहीं.

आमच्यांत हिंमत असते, आकांक्षा असते, कर्तबगारी असते. पण ह्या साऱ्या गोष्टी,

आमच्या साऱ्या शक्ति, बेफाम अफीमबाजांप्रमाणें गुंगींत

असतात; त्या कुंभकर्णी झोंपा घेत असतात. योग्य प्रकारच्या व योग्य प्रमाणांतील शारीरिक श्रमांच्या आणि शारिरीक व्यायामांच्या अभावीं आपलें सारें शरीर हें अनिष्टव विषारी द्रव्यानीं खचून भरलेलें असतें. उद्योग व हालचाल ह्यांवाचून स्नायूंना मजबुदी येत नाहीं; योग्य मेहनतीवांचून रुधिराभिसरण नीट राहत नाहीं आणि जोमदार रुधिराभिसरणाच्या अभावीं शरीरांतील आम्लद्रव्यें व झीज हीं सफाईनें बाहेर पडत नाहींत. अशा रीतीनें शरीरांत घाण सांचत गेली म्हणजे मज्जातंतु व मेंदू ह्यांचें कार्यहि सफाईनें होत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे साराच गोंधळ उडून जातो व ह्या गोंधळांत थकवा, कंटाळा आणि जाडय ह्यांना फावतें. ह्या सगळ्यांचा अर्थ एकच आहे. तो हाच कीं –कार्यनाश !

ह्या गुंगीवरचें एक औषध

इच्छाशक्तीच्या बळावर अत्यंत थकलेला मनुष्य सुद्धां प्रसंगीं अचाट श्रम करूं शकतो; अगदीं कंटाळून गेलेला माणूस ताज्या दमाने सफाईनें काम करूं लागतो आणि अगदीं अंगांत जाडय येऊन 'असेंच' दिवसभर पडून रहावें म्हणून इच्छा करणारा मनुष्य

रात्रीचा दिवस करून कामाचे डोंगर उठवितो. सगळें खरें. पण असें क्वचितच होतें. फक्त आणिबाणीच्या प्रसंगीं होतें. सधन इच्छाशक्तीचा असा उपयोग करणार तरी किती?

शरीरशक्तीची जोड मिळाली तरच असला हा कुंभकर्णी करंटेपणा मनुष्य दूर करूं शकेल. शरीरशुद्धी हाच असल्या दुबळेपणावर,ऐदीपणावर,रडया स्वभावावर रामबाण उपाय आहे.कुंभकर्णाच्या राक्षसी आणि इंद्राच्या दैवी साम्राज्यांतून खालीं उतरून आपल्या मानवी साम्राज्यांतल्या व्यावहारिक शब्दांत स्पष्टच सांगावयाचें म्हणजे मनुष्यामधील रडवेपणा, दुबळेपणा आणि भेकडपणा घालवून मनुष्य असेल त्यापेक्षां अधिक महत्वाकांक्षी, अधिक कर्तबगार व अधिक हिंमतवान् व्हावयास

व्यायामासारखें दुसरें रामबाण औषधच नाहीं.

आपण असहाय्य होऊन अज्ञानानें आयुष्यांतील किती तरी वेळ ऐदीपणांत किंवा अर्धवट प्रयत्नांत घालवीत असतों. बळकट मनाला शरीरशुद्धीमुळें उत्पन्न होणाऱ्या तरतरीची जोड मिळेल तर पूर्वीच्याच वेळांत पूर्वीच्या किती तरी पटीनीं जास्त व सफाईदार कार्य आपणास करून घेतां येईल.

भिडेनें किंवा आवडीनें, स्वतःसाठीं नाहीं तर माझ्यासाठीं, पण 'अरुणा'च्या तरूण वाचकांनीं कोणता तरी व्यायाम सतत तीन महिनें तरी करून पहावा. आणि मग आपल्या मनःस्थितीची पूर्व स्थितीशीं तुलना करून पहावी.

अशा रितीनें अंगांत तरतरी देऊन शरीर शुद्धीला उपयोगीं पडणारे कांहीं व्यायाम पुढें दिले आहेत. हे व्यायाम फार दांडगट नाहीत. ते बेतानें घ्यावेत. आणि झोंपेंतूनन उठल्याबरोबर गुंगींत राहाण्याचा मोह धरूं नये. उठणें झाल्याबरोबर हे व्यायाम घ्यावेत म्हणजे अंगांत सणसणीतपणा येऊन उल्हासाने कामास लागतां येईल.

केव्हांहि अंग जाड व ताठर होईल, निष्कारण गुंगी येत असेल,कंटाळा किंवा आळस आला असेल अशा वेळीं केव्हांहि हें व्यायाम घ्यावेत. म्हणजे अंगात तरतरी आल्यावांचून राहाणार नाहीं.

व्यायाम नं. १—सरळ उताणें पडून दोन्ही हात दोन बाजूस सरळ ठेवावेत. नंतर दोन्ही पाय ढोपरांत न वाकवितांच आस्ते आस्ते वर सरळ व ताठ उभे करावेत व नंतर पुन्हां आस्ते आस्ते सरळ व ताठ ठेऊन खालीं आणावेत.

(ब) मग पाय वरती नेल्यावर तसेच डावीकडे व उजवीकडे ह्याप्रमाणे कांहीं वेळ झुकवावेत.

व्यायाम नं. २— वरीलप्रमाणें सरळ उताणें निजून व पाय जमिनीवर स्थिर ठेऊन शरीर आस्ते आस्ते वर उठवावें आणि ताठ बसून मग पुढें आस्ते आस्ते वांकवीत हात पायांच्या बोटांत अडकवावेत. (चित्र नं. १

व्यायाम नं. ३—पाय पुढें सरळ ठेऊन बसल्या जागींच डाव्या हातानें उजव्या पायाचा अंगठा धरावा व उजवा हात सरळ ताठ ठेऊन व तळहात पाठीमागें करून शक्य

तितका हात मागें मागें खेंचावा; म्हणजे शरीराला व हाताला चांगलाच पीळ बसेल. ह्यावेळीं मूठ आवळून ती शक्य तितकी मनगटाकडे पिळून मनगटाच्या मागच्या बाजूला खांद्यांवर ताण द्यावा. आणि हाताबरोबरच मानहि मागें वळवून दृष्टी दंडाच्या स्नायूवर धरावी. ह्या योगानें मानेच्या स्नायूसहि ताण बसेल. (चित्र नं २)

(ब) बाजू बदलून हाच व्यायाम द्यावा.

व्यायाम नं. ४—गुडघे टेंकून व पाय घोटयाजवळ मुरगळून पायांच्या खोटावर नितंब भाग टेकून बसावें. ह्या बैठकीनें पायाचे चवडे आणि सांध्यातील पुढचे स्नायू यांस साधारण ताण बसेल. नंतर बैठक तशीच कायम ठेऊन हळुहळु मागें पडून पाठीचा अगदीं वरचा भाग व डोकें जमिनीवर टेकावें.

पायाच्या खोटा बरोबर सरळ व उभ्याच नितंब भागाखालीं टेकून अशा रीतीनें पडतांच पायाच्या घोटयांत फारच कळा लागतात. ह्या कळा असह्य वाटल्या तर किंवा असह्य होतांच पाय एकमेकांपासून जरा रुंद करून खोटा V अक्षराप्रमाणें बाहेर सरकवाव्यात.म्हणजे घोटयांतील प्रथम पडणाऱ्या स्नायूंवरील ताण दुसऱ्या स्नायूंवर जाईल व फार कळा लागणार नाहींत. (चित्र नं ३)

व्यायाम नं.५—एका कुशीवर सरळ झोंपावें. नंतर कंबर जमिनीवर स्थिर ठेऊन खालून दोन्हीं पाय व वरून सबंध मान व धड हीं वर उचलूं लागावें. ह्याच वेळीं वरील हातहि वर ताठ उचलून तळहात फिरवून सबंध हाताला पीळ द्यावा व दृष्टी दंडाच्या स्नायूवर स्थिर करावी. (चित्र नं ४)


(ब) हाच व्यायाम दुसऱ्या कुशीवर पडून द्यावा.

व्यायाम नं. ६—सरळ उताणें पडून व्यायाम नं. १ प्रमाणें दोन्ही पाय आस्ते आस्ते वर आणावेत, पण तेथेंच न थांबतां हळु हळु पलीकडे नेऊन पायांची बोटें मागील बाजूस टेकण्याचा प्रयत्न करावा. (चित्र नं. ५)


व्यायाम नं. ७—जमिनीवर पाय लांब व ताठ ठेऊन बसावें आणि दोन हातानीं पायांचीं बोटें धरून मस्तक गुडघ्यास लावावें. (चित्र नं ६)

प्रत्येक हालचाल थोडा थकवा येईतोंपर्यंत करावी व मग पुढील हालचाल करूं लागावें. प्रत्येक हालचालींत कोणत्या स्नायूंवर ताण बसतो तिकडे लक्ष ठेवावें. आणि हालचालींत थोडासा फरक झाला तर लगेच निराळ्या स्नायूंस कसा व किती ताण पडतो हें लक्षांत द्यावें, म्हणजे नवे नवे व्यायाम सुचूं लागतात.

ह्या व्यायामानें शरीराच्या बहुतेक सर्व अवयवांस बेताचा ताण पडून अंगांतील ताठरपणा कमी होईल व अंगांत स्फुरणसणीतपणा येईल. सतत महिनाभर हे व्यायाम घेत गेल्यास अंगांतील जाडय बरेंच कमी झालें आहे असा अनुभव आल्यावांचून राहाणार नाहीं.




चित्र नं. १




चित्र नं.२




चित्र नं. ३



चित्र नं. ४



चित्र नं. ५



चित्र नं. ६

फोटोग्राफर:--श्री. एस्. जे. जसीवाले, खेतवाडी, मुंबई.

जगाची दृष्टी.

ले. श्री. विनोदलाल.

उद्देश:—श्रीमंत व गरीब यांमध्यें समसमान असणाऱ्या गोष्टीकडे व्यवहारी माणूस निरनिराळ्या दृष्टींनीं पाहूं लागतो. श्रीमंतांच्या बाबतींत ज्या गोष्टी त्यांचें भूषण म्हणून दाखविल्या जातात त्याच गरिबांच्या बाबतींत जगाच्या दृष्टीनें कलंकित ठरतात.

नंबर १]

"—म्हणजे? म्हणतां काय तुम्हीं? आपला तर बुवा अजून विश्वास नाहीं बसत! एकंदरींत माणूस फार चांगला अं—खरंच फार चांगला नि गोड. असा कसा हो गेला एकाएकीं? बाकी क्षय लागलेलीं माणसं तीं!—केव्हां राम म्हणतील नि केव्हां नाहीं याचा भरंवसा नाहीं—रोगच बेटा हट्टी; त्याला डॉक्टर जरी टोंचून भरला तरी मागं हटायचा नाहीं कांहीं कमी उपचार केले नसतील, पण काय करणार? 'होणारें न चुके म्हणतात' त्याला बाध येईल ना! कपाळावरच्या रेषा त्या! जशा कांहीं मनुष्याला त्याच्या भवितव्यतेकडे नेणाऱ्या वाटाच! लाख मरावे, पण लाखाचा धनी मरूं नये म्हणतात तस्सं तंतोतंत वाटायला लागतं आतां. हळहळणारा काय तो एक मुलगा आणि बायको. इस्टेट, रोकड बिकड बरीच माया आहे, पण त्याचं काय? तरी पण एवढं खरं कीं मरून कुणाचं नुकसान मात्र केलं नाहीं हं! माणूस बिचारा अगदीं साधाभोळा. आपलं काम बरं नि आपण बरा! कुणाच्या अध्यांत नाहीं मध्यांत नाहीं. पोषाख तरी किती साधा! आत्तांच जसं कांहीं डोळ्यासमोर स्वरूप उभं रहातं. वृत्तीसुद्धां निगर्वि, पण एवढं असून सुद्धां माणूस हिशेबी हं! कुणालाही दानधर्म करायचा असला तर योग्यायोग्यतेचा विचार करून—बाकी तसा कांहीं दानधर्म झाला नाहीं म्हणा! नाहीं म्हणायला वॉर टाईमच्या वेळीं सरकारचीं जीं कांहीं कॅश सर्टिफिकेटस घेतलीं असतील तेवढींच! घरीं एवढा पैसा कुजत होता, पण पेढीवर जायला एखादी मोटर बिटर ठेवली असेल—? नांव नको. सकाळीं जेवल्यावर बरोबर दहा वाजतां बाहेर पडायचं तें दहा पस्तीसला पेढीच्या दारांत हजर! अगदीं मंडलिकी टाईम! ज्यानीं पैसे स्वतःच्या श्रमावर कमावलेयत त्यानांच त्यांची किंमत कळायची आणि साहाजिकच खर्च करतांना हात आंखडायचा! लोकांचं काय घेऊन बसतां एवढं! मी सांगतों तुम्हांला; जगांत स्तुतिपाठकांच्या बरोबरच निंदकांचाही सुकाळ असतो आणि तशांत ह्यांचा पैसा डोळ्यांत भरल्यामुळें सहजच त्यांच्या पोटांत दुखूं लागून नाहीं नाहीं ते दुगुर्ण ते अंगावर लादूं लागतात. त्यांत मोठंसं नवल नाहीं. ही जगाची दृष्टी अशीच आहे."

नंबर २]

"—मरायचा हें तर अगदीं ठरल्यासारखंच होतं. नवीन असं कांहींच सांगितलं नाहींत तुम्हीं; फक्त दिवस काय तो कळायचा होता. मेल्यावर कुणाला निंदूं नये म्हणून मात्र, नाहीं तर–! पण जाऊं द्या; गेला तो सुटला दगदगींतून आणि जंजाळांतून !–माझा आणि त्याचा द्वेष ? नाहीं बुवा, तसा कांहीं प्रकार नाहीं. द्वेष किंवा मत्सर असायला मला काय कारण ? अहो, उभ्या आयुष्यांत बोलणं भाषण सुद्धां नाहीं. असतं तें, असं कांहीं कारण नसतांना सुद्धां कुणाबद्दलही प्रथम चटकन् वाईट मत होत असतं–! तुमच्या 'लव्ह ॲट फर्स्ट साईट' सारखंच हें !वाटलं तर 'प्रेजुडिस ॲट फर्स्ट साईट' म्हणा !–क्षय लागला होता नाहीं कायसासा ? क्षय लागेल नाहीं तर काय होईल ? सर्व दिवसभर सकाळपासून संध्याकाळपर्यंत मरमर काम करायचं ! जशी कांहीं जगाच्याच पोषणाची गोणी येऊन पडलीय् मानेवर !– बरं, माणूस तरी तसा चार चौघांमध्यें मिळून मिसळून वागणारा म्हणावा, तर कधीं कुणांत उठणं नको, कुणांत बसणं नको. 'सोशल' कसं असावं हें तर महात्म्याच्या गांवींही नाहीं. अगदीं एकलकोंडयासारखी वागणूक ! स्वभाव म्हणावा तर पराकाष्ठेचा चिक्कट! कधीं कुणाला पै उचलून दिलेली आठवत नाहीं. आयुष्यभर पैशांचाच हव्यास ! दहा सव्वा दहा वाजतां कसेबसे चार घास कोंबून वणवण करीत नेमक्या वेळीं कामावर जाऊन पडायचं !–ट्रॅमसाठीं कधीं पै खर्च केलेली आठवत नाहीं. ती पेटंट छत्री खांकेंत घेऊन चाललेला आपला नेहमीं रस्त्यांत पाहावा ! ––औषध उपचार केले असं तुम्हीं म्हणतां म्हणूनच त्यावर विश्वास ठेवायचा ! औषधपाण्यांत पैसे जातात याबद्दल त्याला किती वाईट वाटलं असेल, सांगतां येत नाहीं. क्षयाचं दुखणं काय, पैसे खर्चच करायचं ठरवलं तर बरं होत नाहीं ? अहो,रोग आहे त्याला इलाजही आहेच आहे !–बायको आणि मुलगा कायशीशी आहेत म्हणतात नाहीं ? विमा उतरला असेल तर मिळतील पैसे; नाहींतर टांचा घांसून सोडतील प्राण.–नातेवाईक म्हणतां? नातेवाईकांवर नका हं राहूं विसंबून आणि त्यांत मला नाहीं वाटत नातेवाईकांना खुद्द यांनीं आपल्या आयुष्यांत विचारलं असेलसं!––लोक कसले गातात चांगुलपणाचे पोवाडे ! अहो चांगलं म्हणायला कुणाच्या पदरचं काय जातं आहे ? लोक हे असेच हट्टी नि चमत्कारीक असतात. कोणी कुणाचं खरं स्वरूप दाखवलं तर तावडतोब ते उलट जाऊन उलट बोलूं लागतील. ही जगाची दृष्टी अशीच असते–!"

—•—

मुलांची मौज.

तीन पानें.

(वि. रा. सुखटणकर.)

एकदां एका गांवांत एक गरीब मनुष्य राहात असे. तो आपल्या एकुलत्या एका मुलाचें पोट भरण्यास असमर्थ होता. एकदां त्याचा मुलगा म्हणाला,

" आपल्या मागें दुर्दैव लागलें आहे, आणि माझ्यासाठीं तुम्हांस श्रम करावे लागतात. म्हणून मी दुसरीकडे जातो व माझी पोट भरण्याची व्यवस्था मी करतो." नंतर बापानें त्याला आशिर्वाद देऊन दुःखानें निरोप दिला.

त्यावेळीं एका मोठ्या राजावर त्याच्या शत्रूंनीं हल्ला केला होता. त्या राजाकडे तो मुलगा चाकरीस राहिला व सैन्याबरोबर लढण्यास गेला. लढाईंत राजाचा पराभव थोड्याच वेळांत होईल असें सर्वांस वाटलें. राजाचे पुष्कळ लोक मेले व सेनापती मारला गेला व बाकीचे राहिलेले पळून जाऊं लागले; परंतु हा मुलगा सैनिकांच्या पुढें होऊन लढूं लागला. तेव्हां सर्व मदतीस आले व त्यांनीं शत्रूंच्या सैन्याचा पराभव केला.त्या मुलानें विजय मिळवून दिल्याबद्दल बक्षीस म्हणून त्याला आपला प्रधान नेमिलें.

त्या राजाला एक मुलगी होती. तिनें असा पण केला होता कीं,ती जर अगोदर मेली तर नवऱ्यानें सुद्धां तिच्याबरोबर स्वतःला पुरून घेतलें पाहिजे. असें जो कोण करील त्याच्याबरोबरच ती लग्न करील. तिचा निश्चय ऐकून सर्वजण घाबरून गेले. परंतु तो मुलगा राजकन्येच्या सौंदर्याला भुलला व लग्न करण्यास तयार झाला आणि त्यानें राजकन्येची मागणी घातली. राजानें त्याला लग्न न करण्याविषयीं सांगितलें. परंतु तो आपला हट्ट सोडीना. तेव्हां राजानें लग्न करण्यास संमती दिली आणि थोड्याच दिवसानीं लग्न झालें. तें जोडपे पुष्कळ वर्षेंपर्यंत आनदानें राहिलें. परंतु एके दिवशीं असें झालें कीं, त्या राजकन्येस अतिशय ताप आला. त्याचें कोणाही वैद्याला निवारण करतां आलें नाहीं व ती राजकन्या मेली. तेव्हां त्या मुलाला तिचें वचन आठवलें. त्याला आतां आपली सुटका करून घेतां येईना. कारण राजानें बाहेर पहारे करी ठेविले होते. जेव्हां राजकन्येला पुरण्याचा दिवस आला तेव्हां त्या मुलाला एका भुयारांत नेलें व राजकन्येचें प्रेत आंत सोडलें. नंतर चार दिवे, चार भाकऱ्या

व चार बाटल्या पाणी खालीं सोडलें. नंतर त्या मुलाला खालीं सोडण्यांत आलें. भुयाराचें दार बंद केलें. तो मुलगा दुःखानें खालीं बसला. तो प्रत्येक दिवशीं थोडी भाकर व थोडें पाणी पीत असे. प्रत्येक दिवशीं आपलें मरण जवळ येत आहे असें त्याला वाटे.

एके दिवशीं तो बसला असतां त्याला एक सर्प राजकन्येच्या प्रेताजवळ येतांना दिसला. तेव्हां त्यानें आपली तलवार उपसली व 'मी जिवंत असेपर्यंत दुसऱ्या कोणाचाही स्पर्श प्रेतास होऊं देणार नाहीं,' असें म्हणून त्यानें सापाचे चार तुकडे केले व आपल्या जाग्यावर जाऊन बसला. नंतर त्यानें दुसरा एक साप येतानां पाहिला. त्या सापानें त्या मेलेल्या सापास पाहिलें. तो परत आपल्या बिळांत गेला व तोंडांत तीन पानें घेऊन आला. त्यानें ते चार सापाचे तुकडे जोडले व तीन पानं तीन जखमांवर लाविलीं. त्याबरोबर तो साप जिवंत झाला व ते दोघे साप तीं पानें तिकडेच टाकून गेले. हें पाहून त्या मुलाला एक युक्ति सुचली. त्यानें तीं पानें घेऊन त्यापैकीं एक पान राजकन्येच्या तोंडांत घातलें व दोन पानें डोळ्यांस लाविलीं; त्याबरोबर राजकन्या जिवंत झाली. त्यानें राजकन्येस थोडी भाकर व थोडें पाणी दिलें व तीं दोघेजण भुयाराच्या दरवाज्याजवळ जाऊन तो मोठमोठ्यानें ठोठावूं लागलीं. तें पहारेकऱ्यांनीं ऐकून राजाला कळविलें. राजानें दरवाजा उघडला व त्या दोघांना पाहिलें. राजानें त्या दोघांवरचा प्रसंग टळला म्हणून दरबारांतील सर्व लोकांना मेजवानी दिली. राजकन्येच्या नवऱ्यानें तीन पानें एका विश्वासू चाकराजवळ देऊन सांगितलें कीं, हीं पानें माझ्यासाठीं तुझ्याजवळ जपून ठेव, व सर्व वेळ तुझ्याजवळ बाळग. कांहीं दिवसांनीं असें झालें कीं आपल्या नवऱ्यावरील राजकन्येचें प्रेम उडून गेलें व म्हणून तो आपल्या बापाकडे जाण्यास निघाला. तो जहाजांतून जात असतां राजकन्येनें आपल्यावरील उपकार न स्मरून तिनें व जहाजाच्या कप्तानानें कट करून त्याला रात्रीं निजला असतां पाण्यांत फेकून दिलें. हें दुष्ट कृत्य केल्यावर राजकन्येनें कप्तानाला सांगितलें कीं, आतां आपण परत घरीं जाऊं आणि राजाला असें सांगूं कीं, राजपुत्र वाटेंत मेला आणि नंतर मी तुझ्याबरोबर लग्न करीन. नंतर तीं जावयास निघालीं.

परंतु त्या विश्वासु चाकरानें नकळत एक होडी सोडली आणि आपल्या धन्याकडे नेली. त्यानें आपल्या धन्याचें प्रेत होडींत घातलें आणि त्या तीन पानाच्या योगानें त्याला जिवंत केलें. त्या दोघांनीं रात्रंदिवस होडी वल्हवून राजकन्येच्या अगोदर ते राजाकडे येऊन पोहोंचले. राजाला ते दोघेजण आलेले पाहून आश्चर्य वाटलें. जेव्हां राजकन्येच्या नवऱ्यानें तिचा कृतघ्नपणा सांगितला तेव्हां राजाला आपल्या मुलीचा फार राग आला. व त्यानें दोघांनाहि एका खोलींत लपविलें. नंतर लवकरच राजकन्येचें जहाज आलें. व तिनें दुःखी असल्याचें ढोंग करून राजापुढें ती उभी राहिली. तेव्हां राजानें विचारलें, "तूं एकटी परत कां आलीस? तुझा नवरा कोठें आहे?" तिनें उत्तर दिलें, "हाय, हाय! तो एकाएकीं पुष्कळ आजारी होऊन मरण पावला. म्हणून मी परत घरीं आलें." राजानें ह्मटलें, "मी त्याला परत जिवंत करतों." त्यानें जवळच्या खोलीचा दरवाजा उघडून तिच्या नवऱ्याला व चाकराला पुढें यावयास सांगितलें. तेव्हां राजकन्या घाबरून गेली व क्षमा मागूं लागली. तेव्हां राजानें तिला क्षमा केली व तीं दोघेजण सुखानें राहिली.

"अभ्यास व व्यायाम यांपैकीं तुम्हीं फाय पसंत कराल व तें कां?"

(या लेखाला श्री. 'सीताकांत' कृत **आत्मोन्नति** हें पुस्तक बक्षीस देण्यांत आलें.)

(ले. ग. वि. देशपांडे.)

व्यायाम व अभ्यास यांमधील अधिक आवडीची गोष्ट कोणती याचा विचार करूं गेलें असतां दोन्ही, गोष्टी सारख्याच आवडीच्या वाटूं लागतात. व्यायाम म्हणजे नुसते खेळ खेळणें असें धरून चाललें तर पुष्कळांना माझ्या प्रमाणें निरनिराळे खेळ खेळणेंच अधिक आवडेल यांत शंका नाहीं. अभ्यासाचा कंटाळा येऊं लागला म्हणजे लौकर शाळा सुटून खेळण्यासाठीं बाहेर जाण्यास कधीं मिळतें या गोष्टीकडेच सर्वांचें लक्ष वेधलेलें असतें. व्यायाम किंवा खेळ यांमुळें अभ्यासानें आलेला थकवा निघून जाऊन मनाला हुशारी

वाटून अभ्यास करण्यास नवा उत्साह उत्पन्न होतो, आणि या बाजूनें विचार केला असतां अभ्यासापेक्षां व्यायामाचें महत्व साहजिकच अधिक दिसूं लागते.

उलटपक्षीं अभ्यासाचीहि हीच स्थिति आहे. आम्हांला जें शाळेंत घालण्यांत आलेलें असतें त्यांत अभ्यास करावा असा पालकांचा मुख्य हेतु असतो आणि म्हणून आम्हीं अभ्यासाकडे लक्ष देणें हें आपलें कर्तव्य असतें. परंतु आवडी-नावडीचा प्रश्न आल्यास अभ्यास खेळापेक्षां किंवा व्यायामापेक्षां सर्वांनाच अधिक आवडतो असें नाहीं. अभ्यासांतील गणित विषयापेक्षां मराठी व इतिहास हे विषय माझ्या अधिक आवडीचे आहेत. गणित विषयाचा मला साहजिकच कंटाळा आहे आणि आमच्या वर्गांतील बऱ्याचशा मुलांचा याच कारणामुळें हा विषय कच्चा आहे. शिवाय पुष्कळदां अभ्यास करणेंहि मला आवडूं लागतें. शाळा सुटल्यावर जरी मी नेहमीं व्यायामाचे खेळ कधीं चुकवीत नाहीं तरी शाळेची परीक्षा जवळ आली कीं, आम्हां विद्यार्थ्यांत पास होण्यापेक्षां एकमेकांवर अधिक मार्क मिळवून वर नंबर मिळवण्याच्या इच्छेमुळें माझें खेळण्याकडे साहजिकच दुर्लक्ष होतें. यावेळीं मात्र अभ्यासांत देखील मला खेळण्यापेक्षां अधिक गोडी वाटते.

आतां अभ्यास व व्यायाम यांत माझ्या अधिक आवडीची गोष्ट कुठची आहे हें ठरविणें मात्र मला जड वाटत आहे. अभ्यासापेक्षां खेळण्याकडे जरी नेहमीं माझ्या मनाचा अधिक ओढा आहे तरी शाळेच्या नियमींत वेळांत अभ्यासाकडे माझें चांगलें लक्ष असतें. मी अभ्यासाचा त्या वेळीं कंटाळा करीत नाहीं आणि यावरून अभ्यास करणें मला आवडतें असें मला कबूल केलें पाहिजे. परंतु शाळा सुटल्यावर जर व्यायामाचे खेळ खेळले नाहींत तर रात्रीं झोंप येत नाहीं. मनाला हुशारी वाटत नाहीं आणि त्या दिवशीं घरीं अभ्यास करण्यालाहि मन घेत नाहीं. म्हणून व्यायामाचें महत्व यावेळीं पटूं लागतें आणि व्यायामाची एवढी आवश्यकता वाटत असल्यामुळें तो ज्याअर्थीं मला नेहमीं ध्यावासा वाटतो त्याअर्थीं व्यायामहि मला आवडतो हें निराळें सांगणें नकोच. म्हणून व्यायाम व अभ्यास यांत जरी पुष्कळांचा ओढा व्यायामाकडे असला तरी मला हे दोन्ही विषय सारखेच आवडतात. अभ्यास करावयाच्या वेळीं अभ्यास करीत रहावें असें वाटत असल्यानें आणि खेळण्याच्या वेळीं अभ्यासाचें नांवहि काढूं नयेसें वाटत असल्यानें आवडीचा प्रश्न ठरविणें बिकट होऊन बसलें आहे.

बक्षिसाचा विषय

"तुम्हीं वाचलेल्या पुस्तकांपैकीं ५ पुस्तकांची नांवें सांगून प्रत्येक पुस्तकांत तुम्हांला काय तात्पर्य आढळलें तें लिहा." हीं पुस्तकें अभ्यासाच्या पुस्तकांपेक्षां निराळीं असलीं पाहिजेत.

(बक्षिसाचा विषय १४ तारखेपूर्वी व फक्त १४ वर्षाआंतील वर्गणीदारांनींच लिहून पाठवावा.)

—०—

"भिकारि कैसा ?"

रडका विष्णू रडुनी दमला
स्तब्ध बैसला रडक्या वदनीं
संवगडी तया म्हणती रडवा
चरफडला विष्णू स्वमनाशीं ॥ १ ॥
"कां रे, मजला म्हणतां रडवा ?
विना सबब मी रडलों नाहीं.
या 'ताइटली'चा द्वाडपणा
तुम्हांस पुरता ठाउक नाहीं. ॥ २ ॥
भातुकलीचा तिचा पसारा
खरेंच नव्हता पाहियला मी
पाय पडूनी सर्व मोडला
कां मारावें तिनें मज तरी ? ॥ ३ ॥
भूक लागतां बेसुमार मज
आई देत न कांहीं खाया,
ताई वदते "भिकारि हा बघ"
तूंच सांग मी भिकारी कैसा ? ॥ ४ ॥
चोरुनि चढलों फडताळावरि
खालीं पडलों जाउनि तोल
आई, बाबा उगाच मारिति
हा का माझा गुन्हाच बोल ?" ॥ ५ ।

कोडचाचें उत्तर

प
कं ट क
क व च
ण र्ध रा
न

उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नांवें:—गो. न. ककेरी,. एन पी. मोरे, वि. अ. बावडेकर, कु. शिरीन खं. धैर्यवान, पां. ना. नाईक, भा. दा. सांडू, वि. वा. सरवटे, रा. ग. जोशी, वि. ल. भणंग, कु. सिंधुमती वि. दडकर, कु. अहिल्या वा. डुकले, वै. र. सोहनी, भा. अ. लिमये, वि. वा. डुकले, व. वि. जोगळेकर, वै. चि. तिगडी, वि. शं. दळवी, वि. रा. सुखटणकर, द.भा. तेंडुलकर, श्री. ग. पंडीत, वा. आ. गांधी.

नवें कोडें

(१) उंबरगांव
(२) अटक
(३) रामोशी
(४) गवत
(५) वसुंधरा

या पांच शब्दांतील एक एका शब्दांत एका ५ अक्षरी फुलाच्या नांवाचें एक एक अक्षर दडलें आहे. अक्षरें शब्दांच्या अनुक्रमानेंच दिलीं आहेत. मग त्या फुलाचें नांव काय ?

(उत्तरें फक्त १४ वर्षां आंतील **वर्गणीदारांनींच** पाठवावीं)

लहान मुलांच्या आवडत्या गोष्टी

(१) अभ्यास करण्यापेक्षां खेळून वेळ काढणें.

(२)खेळून दमल्यावर अगर वेळ जात नसला तर आईजवळ खावयास मागणें. न दिल्यास मोठयानें भोकांड पसरणें.

(३) आपल्यापेक्षां धाकटया भावंडांची कळ काढून त्यानां रडवणें.

(४) दुसऱ्याकडे पाहिलेली वस्तू स्वत:ला पाहिजे असा हट्ट धरून रडत बसणें व ती मिळाल्यावर निष्काळजीपणानें कुठें तरी सांडून टाकणें.

(५) वडिल माणसांच्या गैरहजेरींत टेबलावरचे जिन्नस अव्यवस्थित करणें. पुस्तकांतील चित्रें बघतानां तें फाडणें व याच तऱ्हेचे इतर उपद्व्याप करणें.

(६) शाळेंत गेल्यावर मारामारी करून कोट अगर शर्ट फाडून आणणें अगर शाईनें कोट रंगवणें.

(७) शाळेंतून घरीं आल्याबरोबर हातांतली पुस्तकें एका कोंपऱ्यांत, टोपी दुसऱ्या कोंपऱ्यांत व कोट तिसऱ्या कोंपऱ्यांत भिरकाऊन दुसऱ्या दिवशीं तीं शोधण्यांत शाळेला उशिर होत असला तर दुसऱ्यांवर विनाकारण चरफडणें.

तुमच्यापैकीं अशीं किती मुलें आहेत ?

मित्रप्रेमाचा मासला.

(शंकर वासुदेव सांडू, चेंबूर.)

एका खेडेगांवांत रामा व गोविंदा या नांवाचे दोघे अत्यंत जिवलग मित्र होते. ते एकाच वर्गांत होते व वयानेंही सारखेच होते. एकदां ते शाळा सुटल्यावर फराळ वगैरे करून संध्याकाळीं फिरावयाला गेले. कांहीं वेळ फिरल्यानंतर दोघेहि विश्रांति घ्यावी म्हणून एका प्रचंड अशा पिंपळाच्या छायेखालीं बसले. इतक्यांत जवळूनच एका रानांतून एक मोठा काळा भुजंग तेथें आला. तो जवळच्या रानाचा रक्षक होता. तो आल्यानंतर त्या दोघानां मनुष्यवाणीनें म्हणाला:—" आतां मीं तुम्हांपैकीं कोणातरी एकाला दंश करतों. " असें म्हणून तो भुजंग गोविंदाजवळ आला. हें जेव्हां रामानें पाहिलें तेव्हां तो रडावयाला लागला व भुजंगाला म्हणाला:— " त्याला चावूं नका. मला चावा. मी पोरका आहे. " हें जेव्हां त्या भुजंगानें ऐकलें तेव्हां तो रामाजवळ आला. हें पाहतांच गोविंदा रडावयाला लागला व म्हणाला, " अहो, मला दंश करा. मला पुष्कळ भाऊ आहेत. " अशा रितीनें त्या भुजंगानें एकमेकांची चाललेली चढाओढ पाहिली व त्याला त्यांची कींव आली व तो त्या दोघांना म्हणाला, " तुम्हीं आतां खुशाल घरीं जा. मी कोणालाहि दंश करीत नाहीं. व तुम्हांला मी असा आशिर्वाद देतों कीं, माझ्यासारख्या दुसऱ्या कोणत्याहि सर्पाचा दंश जरी तुम्हांला झाला तरी तुम्हांला त्या विषाची बाधा होणार नाहीं व तुम्हीं पुष्कळ वर्षें या जगांत जगाल. " दोघांचें एकमेकांवर अत्यंत प्रेम होतें व त्यानां त्या प्रेमाचा मोबदलाही ताबडतोब मिळाला.

तात्पर्यः—आपण आपल्या बंधूंवर व आपल्या मित्रांवर अशा तऱ्हेचें प्रेम करावें म्हणजे आपलें कल्याण होतें.

आ | आ

द | वाघ्या. | द

र्श | र्श

लेखकः—श्री. प्रभाकर गणेश गुप्ते.

दिवस होते थंडीचे. रात्रीची वेळ. मी बिछान्यावर पडलो होतों. ढेकूण अति झाले होते. पण थंडी असल्यामुळें अंगावरून पांघरूण गुरफटून घेतल्याशिवाय इलाज नव्हता. नुक्ताच कोठें डोळा लागत होता. इतक्यांत बाहेर कुत्र्याच्या भुंकण्याच्या आवाजानें मी जागा झालों. मला असा संताप आला ! आतां कुठें डोळा लागत होता. मी पडल्या पडल्याच दरडावणीच्या आवाजांत ओरडलों,'अरे हॅड.'थोडा वेळ जरा शांतता झाली. आपल्या एकाच हाकाटीनें काम झालें असें पाहून मी परत झोंपण्याचा प्रयत्न करूं लागलों; तों बाहेर परत कुत्र्यानें 'भों भों,' सुरूं केलें. आतां मात्र मला भयंकर संताप आला. त्या झटक्यांत मी अंगावरचा 'रग' भिरकावून दिला. हातांत एक काठी घेऊन दार उघडून बाहेर आलों. पण दार उघडतांच मला जें दृश्य दिसलें त्यानें माझा विचार जागच्या जागींच राहून माझ्या हातांतील काठी खालीं गळून पडली.

समोर पायरीवर एक किडकिडीत कुत्री थंडीनें लटलट कांपत केविलवाणें तोंड करून भोंकत उभी होती. तिच्या पायाशींच लहान पिलूं पडलें होतें. त्याची तर कांहींच हालचाल दिसत नव्हती. मी झटदिशीं पुढें होऊन तें पिलूं उचललें. अहाहा ! किती गोजिरवाणें तें होतें ! मी त्याला तसेंच घरांत आणलें. माझ्या पाठोपाठ ती कुत्रीहि घरांत आली. शेगडींतील विस्तावानें त्या पिलाला जरा शेकतांच तें चळवळ करूं लागलें. नंतर एका वाटींत थोडें दूध घेऊन मी त्या पिलाला पाजलें. हें सर्व करीत असतां ती कुत्री कृतज्ञ नजरेनें माझ्याकडे बघत मधून मधून माझे अंग चाटीत उभी होती. ती कुत्रीहि फार भुकेली दिसली; म्हणून मी घरांतून भाकरी आणून तिच्या पुढ्यांत टाकली आणि नंतर तेथेंच दरांत एक पोतें आंथरून त्यावर मी त्याला आणि पिलाला ठेवलें आणि आपल्या बिछान्यावर येऊन पडलों. झालेल्या गोष्टीचा विचार करतां करतां माझा केव्हां डोळा लागला तें कळलें नाहीं. सकाळीं मी जेव्हां जागा झालों तेव्हां तें कुत्र्याचें पिलू समोर बागडतानां दिसलें. पण ती कुत्री कोठें दिसेना. अखेरीस बाहेर अंगणांत मला एके ठिकाणीं ती मरून पडलेली आढळली. जणूं काय ती आपल्या पिलाची सोय लावण्याकरितांच माझ्याकडे आली होती, आणि आपल्या पिलाची योग्य सोय लागली असें पाहून ती हा लोक सोडून चालती झाली होती !

× × × ×

"वाघ्या, वाघ्या, यू!" त्या पिलाचें नांव आम्हीं 'वाघ्या' असें ठेवलें होतें. वाघ्याचा रंग तांबडा होता. त्याच्या मानेवर एक पांढरा पट्टा होता. अंगावर केस होते. त्याचें चालणें बसणें सगळेंच कांहीं रुबाबदार होतें. मधूचा तर तो फारच लाडका होता. मधू त्याला आंघोळ घाली, त्याचे अंग पुशी. कधीं कधीं आपली टोपी वाघ्याच्या डोक्यांत आणि आपला 'मफलर' त्याच्या गळ्यांत अडकाऊन तो पडवींत त्याच्याशीं गप्पा मारित बसे. वाघ्याला खायला घातल्याखेरीज मधू कधींहि कांहीं खात नसे. आणि वाघ्याहि आमच्यापेक्षां त्याचेंच जास्त ऐकत असे.

दुपारची वेळ. मुलें बाहेर ओटयावर खेळत होतीं. वाघ्या आंतल्या दारांत पाय पसरून पडला होता. इतक्यांत काय झालें कुणास ठाऊक! वाघ्या एकदम उसळी मारून "भों भों" करीत बाहेर आला. यावेळीं मधू ओटयाच्या अगदीं कोपऱ्यावर उभा होता. तो दचकला आणि त्याचा झोंक जाऊन तो धाडदिशीं खालीं पडला. मुलांच्या ओरड-प्यानें आम्ही बाहेर येऊन पाहातों तर, मधूच्या डोक्याला भयंकर दुखापत होऊन त्याच्या डोक्यांतून सारखें भळभळ रक्त वहात असून वाघ्या त्याचे पाय चाटीत मध्येंच तोंड हुंगीत केविलवाणें तोंड करून तेथें उभा होता.

× × × ×

मधूचा ताप चढला होता. वाघ्या त्याच्या पायथ्याशीं पायावर डोकें ठेऊन मधूकडे सारखी नजर लाऊन बसलेला होता. आम्हीं त्याला तेथून उठवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण मधू पडल्यापासून वाघ्या जो त्याच्या पायथ्याशीं येऊन बसला होता, तो बहुतेक हालतच नव्हता. मधू मधून मधून बरळे. "हं, वाघ्या, मार उडी." तेव्हां वाघ्या मान उचलून मधूकडे टंवकारून पाही. पण त्या मुक्या जनावराला देखील आज आपला धनी आपल्याला शुद्धींत हुकूम सोडीत नाहीं असें समजत होतें.

× × × ×

काय असेल तें असो. डॉक्टर देखील अगदीं आश्चर्यचकीत झाले. त्यांना कल्पना नव्हती इतका एकदम मधूच्या प्रकृतींत फेर पडला. मधूची प्रकृति झपाटयानें सुधारूं लागली. पण इकडे वाघ्याची प्रकृति खालावत चालली. तो अगदीं रोड दिसूं लागला. त्याच्या अंगांत कांहींच त्राण राहिलें नाहीं. डॉक्टरचें औषध सुरू केलें; पण वाघ्याची प्रकृति सुधारण्याचें कांहींच लक्षण दिसेना.

× × × ×

संध्याकाळची वेळ. मुलें कोठें बाहेर गेलीं होती. "भों भों भों." वाघ्याचें आज बरेंच दिवसांत न ऐकलेलें भुंकणें कानीं येतांच आम्ही सर्व धांवत बाहेर आलों. वाघ्या अर्धवट डोळे मिटून पडला होता. आम्ही सर्व जवळ जातांच त्यानें जरा वर

उठल्यासारखें केलें. पण शरीरांत कांहींच त्राण नसल्यामुळें त्याला परत अंग खालीं टाकावें लागलें. मग त्यानें सरपटत मान सरकाऊन प्रत्येकाचे पाय आपल्या जिभेनें चाटले आणि तो कांहीं वेळ स्वस्थ पडला. थोडया वेळानें त्यानें परत एकदां जोराची उसळी मारली, सर्वांकडे आपली नजर फिरवली आणि खालीं मान टाकली ती शेवटचीच ! वाघ्या गेला ! वाघ्याचा मृत देह खालीं पडला होता ! भोंवतीं आम्ही सर्व उभे होतों. आम्हांला वाटलें वाघ्या एकाएकीं आजारी पडला कसा ? मधूचें बरें होणें आणि वाघ्याचें आजारी पडणें, याचा कार्यकारण संबंध होता काय ? खास ! वाघ्यानें मधूच्या जिवाकरितां आपल्या जिवाचा मोबदला दिला. वाघ्यानें मधूच्या जीवावरून आपला जीव ओंवाळून टाकला.

मुलें बाहेरून आलीं. वाघ्याला पडलेला पाहून मधूला चमत्कारीक वाटलेसें दिसलें. त्यानें मला विचारलें, " भाऊ, वाघ्याला काय रे झालं ?" मी काय उत्तर देणार ?

" भाऊ, सांग ना ! वाघ्या असा कां पडलाय् ?" मधूनें पुन्हां प्रश्न केला.

" काय सांगणार मधू ! वाघ्या आपला नव्हता. देवाचा वाघ्या देवाकडे निघून गेला. तूं आजारी असतां तुझ्या बऱ्याकरितां देवाच्या दाराशीं धरणं घरून तूं बरा होतांच स्वतःच्या जीवाचा मोबदला देण्याकरितां वाघ्या देवाकडे चालता झाला. "

" अं ? ... "

मधूला पुढें बोलवेना. वाघ्याचें डोकें आपल्या मांडीवर घेऊन तो स्फुंदून स्फुंदून रडूं लागला.

पुढील अंकांत

" खुडलेलीं फुलें "

श्री. कृ. कोल्हटकर

व

कॅप्टन लिमये

पुढील अंकांत

" देवदुताचें गमन ",

व

संताजी घोरपडे, धनाजी

जाधव

मुलींचा संसार

"स्त्रियानां स्वयंपाक शिकणें आवश्यक आहे काय ?"

(सौ. यमुनाबाई मिरजकर)

आक्का:—किती वेडेपणाचा प्रश्न विचारलास ग हा ?

भागीरथी:—काय झाला ग, यांत वेडेपणा ?

आक्का:—आणखी पुन्हां विचारतेस ? म्हणे 'स्त्रियानीं स्वयंपाक शिकलाच पाहिजे कीं काय ?'

भागीरथी:—मग मी विचारायला चुकलें कीं काय ?

आक्का:—नाहीं तर ? स्त्रियांनीं स्वयंपाक शिकायचा नाहीं, तर काय पुरुषानीं शिकायचा वाटतं ?

भागी:—मी मूर्ख तर मूर्ख. पण शहाणे, तूं तरी सांग ना माझं म्हणणं चूक कसं तें ?

आक्का:—असं पहा, आम्हां बायकानीं स्वयंपाक शिकायचा नाहीं तर करायचं तरी काय ? पुरुष तुम्हांला जेवण तयार करून वाढणार वाटतं ? उद्यां तुझं लग्न झालं म्हणजे नवऱ्याला काय जेवण करा—

भागी:—हं. हं. पुरे. नवऱ्याला जेवण करायला कशाला लावलं पाहिजे ? स्वयंपाकी नाहीं वाटतं मिळत ? कांहीं एकाद्या ओसाड गांवांत नाहीं पडलों !

आक्का:—स्वयंपाकी मिळतील. न मिळायला काय झाले ? पण तुम्हांला त्यांच्या हातचं चालेल ना ?

भागी:—म्हणजे ? इतक्या जणांच्या घरीं आपण स्वयंपाकी असलेले पाहतो ते नाहीं वाटतं जेवत त्यांच्या हातचं ?

आक्का:—जेवतात. पण मी तुला असं विचारतें, तें जेवण जसं तूं अगर मी काळजीपूर्वक आणि स्वच्छता राखून करूं तसं तो करील का ? अग, किती झालं तरी तो पगारी माणूस ! पैशाच्या पोटीं का प्रेम असतं ? महिनाअखेर पगार मिळाला, झालं ! त्याला थोडीच काळजी आहे, मालकाला चांगलं अन्न व्यवस्थित आणि स्वच्छ मिळावं अशी ! इकडे विडया फुंकील आणि त्याच हातानं पोळ्या लाटील. कसली स्वच्छता अन् कसलं काय ! आणि त्याच्या हातचं मिटक्या मारून जेवशील

नाहीं ? बरं समज, एखादी स्वयंपाकीण बाई–अगदीं टापटीपीची आणि स्वच्छ काम करणारी बाई मिळाली तरी तिचा ग काय भरवंसा ? कुठें एखाद दिवशीं ताप आला आणि तिच्यानं स्वयंपाक करायला नाहीं उठवलं, म्हणजे आली कीं नाहीं पंचाईत ? मग काय उपाशी रहाणार कीं खाणावळींतला डबा आणून जेवणार ? तेंच स्वयंपाक कसा करायचा हें ठाऊक असलं म्हणजे असली अडचण निभाऊन जाते. सर्वस्वी स्वयंपाक्याच्या हातांतच तुमच्या नाड्या मिळाल्या तर काय, तो हवं तसं तुम्हांला नाचवील. ऐन अडचणीच्या वेळीं सांगील माझा पगार वाढवा, नाहीं तर हा मी चाललों ! मग मुकाट्यानें त्याचा पगार वाढवायचा;शिवाय अन्न चांगलं नाहीं तें नाहींच. पगार मात्र भरपूर. त्याला देण्यांत येणाऱ्या पैशाची बचत करतां येणं हातचं असून स्वयंपाकी ठेवायचा हें कांहीं श्रीमंतीचं लक्षण नव्हें. मला तर हा अगदीं मूर्खपणा वाटतो. जें स्त्रियांचं खरं कर्तव्यकर्म आणि जें विशेष कष्टाचंहि नाहीं त्याच्यासाठीं पगारी माणून नेमायचा ही का श्रीमंती झाली? नवऱ्याला तरी वाटत असेल कीं नाहीं कीं आपण आपल्या बायकोच्या हातचे चार घांस खावे ? शिवाय स्वयंपाकी ठेवला म्हणजे मग स्त्रियानीं सबंध दिवस करायचं काय ?

भागी:—शिवणकाम आहे, विणकाम आहे.

अक्का:— पण सबंध दिवस करवेल का ? तास, फार फार तर दोन, तीन तास. मग येईल कंटाळा. शिवाय सबंध दिवस उत्साह वाटायचा नाहीं तो नाहींच. स्वयंपाकापासून विशेष फायदा असेल तर तो हाच कीं, काम करतानां शरिराला नकळत व्यायाम होतो आणि त्यामुळं मनाला किती तरी उत्साह वाटतो. मी तर म्हणते मोठ-मोठ्या मुली शाळेंत जाऊन जें कांहीं लिहावाचायला शिकताहेत त्यापेक्षां जर घरींच थोडथोडी स्वयंपाकाची माहिती करून घेतील तर त्या शिक्षणाचं चीज तरी होईल. स्वयंपाक येण्यानं कांहीं त्यांच्या इंग्रजी शिक्षणाला बट्टा लागत नाहीं. मात्र त्याची जोड मिळाली तर ती एक आदर्श स्त्री होऊं शकते. पटतं कीं नाहीं तुला माझं म्हणणं ?

भागी:—हो; पण असं बघ, एखाद्या बडथा घरांत जर मुख्य मालकीणच स्वयंपाक करूं लागली तर आसपासची माणसं म्हणतील, घरांत इतकी संपत्ति असून स्वतः कंजुषपणानं मरमर राबते आहे ! १५-२० रुपये देऊन एखादा स्वयंपाकी नाहीं का ठेववत ?

अक्का:—काय खुळचट प्रश्न आहे हा ! लोकानां असं बोलायला काय जातं ? आज असं म्हणतील. उद्यां स्वयंपाकी अडचणीच्या वेळीं निघून जाऊन स्वयंपाक करतांना तिची धांदल उडूं लागली तर पुन्हां फिदी फिदी हंसायला सुद्धां तयार ! तेव्हां त्यांच्या हंसण्याबोलण्याची फिकीर करून काय होणार ? स्वतःच्या मनाला पटतं तें करावं; दुसरं कोणी कांहीहि म्हणेना.

सौंदर्य

लेखक श्री. मो. ग. रांगणेकर.

गगनांगणांतल्या कभिन्न काळोखांत दिमाखानें स्वच्छंद भटकणाऱ्या नाचऱ्या चांदण्यांत, ओसाड आडांतल्या कोनाकोपऱ्यांत उगवलेल्या एकलकोंडया निर्गंध फुलांत, अगर उध्वस्त किल्ल्याच्या अवशिष्ट दगडाळ भिंतीवर चोरटया पावलानें मार्गक्रमण करणाऱ्या लतेंत निसर्गदत्त सौंदर्याची खुलावट खुलते आहे. चंद्रम्याच्या गैरहजेरीत साभिमान बागडणाऱ्या क्षीण प्रकाशी चांदण्या, दुर्मिळतेमुळें ओसाड ठिकाणीं महत्व पावलेलें निर्गंध फूल आणि कठीण भौंवतालांत शांतपणानें कालक्रमण करणारी खडबडीत भिंतीवरची मृदु वेल यांत सौंदर्य एकवटल्यामुळेंच त्यानां महत्व मिळालें आहे. एरव्हीं फुलांच्या राशीवरून चालतानां पायदळीं चुरडलेल्या फुलांचें बहुत्वामुळें महत्व कळत नाहीं; अगर सूर्य-चंद्राच्या सतेज प्रकाशांत परंप्रकाशित हीनतेज चांदण्यांच्या क्षीण दिमाखाकडे औत्सुक्यानें कोणी पहात नाहीं. परंतु स्वयंप्रकाशित सूर्याच्या प्रखर तेजापेक्षां चमकदार चांदण्यांची क्षुल्लक चमकीच सौंदर्यपूर्ण वाटते. वर्चस्वाच्या चढाओढींत सबलतेपेक्षां नाजुक साजुक सौंदर्याकडेच आकर्षक नजर वळते. तुफान दर्यातल्या पर्वतप्राय लाटांच्या भीषण आरोळ्यापेक्षां प्रशांत नदीच्या तरंगावरचें सरितासंगीत कर्णमधूर वाटतें आणि बोजड बलिष्टापेक्षां मर्यादित शरिरसौष्टवाचें किरकोळ माणूस सौंदर्यवान् वाटतें.

सृष्टींतली प्रत्येक जड-चर वस्तु मूर्त–अमूर्त स्वरूपांत सौंदर्यपूर्ण आहे. आकाशांतल्या स्निग्ध चंद्रिकेपासून जमिनीशीं जखडलेल्या राठ दगडांपर्यंत सौंदर्याचें अस्तित्व कमी अधिक प्रमाणांत आणि दृश्य–अदृश्य स्वरूपांत अचल आहे. फुला–चांदण्यासारख्या नाजूक वस्तूंत सौंदर्याचें जितकें वाढतें प्रमाण आहे तितकें तें दगडामातींत नाहीं. पण बाह्यांगी व क्वचित् प्रसंगीं अंतरांगीं सौंदर्यहीन वाटणाऱ्या प्रत्येक सचेतन अचेतन वस्तूंत सौंदर्याची साजुकता आहे. पायाखालीं तुडवल्या जाणाऱ्या दगडांची–राजरस्त्यावर टोलेजंग देखणी इमारत बांधली जाते आणि क्षणभर तिकडे टक लाऊन पहाण्याइतकें त्यांत सौंदर्य दिसूं लागतें. कवडी किंमतीच्या मानलेल्या मातीचाच डोंगर वनश्रीनें सजला म्हणजे तें एक आल्हादक दृश्य वाटतें. अशा तुच्छतेच्या पदार्थांत परिश्रमामुळें जसें सौंदर्य उत्पन्न होतें तसेंच कित्येक सौंदर्यमूलक वस्तूनां परिश्रमानें टाकाऊपण येतें. आकाशाला खुलावट आणणाऱ्या सप्तरंगी इंद्रधनुष्याचें तात्विक रुक्षतेनें पृथःकरण करण्याचा प्रयत्न केला तर मूळांतलें सौंदर्य व दृष्टीसौख्य नाहींसें होत नाहीं का ?

मनुष्यप्राण्याच्या बाह्यांगापुरताच विचार केला तर स्त्रियांचें स्वरुपांत आणि पुरुषांचें रुबाबांत सौंदर्य आढळून येतें. स्त्रियांचें स्वरुप म्हणजे पांढरा फटफटीतपणा नव्हे अगर पुरुषांचा रुबाब म्हणजे झकपक पोषाख नव्हे. उलटपक्षीं केवळ स्त्रीजात म्हणून त्यांच्या बेढबपणांतहि सौंदर्य नसतें अगर पुरुषांच्या नाजुकपणांत त्यांचें सौंदर्य एकवटलेलें नसतें. नैसर्गिक स्वरुपसौंदर्याचा अभाव भरून काढण्याकरितां कृत्रिम उपायाच्या मोहरेदार चेहऱ्यांत सौंदर्याचा लेशहि नसतो अगर आपल्या अव्यवस्थित शरिराला मुष्किलीची खटपट करून आटोपशीर करण्यांत सौंदर्याचा उठाव येण्याऐवजीं हंसेंच मात्र होतें. केव्हां केव्हां स्त्रियांच्या नखरेल गोरेपणापेक्षां काळ्या सावळ्या चेहऱ्यांतच मोहकतेचें मुग्ध सौंदर्य दिसतें आणि बहुमोल पोषाख पेहेरलेल्या ऐटबाज पुरुषापेक्षां साध्यासुध्या पोषाकाच्या नीटनेटक्या माणसांतच प्रसन्नता उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असलेलें आढळून येतें. सौंदर्य धुंडाळण्याकरितां चेहऱ्याची मोहकता हुडकावी लागत नाहीं अगर श्रीमंतीहि मापावी लागत नाहीं. तें गरीब घराण्यांत, नीटनेटक्या स्वच्छतेंत–नुसत्या डोळ्यांत सुद्धां, आढळून येईल.

एखादा पुण्यश्लोक साधूपुरुष ईश्वरी सौंदर्याचा शोध करतानां त्याची नजर स्वरुपवान् स्त्रियांच्या चेहऱ्यांच्या भुलभुलावणीकडे वेधणार नाहीं आणि पुरुषांच्या छानछोकीकडेहि सौंदर्य हुडकण्यासाठीं तो आतुरतेनें पहाणार नाहीं. बाह्य सौंदर्याचा मोहकपणा सामान्य माणसाचें आकर्षण करतो आणि अंतरंगांतील भोळे भाबडें प्रेमळ हृदय विरागी महात्म्याला सौंदर्यपूर्ण वाटतें. आपल्या चेहेरपट्टीच्या आणि वस्त्रप्रावरणाच्या टापटीपीतच दरिद्र्यांची उपेक्षा बाळगून सौंदर्यवान् बनूं पहाणाऱ्या चढेल स्त्री-पुरुषांपेक्षां असहाय्य अनाथानां हातभार लाऊन दुःखमुक्त करणाऱ्या उदारमनस्क स्त्री-पुरुषांचेंच सौंदर्य दिव्य व परिपूर्ण वाटतें. सर्वांग व्याधीनें जर्जर झालेल्या किळसवाण्या कंगालाकडे सुद्धां खुल्या सहानुभूतीनें बसून मायेच्या शुश्रूषेनें त्याला रोगमुक्त करणाऱ्या स्त्रीपुरुषाचें हें भरजरी सौंदर्याचें वैभव अतुल्य आहे. वरकरणी स्वरुपसुंदरतेच्या अभिलाषबुद्धीऐवजीं या हृदय–सौंदर्याच्या वैभवाकडे दिव्य आदरानेंच पहावें लागेल.

सौंदर्य हें फक्त दृष्टीसौख्य नाहीं. सुंदर आवाज, सुंदर पक्वान्नें आणि सुंदर हवा हीं अनुक्रमें कानाला, जिभेला आणि शरीराला सुखकर वाटत असतात.

चिमण्या जगाच्या निष्पाप वातावरणांत मनमोकळेपणानें बागडणाऱ्या चिमुरड्यांचें सौंदर्य फुला–चांदण्यांइतकेंच नाजूक व निर्दोष असतें. तो टिचभर उघडानागडा देह कटिखांद्यांवर खेळवला, मातींत लोळला तरी नैसर्गिक सौंदर्याचा मोहकपणा कायमच रहातो. किंबहुना हौसेच्या नटवेपणापेक्षां त्याचा मूळ ओबडधोबडपणाच सौंदर्यपूर्ण वाटतो. बालपणांत एखाद्याच्या ओंगळ चेहऱ्यांत सुद्धां एक आकर्षक सौंदर्य आढळतें. नुकतेंच देवाघरून आल्यामुळें गुणसौंदर्याचा ईश्वरी अंश निष्पाप बालक आपल्याबरोबर घेऊन

येतें आणि कालांतरानें कृत्रीम जगांत मन रममाण झाल्यावर त्या ईश्वरी सौंदर्याचा लोप होतो. पोरवयांत त्याला आपल्या स्वर्गीय सौंदर्याची जाणीव नसते आणि जाणत्या वयांत कृत्रिमतेकडे त्याची नजर रमते.

सौंदर्याचे गुणदोष व्यक्तीच्या मनोधर्मावर अवलंबून असतात. दैववशात् मिळालेल्या सौंदर्याच्या दुरुपयोगानें एखादी छटेल बाजिंद स्त्री पापांच्या राशी जमवील आणि त्याच सौंदर्याचा, एखादी भाग्यशाली महासाध्वी सदुपयोग करील. हटवादी प्रतिपक्षाचे दोष त्याला दाखवण्याकरितां वाक्चातुर्यापेक्षां सौंदर्याची छाप जास्त पडते. स्वतःच्या मताचें महत्व श्रोतृसमूहाच्या मनावर बिंबवण्याकरितां शरिराची रुबाबदार उठावण तें साधन जितक्या अल्पावकाशांत साध्य करील तितक्या लवकर कसलेल्या वक्त्याचा बुद्धिवाद व कंठशोष तें काम करूं शकणार नाहीं. उलटपक्षी काळजाच्या काळकठोर दरोडेखोराकडून गुन्ह्याचा कबुलीजबाब वरिष्ठांच्या असह्य दंडदानानें सुद्धां मिळत नाहीं; पण त्याच्याच चिमुरडथाच्या निष्पाप सौंदर्याचा गोजिरवाणा चेहरा पाहून त्याच्या मुक्या प्रश्नाला सुद्धां त्याच्याकडून पश्चात्तापाचा जबाब मिळेल.

प्रेम आणि सौंदर्य यांचा बव्हांशी जन्यजनक संबंध जोडला जातो. पण सौंदर्यामुळें जसें प्रेम उत्पन्न होतें तसेंच प्रेमामुळें सौंदर्य निर्माण होणें सुशक्य आहे. निसर्गदत्त स्वरुपसुंदर स्त्री आत्ममाणसांबरोबरच त्रयस्थानां सुद्धां सौंदर्यपूर्ण वाटते; पण केव्हां केव्हां काळ्या सावळ्या वर्णाची व क्वचित् विद्रुप चेहेऱ्याची स्त्रीसुद्धां तिच्या पतीला अतुल सौंदर्यशाली वाटत असलेली आढळून येते. इतरांकडून अभागी रुपाबद्दल तिरस्करणीय बनलेल्या स्त्रीबद्दल ती सौंदर्यहीन असतांहि नवऱ्याच्या पोटीं प्रेम व आदर उत्पन्न होतो. पतिपत्नीइतका एकमेकांतील सर्वस्वाचा जिव्हाळा, तिऱ्हाइतांच्या बाबतींत आढळून येत नसल्यामुळेंच तिऱ्हाइतांच्या व प्रत्यक्ष नवऱ्याच्या दृष्टीला कांहींशा विद्रुप चेहेऱ्याची स्त्री निरनिराळी भासते. तिऱ्हाइतांची नजर जातांजातां तिच्या चेहेऱ्याकडे वळते; पण तिच्या सर्वस्वाच्या मालकाची–अर्थात् तिच्या नवऱ्याची दृष्टि फक्त तिच्या चेहेऱ्यापुरतीच नसते. तिथें प्रत्यक्ष त्याच्या आयुष्याचा संबंध असतो. अर्थात् त्याच्या व परक्यांच्या दृष्टींत तफावत असणें संभवनीय आहे.

"काय ?" त्याच्या तोंडून चटकन् शब्द निघाला.

"ज्याच्या ज्याच्याशीं त्याची ओळख होती त्याच्या त्याच्या घरांत या हलकट महेश्वरानं कितीतरी धुमाकूळ घातला आहे. आणि तुझ्या घरींहि त्यानं शालीनसारख्याशीं लघळपणा करणं हें निदान तुला तरी लांछनास्पद आहे !"

माझ्या वाक्यानें प्रभाकर एकदम चमकला. माझ्याकडे नीट रोखून पाहून त्यानें स्वत:ची खात्री करून घेतलीशी वाटलें. कपाळावर आंठ्या घालून विचारमग्न स्थितींत तो खिशांत हात घालून खुर्चीवरून उठला आणि तसाच हॉटेलच्या पायऱ्या उतरून रस्त्यावर आला. मीहि बील चुकतें करून त्याच्यापाठून खालीं उतरलों. माझ्या अपेक्षेबाहेर इतक्या लवकर यश आलेलें पाहून मला स्वत:लाच कितीतरी आश्चर्य वाटलें.

प्रकरण ७ वें.

सौभद्र

बाहेर चांगलें ऊन पडलेलें पाहून मी आळोखेपिळोखे देत पलंगावर उठून बसलों. माझ्यांत कॉलेजस्टूडंटचे कांहीं कांहीं 'गुण' फारच उत्कृष्ट रीतीनें उतरले होते. आणि त्यांत झोंपाळूपणा हा 'गुण' प्रामुख्यानें झळकत होता. स्वतंत्र खोली असल्यामुळें आणि कोणाचा दाब नसल्यामुळें माझ्या फाजील झोंपेबद्दल मला बोलणारें कोणीच नव्हतें. वाटेल तेव्हां झोपावें, वाटेल तेव्हां उठावें आणि बाबानीं पाठविलेल्या पैशावर मन मानेल तशी चैन करून घ्यावयाची. त्यांतल्या त्यांत मी कुठल्याहि व्यसनाला बळी पडलों नव्हतों ही विशेष समाधानाची गोष्ट आहे असें केव्हां केव्हां मला वाटत असे. कधीमधीं स्नेह्यांच्या भिडेखातर एखादी सिगारेट ओढण्यास मला फारसें कांहीं वावगें वाटत नसे.

मी गांवीं शाळेंत असतांना मला मुंबईला कॉलेज रेसिडन्सीमधल्या अगर स्वतंत्र खोलींत राहणाऱ्या कॉलेजस्टूडंटचें सुख पाहून फार हेवा वाटत असे. आईबापानीं त्याला मुंबईत दर महिन्यास पैसे पाठवायचे आणि त्यानें त्याच्यावर मन मानेल तशी चैन करावयाची. किती सुखी आयुष्य ! पण आतां मला केव्हां केव्हां ते कंटाळवाणें वाटूं लागत होतें. कोणत्याहि कामाचा आळस करून मला माझी एखादी गरजेची गोष्ट भागवणें शक्य नव्हतें. एखादे वेळीं झोंपून उठल्यावर अगर श्रम करून आल्यावर कधीं दमल्या भागल्यासारखें वाटून त्यावेळीं कोणी तरी चहाचा प्याला पुढें ठेवावा, असें वाटत असतें. पण त्या स्वतंत्रतेच्या सुखांत एवढीच, आणखी एकदोन संटरफटर गोष्टी दु:खकारक वाटतात. अशा वेळीं एखाद्या हॉटेलांतलें कढत कढत पाणी पिऊन चहाची तलफ भागवावी लागते. झोंपेनंतरच्या गुंगींत मला याच आळसानें कंटाळा आल्यामुळें चहा तयार

करण्याचा मला कंटाळा आला. पण आपण होऊन चहा करून देणारें कोणीच माणूस नसल्यामुळें मी मोठया जिवावर येऊन स्टो पेटवण्यासाठीं खालीं काढला.आगपेटी ठेवण्याच्या ठिकाणीं आगपेटी आढळेना; बऱ्याच वेळानें ती सांपडली, तर स्टोव्हमधलें तेलच संपलें होतें. चरफडत मी बाटलींतलें तेल त्याच्यांत ओतलें आणि अर्धेअधिक जमिनीवर सांडलें. पण मी तिकडे लक्ष्य देईन तर ना ? काकडयावर स्पिरीट ओतून मी स्टोव्ह पेटवला आणि नळ सोडून भांडयांत पाणी भरलें. दरवाजांतून येणाऱ्या वाऱ्यानें स्टोव्ह नीट पेटेना. मी चिडून दोन्ही दारें जाऊन जोरानें ढकलली. पण जाताजातां पाण्याच्या भांडयाला पाय लागून तें सगळ्या जमिनीवर पसरलें.आतां मला हें सहन होणें शक्यच नव्हतें. मी उरलेलें पाणी संतापानें पेटत्या स्टोव्हवर टाकून तो विझवून टाकला जाणि भांडें कोपऱ्यांत फेकून धाडकन् पलंगावर जाऊन पडलों. माझ्या सहनशीलतेची अगदीं सीमा झाली होती.

इतक्यांत बाहेर कुणाचासा पाय वाजला आणि थोडया वेळानें बंद असलेल्या दरवाजावर टिचक्याहि वाजूं लागल्या. मी त्या ऐकल्या, पण मी समोरच शून्य नजरेनें भिंतीवरील कॅलेंडराकडे पाहूं लागलों.

" काय, आहे का नाहीं हा घरांत ? " असें म्हणत आमच्या क्लासमधला परांजपे दरवाजा लोटून आंत आला आणि त्याच्यापाठून करमरकरहि आला. मी तसाच पलंगावर पडून त्यांच्याकडे अर्थशून्य नजरेनें पहात राहिलेला पाहून परांजपे म्हणाला,

"काय रे, अजून झोंपून उठला नाहींस ? आणि हें काय ? पाणी सांडलं आहे जमिनीवर ? स्टोव्हवर पाण्याचा अभिषेक केलास ? You negligent boy! कायरे हें ? "

" तुझं कर्म ! " मी वळून भिंतीकडे तोंड करून तसाच पडलों. पण अर्ध्या एक मिनीटांत मी एकदम परत वळून बिछान्यावर उठून बसलों आणि खालीं उतरीत असतानां हंसत हंसत म्हटलें,

" सॉरी हं मिस्टर परांजपे. "

परांजपेला माझ्या विचित्र स्वभावाबद्दल हंसूं आल्याशिवाय राहिलें नाहीं. मी स्टोव्ह, स्पिरिटची बाटली वगैरे साहित्य होतें तिकडे ठेऊन पुन्हां पलंगावर बसून म्हटलें,

" पण आज बुवा, बरेच दिवसांनीं सकाळींच कुठें झुकली स्वारी इकडे ? "

" छान, या आठ पंधरा दिवसांत निदान १०-१२ खेपा झाल्या असतील तुझ्या घरीं; पण एकदां--"

" पण मी मुळीं होतों कुठें इकडे ! "

" कुठें गेला होतास तर मग ? "

" बदलापुला. "

" आणि आलास कधीं ? "

" झाले दोन तीन दिवस. "

"भले ! जाण्यापूर्वी कळवायचंस तरी ! आणि येऊन दोन तीन दिवस झाले म्हणतोस, पण मी हे चार दिवस सारखा रोज तुझ्याकडे येतों आहे; होतास कुठें ?"

"सुटींत रमला आहेस तरी कुठें ?" करमरकरनें हंसत हंसत विचारलें.

"नॉन्सेन्स् !"

"नॉन्सेन्स कसं ? रमला नसलास तर गांवाला जाऊन ताबडतोब ८ दिवसांनीं कां आलास रे ? तुझ्या घरच्या मंडळीपेक्षां तुझं इथं मन कसं जास्त रमतं ?"

"ती प्रत्येकाची 'टेस्ट' आहे." मी घुटमळत म्हटलें.

"बरं तें जाऊंदे. मी आलों होतों कशाला तें तुला सांगतों. हें बघ, आपण ७–८ जण कुठें बाहेरगांवीं न जातां इथंच मुंबईत आहों. परीक्षेची दगदग मिटली असल्यामुळें सगळ्याजणांनीं एके ठिकाणीं जमून आज चैन करायची आहे. बस्, अशी मौज करायची—"

"पण आजच का ?"

"होय."

"कुठें जमायचं ?"

"कुठें म्हणजे ? तुझ्या खोलींत."

"माझ्या ?" मी आश्चर्यानें विचारलें. माझ्या खोलींत सबंध दिवस सर्वांनी मिळून चैन करायची म्हणजे तें एक मला संकटच होतें ! सबंध दिवस इकडेच अडकल्यावर शालिनीकडे कसें जावयाला मिळणार ? आणि एक दिवस गेलों नाहीं तर--

"कायरे ? गप्पसा राहिलास ? आम्हांला आजच्यापुरती तुझी ही खोली मिळालीच पाहिजे. चांगली औरसचौरस आहे. No excuse will do ! या कामासाठीं तर आज इतके दिवस तुझ्याकडे घिरट्या घालतों आहे. पण तूं काय ! झाला आहेस दंग आपल्याच उद्योगांत."

शेवटचें वाक्य परांजपे हंसत हंसत करमरकरकडे डोळ्याचा खेळ करीत म्हणाला. करमरकरहि माझ्याकडे पाहून हंसूं लागला. पण मी तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. मी माझ्यावर ओढवलेल्या संकटाचाच विचार करीत होतों. कांहीं झालें तरी सगळी मंडळी येथें जमल्याशिवाय रहाणार नाहींत. अर्थात त्यांना सर्वांनां सोडून मी एकट्यानें निसटून शालिनीच्या घरची वाट धरणें शक्यच नव्हतें. मग यांतून सुटायचें कसें ?--

"बरं, Good day. आम्हीं चाललों आतां–अरे, हो, पण तुझी सब्स्क्रिप्शन देतो आहेस का आतां ? एक एक रुपयाच काढली आहे. मात्र तूं जास्त देणार असलास तर आम्हीं रिजेक्ट करूं असं कांहीं नाहीं." परांजपे उठत उठत म्हणाला. मी खिशांतलें पाकीट काढून एक रुपया त्याच्या हातावर ठेवला आणि पुन्हां पाकीट बंद करून खिशांत ठेवलें. परांजपेनींहि तो खिशांत टाकून ते दोघेजण उठले.

" बरं, अकरापर्यंत सगळे तुझ्या खोलीत येतील. तूं मात्र कुठें पळून जाऊं नकोस हं. नाहींतर सगळा घोंटाळा करून टाकशील. आज खानावळींत जाऊं नकोस, समजलं ?"

" हुं. "

"बरं, आम्हीं जातों आतां.पुढची सगळी ॲरेंजमेंट केली पाहिजे.बरं Good bye."

दोघेहि निघून जातांच मी पलंगावर येऊन पडलों. या १५-२० मिनिटांत सगळ्या गोष्टी माझ्या मनाविरुद्ध होत होत्या. त्यावेळीं मला वाटलें, मी त्यावेळीं घरीं नसतों तर किती वरें झालें असतें ? पण--

मी अजून चहा घेतला नव्हता; म्हणून स्टोव्ह वगैरे पेटवण्याच्या भरीस न पडतां कोट टोपी घालून खोलीच्या बाहेर पडलों आणि कुलूप लाऊन खालीं आलों. पर्शियन इंडियनमध्यें चहा व खारी बिस्किट्स् मागवून टेबलावरचा टाइम्स वाचत बसलों.

" Good morning dear Jaya ! (गुड मॉर्निंग, डियर जया.) " माझ्या पाठीवर कोणी तरी हळुच थाप मारली. म्हणून मी मागें वळून पाहिलें.

" काय, प्रभाकर, सकाळींच आलास ! कुठें गेला होतास वाटतं ? "

" पहाटें जरा लवकर उठलों, तेव्हां हँगिंग गार्डनवर गेलों होतों. या वाटेनें सहज जात होतों परत घरीं. तूं पाठमोरा बसलेला दिसलास. "

" ए वेटर, चाय और खारा बिस्केट लाव एक आनेका. "

" अस्सं—" प्रभाकर आतां साफ निवळून गेला होता. आणि याचें श्रेय मला आहे अस अण्णा, शालिनी वगैरे एकसारखीं म्हणत.

चहाचा घोट घेत घेत प्रभाकर म्हणाला,

" जया, आज आमच्याबरोबर नाटकाला येतोस का ? "

" नाटकाला ? कोण कोण जाणार ? "

" सगळीं जणं. अण्णासुद्धां येणार आहेत. "

" यशवंत कंपनीच्या सौभद्राला वाटतं ?--पण--"

" पण कायरे ? तुला कसली अडचण आली आहे ? "

" आमच्या खोलींत आज सारे क्लासफ्रेंड्स् जमणार आहेत. "

" कशाला ? " प्रभाकर बिस्किट् तोंडांत टाकीत टाकीत आश्चर्यानें म्हणाला.

" काय वेड डोक्यांत भरलं आहे झालं त्यांच्या ! आज अगदीं मनमुराद मजा मारण्याची त्यांची इच्छा आहे. आणि माझ्याशिवाय कोणाची स्पेशल खोली मिळणार ? "

" मग तूं येत नाहींस तर ? तूं आतां भेटला नसतास तर मी तिकीटसुद्धां काढणार होतों तूं येशील या भरंवशावर. "

" माझी सुद्धां इच्छा होती. पण आतां तें जमणार कसं ? "

" बरं, पण आतां कुठें जाणार आहेस तूं ? "

" तुमच्या घरींच निघालों होतों यायला ! "

" मग चल तर ! " मी खिशांतून पाकीट काढून पैसे देण्यापूर्वीच प्रभाकरानें खिशांतला रुपया इराण्याच्या पुढ्यांत काउंटरवर फेंकला आणि बाकीचे पैसे घेऊन तो आणि मी खालीं उतरलों.

घरीं गेल्याबरोबर शालिनीनेंच मला पहिला प्रश्न विचारला,

" आज नाटकाला येणार ना आमच्याबरोबर ? "

" कां ? आमचं तिकिट काढायला कबूल आहेस ? " मी हंसत हंसत विचारलें.

" मग काय आम्हीं तुम्हांला पैसे खर्चायला नाहीं सांगत. "

" पण आम्हांला यायचंच नसलं तर ? "

" पण तें चालणारच नाहीं ना ! "

" वाः, म्हणजे आम्हांला दुसरीं कामं नसतात वाटतं ? आम्हीं कांहीं तुमच्यासारखे रिकामे नाहीं. " मी अगदीं गंभीर चेहरा करून म्हटलें.

" कसलं काम आहे ? "

" तें सांगून तरी काय उपयोग ? "

" इतक्या आडवाटेनं जाण्यापेक्षां मनांतून यायचं नाहीं असं स्पष्ट म्हटलं तर ? "

शालिनी कांहींशी रागानें माझ्याकडे न पाहातां घरांत निघून गेली. मी तसाच स्वतःशीं हंसत हंसत बाजूचं सौभद्र नाटक चाळीत बसलों.

" जा ग, शालिन, नानांना चहा नेऊन दे हा. " स्वयंपाकघरांतून शालिनीला आईनें म्हटलेलें माझ्या कानीं पडलें.

" मी नाहीं देणार- वसंतला नेऊन द्यायला सांग. "

शालिनी माझ्यावर रागावली हें माझ्या लक्षांत आलें. शालिनी एरव्हीं किती गोड स्वभावाची मुलगी होती ! पण अशीच तिला कधीं कधीं क्षुल्लक कारणावरून रागाची लहर येत असे; आणि तिचा राग घालवतां घालवतां मी तर अगदीं कंटाळून जाई. पण एकदां राग गेल्यावर तिच्या मनांत कसलेंच किल्मिष रहात नसे आणि मग ती इतकी बोले, इतकी हंसे--

वसंतानें चहा आणण्यापूर्वीच मी आंत गेलों आणि त्याच्या हातांतला पेला घेऊन तो पिऊं लागलों.

" काय हो नाना, शालिनीला रागवायला काय झालं ? "

" कुणास ठाऊक ? " मी तिच्याकडे न पाहतां चहाचा घोट घेत म्हणालों.

" वेडो पोर आहे झालं !--हो खरच, पण तुम्हीं आमच्याबरोबर आज नाटकाला येणार ना ? जेवायला इकडेच रहा आज. "

" मला येतां येणार नाहीं. "

" कां ? "

" आज आमच्या घरीं मित्रमंडळी सगळी जमणार आहे. आणि त्यांना सोडून मला तिथून एकटाच जातां येणें शक्यच नाहीं. "

" च्, आलां असता म्हणजे बरं झालं असतं. "

" हो, खरंच. " असें म्हणून मी पेला खालीं ठेवला आणि रुमालानें तोंड पुशीत बाहेर आलों. शालिनी बाहेर बसली होती. पण मी येतो आहे असें पहातांच ती पलीकडच्या खोलींत जाऊं लागली.

" शालिन " मी हांक मारली. पण माझ्याकडे न पहातां ती कपाळावर ओढून ताणून आठ्या पसरून निघून गेली.

× × ×

शालिनीला रागवायला कारणाचीसुद्धा कधीं कधीं गरज लागत नसे.ती उगाच केव्हां केव्हां माझ्यावर रागावत असे. आणि ती माझ्याशीं मुळींच बोलली नाहीं म्हणजे मी अगदीं अस्वस्थ होत असे. परंतु तिचा राग मात्र दोन दिवसावर कधींच टिकत नव्हता. तिचा राग गेला म्हणजे प्रथम माझ्याकडे पहतांना, माझ्याकडे बोलण्याचा प्रयत्न करतांना तिची अशी कांहीं गोंधळलेली स्थिति होई कीं त्यावेळीं मी तर मनांतल्या मनांत खूब हंसत असे. कांहीं कारण नसतांना ती वसंताला 'दलाल' नेमून मला कांहीं तरी विचारी; आणि असें झालें म्हणजे मी समजावें कीं आतां हिची लहर गेली. पण तो राग जाऊन आम्हीं दोघेजण पुन्हां बोलते झाल्यावर किती गोड प्रसंग निर्माण होई! आम्हांला एकमेकांना मग मुळींच सोडवत नसे. त्यावेळीं थट्टा काय, मस्करी काय---आणि म्हणूनच मला केव्हां केव्हां वाटे कीं शालिनी माझ्याशीं नेहमीं रागवावी. मनुष्याला आशेचें आमीष दिसलें म्हणजे प्रथम तो वाटेल तें संकट सहन करील. भात चांगलें यावें म्हणून शेतकऱ्याला प्रथम जमिनीची मशागत करण्याचे कष्ट सोसावे लागतात. पढल्या आशेचेंच आमिष त्याला लागलेलें असतें.आणि याच कारणासाठीं शालिनी माझ्यावर नेहमीं रागवावी असें मला वाटत असे. शिवाय ' कलहाशिवाय प्रेम सुनें गमत असतें' हेंहि 'तत्व' मला पुरेपुर पटत होतें.

माझ्याखेरीज सर्वांनीं त्या दिवशीं मन मानेल तशी चैन केली; पण मी त्यांत फारच थोडा भाग घेत होतों. माझा मुखस्तंभपणा पाहून सर्वांनीं जवळ जवळ एक तऱ्हेचेच तर्क बोलून दाखविले. पण मी मात्र तोंडावर उसनें हंसूं आणून त्यांना उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं. मी सारखा जाण्यासाठीं चुळबुळ करीत होतों; पण मला जायला मिळेनाच. शेवटीं मी एक युक्ति काढली. आमच्यापैकीं बऱ्याच जणांनीं ' सौभद्र '--आणि त्यांतल्या त्यांत यशवंत कंपनीचें--पाहिलें नव्हतें, म्हणून बोलतां बोलतां मी म्हटलें,

" आतां असेंच बसून दिवस घालवण्यापेक्षां आपण सौभद्राला जाऊं. सरनाइकाचं 'पांडुनृपति ' म्हणे फारच ' एक्सलंट् ' वठतं. "

" खरंच, पटवर्धन, आपण जाऊं आज. आणि आजचा शेवटचा खेळ आहे. मग परत कधीं कंपनी तोंड दाखवायला येईल कोणाला ठाऊक ! आतां तिकिटं मिळतील नाहीं ? " पंडीतानीं मला विचारलें.

"कां नाहीं मिळणार ? It is just 2-15. (आत्तां कुठें २-१५ झाले.)" मी रिस्टवॉचकडे पाहून झटलें.

परांजपे कुरकुर करीत होता; पण सर्वांनीं त्याचा इनकार करून नाटकाला जाण्याचा ठराव पास केला. मोठ्या मुष्किलीनें आम्हांला तिकिटें मिळालीं. पण तीं पावणे दोन रुपयाची होतीं. आम्हांला बरेंच पुढें बसावयाचें होतें. पण सगळ्या 'सीट्स्' भरून गेल्या होत्या. आम्हीं गेलों त्यावेळीं अडिच वाजले होते. थिएटरांत शिरतांच मी उत्सुकतेनें थिएटराचा काना कोपरा निरखून पाहिला. पण मला पाहिजे होतें तें तेथें मुळींच मिळालें नाहीं. शालिनी, प्रभाकर अगर अण्णा कोणीच आलेलें दिसलें नाहीं. मला वाटलें मी जाणार नाहीं म्हणून त्यांचा बेत रहित झाला असेल.

मी नाटक पहायला जाण्याची 'टुम' उगीच काढली असें मला आतां वाटूं लागलें. कारण मी तें नाटक पूर्वी पाहिलें असून सुद्धां न पाहिल्याचा बहाणा करून नाटकाला जाण्याचा ठराव पुढें आणला होता. तेंच तेंच नाटक पुन्हां पुन्हां पहाण्यांत मौज नसते. पण ज्या कारणासाठीं नाटकाला जाण्याचें माझ्या मनांत होतें तें कारण तसेंच राहिलें. शालिनी अगर कोणीहि अजून आलीं नव्हतीं. मला वाटलें आणखी थोडया वेळानें सर्वजण येतील. पण सव्वा तीन वाजून नाटक सुरूं होण्याची घंटा वाजली तरी कोणीच येण्याचें चिन्ह दिसेना. माझी दृष्टि दरवाजाकडे सारखी लागून राहिली होती. पंडितांच्या लक्षांत माझी ही मनःस्थिति आल्यासारखी मला वाटलें. कारण तो कांहींसा तशाच अर्थाचें बोलला. पण माझ्या कानावर त्याचे शब्द पडले नाहींत. अगर पडले असले तरी ते मला कळले नाहींत

नाटक सुरूं झालें; पण तिकडे माझें फार थोडें लक्ष्य लागलें होतें. मी 'स्टेज'कडे पहात होतों एवढेंच; पण मला मात्र त्यांत कांहींच कळत नव्हतें. कुठून नाटकाला आलों असें मला वाटलें.

प्रकरण ८ वें.

चौपाटीवर.

अण्णांच्या घराच्या डाव्या बाजूला प्रभाकरानें आणि शालीननें मिळून एक छोटासा बगिचा उठवला होता. दोघानांहि आणि त्यांतल्या त्यांत शालिनला फुलझाडांची हौस विशेष असल्यामुळें त्या छोटया बगिच्याची त्यांनीं छानच निगा राखली होती.

सकाळींच शालिन देवपुजेसाठीं बगिच्यांतली फुलें तोडीत होती. मी उतावळ्या मनःस्थितींत पायऱ्या चढतां चढतां तिला पाहून तेथेंच एक क्षणभर थबकलों. आणि चटकन् पायऱ्या उतरून तिच्या बाजूला गेलों. माझ्या पावलांची चाहूल ऐकून तिनें तोंड

वळवून पाठीं पाहिलें. मी तिच्याकडे पाहून हंसलों.पण तिकडे लक्ष्य न देतां तिनें माझ्याकडे पाठ करून फुलें तोडण्यांत दंग असल्याचा आव आणला. मी जरा पुढें जाऊन म्हटलें,

" शालिन ! "

" काय ? " तिनें माझ्याकडे न बघतां ताटव्यावरचें गुलाबाचें फूल तोडतां तोडतां विचारलें.

" माझ्याकडे पहायला सुद्धां कबूल नाहींस अं ? "

" पहाण्यासारखं काय आहे तिथं ? " तिची विचारण्याची ढब रागाची होती हें मी चटकन् उमजलों.

" आजच तुला तिथें काहींच दिसत नाहीं, आणि रोज माझ्याकडे तासचे तास टक लावून पहात बसतेस ती ? " मी आसपासची परिस्थिति विसरून बोललों.

" कधीं पाहिलं होतं ? आणि पाहिलं असलं तरी दर क्षणाला जग बदलतं आहे हें कॉलेजमधल्या माणसाला कळूं नये म्हणजे बाई आश्चर्याचीच गोष्ट आहे." शालिन स्वतःशींच हेटाळणीच्या स्वरांत हंसून म्हणाली.

" जग बदलत असलं तरी तुझ्या माझ्या रोजच्या व्यवहारांत काडीचा फेर होण्याइतका आम्हांला जगाचा नियम लागूं नाहीं. खरं ना हें ? "

" मला नाहीं ठाऊक. "

" ठाऊक नाहीं कसं ? तूं असं त्यादिवशीं म्हणाली नव्हतीस का ? "

" असेन. त्यावेळीं मी शुद्धीवर नव्हतें. मनाच्या बेभान स्थितींत मला नकळत माझ्या तोंडून असलं एखादें वाक्य निघालं म्हणून तें कांहीं अगदीं मनापासून निघाल आहे असं म्हणतां येत नाहीं. झोपेंत सुद्धां एखादा स्वतःला राजा समजून आपल्या कल्पनेंतल्या नोकरांना हुकुम सोडीत असतो. म्हणून कांहीं त्याला खरा राजा म्हणतां येणार नाहीं. " शालिन एखाद्या पाठ केलेल्या माणसासारखी झरझर बोलत होती.

" शालीन, किती खाष्ट आहेस ग, तूं ? त्या दिवशीं जरी नसलं तरी आतां मात्र तूं अगदीं बेशुद्धींत बडबडते आहेस असं वाटतं. "

पण माझ्या बोलण्यावर कांहींच उत्तर न देतां हातांतल्या परडींत पुरेशीं फुलें झालेलीं पाहून ती माझ्याकडे न पाहतां झरझर पायऱ्या चढून घरांत गेली. नुकतीच आंघोळ केल्यामुळें ती पाठमोरी होती तरी फारच सुंदर दिसत होती. रागामुळें तिचें पाउलसुद्धां नीट पडत नव्हतें. पायऱ्या चढतां चढतां पायांत पाय आडखळून ती एकदां पडली देखील. पण ' आई ग ' असे अस्पष्ट उद्गार तोंडांतून काढून ती पुन्हां तितक्याच वेगानें झरझर पायऱ्या चढून वर आंत गेली. मी एक मिनिटभर होतों त्याच ठिकाणीं उभा राहिलों आणि खिन्नपणानें पायऱ्या चढून आंत दिवाणखान्यांत गेलों.

पोंच व अभिप्राय

निर्झर.—(हस्तलिखित मासिक) सं. रा. रा. अ. म. प्रभू.—शिरोडें (वेंगुर्ले) येथील टयू. इं. स्कूलमधील विद्यार्थ्यांनीं चालविलेल्या या हस्तलिखित मासिकाचा दिवाळी अंक प्रसिद्ध झाला आहे. विषयवैचित्र्याच्या दृष्टीनें अंक चांगला सजविण्यांत आला असून लेखांमध्येंहि गु. रा. रा. श्री. कृ. कोल्हटकर हा चरित्रपर निबंध, ' सरस्वतीपूजन ' ही गोष्ट, रा. जनार्दनमूर्ति यांचा ' शरीरसंपदा ' हा व्यायामविषयक लेख, व मेघनाद यांच्या कविता सरस आहेत. शुद्धलेखनाकडे दुर्लक्ष व सुबक हस्ताक्षराचा अभाव या गोष्टी मात्र या सुंदर अंकाला वैगुण्य उत्पन्न करतात. संपादकांनीं तिकडे जरूर लक्ष पुरवावें.

ज्ञानोत्साह—(हस्तलिखित त्रैमासिक) येथील चिकित्सक स. हायस्कूलांतील कित्येक विद्यार्थ्यांनीं शाळेंतील एक शिक्षक रा. सरमुकादम बी. ए. यांच्या मार्गदर्शकत्वाखालीं हें त्रैमासिक चालविलें असून त्याचा ६ व्या वर्षाचा १ ला अंक प्रसिद्ध झाला आहे. ऐतिहासिक चरित्रें, ' माझा देश ' हें प्रहसन व 'ताऱ्याचा उपदेश ' ही कविता हे विषय चांगले वठले असून 'अरुणा'च्या वाचकांना परिचित असलेले तरुण चित्रकार रा. धारगळकर यांनीं अंकांतील विषयांना अनुसरून सुंदर चित्रें काढल्यामुळें अंक सुंदर झाला आहे. परंतु हस्तलिखित मासिकामध्यें विशेश दिसून यावयास पाहिजे असलेल्या गोष्टींचा (सुबक हस्ताक्षर व शुद्धलेखन) या अंकांत अभाव आहे असें खेदानें म्हणावें लागतें.

कुंजवन—ले. श्री. ग. वि.आठलेकर.वैनतेय ग्रंथमालेचें (सावंतवाडी) हें पहिलें पुस्तक असून यांत रा. आठलेकर यांच्या निरनिराळ्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या लघुकथा संग्रहित केल्या आहेत.सर्वच लघुकथा जरी वरच्या दर्जाच्या नसल्या तरी पुस्तक एकंदरीत एकदां तरी वाचण्यालायक झालें आहे.

मनोहर माला (ख़ास अंक) 'अरुण माले'च्याच धर्तीवर निघालेल्या या नवीन मालेचा खास अंक (पुष्प४) थोडयाच दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाला आहे. खास अंकांतील सर्व लेखांत 'स्त्रिया व सहकारिता ' 'बेवंदशाही ' नाटकाचें परीक्षण, हे लेख उत्तम असून विनोदी लेखही कांहींसे बरे साधले आहेत. ' आप्पांच्या गुदगुल्या ' व ' बावळट पुरोहित व मूर्ख यजमान ' हे पोरकट विषय ' खास ' अंकाचे कीं काय ?

अभिनंदन.

आमच्या एक बालवर्गणीदार कु. शिरीन खं. धैर्यवान यानां स्टूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सो. शाळेंत पहिल्या स्कॉलर ठरविण्यांत आलें असून १ मार्च १९२६ पासून पुढें ३ वर्षेंपर्यंत दरमहा ३ रु. शिष्यवृत्ति मिळणार असल्याचें सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे. आमच्या इतर बाल वर्गणीदारांकडून आम्हीं याच यशाची अपेक्षा करतों.

मेंदुचे विकार व डोकें दुखणें यावर.

किं. १-२-०,] ब्राम्ही तेल [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा:—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळंत काढा:—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळकडू:—उपजल्यापासून देण्यास योग्य किं. ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायणें वगैरे औषधें तयार आहेत. एक आणा आला असतां रुग्ण पत्रिका, लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचना:—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांचा खप वाढल्यामुळें नक्कल सुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळीं या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयौषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.
दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्यचे काळे न होणारे दागिने

शर्टची बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोत्याची रु. ५. आंगठी रु. १; सल्ले जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. २॥; घडाळ्याचा छेडा रु. ३;

केंस काळे करण्याचा साबण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्याच्या बॉक्सला रु. १॥.

इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुड्यासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. अमृतवाडी, गिरगांव, मुंबई



किंमत ३ आणे.

संपादक—मो. ग. रांगणेकर

अरुण कार्यालय,
२ री भटवाडी, मुंबई ४.

वा. व. ट. ख.
२। रुपये.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं
जगाविख्यात "निवडक औषधें."

नं. १ **फिवरॉल**–सर्व जातींच्या साध्या-दोषी–विषारी-मुदती–सांथीच्या तापांवर अप्रतिम. किं. रु. १॥-

नं. ५ **मलेरिन**–अखिल हिंदुस्थानांतील पहिलेंच सर्वश्रेष्ठ–अत्यंत सोईस्कर ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. १।-

नं. ६ **मलेरिन नं २**–अल्पमोली पण खात्रीपूर्वक अत्यंत गुणी ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. ।॥

नं. १४ **हिस्टेरिन**–स्त्रियांच्या हिस्टेरिया–उन्माद–गुल्मादिकांवर सर्वोत्कृष्ट. किं. रु. ३

नं. १५ **थॅमिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट–हट्टी–प्राणघातक दम्यावरअमोलिक. किं. रु. ३

नं. १९ **जर्मिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट हट्टी-हाडींमासीं खिळलेल्या उपदंश गर्मीवर. किं. रु. ३

नं. २० **सँट्रोल**–प्रमेह--परम्यावर; लघवीची आग–तिडिक–जळजळ ५।६ तासांत बंद ! किं. रु. ३॥

नं. ३९ **एलिक्झीर शिलाजित कंपाउंड**–सर्व प्रकारच्या मूत्रदोषादि विकारांवर. किं. रु. ३

नं. ४२ **रास्ना कॉर्डियल**–अर्धांगवायू-पक्षाघात,कटिशूल, संधि– आमवातादिकांवर. किं. रु. ३

नं. ४८ **मस्तकशूळावर रामबाण वडया**-असह्य मस्तकशूळ-अर्धशिशी ५ मिनिटांत बंद ! किं रु. -॥।-

नं. ४९ **वीर्योटोन गुटिका**–सर्वांग सुंदर धातुपौष्टिक; रक्त-मांस-मेंदू-बलवर्धक. किं. रु. २॥-

नं. ५० **चैतन्योटोन गुटिका**–यॉहिंबिनयुक्त; मर्दाईवर जगप्रसिद्ध निर्वाणीचा उपाय. किं. रु. ६

नं. ५१ **चैतन्योटोन तेल**–मर्दाईवर तात्कालिक व चिरकालिक बाह्योपचार किं. रु. ५

नं. ५४ **एलिक्झीर पॅन्टी कन्व्हलशन**–लहान मुलांच्या आंकडीवर प्रतिज्ञेचें औषध. किं. रु. २

नं ७८ **वेदिक पेन बाम**–वातहारक, दुःखशामक, सूजनाशक, झटपट– चिरकालिक गुण. किं. रु. -॥।-

मोठा सचित्र क्याटलाग व नविन वर्षाचें सर्वांगसुंदर क्यालेंडर १ आण्याचें तिकिट पाठविल्यास मोफत पाठवूं.

कुळकर्णी ऍण्ड सन्स, मुंबई नं.२.

अमृतधारेची सिल्व्हर ज्युबिली.

"अमृतधारा भुवनामध्यें" मेंटया धामधुमीनें ता. १० ते १६ मार्चपर्यंत प्रतिष्ठित सज्जनांनीं व लेडीनीं भाग घेऊन जो उत्सव साजरा केला त्याचा विस्तृत वृत्तांत छापून तयार झाला असून मागविण्याचा तो फुकट पाठवून देण्यांत येईल.

या सिल्व्हर ज्युबिली निमित्त

ता. ३१ मे १९२६ पर्यंत अमृतधारा $\frac{3}{4}$ किंमतीस व इतर औषधें व पुस्तकें निम्म्या किंमतीस देण्याचें ठरविण्यांत आलें असून या सवलतीप्रमाणें अमृतधारेची २॥ रुपयांची १। रुपयांची व नमुन्याची ८ आण्याची बाटली अनुक्रमें १ रु. १४ आणे, १५ आणे व ६ आणे या किंमतींत देण्यांत येईल. व इतर शेंकडों औषधें व पुस्तकें अर्ध्या किंमतींत मिळतील. कॅटलॉग फुकट.

जलदी करा व या दुर्लभ संधीचा पूर्ण फायदा घ्या.

पत्रव्यवहार व तारेचा पत्ता:—

अमृतधारा, लाहोर.

अनुक्रमणिका.

१	समुद्र व निर्झरिणी---(कविता) 'कुमार' ...	१
२	थारेपालट---(सं. गोष्ट) श्री. स. बा. पांचवडकर...	३
३	खुडलेलीं फुलें---श्री. श्री. कृ. कोल्हटकर व कॅप्टन लिमये	१३
४	"मेली पोरांची जात !"---कु. सुमतीबाई दडकर	१५
५	मुलांची मौज	१६
६	धीरद्वय---(चरित्र) श्री. भा. वि. नाडकर्णी ...	२३
७	आदर्श—(देवदूताचें गमन) श्री. शां. अ. सवनीस	२६
८	दोन स्थित्यंतरें—श्री. 'मंगळमूर्ति'	२९
९	उगवत्या सूर्यास प्रणाम---(कविता) 'विवेक'	३२
१०	क्षणभंगुर—(चालू कादंबरी)	५७
११	पोंच व अभिप्राय	४३

अहो ! बेपत्ता झा—ले !

नाहीं हो ! पत्ता बदलला

लिंग्रस ब्रदर्स,

गोवर्धनदास बिल्डिंग, पोर्च्युगीज चर्च, गिरगांव—मुंबई

या ठिकाणीं गेले.

कडक्री न शक्तीचर ४२ वनस्पतींचा गोड



अशक्त मलें, स्त्रिया व पुरुषांना शरीर धष्टपुष्ट आणि सशक्त होण्यास हा काढा वापरा. किं. १। ६.

पर्ल आणि कंपनी,

राणीचा बाग, मुंबई.



"प्रतिबिंब"

रा. वैद्य, पुणें.



इंदूरचे
माजी
महाराज
श्रीमंत
तुकोजीराव
होळकर

इंदूरचे
राज्यारूढ
महाराज
श्रीमंत
यशवंतराव
होळकर

अरुण माला.

वर्ष २.] मार्च १९२६ [अंक ७.

समुद्र व निर्झरिणी.

(वृत्त—दिंडी.)

रम्य रत्नाकर नाम जगीं गाजे ।
सकल सरितांचा नाथ हा विराजे ॥
लाट साधी चुंबिते गगनभागा ।
कुठें तुलना लाभेल महाभागा ? ॥ १ ॥

नित्य मेघांतें अर्पितो अहेर ।
जलद्रव्याचा भासतो कुबेर ॥
कंठ पांथाचा सुकुनि जरी गेला ।
जलधि मौजेनें पाहतसे लीला ॥ २ ॥

धार नाहीं जरि बोटभरी रुंद ।
नसे भरती कधिं, गति सदैव मंद ॥
कडयावरुनी धडपडे पडे खालीं ।
श्रांत पांथा परि निर्झरिणी वाली ॥ ३ ॥

भव्य नौका कोठल्या ? पान पृष्ठीं ।
कुठुनि रत्नें हृदिं ? रानफुलें ओष्ठीं ॥
पुण्यपर्वाचें स्नान करायातें ।
थवे लोकांचे भेटती न वाटे ॥ ४ ॥

लाजलाजुनि जी गात मनीं गाणें ।
समुद्राची गर्जना कशी जाणे ॥
ज्ञान नाहीं थैमान मांडण्याचें ।
गगनपाताळा एक करायाचें ॥ ५ ॥

अंत लागे अति सहज अशी भोळी ।
लपंडावाच्या रमत सदा खेळीं ॥
राजराजेश्वर सागराधिराज ।
वदे ' उपजे पाहुनी हिला लाज ' ॥ ६ ॥

" प्राण देउनि आपुले उन्हाळ्यांत ।
तृषार्तांचे ही धन्यवाद घेत ॥
काय लाभे परि दिव्य संतिणीला ? ।
मौक्तिकांच्या मिळतात मला माळा ॥ ७ ॥

पुनर्जीवन दे जलद दयाशील ।
खुळी आरंभी पुन्हां तेच खेळ ॥
धांवधांवे निजवित्त वेंचण्याला ।
संचयाची कल्पना नसे स्त्रीला ॥ ८ ॥

अदय मातें म्हणतात लोक सर्व ।
शब्द एकच मम हरिल वृथा गर्व ॥
मलिन मुख करि पर्जन्यकाळिं कोण ? ॥
हृदयिं वसुनी दे देव कुणा मान ? " ॥ ९ ॥

मुकी निर्झरिणी वाद कसा व्हावा ।
मनीं अनुभव परि सज्जनीं पहावा ॥
चला वेलींच्या हृदयिं पहायाला ।
पांथ-नेत्रांविण साक्ष नसे याला ॥ १० ॥

कुमार

थारेपालट

ले. श्री. सय्यदनूर बाबनसाहेब पांचवडकर, सातारा.

१]

"बरं मग ?

माझी मर्जी ! म्हणे सिनेमाला जाऊं नकोस. तुम्हांला नसेल यायचं तर खुशाल बसा पुस्तकांत डोकं खुपसून ! लोकांना कां आपल्या बरोबर त्रास ? 'अस्सच कर, तस्संच करूं नकोस,' हें ऐकायला कांहीं मी अगदीं कुकुलं बाळ नाहीं बरं ! काय मेलं माणूस तरी चम. त्कारिक असतं ?" कमलिनी अगदीं झणकाऱ्यानें बोलतच सुटली होती. कमलाकर गोरे-मोरें तोंड करून गुपचुप उभा होता. बोलावयासाठीं तो खटपट करीत होता; पण तिच्या त्या सरबत्तीपुढें तो अगदीं गोंधळून गेला होता. त्याला बोलावयास सवडच सांपडेना. अखेर मध्येंच तो बोलूं लागला,"अग, पण ऐकून तरी घेशील ना ? बोलतांना आपण काय बोलतों आहों याची तरी शुद्धी ठेवायला पाहिजे कां नको ? तुझ्या बाईटाकरितां का मी सांगत आहे ? सिनेमाला जाऊं नये असं नाहीं. पण रोजरोज नाटकं सिनेमा म्हणजे काय ? लोक नांव ठेवणार नाहींत का ? तें जरी घटकाभर बाजूला ठेवलं तरी फुकट पैसे खर्च होत नाहींत का ?"

"मी विनाकारण खर्च करते होय ? बरं लौकर सांगितलंत अं महाराज ! उद्यां चहाच कां घेतेस, असं विचारायला देखील आपण कमी करणार नाहीं ! हो, तो तरी व्यर्थ खर्चच नव्हे का ? काय बोलले हो मी असं तुम्हाला, शुद्धि न् बुद्धि काढायला ? हो, सांगून ठेवतें, मला नाहीं असलं खपायचं !" कमलिनी अगदीं 'लालीलाल' होत चालली होती. संतापाच्या भरांत अगदीं खाऊं का गिळूं असें तिला झालें होतें. तिला शांत करण्याच्या हेतूनें कमलाकर म्हणाला,

"कमु, असं काय बरं वेड्यासारखं करतेस ? लोक नांव ठेवतात ना अशा वर्तणुकीला ? म्हणून तुला मी नेहमीं असं सांगत असतों. सिनेमाला जाणं काय किंवा मैत्रिणी-बरोबर फिरायला जाणं काय, थोड्क्यांत असेल तरच बरं दिसतं. नाहींतर छचोर म्हणतात लोक. तूं चांगली सुशिक्षित आहेस म्हणून सांगायच्या या गोष्टी तुला ! जा, तूं आजच्या दिवस सिनेमाला जा. नव्हे, मीच येतों तुझ्याबरोबर; मग तर झालंना ? पण पुढें तरी जरा वर्तन सुधार."

अरे बापरे ! आतां मात्र कमलिनी वाघासारखी चवताळली. तिच्यासारख्या मानी तरुणीला वर्तन सुधारण्याचा उपदेश कुठला सहन व्हायला !

" का हो, विनाकारण माझ्यामागं तुमची ही किरकिर ? कुठं माझं वांकडं पाऊल पडलं तें दाखवा आधीं ! मानभवी भाषणं करवतात तरी कशी म्हणते मी ! वर्तन सुधारायचा उपदेश करतां होय मला ? पण आधीं माझं वर्तन विघडलंच कुठं तें दाखवून द्याना मला ! मेलं ऐकून घ्यावं तों तों जास्तीच होतं ! मनांत असायचं एक, आणि ढोंग करायचं भलभलतंच. मी पैसे खर्च करतें म्हणून ही ढोंगं आहेत; मला माहीत नाहींत वाटतं ? तशीच एकाद्या भिकाऱ्याची असतें तर काय केलं असतं कोण जाणें ! पूर्वीचे दिवस विसरलांत वाटतं ? काय पण गोगलगायीसारखं रूप धारण केलं होतं ! बाबांनीं हाताशीं धरलं नसतं, म्हणजे समजलं असतं. पण त्याची आठवण आतां कशाला होईल ? आतां माझा खर्च वाटूं लागला. माझं यांत कांहीं नाहीं ! अगदीं पदरालाच खार लागतो आहे वरं, अन तो तुम्ही म्हणूनच सोसूं जाणें ? जाईना का, मरेना तो सिनेमा ! शेजारच्या करमरकरानीं विचारलं 'सिनेमाला याल का ?' म्हणून म्हटलं आपणही जावं, त्यांची मंडळी जाणार होती त्यांच्याबरोबर. पण इकडे खर्चाचा बोजा वाढतो आहे, मग कशाला द्या त्रास ? राहूं द्या आमचं जाणं !" असें म्हणून कमलिनीनें रागारागानेंच पायांतले बूट काढून कोपऱ्यांत भिरकावले आणि इझिचेअरवर अंग टाकून दिलें.

* * *

२.] कायम

ह्याप्रमाणें नायक नायिकेची वंशावळ सांगून 'नसतें' कंटाळवाणें चरित्र वळवण्यापेक्षां वेंचक शब्दांत त्यांचा पूर्वेतिहास सांगावयाचें म्हटलें तर इतकेंच म्हणतां येईल कीं, कमलाकराचे वडिल कालवश झाल्यावर त्यांचे मित्र रावबहादूर—नायिकेचे वडिल—यानींच आपल्या मित्राच्या मरणकाळच्या विनंतीला मान देऊन कमलाकराला प्रवेशपरिक्षे नंतर आपल्या घरीं नेऊन त्याचें संगोपन केलें.

रावबहादूरांच्या कुटुंबांत इन्मिन् तीन माणसें होतीं. ते स्वतः, त्यांचे कुटुंब आणि त्यांची मुलगी कमलिनी. शिवाय रावबहादूरांच्या वृद्ध मातोश्री होत्या. रावबहादुरांना मुलगा नसल्यामुळें लवकरच कमलाकरावर सर्व मंडळी प्रेम करूं लागली. कमलाकरहि आपल्या मोकळ्या वर्तणुकीनें अगदीं घरांतलाच होऊन राहिला. त्याच्या वडिलांवर रावबहादुरांच्या मातोश्रीचें अगदीं मुलाप्रमाणें प्रेम असल्यामुळें कमलाकराचेहि त्या लाड करूं लागल्या. या प्रमाणें थोडयाच दिवसांत कमलाकर हा कुणा दुसऱ्याचा मुलगा आहे ही भावनाच कुणाच्या मनांत येईनाशी झाली.

कमलिनी म्हणजे सातानवसांनीं झालेली रावबहादुरांची एकुलती एक मुलगी होय. घरांत एकुकतें मूल असल्यावर त्याचे किती लाड केले जातात हें सर्वांना माहित आहेच. त्यांत श्रीमंत आईबापांची मुलगी, मग काय विचारतां ! कमलिनी म्हणेल तो पूर्व दिशा !

या गोष्टीचा परिणाम कमलिनीच्या स्वभावावर झाल्या खेरीज राहिला नाहीं.पोरीची जातच आधीं नटवी, त्यांत मन मानेल तशी वागण्याची मोकळीक. अगदीं लहानपणी देखील तिला दिवसांतून दहा पर'कर बदलावयास लागत ! बरोबरीच्या मैत्रिणींनीं तिच्या सौंदर्याची वाहवा केली म्हणजे तिला मूठभर मांस चढल्यासारखें वाटे.कळत्या वयाची सरहद्द ओलांडली तरी फुलपांखराप्रमाणें नटण्या मुरडण्याची हौस तिच्या मनांतून 'हद्दपार' होऊं शकली नाहीं.

कमलाकर तेथें आला तेव्हां कमलिनी इंग्रजी तिसरींतून नुकतीच चौथींत गेली होती.पण अभ्यासांत तिची म्हणावी तशी प्रगति नव्हती. दिवसांतला बराचसा वेळ आरशासमोर बसून केस चापूनचोपून बसविणें, योग्य ठिकाणीं व्यवस्थित पिन्स लावणें, यांत खर्च होत असल्यामुळें तिला अभ्यासाला वेळच मिळत नसे. कमलाकर तीव्र बुद्धीचा असल्यामुळें त्याला कमलिनीचा हा मठ्ठपणा आवडला नाहीं. तिनें वर्गांत पहिला नंबर ठेवावा अशी त्याची इच्छा होती. त्याला त्या कुटुंबाबिषयीं आपलेपणा वाटत असल्यामुळें कमलिनीचा हलगर्जीपणा त्याला आवडला नाहीं. त्यानें तिला एक दोन वेळां समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; पण तिनें तिकडे लक्षच दिलें नाहीं. रावबहादुरांना कमलाकराची ही कळकळ पाहून आनंद झाला. त्यांनीं कमलिनीला नीट अभ्यास करावयाचा उपदेश करून 'दररोज कमलाकराकडे एक तासभर अभ्यास विचारावयास जात जा' असें त्यांनीं तिला बजावलें. थोडया नाखुशीनेंच ती त्याच्याकडे मुकाटयानें अभ्यासाला जाऊं लागली. आपला कॉलेजचा अभ्यास बाजूस ठेऊन कमलाकर तिला मन लावून शिकवूं लागला. कमलाकर खरोखरच हुशार होता यांत कांहीं शंका नाहीं. कमलिनीसारख्या मूढ मुलीला त्यानें थोडयाच दिवसांत ताळ्यावर आणलें. त्याची शिकविण्याची पद्धतच अजब होती. कमलिनीसारखी प्रथम कानाडोळा करणारी चंचल मुलगी देखील अगदीं एकाग्र चित्तानें ऐकत बसे. तो त्याच्या समोरून उठल्यावर मात्र मुळींच अभ्यास करीत नसे. पण निम्या विषयांत तरी नेहमीं नापास होणारी कमलिनी या वर्षीं सर्व विषयांत पहिल्या नंबरांत पास झाली ! रावबहादुरानां आनंद झाला. त्यांनीं त्याच दिवशीं कमलाकराला अडिचशें रुपयाचें एक रिस्टवॉच बक्षिस दिलें.

चार वर्षें सहज निघून गेली. कमलाकर बी.ए.च्या परीक्षेंत ऑनर्सनी पास झालाच; पण कमलिनी देखील त्याच वेळीं मॅट्रिक पास होऊन तिला निम्याहून अधिक विषयांत डिस्टिंक्शन मिळाल्याबद्दल रावबहादुरानां आनंद झाला. आपल्या श्रमाचें सार्थक झालेलें पाहून कमलाकराला तर सर्वांपेक्षां जास्त आनंद होऊन, त्यानें कमलिनीचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन केलें.

याच वेळीं रावबहादुरांच्या मनांत एक कल्पना आली. त्यांनीं ती कुटुंबाजवळ बोलून दाखविली. कुटुंबानाहि ती कल्पना पसंत पडली. आणि प्रास्ताविक टाळून सांगावयाचें म्हणजे लवकरच कमलाकर–कमलिनी यांचें लग्न झालें.

याच प्रेमळ जोडप्यामध्यें प्रथमारंभीं सांगितलेला खडाजंगी खटका उडाला !

* * *

झाल्यावर कमलाकराला रावबहादुरांच्या घरीं राहणें प्रशस्त वाटलें नाहीं. एल्. एल्. बी. ची परीक्षा झाल्याबरोबर कमलाकरानें स्वतंत्र संसार सजविण्याची आपली इच्छा रा० ब० नां कळविली. त्यांनीं कमलाकराचा हेतू ओळखून त्याला तशी परवानगी दिली. पण पुण्याबाहेर जाऊं नये अशी त्यांनीं त्याला विनंति केली; इतकेंच नव्हे, पण लगेच त्यानीं त्याला एक प्रशस्त घर घेऊन दिलें. आणि गडी पण स्वतःच्या खर्चानें ठेवून दिले.

कमलाकराला आरंभीं प्रॅक्टिस फारशी नसल्यामुळें रा० ब. च बहुतेक सर्व खर्च चालवीत असत. त्यांनाही मुलगा नसल्यामुळें 'आहे तें तुझेंच आहे ' असें सांगून त्यांनीं कमलाकराला लागेल तें मागण्याची अगदीं आग्रहाची आज्ञावजा विनंति केली होती. कमलिनी कमलाकराबरोबर स्वतंत्रपणें राहात होती, तरी तिनें कॉलेजांत जाणें सोडलें नव्हतें. ती यावेळीं इंटरमध्यें होती. रावबहादुरांच्या मनांत तिनें आतां शिकणें पुरें करावें असें होतें. पण कमलाकरानें तिची इच्छा असेल तितकें शिकण्याची तिला पूर्ण परवानगी दिली. त्या प्रमाणें ती कॉलेजांत जातच होती.

कमलिनीचें वय यावेळीं जवळ जवळ वीस वर्षांचें होतें. तरी तिच्या अंगीं समंजसपणा कसा तो मुळींच नव्हता. ती नेहमीं नटण्या मुरडण्यांत अजून दंग असे. आपल्या मनाविरुद्ध कुणीं गेलेलें तिला खपत नसे. यामुळें कमलाकर व कमलिनी यांच्यामध्यें नेहमीं कांहींना कांहीं कुरबूर झाल्याशिवाय राहात नसे.

आतांपर्यंत कमलिनीच्या सौंदर्याची वाचकांना ओळख झालेली नाहीं. कमलिनी खरोखरच शंभर बायकांत सरस उठून दिसण्यासराखी होती. त्यांत फ्याशनची भर पडलेली असल्यामुळें ती फारच आकर्षक दिसत असे. खुबीदार तिरपा भांग, मुळच्याच गौर गालावर गुलाबी पावडर लावलेली, हातांत रिस्टवॉच, दुसऱ्या हातांत चिमुकली छत्री, पायांत बूट स्टॉकिंग्ज, अशी नटून स्वारी बाहेर पडली म्हणजे जाणारे येणारे नुसते पहातच राहात. तिला स्वतःला तर आपल्या सौंदर्याचा असा अभिमान होता कीं सांगावयाची सोय नाहीं. पण बिचारीचा स्वभाव मात्र अगदीं साधा होता. वर्गातल्या विद्यार्थिनींनीं तिच्या सौंदर्याची स्तुति केली, कीं ती अगदी खुलून जाई. तिला आपल्या सौंदर्याचा अतिशय गर्व वाटूं लागला. आपला दिमाख दुसऱ्यानां दिसावा म्हणून ती जीव तोडून झटत असे.

हें सर्व पाहून कमलाकराला फार वाईट वाटे. कधीं कधीं त्याचें मन बेफाम भडकून गेलें तर सहनशील बनण्याचा शक्य तो प्रयत्न करून व रावबहादुरांचे उपकार आठवून तो तिला फारसा कधीं बोलत नसे. त्याचा स्वभावच थोडा भिडस्त होता, त्यांत रावबहादुरांच्या कृपेनें त्यानें हे दिवस पाहिलेले; मग त्याच्या हातून कमलिनीला वाईट

वाटेल असें वर्तन कुठलें व्हायला ! पण त्यामुळें कमलिनी मात्र जास्त शेफारत चालली. नवरा आपल्या मुठींत असावा अशी महत्त्वाकांक्षा दिवसें दिवस तिच्या ठिकाणीं जास्त प्रबल होत चालली. आपण आपल्या सौंदर्यप्रभावानें सहज त्यांना आपल्या मुठींत ठेऊं असा तिचा आत्मविश्वास होता. त्या विश्वासाच्या जोरांत ती कमलाकराला कित्येक वेळां ती टाकून देखील बोलत असे.

पण एवढें मात्र खरें होतें कीं, कमलिनी जरी एवढा थाटमाट करी, नाटकें सिनेमा पाहावयास मैत्रिणीबरोबर एकटी जाई तरी ती निष्कलंक होती. कमलाकराला तिच्या शुद्ध मनाची ओळख असल्यामुळेंच तो तिला इतकी स्वतंत्रता देत असे. नाहींतर तेव्हांच त्यानें निराळे उपाय अमलांत आणून तिला ताळ्यावर आणलें असतें. पण तिच्या शुद्ध शीलाची त्याला खात्री असल्यामुळें तो स्वस्थ बसे. पण जगाला काय त्याचें ?

* * *

फॅशनची हांव दिवसेंदिवस वाढतच चालली होती.अभ्यासाकडे तिचें अलिकडे मुळींच लक्ष नव्हतें. केवळ फॅशन म्हणूनच ती कॉलेजांत जात होती इतकेंच. घरीं बसून 'माशा मारीत' वेळ घालवावयाचा त्यापेक्षां कॉलेजांत जाऊन साहाध्यायांशीं गप्पा मारण्यांत वेळ घालविणें तिला फार आवडे. आतां मात्र कमलिनीची वर्तणूक कमलाकराला अगदीं असह्य झाली. वर्गांत आणि थिएटरांत टारगट विद्यार्थी कमलिनीच्या भोवतीं घिरट्या घालीत असतात ही गोष्ट त्याच्या कानीं उडत उडत आली होती. तिच्या शीलाकडे पाहून आजपर्यंत त्यानें जरा दुर्लक्ष केलें होतें; पण आतां तिच्या वर्तणूकीकडे डोळेझांक करणें म्हणजे आपण होऊन आपल्या पायावर दगड पाडून घेणें आहे असा विचार त्याच्या मनांत येऊं लागला. कमलिनीच्या या वर्तणुकीला आळा घालण्यास तिचें कॉलेज बंद करणें एवढा एक उपाय होता व तो त्यानें अमलांत आणला. कॉलेज सोडतांना देखील त्या जोडप्यांत चांगलीच 'झडली.' पण कमलाकरानें 'सासूबाईंना' अगोदरच वळवून एका माऱ्याची जागा सर करून ठेवली असल्यामुळें कमलाकर विजयी झाला. कॉलेजांत जाणें बंद झालें तरी तिची फॅशन सुटेना किंवा कमलाकराला पण ती दाद देईना.

कमलाकर एकटा बसला म्हणजे त्याचें याच विषयावर डोकें भणाणून जाईपर्यंत विचार चालत तो कमलिनी आणि त्राटिका यांची तुलना करी. त्या तुलनेंत दोघींत पुष्कळ साम्य त्याला दिसे. त्राटिका कजाग होती, त्रासिक होती, चमत्कारिक होती पण मनाची मऊ होती. तशीच कमलिनी काव्यमय होती, फॅशनेबल होती, हेकेखोर होती आणि सौंदर्याचा अभिमान तर तिच्या रोमरोमांत खिळला होता. पण तिचें शुद्ध हृदय अल्लडपणामुळें खोट्या मोहांत गुरफटलें होतें. कमलाकराला प्रतापरावाचा पार्ट घेऊन त्राटिका नाटकाची सुधारलेली आवृत्ति काढून जगाला चौदाव्या रत्नाचा प्रभाव दाखवावा असें वाटे.

पण त्याला हा विचार मनांतच ठेवावा लागे. पण केलेल्या संगीत प्रयोगामुळें रावबहादुरांना कदाचित् वाईट वाटेल असें त्याला वाटे. आपल्याला ज्यानें उर्जित अवस्थेला आणलें इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष पोटची मुलगी आपल्याला दिली त्याचें मन दुखावेल असें कांहीं करणें त्याला बरें वाटेना. म्हणून त्यानें कधीं ती सुधारेल तेव्हां सुधारेल म्हणून स्वस्थ बसण्याचें ठरविलें. कमलाकराच्या या कृत्याला कांहींजण 'बाइलबुद्धि' अथवा 'मिंधेपणा' हें नांव देतील, पण जगाच्या तोंडाला लागावें कोणी ?

* * *

५] कसलीशी

सुटी असल्यामुळें कमलाकर आज घरींच होता. कमलिनी जवळच एका इझिचेअरवर कादंबरी वाचीत पडली होती. कमलाकर कामाचे कागद पाहत असतां मधून मधून तिच्या रम्य मुखाकडे पहात होता. कमलिनी यावेळीं पारशी फॅशनचें गुलाबी रंगाचें रेशमी पातळ नेसली होती. अंगांत जांभळ्या रंगाचा पोलका घातला होता. गळ्यांत थेट युरोपियन फॅशनची टपोऱ्या मोत्यांची एकच माळ तिच्या मोहकतेंत भर टाकण्यासाठीं वक्षःस्थलावर रुळत होती. कोमल मनगटावरील चिमुकले रिस्टवॉच चुक् चुक् चुक् चुक् असा शब्द काढून कमलिनीच्या सान्निध्यामुळें झालेला आनंद व्यक्त करित होतें. शटर्स-मधून येणारा प्रकाश निळसर भिंतीवरून परावर्तित होऊन तिच्या अंगावर पडल्यामुळें तिचें सौंदर्य फारच खुलून दिसत होतें. कमलाकर हातांतलें काम तसेंच धरून कितीतरी वेळ तिच्याकडे पहातच होता. तिचें तें मुग्ध सौंदर्य पाहून तो क्षणभर मंत्रमूढ झाला. त्याला आपल्या पत्नीच्या सौंदर्याबद्दल साभिमान आनंद वाटला. थोडीशी गंमत करण्याच्या हेतूनें तो म्हणाला, " कमल, कसलं वाचन चाललंय् इतकं ? आज कुठें फिरायला वगैरे जायचं नाहीं वाटतं ? "

हातांतील पुस्तक मिटून हंसतच ती म्हणाली, " न जायला काय झालं ? पण इकडून परवानगी तर मिळाली पाहिजे ना ? सदान्कदा आपलं घरांत बसायची संवय लागलेली; तेव्हां मी फिरायला निघालें कीं कांहीं तरी सबब पुढें येते. म्हणून बसले आहे वाचीत. "

" आहे खरं; आमच्यासारखी रानवट माणसं घरांत बसली काय किंवा फिरायला गेलीं काय, त्यांच्यांत कांहीं फरक पडणार नाहीं. पण हें असलं सुंदर कमल घरांत कोंडून ठेवल्यास तें कोमजल्याशिवाय राहणार नाहीं. खरंच, उघड्या हवेशिवाय असल्या नाजूक फुलांना टवटवी येणार नाहीं ! मग कुणीकडे जाण्याचा आज बेत आहे कळूं द्या तरी. "

कमलिनी खुलत चालली. ती म्हणाली, " मी नाहीं जा ! उगीच आपलं तोंडापुरतं बोलतां झालं ! आतां स्तुति कराल तर घटकेनं नांवं ठेवायला लागाल. घरांत बसलें म्हणजे का मी विद्रुप दिसते, होय ? इश्श, कांहीं तरीच ! "

"भले, घरांत तूं विद्रूप दिसतेस असं का मी म्हणालों? अग, असलं सौंदर्य उघडया हवेंत जरा जास्त खुलून दिसतं! घरांतच कोंडून ठेवल्यासारखं बसून राहात जा असं मी कधीं तरीं सांगितलं होतं का? उघडयावर फिरून आलं म्हणजे आमच्यासारखी रानवट माणसं देखील जरा टवटवीत दिसूं लागतात. मग तुझं तर काय–" कमलाकराला पुढें तिनें बोलूंच दिलें नाहीं.

"इतकं नको पण अगदीं हिणवायला! 'आम्ही रानवट, आम्ही रांकट' असं म्हणून मला लाजविणं चाललंय् वाटतं? त्यांत काय आहे? स्त्रिया साहजिकच पुरुषापेक्षां सुंदर असतात. म्हणून अगदीं असा कमीपणा नको कांहीं आपल्याकडे घ्यायला."

"असूं दे. मग आज फिरायला कुणीकडे जायचं तें सांगत नाहींच ना तुम्ही? चला, आज आपण देखील येणार बुवा फिरायला तुमच्याबरोबर! ह्या 'केस'चा काथ्याकूट करतां करतां कपाळ कसं पिकल्यासारखं झालंय! मग काय, नेणार ना आम्हांला फिरायला?"

कमलिनीला अगदीं गुदगुल्या होऊं लागल्या. नवऱ्याकडून असलें गोड भाषण ऐकण्याचे तिला फार थोडे प्रसंग येत. मनगटावरील घडयाळाकडे पहात पहात ती म्हणाली, "मी नको का म्हणत्यें कधीं? मला तर कित्ती कित्ती वाटतं, आपण यावं म्हणून. चलायचं गडे! आज आपण एंप्रेस गार्डनकडे जाऊं."

"अच्छा, चला तर, पण त्यापूर्वी आपल्याला या हातचा गोड चहा मिळाला पाहिजे बुवा!"

चहा करायची पाळी आपल्यावर येणार हें पाहून तिच्या कपाळावर किंचित् आंठया पडल्या. आपल्या स्वच्छ हाताकडे पाहून ती म्हणाली, "आपण तेवढा स्टोव्ह पेटवून द्यायचा गडे!"

कमलाकर आपल्या लक्षांत कांहींच आलें नाहीं अशा मुद्रेनें म्हणाला, "छट, आपण नाहीं पेटवणार बुवा! निम्मी 'टेस्ट' नाहींशी होईल आमचा हात लागला कीं. तें कांहीं नाहीं, आज अगदीं आमच्या हातांत आयता आणून दिला पाहिजे कप. चहा होईपर्यंत मी तोंड धुऊन येतों." असें म्हणून कमलाकर तेथून बाहेर पडला.

पंधरा वीस मिनिटांच्या आंत कमलाकर परत येत असतां अर्ध्या जिन्यांतच त्याला एक किंकाळी ऐकूं आली. आवाज तर कमलिनीचाच होता. हें त्यानें धोरणानें ताडलें. एकदम कमलाकरानें खोलीकडे धुम ठोकली. तों काय! कमलिनीच्या अंगावरील पातळ पेंटलें होतें! अंगावरील कपडे हात खराब होऊं नयेत म्हणून अगदीं लांबून स्टोव्ह पेटवीत असतां, तिच्या अंगावर राकेल उडालें. झिरझिरित रेशमी पातळाला पेटावयाला किती उशीर लागणार? तिनें पदर उलगडण्याची खटपट केली; पण जागोजाग लाव-

लेल्या 'पिन्स' आडव्या आल्या, तशी ती घाबरून इकडे तिकडे धावूं लागली; पण त्यामुळें जास्तीच जाळ झाला. कमलाकरानें हें पाहिल्याबरोबर त्याच्या छातींत धस्स झालें. पोलका, पातळ यांचा अगदीं भडका उडाला होता. कमलाकरानें चटकन् खुंटीवरचा ओव्हर कोट तिच्या अंगावर टाकून तिला दाबून उभें केलें. तो देखील थोडासा भाजलाच; पण मोठया शिकस्तीनें तिच्या अंगावरील कपडे त्यानें विझविले.

*　　*　　*

६]　　कमलिनीला

बरें व्हावयास चांगला एक महिना लागला. कमलाकरानें महिनाभर कामाला रजा देऊन तिच्या बिछान्याजवळ बसून तिची शुश्रूषा केली. केवळ फॅशनच्या पायीं कमलिनीनें आपल्यावर हें संकट ओढवून घेतलें होतें. आपले कपडे खराब होतील, हाताला काळें लागेल, म्हणून स्पिरिट पेटवून जपून 'पंप' करीत असतां तिच्या अंगावर पेटलेलें राकेल उडालें आणि कपडयानीं पेट घेतला. पेटलेले पातळ सोडून तिला स्वत:च्या बचाव करतां आला असता; पण पिन्स लाविल्यामुळें तेंही अशक्य झालें आणि कमलिनीचा कोमल देह भाजून निघाला !

बरीच शुश्रूषा केल्यावर ती एकदांची बरी झाली. पण काय ?...! ज्या सौंदर्याचा तिला इतका अभिमान होता, त्याची अगदीं माती झाली ! एक दिवस जरा बरें वाटूं लागल्यावर, आपण आतां कसें दिसतो हें पाहाण्याकरितां ती आरशासमोर उभी राहिली. आपल्या डोक्यांत कोणी तापलेलें लोखंड खुपसल्यासारखं वाटून तिनें दु:खानें किंकाळी फोडली ! तिच्या गोजिरवाण्या मुखाची आगीनें नासाडी केल्यामुळें तें अगदीं विद्रुप झालें होतें. एका बाजूचा गाल भाजून खरोखरीच खराब झाला होता !

त्यादिवसापासून तिचा आवडता आरसा तिला हाडवैऱ्यासारखा दिसूं लागला. तिनें त्याचें अगदीं नांव सोडलें. त्यावेळेपासून तिचा अभिमान पण नाहींसा झाला. एक दिवस मनमुराद रडून तिनें सर्व फॅशनचा त्याग करून अगदीं साध्या साधनांचा आश्रय केला.

तिचा तो पूर्वीचा तापट स्वभाव तर केव्हांच नाहींसा झाला होता. आतां आपल्याला कोणी जवळ देखील उभें करणार नाहीं असें वाटून तिला अगदीं पश्चात्ताप झाला. आतां ती घरकाम स्वत: करूं लागली. कमलाकराची सेवा मनोभावानें करण्याचा तर तिनें विडाच उचलल्यासारखं दिसत होतें. आतां कमलाकरानें कांहीं सांगितल्यास " माझ्या अंगाला काळें लागेल, माझे कपडे खराब होतील " अशी सबब न सांगतां मुकाटयानें त्याची आज्ञा पालन करूं लागली होती. सौंदर्याबरोबर तिच्या ताठयाचीहि राख झाली.

७] पुन्हां

अशीच सुटी असल्यामुळें, कमलाकर घरीं बसून नेहमींप्रमाणें कागद चाळीत होता. कंटाळा आल्यामुळें काम बाजूला ठेवून जवळच्या पंलगावर पडून त्यानें सिगारेट पेटविली. कमलिनी सामान व्यवस्थित ठेवण्यांत गढून गेलेली होती. इकडची खुर्ची तिकडे ठेव, तिकडचें चित्र इकडे लाव, अशी तिची धांदल चालली होती. यावेळीं ती अगदीं साधें लुगडें नेसली होती. बाजूला घसरलेला भांग केव्हांच ताळ्यावर आला होता. या वेषांत ती कमलाकराला खरोखरच फार रमणीय दिसत होती. पूर्वीचा तो छचोरपणा पोषाखांत कुठेंच दिसत नव्हता किंवा चर्येवर दिसणाऱ्या बेपर्वाईपणाचीहि राख झाली होती. यामुळें ती विनयवती या वेषांत सुंदर दिसत होती. भाजल्यामुळें गालावर उठलेली अर्धचंद्राकृति तिच्या मुखचंद्राच्या मोहकतेला दृष्ट लागूं नये म्हणून लावलेल्या गालबोटाप्रमाणें शोभत होती. तिच्यांत पडलेला हा फरक कमलाकर सारखा एकाग्र दृष्टीनें पहात होता. कमलिनीचें तिकडे लक्ष जातांच, जरा लाजूनच ती म्हणाली, " इतकं लक्ष्यपूर्वक काय पहाणं चाललंय् ?"

कमलाकर धुराचा लोट सोडून म्हणाला, "कांहीं नाहीं; पडल्या पडल्या परिस्तानच्या परीचं परिभ्रमण पहातोय् !"

तो हें सहज म्हणाला; पण कमलिनीला त्यामुळें वाईट वाटलें. आपल्या नष्ट सौंदर्यावर ही टीकाच असावी जशी तिची कल्पना झाली. तसा तिला मागील सर्व काल आठवला आणि दुःखाचा उसासा टाकून ती म्हणाली, " कशाला हिणवायचं नाथ आतां ? गेला माझा गर्व आतां. परमेश्वरानं चांगली अद्दल घडविली मला. माझ्या उच्छृंखलपणा बद्दल मला चांगला धडा मिळाला. पण त्याची फी मात्र ज्यास्त द्यावी लागली. हें अभद्र तोंड कुणाला दाखवूं सुद्धां नये असं वाटतं. पण काय करायचं ! असे व्रणावर घाव घालूं नयेत गडे; तिचे डोळे भरून आले.

कमलाकर पुढें होऊन तिला आपल्याजवळ ओढून म्हणाला, " कमलिनी, वेडी तर नाहींस ! मी खोटं नाहीं सांगत. खरोखरच तूं आतां पूर्वीपेक्षां पुष्कळच सुंदर दिसतेस. पूर्वीची ती पोलकीन् पातळंन् बूट वगैरे फार वाईट दिसत तुला. पण आतां तूं अगदीं साधी वागणूक ठेवल्यापासून तुझं स्वाभाविक सौंदर्य फांकूं लागलेलं आहे. पण त्याचं तुला वाईट का वाटतं ? तूं कुणालाही विचार खरं काय आहे तें."

" पूर्वीची वागण्याची पद्धत एक असेल वाईट; पण आतां मी जास्त चांगली दिसतें हें मात्र अगदीं तोंडदेखलं बोलणं आहे. मला वाईट वाटूं नये म्हणून कांहींतरीच थाप मारायची झालं ! "

" खरं सांगू का कमळ तुला ? हें बघ, यांत थापबिप कांहीं नाहीं. आजपर्यंत तूं केवळ फॅशनच्या नादीं लागल्यामुळें तो विचित्र-वेष तुला कसासाच दिसे, आणखी हें

पाहिलसं का ? तो तसला वेष कुलस्त्रियांना शोभत नाहीं. रागावूं नकोस. पण ती फुलपांखराच्या रंगाची पातळं, पोल्की, बूट, स्टॉकिंग्ज् आणखी ते आडवे तिडवे भांग, कुलस्त्रियांना बरे दिसतात का ? सांग बरं तूंच. त्या वेळीं तुझ्या अंगीं केवढा गर्व होता ! यावेळीं देखील तूं सुंदर दिसत होतीस; पण तें तामसी सौंदर्य होतं ! सौंदर्याला विनयाची जोड नसेल तर तें रखरखीत भासतं. त्याच्या योगानं मनाचं समाधान होत नाहीं, पण पर्वाच्या त्या अपघातांत तुझ्या तामस गुणांची होळी झाली, याबद्दल मला आनंद होत आहे. आतांचं तुझं सौंदर्य विनय आणि साधेपणा यांच्या योगानें पूर्वीपेक्षां शतपट अधिक शोभत आहे. पूर्वीचं तामसी सौंदर्य होतं,पण आतांचं हें सात्विक सौंदर्य आहे.हें सात्विक सौंदर्यच मला जास्त आवडतं. जाऊं द्या. आज बऱ्याच दिवसांनीं तसाच प्रसंग आलेला आहे. चला. आज आपण फिरायला जाऊं. मागें आपण एम्प्रेसकडे जाणार होतों, तिकडेच आतां जाऊं. मग, चहा करणार, का मीच पेटवूं स्टोव्ह ? ”

“ इश्श !-करत्ये बरं चहा मीच ! झालं तें झालं, आतां नाहीं बरं स्टोव्ह पेटवायला सांगायची कधीं ! ”

त्या दिवशीं कमलिनीनें हंसतमुखानें आणून दिलेला चहा कमलाकराला किती गोड लागला असेल, याची कल्पना ‘तसला ’ चहा आपल्याला घ्यायला मिळाल्याशिवाय त्याची कल्पना कशी करतां येईल?

“बालगंधर्वांनां” त्यांच्या सर्व कामांत कुठचें काम जास्त आवडतें ? नाटककारांपैकीं कोणापासून त्यानां विशेष शिक्षण मिळतें ? काम करतानां ते कोणाचा आदर्श पुढें ठेवतात ? वगैरे अनेक कुतूहल प्रश्नांचीं **त्यांच्याच तोंडून** उत्तरें ऐकण्यासाठीं

“ बालगंधर्वांची मुलाखत ”

हा पुढील अंकांतील लेख वाचा.

खुडलेलीं फुलें.

—निर्बुद्ध म्हणून गाजलेला विद्यार्थी प्रौढपणीं गुरु झाल्यावर तीक्ष्ण बुद्धीच्या शिक्षकापेक्षांहि अधिक कीर्ति संपादन करतो हा नेहमींचा अनुभव आहे. याचें एक कारण असें असतें, कीं जड बुद्धीच्या विद्यार्थ्यास कोणता विषय कठीण व कोणता सुलभ हें जसें कळतें, तसें तरळ बुद्धीच्या विद्यार्थ्यास कळत नाहीं. दुसरें असें कीं, मंद बुद्धीच्या विद्यार्थ्यास जें ज्ञान पायरीपायरीनेंच करून द्यावें लागतें त्याचें आकलन पल्लेदार बुद्धीचा विद्यार्थी एका झटक्यासरसें करूं शकतो. शीघ्रग्रहण करण्याची ही प्रवृत्ति क्रमाक्रमानेंच ज्ञानदान करण्यास अत्यंत प्रतिकूळ असते. उलट मंदधी मनुष्य ज्या क्रमानें विद्या शिकला त्याच क्रमानें विद्यादान करणें त्यास अवघड जात नाहीं. हें बुद्धीसंबंधानें झालें. मंद व तलख बुद्धीच्या गुरूंच्या स्वभावांमध्येंहि ज्ञानदानास अनुकूल व प्रतिकूल अशा प्रकारचा फरक असतो. बुद्धिहीन गुरूस लहानपणीं बुद्धिमंद विद्यार्थ्यांच्या अडचणींचा पूर्ण अनुभव आलेला असल्यामुळें तो त्या अडचणींकडे क्षमाशील दृष्टीनेंच पहातो. उलट हुशार शिक्षकास मट्ठ विद्यार्थ्याच्या प्रमादांची मीमांसा करतां न आल्यामुळें तो त्या प्रमादांवर करडी नजर ठेवितो.

—श्री. श्री. कृ. कोल्हटकर (श्यामसुंदर)

—वाहतुकीच्या साधनांच्या धंद्यांत ट्रॅमकरितां वाट पहाणें हा धंदा श्रेष्ठ समजला पाहिजे. बिऱ्हाडाला जागा मिळण्याची, नळाला पाणी येण्याची, घरांतील अडचण संपण्याची, जरुरीचें पत्र येण्याची, क्वीन्स् रोडवरील मोटारींची रांग संपण्याची, नदीचा प्रवाह थांबण्याची आणि ट्रॅम मिळण्याची वाट पहाणें हे एका माळेंतील मणी समजल्यास मेरुमणीचा मान शेवटच्या क्रियेला दिला पाहिजे. यामुळें कित्येक वेळां पायींच जाणें पुरवतें! पण जर बदलीचें तिकीट असलें व बदलीची गाडी लवकर येईनाशी झाली तर पायी जाणेंहि शक्य नसतें. कारण ट्रॅमवे कंपनीचें तिकीट जरी तुमच्या अंगठींत असलें तरी तें घेऊन ठेवलें असल्यामुळें तुमची शेंडी त्यांच्या हातांत गेलेली असते. असें सांगतात कीं, मागें एक गृहस्थ रजेवरून परत कामावर रुजू होण्याकरितां चालला होता. तो अशीच ट्रॅमची वाट पहात असतां ट्रॅमसर्व्हिसचा 'ब्रेक-डाऊन' झाल्यामुळें एक दिवस उशिरां हपिसांत पोंहोंचला व त्याच्या पंचवीस वर्षांच्या सर्व्हिसमध्येंहि ब्रेक झाला. एक मनुष्य

बोरीबंदरपाशीं संध्याकाळच्या वेळीं ट्रॅमची वाट पहात असतां, त्यांतच बिचाऱ्याचा अंत झाला ! बराच वेळ वाट पाहिल्यानंतर एका वृद्ध गृहस्थांना असें आढळून आलें कीं, आपल्याला ताटकळत उभें राहिल्यामुळें जुनाट संधिवात जडला ! एका मारवाडयानें पाहिलें कीं, ट्रॅम येईपर्यंत भाडयाची आणेली खिशांत लोळत पडण्यापेक्षां व्याजबट्टयांत गुंतवलेली बरी ! डोहाळे जेवणाला निघालेली एक बाई चक्क बारसेंच जेऊन आली ! एका बाईच्या खुपऱ्या ट्रॅमकरितां थांबतां थांबतां आपोआप बऱ्या झाल्यामुळें डॉक्टरचा सल्ला घेण्याची तिला जरूर पडली नाहीं. आणखी एक बाई आपली चार वर्षांची लेक व दीड आणा घेऊन अशीच ट्रॅमची वाट पहात उभी होती. एकदांची आली ट्रॅम; पण पहाते तों कंडक्टर त्या मुलीला अर्ध्या आण्याच्या तिकीटावर सोडीना. कारण ट्रॅमची वाट पहातां पहातां ती चार वर्षांची लहानगी मुलगी एव्हांना चांगली वयांत आलेली दिसत होती !

—कॅप्टन लिमये. (विनोदसागर)

पुढील अंकांत—

बालगंधर्वांची मुलाखत— प्रो. पटवर्धन

धनाजी जाधव—रा. भा. वि. नाडकर्णी

सहृदय—'सीताकुमार' (चाळीसगांव)

खुडलेलीं फुलें—'बाळकराम' व रा. वि. ह. औंधकर

" मेली पोरांची जात !- "

(लेखिका-कुमारी सुमतीबाई दडकर.)

—वाट लावलिन् माझ्या पोराची मारून मारून ! नाहीं तर नाहीं केलान् ! म्हणून काय मारायला हवं ? जळळा मेला तो अभ्यास ! मुलांची जातच मुळीं बागड-ण्याची पांखरासारखी. या मेल्या अभ्यासानं वाट लागली माझ्या सोन्यासारख्या बाळाची ! गेल्या एकादशीलाच ना तें ?-नव्हं नव्हं, गेल्याच्या आदल्या एकादशीला बरं ! माझ्या बाबूला घेऊन मी देवळांत गेलें होतें ना, तेव्हां त्या सखूताई म्हणाल्या सुद्धां ! "आजी-बाई, घरीं गेल्यावर नातवाची दृष्ट काढा बरं मीठ मोहऱ्या घेऊन ! " खरंच तें ! त्यावेळीं माझा बाबू दिसतच होता तसा मुळीं! आतां त्याला शाळेंत घातलाय् अन् तिथें ते खिळाल्या-सारखं बसून पोंक सुद्धां येऊं लागेल पाठीला ! तिथं शाळेंत त्या मास्तरचा भय नि मार अन् इथं हें हिचं ! एवढं मेलं कोवळं पोर ! जिवापेक्षां का मेला अभ्यास अधीक ? शिकायचं असेल नशिबीं तर शिकेल पुढं ! एव्हांपासूनच मारून मारून त्याला ' बालि-ष्टर ' का करायचा आहे ? नसेना ती मेली ' बालिष्टरगिरी !' —आणि तुम्हींच सांगा भामाबाई ! अभ्यासही नाहीं केलान् आणि ब्रम्हदेवानं जर कपाळांत कोरून ठेवलिन् तर तो कधीं चुकेल का ? वाघाच्या पुढयांतून कोंकरूं सुटावं, तसं माझं बाळ धांवत येतं शाळेंतून आजी ! आजी ! करीत. नानाच्या कानीं कपाळीं किती ओरडलें एव्हां त्याला शाळेंत घालूं नकोस म्हणून. आम्हीं नव्हतीं का आमचीं मुलं शाळेंत घातलीं ! पण केव्हां ?—" तुम्हीं म्हणें जुनीं माणसं ! तुम्हांला काय समजतं ? "—पण असं बघा भामाबाई ! आम्हीं पावशेराचं अन्न खातों तिथं नवटाकांची तरी अक्कल असेल मेली ? बरं तें एक असो. खाणं पिणं तरी त्याला चारदां दिलं पाहिजे ना ! तर तेंहि बघा, नेमानं दोनदां खाणं नि वेळेवर जेवण ! अशानं का कुठं मुलं गत घेतात ? मेली पोरांची जात ? त्यांच्याचसाठीं ना लाडूमेवा करायचा ?—म्हणे अवेळीं खाण्यानं शरीरप्रकृति बिघडते. आम्हांला नव्हतीं का मुलं ?-आमचा नाना बघा भामाबाई !--सणावारीं कांहीं गोडधोड केलं कीं नई म्हणजे चारचारदां येऊन खायचा ! त्याचं लक्षच मुळीं घरांत !- आणि दुसरे दिवशीं पण राखून ठेवलं पाहिजे होतं हो ! मेली पोरांचीच जात ती !-बरं, जेवतांनां म्हणून ? तिकडचं नि नानाचं पान बरोबर मांडायचं ! पण लबाड मला जेव-तांना कसा टपत रहायचा ! माझ्या ताटांत जेवल्याशिवाय मुळीं त्याचं समाधानच होत नसे. माझ्या नानाला कसा तिनदां भात नि चार पांचदां खायाचं देई म्हणून पहा आतां कसा लोखंडासारखा आहे तो ! खाण्यानं का कधीं प्रकृति बिघडते ? आतांचं मेलं ऐकावं तें एक एक नवलच !-

मुलांची मौज.

देवदूतांचें पुस्तक.

(वासुदेव वि. एनापुरे)

बाबांच्या टेबलावरचें एक चित्राचें पुस्तक घेऊन यमू छोट्या बाबूचा हात पोहोंचणार नाहीं इतक्या उंचीवर तें धरून म्हणाली, "बाबू, तुला हें पुस्तक हवं ?"

"दे, दे." बाबू गुडघ्यावर बसून हात उंच करीत म्हणाला. तो जसजसा हात उंच करी तसतशी यमू तें पुस्तक उंच धरी. पण अखेर बाबूनें एकदम झडप घालून त्या पुस्तकाचें एक टोंक हातांत धरून खेंचलें. त्याबरोबर तें पुस्तक यमूच्या हातांतून खालीं पडलें. यमू बाबूला मारण्यासाठीं म्हणूहन हात उगारणार इतक्यांत पुस्तकांतली देवदूतांची चित्रें पुस्तकाबाहेर येऊन जमिनीवर चालूं लागलेलीं पाहून ती आश्चर्यानें त्यांच्याकडे पाहूं लागली. तीं सर्व चित्रें तिच्या ओळखीची होती. ती त्यांच्याकडे पाहूं लागल्यावर त्यापैकीं एक देवदूत म्हणाला, "तुझ्यासारख्या लहान मुलींनीं आपल्या चित्रांच्या पुस्तकांचे असे हाल केले तेव्हां आम्हीं येथून निघून जाणार." यमू रडवें तोंड करून म्हणाली, "मी कांहीं पुस्तक मुद्दाम फाडलं नाहीं. बाबूला माझं पुस्तक हवं होत, म्हणून त्यानें तें ओढून घेतलं आणि जमिनीवर पाडलं. तुमच्यापैकीं कोणाला दुखापत झाली नाहीं ना ?"

"तें आम्हांला कांहीं ठाऊक नाहीं. आम्हीं आतां डॉक्टरकडे जातों." असें म्हणून ते बोटाएवढ्या उंचीचे देवदूत खोलीभर दिसूं लागले. अखेर ते कोंपऱ्यांतल्या पुस्तकाच्या ढिगाकडे आले आणि एकएक देवदूत पुस्तकावरून वर चढूं लागला. यमू त्यांच्याकडे आश्चर्यानें पहात होती. ती धांवत धांवत त्या ठिकाणीं गेली आणि अजून खालीं असलेल्या एका देवदूतास म्हणाली, "तुम्ही सर्वजण कुठें जात आहां ?"

देवदूतांचे कपडे जादूचे असतात. तेव्हां यमूनें त्याच्या कपड्याला हात लावल्याबरोबर ती लहान होत होत अखेर त्यांच्याच एवढी आंगठ्याच्य उंचीची झाली;आणि त्यांच्याबरोबर तीहि वर जाऊं लागली. त्यांना वर जाण्यास

कितीतरी वेळ लागला. अखेर वर गेल्यावर त्यांना लहान लहानशीं निळीं घरें दिसलीं. त्यापैकीं एका घरांत ते सर्वजण शिरले. त्यांच्यांपाठून यमूहि आंत गेली. कांहीं वेळानें बाहेर पावलें वाजलीं आणि ते देवदूत आपापसांत 'डॉक्टर आले' असें म्हणूं लागले. यमू दरवाज्याकडे पाहूं लागली. तों एक उंदीर कपडे वगैरे घालून आंत आला. डॉक्टर म्हणजे एक उंदीर असेल अशी तिची कल्पना नव्हती. त्यानें पंख मोडलेल्या देवदूताला तपासलें व विचारलें, "तुझ्या पंखाला कशामुळें दुखापत झाली ?" यमू एकदम म्हणाली, " माझ्या हातून पुस्तक खालीं पडलें आणि—" पण तो डॉक्टर मध्येंच यमूच्या अंगावर येऊन म्हणाला. "तूं ? तूं पंख मोडलास ? इतकी खटयाळ दुष्ट मुलगी आहेस ?" यमू थरथर कांपू लागली. पण सर्व देवदूतांना तिची दया आली आणि त्यांच्यापैकीं एकानें म्हटलें, " ती अगदीं गरीब मुलगी आहे. त्यांत तिचा अपराध नाहीं; तिनें तें पुस्तक मुद्दाम टाकलें नाहीं."

" तें कांहीं नाहीं. मी तिला चांगली कडक शिक्षा करणार." असें म्हणून तो आंतल्या खोलींत गेला. पण इतक्यांत सर्व देवदूतांनीं यमूस पळण्यास सांगून आपणहि खोलीबाहेर पडले. धांवतां धांवतां त्यांना एक कडा लागला. यमूचा पाय निसरून ती कडयावरून खालीं गडगडत आली. आणि तिचे हात पाय वर झाले.

पण इतक्यांत छोटा बाबू ओरडलेला पाहून यमू दचकून शुद्धीवर आली. तिला हें स्वप्न पडलें होतें. तिच्याबरोबर देवदूत नव्हते—अगर ती कडयावरून घसरून खालींहि पडली नव्हती. तिला आपण कडयावरून पडतों आहों असें वाटलें आणि तिच्या हाताचा छोटया बाबूवर जोराचा फटका बसून तो ओरडला आणि यमूचें स्वप्न नाहींसें झालें.

— o —

सहानुभूति

ले. कु. जनाबाई मंगेश सुखटणकर.

सहानुभूति म्हणजे आपल्या माणसाविषयीं किंवा परक्याविषयीं दया उत्पन्न होऊन त्याला मदत करण्याची इच्छा. सहानुभूति आणि सहाय्य यांचा एकमेकाशीं अगदीं जवळचा संबंध आहे; म्हणजे सहानुभूति वाटल्याशिवाय सहाय्य करावें असें मनुष्याला वाटत नाहीं.

सहानुभूति हा एक अंतःकरणाचा धर्म आहे. आणि पुरुषांपेक्षां बायकांचें अंतःकरण कोमल असतें. त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं सहानुभूति लवकर उत्पन्न होते.

आई आपल्या मुलांचें पालन कितीहि संकटें आलीं तरी त्यानां न जुमानतां करीत असते. याचें कारण तिच्या मनांतील सहानुभूति व अपत्यप्रेम होय. तिच्या मनांत जर मुलाविषयीं प्रेम नसेल तर तिच्याकडून नाना तऱ्हेचे कष्ट होणार नाहींत. कोणाविषयीं का असेना, मनांत सहानुभूति उत्पन्न झाल्याशिवाय दुसऱ्याला सहाय्य करतां येणार नाहीं.

उदाहरणार्थ —आजारी मनुष्याची सेवा. त्याच्याविषयीं मनामध्यें जर दया उत्पन्न झाली नाहीं तर त्याची सेवा आपल्या हातून होणार नाहीं. कारण, आपल्या मायेचें कोणी माणूस आजारी असलें म्हणजे त्याची सेवा आपण जितक्या काळजीनें करूं तितक्या काळजीनें हॉस्पिटलमध्यें असलेल्या आजाऱ्याची सेवा नर्स–दायांकडून होत नाहीं हें सहाजिकच आहे. यावरून असें समजतें कीं, आपलेपणा असला म्हणजे मनुष्य सहाय्य करतो. अशीं सहानुभूतिचीं अनेक उदाहरणें आहेत. एखाद्या देशांत दुष्काळ पडला म्हणजे इतर देशांतील लोक त्यानां मदत करतात. याचें कारण काय? तर त्यांच्याविषयीं वाटणारी त्यांना सहानुभूति. एखाद्याच्या घराला आग लागली तर आपण त्यास मदत करावयास जातों. याप्रमाणें जर आपण दुसऱ्यास मदत केली नाहीं तर पुष्कळ तोटेहि होतील; म्हणून प्रत्येकानें सहानुभूति अंगीं आणावी. कारण सहानुभूतीच्या योगानें परोपकार घडतो. आणि परोपकारासारखें दुसरें पुण्य नाहीं. ज्याच्यायोगानें अशा थोर पुण्याचा सांठा होतो तो गुण किती अवश्य अंगीं असला पाहिजे हें अनुभवावरून प्रत्येकाला समजून येण्यासारखे आहे.

दीनांचा वाली परमेश्वर

(लेखक–रा. बाबुराव य. नेरुरकर)

बार्शी तालुक्यांत वळसंग गांवीं रामराव जाधव नांवाचे एक शाळामास्तर रहात असत. त्यानां विश्वनाथ, तानाजी, असे दोन मुलगे व तारा नांवाची एक मुलगी होती. रामरावानां १० रुपये पगार होता. त्यांची पत्नी सीताबाई

फार उद्योगी व काटकसरीनें वागणारी असल्यामुळें त्या कुटुंबाचा कसाबसा निर्वाह होत होता. विश्वनाथ दहा वर्षांचा झाला नाहीं तोंच रामरावानां देवानें आपल्या घरीं नेलें. यामुळें बिचाऱ्या सीताबाईला जास्त कष्टाचीं कामें करून आपलें व मुलांचें पोट भरण्याची वेळ आली. तरी ती न त्रासतां दळणकांडण वगैरे करून मुलांचें शिक्षण चालवित होती. विश्वनाथ मराठी पांचव्या यत्तेंत व तानाजी चौथ्या यत्तेंत होता. वरचेवर सदुपदेशाच्या गोष्टी सांगून सीताबाईनें मुलांना उत्तम वळण लाविलें होतें.

खाण्यापिण्याचे हाल आणि कामकाज जास्त यामुळें सीताबाईला ताप येऊं लागला. चार पांच दिवस तिनें कसे तरी काढले; शेवटीं ती अंथरुणाला खिळली. आतां मुलांचें कसें होईल याची तिला चिंता लागली. पैसे नाहींत म्हणून सीताबाई डॉक्टर वैद्यांचें औषध घेईना. एक दिवस ताप फार वाढला आणि तिची शुद्धी गेली. भ्रमांत ती मुलांसंबंधानें बरळूं लागली. हें पाहून विश्वनाथ फार घाबरून गेला. त्याची आईवर फार ममता होती. आतां काय करावें हें त्याला सुचेना. त्यांच्या शेजारीं राहाणारी एक म्हातारी बाहेर कुठें कामाला गेली होती, ती आली. तिला पाहून विश्वनाथाला जरा धीर आला. त्यानें म्हातारीला 'आईकडे जरा बैस; मी डॉक्टरला घेऊन येतों' असें सांगितलें आणि तो बाहेर पडला. त्या गांवांत एकच डॉक्टर व एक नामधारी वैद्य होते. विश्वनाथानें पहिल्यानें डॉक्टरकडे धांव घेतली. डॉक्टरसाहेब जातीनें मराठेच होते. विश्वनाथाला पाहिल्याबरोबर त्यांनी कपाळाला आंठ्या घालून ' काय काम आहे ?' म्हणून विचारिलें. विश्वनाथानें हात जोडून म्हटलें,

'डॉक्टर साहेब,माझी आई फार आजारी आहे.कृपा करून आपण तिला पाहण्यासाठीं घरीं याल तर आपलें फार उपकार होतील." विश्वनाथाकडून घरीं जाण्याची फी मिळणार नाहीं हें डॉक्टरांनीं जाणलें. ते एकदम म्हणाले,"जा, जा,मला येण्यास वेळ नाहीं." त्यावर पुन्हां विश्वनाथ म्हणाला, " डॉक्टरसाहेब, औषध तरी कांहीं द्या. खरोखरच तुमचे उपकार मी कधीं विसरणार नाहीं." ह्या बोलण्यानेंही डॉक्टरचें अंत:करण द्रवलें नाहीं. ते हेटाळणीनें हंसून म्हणाले,"औषध काय फुकटचें येतें काय रे ? जा, गवती चहाचा काढाबिढा दे जा." बिचारा विश्वनाथ अगदीं खिन्न होऊन बाहेर पडला. आतां वैद्याकडे तरी जावें म्हणून तो त्यांच्या घरीं गेला. वैद्यराज डॉक्टरना सरखे बंधू शोभण्यासारखेच होते.त्यांनीही पैशावा-

चून औषध देण्याचें नाकारलें. विश्वनाथ अगदीं हताश होऊन घरीं आला.दुपारचे बारा वाजण्याची वेळ झाली होती. घरीं आल्यावर म्हातारीला विश्वनाथानें सर्व हकीगत सांगून तो रडूं लागला. म्हातारीला फार वाईट वाटलें, परंतु ती तरी काय करणार ? तिची स्थिति गरिबीचीच होती; तरी तिनें माणूसकीला जागून आपल्या घरचे तांदूळ पीठ आणून भात पिठलें केलें आणि विश्वनाथाला आणि त्याच्या भावंडांना जेऊं घातलें.

ती रात्र त्या म्हातारीनें आणि विश्वनाथानें सीताबाईजवळ जागून काढली. सीताबाईची स्थिती होति तशीच होती. उजाडतांच म्हातारी बाहेर कामाला निघून गेली. विश्वनाथाला काय करावें तें सुचेना. बापाची आठवण येऊन त्याला फार वाईट वाटूं लागलें. औषधपाण्यावांचून आईला मृत्यु येणार असे विचार त्याच्या मनांत येऊन त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. इतक्यांत त्याला बाप.च्या शेवटच्या शब्दांची आठवण झाली. रामरावानीं मरण्यापूर्वी एक दिवस विश्वनाथाला म्हटलें होतें, " विश्वनाथ ! दीनांचा वाली परमेश्वर तुझा कधींहि त्याग करणार नाहीं. तो समोर दत्ताचा फोटो आहे तोच माझा परमेश्वर. तूंहि त्याला भजत जा.तुजवर कितीहि मोठें संकट आलें तरी त्याचा धांवा कर, म्हणजे निभावून जाशील." बापाच्या ह्या शब्दांची आठवण त्याला आतां झाली, त्याबरोबर विश्वनाथ उठला व समोर दत्ताचा फोटो होता त्याला हात जोडून तो प्रार्थना करूं लागला. " देवा दत्तराया ! दोन दिवस मला तुझी आठवण झाली नाहीं त्याबद्दल क्षमा कर.मी लहान मूल आहे. तुझी प्रार्थना कशी करावी तें मला समजत नाहीं. दीनांचा वाली परमेश्वर असतो असें बाबांनी सांगितलें होतें, तर आज माझा वाली तूंच आहेस. माझ्या आईला बरी कर." असें मनांतल्या मनांत बोलून त्यानें दत्ताकडे करुणमुद्रेनें सारखी टक लाविली. त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. दत्ताकडे पाहतां पाहतां त्याला समाधान वाटूं लागलें. दत्ताचा तो हंसतमुख चेहेरा आपल्याकडे पाहून " भिऊं नको, बाळ, मी तुझा पाठीराखा आहे" असें बोलत आहे असें विश्वनाथाला वाटलें. त्याला धैर्य आलें. पैशाची कांही तजविज झाली तर डॉक्टर येतील. परंतु पैसे कुठून आणावे ? उसने आणण्याची त्यानें खटपट केली होती. परंतु ते सुद्धां त्याला देण्यास कोणी तयार नव्हतें, म्हणून तो विचारांत पडला. (अपूर्ण)

कोड्याचें उत्तर.

" बट मोगरा "

बरोबर उत्तरें पाठविणारांचीं नांवें:—द. कृ. नेरुरकर, द. भा. तेंडुलकर, म. कृ नाडकर्णी, खं. मो. रांगणेकर, कु. शिरीन खं. धैर्यवान, म. दा. ओक, श्री. वा. सांडू, गो. न. कंकेरी, वि. अ. बावडेकर, कु. मा. म. मसुरकर, कु. प्र. आ. गांधी, वा. आ. गांधी, वै. च. तिगडी, वा. वि. जोगळेकर, एन. पी. मोरे, कु. सुमती शा. त्रिलोकेकर, वि. शं. दळवी, श्री. रा. कामत, कु. कुसुम बा. कामत, कु. सुमती ना. नाईक, पां. ना. नाईक.

नवें कोडें

खालीं सहा शब्द दिले आहेत. परंतु प्रत्येक शब्दाचीं अक्षरें, मात्रा, काने वगैरे चुकून भलत्याच ठिकाणीं पडलीं आहेत. तरी प्रत्येक शब्दांतील अक्षरें नीट जुळवून शब्द बनवावा. कंसांत तो शब्द काय अर्थाचा आहे तें दिलें आहे.

(१) वे ड ा ठ ा क (प्रांत)
(२) ह र े ब ो म न (इं. महिना)
(३) क ि व े श र ् र व (आडनांव)
(४) न इ ा प ी त स ि (मुलांना आवडणारें एक पुस्तक)
(५) ठ ि यु ि र ष ध (महा भारतांतील एक पुण्यवान मनुष्य)
(६) ि न ग ा ी र (एक रंग)

आमच्या बाललेखकांना विनंति

आम्ही ५ व्या अंकांत लिहिल्यावरून बऱ्याच बाललेखकांनीं नवीनवीं कोडीं, कविता, गोष्टी वगैरे पाठवल्या. पण कांहीं जणांना एक वाईट खोड लागली आहे. पोष्ट कार्डावरच ते कोडें, कविता, गोष्ट वगैरे लिहून पाठवतात; हें बरें नव्हें. लेख लिहावयाचा तो एका निराळ्या कागदावर व एका बाजूनें लिहावा. कागदाच्या दोन्हीं बाजूनीं मळींच लिहूं नये.

पुढील अंकासाठीं **" बक्षिसाचा विषय"**:—" मराठींतल्या ५ सुंदर म्हणी लिहून प्रत्येक म्हणीचा स्पष्ट अर्थ द्या. "

" मी वाचलेलीं पांच पुस्तकें "

(ले.–श्री. वा. आ. गांधी.)

(बक्षिस पुस्तक—" **इनामदारांचा बाळू** " किं. रु. १॥)

मी बरींच पुस्तकें वाचलीं,पण त्यांतली पांच पुस्तकें म्हणजे **नीतिमाधुर्य, नाट्यरामायण, सुबोध गोष्टी, बालभारत व मौजेच्या गोष्टी.** 'नीतिमाधुर्य ' यामधील एकलव्याच्या गोष्टीचें तात्पर्य:–जे गुरु एकलव्यास धनुर्विद्या शिकविण्यास तयार नव्हते त्यांच्याविषयींहि त्याच्या मनांत अतिशय पुज्यभाव होता. आपल्या गुरूस मान देणें व त्याविषयीं मनांत पुज्यभाव वाळगणें हें विद्यार्थ्यांचें आद्यकर्तव्य आहे. ज्यांच्या कृपेनें आपल्याला थोडें फार शिक्षण मिळालें, त्यांच्याविषयीं मनांत पुज्यभाव न ठेवणें अगर त्यांचा अव-मान करणें हें कृतघ्नतेचें आहे. दुसरी एक गोष्ट या एकलव्याच्या गोष्टीवरून शिकण्यासारखी आहे, तो हीच कीं, कोणतीही विद्या असो अगर कला असो, दृढनिश्चयपूर्वक आणि काळजीपूर्वक तिचा अभ्यास विद्यार्थ्यानें केल्यास ती त्याला साध्य झाल्यावांचून राहात नाहीं.

मी दुसरें पुस्तक वाचलें त्यांत राम व लव कुश यांचें युद्ध झालें आहे असा कथाभाग आहे. अश्वमेधाचा घोडा लवानें धरल्यामुळें तें युद्ध झालें होतें. तात्पर्य–ह्यावेळीं रामाला गर्व चढला होता तो लवकुश यानीं त्याचा पराभव करून नाहींसा केला. तेव्हां आपण गर्व धरूं नये. गर्वाचें घर खालींच होते.

मी तिसरें पुस्तक वाचलें ते सुबोध गोष्टीचें आहे. त्यापैकीं एका गोष्टींत दोन मांजरांचें खव्यावरून भांडण चाललें होतें तें एका माकडाने पाहिलें व त्यानां फसवून सर्व खवा त्यानें गट्ट केला व मांजरे रडत बसलीं. तात्पर्य:–दोघांचें भांडण व तिसऱ्याचा लाभ. त्या करितां आपण भांडण करूं नये.

बालभारतांत शकुनी व धर्मराज द्यूत खेळले. त्यांत धर्मराज हरला. तात्पर्य–द्यूताच्या घोर परिणामानें भावाभावांत सुद्धां मारामाऱ्या होतात. त्याकरितां आपण द्यूत-जुगार खेळूं नये.

मी सहावें पुस्तक वाचलें तें "मौजेच्या गोष्टी" हें होय. त्यांतील एक गोष्ट अशी आहे की, एक सुतार काम करीत असतां त्याच्या डोक्यावर माशी बसली. तेव्हां त्यानें आपल्या मुलास ती हाकलण्यास सांगितलें. मुलानें त्याच्या डोक्यावर माशी हाकलण्यासाठीं कुऱ्हाड घातली व बाप मरण पावला.

भलत्याच मनुष्याला भलतेंच काम सांगूं नये. ते मग असा घात करतात.

वीरद्वय

लेखकः—श्री. भा. वि. नाडकर्णी

श्री शिवाजी महाराजांच्या शुभावसानानंतर मराठेशाहीच्या पडत्या काळांत ज्या योद्धयांनीं अद्वितीय पराक्रम करून स्वराज्याचें पुनरुज्जीवन केले, त्या शूरवीरांत नरवीर संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांचा प्रामुख्यानें नामनिर्देश केला पाहिजे. या दोन धडाडीच्या वीरांनीं इतकी दहशत बसवली होती कां, एखाद्या मुसलमान स्वाराचा घोडा पाणी पीत नसला तर तो त्यास "तुला पाण्यांत धनाजी दिसतो कीं काय ?" असें विचारी ! त्याच या वीरद्वयांचा इकडे तिकडे मिळालेली कांही त्रोटक माहिती संकलित करून सादर करीत आहें.

सेनापती संताजी घोरपडे

संताजी घोरपडे याचा बाप म्हाळोजी घोरपडे हा कापशीच्या घोरपडे घराण्यापैकीं एक जहागीरदार होता. म्हाळोजीला संताजी, बहिरजी व मालोजी असे तीन मुलगे होते. हे सर्वजण श्री शिवाजी महाराजांजवळ नोकरी करीत होतं. या तिघांत संताजी विशेष पराक्रमी निपजला असें त्याच्या पुढील चरित्रावरून दिसून येतें.

संताजीचा उदय प्रथम जेसरीच्या १६७४ सालच्या लढाईंत झाला. थोरल्या महाराजांचे सेनापति प्रतापराव गुजर यांनीं उंबराणी येथील लढाईंत विजापूरच्या बहुलोलखानाचा पराभव करून त्याला पाणीहि मिळेनासें केलें. तो शरण आला असतां प्रतापरावास त्याची दया आली व त्यास त्यानें सोडून दिलें. पण महाराजांना प्रतापरावांच्या या कृत्याचा फार राग आला व त्यानीं त्यास 'बहुलोलखानाला पकडल्यावांचून मला तोंड दाखवूं नको' असें सांगितलें. प्रतापरावास फार वाईट वाटलें व त्यानें अविचाराने समरांगणांत उडी टाकली. तो लढतां लढतां धारातीर्थी पतन पावला. यावेळीं सेनापति पडल्याबरोबर मराठे पळूं लागले. इतक्यांत हंबीरराव मोहिते यानें सर्वांना धीर दिला व बहुलोलखानाच्या सैन्याची दाणादाण केली. संताजी घोरपडे व धनाजी जाधव या द्वयीनें या वेळेस पराक्रमाची कमाल केली, याबद्दल महाराजांनीं त्यांची पाठ थापटली. यानंतर संताजी व धनाजी हे नेहमीं सेनापतीच्या हाताखाली कामें करीत असत. कर्नाटकांतील शिवदिग्विजयामध्यें सेनापति हंबीरराव व ही वीरद्वयी यांनीं फार पराक्रम गाजविला. परंतु संताजीच्या खऱ्या उदयास प्रारंभ

राजारामाच्या कारकिर्दीत झाला. सँगमेश्वरास ज्यावेळीं संभाजीस मुकारीबखानानें कैद केलें,त्यावेळीं संताजीचा बाप म्हाळोजी घोरपडे पांचशें लोकांसह लढतां लढतां मरण पावला. संभाजीला ह्या बातमीनें फार चेव आला. व त्यानें बादशहातीचा सूड उगविणें हेंच आपलें ध्येय केलें. राजाराम महाराजांबरोबर संताजी कर्नाटकांत गेला. त्या ठिकाणीं संताजीस सेनापतीपद मिळालें व त्यानें महाराष्ट्रांत राहून मोंगल सैन्याचा धुव्वा उडवावा ही त्याची आवडती कामगिरी त्याच्यावर सोंपवण्यांत आली. संताजी व विठोजी चव्हाण या दोघांनीं प्रत्यक्ष बादशहाच्या छावणीवर हल्ला केला. मध्यरात्रीच्या सुमारास छावणीपासून तीन कोसांवर छबिन्याच्या स्वारांची गांठ पडली असतां, आपण शिर्क्यांचे स्वार आहोंत असें त्यांनीं सांगितलें व त्यांच्या हातून निसटून बादशहाच्या शामियान्यावर झडप घातली. त्या ठिकाणीं बरीचशी लूट मिळवून शिवाय शामियान्याचे सोन्याचे कळस त्यानें कापून काढले. हा प्रकार रायगडचा वेढा चालू असतांना घडला. नंतर संताजीनें इतिखदखानाचा मोठ्या शौर्यानें पराभव करून त्याचे पांच हत्ती पन्हाळ्यास राजारामाकडे नेले. त्यावेळीं राजारामानें संताजीस 'ममलकत-दार' (देशाचा मुख्य), बहिर्जीस 'हिंदु-राव,' मालोजीस 'अमीसल् उमराव' व विठोजी चव्हाणास 'हिंमत बहादर' असे किताब दिले. त्यावेळचे इतिहासकार असें म्हणतात कीं, 'संताजीपुढें कोणताही घोडा उभा राहूं शकत नसे.' मोठे मी मी म्हणणारे मुसलमान सरदार त्याच्यापुढें थरथर कांपत असत. इस्माईल-खान नांवाच्या सरदारास पहिल्या सपाटयास त्यानें पाणी पाजलें. तसेंच सर्जाखान सिंहासारखा पराक्रमी म्हणून जो नांवाजलेला, त्याचा संताजीनें पूर्ण पराजय केला. जिंजीच्या वेढयाचें काम चालू असतां संताजीनें जिंजीकडे भरारी मारली. वाटेंत कुंवरपाक येथें अली मर्दानखान याचा पराभव केला.व त्यास बेदम झोडून व त्याजकडून दंड घेऊन त्यास सोडून दिलें (१६९६). अशा प्रकारें संताजी महाराष्ट्रांत मुसलमानांना जर्जर करीत भराऱ्या मारीत होता.

इ.स.१६९४ सालांत संताजीची कासमखानाशीं जंगी लढाई झाली. बादशाहानें त्याला व दुसऱ्या कांहीं सरदारांस संताजीचा बंदोबस्त करण्याकरितां पाठविलें. कासमखानाच्या आघाडीवर संताजीनें छापा घातला व तिचा धुव्वा उडवला. हें ऐकून कासमखान रागानें मराठ्यावर चालून आला; परंतु त्यालाही संताजीनें चोहोबाजूनीं कोंडलें. खान मागें हटत हटत दुदेरीच्या गढींत गेला. गढींत त्या ठिकाणीं त्याला मराठ्यांनीं फारच जर्जर केलें. शेवटीं तर मोंगल सैन्यास अन्न मिळेना.तेव्हां घोडे फाडून खाण्याची वेळ आली; तेव्हां मराठ्यांनीं त्यांस दाणा गोटा विकून खूप पैसा मिळविला. शेवटीं राग व निराशा यानीं उद्विग्न होऊनीं खानानें आत्महत्त्या केली; इतक्यांत संताजीवर हिंमतखान नांवाचा सरदार चालून आला. संताजीनें सैन्याच्या दोन टोळया केल्या व एका टोळीस खानावर पाठवून दुसऱ्या टोळीस खानास अडविण्याकरितां झाडींत नेलें. पण त्या संधीस खानास एक गोळी लागून तो ठार झाला व संताजीच्या हातीं सर्व सामानसुमान आलें.

इ. स. १६९६ सालीं झालेलें युद्ध हा संताजीचा शेवटचा पराक्रम होय. या नंतर संताजीचें सेनापतिपद धनाजी जाधवाकडे गेलें. संताजी व धनाजी यांच्यामध्यें पूर्वीपासून चुरस लागली होती व अखेर त्याचें रूपांतर द्वेषांत झालें, व हें त्या दोघां वीरामध्यें वेबनाव उत्पन्न होण्यास कारण होय. संताजीनें सैन्यांत अत्यंत कडक शिस्त ठेवली होती. श्री शिवाजी महाराजांच्या वेळेची सैन्यांतील शिस्त फक्त संताजीच्याच सैन्यांत कायम होती. यामुळें बरेचसे लोक संताजीवर फार नाखूष असत; व हे लोक धनाजीच्या सैन्यास जाऊन मिळत. कांहीं इतिहासकार असेंही म्हणतात कीं, औरंगजेबानें संताजी व धनाजी यामध्यें फूट पाडण्यासाठीं कांहीं कारस्थानें रचिलीं होतीं. हेंहि खरें असेल; पण त्यांच्या बेबनावापासून मराठ्यांचा मात्र बराच तोटा झाला. राजारामाच्या कानावर संताजीनें फितुरी केली अशा गोष्टी आल्या, पण त्यावर त्यानें विश्वास ठेवला नाहीं व तसें करण्यास पुरावाहि नव्हता. तथापि संताजीचें सेनापती-पद त्यानें धनाजीस दिलें. या शूर वीराचा अंत हृदयद्रावक रीतीनें झाला. त्याच्या मृत्यूबद्दल अद्यापि निश्चित अशी माहिती मिळालेली नाहीं. संताजीचा वध म्हसवडच्या नागोजी मान्यानें खाजगी द्वेषानें व बायकोच्या सांगण्यावरून, नामर्दपणानें केला. (१६९८). धनाजीचे सैनिक पाठीं लागले असतां संताजी एका ओढ्यावर पाणी पिण्यासाठीं व स्नान करण्यासाठीं उभा होता. ही संधी साधून नागोजी मान्यानें हलकेंच पाठींमागून येऊन एका घावानें त्या शूर सेनापतीचें शीर तोडलें. संताजीच्या वधानें महाराष्ट्राची फारच हानि झाली. संताजीच्या बहुमूल्य कामगिरीमुळें मराठेशाही त्यावेळच्या संकटग्रस्त परिस्थितींतून चांगल्या तऱ्हेनें पार पडली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

संताजीचा कारभारी नारो महादेव हा घोरपडेकरांजीच्या घराण्यांतील मूळ पुरुष होय. हा संताजीची सर्व व्यवस्था पाहात असे. नारो महादेव त्याचा फार आवडता होता. विठोजी चव्हाण हा संताजीचा एक मित्र होता. तो व संताजी एकजुटीनें व एकमतानें राहात असत. प्रल्हाद निराजी व रामचंद्रपंत यांना संताजीविषयीं फार सहानुभूति व प्रेम वाटे. प्रल्हाद निराजी जिवंत असेपर्यंत त्यानें राजारामाच्या मनांत संताजीविषयीं भलत्याच कल्पना भरूं दिल्या नाहींत. संताजीच्या मरणानंतर त्याचे मुलगे राणोजी, पिराजी व पुतण्या सिधोजी हे स्वतंत्र मुलखगिरी करून मराठेशाहीस यथाशक्ति मदत करीत होते. या वंशांत पुढें मुरारराव घोरपडे या नांवाचा एक शूर वीर होऊन गेला. *

पुढील अंकांत "धनाजी जाधव" यांचें संक्षिप्त,
पण चटकदार चरित्र देण्यांत येईल.

---

*सदर लेख येथील चि. स. हा. स्कूलच्या तर्फे निघत असलेल्या "ज्ञानोत्साह' या हस्तलिखीत मासिकांतून घेतला आहे. इतर शाळांतल्या हस्तलिखित मासिकांच्या संपादकांकडून छापण्यालायक लेख आल्यास त्यांचा साभार स्वीकार करण्यांत येईल.

सं. 'अ. माळा'

आदर्श

देवदुताचें गमन

ले. रा. शां. अ. सबनीस

ओसाड आडांतून । अथवा पडक्या बुरुजांतून ।
शब्द येतात । चल बसूं नको जगतांत ।
बोलवितात विक्राळ यमाचे दूत ।—बालकवि

रामचरण भय्याची व माझी ओळख असण्याचा विशेषसा संभव नव्हता. त्याचा पेशा वेगळा पडला, माझा वेगळा पडला. तरीसुद्धां तो मी जात असे त्याच क्लबमध्यें क्रिकेट खेळावयास येत असल्यामुळें त्याची व माझी ओळख—नव्हे दाट मैजी जमली होती. त्याचा स्वभावच असा होता कीं कोणालाही त्याच्या बरोबर ओळख करून घेण्याचा मोह आवरतां येत नसे. त्याची ती बेफिकीर वृत्ति, नेहमीं हास्य धारण करणारी मुद्रा व विशाल देहयष्टी डोळ्यासभोर उभी राहिली व मागाहून त्याच्यांत पडलेला फेर ध्यानांत आला कीं मला अजूनहि कसेसेंच होतें.

× × ×

रामचरण पोलीसमध्यें फौजदाराच्या हुद्यावर होता. त्याच्या घरांतील माणसें म्हणजे फक्त दोन. एक तो स्वतः व त्याचा ६–७ वर्षांचा मुलगा रणजीत. रणजीतची आई रणजीतला जन्म देऊन लगेच परलोकी रवाना झाल्यामुळें रामचरण रणजीताला तळहातावरील फोडाप्रमाणें वागवीत असे. बायको मेल्यावर रामचरणाला पुष्कळांनीं लग्न करण्याचा आग्रह केला; पण त्यानें आपला हेका सोडला नाहीं. आपल्या धाकट्या रणजीतबरोबर गुलगुल गोष्टी बोलण्यांत व लडिवाळ प्रेमानें खेळण्यांत त्याला स्वर्गाच्या तोडीचें सुख वाटत असे. क्रिकेट ग्राउंडवर सुद्धां तो रणजीतला घेऊन येत असे. त्यानें त्याला एक लहानशी ब्याटहि घेऊन दिली होती. रणजीत फार चौकस, हुशार व हूड मुलगा होता. क्रिकेट ग्राउंडवर आल्यावर तो आपल्या सतरा तऱ्हांच्या प्रश्नांनीं सर्वांना भंडाऊन सोडीत असे. एक दिवस ग्राउंडवर असलेल्या रोपट्यावर त्यानें दोन फुलें पाहिलीं. त्याबरोबर त्यानें आपली प्रश्नाची फैर झाडण्यास सुरवात केली. " हीं

फुलें कोठून आलीं ?" मी उत्तर दिलें, "देवा घरून." लगेच परत दुसरा प्रश्न आला. "देव कुठें राहातो ?" "त्या पलीकडल्या ढगांत." रामचरणानें उत्तर दिलें. "देवच कां त्या चकचकीत ढगांत राहातो आणि आम्हांलाच इकडे कशाला ठेवतो ? मी त्याच्याकडे जाणार." खेळाच्या नादांत तें वाक्य रामचरणाला ऐकूं आलें नाहीं.

× × × ×

संध्याकाळच्या वेळीं क्रिकेट ग्राउंडवर जातेवेळीं रामचरण व रणजीत या दोघांना बरोबर घेऊन जाण्याचा माझा शिरस्ता असे. त्याप्रमाणें मी आज रामचरणकडे गेलों. मी गेलों त्यावेळीं रणजीत हारमोनियमवर वेडेवांकडे सूर काढीत होता. रामचरण आंत कपडे करीत होता. मला पाहिल्याबरोबर रणजीतनें आपलें वादन थांबविलें, व हंसत हंसत माझ्याजवळ येऊन बसला. माझ्याजवळ बसल्यावर मला परत त्यानें कालचा प्रश्न विचारला. मी त्याला थट्टेनें विचारलें, "तुझे पाय तर लहान आहेत; मग तूं देवाकडे कसा जाशील ? वाटेंत थकणार नाहींस ?" त्या बरोबर तो म्हणाला, "तिकडे काय चालत जात नाहींत ? मनुष्य मेला कीं तिकडे जातो. तुम्हीं माझ्याबरोबर याल का ?" मी पुन्हा एकदां थट्टेनें म्हणालों, "हो. पण आम्ही मरूंया कसे ?" त्याबरोबर तो लगेच म्हणाला, "आपण कुव्यांत पडूं या; म्हणजे आपण मरूं !" त्याची ती युक्ति ऐकून मला हंसूं आलें. पण लगेच तो म्हणाला, "नको, तुम्हीं नका मरूं; आपण दोघेहि मेलों तर दादा एकटा राहील." आतां तर मला माझें हंसें आवरेच ना. पण मोठया मुष्किलीनें मी तें आंवरून धरण्याचा प्रयत्न केला, व त्याची समजूत घातली. इतक्यांत रामचरण कपडे करून बाहेर आला व आम्हीं क्रिकेट ग्राउंडवर जावयास निघालों.

× × × ×

नित्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं मी रामचरणकडे गेलों. रामचरणनें मला सांगितलें कीं रणजीतला ताप आला आहे. आम्हीं क्रिकेट खेळावयास न जातां रणजीतकडेच बसून राहिलों. "सकाळीं उन्हांत खेळत असतांना घेरी आल्यासारखे झालं आणि रणजीत खालीं पडला. ताप कांहीं फार नाहीं. दुपारीं फक्त १०१ पर्यंत चढला होता." रामचरणानें मला रणजीतच्या तापाची माहिती दिली. मीहि त्याला भिण्याचें कांहीं कारण नाहीं म्हणून सांगितलें. रात्रीं मी रणजीतकडेच होतों. सकाळीं ताप कमी होता. दुपारीं जवळच्या गांवावर दरोडा पडल्यामुळें रामचरणला जाणें भाग होतें; जातांना त्यानें मला रणजीतजवळ बसून राहाण्यास सांगितलें. जातांना त्याच्या मनाची किती तरी चलबिचल झाली. पण न गेलें तर नोकरीवर पाणी पडेल. या भीतीनें अखेर मनाचा हिय्या करून तो निघून गेला.

× × × ×

दुपारभर रणजीत बरा होता. तो माझ्याबरोबर चांगला बोलत होता. बोलण्याच्या भरांत एकदां त्यानें मला विचारलें, " काका, ताप आला कीं माणसें मरतात का हो ?" त्याच्या प्रश्नानें माझें मन थरारलें. कांहीं तरी सांगून मी त्याची समजूत घातली. संध्याकाळीं क्रिकेट खेळून घरीं जातांना मंडळी रणजीतच्या समाचारास आली. त्यावेळीं रणजीत त्यांच्याबरोबर चांगला बोलला. संध्याकाळीं ५ वाजतां डॉक्टर येऊन गेले. त्यांनीं भिण्याचें कारण नाहीं म्हणून सांगितलें. पण आठ वाजल्यापासून तो चमत्कारिक करूं लागला. मी एका शिपायाला डॉक्टरला बोलावण्यास पाठविलें. आतां डॉक्टरांना रोगाचा निर्णय लागला. डॉक्टरनीं सांगितलें कीं " Sun Stroke " झाला आहे. पण भिण्याचें कारण नाहीं. ९ वाजतां रणजीत कांहींतरी बडबड करूं लागला. मी रामचरणला तार केली– " Ranjit serious Start at once. " रामचरणला हें अगोदर कळलें असतें तर तो गेला असता कशाला ? भावी संकटाची अंधुक सुद्धां कल्पना परमेश्वर कां बरें येऊं देत नाहीं ? १० वाजतां रणजीतला घरघर लागली. त्याच्या मुद्रेवर प्रेतकळा पसरलेली दिसत होती. माझ्या घशाला कोरड पडली. १२ वाजतां रामचरणच्या घोडयाच्या टापा ऐकूं येऊं लागल्या.

रणजीतची आतां आशा नव्हतीच ! रामचरणला सर्व हकीगत सांगण्याचें त्राण माझ्या जिव्हेंत उरलें नाहीं. पांच मिनिटांनीं देवाच्या बागेंत बागडण्यासाठीं रणजीतचें फुलपांखरूं नश्वर जगाचा त्याग करून हातोहात उडून गेलें. फुल कोमेजलें तरी ज्याप्रमाणें वास अखंड राहतो त्याप्रमाणें जरी रणजीत निघून गेला तरी त्याच्या वियोगानें माझ्या हृदयाला केलेली जखम अजूनहि ताजी आहे. त्याच्या मृत्यूनें मला चटका लागण्यासारखें आमचें रक्ताचें नातें नव्हतें; पण जिव्हाळा मात्र जबर होता.

× × × ×

त्या प्रसंगानंतर रामचरण मला भेटला नाहीं. रजा घेऊन तो जो कुठें गेला त्यानंतर मी त्याला पाहिलें नाहीं. 'सर्व्हिस लीस्ट' मध्यें मी त्याचें नांव शोधलें; पण सांपडलें नाहीं. त्या झुडपाला अजूनहि फुलें येतात. पण.....?

पुढील अंकांत ' **आदर्शांत** '

" **सहृदय** " ही गोष्ट

दोन स्थित्यंतरें

(श्री. ' मंगळमूर्ति.)

लाचार लेखक

(अत्यंत प्रयासानें लिहिलेला पहिला लेख एका प्रतिष्ठीत मासिकांत छापून येण्यासाठीं बाललेखकाची होणारी धडपड !–)

रा. रा. संपादक महाशय यांस कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि.

मनुष्य कितीहि वैभवाला पोंचला तरी त्यानें गोरगरिबांची परिस्थिति जाणून त्यांनां सढळहातानें मदत करण्यांतच त्यांचें मोठेंपण असतें. आपल्यासारख्या एका अत्यंत नाणावलेल्या आणि उच्च दर्जाच्या लोकप्रिय मासिकाच्या विद्वान संपादकांबद्दल माझी हीच कल्पना असल्यामुळें मी सोबतचा माझा बालप्रयत्न—अगदीं कसोशीनें केलेला प्रयत्न प्रस्तुतच्या लेखाकया रुपानें पाठविला आहे. त्याचा उदार मनानें यथायोग्य स्वीकार करून आपल्या उत्कृष्ट, लोकादरास अत्यंत पात्र झालेल्या सर्वांगसुंदर मासिकांत त्याला प्रोत्साहनाच्या जाणिवेनें स्थळ द्यावें अशी नम्र विनंति आहे. सदर लेख मी अत्यंत प्रयासानें, रात्रीच्या रात्री जागून, दोन तीन वेळां सुवाच्यं अक्षरानीं लिहून पाहिल्यावर अखेरची प्रत आपणाकडे पाठविली आहे. यापेक्षां हा लेख लिहिण्यासाठीं मी काय काय परिश्रम केले आहेत हें मला कळत असलें तरी त्याची आपणांला जाणीव करून देण्यास माझ्याजवळ शब्दभांडार नाहीं. तेव्हां सदर लेखास उदार मनानें स्थळ दिल्यास माझ्यासारख्या बाललेखकास प्रोत्साहन दिल्याचें आपणास श्रेय मिळेल. उत्तर पाठविण्याची कृपा करावी. क. लो. अ. ही वि.

आपलें सदैव शुभ यश इच्छिणारा,

—— ——

× × ×

सलगींतला दोस्त

(तोच पहिला लेख त्याच नांवाजलेल्या अशा बडया मासिकांत सुमारें ६–७ महिन्यानीं छापून आल्यामुळें त्याच बाललेखकाचा बदललेला दृष्टिकोन:––)

रा. रा. + + + यांस सप्रेम नमस्कार.

आपल्या मासिकांत माझा लेख छापून आला याबद्दल मी आपले आभार मानले तर औपचारिकतेचा आणि अपरिचिताचा माझ्यावर आरोप येईल. अशा शिष्टाचारानें

वागणें हें परक्या भावाचें द्योतक आहे. मी तसें लिहिलें असतें तर आपण प्रेमळ रागानें माझी कानउघाडणी केली असतीत; म्हणूनच मी आपले तिन्हाइतासारखे धन्यवाद गाणार नाहीं.

नाताळची आमच्या शाळेला रजा पडली आहे. आमच्या शेजारचा गजाभाऊ प्रधान मला आपल्याबरोबर आपल्या गांवीं येतोस का म्हणून विचारत होता. पण मी तें साफ नाकारलें. तेथें जाऊन करायचें तरी काय हो ? तेथें वेळ अगदीं कंटाळवाणा जातो. मागल्या वळीं गेलों तेव्हां सायकलीवर बसायला शिकण्यांत तरी दिवस गेले. आतां तर मी त्यांत पक्का तरबेज झालों आहे. तेव्हां वेळ जाण्याची आशा खुंटलीच. नाहीं म्हणायला डोंगरावर पेरूंची झाडें आहेत. पण तेथें तरी काय सबंध दिवस जाणार ? तेव्हां त्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या झालं ! आणि शिवाय सध्यां आमचे मेहुणे आले आहेत इकडे. कराचीच्या करन्सी ऑफिसांत असतात ते. पगारहि चांगला भरपूर आहे त्यानां 'कलेक्शन' चा भारी नाद. स्टँप्स, जुनीं नाणीं, आगपेटयांवरची चित्रें, सिगारेटच्या बॉक्समधली कार्ड्स्, निरनिराळ्या जातीचे दगड, यांचा त्यांच्या घरीं म्हणजे एक भला मोठा संग्रह आहे. कुठें दुसरीकडे तसा संग्रह असल्याचें कळलें कीं, त्यांना तो पाहिल्याशिवाय जेवणसुद्धां सुचत नाहीं. जबरदस्त वेड त्यांना असल्या गोष्टींचं. बाकी गाणं बजावणं, सिनेमा-नाटकं या बाबतींत मात्र अगदींच अरसिक हा एक मनुष्यस्वभावच आहे म्हटलं पाहिजे. माझ्या गेल्या लेखांत सुद्धां मी लिहिलं आहे कीं " व्यक्तिमात्राप्रमाणें रुचिवैचित्र्य हें असतेंच ! " त्याचाच हा एक दाखला. पण त्यांच्या अगदीं उलट स्वभावाची आमची आक्का आहे. लग्नाअगोदर बाबानीं तिला हारमोनियम आणून दिला होता. त्याच्यावर तिचा सबंध दिवस जात असे. महा शोकी बाज्याच्या पेटीची ! तिनें लग्न झाल्यावर सुद्धां हक्कानें मागून नेला आहे तो कराचीला. नवरा-बायकोंत इतका भिन्नपणा ! गेल्या लेखांत तिसाव्या पानावर खालून तिसऱ्या-चौथ्या ओळींत तरी मीं तेंच दाखवलें आहे कीं, " परस्पर विरोधी आवडीनावडीच्या स्वभावाच्या माणसांत जें पति-पत्नीचें नातें येतें तें केवळ विधिघटनेमुळेंच ! " तशी आमच्या आक्काची आणि भावोजींची गत !

सध्यां कांहींशी थंडी पडते आहे. तुमच्या मुंबईला कशी काय हवा आहे ? पहांटेचा बराच गारवा पडतो. मी तर बुवा, हल्लीं फिरायला जायचं सुद्धां सोडलंय्. आमच्या बेबीला सध्यां खोकला येतो आहे; डॉक्टरनीं तो थंडीमुळें म्हणून सांगितलं आहे. बाकी सर्व मंडळी ठीक आहे. तुमची व सौभाग्यवतीचीहि खुशाली इच्छितों.

हो, पण एक मुख्य बाब राहिलीच.छापण्यासाठीं म्हणून मी जो लेख पूर्वी पाठवला त्यावेळीं त्यासोबत एक पत्र पाठविलें होतें. तुम्हीं माझ्यावर तें पत्र वाचून फार रागावल असाल, नाहीं ? माझ्यासारख्यानें इतका औपचारिकपणा दाखवल्याबद्दल आपणाला वाईट वाटलें असेल तर मी माफी मागतों. पण केवळ " लेखकांस सूचना " या आपल्या मासिकांतल्या जाहिरातीवरूनच मी आपल्या व्यक्तिशः पत्राची सुद्धां वाट न पहातां लेख रवाना केला हें आपण लक्षांत आणलें म्हणजे मी आपल्याकडे किती आपुलकीच्या नात्यानें वागतों आहे हें आपल्या सहज लक्षांत येईल.

पत्रोत्तर जरूर जरूर पत्र देखतांच यावें. मोठ्यांस नमस्कार, लहानांस आशीर्वाद, कळावें. लो. अ. ही विनंति.

आपला,

× × ×

हिंदुसणांच्या माहितीसाठीं–

"आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास" वाचा

लहान मुलांना खूष करण्यासाठीं

व्ही. प्रभा कंपनींत जाऊन लांकडाचे रंगीत खेळ घ्या.

तुमच्या स्वतःसाठीं तर बऱ्याच उपयुक्त

वस्तु तेथें मिळतील.

" उगवत्या सूर्यास प्रणाम "

(पृथ्वी–वृत्त)

सहस्रकर ! तेजसा ! प्रभुवरा ! तमोध्वंसका! ॥
प्रभातकुसुमोत्सवा ! हृदय–चेतनोत्पादका ! ॥
प्रबोधचतुरा ! विशाल बलधारका ! भास्करा ! ॥
प्रणाम करितों मदीय कर जोडुनी, धी–वरा ! ॥ १ ॥

तवोदय गिरीवरी वघुनिया उषा ही हंसे ॥
तदा तरल–रक्तता अभिनवा, कपोलीं दिसे ॥
विनम्र गुणसुंदरी लसित अष्ट दिद्देवता ॥
प्रसन्न हृदयें अपूर्व सजती तुझ्या स्वागता ॥ २ ॥

प्रभातसमयीं नवोनव अशा सुरम्याकृती ॥
तुझे किरण–भृत्य हे, गगनमंदिरीं काढिती ॥
विशुद्ध रमणीयता सुरस थाटली पाहुन ॥
प्रसन्न अति हो, तम श्रमित सृष्टिदेवी मन ॥ ३ ॥

सुरम्य कलिका लता–तरु कटीवरी वैसुनी ॥
वनीं, उपवनीं सुखें विहरती मधुस्यंदनीं ॥
कुणी विकसुनी त्वदीय अभिदर्शनें हर्षती ॥
कुणी हळुच आडुनी स्मितमुखें तुला पाहती ॥ ४ ॥

त्वदागमन पाहतां तरुशिखांवरी वैसुनी ॥
तव स्तवन हे विहंग करिती मुदें गाउनी ॥
तसे गगनिं मंडलाकृति फिरूनियां क्रीडती ॥
महोत्सव सुसाजरा करिति चित्तहारी किती ॥ ५ ॥

तुला बघुनियां प्रफुल्ल मन जाहलें भास्करा ! ॥
मदीय हृदयीं प्रमोद भरला कृपासागरा ! ॥
घडो सतत हें तुझें मजसि दिव्यसें दर्शन ॥
करी मलिनसे हृदंतर–विचार जें पावन ॥ ६ ॥

कवि– 'विवेक'

तेथें कोणीच नव्हतें. मी खिडकीजवळ उभा राहून बाहेरची फुलझाडें पाहूं लागलों. पहात होतों एवढेंच. पण त्यावेळीं मला कोणी विचारलें असतें कीं त्या छोटया बगिच्यांत गुलाबाचीं झाडें किती आहेत, मोगरीचीं किती आहेत, आणखी दुसरीं कसल्या कसल्या तऱ्हेचीं झाडें आहेत ? तर मला त्यांतल्या एकाचेंहि उत्तर देतां आलें नसतें. कारण मी इतक्या तीक्ष्ण निरीक्षक बुद्धीनें त्या फुलझाडांकडे मुळीं पहातच नव्हतों. एखाद्या गोष्टीवर्दल मन लाऊन विचार करतांना आपण एखाद्या वस्तूकडे डोळ्याची पापणी न हालवतां किती वेळ तरी बघत असतो अगर हातांत पेन्सिल असली तर कांहीं तरी भिरकटत असतो. म्हणजे ती कृती कांहीं हेतुपूर्वक घडत असते असें नाहीं.

" ओल्लो, डियर जयवंत. How long are you standing here ?" प्रभाकर पायांत खाडावा घालून व कमरेसभोंवती टॉवेल गुंडाळून हातांतल्या फणीनें केंस वळवीत आंत आला.

" अं ?" मी दचकून म्हणालों.

" कसलं ध्यान चाललं होतं ? " प्रभाकर हंसत हंसत आरशासमोर उभा राहून केसाचा भांग पाडीत म्हणाला.

" छेः, ध्यान कसलं ? असाच बाहेर पहात होतों. हो, पण प्रभा, वाल तुम्हीं नाटकाला आले नाहींत ते ? I was looking for you there !"

" काय बेमालुम थाप मारतो आहेस रे ? "

" Really ! खरंच मी गेलो होतों नाटकाला."

" आणि तुझे फ्रेंड्स् कुठें गेले ?"

" तेहि माझ्याबरोबर होते की ! मी तर मुद्दाम ' टुम ' काढली नाटकाला जायची. म्हटलं तुम्हांला थिएटरमध्यें भेटीन. पण तुमचा तर पत्ता नाहीं."

" छान. आयत्या वेळीं अण्णांना जी थंडी वाजूं लागली ती ते दोन, चार पांघरुणं अंगावर घेऊन बिछान्यावर पडले तरी थांबेना. शालीन तर सकाळपासून धुसपुसत होती. तिला विचारलं तर तीहि नाहीं म्हणाली. मग आम्हीं बसलों मुकाटयानं घरीं."

" च्. च्. फुकट आमच्या पदरचे पैसे गेले. "

" मग मला काय सांगतोस ? "

" वाः, तूं मला नाटकाला येतोस म्हणून सांगितलंस म्हणून तर मी माझ्या फ्रेंड्स्-बरोबर नाटकाला आलों."

" अस्स अस्स–माझ्यासाठीं नाटकाला आला होतास नाहीं ? " प्रभाकर मिस्कील-पणानें हंसत हंसत म्हणाला. इतक्यांत शालीन कशालाशी दिवाणखान्यांत आली.

" ऐकलंस का ग शालू ? "

" काय ? "

" जया कांहीं तुझ्यासाठीं आला नव्हता नाटकाला. माझ्यासाठीं आला होता. तूं नेहमीं सांगतेस ना कीं जया सगळं तुझ्यासाठीं..."

पुढचे शब्द ऐकावयाला शालिनी तेथें उभी राहिलीच नाहीं. कपाळाला आंठ्या घालून ती झटकन तिथून निसटली. मला कसेसेंच वाटलें. खरी गोम प्रभाकरला कळूं नये म्हणून मी जें बोललों त्याचा अगदीं भलताच विपर्यास होऊन शालिनीच्या रागांत मात्र भर पडली हें माझ्या लक्षांत बऱ्याच वेळानंतर आलें.

× × × ×

दोन दिवस मी कसे काढले माझे मलाच ठाऊक ! मी दोन दिवसांत शालिनीच्या घरीं मुळींच फिरकलों नाहीं. तिच्याकडे मी एक दिवस गेलों नाहीं तर मला मुळींच चैन पडत नसे; आणि तिलाहि मी आलों नाहीं तर कसेसेंच होत असे. आमच्या दोघांच्याहि मनाची ओढ एकमेकाकडे तितक्याच वेगानें जात होती. परंतु यावेळीं शालिनीला माझें दर्शन नको होतें. मला पाहून ती कपाळाला आंठ्या घाली. आणि मलाहि तिचा बराच राग आला होता. खरें म्हटलें तर माझी कांहींच चूक नव्हती. तिच्यासाठींच मी नाटकाला आलों होतों. आणि ती आली नाहीं म्हणून मी खरें म्हटलें तर रागवावयाचें. पण उलट तिनेंच माझ्याशीं अबोला धरला याची मला चीड आली. मी येणार नाहीं असें तिला म्हटले होतें म्हणूनच ती नाटकाला जाण्यास कबूल नव्हती हें मला पक्कें ठाऊक होतें. पण नंतर एकाएकीं तशीच परिस्थिति आल्यामुळें मी नाटकाला गेलों. अर्थात मला तिला तसें कळवणें शक्यच नव्हतें. कारण ती नाटकाला आली असेल अशीच माझी तेव्हांपर्यंत खात्री होती. मग यांत माझा काय दोष होता ?

शालिनीशीं खोटया उद्दामपणानें वागणेंसुद्धां मला अतिशय जड होतें. निर्धारि टिकवण्यासाठीं मी माझें मन रमेल असे सारे उपाय केले. तीन, चार नवीन मराठी कादंबऱ्या विनाकारण खरेदी केल्या. माझ्या एका, दोघा मित्राकडे वेळ घालवण्यासाठीं मी आपण होऊनच जाऊं लागलों. मी कधीं न येणारा माणूस त्यांच्या घरीं चार चार,पांच पांच तास गप्पा गोष्टी करीत असलेला पाहून त्यानांहि वरेंच आश्चर्य वाटलें. पण मी स्वतः जें 'कार्य' आरंभलें होतें तेंच जर आश्चर्य करण्यासारखें होतें, तर त्याला पोषक अशा माझ्या हातून घडणाऱ्या इतर लहानसहान आश्चर्यांच्या गोष्टीबद्दल आश्चर्य करण्यासारखे काय होतें ? मी आमच्या कॉलेजच्या क्रिकेट ग्राउंड्वरहि दोन दिवस गेलों. रॉयल ऑपेरा, वेस्टेंड, एंप्रेस या माझ्या तीन आवडत्या सिनेमाचे दोन दिवसांत दोन दोन वेळां ड्रामा पहाण्यांत मला दहा रुपयाची नोट खर्च करावी लागली. शालिनवरचा राग टिकवण्याचा जो जो प्रयत्न शक्य होता तो मी अंमलांत आणला. पण ओढघाचें पाणी दगड

धोंडयांचा अडथळा झाला तरी अखेर समुद्राला मिळावयाचेंच ! वेस्टेंडमधला साडेतीनचा 'ड्रामा' पाहून मी रॉयल ऑपेरांत गेलों. पण ती फिल्म इतकी गचाळ होती कीं मी दोन 'पार्ट्स्' झाल्यानंतर उठून थिएटरबाहेर आलों. इतक्या लवकर घरीं जाण्याचें टाळण्यासाठीं मी चौपाटीचा रस्ता धरला. पण आज माझा दैवानें पिच्छाच पुरवण्याचा निश्चय केला होता कीं काय कोण जाणे ! मी चौपाटीवर या टोकापासून त्या टोकापर्यंत दोन तीन फेऱ्या मारल्या. पण एखादा मित्र अगर ओझरत्या ओळखीचा एखादा माणूसहि मला आढळला नाहीं. अखेर कंटाळून मी वाळूंत जाऊन बसलों.

तो रविवारचा दिवस असल्यामुळें मुबलक गर्दी होती. मुंबई पहावयास आलेलीं खेडवळ माणसें तो चौपाटीवरील लोकांचा दांडगा जमाव पाहून आणि तरण्याताठ्या मुली हंसत खिदळत बेगुमानपणानें परपुरुषांच्या अंगाला खेटून चालतांना पाहून गांवढळपणानें आ वासून पहात होती. ठिकठिकाणीं चार,पांच समवयस्क मित्रमंडळी आजूबाजूच्या 'जगा'ला विसरून कित्येक चौपाटीवर फिरणाऱ्या ठसकेबाज मुलींबद्दल हवेतसे मोठमोठ्यानें 'रिमार्क्स्' मारित होते. उलटपक्षीं कांहीं सुशिक्षित खटयाळ मुली एकमेकांत एखाद्या शेजारच्या माणसाबद्दल बेमुर्वतपणानें चेष्टा करीत होत्या. अशा एका 'चौकडी'-पासून पांचदहा हातांवर मी बसलों होतों. तेथून मला त्यांचें बोलणें स्पष्ट ऐकूं येत होतें. एखाद्या माणसाची तिरक्या नजरेनें अगर बोटानें इतर मुलींना जाणीव करून देऊन त्या त्याच्याबद्दल इतक्या खटयाळपणानें व मोठमोठ्यानें बोलत होत्या कीं येवढ्या गर्दीत त्यानीं सारी लाजलज्जा आणि विनय कुठें गहाण टाकली होती कीं काय असा मला संशय वाटला. दगड-खडकांतून वाट करून धांवणाऱ्या निर्झराप्रमाणें गंडेरी-शेंगावाले,चणेवाटाणेवाले, चिवडा भज्यावाले आणि 'बदामना' पुरीवाले आपल्या कर्कश आणि बदसूर आरडाओरडीनें दर पांच दहा हातावर बसलेल्या स्त्री पुरुषांच्या छोट्या मोठ्या 'मेळ्या'मधून वाट काढीत होते. भिकारी 'गायक'हि आपल्या भसाड्या सुरांत पितळीच्या तालावर गाणें म्हणण्याचा बंडखोरपणा करीत होते. त्यांचें गाणें ऐकून खूष होण्यापेक्षां तें सुरूं करण्यापूर्वीच एखादा पैसा त्यांच्या अंगावर फेंकावा लागत होता.

या सर्व गडबडींत माझा मला विसरून जाण्याचा मी अटोकाट प्रयत्न करीत होतों. पण माझ्या इच्छेविरुद्ध माझें मन तिथून निसटून कुठेंतरीं भटकत होतें आणि अखेर एखाद्या ओढाळ गुरूंप्रमाणें मला नको होतें त्याच मार्गावर अचूक जाऊन थांबत होतें. मीं तें टाळण्यासाठीं होते नव्हते ते सर्व प्रयत्न केले. पण मला त्यांत मुळींच यश येईना ! अखेर कंटाळून मी माझ्या मनाला वाटेल तसें भरमसाट भटकण्याला मुभा दिली; पण त्यामुळें मी जें टाळत होतों तेंच घडून आलें. शालिनीला पहाण्यासाठीं इतका वेळ दाबून धरलेलें माझें मन उचल खाऊं लागलें. दोन दिवस मी तिला भेटलों नाहीं तर तिला काय वाटलें असेल ? तिचीहि माझ्यासारखी स्थिति झाली नसेल कशावरून ? मूळ ती

जरी माझ्यावर रागावलेली असली तरी मी दोन दिवस तिच्याकडे आलो नाहीं याचा तिच्या मनावर कांहींतरी परिणाम झाल्याशिवाय खास रहाणार नाहीं अशी माझी खात्री होती. कारण आम्हीं बाहेरून जरी लटकेपणानें अगर क्वचित् खरेपणानें एकमेकावर अतिशय रागावलों असलों तरी तो राग अक्षय टिकवण्याइतकें आमच्यांत मनोधैर्य नाहीं हें आम्हां दोघांनाहि पुरेपुर कळून चुकलें होतें. त्या वेळापुरती रागाची लहर येईल तितकीच. नंतर तिचा मागमूसहि राहणें शक्य नव्हतें. हा आमच्या मनाचा कोतेपणा एकमेकांना पूर्ण ओळखीचा असल्यामुळेंच मला राहून राहून वाटत होतें कीं, शालिनीला माझ्या न येण्यानें फार वाईट वाटलें असेल. कदाचित् तिच्या मानी स्वभावानुसार तिनें जरी माझ्यासारखाच माझ्यावरचा राग टिकवण्याचा प्रयत्न केला असला तरी यावेळपर्यंत तिचें मन तिच्या मुळींच कह्यांत नसणार अशी माझ्या मनाची पक्की खात्री झाली. आणि त्या भरांतच मी एकदम उठलों आणि पायांत स्लीपर घालून काठी फिरवीत दहा, बारा पावलें गेलों न गेलों तोंच माझ्या पाठीवर कोणीशी थाप मारली. मी वळून पाहिलें तर एक काळसर वर्णाचा मनुष्य माझ्याकडे पहात हंसतो आहे. माझ्या तो मुळींच ओळखीचा नव्हता असें मला वाटलें. म्हणून मी म्हटलें,

"I think you have taken me for some—(मला वाटतं तुमची माझ्याबद्दल गैर समजूत–)"

"Well, Mr. Kale, you have already forgotton me it seems. (व:, मि० काळे, तम्हीं मला विसरलांत असं दिसतं)" तो मनुष्य माझा हात आपल्या हातांत घेत जोरानें आवळून म्हणाला. मी अगदीं गोंधळून गेलो. त्याला कधीं पाहिल्याचें मला स्मरेना. मला अजून वाटत होतें कीं माझ्यासारखाच त्याच्या ओळखीचा एखादा ओळखीचा मनुष्य असावा. आणि तोच मी असें समजून तो माझ्याशीं इतकी लगट करित असावा. पण त्याला तर अजून त्याची चूक उमगली नव्हती.

"अज़ून मला नाय ओळखले ?" तो माझी गोंधळलेली स्थिति पाहून हंसत मराठींत बोलूं लागला.

"मी फ्रेडिरिक डिसोझा. रेल्वेंत आपली ओळख —"

"ओ, आय सी !" मला एकदम त्याची ओळख पटली. मी नंदगांवला जातांना माझ्याबरोबर गाडींत जो खिश्चन होता तोच आतां माझ्या समोर उभा होता. पण या वेळीं त्याचें तें धोतर, पायांत वहाणा, डोक्यावर फोल्ड केलेली काळी टोपी वगैरे एखाद्या अस्सल हिंदूसारखा पोषाख पाहून मी मोठमोठ्यानें हंसूं लागलों. माझ्या हंसण्याचें कारण त्यालाहि उमगून तोहि माझ्याबरोबर हंसूं लागला.

"Let us sit here for a while. (आपण बसूं थोडा वेळ इकडे !)" असें म्हणून त्यानें माझा हात धरून मला खालीं बसवलें शालीनकडे जाण्याच्या माझ्या बेताला आडकाठी आल्यावर मीहि प्रसन्न मनानें त्याच्याबरोबर गप्पा गोष्टी करूं लागलों.

फ्रेडरिक फार उमदा मनुष्य होता. तो कांहीं माझ्यापेक्षां फारसा मोठा नव्हता. फार तर सव्वीस सत्तावीस वर्षांचा म्हणजे तरुणच होता. त्याच्या स्वभावाशीं माझा स्वभाव ऐशीं, नव्वद टक्के जमत होता. तो इतका बोलका होता–परंतु मला त्याचें बोलणें कंटाळवाणें वाटत नव्हतें. कारण तो एखादा व्यवहारी स्वभावाचा मनुष्य नसून माझ्यासारखाच अगर माझ्यापेक्षां किंचित् जास्तच काव्याचा भोक्ता होता. आणि म्हणूनच त्याचें बोलणें मला नीरस वाटत नव्हतें.

बोलतां बोलतां जवळच बसलेल्या तीन, चार मुलींकडे दृष्टि फेंकून फ्रेडरिक म्हणाला,

"काय मि. काळे, तुमच्यांत 'वुइने'ची 'ब्युटी' छान असते नाय ?"

"म्हणूनच असला हिंदु ड्रेस करून तुम्हीं चौपाटीवर येता नाहीं ?" मी मोठ-मोठ्यानें हंसत त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणालों.

"नाय, नाय. तसा नाय. ती माझी 'व्हिम' हाय्. पण बघा मि. काळे, ही 'नॅचरल ब्युटी' हाय. आमच्या जातींत काय ! युरोपियनची 'इमिटेशन' करायला बघते. पण एक पण सफेद 'फेस' नाय. सगळा 'ब्लॅक सी.' पावडरचे डबे खलास होते. पण तोंड धुला कीं काला डांबर." त्याच्या या कोटीनें मला अनावर हंसूं आलें.

"मग तुला वाईट वाटलं असेल नाहीं ख्रिश्चन जातींत जन्मल्याबद्दल ? इंटरमॅरेज को नाहीं करित मग ?"

माझ्या या प्रश्नावर त्यानें मला आपलीं जीं मतें सांगितली तीं ऐकून मला त्याच्या सौंदर्याबद्दलच्या कल्पनेचें बरेंच आश्चर्य वाटलें. सौंदर्याबद्दल, त्यानें निरनिराळे आधार देऊन, मला जें 'व्याख्यान' दिलें त्यांत मुख्य सार म्हणजे एवढेंच होतें कीं, "सौंदर्य हें स्वरूपांत नाहीं. कुरूप स्त्रीत सुद्धां तितक्या बारकाईनें पाहिलें तर स्वरुपसौंदर्य आढळून येईल. मात्र बाह्यांग रूपाला हुरळणाऱ्या फारच थोड्या चंचल तरुणानां हें कळून येतें. आणि तेंहि पण पश्चात्तापाची पाळी आली म्हणजे. तोंपर्यंत फुलपांखरासारखी त्यांची अधाशी नजर मोहक व गौरवर्णाचे चेहरे हुडकीत असते. व एकापेक्षां दुसरी जास्त सौंदर्यवान दिसली कीं त्याचें मन पहिलीबद्दल विटून दुसरीवर स्थायिक होतें. तात्पर्य काय, तर प्रेम करावयाचें तें एका स्त्री मुलीवर आणि तेंहि एकदांच करावें."

त्या रात्रीं मी त्याच्या बोलण्याचा खूप विचार केला. "We can love but one girl." (प्रेम केलें तर तें एकाच मुलीवर केलें पाहिजे) हें कांहीं खोटें नव्हतें. सतराजणाकडे त्याच दृष्टीनें पाहिलें म्हणजे त्यांत अस्सलाचें फारच थोडें बीज सांपडतें. एका ठिकाणाहून दुसरीकडे नजर गेली म्हणजे पहिल्या ठिकाणचा विसर पडून दुसऱ्या

ठिकाणीं मन रमतें. असल्या चंचलपणांत प्रेमाचा चिरस्थायीपणा असणेंच संभवत नाहीं. प्रत्येक नवाईबद्दल सहानुभूति, प्रेम वाटून जुन्याचा विसर पडतो. असल्या चंचलपणांत दिखाऊ लटकेपणाचाच जास्त अंश सांपडावयाचा.

मी हें सर्व तत्वज्ञान लढवलें खरें. पण मीहि असल्या तऱ्हेचा मनुष्य आहे–निदान होतों हें माझ्या लक्षांत आलें. शालीन दृष्टीआड झाल्यावर मी कुसुमकडे—

कुसुमचें नांव आठवतांच मला माझ्या निर्धाराची आठवण होऊन मी एकदा कुशीवर वळलों आणि दुसरे कसले तरी विचार करूं लागलों. त्या विचारांत मला केव्हां झोंप लागली मला कळलेंच नाहीं.

प्रकरण ९ वें.

अबोल्यानंतर

मी नंदगांवाहून आल्यापासून घरीं पत्र लिहिलें नव्हतें. महिना महिना घरीं पत्र न पाठवणें हें माझ्या अंगवळणींच पडलें होतें. कधींमधीं बाबानीं खरमरीतसें पत्र लिहिलें म्हणजे मला घरची आठवण होऊन एखादें कार्ड खरडी. त्यानां फक्त माझी खुशाली कळली म्हणजे पुरें होतें. पण तें सुद्धां माझ्यानें होत नसे. कारण मला लिहिण्याचा फार कंटाळा होता. आणि आईला आणि बाबांना लिहून लिहिणार तें काय? 'मी सुखरुप आहे, काळजी नसावी. आपली खुशाली कळवावी. हवा बरी आहे, रोगराई नाहीं' एवढा ठराविक मजकूर लिहिला कीं आमच्या नाड्या आखडल्या. पुढें काय लिहावें तेंच कळत नसे. मग कार्ड भरण्यासाठीं 'तुला साष्टांग नमस्कार, बाबांना सा. नमस्कार, प्रभाला आशिर्वाद, मधूला आशिर्वाद' वगैरे उगीच मोठमोठें अक्षर काढून अर्धेअधिक पत्र भरून काढावयाचें. एखाद्या मित्राला लांबलचक पत्र लिहितां येतें पण घरच्या नातेवाईकानां एखादें कार्ड लिहितांना तें लिहून भरेल कसें हाच प्रश्न पडतो. आणि नंदगांवाहून येतांना तर मला आईनें तीन तीनदां बजाऊन सांगितलें होतें कीं, नुसतें कार्ड न लिहितां लांबलचक पत्र पाठव. लिहिण्याचा कंटाळा करणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला लांबलचक पत्र लिहिणें म्हणजे मोठा जुलुम होता. पण न लिहून मुळींच चालणार नव्हतें. शेवटीं मी नोटपेपर पुढ्यांत ठेऊन दौतींत टांक तर बुडवला आणि कृ. सा. न. वि. वि. हे शब्द झरकन लिहिले. आणि पुढें कांहीं लिहिणार इतक्यांत पोष्टमनच्या वहाणाचा करकर आवाज ऐकून खुर्चीवरून उठलों आणि त्याच्या हातांतलें पत्र घेतलें. वरचें अक्षर माझ्या मुळींच ओळखीचें नव्हतें आणि छाप तर नंदगांवाचा होता. मी विचार करीत तें फोडलें आणि खुर्चीवर येऊन बसलों. घडी उलगडून खालीं सही पाहिली तों 'कुसुम!'

मी एकदम दचकलों. कुसुमकडून मला पत्र येईल अशी माझी केव्हांहि अपेक्षा नव्हती. आणि तिच्याकडून पत्र येणें हें मला कसेंसेंच वाटलें. कारण किती झालें तरी ती प्रभाकराची वादत्त वधु होती. तिची माझी फक्त आठ दिवसांची ओळख. त्या ओळखीच्या आधारावर तिला मला पत्र लिहिण्याचा अधिकार पोंचत नव्हता आणि शिवाय माधवरावांचा माझ्यावर राग कां आहे त्याचें कारणहि तिला ठाऊक होतें. मी कांहीं वेळ जरी तिच्यावर भाळून गेलों होतों तरी आतां आधल्या रात्रीच्या फ्रेडरीकच्या एका वाक्यानें मला माझी चूक कळून आली होती. पण तिनें पत्रांत काय लिहिलें आहे तें कळण्याची उत्सुकता लागून मी वर मान करून पत्र पुढ्यांत घेतलें.

मी तें पत्र एकदां, दोनदां, तिनदां वाचलें. पत्र तिच्याकडून आलें आहे हें कळतांच मला जितकें आश्चर्य वाटलें त्याच्या कितीपट तरी आश्चर्य पत्रांतील मजकूर वाचून मला वाटलें. असल्या पत्राची अपेक्षा मी शालीनकडून केली असती. सबंधपत्रांतून एकच सूर निघत होता. कुसुमचें माझ्यावर अत्यंत निर्भेळ प्रेम बसलें होतें. मला पाहिल्यापासून, माझा आनंदी स्वभाव कळल्यापासून आणि नदीकिनारीं मी तिला उद्देशून बोललेल्या 'त्या' अर्ध्याअधिक वाक्यावरून तिचें माझ्यावर मन बसलें होतें. त्या वेळच्या माझ्या वागणुकीवरून तिचा अगदीं निराळा ग्रह बनत चालला होता.आणि खरें म्हणायचें तर मी त्यावेळीं शालीनला जवळजवळ विसरून कुसुमवर भाळलों होतों. परंतु आतां कांहीं तशी स्थिति नव्हती.

तिनें आणखी पत्रांत लिहिलें होतें कीं 'बाबानीं जरी प्रभाकरांशीं माझ्या लग्नाचें ठरवलें आहे तरी मी मनांतून पति या दृष्टीनें आपणाकडेच पहाणार. प्रभाकरांशी माझा विवाह झाला तर तो केव्हांहि सुखदायी होणार नाहीं.' शिवाय तिनें आणखी बरेंच कांहीं कांहीं लिहून आपलें मनोगत मला परिपूर्ण कळवण्याचा शक्य तो प्रयत्न केला होता. तें सबंध पत्र वाचून मला एखाद्या कादंबरींतल्या प्रसंगाप्रमाणें तो प्रसंग वाटला. तिन्हाईत तरुणीनें अस्पष्ट संशयाच्या आधारावर एखाद्यास प्रेमपत्र पाठविणें ही चाल हिंदुस्थानांत बरीच परकी आहे. कादंबरी नाटकांतून असलें प्रसंग हरदम सांपडत असले तरी व्यवहारांत त्याचा केव्हांहि अभावच असतो. खेडवळ कुसुमनें मला लिहिलेलें पत्र जरी एखाद्या कादंबरींतल्या पत्राप्रमाणें मला सकृद्दर्शनी भासलें तरी तिचें माझ्यावरील अमर्याद प्रेम व्यक्त करण्याकरितां तिनें पुनः पुनः त्याच त्याच अर्थाची लिहिलेलीं वाक्यें व शब्द वाचून तिच्या मनाची तळमळ मला पुसट पुसट दिसूं लागली. कुसुम सर्वांग सुंदर नसली तरी शालीनीपेक्षां ती कशांतहि आणि कुठल्याहि रीतीनें उणी पडत नव्हती. पण इतके मात्र खरें कीं, तिच्या अंतःकरणांतली तळमळ स्पष्ट रीतीनें कळत असतांना सुद्धां माझें मन तिच्याकडे ओढ घेईना. ही मनावरची मुखत्यारी फ्रेडरिकच्या एकाच वाक्यानें गाजवली असेंच मला राहून राहून वाटूं लागलें.

तिनें माझ्याकडून उत्तराची अपेक्षा केली होती. तिला काय उत्तर द्यावें याच विचारांत मी गढून गेलों. नंदगांवला तिला पाहून माझ्या मनाची किंचित्काल चलबि-

चल झाली या आधारावरच तिनें पत्र लिहिलें होतें. मग त्यांत तिचा दोष काय? दोष होता माझाच: पण आतां त्यावर पांघरूण घालण्यासाठीं मला मखलाशी करणें भाग होतें. तिला समजुतीच्या शब्दांनीं तिच्या कर्तव्याची जाणीव करून देऊन मोकळें व्हावें तर त्यामुळें माझा मीच पेचांत सांपडत होतों. ज्याअर्थीं तिनें धीट बनून मला पत्र पाठविलें होतें त्याअर्थीं माझ्या पत्रावर उत्तर म्हणून ती असा प्रश्न विचारील कीं, "नंदगांवला असतांना आपण माझ्यावर प्रेम करीत होतां, हें आपणासहि नाकबुल करतां यावयाचें नाहीं. मग आतांच तें मावळण्याचें कारण काय? दुसरीकडे कुठें नजर गेली का?" असा प्रश्न विचारण्याइतकी ती धीट बनेल असें मला आतां खात्रीनें वाटत होतें. मग आतां काय उत्तर देणार? अगदीं खरें सांगितलें तर शालीनबद्दल तिच्या मनांत द्वेष आल्याशिवाय राहील का? खेड्यापाड्यांत वाढलेल्या मुली जरी एरव्हीं कितीहि निर्दोष आणि साध्या-भोळ्या म्हणून गणल्या गेलेल्या असल्या तरी निदान प्रेमाचा–त्यांच्या सर्वस्वाचा प्रश्न येतांच त्या मत्सरापासून कितीशा अलिप्त राहतील ह्याचा मला संशयच होता. आणि म्हणूनच मला प्रश्न पडला कीं कुसुमच्या पत्राला उत्तर द्यावें काय!

कोणी आल्यासारखें वाटलें म्हणून मी कुसुमचें पत्र ड्रॉवरमध्यें घातलें आणि तिला पत्र लिहायला घेतलेला नोटपेपर पॅडमध्यें घालून बाहेर आलों. पगडी, लँाग कोट घातलेला एक साधारणसा उतार वयाचा सभ्य गृहस्थ जोडे काढून नमस्कार करीत आंत आला. मीहि त्यानां प्रतिनमस्कार करून खुर्ची पुढें केली आणि बाजूच्या दुसऱ्या खुर्चीवर मी बसलों. त्यानें रुमालानें तोंड पुशीत आणि पगडी काढून टेबलावर ठेवीत म्हटलें,

"आपण मला ओळखलं नसेल?"

"नाहीं. कोण आपण?" मी लटकें हंसत आणि त्याची ओळख पटवण्याचा प्रयत्न करीत विचारलें.

"मी 'ओरियंट्ल् इन्शुरन्स कंपनी'चा एजंट आहे."

विमा कंपनीचा एजंट म्हटल्याबरोबर माझ्या छातींत धस्स होऊन मी घड्याळाकडे नजर फेंकली. विमा कंपनीच्या एजंटासारख्या बडबड्या आणि 'चिकट' मनुष्याशीं गांठ पडल्यावर किमानपक्षीं दोन तास तरी बैठकीवरून उठणें शिष्टाचारासाठीं आणि निरुपायामुळें अशक्य होणार आणि अर्थात खाणावळींतून अलेल्या डब्यांतील जेवण बर्फासारखें थंडगार होणार हें मला कळून चुकलें. पण–पण निरुपाय होता! तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करणें आवश्यक होतें. एखादा कुडबुड्या जोशी अगर 'अल्ला तेरा भला करेगा' असा दोन्ही हात वर करून गंभीरपणानें आशिर्वाद देणारा भगव्या कफनीचा जटाधारी आला असता तर कुठल्याहि उपायानें त्याला हाकून लावले असतें. पण विमा कंपनीचा एजंट–आपल्या मुलांबाळांचा 'अन्नदाता'––स्वतः आमच्या 'सुखसोईसाठीं' आपण होऊन आला असतांना त्याला कुठल्या तोंडानें जा म्हणणार? एकतर 'एटिकेट्स्' म्हणून आणि

दुसरें म्हणजे तो कांहीं रस्त्यांतला भणंग भिकारी नसून गृहस्थ होता. त्यावेळी कुसुमच्या पत्राचा वगैरे पार विसर पडून हें संकट टळणार कसें याचाच मी विचार करूं लागलों.

"तुम्हीं एकटेच असता का ?" येण्याचें कारण एकदम कळण्यापेक्षां प्रथम 'हवा पाण्या'चे आणि नात्यागोत्याबद्दल प्रश्न विचारून नंतर 'परिचया'चें झाल्यावर मुद्याचें बोलणें काढणें बरें असा नेहमींप्रमाणें स्वत:शी विचार करून त्यानें हा प्रस्ताव सुरूं केला आहे हे माझ्या सहज लक्षांत येण्यासारखें होतें. कारण विमा कंपनीचा एजंट वायफळ गप्पा मारण्यासाठीं एखाद्या अनोळखी तिऱ्हाइताकडे खास जाणार नाहीं हें मला पक्कें ठाऊक होतें.

"होय; वडील, आई वगैरे सर्व मंडळी गांवींच असते."

"तुम्हीं काय करतां इथें ?"

"सध्यां इंटरमध्यें आहे वुइल्सन कॉलेजांत." मी कॉलेजस्टूडंट—अर्थात बिनकमाईदार आहे हें कळतांच त्याच्या चेहऱ्यावर जरा निराळीच छटा पडलेली मला दिसली. नंतर एक, दोन मिनिटें आम्हीं दोघेहि स्तब्ध होतों. तो रुमालानें आपल्या चष्म्याच्या कांचा पुसण्यांतच दंग होता. माझी मात्र चमत्कारिक स्थिति झाली. मी बसलो होतों त्याच्या जवळ खुंटीला टांगून ठेवलेल्या जुन्या कोटाच्या खिशांत कुठल्याशा सालांत घेतलेली सिगारेट बॉक्स डोकाऊन बाहेर पहात होती. मी ती हळुंच खिशांतून काढली आणि अर्धिअधिक उघडून त्यांच्या पुढें केली. त्यानीं हंसत हंसत चष्मा खिशांतल्या केसमध्यें ठेऊन त्यांतील एक सिगारेट घेऊन बॉक्स टेबलावर टाकले. मी आगपेटी देतांच त्यानीं सिगारेट शिलगावली.. मीहि शिष्टाचारासाठीं सिगारेट पेटवली.

"आपण अजून 'इन्शुरन्स (विमा) केलं नसेल ?"

"छे, नाहीं; इतकीशी गरज नाहीं." मी प्रथमपासूनच तें संकट टाळण्याचा बेत केला होता..

"गरज नाहीं कशी ? You need take care of your children (तुम्हीं आपल्या मुलांबाळांची काळजी घेतली पाहिजे.) तुम्हीं स्वत:चें पोट भरूं शकाल पण तुमच्यापाठून आपल्या बायकापोरांची तरतुद तुम्हीं केली पाहिजेत. ती कोणाच्या तोंडाकडे पहाणार तुमच्या मागें ? नंतर उगाच हालाकष्टांत दिवस काढण्यापेक्षां प्रथमपासूनच Precaution (काळजी) घेतलेली बरी."

"पण माझं अजून लग्नच झालं नाहीं." मी हंसत हंसत म्हटलें.

"लग्न झालं नाहीं म्हणून काय झालं ? आज ना उद्यां तें होणारच. तुम्हीं कांहीं इतक्यांत म्हातारे नाहीं बनलात: लग्न झाल्यानंतरच विमा उतरला पाहिजे असं म्हणणं चुकीचं आहे. समजा, लग्न झाल्यानंतर पहिला हप्ता भरल्यानंतर तुमचं कांहीं बरं वाईट झालं--सॉरी हं—तर मग काय होईल ? तुमची बायकापोरं कोणाच्या तोंडाकडे

पहाणार ? स्वत:च्या हक्काचं कांहीं असलं म्हणजे उरलं आयुष्य सुखासमाधानांत तरी घालवतां येतं. नाहींतर मग दुसऱ्या कोणाच्या तोंडाकडे बघायचं, त्यांनं त्यांचे वाटेल तसे हाल करायचे, कुत्र्यासारखा त्यांच्यापुढें एखादा भाकरीचा शिळा तुकडा नाहींतर खरकटं त्यांच्या ताटांत टाकायचं—शहारे येतात मिस्टर अंगावर ! अहो, नुसती कल्पना केली तर मनाचा थरकांप होतो. मग तसं जर खरोखरीच घडलं तर त्यांचं आयुष्य किती हालअपेष्टांत जाईल याचा विचार करा."

तो अप्रत्यक्ष रीतीनें हें सारें शालीनबद्दलच बोलल्यामुळें मला त्याची चीड आली. शालीन बद्दल असली भयाण कल्पना करणें म्हणजे मला तें इतकें चमत्कारिक दिसलें ! कुठली ही ब्याद सकाळींच अशुभ बोलायला आली असें मला झालें. पण त्याचा चेहरा अगदीं विकारशून्य होता. नेहमीं मरणाच्याच गोष्टी बोलण्याचा सराव असल्यामुळें त्यांच्या भावना दुखवणार कुठून ? नवीनपणामुळें आम्हांला मात्र तें कसेसेंच वाटतें. मोटरशिवाय खालीं पाऊल न टाकणारा रंगेल गर्भश्रीमंत 'टॅक्सीवाल्या'च्या अंगावर ५–१० रुपयांची नोट फेकतांना बेफिकीर असतो; मात्र आपल्या आशाळभूत नजरेला हें अगदीं चमत्कारिक वाटतें. मनुष्याच्या मरण्याच्या मुद्यावर स्वत:ची कमाई करणाऱ्या विमा कंपनीच्या एजंटाला दुसऱ्याच्या बायकापोरांच्या हालअपेष्टांचें चित्र भडक रंगानें रंगवून तें त्या मनुष्यालाच दाखवतांना कसला कोंवळेपणा वाटणार ? आणि म्हणूनच माझ्या शालीनबद्दल तो अपरोक्ष रीतीनें बोलल्यामुळें जरी मला फार वाईट वाटलें तरी त्याच्या मनांत ती कल्पना क्षणभर सुद्धां डोकावली नसेल. त्यानें बहुतेक जळून संपलेल्या सिगारेटचें अवशिष्ट राहिलेलें टोंक टेबलावर विझवून टाकलें आणि दुजाभाव न बाळगतां सिगारेट 'केसमधून दुसरी सिगारेट काढून ती शिलगावली. हवेंत त्याचे फवारे सोडीत त्यानें आपलें चऱ्हाट पुन्हां सुरूं केलें.

"मला वाटतं शेंकडा सत्तर लोकानां तरी अजून विम्याचं महत्व कळलं नसेल. मी म्हणतो, त्यांत त्यांचं नुकसान काय आहे ? उलट फायदाच आहे. अहो, हें पहा. आतां तुम्हीं एक हजाराचा पंधरा वर्षांचा विमा उतरलात. काय समजलेत ? पंधरा वर्षांनीं याचे समजा १६०० रुपये झाले. बरं, पहिला हप्ता भरल्यावर पॉलिसी-होल्डर मेला तरी कंपनीला मुकाटयानें त्याच्या बायकोला १००० रुपये दिले पाहिजेत. त्यांत कसला आला आहे तोटा ? मुदत पुरी होईपर्यंत तुम्हीं जिवंत राहिलांत तर तुम्हाला आणखी तुमच्या मुद्दलावर व्याज मिळणार आणि सगळी रक्कम तुमच्या पदरांत पडणार. काय समजलेत ? यांत तोटा आहे का कुणाचा ?—नाहीं, सांगा तर खरं ! अहो, उलट विमा उतरल्यानें फायदाच होतो आहे. मेलेत तर एक हप्ता भरून सुद्धां तुम्हांला जितक्या रकमेचा विमा उतरलात तितकी रक्कम मिळणार आणि मुदत संपेपर्यंत जिवंत राहिलात तर तुमची विम्याची रक्कम आणि शिवाय १५ वर्षांचं तिच्यावरील व्याज मिळणार.

पोंच व अभिप्राय

भीष्मचरित्र (लेखिका–सौ. राधाबाई करमरकर) महर्षि भीष्मांचें उज्ज्वल चरित्र सुलभ व मनोरंजक रीतीनें लहान मुलांस कळण्यासाठीं तें नाटयाच्या रूपानें लेखिकेनें लिहिलें आहे. भाषा सोपी असून मुलानां वाचतानां कंटाळा येणार नाहीं अशी प्रवेशांची सुंदर मांडणी आहे. (मिळण्याचें ठिकाण–आनंद छापखाना, पुणें.)

सार्थ श्रीमद्भागवत (शेट दामोदर सा. यंदे ठाकूरद्वार, मुं. ४) चटोर पुस्तकें वाचण्यास चटावलेल्या सध्यांच्या काळांत, वाचकांच्या मनोवृत्ति असल्या धार्मिक मासिकाकडे वळतील कीं नाहीं याबद्दल शंका वाटत असल्यामुळेंच रा. यंदे यांचें हें साहस विशेष धाडसाचें वाटतें. श्रीमद्भागवतासारखा सर्वमान्य आणि सर्वश्रेष्ठ ग्रंथ सर्वांस कळण्यास सुलभ व्हावा म्हणून रा. यंदे यानीं कांहीं विद्वान व अधिकारी मंडळीच्या सहाय्यानें प्रत्येक अध्यायाचा अन्वय, पदच्छेद, टीपा व सरळ अर्थ देऊन एक वर्षांत सुमारें ८०० पृष्ठें प्रकाशित करण्याचें ठरवलें आहे. वा. व. ५ रुपये आहे. पण ग्रंथाच्या महत्त्वामुळें ती तितकीशी जास्त वाटत नाहीं. रा. यंदांच्या या नवीन धाडसांत आम्हीं त्यांचें यश चिंतितों.

मुंबई इलाख्याचें वर्णन--(ले.रा. शं. के. आठवले, हेडमास्तर म्यु.म. शाळा, ठाकुरद्वार, मुं.४) मुलांसाठीं अत्यंत उपयुक्त असलेल्या या पुस्तकाची ७ वी आवृत्ति निघाली आहे. परिक्षेला जरूर असलेला भाग पाल्हाळ न लावतां मुद्देसूद लिहिला आहे. शिवाय या आवृत्तींत एक व्याख्यांचा, हिंदुस्थानचा व बेट व इलाखा यांचे नकाशे दिले आहेत. ट्रॅम, इलेक्ट्रिक रेल्वे, बी. पी. टी. रेल्वे यांचीहि साग्र व सुलभ माहिती दिली आहे. परिक्षेचें साधारण धोरण अजमावण्यासाठीं शेवटीं प्रश्नमालिका जोडली आहे. इतकें हें उपयुक्त पुस्तक असून किं. फक्त ३ आणेच ठेवली आहे. पुस्तक–विशेषतः शिक्षक व विद्यार्थी यांना निःसंशय संग्राह्य आहे.

पुढील अंकांतील—

" बालगंधर्वांची मुलाखत "

हा सुंदर लेख वाचण्यास विसरूं नका.

मेंदुचे विकार व डोकें दुखणें यावर.

किं. १-२-०,] **ब्राम्ही तेल** [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा:—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.

बाळंत काढा:—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.

बाळकडू:—उपजल्यापासून देण्यास योग्य किं. ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायणें वगैरे औषधें तयार आहेत. एक आणा आला असतां रुग्ण पत्रिका, लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचना:—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांचा खप वाढल्यामुळें नक्कल सुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळीं या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयौषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.

दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने.

शर्टची बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोत्याची रु. ५. आंगठी रु. १; सल्ले जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. २॥; घडाळ्याचा छेडा रु. ३;

केंस काळे करण्याचा साबण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्याच्या बॉक्सला रु. १॥.

इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुड्यासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. अमृतवाडी, गिरगांव, मुंबई



किंमत ३ आणे

संपादक—मो. ग. रांगणेकर

अरुण कार्यालय,
२ री भटवाडी, मुंबई ४.

वा. व. ट. २। रुपये.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं

जगाविख्यात "निवडक औषधें."

नं. १ **फिवरॉल**–सर्व जातींच्या साध्या-दोषी–विषारी-मुदती–सांथीच्या तापांवर अप्रतिम. किं. रु. ॥।-

नं. ५ **मलेरिन**–अखिल हिंदुस्थानांतील पहिलेंच सर्वश्रेष्ठ–अत्यंत सोईस्कर ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. १।-

नं. ६ **मलेरिन नं २**–अल्पमोली पण खात्रीपूर्वक अत्यंत गुणी ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. -।।।-

नं १४ **हिस्टेरिन**–स्त्रियांच्या हिस्टेरिया–उन्माद–गुल्मादिकांवर सर्वोत्कृष्ट. किं. रु. ३

नं. १५ **थॅमिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट–हट्टी–प्राणघातक दम्यावरअमोलिक. किं. रु. ३

नं. १९ **जर्मिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट हट्टी-हाडींमासीं खिळलेल्या उपदंश गर्मीवर. किं. रु. ३

नं. २० **सँटोल**–प्रमेह--परम्यावर; लघवीची आग–तिडिक–जळजळ ५।६ तासांत बंद! किं. रु. ३।।

नं. ३९ **एलिक्झीर शिलाजित कंपाउंड**–सर्व प्रकारच्या मूत्रदोषादि विकारांवर. किं. रु. ३

नं. ४२ **रास्ना कॉर्डियल**–अर्धांगवायू-पक्षाघात,कटिशूल, संधि– आमवातादिकांवर. किं. रु. ३

नं ४८ **मस्तकशूळावर रामबाण वडया**-असह्य मस्तकशूळ-अर्धशिशी ५ मिनिटांत बंद! किं रु. -।।।-

नं ४९ **वीर्यौटोन गुटिका**–सर्वांग सुंदर धातुपौष्टिक; रक्त-मांस-मेंदू-बलवर्धक. किं. रु. २॥-

नं. ५० **चैतन्यौटोन गुटिका**–यॉहिंबिनयुक्त; मर्दाईवर जगप्रसिद्ध निर्वाणीचा उपाय. किं. रु. ६

नं. ५१ **चैतन्यौटोन तेल**–मर्दाईवर तात्कालिक व चिरकालिक बाह्योपचार किं. रु. ५

नं. ५४ **एलिक्झोर ऍन्टी कन्व्हलशन**–लहान मुलांच्या आंकडीवर प्रतिज्ञेचें औषध. किं. रु. २

नं. ७८ **वेदिक पेन बाम**–वातहारक, दुःखशामक, सूजनाशक, झटपट– चिरकालिक गुण. किं. रु. -।।।-

मोठा सचित्र कयाटलाग व नविन वर्षाचें सर्वांगसुंदर कयालेंडर १ आण्याचें तिकिट पाठविल्यास मोफत पाठवूं.

कुळकर्णी ऍण्ड सन्स, मुंबई नं.२.

अनुक्रमणिका.

१ उफराटें जग—(कविता) श्री. केदार १
२ श्री. बालगंधर्व यांची मुलाखत—प्रो. ना. म. पटवर्धन २
३ सागर-संगीत—श्री. प्र. ग. गुप्ते ११
४ सहृदय (आदर्श)—श्री. सीताकुमार १२
५ बक्षिसाचो नवीन योजना १६
६ रायगडास पाहून—(कविता) श्री. ग. बा. ताम्हणे १७
७ मुलांची मौज १८
८ खुडलेलीं फुलें २५
९ मुलींचा संसार—कु. मा. म. मसुरकर २७
१० वीरद्वय—श्री. भा. वि. नाडकर्णी ३०
११ क्षणभंगुर—(चालू कादंबरी) ६७
१२ मासिकाचा लेखक—श्री. विनोदलाल ४३

अहो ! बेपत्ता झा—ले !

नाहीं हो ! पत्ता बदलला

लिग्रस ब्रदर्स,

गोवर्धनदास बिल्डिंग, पोर्च्युगीज चर्च, गिरगांव—मुंबई

या ठिकाणीं गेले.

कडकी व शक्तीवर ४२ वनस्पतींचा गोड



अशक्त मुलें, स्त्रिया व पुरुषांना शरीर धष्टपुष्ट आणि सशक्त होण्यास हा काढा वापरा. किं १। रु.

पर्ल आणि कंपनी,

राणीचा बाग, मुंबई.

अमृतधारेची सिल्व्हर ज्युबिली.

"अमृतधारा भुवनामध्यें" मोठ्या धामधुमीनें ता. १० ते १६ मार्चपर्यंत प्रतिष्ठित सज्जनांनीं व लोकांनीं भाग घेऊन जो उत्सव साजरा केला त्याचा विस्तृत वृत्तांत छापून तयार झाला असून मागविणाऱ्यास तो फुकट पाठवून देण्यांत येईल.

या सिल्व्हर ज्युबिली निमित्त

ता. ३१ मे १९२६ पर्यंत अमृतधारा $\frac{3}{4}$ किंमतीस व इतर औषधें व पुस्तकें निम्म्या किंमतीस देण्याचें ठरविण्यांत आलें असून या सवलती प्रमाणें अमृतधारेची २॥ रुपयांची १। रुपयांची व नमुन्याची ८ आण्याची बाटली अनुक्रमें १ रु. १४ आणे, १५ आणे व ६ आणे या किंमतींत देण्यांत येईल. व इतर शेंकडों औषधें व पुस्तकें अर्ध्या किंमतींत मिळतील. कॅटलॉग फुकट.

जलदी करा व या दुर्लभ संधीचा पूर्ण फायदा घ्या.

पत्रव्यवहार व तारेचा पत्ता:—

अमृतधारा, लाहोर.



" पाण्यावर "

चित्रकार रा. के. बी. चुडेकर. (विविध-वृत्त)



नाट्यसम्राट श्री. बालगंधर्व

उर्फ

श्री. नारायणराव राजहंस.

अरुणा माला.

वर्ष २.] एप्रिल १९२६ [अंक ८.

उफराटें जग.

प्रशांत, गंभिर, अफाट दर्या
आश्चर्योत्सुक जन देखाया
कोण मर्जी त्या कालीं आणि
कुठुनी जमलें अगाध पाणी ?
कल्पकतेचें दुर्लभ बल तें
देवदया तीं भाळीं लिहिते
त्रिलोक कुतुकें कल्पक चाहत
स्मरतो ना परि जनका एक !
प्रतिपक्षा निःशेष कराया
समरीं अर्पित अपुली काया
बापुडि सेना-कोणी न पुसे
त्रिभुवनिं अधिपति गर्जत गाजे !

* * *

शौर्य, कष्टादिका साऱ्या विस्मराव्या या जगां
चकाकतें सोनें सारें मानावें या खुळ्या जगीं.

--केदार.

श्री बालगंधर्व यांची मुलाखत.

[श्री. ना. म. पटवर्धन. एम् ए; प्रि. ट्रेनिंग कॉलेज, हिंगणें.]

महाराष्ट्रांतील नाटयप्रेमी लोकांना आपल्या नाटयकौशल्याचे योगानें अत्यंत प्रिय झालेले नटवर्य श्री. **नारायणराव राजहंस** उर्फ **बालगंधर्व** यांस हिंगणें येथील 'अनाथबालिकाश्रम संस्था' पाहून जाण्याबद्दल विनंति करण्याकरितां मी कांहीं दिवसांपूर्वी त्यांजकडे गेलों होतों. दुपारीं ३ चा सुमार असून बाहेर झिमझिम पाऊस पडत होता. दिवाणखान्यांत 'गंधर्व' एकटेच बसले असून ताजा 'केसरी' वाचण्यांत इतके दंग झाले होते कीं, बराच वेळपर्यंत मी आल्याचें त्यांना भान देखील नव्हतें. शेवटीं त्यांच्या 'जयानें' व 'टिपू'नें (ही एक उमद्या कुत्र्यांची जोडी असून ती त्यांची फारच लाडकी दिसली.) मी आल्याची त्यांस वर्दी दिल्यावर अर्थातच त्यांनीं उठून माझें स्वागत केलें. वास्तविक त्यांच्याशीं मनसोक्त बोलण्याची संधी मिळावी अशी माझी इतरांप्रमाणें किती तरी दिवसांची इच्छा; व ती इच्छा आतां तृप्त करून घेतां आली असती तर मला नको होतें असें मुळींच नाहीं. परंतु शक्य तितक्या लवकर माझें काम आटोपून, त्यांच्या वाचनांत व इतर उद्योगांत फारसा व्यत्यय न आणतां निघून जावें असा विचार करून मी उभ्या उभ्याच काम उरकून घेण्याचा आव आणिला. परंतु माझी ती मनांतली खरी इच्छा, व तो दाबून उसना आणलेला आव हीं ओळखून जरा हंसत हंसतच त्यांनीं मला बसवून घेतलें, व मोठया आस्थेनें संस्थेबद्दल माहिती विचारिली. त्यांची ती आस्था व 'तुम्ही बसल्यास हरकत नाहीं, किंबहुना तुमच्याशीं बोलावयास मल, मुबलक वेळ असून इच्छाहि आहे' असें दर्शविणारी त्यांची ती मुद्रा पाहून, फारा दिवसांची इच्छा आतांच तृप्त करून घ्यावी असा निर्धार करून, फारसे आढेवेढे न घेतां मी प्रशस्तपणें बसलों. एकंदर मुलाखत सुमारें तास दीड तास झाली; व तोंपर्यंत त्यांचे ते जंगली संवगडी कुरवाळून घेत त्यांच्याशीं लगट करीत बसले होते. जंगली अंतःकरणालाही प्रेमाचा हात कळत नाहीं असें नाहीं. झालेली मुलाखत माझ्यासारख्या नाटयप्रेमी लोकांस व विशेषतः होतकरू नटास बरीच मनोरंजक व बोधप्रद होईल असे वाटून शक्यतों मूळच्या शब्दांतच तिचा सारांश खालीं देत आहे.

मी:—आपणांस वेळ असल्यास मला आपणांस कांहीं विचारायचं आहे.

गंधर्व:—हो हो ! खुशाल विचारा. अहो, विचारतो तरी कोण असं !

मी:—(हुरूप येऊन) मानसशास्त्रांत 'जेम्स' नांवाच्या मानसशास्त्रज्ञानें असा एक प्रश्न उपस्थित केला आहे कीं भावना आधीं कीं तिचा आविष्कार आधीं ? आपल्या इकडची परिभाषा वापरायची म्हणजे भाव आधीं का अनुभव आधीं ? सामान्य भाषेंत सांगायचे म्हणजे क्रोध ही भावना आधीं कीं भ्रूभंगादि व्यक्त स्वरूप आधीं ?

आणखी खुलासा केल्याशिवाय त्यांना कदाचित् कळणार नाहीं असें वाटून मी तो तसा करूं लागणार, तोंच ते मला थांवबून म्हणाले,

गंधर्व:—समजलों, असा कांहीं वाद आहे असं मी ऐकलं आहे. अर्थात माझा त्यासंबंधीं कांहीं वाचन नाहीं, परंतु प्रत्यक्ष अनुभव मात्र दोन्ही प्रकारचा येतो.

मी:—(एकदम) मला प्रत्यक्ष अनुभवच पाहिजे आहे.

गंधर्व:—करीत असलेल्या पार्टशीं माझं तादात्म्य झालं म्हणजे ॲक्टींग चांगलें होतें यांत शंका नाहीं. परंतु असें तादात्म्य उत्पन्न झाल्याशिवाय चांगलें ॲक्टींग व्हायचेंच नाहीं असें मात्र मला वाटत नाहीं. ॲक्टींगनें ती भावना उत्पन्न होऊं शकते. तुम्हाला जरा चमत्कारिक वाटेल, परंतु रडायला बसलें कीं रडूं यायला लागतेंच.

मी:—(लहान मुलाच्या आतुरतेनें), काय हो,शोकाचें काम करतांना–उदाहरणार्थ एकच प्याल्यांतील सिधूचें–तुम्हांला कधीं खरोखरचें रडूं येतं कां ?

गंधर्व:— (माझा हा भाबडा प्रश्न ऐकून हंसत हंसत), हो, पुष्कळ वेळां. परंतु कांहीं वेळां ॲक्टींग करूनही समरस होतां येत नाहीं. तादात्म्य होणें हें पुष्कळ वेळां इतर गोष्टींवर अवलंबून असतें, त्या गोष्टी नक्की सांगतां येणार नाहींत- हरदास तोच; परंतु कीर्तनाला रंग कधीं येईल, तर कधीं येणार नाहीं. बरीक असा रंग येणार कीं नाहीं हें पहिला पडदा उघडतांच कळून येतें.

मी:—(आपलें ज्ञान दाखविण्याचे हेतूनें) पुष्कळसें प्रेक्षकांवर, खेळावर, अगोदरच्या मनःस्थितीवर अवलंबून असेल.

गंधर्व:—हो तें खरेंच. परंतु नुसती गर्दी असली, किंवा नाटक चांगलें असलें किंवा पाठीमागें घाई नसली म्हणजे रंग येतोच असें नाहीं. काय हवें हें नक्की सांगतां येत नाहीं आणि म्हणूनच ईशस्तवन करून रंगदेवतेला आळवावें लागतें. त्या योगें एक प्रकारचें उच्च मानसिक वातावरण उत्पन्न होण्यास मदत होते. एक नाटक चांगलें होतें म्हणून लोक मोठ्या आतुरतेनें तेंच नाटक पाहाण्यास पुन्हां येतात तों

ते खरोखर अगदीं वाईट होतें; व बिचाऱ्यांची अगदीं निराशा होते ! हें आम्हांला समजत का नाहीं ? आणि हातचें असतें तर आम्ही कसूर केली असती असं कां तुम्हांला वाटतं ? माझ्या खास मित्रमंडळींना देखील नाटक चांगलं होणार का वाईट होणार हें मला अगोदर सांगतां येत नाहीं.

मी:--(जरा खोंचून) तुम्ही स्वतः कसूर करतां असं कोणासच वाटत नाहीं.

त्यांच्या सरळ मनाला ती खोंच समजली का नाहीं कोणास ठाऊक ! आणि जरी समजली असली तरी इतरांची ग्वाही ते कसे देऊं शकणार ! विषय बदलण्याच्या हेतूनें मी पुढें विचारलें,

मी:--तुम्हाला नाटक बसविण्याचें कामीं नाटककारांची कितपत व कोणत्या बाबतींत मदत होते ?

गंधर्व:--मूळ हेतु व त्यांतलें Spirit समजून घेण्याचें कामीं नाटककारांची पुष्कळ मदत होते. आमच्या अभिनयानें तो मूळ हेतु कितपत साधला यवढेंच ते सांगूं शकतात. नाहीं म्हणावयास खाडीलकरांचा मात्र दोन्हीं बाबतीत फार उपयोग होतो.

कुत्र्यांच्या अंगावर हात फिरवितां फिरवितां सहज कोठें फोड झालेला त्यांना समजलें. लगेच मूळ विषय तितकाच सोडून, ' अहो शुक्ल, अहो शुक्ल, ह्या आपल्या टिपूला काय झालं आहे तें पाहा हो. नाहींतर उद्यां त्याला डॉक्टरकडे तरी न्या ' असें म्हणाले व अर्धवट सोडलेला विषय पुन्हां घेण्याच्या इच्छेनें ते मजकडे पाहूं लागले. मीहि तुटलेला धागा सांधण्याच्या इच्छेनें विचारलें,

मी:--खाडीलकर स्वतः Acting करून दाखवितात काय ?

गंधर्व:--अहो, तुम्हांला कल्पना नाहीं ! ते वरून असे दिसतात, परंतु अत्यंत मार्मिक आहेत. महाराष्ट्रांतील बहुतेक नाणावलेले नट त्यांच्या तालमींत तयारझाले आहेत. महाराष्ट्र नाटक मंडळींत अद्यापीहि जो एक रेखींवपणा व टापटीपपणा दिसतो त्याचं बहुतेक श्रेय खाडिलकर व भागवत यांस दिलं पाहिजे.

मी:--भागवतांचीं कांहीं कामं मी पाहिलीं; परंतु मला तीं नीटशीं आठवत नाहींत. त्यांना लोक चाहतात त्याप्रमाणें ते खरोखर उत्कृष्ट नट होते का ?

गंधर्व:--(आस्थेवाईकपणें पुढें सरकून व माझ्या मांडीवर हात ठेऊन जरा सद्गदित अंतःकरणानें) अहो, हें काय विचारतां ? फार मोठा गुणी मनुष्य ! त्रिंबकराव, प्रधान, वगैरे लोक कामं करतात, चांगलीं करतात--पण भागवतांचं कांहीं निराळेच !

आणि तसं पाहिलं तर कंपनींत किती उशीरां आले ! नटाला लागणारी कोणतीहि गोष्ट अनुकूल नाहीं. ते प्रथम तोत्रे होते ! परंतु डोंगरावर जाऊन, तोंडांत गारगोटया धरून मोठ्यानें व स्पष्टपणें ओरडण्याचा त्यांनीं इतका सराव केला कीं कांहीं विचारूं नका !

मी:--(आश्चर्यानें) अरे वा ! ही fact आहे का ? मला वाटत होतं कीं ती थोरांच्या महदाख्यायिकांपैकीं एक आख्यायिकाच असेल !

गंधर्व:--नाहीं हो नाहीं ! असं कसं म्हणतां ? मनुष्य करील तर काय नाहीं होणार ? उगीच नाहीं ते इतके पॉप्युलर झाले ! अगदीं Sheer merit.

मी:--कोल्हटकर वगैरेंचीं नाटकं बसवून देण्याचे कामां कितपत मदत होते ?

गंधर्व.--तात्यासाहेबसुद्धां फार मार्मिक आहेत बरं ! भिडस्त आहेत मात्र ! ते फार चांगलं गातात, परंतु लोकांदेखत नाहीं म्हणत ! प्रो. भानू चांगल्या प्रकारचे नट आहेत. अहो विद्वानच ते, विद्वत्तेला वळण दिलं तशी जाते. परंतु त्यांनीं आम्हांला सांगण्याचा प्रसंग नाहीं कधीं आला. गडकरी नट होते; परंतु अभिनयाचे बाबतींत आम्हांला फारसा उपयोग झाला नाहीं. 'राक्षसी महत्वाकांक्षेचं ' कर्ते वामनराव जोशी मात्र उत्तम प्रकारचे नट आहेत; व खाडीलकरांप्रमाणेंच त्यासही मनांतली कल्पना अंगविक्षेपानें उत्तम प्रकारें व्यक्त करतां येते.

मी:--नवीन खळ बसवितांना तुम्हांला स्वत:ला ॲक्टींगकडे कितपत लक्ष द्यावं लागतं ? तुम्हांला इतरांप्रमाणे मुद्दाम फारसे श्रम करावे लागत नसतील.

गंधर्व:--असं कसं होईल ? प्रत्येक लहानसहान बाबतींत मी अगदीं एकाद्या नवशिक्या नटाप्रमाणें काळजी घेतों.

मी:--म्हणजे ? कांहीं सामान्य प्रकारच्या ठराविक ॲक्टींगमध्यें सुद्धां तुम्हांला श्रम करावे लागतात ? मला वाटलं होतं कीं एकदां Spirit कळलं, कीं सरावाच्या योगानें तुम्हाला ॲक्टींग आपोआप येत असेल.

गंधर्व:--तुम्हीं म्हणतां तें थोडंसं बरोबर आहे. प्रत्येक ओबडधोबड कृती मला मुद्दाम करावी लागत नाहीं, तितकं automatic होतं. परंतु ' मला ॲक्टींग येतं, आतां शिकण्यासारखं कांहीं राहिलं नाहीं. ' असे मात्र मला कधींच वाटत नाही. कितीतरी शिकण्यासारख्या गोष्टी अद्यापि उरल्या आहेत ?

मी:--(जरा भीत भीत) काय हो, आम्हांला तर वाटतं कीं, Female part च्या ॲक्टींगमध्यें तरी तुम्ही अगदीं पूर्णत्वाला पोचलां, आणि तुम्ही तर म्हणतां 'अद्यापि शिकण्यासारखं पुष्कळ आहे.' तुमच्या समोर ॲक्टींगचे बाबतींत Ideal कोणतं ?

गंधर्व:--माझं Ideal ? गणपतराव जोशी ! तो खरा Actor ! बाकीची मंडळी त्यांचे मानानें कितीहि सरस निरस असली तरी गणपतरावांचा असा कांहीं एक aurora असे कीं, त्या तेजांत बाकीचे सर्व खुलून दिसत !

मी:--तुमचंहि असंच नाहीं का होत ?

गणपतरावांचें नांव निघतांच त्यांच्याबद्दल वाटणारा आदर व प्रेम हीं त्यांच्या डोळ्यांत या वेळीं फारच बहारीनें खुलत होतीं. तसेंच त्याच्या aurora या शब्दाचा प्रयोगहि मोठ्या स्फूर्तीचा व सहजतेचा होता. कदाचित याच भावनांचे आणखीहि कांहीं दृश्य परिणाम मला पाहावयास सांपडले असते. परंतु इतक्यांत त्यांच्या निजलेल्या लहान मुलीला पाळण्यांत ठेवण्याकरितां एक वृद्धशा बाई तेथं आल्या. लगेंच, 'आलों हां आलों' असें म्हणत ते उठले, व बाईंच्या हातांतून त्या मुलीला घेऊन पाळण्यांत अत्यंत नाजुक रीतीनें त्यांनीं तिला ठेविलें. जणूं कांहीं बाईंच्या धसकाफसकीच्या ठेवण्यानें ती जागी झाली असती ! खिडक्या दारें बंद करून व पुनः एकदां पाळण्यांत डोकावून सर्व ठीक आहे' अशी खात्री करून घेऊन ते मजकडे आले. यावेळीं मात्र कथानकाचा धागा तुटणें शक्य नव्हतें व म्हणून ते स्वतःच बोलूं लागले.

गंधर्व:--गणपतरावांचं बघा कांहीं निराळंच पडे. ते Born actor होते यांत शंकाच नाहीं. त्यांचीं सर्व कामं मी अगदीं लक्ष लावून पाहिलीं आहेत.

नवीनच एका मृद्याची आठवण होऊन मी विचारलें,

मी:—का - हो ! त्यांच्या ॲक्टींगवर दारूचा कांहीं परिणाम झाला नाहीं का हो!

गंधर्व:-- (वाईट वाटून) नाहीं असं कसं होईल ! दारू पिऊन सुद्धां इतकं ॲक्टींग ! भानावर असून केलंल्या ॲक्टींगचं काय सांगावं ! दारूमुळें स्वतःला विसरून ते ॲक्टींग चांगलं करीत असत, असं पुष्कळांना वाटतं. परतु ही चूक आहे. दारूमुळें आपले अवयव इतके सुस्त होतात कीं, ॲक्टींग करतांना लागणारी Command त्यांवर राहणं शक्य नाहीं. आणि जें ॲक्टींग वास्तविक Automatically व्हावयाचं तें करण्याकरितां त्यांना सर्व Attention तिकडे द्यावं लागे. खरोखर शुद्धीवर असतांना केलेलीं कामं पाहणं नशिबींच पाहिजे होतं आणि तसं माझ्या नशिबीं होतं. मी प्रथम किर्लोस्कर कंपनींत आल्याबरोबर अर्थात मला कामं फार थोडीं असत. परंतु तो वेळ मी फुकट न घालवितां चांगल्या नटांचीं कामें पाहाण्यांत घालवीत असे. तसंच पार्ट करण्याचं प्रत्यक्ष शिक्षण जरी कंपनींत गेल्यावरच मिळालं, तरी चांगलं ॲक्टींग कोणतं, वाईट कोणतं, ही चिकित्सक दृष्टि मला लहानपणापासूनच प्राप्त झाली होती; व याचं सर्व श्रेय मी लहानपणीं जळगांवाला ज्यांकडे होतों त्यांना, म्हणजे आमचे

मामा आबासाहेब म्हाळस यांना दिलं पाहिजे ते Municipal Chairman असल्यामुळें नाटकांचे फुकट पास नेहमीं येत व मलाहि ते बरोबर घेऊन जात. आमचा नूर त्यांनीं अगोदरच ओळखला होता कीं काय कोणास ठाऊक ?

मीः—पण काय हो ? गणपतरावांचं Ideal समोर ठेऊन तुम्हाला काय उपयोग ? गणपतरावांचीं सर्व कामं पुरुषांचीं व तुमचीं तर बायकांचीं ! पुरुषपात्राच्या ॲक्टींगचा स्त्रीपात्राला कितपत उपयोग होणार ? उदाहरणार्थ, पुरुषांच्या रागावण्याचें ॲक्टींग व स्त्रियांच्या रागावण्याचं ॲक्टींग यांत कितीतरी फरक !

गंधर्वः—तुम्ही म्हणतां तसा फरक पडतो खरा. परंतु एका भागाचं ॲक्टींग पूर्णत्वानें बिंबलें, म्हणजे त्याच्या योगानें दुसऱ्या भागाच्या ॲक्टींगचीहि बरीचशी कल्पना येऊं शकते. ती power तुमची Develope झाली म्हणजे फक्त ती Carry over करण्याचंच काम कायतें शिल्लक राहिलं.

तत्त्व मान्य झाल्यावर तपशिलांत मी फारसा शिरलों नाहीं; दारू व ॲक्टींग याच विषयासंबंधीं मी पुनः त्यांस विचारलें.

मीः—दारूचा इतका घातुक परिणाम असला तर England मध्यें कसं होतं ?

गंधर्व—कसं होतं ? तिकडेहि आतां मोठमोठे नट Purely vegetcrian diet ध्यावयास लागले आहेत. Alcohol कितीही थोड्या प्रमाणांत असलं तरी त्याचा परिणाम झाल्यावांचून कसा राहील ?

टिळकांकरितां चहा सोडला !

दरम्यान आंतून एक ग्लासभर मोसंबीचा रस आणून देण्यांत आला. मलाहि त्यांनीं चहाबद्दल विचारलें. परंतु 'मी घेतला' असें सांगितल्यामुळें त्यांनीं फारसा आग्रह केला नाहीं. रस पिऊन झाल्यावर त्यांचें तोंड आंबट झालेलें पाहून मी विचारलें,

मीः—नुसताच रस असतो का कांहीं औषध असतं ?

गंधर्वः—अहो, हें औषध नाहीं. मी हल्लीं चहा वगैरे न घेतां दोन्हीं वेळां नुसता रसच घेत असतों.

मीः—चहा जाग्रणाला सोसत नाहीं वाटतं ?

गंधर्वः—अहो, सोसण्याचा प्रश्न नाहीं. मी प्रथम पक्का चहाबाज होतों. पण गेलीं ३ वर्षें मी तो सोडून दिला आहे.

चहा सोडण्याचें कारण विचारतां ते जरा अनमान करूं लागले. व त्यामुळें तर मी अगदीं आग्रहासच पेटलों. माझा आग्रह पाहून ते म्हणाले,

गंधर्व:--बळवंतराव गेल्यापासून मी चहा सोडला आहे.

टिळकांबद्दलची त्यांची ही भक्ति पाहून त्यांच्या (गंधर्वांच्या) बद्दलचा माझा आदर जास्तच वाढला. छंदीफंदी व रंगेल समजल्या जाणाऱ्या 'नाटक्यां'च्या अंत:करणांत अशाप्रकारें भक्ताची भक्ति व योग्याचा संयम वसत असतील असें सामान्य माणसाच्या मनांत तरी येईल का ?

जाण्याची वेळ जवळ आली तेव्हां मला जें कांहीं खरें सांगावयाचें आहे तें सांगून टाकावें असा बेत करून मी गंभीरपणानें म्हटलें,

मी:--नारायणराव, तुमच्यावर अतिशय मोठी जबाबदारी आहे असं नाहीं तुम्हांला वाटत ? तुमच्या ॲक्टींगचा, तुमच्या पोषाख करण्याच्या पद्धतीचा एकंदर स्त्री-समाजावर किती परिणाम होत आहे हें तुम्हांला सांगायला नकोच !

गंधर्व:--(तितक्याच गंभीरतेनें) हें काय मला समजत नाहीं ? परंतु मी तरी काय करणार ? मी समाजाचं निरीक्षण करून, आहे तसें दाखविणार. घेतलेल्या सोंगाला, व त्या त्या प्रसंगाला अनुरूप असे पोषाख मला केलेच पाहिजेत. 'वसंतसेना' 'रेवती' यांचा पोषाख मी रुक्मिणीवर कसा चढवीन ? नाटक खरं realistic करण्याकरितां अगदीं चमत्कारिक दिसणारे पेहराव सुद्धां उपयोगांत आणावे लागतात. England मध्यें सुद्धां जुनीं नाटकं करताना जुन्या पोषाखपद्धतीहि आपोआपच पुढें येत आहेत.

मी:--तुमचे नंदकुमारांतील पोषाख किती चमत्कारिक दिसतात ?

गंधर्व:--चमत्कारिक कसे ? महाभारताच्या उपसंहारांत वैद्यांनीं भारतकालीन पोषाखांचं जें वर्णन केलं आहे त्याप्रमाणें आम्ही जर पोषाख केले नाहींत, तर भारतकालीन परिस्थिति उत्पन्न कशी होणार ?

मी:--आणखी एक दोन प्रश्नच विचारून नंतर मी तुमची रजा घेतों. तुम्ही तुमचे Parts पाठ कसे करतां ?

गंधर्व:--नटांची नेहमींची पाठ करण्याची पद्धति अगदीं चुकीची आहे. आपलाच भाग पाठ करायचं म्हटलं तरी प्रत्येक खेपेस सबंध पुस्तक वाचलंच पाहिजे; म्हणजे Contest समजूत associations चांगलीं पक्कीं बनतात.

पाठ करण्याची ही शास्त्रोक्त पद्धति यांनाहि माहीत आहे असें पाहून मला फार समाधान वाटलें,

मी:--तुम्हांला पुरुष-पार्ट साधावयाचा नाहीं काय ? केशवरावांना नाहीं का साधला ?

गंधर्व:—साधेल तर काय झालं ! आणि मी मध्यंतरी कोदंड वगैरेंचीं कामंहि केलीं आहेत. पण सांगावयाचं म्हणजे I am not born for it आणि केशवरावांना देखील पुरुष-पार्ट साधला म्हणजे काय ? खरं पाहिलं तर त्यांचं ॲक्टींगकडे फारसं लक्ष कधींच नसे. (अत्यंत आदारानें) त्यांची खरी मजा गाण्याची.

मी:--(जरा भीत) खरं सांगूं ? गाण्याचे बाबतींत सुद्धां पुष्कळ लोक तुम्हांलाच जास्त मार्क देतील.

गंधर्व:--छे, हो. बैठकीच्या गाण्याला ते माझेपेक्षां किती तरी Superior. मात्र येवढं खरं कीं, स्टेजवर गाणं किती प्रमाणांत पाहिजे इकडे त्यांनीं फारसं लक्ष दिलं नाहीं. गाण्यानें नाटकाला जलशाचं स्वरूप येतां कामा नये. नाटकांत गाणं हें साध्य नंसून तो तो रस उत्पन्न करण्याचं तें साधन आहे ही गोष्ट पुष्कळसे नट विसरतात.

इतक्यांत त्यांची थोरली मुलगी तोंडाचा तबला वाजवीत, व गाण्याची एक सफाईदार लकेरी मारून झट्दिशीं इकडून तिकडे निघून गेली. माझें लक्ष अर्थात तिकडे गेलें. गाण्याचा गुण यांच्या कुटुंबामध्यें आनुवंशिकच आहे कीं काय अशी शंका येऊन मी त्यांस विचारलें,

मी:-- काय हो ! आपली सर्वच मंडळी गंधर्व दिसतात !

गंधर्व:-- (तितक्याच विनोदानें) गंधर्व नसली तरी गर्दभ खास नाहींत ! (जरा गंभीरपणानें) माझे चुलते व वडील चांगले गवई होते. माझ्या आईच्या घरगुतीच परंतु प्रेमळपणें गायिलेल्या गाण्यांसारखीं गाणीं तर मी कधीं ऐकलींच नाहींत. दादा, व बापूही लहानपणीं चांगलं गात असत. मुलांबद्दल पुढें कांहीं सांगणार तोंच मीं विचारलें,

मी:--प्रत्येक author चं जसं त्यानें लिहिलेल्या सर्व पुस्तकांपैकीं एखादं पुस्तक विशेष लाडकं असतं, तशी,तुम्हीं करीत असलेल्या भूमिकांपैकीं तुम्हांला विशेष कोणत आवडते ?

गंधर्व:—खाडीलकरांच्या सर्वच नाटकांतील भूमिका मला आवडतात. परंतु प्रेक्षसामान्य प्रेक्षकांना त्या नीट समजत नसल्यामुळे माझा किंचित् विरस होतो. जी क्षिकांची आवड तीच माझीहि आवड या दृष्टीनें पाहिलें असतां सिंधूची भूमिका करतांना विशेष आनंद होतो.

मी:--स्टेज् इफेक्ट्च्या दृष्टीनें तुम्हीं कोणाचीं नाटकं पसंत करतां ?

गंधर्व:-अर्थात खाडीलकरांचीं.

मी:--त्यांची द्रौपदी सुद्धां ?

गंधर्व--म्हणजे ? त्या नाटकाची मजा तुम्हाला माहीत नाहीं.

इतकें बोलणें होत आहे तोंच एक गृहस्थ मोटार घेऊन आले. बोलणेंहि आतां बरेंच झालें होतें, म्हणून त्यांना कोणतें नाटक जास्त आवडतें, नंदकुमार नाटकासंबंधीं त्यांचें काय मत आहे इत्यादि प्रश्न न विचारतांच मी उठलों. जिन्यापर्यंत पोंचवा-वयास येत असतां मी त्यांस विचारलें,

मी:—मग येणार ना एकदां हिंगणं पाहण्यास ?

गंधर्व:—(चेहरा बदलून) खरंच सांगूं ? मी हल्लीं कोठें अशा संस्था पाह-ण्यास जात नाहीं. कारण त्या पाहाण्यास जायचं व हात हालवीत परत यावयाचं हें मला कसंसंच वाटतं.

मी:--(त्यांची खरी अडचण ओळखून) नारायणराव, तुम्हाला तसं मुळींच वाटावयास नको. मी जें तुम्हांला बोलावितों तें केवळ घरगुती नात्यानें.

माझ्या बोलण्याचा हेतु त्यांच्याहि लक्षांत येऊन त्यांनीं एकदां हिंगण्यास येण्याचें कबूल केलें; व मीहि नमस्कार करून तेथून निघालों

" श्री. बालगंधर्व यांची मुलाखत "
हा लेख वाढल्यामुळें व इतर कुठचाहि विषय कमी
करणें शक्य नसल्यामुळें या अंकांत
नेहमीप्रमाणें
गोष्ट घातली नाहीं.

सागर-संगीत

गानलुब्ध--श्री. प्र. ग. गुप्ते.

(१)

हे विश्वनाथा ! आम्ही तुझीं चिमुकलीं बालकें. आमचें कोड तूं पुरवणार नाहींस, तर दुसरें कोण पुरवणार ? देवा आम्हाला खेळण्याकरितां तूं हें विश्वाचें अवाढव्य पटांगण केलें आहेस. असंख्य जीव यावर नांदत आहेत. त्यांत किती तरी दुःखी आहेत. दीनानाथा ! तूं आपल्याला दीनानाथ म्हणवतोस तर मग हे जीव अशीं दुःखें कां बरें भोगीत आहेत ! कोणी म्हणतात गेल्या जन्मीं त्यांनीं केलेल्या पापाबद्दल तूं त्यांना हें प्रायश्चित देतो आहेस. पण देवा, मग तुला करुणासागर असें कां म्हटलें आहे ? मी म्हणतों तूं त्यांना पुढें देणाऱ्या सुखाकरितां ही दुःखाची आग आज त्यांच्यावर पाखडीत आहेस. म्हणजे मिळणाऱ्या भावी सुखाचे स्वारस्य तेव्हां त्यांना चांगलें कळेल.

(२)

हा आटयापाटयांचा खेळ चालला आहे. ही पहा यांनीं कोंडी धरली. कांहीं जण ती कोंडी फोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. तें मला म्हणतात " तूं खेळायला कां येत नाहीस ? " मी खेळायला जात नाहीं म्हणून ते मला आळशी म्हणतात. पण मी म्हणतों या नकली आटयापाटयामध्येंच यांना इतकें काय वाटतें आहे ! त्यांना तूं त्यांच्या भोंवतीं केलेल्या कोंडीची कल्पनाच नाहीं काय ? तुझी कोंडी हंसत खेळत फोडायची सोडून यी नकली कोंडींत ते आपल्या जीवाला खेळवीत आहेत हा पहा अंधार पडत चालला. त्यांनीं आतां दिसत नाहीं म्हणून आटयापाटयांचा खेळ बंद केला. ते म्हणताहेत आतां चांदणें असतें तर आपल्याला आणखी खेळायला मिळालें असतें; हे जगत्पालका तूं आपल्या बालकांच्या करितां मांडलेल्या आटयापाटयांचा खेळ जगाच्या अंतापर्यंत चालत राहाणारा आहे. एक कोंडी फोडून जरी आम्ही पुढें गेलों तरी तुझा मृदंग पुन्हां दुसरी कोंडी करील. यांचा हा आटयापाटयांचा खेळ बंद पडल्यामुळें त्यांचे चेहरे पहा कसे हिरमुसले झाले आहेत. हे जगदीशा ! तुझ्या अनादि अनुपम आटयापाटयांची यांना कल्पनाच नाहीं कीं काय ?

(३)

काळोख किती किट्ट पडला आहे हा ! देवा ! मला कांहीं दिसत नाहीं. मग माझ्या ठिकाणचा रस्ता मला आतां कोण दाखवील हें पहा आजूबाजूंचे दगड निरनिराळ्या आकृतींनी मला भेवडवण्याचा प्रयत्न करीत आहेत. हा शब्द कोण काढतो आहे ? ऐका किर्रर्र म्हणून आवाज मला ऐकूं येतो आहे. देवा हा आवाज कसला ? तूं आपल्या बालकांच्या संरक्षणाकरितां नेमलेल्या जागल्यांचें हें ओरडणें आहे का ? मग देवा तूं त्याला तरी मला रस्ता दाखवायला सांग. किती तरी लोक पुढें गेलें आहेत. मीच अंधारांत हा असा चांचपडत खळग्यांत पडत झडत आपलें ठिकाण शोधतों आहें. मला तें अद्याप सांपडत नाहीं .

(४)

अबब ! किती मोठा आहे हा पूल ! आणि ही नदीही किती मोठी आहे! काय या नदीचें नांव ? आणि हा पूल तरी कोणता ? या पुलावर जाण्याचा मार्ग कोणता ? देवा सांग लवकर, मी अद्याप या नदीकिनाऱ्यावर फिरत आहें. नदीच्या पाण्यावर तरंगत येऊन तिच्या किनाऱ्यावर पडलेले कांटे माझ्या पायांत रुतत आहेत. किनाऱ्यावरची ही जमीन दलदलीची झाली आहे. एक पाय काढतों तर परत दुसरा पाय आंत रुततो आहे. हा बघ नदीच्या पाण्याचा जोर सारख वाढतो आहे. तूं देवा मला लवकर मार्ग दाखव नाहींतर या पुरांत मी वाहून जाण्याचा संभव आहे.

(५)

तूं सर्व कांहीं जाणतोस म्हणून तुला सर्वज्ञ म्हटलें आहे. मग माझी ही हांक तुला ऐकूं येत नाहीं काय ? हें बघ पाणी किती चढलें आहे. माझ्या गुढग्यापर्यंत तें आलें. आतां या झाडाच्या फांदीचा आश्रय केल्याशिवाय इलाज नाहीं. कृपासागरा ! आतां तरी लवकर येऊन यांतून माझी मुक्तता कर. खालीं अथांग पाणी पसरलें आहे आणि एका झाडाच्या फांदीनें मला आश्रय दिला आहे . तिला मी लोंबकळत आहें. देवा ! मला आतां जास्त वेळ धीर धरवणार नाहीं. माझे हात दुखून आले आहेत. फांदीला गच्च आवळलेले हात केव्हां सुटतील आणि मी खालीं या पाण्यांत केव्हां पडेन याचा नेम नाहीं. पण हें काय ! ही फांदी हळू हळू अशी खालीं कां येऊं लागली. जगदाधारा तुझ्या मनांत तरी काय आहे. झालें, फांदीचा आधार सुटला. पाण्यांत पडून मी गटांगळ्या खाऊं लागलों. देवा आतां अशा प्रसंगांतून तूं माझें रक्षण कसें करणार ?

सहृदय

(आदर्श)

ले:–श्री सीताकुमार.

(१)

आनंदी प्रभा त्या दिवशीं फारच आनंदित दिसत होता.

अरुण आपल्या खेडेगांवाहून शिकण्याकरितां पहिल्यानेंच प्रभाचे गांवीं आला होता. अरुणाचे वडील हे प्रभाचे मामा. खेडेगांवांत पुढें शिकण्याची सोय नसल्यामुळें अरुणाला आपल्या आतेभावाचे गांवीं शिकण्यास यावें लागलें.

नव्या नाविन्यानें नटलेल्या कृत्रिमतेत निसर्गाची रमणीयता कोठून आढळणार ? अरुण गोंधळला. चहाची वेळ झाली. चहा घेण्याकरितां मंडळीं एकत्र जमली. कप-बशांचा तो खडखडाट नी त्यांत वाफा निघणारें तें पाणी ! अरुण कचरला. भारतभूमींत अवतरलेलें तें 'अमृत' अरुण पहिल्यानेंच पाहात होता. सरलमनस्क बालकास तें रुचलें नाहीं. त्यानें आपलें तोंड फिरविलें. चहापानविधी संपला.

रविवारचा दिवस तो. अरुणास घेऊन प्रभा बाहेर पडला. माणसांनीं गजबजलेल्या त्या बकालपुरींत नैसर्गिक सौंदर्य कसें दिसावें ? विस्फारितं नेत्रांनीं अरुण इकडे तिकडे पाहूं लागला. जिकडे तिकडे नटवी कृत्रिमता खेडवळ अरुणाकडे पाहून हंसत होती. 'अरुण, तूं खेडवळ आहेस.' चोंहीकडून नाद उठूं लागले. अरुणाचं कानांत त्याचा प्रति-ध्वनि घुमूं लागला. पण बोलणारे कोण ? कीं नुसता भासच ? अरुण गोंधळला.

'हें आमच्या मधूचें घर' प्रभा उद्गारला. 'तो आमच्याच वर्गांत आहे. फार गोड स्वभाव आहे त्याचा. आम्ही बरोबरच शाळेंत जातों येतों. अन् ते पहा, पलीकडे ते साय-कलवर बसून चालले ते, तेच आमचे हेडमास्तर. ती पलीकडे उंच इमारत दिसते ना ? तें आमचें हायस्कूल.' अरुणानें काय ऐकलें ?

'प्रभा, पळ, पळ;' समोरचें दृश्य पाहून अरुण घाबरला. प्रभाला हंसूं लोटलें. अरुण ओशाळला. भोळा बिचारा. त्याला काय माहीत ती परेड चालली आहे म्हणून.

अरुणाचें चित्त रमेना. त्यास कोंडल्यासारखें होऊं लागलें. रविवार गेला. अकरा झाले. अरुणाचें नांव शाळेच्या हजेरीपटावर झळकूं लागलें.

(२)

वर्गांत प्रभा पहिल्या नंबरचा. परंतु अरुणापुढें त्याचें तेज पडेना. हळू हळू आनंद नाहींसा झाला. गट्टी पळाली. प्रेमाची जागा मत्सरानें भरून काढली. विचाऱ्या अरुणाचा यांत काय बरें दोष ?

परीक्षा झाली. अरुण पहिल्या प्रतीचा पास आणि प्रभा ? झालें. असूयेनें पेट घेतला. आनंदी प्रभा गोड बोलून पुरेपुरेसा करावयाचा. पण पारडें फिरलें. असें कां ? अरुण बुचकळ्यांत पडला. भोळा बिचारा. त्याला काय माहीत आपली बुद्धिमत्ता आड येते म्हणून ?

आनंदी वृत्तीचा विनोदी प्रभा सगळ्या वर्गाचा प्राण होता. त्याचे बोल कसे फोल होणार ? मुलेंच तीं. सारखीं अरुणास हिणवून त्याची कुचेष्टा करूं लागलीं. 'अरुण, तूं खेडवळ आहेस. तूं आमचा मित्र होण्याला योग्य नाहींस.' अरुण गर्हिवरला. त्यास मनस्वी वाईट वाटलें. 'खरेंच आपण खेडवळ.' भोळा बिचारा. खेडवळ असणें–खेडयांत जन्म घेणें–हा त्याचा दोष कसा ?

घरीं दारीं असह्य अबोला भेडसावूं लागला. मोहमयी नगरीच्या मोहपाशांत अडकूं पाहाणाऱ्या अरुणास ते पाश आतां पुन्हा असह्य होऊं लागले. त्याचें चित्त उदास झालें त्याला आपल्या निसर्गसुंदर खेडेगांवांतील सुखमय जीवनाची आठवण होऊं लागली. तो मनांत कृत्रिमतेशीं निसर्गाची तुलना करूं लागला. त्यास प्रत्येक बाबतींत निसर्गाचाच जय दिसूं लागला. मग असें कां ? मुलें खेडवळ म्हणून आपला तिरस्कार कां करतात ? अरुण बुचकळ्यांत पडला.

भोळा बिचारा. त्याला काय माहीत, नटव्या कृत्रिमतेचा जगांत 'उदो उदो' होतो म्हणून ?

(३)

"प्रभा प्रभा असें काय बरें ?" आपल्या खोलीत अभ्यास करीत बसलेल्या प्रभाच्या खांद्यावर हात ठेवून अरुण कळवळ्यानें उद्गारला. भिवया संकुचित करून प्रभानें वळून पाहिलें. "प्रभा, मी तुझा कोणता अपराध केला ? बोलत कां नाहींस ?"

"आलास कशाला दुसऱ्याचा अभ्यास बुडवायाला ? सभ्यपणाचा आव किती पण ?" एक ना दोन; प्रभानें कितीतरी बोलून घेतलें. अरुण चकित झाला. "खेडवळ कुठले. जा आतां. नाहींतर मी आईला सांगेन अभ्यास करूं देत नाहींस म्हणून. जा. जा म्हणतों ना ? आई sss"

भोळा बिचारा अरुण. खेडवळ खराच. नाहींतर दिखाऊ दृष्टीला नकली सुधारणा नियमांचें उल्लंघन त्याजकडून कसें होतें ?

अरुण परत फिरला. त्याला रडें कोसळलें. त्यानें वडिलांस पत्र लिहिलें. 'मला शिकावयाचें नाहीं; मी घरीं येतों.' मुलाचें पत्र पाहून त्यांस विस्मय वाटला. नव्या नव-

सानें झालेला एकुलता एक मुलगा. बापानें पुष्कळ सांगून पाहिलें. अरुण हट्ट सोडीना. शेवटीं व्हायचें तेंच झालें. अरुण शाळेला अंतरला. पण त्यानें चुकूनसुद्धां खरें कारण कोणास कळूं दिलें नाहीं.

अरुण जाण्याचें कारण वर्ग-शिक्षकांस कळलें. त्यांनीं प्रभाची × × × केली. मुलें उमजलीं. भोळ्या अरुणाच्या खेडवळ चारित्र्यांत त्यांना आतां विशेष दिसूं लागलें.

कालचक्र थांबतें थोडेंच ! पारडें फिरलें. वर्गांत एकटया मधूशिवाय प्रभाशीं कोणीहि बोलण्यास तयार होईना. शिक्षक नेहमी अरुणाची स्तुति करून प्रभास दोष देऊं लागले. झाली चूक आतां कळली. पण होणारें होऊन गेल्यावर उपयोग काय ?

भोळया खेडवळांतच खरें प्रेम आणि मनाची सरळता असते असें आज त्यास वाटूं लागलें. गरीब बिचाऱ्या अरुणाचें शिक्षण बुडवण्यास आपणच कारण झालों. पण उपयोग काय ? वेळ निघून गेली. आतां थोडाच सरळ मनाचा मानी अरुण परत येणार होता !

(४)

रविवारचा दिवस. प्रभा आपले खोलींत लेखन-साहित्य पुढें ठेऊन बसला होता. त्याचें चित्त कोठेंच रमेना. खेडवळ अरुणाच्या भोळ्या मैत्रीची गोड आठवण त्यास प्रत्यहीं जाणवूं लागली. आतां त्यास वाटे कीं अरुणासारखा सालस, सज्जन व साधा मित्र कोठेंच नाहीं.

कितीं वेळ झाला, 'प्रभा, प्रभा,' करीत मधू आंत शिरला. विचारमग्न प्रभा दचकून उठणार तोंच त्याचे मांडीस मांडी लावून मधू येऊन बसला सुद्धां.

' कसें काय ! काय चाललंय ? हें काय ! कविता अं !' मधू उद्गारला.

हो. कागदावर कविताच लिहिली होती. कविराज आपणच लिहिलेली दिसते. अरे वा; पाहूं तर खरें ?' असें म्हणून मधूनें प्रभाचे हातून तो कागद हिसकून वाचण्यास देखील सुरवात केली.

बसलेल्या प्रभाचे लेखणीतून तीव्र विचारोवेगांत ती कविता कागदावर अवतीर्ण झाली होती. प्रभाला कविता वाचण्याचा नाद होता. तो केव्हां केव्हां कविताही लिहीत असे.

मधूनें कागदावर पाहिलें तों काय ? मधू दचकला. आपल्या नेत्रांवर त्याचा विश्वास बसेना. कां बरें ? असें त्या कागदावर होतें काय ? प्रभानें लिहिलेल्या कवितेच नांव मधूनें पुन्हां दृष्टि साफ करून मोठया शब्दांत वाचलें. काय बरें तें नांव !

' सहृदय '

(अरुण–प्रेम. हस्तलिखित मासिक जळगांव.)

बक्षिसाची नवीन योजना.

एक संपूर्ण गोष्ट:—" अरुण-माले"च्या दर अंकांत एक संपूर्ण, चटकदार गोष्ट येत असते. आजपर्यंत या मासिकांत आलेल्या गोष्टी सभ्य असून शिवाय सुंदर व मनोरंजक आहेत. तशाच तऱ्हेच्या १० पासून १४ पानाएवढ्या मोठ्या, चटोरतेचा गंधहि नसलेल्या व कोणीहि वाचण्यालायक मनोरंजक गोष्टी पाठविल्यास सर्वांत चांगल्या ठरलेल्या गोष्टीस ५ रुपये बक्षिसादाखल देऊं.

आदर्श:—" आदर्श " हें अरुण-मालेंतलें नित्याचें सदर आहे. छोट्या गोष्टीच्या रूपानें मनुष्यस्वभाव प्रतिबिंबित करण्याचा 'आदर्श'चा उद्देश आहे.अशी छोटी गोष्ट ३–५ पानाएवढी असून तिच्यांत लेखकाचा उद्देश तडीस गेला असला पाहिजे. बक्षिस ४ रुपये

खुडलेलीं फुलें:—सुविख्यान गद्य–पद्य लेखकांचे अप्रसिद्ध, उद्बोधक व मनाला चटका लावणारे उतारे लिहून पाठवावे. मूळ लेखक पौर्वात्य अगर पाश्चात्य कोणीहि चालेल. दर उताऱ्यास १ रुपया.

मुलांची मौज:—या सदरांत मुलांना आवडेल, त्यांना हंसवील अशा तऱ्हेचा मजकूर पाठवावा. लेखकाच्या लायकीप्रमाणें बक्षिस देऊं. शिवाय **"मुलांसाठीं व इतरांसाठीं कुठलीं नवीन सदरें उघडावीं व काय काय नवीन योजना कराव्या त्या विचारपूर्वक लिहून पाठवून त्या तऱ्हेचा एक लेख सोबत रवाना करावा. ही नवी योजना लहान थोर वाचकांना रंजविल असें वाटल्यास सदर सूचकास ५ रुपये बक्षिसादाखल पाठवूं."**

[वरील सर्व बक्षिसांचे विषय लिहून पाठविण्याचा हक्क **फक्त वर्गणीदारांसच** आहे. तेव्हां इतरांकडून चांगले विषय आले तरी त्यांना बक्षिसें देण्यांत येणार नाहींत.]

रेल्वे बुकस्टॉलसवर

अरुणमालेचे

अंक

विकत मिळतील.

रायगडास पाहून—

(रायगड किल्ला पाहिल्यावर असे उद्गार कां बरें येणार नाहींत ?)

सुनीत

जेथें वैभवशालि भूपति अहा ! सत्ता स्वयें गाजवी ॥
ज्यांनीं दाखियला पराक्रम रणीं ते शौर्यधी ज्या स्थळीं ॥
धर्मासाठिं अमोल जीवितसुमा संतर्पिलें ईश्वरा ॥
ऐशा मंडित सुस्थळीं अजि परी भीती मना कांपवी ॥ १ ॥

होती गर्जत श्री समर्थ मुखिंची वाणी मनोमोहिनी ॥
वीरोचीत पवाड शाहिर मुदें तैं गात उच्च स्वरीं ॥
ये कानीं जयघोष छत्रपतिच्या यन्नाद हो अंबरीं ॥
तेथें घूक परी अजी रमतसें घूं घूं स्वरें गाउनी ॥ २ ॥

शौर्यें मंडित श्रीशिवाजि नृपती वीरासनीं बैसले ॥
छत्रें चामर वीर ढाळिति वरी; हर्षप्रभा दाटली ॥
जेथें राष्ट्रध्वजा नितांत भगवो वायूंत हेलावली ॥
हा ! हा ! भग्न समाध तेथ बघुनी, दुःखाश्रु हे पातले ॥ ३ ॥

× × ×

गेला तो रमणीय काळ, नृपतो तैसेंच तें वैभव ॥
अश्रूंचींच फुलें अजि उधळितों त्या पुण्य कालास्तव ॥

गणेश बाळकृष्ण ताम्हणे

———

मुलांची मौज

ज्याचें कर्म त्याला भोवतें.

(लेखक:–लक्ष्मीकांत भास्करराव परूळकर)

एक राजा होता. त्याच्या राज्यांतल्या एका अरण्यांत एक ऋषी रहात होता. तो अरण्यांत बसून संजीवनी विद्या शिकत होता. एके दिवशीं राजा शिकारीस गेला असतां त्या अरण्यांत गेला व त्याच्या दृष्टीस तो ऋषी पडला. तेव्हां त्या ऋषीजवळ जाऊन राजानें विचारलें, " महाराज, आपण ह्या अरण्यांत बसून काय करतां ?" तेव्हां ऋषी म्हणाला:, राजा मी ह्या अरण्यांत बसून संजीवनी विद्या शिकून घेतली आहे." तेव्हां राजा म्हणाला, "ही विद्या मला शिकवाल का ?" तेव्हां त्याचा आदर पाहून ऋषी कबूल झाला व राजा तेव्हांपासून कोणालाही नकळत दररोज रात्रींचा एकटाच जात असे. तो असा पंधरा वीस दिवस गेला. तेव्हां एके दिवशीं प्रधानास संशय आला व तो त्याच्या पाळतीवर राहिला. एके दिवशीं राजा जात आहे ती वेळ साधून तो त्याच्या मागोमाग गेला. तें राजाला माहित नव्हतें व तो झाडाच्या आड लपून राजा काय करतो हें पाहूं लागला. ही गोष्ट ऋषीला अंतर्ज्ञानानें समजली पण तो कांहीं बोलला नाहीं व तो राजाला संजीवनी विद्या शिकवूं लागला. एका सर्पानें आपली मेग टाकली होती तेव्हां ऋषी राजाचें सत्व पाहाण्याच्या उद्देशानं म्हणाला, "हे राजा, ह्या सर्पानें मेग टाकली आहे तर तुझा देह त्यांत सोड " त्याबरोबर राजान आपला देह सोडून सर्पाच्या कुडींत जाऊन तो बसला व सर्प झाला. हें सगळें प्रधानानें पाहिलें व तो राजाच्या कुडींत जाऊन बसला. प्रिय वाचकहो, तुम्ही विचाराल कीं प्रधानानें आपला देह राजाच्या कुडींत कसा सोडला ? जेव्हां राजानें आपला देह सर्पांत सोडला त्यावेळीं राजानें मंत्र म्हटला व तो त्या कुडींत गेला व तो मंत्र ऐकून प्रधान राजाच्या कुडींत गेला. तेव्हां जो राजा सर्पाच्या कुडींत होता त्याला आपल्या कुडींत जातां आलें नाहीं व त्यामुळें प्रधानाला फार आनंद झाला. तो राजाच्या राणीजवळ आला. व राजाप्रमाणेंच आयुष्य कंठूं लागला. हें सर्परूपी राजानें पाहिलें व त्याला फार

दुःख झालें. तिकडे एका पोपटानें आपला देह सोडला होता तिकडे सर्परूपी राजाचें लक्ष गेलें व तो ती कुडी सोडून पोपट झाला व राणीच्या खोली जवळ जें झाड होतें त्यावर जाऊन बसला व गाणी गाऊं लागला. तिकडे राणीचें लक्ष गेलें व राणीला वाटलें कीं हा पोपट आपल्या रंगमहालांत असावा व तो पकडून तिनें त्याला रंगमहालांत ठेवलें. तो पोपट प्रधानाचें वर्तन पाहात होता; पण त्याला बोलतां येत नसल्यामुळें फार वाईट वाटलें. एकदां त्याच्या सुदैवानें त्या राजरूपी प्रधानाला राणीनें असा प्रश्न केला कीं, तुम्ही आज इतके दिवस रात्रीचे जाऊन काय गुरुविद्या शिकलेत तें मला सांगा. त्या दाराच्या आड एका पालीचें नुसतें कवच पडलें होतें तिकडे राजरूपी प्रधानाचें लक्ष गेलें व तो म्हणाला. "मी संजीवन विद्या शिकलों आहें" तेव्हां राणी म्हणाली, "ती कशी ती मला दाखवा." हें पाहून त्यानें आपला देह सोडला व तो पालीच्या कुडींत जाऊन बसला. हें त्या पोपटानें (राजाने) पाहिलें व त्यानें तो देह सोडून तो आपल्या कुडींत जाऊन बसला. व प्रधानाचें कवच कुजून गेल्यामुळे तो चक ! चक ! करूं लागला. हें पाहून राणीला आश्चर्य वाटलें. तेव्हां राजानें तिला सगळी हकीगत सांगितली व तीं दोघें त्या ऋषीकडे गेलीं व ऋषीनें राजाची सत्यनिष्ठा पाहून त्यांना आशिर्वाद दिले व तीं दोघें आनंदांत राहूं लागलीं.

:०:

नवें कोडें.

८	८	८
८		८
८	८	८

आकृतींत दाखविल्याप्रमाणें घोडयाच्या ८ पागा असन प्रत्येक पागेंत आठ घोडे आहेत. आतां यांतून ८ घोडे असे काढा कीं कोणत्याहि बाजूनें मोजल्यास प्रत्येक रांगेंत पहिल्याप्रमाणें २४ घोडे रहातील.

कांहीं माणसें झोंपेंत कां चालतात ?

मनुष्याचें मन दुभागलेलें असतें आणि दोहोंचीहि आपल्या शरीराच्या प्रत्येक हालचालीवर सारखीच सत्ता असते. आपण एखादी गोष्ट करीत आहों अशी आपणाला कळत असलेली जी गोष्ट तिचा मनाच्या एका बाजूशीं संबंध असतो; आणि आपल्या नकळत ज्या गोष्टी होत असतात त्यांचा संबंध दुसऱ्या बाजूशीं पोंचतो. आपणाला आपण नेहमीं करीत असलेल्या सर्व जरुरीच्या गोष्टींद्दल कांहींच ठाऊक नसतें. उदाहरणार्थ, आपण नेहमीं श्वासोच्छ्वास करतों; पण आपण त्याच्याबद्दल कधींच विचार करीत नाहीं. तसेंच श्वासोच्छ्वासामुळें आपली छाती वर खालीं होत असते. पण आपण तिकडे विचार करण्याच्या दृष्टीनें कधींच पहात नाहीं. चालण्याची सुद्धां तशीच गोष्ट आहे. मनुष्य झोपेंत चालतो, तो अगदीं जागेपणीच्या चालण्यासारखा. कारण चालणें ही नेहमींची व्यवहारांतलीच एक गोष्ट असल्यामुळें श्वासोच्छासाप्रमाणें मनाच्या दुसऱ्या बाजूचें तिकडे पूर्ण दुर्लक्ष असतें आणि संवईमुळें आपणाला चालण्यासाठीं जागें असण्याची सुद्धां जरूरी भासत नाहीं. यामुळें मनुष्य जागेपणीं ज्या एखाद्या धोक्याच्या जागेकडे जाणार नाहीं, तेथेंहि झोंपेंत तो निर्भय मनानें जात असतो.

कोड्याचें उत्तर.

(१) काठेवाड
(२) नोव्हेंबर
(३) शिवेश्वरकर
(४) इसापनीति
(५) युधिष्ठिर
(६) नारिंगी

उत्तरें बिनचूक पाठविणारांचीं नांवें:--

श्री. रा. वि. सुखठणकर, भा. स. माणगांवकर, वि. शं. दळवी, ज. मो. गावकर. खं. मो. रांगणेकर म. कृ. नाडकर्णी, वि. अ. बावडेकर, क. स. भावे, रा. ल. कीर्तने, ना प्र. वर्वे, ल. तु. वोंडसे. कु. कुसुमबाई बा. कामत, शि. खं. धैर्यवान, श्री. रा. कामत, आ. शां. पाटगांवकर.

बक्षिसाच्या पांच म्हणी.

(लेख– श्री. मा. गो. कीर्तने.)

बक्षिस पुस्तक—(**ध्रुव व चिलया**)

उथळ पाण्याला खळखळाट फार:—ज्याचें डोकें पोकळ आहे त्याला फार बडबड करावयास पाहिजे हें आपण नेहमीं पहातों. उलट खरा सूज्ञ मनुष्य आपण अमुक करूं आणि तमुक करूं म्हणून उगीच बढाया मारणार नाहीं. तो कोणतेंहि कार्य हातानें करून दाखवील. या म्हणींत समुद्राला सूज्ञ मनुष्याची उपमा शोभेल आणि बडबड्या माणसाला ओढ्याची उपमा शोभेल.

•खाईन तुपाशीं, नाहीं तर राहीन उपाशीं:— कांहीं माणसें फारच करारी आणि महत्वाकांक्षी असतात. त्यांच्या इच्छा लहानसान नसतात. काहीं माणसें स्वतःच्या मालकीच्या एखाद्या टोलेजंग इमारतींत रहाण्याची महत्वाकांक्षा धरतात. मोठी इमारत बांधणें त्यांना शक्य नसलें तर ते रस्त्यावर पडून राहतील; पण एखाद्या छोट्या घरांत भाडें देऊन अगर फुकटहि राहणार नाहीत. कारण तें त्यांना अतिशय कमीपणाचें वाटतें.

मियां मुठभर आणि दाढी हातभर:— ही नेहमीं व्यवहारांत आढळणारी म्हण आहे. एखाद्या क्षुल्लक बाबतीसाठीं त्याच्या कितीतरी पट जास्त साधनें गोळा करणें हा ह्या म्हणीचा अर्थ आहे, किंवा एखाद्या छोट्या मुलानें आपल्या आजोबाचा अंगरखा घातला, डोक्यावर मोठी पगडी घातली व पायांत भला थोरला जोडा घातला म्हणजे सुद्धां त्याला पाहून 'मिया मूठभर आणि दाढी हातभर' ही म्हण लागू होईल. म्हणीचा मुख्य अर्थ म्हणजे, आहे त्यापेक्षां जास्ती आव आणणें हा होय.

शितें·तोंवरी·भुतें नाचतीं:—आपल्या नेहमींच्या पहाण्यांत आहे कीं जोंपर्यंत·एखादा·मनुष्य श्रीमंत आहे तोंपर्यंत त्याला भरपर मित्र व आप्त असतात. पण·तोच कांहीं कालानें हीन दशेस पोंचला म्हणजे मित्र व आप्त त्याला·सोडून·जातात. हाच या म्हणीचा अर्थ आहे.

'वांसरांत लंगडी गाय शहाणी':--बरेचसे अशिक्षित मूर्ख एकीकडे जमले म्हणजे त्यांच्यांत जो साधारण शिकलेला आहे तोच शहाणा ठरतो. शहाण्या लोकांत त्याला कोणीच विचारीत नसलें तरी या अशिक्षित मेळ्यांत त्याला मोठा मान मिळत असतो.

पुढील अंकाकरितां

" बक्षिसाचा विषय "

" मे महिन्याची रजा तुम्हीं कशी घालविली ? "

(१॥ पानापेक्षां जास्त लिहूं नये.)

दीनांचा वाली परमेश्वर.

(रा. बाबुराव य. नेरूरकर)

[मागील अंकावरून समाप्त]

इतक्यांत त्याला आपल्या जरीच्या टोपीची आठवण झाली. ती विकावयाची म्हणजे एक दोन रुपये तरी मिळतील असे त्याला वाटलें. त्या टोपीची किंमत तीन रुपये होती. त्याच्या बापानें विश्वनाथाच्या एका वाढदिवशीं त्याला ती घेऊन दिली होती. एक वेळच ती त्यानें घातली होती.ती टोपी आज विकावी लागते म्हणून विश्वनाथाला थोडें सुद्धां वाईट वाटलें नाहीं. टोपी घेऊन तो बाहेर पडणार इतक्यांत म्हातारी बाहेर गेली होती ती लगबगीनें येतांना त्याला दिसली, म्हणून तो थांबला. म्हातारी जवळ आल्याबरोबर उत्सुकतेनें विश्वनाथाला म्हणाली, "बाळ, मी भांडीं घासायला जातें. त्या घरचे मालक आज पंधरा दिवस तापानें आजारी आहेत. इथल्या डॉक्टरच्या औषधानें गुण येईना, म्हणून त्यांनीं मुंबईहून मोठे डॉक्टर आणिले आहेत. ते काल संध्याकाळीं आले. आतां ते त्यांच्या घरीं आहेत. तूं लवकर जा आणि ते येतात का पहा बरें ?',

असें म्हणून तिनें त्या घराचा पत्ता सांगितला. विश्वनाथाला तिचें बोलणें ऐकून बराच धीर आला. म्हातारीला आईजवळ बसण्यास सांगून तो बाहेर पडला. आधीं टोपी विकावी असा विचार त्यानें केला. त्या गावांत टोपीचें एक लहान दुकान होतें, त्या दुकानांत विश्वनाथ शिरला व दुकानदाराला त्यानें टोपी दाखवून तिची मूळ किंमतही सांगितली. दुकानदाराला टोपी पसंत पडली; परंतु विश्वनाथाला तसें न दाखवितां त्याला पैशाची अडचण आहे हें जाणून तो लबाड माणूस म्हणाला, "ही टोपी मी आठ आण्याला घेईन, पाहिजे असेल तर ठेव नाहींतर चालता हो." विश्वनाथ फार काकुळतीला येऊन 'एक रुपया तरी द्या' असें म्हणूं लागला. शेवटीं दुकानदारानें बारा आणे देण्याचें कबूल केलें. विश्वनाथाला बारा आणे तर बारा आणे, तेवढेच द्यावे असें वाटून त्यानें ती टोपी दिली आणि पैसे घेतले. विश्वनाथाचें आणि दुकानदाराचें भाषण चाललें होतें त्यावेळेस त्या दुकानाच्या-समोरच्या घराच्या ओटीवर पार्शी जातीचे एक गृहस्थ उभे होतें. विश्वनाथाचें आणि दुकानदाराचें बोलणें त्याला ऐकूं येण्याचा संभव नव्हता. परंतु विश्वनाथाची व्याकुल मुद्रा, त्यानें दिलेली टोपी व त्याबद्दल घेतलेले पैसे हें त्यानें लक्षपूर्वक पाहिलें. इतक्यांत विश्वनाथ मागें वळला. म्हातारीनें सांगितलेलें समारचेंच घर असें पाहून तो झपाझप पाऊल टाकीत त्या घराजवळ आला. मघां सांगितलेले ओटीवर जे गृहस्थ होते त्यांचे हातांत ब्याग होती; यावरून हेच डॉक्टर असतील असें विश्वनाथाला वाटलें. तो त्यांच्याजवळ जाऊन हात जोडून म्हणाला, " मुंबईहून डॉक्टर आले आहेत ते आपण का ?" डॉक्टर त्याच्याकडे प्रेमळपणें पाहून म्हणाले, " होय, मीच तो. कां बरें बाळ विचारतोस ! तुझ्या घरीं कोणी आजारी आहे का ?"

डॉक्टर साहेबांचा प्रेमळ शब्द ऐकून विश्वनाथाला गहिंवर आला. तो कंपित स्वरानें म्हणाला, "डॉक्टरसाहेब, माझी आई फारच आजारी आहे हो ! इथले डॉक्टर फी वांचून घरीं येण्यास कबूल नाहींत व औषधही पैशांवांचन देत नाहींत. मी दरिद्री मुलगा आहें. आपण माझ्या आईला पहाण्याकरितां याल का ? आपले फार उपकार होतील." त्याचें बोलणें ऐकतांच डॉक्टरांच्या

डोळ्यांत पाणी साठूं लागलें. मनांतल्यामनांत तिथल्या डॉक्टरांचा तिरस्कार करीत ते विश्वनाथाला म्हणाले "·बाळ, भिऊं नकोस. मी तुझ्या घरीं येतों चल" डॉक्टरांचे ते शब्द ऐकून विश्वनाथानें त्याना साष्टांग नमस्कार घातला आणि तो म्हणाला "आज मला गुरुदत्त पावला." डॉक्टरांनीं हंसत विचारलें "गुरुदत कोणरे"? त्यावर विश्वनाथानें बापाचें अखेरचं बोलणें व आपण आज घराबाहेर पडतांना दत्ताचा केलेला धांवा वगैरे हकीगत सांगितली. डॉक्टरांना मोठें कौतुक वाटलें. नंतर ते त्याचा हात धरून निघाले. समोर टोपीवाल्याच्या दुकानाकडे नजर जातांच त्या दुकानांत कां गेला होतास असें विश्वनाथाला त्यांनीं विचारिलें. त्यानें कांहींसें कांकूं करीत टोपी विकल्याची हकीगत सांगितली. तें ऐकून डॉक्टरांना फार वाईट वाटलें. ते त्याला घेऊन दुकानांत शिरले. त्यांनीं दुकानदाराकडून ती·टोपी मागून घेतली व त्याचे बारा आणे आपण फेंकून त्या दुकानदाराची लहान अनाथ मुलाला फसविल्याबद्दल थोडी खरडपट्टी काढली.

विश्वनाथाच्या घरीं आल्यानंतर त्यांनीं सीताबाईला नीट तपासलें आणि औषध तयार करून देऊन ते बाहेर आले. विश्वनाथानें गहिवरून त्यानां पुन्हां एकदां साष्टांग नमस्कार घातला. डॉक्टरांनीं त्याला वर उचलले व म्हटलें, "बाळ, 'दीनांचा वाली· परमेश्वर ·आहे' असें तुझ्या वडिलांनीं म्हटलें तें अगदीं खरें आहे हें. लक्षांत ठेव. चल, हे २५ रुपये तुझ्याकडे ठेव. मी दिलें आहे तेवढ्या औषधानेंच तुझी आई साफ बरी होईल. मी तुला आतां दर महिन्याला २५ रुपये पाठवीत जाईन. बरं, मी जातों." असें म्हणून डॉक्टर झटकन् निघून गेले. विश्वनाथाच्या डोळ्यांत अश्रू आले. त्यानें घरांत येऊन दत्तगुरूला साष्टांग नमस्कार घातला.

खुडलेलीं फुलें.

...परंतु प्रेमाचें तसें नाहीं. प्रेमी–सत्यप्रेमानें भरलेल्या अंत:करणाचा माणूस–आपलें प्रेम लपवूं इच्छित नाहीं आणि त्यानें यदाकदाचित् लपविण्याचा यत्न केला–त्यानें असत्य शब्दांची योजना करून विपरीत अर्थाचा भास दाखविण्याचा खटाटोप केला, तरी तो सफल होत नाहीं. प्रेमास आपलें स्वरूप प्रकट करण्यास अनेक द्वारें आहेत. पृथ्वीच्या अंतर्गत पाणी असें कितीहि ठिकाणीं तिनें लपवून ठेवलें तरी ते कोठें ना कोठें तरी बाहेर पडतेंच; तसें प्रेम हें कितीहि पोटातल्या पोटांत ठेविलें, शब्दांच्या द्वारें बाहेर दिसूं द्यावयाचें नाहीं असा प्रयत्न केला, तरी तें प्रेमी व्यक्तींची दृष्टादृष्ट होतांच अनेक द्वारांनीं बाहेर पडतें. जितकें प्रेम उत्कट, तितकीं त्यांचीं दर्शनद्वारें अधिक ! जिव्हेनें प्रेम प्रकट करण्याचें नाकारलें तरी चर्या जिव्हेपेक्षां हजारों पटीनें तें काम करते. प्रेमाला आत्मस्वरूप व्यक्त करण्यास जिव्हा हें एकच साधन आहे काय ? नाहीं. जिव्हापल्लवी ही त्याची एकच भाषा नव्हे. त्याला करपल्लवी, चर्यापल्लवी, पदपल्लवी, नेत्रपल्लवी, रोमांचपल्लवी इत्यादि अनेक भाषा आहेत. या एक एक भाषेनें जें प्रेमाचें कार्य होतें, तें हजारों शब्दांनीं व शेंकडों वाक्यांनीं होत नाहीं.

मुलगा फारां दिवसांनीं घरीं आला म्हणजे त्याचें स्वागत आई शब्दांनीं करो वा न करो,तें तिच्या प्रेममय पहाण्यानें जसें होतें तसें कशानेंच होत नाहीं. फार वर्षांच्या विरहानंतर आलेल्या पतीचें पत्नी स्वागत करते, तें शब्दांनीं कधीं खऱ्या प्रकाराने व्यक्त होतें काय ? तें स्वागत तिच्या केवळ नेत्रांनींच होतें. फार दिवसांनीं भेटलेले मित्र नुसते एकमेकांचे हात धरतात व एकमेकांकडे पहातात, तेवढ्यांतच परस्परांच्या भेटीपासून होणारें सुख परस्परांस कळून चुकतें. तेथें शब्दांची जरूरीच लागत नाहीं. एखाद्या मैत्रिणीवर दु:खाचा कडेलोट झाला असतां भेटावयास जाणाऱ्या मैत्रिणीनें तिला पोटाशीं धरलें पुरे, तिच्या दु:खाचें ओझें अर्धें अधिक हलकें होतें. शब्द त्या प्रसंगीं अगदीं अनावश्यक किंबहुना फोल, वायफळ होतात. प्रेमानें स्नेहानें, व सहानुभूतीनें तुडुंब भरलेल्या अंत:करणांत शब्दोच्चाराची इच्छाच होत नाहीं.

कै. ह. ना. आपटे.

—कवि हा उपजत वेडा असतो. लेखाच्या तोंडांतच कवीचा व वेडाचा संबंध उडत्या उल्लेखानें दर्शविलेला आहे. कवीचें तें वेड घालविण्याचा प्रयत्न करणे तर दूरच राहिलें परंतु तें नाकबूल केल्यानें सुद्धां आपल्याशीं कवि उभा दावा धरील. या वेडाच्या भरांत कवि वाटेल तो विलक्षण चमत्कार करून दाखवितो. एका कवीनें आपल्या कुटुंबांतील सारीं माणसें मेल्याचें एका सद्गृहस्थाला पत्र पाठविलें, आणि दुसऱ्या दिवशीं सर्वांच्या खुशालीचें दुसरें पत्र पाठवून त्यांत पहिल्यांतील सर्व गोष्टी आपण वेडाच्या भरांत लिहिल्याबद्दल खुलासा केला ! जगाला उपदेश करावयाला तयार झालेला हा महात्मा स्वतः वेडापीर असतो हें, साहित्यशास्त्रासंबंधीं सत्यपदार्थमात्राला दृष्टिगोचर स्वरूप देणारा प्रकाश स्वतः अदृश्य असतो, या पदार्थशास्त्रांतील तत्वालाहि लाजविण्याजोगें आहें. कोणाला पैशाचें वेड लागतें, कोणाला कीर्तीचें वेड लागतें, एका बाईला आपण पोस्टाचें तिकीट असल्याबद्दल वेड लागलें होतें. एका गृहस्थाला आपण प्रमाणाबाहेर लठ्ठ असल्याचें व दुसऱ्याला अक्षय पाऊस पडत असल्याचें वेड लागलें होतें. परंतु कवीला आपण वेडे असल्याचेंच वेड लागलेलें असतें. प्रत्येक कवि आपल्याला निर्भेळ वेड लागल्याबद्दल अट्टाहासानें दवंडी पिटीत असतो. लोकांना हें वेड खरें वाटण्यासाठीं तो भर दोनप्रहरींच फिरावयाला निघतो; केसाच्या झिंज्या पसरतो, चारचौघांत बोलतांना मध्येंच स्वगत भाषणाला सुरवात करतो. पंक्तींत जेवतांना 'दुग्धीं लिंबू' पिळणाऱ्या अर्जुनालाहि शहाणा म्हणतो; (एकानें तर एकदां आपल्या शेजारीं जेवावयाला बसलेल्या एका वृद्ध गृहस्थाला प्रियामजकूर समजून त्याच्या तोंडांत घांस भरविण्यालाहि कमी केलें नाहीं.) कोटांचीं बटणें उघडीं टाकतो, टाळक्यावरची टोपी सव्वा हात मागें टाकतो किंवा भररस्त्यांत मध्येंच बैठक मारतो.

कै. बाळकराम (रिकामपणची कामगिरी)

सणांचे दिवस

मुख्यतः पावसाळ्यांतच जास्त येत असल्यामुळें सर्व सणांचें धार्मिक सामाजिक, औद्योगिक व राजकीय दृष्टींनीं महत्व कळण्यासाठीं ऋग्वेदी कृत

आर्यांच्या सणांचा इतिहास

हें पुस्तक मागवा.

पत्ताः—व्ही. प्रभा आणि कंपनी. नवी भटवाडी. मुंबई नं. ४.

मुलींचा संसार

श्रेष्ठ कोण ? पति कीं पत्नि ?

ले. कु. मालिनीबाई महादेव मसुरकर.(रत्नागिरी)

इंग्लिश समाजाचें बारकाईनें निरीक्षण केलें असतां सदर समाजांतील कुटुंबांत पति–पत्नीमध्यें परस्परांवर वर्चस्व ठेवण्यासाठीं नेहमीं अहमहमिका सुरू असते असें आढळून येईल. सुप्रसिद्ध इंग्रज कादंबरीकार रेनॉल्ड यानें आपल्या एका सामाजिक कादंबरीमध्यें अशा एका कुटुंबाचें चित्र फार बहारीनें चितारलेलें आहे. नवऱ्यापेक्षां बायको अधिक दक्ष, शहाणी व चतुर आहे असें चारचौघांनीं म्हणावें या इच्छेनें या कादंबरींतल्या कुटुंबांतील यजमानीण आपल्या नवऱ्यावर अंमल चालविण्याचा प्रयत्न करीत असे आणि नवरा तर सहाजिकच स्वतःला घरचा एकटाच मालक समजत असल्यामुळें आपल्या नवरेपणाचा अधिकार आपल्या बायकोवर गाजवूं लागे. पति-पत्निमध्यें ही चढाओढ नेहमी सुरू असल्यामुळें पुष्कळदां त्यांची पाहुणे मंडळींत व समाजांत फजिती होत असे. अलीकडच्या इंग्रज समाजांतही बऱ्याच अंशानें हीच स्थिति असून तिचें हास्यास्पद चित्र विनोदी चित्रांमधून काढलेलें पहावयास सांपडतें. इंग्लिश समाज व त्याच्या चालीरीती पाहिल्या म्हणजे अशा तऱ्हेची परिस्थिती कुटुंबाकुटुंबांमध्यें उत्पन्न होणें निसर्गाविरुद्ध आहे असें दिसत नाहीं.इंग्लिश कुटुंबांत प्रौढ विवाह तर प्रचलित आहेच परंतु त्या कुटुंबांतील नवराबायको हीं केवळ वयानेंच समवयस्क असतात असें नाहीं, तर शिक्षण,बुद्धि कला या बाबतींतही तीं समसमान असतात,आणि सुप्रसिद्ध नाटक-कार रा. वरेरकर यांनीं लिहिलेल्या 'स्त्री-पुरुष समवयस्क असलीं म्हणजे त्यांत स्त्रीचाच वरचष्मा होऊं लागतो ' अशा अर्थाच्या वाक्याप्रमाणें अनुभव येऊं लागतो. स्त्रीवर्गावर आपला वरचष्मा ठेवण्याचा पुरुष-वर्गाचा स्वभावधर्म नैसर्गिकच असल्यामुळें किंवा रूढी-मुळें तो तसा बनला गेल्यामुळें, अर्थात् कुटुंबांच्या या दोन घटकावयवांमधें चुरस लागणें अपरिहार्य आहे. 'असे पति देवचि ललनांना ' ही भावना नवऱ्याबद्दल पाश्चात्य स्त्रीच्या अंतःकरणांत सहसा असूं शकत नाहीं. पति हा आपला सर्वांत उत्तम मित्र व हितकर्ता आहे, असाच तिचा समज असतो. म्हणून देवाप्रमाणें पतीच्या ठिकाणीं तिनें आदरबुद्धी ठेवणें हें तिच्या स्वभावधर्माला अनुसरून असल्याप्रमाणें वाटत नाहीं. नवऱ्यानें अन्याय्य

कृत्य केलें तर हिंदू स्त्रीप्रमाणें ती मुळु मुळू रडत बसणार नाहीं किंवा आपल्या जिवाचें बरेंवाईट करून घेण्याचेही मनांत आणणार नाहीं. उलट शक्य असेल तितका व शक्य तोंपर्यंत ती त्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करील आणि वेळप्रसंगीं आपल्या मदतीसाठीं ती कायद्यालाही निमंत्रण करील. अशा तऱ्हेचें इंग्लिश समाजाच्या कुटुंबाचें साधारण चित्र असल्यामुळें पति श्रेष्ठ कीं पत्नि श्रेष्ठ हा वाद त्यांच्यामध्यें सुरू झालेला असून तो कमी होण्याऐवजीं दिवसें दिवस वाढतच जाणार यांत शंका नाहीं आणि तसें होणेंही अपरिहार्य आहे.

आतां हिंदुसमाजाकडे पाहूं लागलें असतां अशा तऱ्हेचा वाद त्यांतील कुटुंबामध्यें उत्पन्न झालेला दिसत नाहीं; पण थोड्या बारकाईनें पाहिल्यास अशा तऱ्हेचा वाद याही कुटुंबांत बदलत्या परिस्थित्यनुरूप कांहीं दिवसांनीं उत्पन्न होईल असें दिसून आल्याशिवाय रहावयाचें नाहीं. जुन्या काळापासून पाहात आलें असतां पति आणि पत्नि हीं संसारशकटाचीं दोन चाकें असून तीं दोन्ही एकोप्यानें राहिलीं तरच हा शकट चांगल्या तऱ्हेनें चालूं शकेल अशी समजूत हिंदु समाजाच्या अंतरंगांत भिनून गेली आहे असेंच दिसूं लागतें आणि समता, न्याय व समाजाला आवश्यक असणारी शांति यांना ही समजूत पोषकच आहे. संसारयात्रेंतील धर्मार्थकामाचे तीन पुरुषार्थ या समजुतीच्या आचरणावरच चांगल्या तऱ्हेनें सिद्धीला जातील. समतेच्या दृष्टीनें विचार केल्यास स्त्री आणि पुरुष यांमध्यें कसल्याच बाबतींत भेदाभेद नसल्यामुळें त्यांचा दर्जा समसमान असणें इष्ट आहे. स्त्री व पुरुष यांच्या शरीर व मनोधर्मामध्ये जरी कांहीं नैसर्गिक फरक असेल तरी त्या फरकांमुळेंच गृहस्थाश्रम सुरळीत चाललेला आहे. ज्या बाबतींत पुरुषवर्ग लंगडा पडतो तीच बाब संसारांत स्त्री जबाबदारपणामुळें उत्तमप्रकारें सांवरून धरते व स्त्रीवर्गाच्या बाबतींत असलेला अभाव पुरुषवर्ग भरून काढीत असतो आणि म्हणूनच या नैसर्गिक भेदाभेदामुळें त्यांचा दर्जा समसमान नसावा असें म्हणण्यास कांहींच साधन नाहीं. पुरुषाशिवाय स्त्री व स्त्रीशिवाय पुरूष पंगू असतो. रावणानें सीतेला पळवून नेलें असतां सीतेचा शोध करीत फिरणारा राम एका ऋषीचें दर्शन घेण्यास गेला असतां सीता नसल्यामुळें गृहस्थाश्रमी रामाचें तेज कमी झालें आहे अशा तऱ्हेच्या सबबीवर ऋषीनें रामाला दर्शन देण्याचें नाकारलें, या रामायणांतील मार्मिक प्रसंगावरून गृहस्थाश्रमाच्या या समतेच्या सुंदर तत्वाचें चांगलें समर्थन होतें.

समाजाला आवश्यक असणाऱ्या शांतीचा भंग या चुरशीमुळें कसा होत असतो हें वर वर पाहिलें असतांहि चांगलें दिसून येतें. रूढीला बळी पडून पायांतील 'वहाण' पायांतच बरी, असा समज करून घेतलेल्या पुरुषाचें आपल्या पायांतल्या 'वहाणे'शीं असलेलें वर्तन

पाहिलें म्हणजे खऱ्या सांसारिक शांति–समाधानाचा त्याला कितपत लाभ होत असेल याची कल्पनाच केली पाहिजे.

हिंदु कुटुंबांतील नवरा व बायको यांच्याबद्दल विचार केला असतां सध्यां तरी नवरा आपल्या 'मुठींत असावा' हा वेडगळ समज मनांत धरून त्या दिशेनें खटपट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांशिवाय वरील तऱ्हेचा श्रेष्ठतेचा वाद इतर स्त्रियांत उत्पन्न झालेला आढळत नाहीं. यांची कारणें बरींच आहेत. सध्यांच्या नवरा बायकोंत नवऱ्यापेक्षां वय व विद्या यांनीं बायको बरीच लहान असते, निदान बरोबरीची तरी नसते हें एक कारण प्रमुख आहे. दुसरें कारण म्हटलें म्हणजे नवऱ्याच्या ठिकाणीं केवळ एक हितकर्ता व मित्र या पलीकडची कांहीं तरी श्रेष्ठपणाची व अधिक पवित्र भावना आर्य स्त्रीच्या अंत:करणांत खोल रुजलेली असते, आणि या भावनेमुळेंच बऱ्याच गोष्टींत पड खाण्याचा स्वभाव किंवा आज्ञाधारकपणाकडे कल त्यांच्या ठिकाणीं उपजत असतो. जरी कदाचित् एखाद्या गोष्टीत तिच्याकडून विरोध झालेला दिसला तरी त्यांत प्रेमळपणाचाच अंश अधिक असतो. तत्त्वासाठीं हट्टाला पेटून केलेल्या विरोधाची व संसारसुखाची होळी करणारी आग त्या विरोधांत नसतें.

परंतु शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळें किंवा शिक्षण या नांवाखालीं होत असणाऱ्या प्रयत्नांनीं असा वाद उत्पन्न होण्याचीं लक्षणें दिसूं लागल्यास समतेची बुद्धि तो वाद अधिक होऊं देणार नाहीं अशी आशा करण्यास हरकत नाहीं. स्त्री आणि पुरुष हीं दोन्हीं कुटुंब, समाज व राष्ट्र यांच्या उत्कर्षास सारखींच कारणीभूत होणारीं असल्यामुळें त्यांच्या श्रेष्ठपणाबद्दल वाद उपस्थित करणें मूर्खपणाचें होईल.

शेक्सपियरच्या

नाटकाचीं सुप्रसिद्ध इंग्लीश ग्रंथकार मि. लँब यानें केलेल्या
मार्मिक संविधानकाच्या धर्तीवर मराठींतील

नामांकित नाटककारांच्या

नाटकांचीं परीक्षणवजा, सुंदर संविधानकें लौकरच

अरुण मालेंतून

सुरू करण्यांत येतील.

वीरद्वय

ले. श्री. भा. वि. नाडकर्णी

(नं. २) धनाजी जाधव

श्री शिवाजी महाराजांचे आजे लखूजी जाधव यांच्या वंशांत नरवीर धनाजीचा जन्म झाला. लखूजी व त्याचा मुलगा अजलोजी यांस अहमदनगरच्या निजामशहानें ठार मारल्यानंतर अजलोजीचा मुलगा संताजी याचें जिजाबाईनें पालनपोषण केलें. संताजी व जिजाबाईचा मुलगा संभाजी हे दोघे समवयस्क असून बरोबरीनें वागत असत. ते दोघे शहाजी राजाजवळ होते व कनकगिरी काबीज करतांना ते दोघे मारले गेले. संताजीचा मुलगा शंभुसिंग हा शिवाजी महाराजांजवळ होता आणि त्याचाच पुत्र सदर चरित्रनायक होय. धनाजीचा जन्म इ. स. १६५० च्या सुमारास झाला. त्याचें बालपण जिजाबाईजवळच गेलें. धनाजीचें नांव सर्वतोमुखी होण्याचें कारण म्हणजे त्यानें संताजी घोरपडे याच्या बरोबर उंबराणी व जेसरीच्या लढाईंत (१६७४) केलेला अचाट पराक्रम होय. त्यानंतर कर्नाटकांत हंबीरराव मोहित्याच्या हाताखालीं असतांना धनाजीनें आपल्या अंगचा निधडेपणा आणि शौर्य याचा चांगलाच दाखला पटवला. विशेषतः सावनूरच्या लढाईंत (१६७८–७९) धनाजीच्या पराक्रमाची शर्थ झाली. धनाजीनेंच ती लढाई जिंकली असें म्हणणें सुद्धां धाडसाचें होणार नाहीं. यावेळीं प्रत्यक्ष महाराज धनाजीस सामोरे गेले व त्याचा सन्मान करून त्यानें केलेल्या अतुल पराक्रमाबद्दल तारीफ केली. ह्या लढाईचें वर्णन महाराजांनीं विचारल्यावरून अण्णाजी रंगनाथानें इतकें हुबेहुब केलें कीं महाराजांच्या डोळ्यासमोर तें सारें दृश्य सत्य-सृष्टींतल्यासारखें दिसूं लागलें. अण्णाजी रंगनाथाची वर्णन करण्याची हातोटी पाहून महाराजानीं त्यांनांही वस्त्रें व अलंकार देऊन त्यांचा गौरव केला.

महाराजांच्या अवसानानंतर संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत धनाजीच्या पराक्रमास विशेषसा अवसर मिळाला नाहीं. पण पुढें राजाराम महाराजांना जिंजीस जाऊन रहाणें जेव्हां अपरिहार्य झालें त्यावेळीं महाराष्ट्राच्या रक्षणाची भिस्त त्यांनीं धनाजी व

संताजीवर ठेवली. या जबाबदारीमुळें मात्र त्यांचे शौर्यादी गुण प्रकट होऊं लागले. बादशहाच्या तबूचे कळस कापून नेण्याच्या मसलतींत धनाजी होताच. संताजीची घोडदौड मुसलमानांना त्राहि भगवन् करीत असतां धनाजी स्वस्थ बसला नव्हता. फलटणच्या मैदानांत रणमस्तखनास गांठून त्याने त्याला नेस्तनाबूद करून टाकलें. ह्या पराक्रमाबद्दल त्याला 'जयसिंगराव' ही पदवी मिळाली. महाराष्ट्रांत सारखें फिरत राहून त्याने शत्रूंना भयंकर जरब बसवली. नंतर संताजी व धनाजी मोंगली मुलुखांत धुमाकूळ घालून चौथाई व सरदेशमुखी वसूल करूं लागले; व त्यांनींच 'घांसपाणी' म्हणून एक नवीन वसुलाची बाब उपस्थित केली. अशा रीतीनें धनाजीनें बरेच पराक्रम केले. इ. स. १६९४ मध्ये धनाजी व संताजी यांच्यामध्यें बेबनाव उत्पन्न झाला व त्याचा विपर्यास म्हणजे संताजीचा खून होय. प्रल्हादपंत वारल्यावर राजारामाला कोणीच सल्लागार राहिला नाहीं व त्यामुळें त्याच्या हातून चुका होऊं लागल्या. संताजी अमात्याचे हुकूम बरोबर पाळीत नसे; कधीं कधीं तो ते अमान्यहि करीत असे ह्यामुळें रामचंद्रपंत व राजाराम यांचीं मनें त्याच्याविषयीं कलुषित होऊन संताजी फितुरी करतो कीं काय याबद्दल ते साशंक असत. संताजी मुळींच फितुर नव्हता. फितुर होण्याचें त्याच्या मनांत असतें तर त्याला तसे पुष्कळ प्रसंग होते. पण संताजी उमद्या अंतःकरणाचा व महाराजांचा विश्वासूक व एकनिष्ठ सेवक होता. तथापि संताजीचें सेनापतिपद काढून घेण्यांत येऊन इ. स. १६९६ त तें धनाजीस देण्यांत आलें. तेव्हांपासून धनाजी आमरण मराठयांचा सेनापति होता. धनाजी संताजीपेक्षां कमी शूर होता अशांतली गोष्ट नाहीं; पण त्याच्या सैन्याची शिस्त ढिली होती. संताजीच्या सैन्याची शिस्त अत्यंत कडक असून शिवाजी-महाराजांच्या कारकीर्दीतील शिस्त व व्यवस्था ठेवण्यासाठीं तो झटत होता. पण यामुळें त्याचा फायदा व तोटाहि झाला. त्याला लांबलांबचे पल्ले लवकर गांठतां येऊन मुसलमानांवर एकदम हल्ला करतां येत असे; तर उलटक्षीं त्याच्या कडक शिस्तीनें लोक त्याच्यावर नाखुष झाले. असो.

धनाजी व संताजी यांच्यामधील बेबनाव वाढत जाऊन एके दिवशीं धनाजीनें विजापूरनजीक संताजीवर हल्ला केला. संताजीची बहुतेक फौज धनाजीस मिळाली व संताजी आपसांतील युद्धप्रसंग टाळण्यासाठीं—अगर जीव बचावण्यासाठीं म्हणा—धनाजीच्या सैन्यास हुलकावण्या दाखवूं लागला. हणमंतराव नांवाच्या एका शिलेदारानें संताजीचा पाठलाग केला, व म्हसवडच्या रानांत तो स्नानासाठीं एका ओढ्यावर उभा असतां नागोजी मान्यानें त्याच्या मानेवर तरवार चालविली. खरोखर पाहिलें असतां धनाजीच्या मनांत संताजीच्या वध मुळींच करावयाचा नव्हता. पुढे इ. स. १७०० मध्यें राजाराम

मरण पावला व ताराबाई राज्यकारभार पाहूं लागली. सेनापतिपद धनाजीकडेच ठेवण्यांत आलें. इ. स. १७०५ मध्यें नाईकाच्या दंग्यांत धनाजीनें बरीच मदत केली. इ. स. १७०७ च्या सुमारास शाहू कैदेंतून सुटून दक्षिणेंत आला. त्यावेळीं ताराबाईनें प्रतिनिधी व सेनापति यांस त्याच्यावर पाठविलें. धनाजीचा ओढा राज्याचा खरा मालक जो शाहू त्याच्याकडेच होता. सेनापतींबरोबर चिटणीस खंडो बल्लाळ हेहि होतेच. त्यांनीं गुप्तपणें शाहूची भेट घेतली व त्यांनीं आणि सेनापति जाधव यांनीं उघडपणें शाहूचा पक्ष स्वीकारला. परशुरामपंतांची शाहूच्या सैन्याशीं लढाई झाली. पण त्यांत त्यांचा पराभव झाला. पुढें शाहूस राज्याभिषेक झाला. त्यावेळीं सेनापतिपद जाधवांकडेच कायम गेलें. यानंतर धनाजी फार दिवस जगला नाहीं. इ. स. १७१० मध्यें हा शूर नरवीर मरण पावला. धनाजीला तीन मुलगे होते. त्यांपैकीं चंद्रसेन जाधवास शाहूनें सेनापति केलें; पण त्याचें व बाळाजी विश्वनाथाचें जमेना; तेव्हां तें पद खंडेराव दाभाडयाकडे गेलें. धनाजीच्या हाताखालीं बाळाजी विश्वनाथ हा शूर व मुत्सद्दी पुरुष कांहीं दिवस होता.

पोंच व अभिप्राय.

उषःकाल. (हस्तलिखित मासिक) मालेगांव येथील ए. व्ही. स्कूलमधील विद्यार्थ्यांनीं हें सुंदर मासिक चालविलें असून त्याचा दिवाळीचा खास अंक प्रसिद्ध झाला आहे. अंकांतील सर्व लेखांत वैचित्र्य असून ते सर्व अंक गोष्टी, कविता व चित्रें यांनीं उत्तम सजविला आहे. रा. वर्टी, गोखले, काशीकर वगैरे विद्यार्थ्यांचे लेख सरस असून कांहीं कविताही चांगल्या साधल्या आहेत. संपादक रा. वर्टी यांचें आम्हीं हा अंक काढल्याबद्दल अभिनंदन करतों. चिरायु होवो.

इतर पुस्तकांवर व नियतकालिकांवर अभिप्राय सवडीप्रमाणें.

मिळणार. बोला आतां, आहे कोणाचा तोटा ? मी तर म्हणतो प्रत्येक मनुष्यानं आणि त्यांतल्या त्यांत उधळ्या माणसानं तर हटकून इन्शुरन्स करावं. अहो,असं बघा.या उधळ्या माणसानीं वाटेल तशी उधळपट्टी केली तर त्यांच्या पाठून त्यांच्या बायका काय करणार ? मनुष्यानं नेहमीं दूरदृष्टीनें वागलं पाहिजे असं आपलं तर बोवा अगदीं प्रामाणिक मत आहे. तात्पर्य काय, कीं,कोणाचं मरण त्याच्या हातीं नाहीं आणि हेंच सत्य नेहमीं मनांत बाळगन आपण जर वागलों तर लोक आपल्या दूरदृष्टीची वाखाणणीच करतील. काय समजलेत ? नाहीं, तुम्हांला सांगतों आहे तें पटलं आहे कीं नाहीं, सांगा. माझं तर अगदीं ठाम मत आहे कीं विमा उतरत नाहीं तो मूर्खांतला मूर्ख. अहो, असं बघा जो स्वतःपाठी बायकांचं पोट भरण्यासाठीं कांहींच तरतुद करून ठेवित नाहीं त्याला शहाणा तरी कुठल्या शहाण्यानं म्हणावं ? आज काल मुंबईंत पैसा उधळणारे काय थोडे थोडके रंगेल बापके बेटे आहेत ? पैसा आहे, उधळताहेत ! पण पुढें ? पुढें काय ? आहे कां कांहीं आशेला जागा ? मी म्हणतों या उधळ्या माणसानीं तर मुद्दाम विमा उतरावा. यानं तरी त्यांच्या उधळ्या स्वभावावर 'चेक' बसेल. प्रिमियम भरलें पाहिजे म्हणून तरी तो बाकीची थोडथोडी चैन कमी करील. आणि अशानें त्याचा स्वभाव सुधरेल. पटतं कीं नाहीं तुम्हांला ? ”

“ पण मी असं म्हणतो, विम्याचा पहिला हप्ता भरल्यावर मरणंच जास्त फायदेशीर आहे. कारण सर्व पैसे भरले नसतांना सुद्धां आपणांला एवढे पैसे मिळणार. तितक्या मुदतीपर्यंत जिवंत राहिल्यावर काय, फक्त वरचं व्याजच मिळणार. तें आम्हांला इतर बँकेंत सुद्धां मिळतं.इन्शुरन्सचा जास्त फायदा म्हणजे पहिला हप्ता भरण्याबरोबर मरणं हा होय. खरं कीं नाहीं ? ” त्याचें चऱ्हाट ऐकत बसण्याचा कंटाळा असल्यामुळें मी अगदीं गंभीर श्रोत्यासारखा चेहरा करून त्याला उगीच कांहीं तरी प्रश्न विचारला. पण नंतर मात्र मला तसा प्रश्न विचारण्याची कुठली अवदशा आठवली असें झालें. कारण त्यानें अर्धीअधीक जळलेली सिगारेट टेबलावर तशीच जळती ठेऊन दिली आणि आखाडयांत उतरणाऱ्या मल्लासारखीं ऐट आणून कोटाच्या बाह्या वर करीत तो म्हणाला,

“ ठीक प्रश्न विचारलात. आतां तुम्हांला त्याचं उत्तर देतों. माझ्या ओळखीचाच एक मनुष्य आहे. त्यानं आपल्या बायकोच्या नांवानं विमा उतरला होता. त्याची मुदत एक, दोन महिन्यापूर्वी भरली. आणि त्याला व्याजासकट सगळी रक्कम मिळाली. मला तो भेटला तेव्हां म्हणायला लागला कीं आम्हांला विम्यांत फारसा फायदा झाला नाहीं हो ! एवढे पैसे काय, आम्हांला बँकेनं सुद्धां दिले असते. आतां या मूर्खाला काय म्हणावं बोला ! तो म्हणायला लागला बायको लवकर मेली असती तर फुकटची 'इन्शुरन्स' केलेल्या रकमेइतकी रक्कम मिळाली असती. पण मी म्हटलं, ' मूर्खा, तूं बायकोला अधिक किंमत

देतोस कीं पैशाला अधिक देतोस ? बायको मध्येंच मेली असती तर तुला 'इन्शुरन्स'चे पैसे न भरतां सर्व रक्कम मिळाली असती खरी. पण त्या पैशासाठीं तूं बायको मेली असती तर बरं झालं असतं म्हणतोस ? म्हणजे आहे काय हें ! जास्ती फायद्यासाठीं असली वाईट आशा करायची, मिस्टर ? तुम्हांला हें पटलं कां हो ! सगळी रक्कम आणि वरचं व्याज मिळालं कीं नाहीं ? शिवाय बायकोहि सुरक्षित आहे. विमा उतरला नसता तर का त्यानं इतकं सेव्हिंग केलं असतं असं तुम्हांला वाटतं होय ? नांव काढूं नका त्याचं ! तात्पर्य काय कीं, इन्शुरन्स हें केव्हांहि फायदेशिर आहे. लवकर मेलांत तरी सगळी रक्कम तुमच्या बायकोला मिळणार; मुद्दल संपेपर्यंत जिवंत राहलांत तरी रक्कम आणि वरचं व्याज मिळणार ! म्हणून सांगायचं तात्पर्य इतकंच कीं त्यापासून कोणाचा कसलाच तोटा नाहीं ! विमा उतरणं हें शहाणपणाचं आणि दूरदृष्टीचं लक्षण आहे. काय समजलेत ? पटलं कीं नाहीं तुम्हांला मी म्हणतों तें ? "

त्याच्या 'काय समजलेत' आणि 'तात्पर्य काय कीं' यानें मी अगदीं कंटाळून गेलों. आणि स्तब्ध बसून त्याच्या प्रश्नाला कांहींच उत्तर न देतां त्याला वाटेल तसें तोंड दुखेपर्यंत बोलूं द्यावें असें मी ठरवीत होतों. पण तें सुद्धां एका अर्थी मला पटेना. हीं माणसें वाटेल तितकी बोलत रहातील, त्याचा त्यानां संवयीमुळें कधींच कंटाळा येत नाहीं कीं दम कोंडून तीं मरत नाहींत. पण अशा वेळीं ऐकणाऱ्याची मात्र पुरी कंबक्ती भरते. त्यानां लागेलसें उत्तर देऊन अगर त्यांचा अपमान होण्यासारखें कांहीं करून त्यानां घालवून देणें हें 'एटिकेट' संमत नव्हतें. तें रानटीपणाचें द्योतक झालें असतें. अशीं अनेक संकटें कित्येक शिष्ट माणसावर येत असून केवळ 'एटिकेट्स्'ला बाध येऊं नये म्हणून तीं त्यानां मकाटयानें सहन करावी लागतात. कित्येक बिनओळखीचीं माणसें घरच्याप्रमाणें वागून चार आठ दिवस राहून जातात; पण यजमानानां आपण कोण, कुठचे, काय वगैरे विचारणेंच 'एटिकेटस्'च्या आड येते; कारण त्या पाहुण्याच्या अगदीं थेट 'आं'तापर्यंत होणाऱ्या मोकळ्या बोलण्यानें तो कदाचित् आपल्या ओळखीचा मनुष्य असावा अशी यजमानांची फसगत होते.

मग विमा कंपनीचे एजंट म्हणजे काय ? अनोळखी ओळखीच्या भरभक्कम आधारावर गंभीरपणाने 'जिवा भावाच्या' गोष्टी सांगणारीं उपकारी माणसें !

मी बराच वेळ स्तब्ध रहाणेंहि अनिष्ट होतें. कारण पुन्हां त्यानें एकदां चर्चाट वळवलें, म्हणजे त्याला खंड पाडणं अशक्यच होतें. म्हणून मी कांहींतरी बोलणार इतक्यांत त्यानें पंख्यानें वारा घेतांघेतांच म्हटलें,

" तुम्हांला आमच्या कंपनीबद्दल कांहीं अविश्वास उत्पन्न झाला असेल तर तसं सांगा. हो, असं असूं शकेल कदाचित्. गांव आहे तिथं म्हारवडा हा असायचाच. ज्यांना

आमचं बरं बघवत नाहीं तें आमच्या कंपनीबद्दल वाटेल त्या अफवा उठवणारच. ही जगाची रीतच आहे. आतां तुम्हींच पहा. एखादा डॉक्टर चांगले खोऱ्याने पैसे ओढतो आहे. त्याची ती श्रीमंत स्थिति पाहून सकाळीं आठ वाजल्यापासून रात्रीं ८ वाजेपर्यंत 'पेशंट्स्'ची वाट पाहून निराश झालेला दुसरा एखादा कमनशिबी डॉक्टर त्याच्याबद्दल नसत्या कंड्या पिकवणारच आणि दुर्दैवानें त्याच्या हातून खरोखरीच एखादी 'केस' गमावली तर मग तो दुसरा डॉक्टर मोठमोठ्यानें शंख करून जगाला ती बातमी कळवील. पटतं कीं नाहीं तुम्हांला हें ? बोला. अहो ही जगाची रीतच आहे. एखाद्याचे गुण कोणी पहाणार नाहीं. पण त्याच्यांत काडीइतका जरी दुर्गुण दिसला तरी त्याला तिखटमिठ लावून तो चारचौघांना सांगील. एखादा नाणावलेला लेखक एखादें सुंदर नाटक लिहितो आणि तें शेंकडा ९९ लोकांना फार फ़ार आवडलें असेल. पण तो शंभरावा त्यांतला अगदीं साधासुधा, कवडी किंमतीचा दोष काढून मारे आरडाओरड करील. अहो, हें जगच असं आहे. कितीही चांगलं करा, एखाद्याला तरी त्यांत कांहींतरी वाईट आढळतंच. जगाची दृष्टीच जेथें अशी विलक्षण झाली आहे तेथें आमच्या कंपनीसारख्या आजकालच्या बलाढ्य आणि श्रीमंत कंपनीबद्दल निरनिराळ्या फसव्या अफवा निघाल्या असल्यास नवल काय ? आमच्या कंपनीच्या वाईटावर कांहीं थोडे थोडकेजण नाहींत. आणि म्हणूनच तुमच्यासारख्या ऐकीव बातम्यांवर बिथरून जाणाऱ्या माणसांचा असा विपरित समज झालेला असतो. काय समजलेत ?"

मी कांहींच प्रश्न विचारला नसता तसें 'धरून चालून' स्वतःच त्याचें उत्तर देण्यासाठीं जी एका पाठून एक त्यानें लागोपाठ उदाहरणें दिलीं त्यानें मी तर अगदीं दिङ्मूढ होऊन गेलों. विमा कंपनीच्या एजंटाची व्याख्या प्रत्यक्ष अशी मला आजच कळली. पण मला त्याच्याशीं फार वेळ हुज्जत घालण्याची इच्छा नव्हती. कुठल्या तरी रीतीनें त्याला वाटेला लावून शालीनकडे केव्हां जाईन असें मला झालें. तो येण्यापूर्वी माझ्या मनाची किती काव्यमय स्थिति झाली होती आणि नंतर हा नीरस मनुष्य व्यवहाराच्या तात्विक गोष्टी बोलतांना पाहून मला त्याची चीड आली आणि त्या भरांत मी उठत उठत शक्य तेवढा त्रासिक चेहरा करून म्हटलें,

"मला सारं कांहीं समजतं आहे. पण सध्यां मला 'इन्शुरन्स' करायचं नाहीं. मी या वेळीं जरा कामांत आहे.दुसऱ्या एखाद्या वेळीं या." मी उठून कोट चढवला आणि केसा-वरून फणी फिरवून टोपी घातली. माझा हा 'रानटीपणा' पाहून तो तोंड वांसून माझ्याकडे आश्चर्यानें पहात पगडी घेऊन उठला. मीं त्याच्याकडे पाहिल्या न पाहिल्यासारखें केलें आणि टेबलावरचें कुलुप घेऊन मी बाहेर पडलों. तोहि मकाट्यानें पायांत वहाण घालून

चमत्कारिक नजरेनें माझ्याकडे पहात खोलीबाहेर आला. मी दाराला कुलुप लावून त्याच्याशीं एक शब्दहि न बोलतां बेगुमानपणें जिना उतरून खालीं आलों. त्याला काय वाटलें असेल कोणाला ठाऊक !

× × ×

शालीन वसंताला शिकवीत बसली होती.माझ्या पायाच्या आवाजानें तिनें कोण आले तें पहाण्यासाठीं वर मान केली. मला पहातांच कपाळाला आंठ्या घालण्याचा तिनें प्रयत्न केला. चेहराही कंटाळ्यासारखा केला.पण हें सारें वरपांगी होतें हें माझ्या चटकन् लक्षांत आलें. ती चेहऱ्यावर ओढून ताणून रागावल्याचा आव आणीत होती. पण मी जरासें चेहऱ्यावर हंसू आणल्याबरोबर तिनें खरा प्रकार उघडकीला येऊं नये म्हणून खालीं मान घालून वसंताला शिकवण्याचा आव आणला. पण तिथें तिचें मनच लागेना. मी 'टाईम्स' उघडून तोंडासमोर धरून बसलों होतों, तिकडे ती मधून मधून एका डोळ्यानें पहात होती हें मला टाईम्सच्या आडून दिसत होतें. पण मला पुढच्या गोड प्रसंगाची अपेक्षा असल्यामुळें मीहि तकडे कानाडोळा करीत होतों. वसंत तर केव्हांपासून तिथून उठून माझ्याकडे येण्यासाठीं चुळबुळ करीत होता. शेवटीं शालीननें जवळजवळ कंटाळल्यासारखें दाखवून म्हटलें,

" कायरे, मघांपासून सारखी चुळबुळ करतो आहेस ? अभ्यासाकडे लक्ष लागत नाहीं वाटतं ?उनाडपणा करायला पाहिजे. चल, जा, उद्यां मात्र जास्त वेळ बसलं पाहिजे अभ्यासाला. समजलं का ? "

"होय !" असें म्हणून वसंतानें तिथून उठून माझ्याकडे धांव ठोकली. शालीननें काय पण बेमालुम अभिनय केला ! जसें कांहीं वसंताचें लक्ष्य लागत नाहीं म्हणूनच तिनें अभ्यास आटोपता घेतला होता !

" नाना , कुठें गेला होतां तुम्हीं ? दोन दिवस आले नाहींत ना ? मी तुमच्यावर फार रागावलों आहे. "

" मी बाहेर गांवीं गेलों होतों ?

" कुठें ? "

" ठाण्याला. "

" कशाला ? "

" माझं काम होतं तिकडे ? "

" कसलं ? "

" अरे, तुला काय सांगूं ?— "

" वसंत ! किती बोलतोस रे ! भंडाऊन सोडील एखाद्याला. लहान मुलानं असं विचारूं नये मोठ्या माणसांना, जा घरांत आणि भांड्यांतलं दूध पिऊन खेळायला जा बाहेर

चल. " शालीननें वसंताची तेथून उचलबांगडी करण्यासाठीं छानच युक्ति योजिली होती. त्यान मला प्रश्न विचारल्यापासून जसा कांहीं तिलाच त्रास होत होता. मी शालीनची ही कावेबाजी पक्की ओळखून होतों. हा ' टर्निंग पॉइंट ' आहे हें मी चटकन ओळखलें. वसंत हिरमुसला होऊन घरांत निघून जातांच मी पुन्हा टेबलावरचा टाइम्स उचलून तोंडापुढें धरून वाचनांत मग्न असल्यासारखें केलें. जवळजवळ पांच एक मिनिटें अशींच गेलीं. मला कसेसेंच होऊं लागलें. मला अगदीं धीर धरवेना. मी ' टाइम्स ' बाजूला करून पहाणार होतों; पण तीच वसंतचीं पुस्तकें गोळा करून टेबलावर ठेवण्याच्या मिषानें तेथें आली. वास्तविक त्याच्या पुस्तकाचें पाकीट अगदीं विरुद्ध दिशेला होतें. पण--

तिनें सगळीं पुस्तकें टेबलावर ठेवलीं. पण मी मोठ्या मुष्किलीनें मनावर ताबा ठेऊन ' वाचण्यांत ' अगदीं दंग झालों होतों. माझी हालचाल होत नाहींशी पाहून ती उगीच पुस्तकें आजूबाजूस करून पुन्हां रचूं लागली. मला अगदीं हंसूं येत होतें. पण-पण मी तें मोठ्या प्रयासानें दाबलें. तिची अगदीं चमत्कारिक स्थिति झाली. तिची ही स्थिति माझ्या लक्षांत आली आहे असें तिच्या लक्षांत येतांच ती जराशी ओशाळली आणि अगदीं माझ्या खुर्चीपाठीं येऊन उभी राहिली. मला तर मनांतून आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या; पण यावेळीं हार खाऊन उपयोग नव्हता. माझ्या सबंध शरीराला एकसारखा आनंदाचा कंप सुटत होता. तो इतका सुंदर प्रसंग होता कीं आतां ह्यावेळीं माझ्या डोळ्यासमोर अगदीं नव्या नवाईनें तो खडा आहे.

शालीननें हळूच माझ्या खांद्यावर हात ठेवला. माझें अंग एकदम थरारलें. मला वाटतें त्यावेळीं त्या थरथरीचा तिलाही उमज पडला असेल. तिनें स्पर्श केला असतांनाहि मी कांहींच हालचाल करीत नाहीं असें पाहून तिनें अगदीं कंपित स्वरांत विचारलें,

" राग आला का ? " मी कांहींच उत्तर दिलें नाहीं. उलट, चेहरा जरा त्रासीकच केला.

" इतका माझ्यावर राग कां ? "

" कारण ठाऊक असतांना मुद्दाम तें विचारून खिजवणाऱ्याचा कोणाला राग येणार नाहीं ? " स्वगत पण तिनें तें ऐकावें याच उद्देशानें मी म्हटलें.

" पण मी असं केलं तरी काय ? "

" ज्याचं त्यानं आपल्या मनाशींच विचारावं. "

" खरंच मला ठाऊक नाहीं. "

"नसलं तर आम्हांला सांगण्याची इच्छा नाहीं." मीं रागावल्याचा अभिनय अगदीं बेमालुम वठवीत होतों.

"नसलं तर सांगू नये. पण राग सोडून नीट चार शब्द गोड बोलायचेही नाहींत का ?" मी कांहीं एक उत्तर न देतां अगदीं तोंड दाबून बसलों.

"इतका का माझा अपराध मोठा आहे ?"

"तें त्याचं त्यानं स्वतःच्या मनाशीं ठरवावं."

"हें काय असं ? मला माझा अपराध काय तो ठाऊक नाहीं म्हणून मी एकदां सांगितलं ना ? मग पुन्हा पुन्हा कां वरं असं ? नाहीं तर नये बोलूं. दोन दिवस गेले तेथें हा तिसरा जाईल." असें म्हणून ती फणकऱ्यानें तेथून निघून खिडकीजवळ गेली. पारडें फिरलें हें मी ओळखलें. मी फार ओढून धरलें होतें. आतां स्वतःसच हार खाऊन तिच्याशीं बोलावयाला मलाच गेलें पाहिजे होतें. मी दोन तीन मिनिटें मुष्कीलीनें तशा स्थितींत काढलीं. पण पुढें माझें मन माझ्या कह्यांत राहीना. मी टाइम्स टेबलावर टाकून तिच्याजवळ गेलों. तिनें मला आलेला पाहून मान फिरविली. मी बराच वेळ बाजूला खिडकीबाहेर पहात उभां राहिलों. पण ती आपणाकडे पहातहि नाहींसें पाहून मी हळूच तिच्याजवळ गेलों आणि तिच्या खांद्यावर हात ठेऊन म्हटलें,

"शालीन !"

पण ती कांहींच बोलली नाहीं. तिनें मी बोलण्यासाठीं प्रथम जे जे प्रयत्न केले तेंच मला केले पाहिजेत, हें मला त्यावेळीं कळून चुकलें.

"शालीन ! इकडे पहा तरी. वेडी नाहींतर ! रागावलीस का ? अं ?" पण ती मुकी ती मुकीच ! मात्र पहिल्या कपाळावरच्या आंठ्या वगैरे जाऊन तेथें थोडीशी प्रफुल्लितपणाची छटा मारूं लागली. ती माझ्यापासून दडवण्यासाठीं शालीन किती, किती प्रयत्न करीत होती ! "अगदीं बोलणार नाहींस वाटतं ? पहा बरं, मग मी अगदीं बोलणार नाहीं. अग, मघाशीं केली ती सारी थट्टा ! तें खरंच समजलीस कीं काय तूं ?—हें पहा तू अशीच मुकी राहिलीस तर—तर तें माझ्या मनाला येणार नाहीं. हें काय ग असं ? मं आपण होऊन ना तुझ्याशीं बोलायला येतों आहे ? बघ, मी रागावेन आतां." माझ्या कांहींशा आर्जवाच्या, धमकीच्या वाक्यांनीं तिला हंसूं येत होतें. मीही हंसत हंसत म्हटलें,

"हंसतेस होय ? लबाडे !" असें म्हणून मी तिचा हात माझ्या हातांत घेऊन इतक्या प्रेमावेगानें दाबला कीं, तिच्या हाताचा तळवा अगदीं लाल होऊन गेला.

"केवढ्यानें दाबला हा हात ?"

" फार मोठ्यानं ! " ती एकदम मोठमोठ्यानें हसूं लागली. मलाहि हंसूं लोटलें ! त्या दिवशीं बोलून बोलून आमचीं तोंडें दुखून गेलीं ! परंतु तरीही आम्हाला वाटत होतें कीं आणखी कांहींतरी बोलत रहावें. मी दोन, तीन दिवसांत काय काय केलें तें अगदीं बिनचुक शब्दान्शब्द तिला सांगितलें. विमा कंपनीच्या एजंटाची हकीगत ऐकून ती इतकी हंसूं लागली ! आणखीं आम्हीं किती वेळ तरी बोलणार होतों. पण इतक्यांत अण्णा, शालोनची आई, आत्या आणि प्रभाकर कल्याणहून आलीं; आणि आमचें बोलणें तितकेंच राहिलें. पण त्या दिवशींचा आनंद कांहीं अवर्णनीयच होता.

प्रकरण १० वें.

निकाल.

मनुष्याच्या इच्छेशीं ईश्वरी इच्छा संलग्न झाली असती तर कल्पतरूचा हरघडी भासणारा अभाव फारसा जाणवला नसता. प्रत्येक इच्छेच्या निश्वासाबरोबर सिद्धि हात जोडून तयार असतां मनुष्याला कसली उणीव पडणार ? पण परमेश्वराला मनुष्याला रडवून त्याला दुःखाची कठोर जाणीव करून द्यावयाची होती म्हणून त्याच्या इच्छेंत आणि साफल्यांत त्यानें आपला सबळ बाहू उभा केला आहे. बोलता शब्द कार्यसिद्धि घडवून आणता तर कमजोर मानवजात आपलें वर्चस्व झुगारून देईल अशीहि परमेश्वराला शंका आली असेल. आणि म्हणूनच त्यानें मनुष्याला अखेरपर्यंत सुखसमाधानानें राहूं न देण्याचा कृतघ्नपणा केला असेल.

मी आमच्या परीक्षेचा ' रिझल्ट ' पहायला मुळींच जाऊं नये म्हणत होतों. कारण त्यांत पहाण्यासारखें काय होतें ? मी पास होणार हें ठरलेलेंच होतें. बढाई नव्हे पण मी खरोखरीच वर्गांत ' ब्राइट स्टूडंट ' (हुशार मुलगा) म्हणून गणला गेलों होतों. एरव्ही मी दिवसांतून एखादा तास तरी अभ्यास करीत असें कीं नाहीं तें माझें मलाच ठाऊक ! माझ्या मित्रांना सुद्धां याचें आश्चर्य वाटे. मी त्यांच्या मानानें कांहींच अभ्यास न करतां पास होतों कसा हें कोडें त्यांना केव्हांच सुटत नव्हतें. अगदीं भर परीक्षेच्या दिवशींसुद्धां मी पेपर देऊन रोज संध्याकाळीं तीन, साडे तीन तास चौपाटीवर नाहीं तर इतर ठिकाणीं कोठेंतरी भटकत असें. शाळेंत असतांना बाबा, आई त्यावेळीं मला कितीतरी उपदेश करीत; पण इंग्रजी पहिली दुसरीपासून तों आतां ' इंटर ' पर्यंत मला त्यांचा उपदेश कधींच पटला नव्हता. माझे इतर कांहीं वर्गबंधू परीक्षेच्या ' हंगामांत ' प्रत्येक क्षण मोलाचा मानून पुस्तकांत अहोरात्र डोकें खुपसून बसले असतां निकालाच्या दिवशीं

त्यांचीं तोंडें अपयशानें गळून गेलेलीं दिसत आणि म्हणूनच माझा कर्तृत्वशक्तीवरील विश्वास उडून मी पक्का fatalist (दैववादी) बनून गेलों होतों. माझ्यापेक्षां कितीतरी पट त्यांचा अभ्यास होत असून त्यांच्या परिश्रमाचें कधींच चीज होत नव्हतें आणि मी परीक्षेच्या ऐनभरांत तासाभरानें पुस्तक टेबलावर भिरकटून कोट टोपी चढवून बाहेर भटकायला जात होतों तों परीक्षेंत बिनचूक पास होत असे. मग माझा कर्तृत्वशक्तीपेक्षां नशिबावरच जास्त हवाला कां असूं नये ? भित्यापाठीं ब्रह्मराक्षस लागतो आणि बेफिकीरपणानें वागलें म्हणजे यश मिळतें हें तत्त्व मला तरी निदान शब्दान्शब्द पटलें होतें. आणि म्हणूनच मी बेफिकीरपणानें ' रिझल्ट ' पहावयाला जाऊं नये असें म्हणत होतों. पण कित्येक गोष्टींबद्दल आतुर उत्कंठा आणि कारणाशिवाय हुरहुर लागत असते. आदल्या दिवशींच मला शालीननें विचारलें होतें,

" उद्यां रिझल्ट पहायला जाणार ना ? "

मी म्हटलें, " काय पहायचं त्यांत ? "

" काय म्हणजे ? पास कीं नापास हें. "

" मग त्यांत तंगडया तोडून युनिव्हर्सिटीपर्यंत पहायला कशाला गेलें पाहिजे ? पास होणार हें ठरलेलेंच आहे. "

" मनुष्याला इतका आत्मविश्वास असलेला वाईट नाहीं. पण मनुष्याचं दैव त्याच्या हातीं कांहीं नसतं. " शालीन पदराचें टोंक आपल्या बोटाला गुंडाळीत म्हणाली.

" आणि म्हणूनच मी म्हटलं पास होईन म्हणून. "

" म्हणजे ?"

" म्हणजे काय ? मी दैवावर विसंबून रहाणारा मनुष्य आहे म्हणूनच मी पास होईन असं मला खात्रीनं वाटतं आहे आणि मी इतका बेफिकीर आहे. परिश्रमाच्या चढाओढीनें पहायचं असेल तर दिवसांतून एखाददुसरा तास मी अभ्यास करीत असेन नसेन "

शालीनला माझें म्हणणें अक्षरशः पटलें होतें. आणि माझें मला तर पटलेंच होतें. तरी जसजसा घडयाळाचा कांटा बारावर येऊं लागला तसतसा माझा न जाण्याचा निश्चय डळमळूं लागला. यशाबद्दल खात्री असली तरी मनुष्याचें मन विरुद्ध दिशेकडेच ओढ घेत असतें आणि बाराचे ठोके पडतांच तर मी अधीरतेनें कपडे चढवले आणि दाराला कुलूप ठोकून ट्रॅम पकडली. त्याच ट्रॅममध्यें करमरकरहि बसला होता. मी त्याला पहातांच त्याच्याच 'सीट'वर त्याच्या शेजारीं जाऊन बसलों. करमरकर जरी फार हुशार नव्हता तरी त्याला पास होण्यास कांहींच हरकत नव्हती. पण तो इतक्या तऱ्हेवाईक स्वभावाचा

मनुष्य होता कीं त्यानें पेपर जरी कितीही चांगला लिहिलेला असला तरी चेहऱ्यावर काय किंवा बोलण्यांत काय, तो तसें कधींहि दाखवणार नाहीं ! नेहमीं कुरकुर करीत असायचा. त्या वेळीं सुद्धां त्याची कुरकुर चाललीच होती. मी ' हुं हुं ' म्हणत होतों एवढेंच. एरव्हीं त्याच्या बोलण्याकडे माझें फारसें लक्ष नव्हतें.

काळ्या घोड्याकडे ट्रॅम थांबतांच मी आणि करमरकर उतरलों. युनिव्हर्सिटीत बरीच गर्दी होती. बऱ्याच जणांचीं तोंडें अगदीं मलूल होऊन गेलीं होतीं. कधीं नाहीं पण त्यावेळीं मात्र माझ्या मनांत चलबिचल होऊं लागली. माझा नेहमीचा आनंदी आणि बेपर्वाई स्वभाव नाहींसा होऊन मी जसजसा जवळ जाऊं लागलों तसतशी माझ्या छातींत एकाएकीं धडधड सुरूं झाली. आजच मला असें कां होतें आहे हें मला कळेना. मी नापास तर—

नापास होण्याचा विचार मी झटकन् मानेला हिसडा देऊन विसरून टाकण्याचा प्रयत्न केला आणि पायऱ्या चढून ' रिझल्ट शीट ' लावलेल्या ठिकाणीं गेलों. तिकडे जरा विशेष गर्दी होती. म्हणून मी जरा गर्दी कमी होईपर्यंत बाजूला उभा राहिलों. इतक्यांत परांजपे त्या गर्दीतून बाहेर आला. त्याचें तोंड प्रफुल्लित दिसत होतें.

" पास !"

" यस्. तुझा नंबर काय ? "

" चौदा. "

"चौदा ? अर्र् गेलास वाटतं ! एक, पांच आणि एकदम सतरा आहे. बघूं हं !"

माझ्या काळजांत धस् झालें. तरी कदाचित् त्याची नजरचूक झाली असेल म्हणून मीहि गर्दीतून वाट काढून आंत गेलों. एक, पांच आणि एकदम सतरा ! परांजपेनें सांगितलें तेंच खरें होतें. त्या दिवशीं एकसारखें माझें मन अस्वस्थ कां झालें होतें तें माझ्या लक्षांत आलें. पाऊस यावयाचा असला म्हणजे प्रथम आकाश अभ्राच्छादित होत असतें !

मी खिन्नपणानें बाहेर पडलों. परांजपे माझ्याबरोबर येत होता. पण मी कांहीं तरी कारण सांगून त्याला लाऊन दिलें आणि रस्त्यावर आलों. मला काय होत होतें तेंच मला कळत नव्हतें. प्रत्येक पाऊल पुढें पडत होतें आणि मी त्याच्या पाठून जात होतों एवढेंच. आज इतक्या वर्षांत हें पहिलेंच अपयश होतें म्हणूनच त्यावेळीं माझी अशी चमत्कारिक स्थिति झाली होती. पास-नापास होण्याबद्दल ओझरती शंका येऊन मन दुबळें झालें म्हणूनच दैवानें डावी दिली असें, मी त्यावेळीं शुद्धीवर असतों तर मला वाटलें असतें. पण त्यावेळीं मला कसलाच विचार सुचत नव्हता. माझें मन अगदीं विचारशून्य असून सुद्धां पुन्हां याच्यावर नव्हतें.

मला त्यावेळीं कांहीं एक सुचत नव्हतें अगर एखादा विचार सुचण्याइतकें मनाला मुळींच स्वास्थ्य नव्हतें. त्यावेळीं मी एक चालती बोलती पण निर्जीव बाहुलीच बनून गेलों होतों. माझ्या मनांत कसलेच विचार येत नसतां माझी एखाद्या गंभीर विचारमग्न मनुष्यासारखी स्थिति झाली होती. पाठून येणारी एक व्हिक्टोरिया तर माझ्या अंगावरून जाणार होती. गाडीवाल्यानें केवढ्या मोठ्यानें ओरडून मला दूर सरण्याला सांगितलें असेल. पण माझे कान इतके बधिर झाले होते कीं त्याचा एकहि शब्द माझ्या कानापर्यंत येऊन पोंचत नव्हता. अखेर त्यानें मोठ्या मुष्कीलीनें घोडयाची लगाम खेंचून धरली आणि गाडीचा वेग आवरला म्हणूनच मी बचावलों.

फ्लोरा फाउंटन् जवळ येतांच मला कोणीसा हिसडा दिला म्हणून मी मागें वळून पाहिलें तों महेश्वर.

" काय, पास झालांत ? " माझ्या चेहऱ्यावर कसली छटा दिसते हें कळत असतांहि त्यानें मला हें जाणून बाजून माझी चेष्टा करण्यासाठीं विचारिलें हें न कळण्याइतका कांहीं मी दुधखुळा नव्हतों. मी त्याच्या प्रश्नानें अतिशय चिडलों. पण त्याच्याकडे चिडखोर नजरेनें पाहून मी कांहींच उत्तर न देतां जवळच्या ट्रॅममध्यें चढलों. तशा त्या स्थितींतहि महेश्वर स्वतःशीं हंसल्याचें मला ऐकूं आलें.

ट्रॅममध्यें गर्दी होती कीं नव्हती इकडे माझें मुळींच लक्ष्य नव्हतें. एका रिकाम्या बाकावर मी जाऊन बसलों. मी नापास झालों ही खरोखरच आश्चर्य करण्यासारखी गोष्ट होती. मला सगळे पेपर चांगले गेले असतांना मी नापास कसा झालों हेंच मला कळेना. शालिननें आदल्या दिवशीं सहज म्हणून जी शंका प्रदर्शित केली तीच अखेर कारणाशिवाय खरी ठरली. आत्मविश्वास मर्यादेबाहेर गेला होता म्हणून दैवानें मला ही शिक्षा ठोठावली हें मला मुळींच पटत नव्हतें. कसेंही झालें तरी मी नापास झालों होतों हें अगदीं खरें होतें. मी नापास झालों म्हणून बाबा कांहीं मला फारसे रागावणार नव्हते. परंतु एक वेळ त्यांचा राग पुरवला पण माझ्या मनाची टोंचणीच मला असह्य होऊं लागली. बाबा मला हातखर्चासाठीं दरमहा साठ रुपये पाठवीत असत. शिवाय कॉलेजची फीहि पाठवीत असत. मी पास झालों असतों म्हणजे इतक्या पैशाचें चीज झालें असतें. पण एवढे पैसे पाण्यांत गेले याचें मला फार वाईट वाटलें.

× × × ×

" मग पुढं काय ठरवलं आहे ?"

" काय ठरवायचं ? पुन्हां कॉलेजची पायरी चढायची नाहीं हें नक्की ठरलंच ! "

"पण एकदां अपयश आलं म्हणून धीर सोडून--"

मासिकाचा लेखक.

[ले. श्री. विनोदलाल.]

(एका मासिकांत स्वत:चा चुटका छापून आलेल्या लेखकमजकुराचा आपल्या सोबत्यांस उपदेश) "—आर्ट आहे आर्ट. लेखक होणं ही सोळा विद्यांपैकीं एक विद्या आहे बाबा. आणि ती सुद्धां विद्या हस्तगत करणं म्हणजे कांहीं येरा गबाळाचं काम नाहीं. अरे, आजकाल इंग्लंडमध्यें काय माजून राह्यलंय् असं वाटतं तुला ? लेखकाच्या प्रत्येक शब्दाला तिथं गिन्या पडताहेत गिन्या. पण तिकडही झालं तरी मूर्खपणाचाच कारभार ! एकदा आपला क्ष लेखक झाला, आला थोडासा पुढें आणि गाजूं लागलं त्याचं नांव चार चौघांच्या तोंडीं, म्हणून सर्वांनाच वाटतं कीं आपण सुद्धां होऊन टाकावं झालं लेखक. मग काय पोटभरू माणसं आहेतच तयार ! त्यांनीं काढल्या शाळा लेखक बनवायच्या. या दरवाजांतून इसम कोरडचा ठणठणीत डोक्यानं आंत गेला आणि दुसऱ्या दरवाजानं लेखक म्हणून बाहेर आला. हँ,हँ, आहे कीं नाहीं मौज ! (थांबून) कवी काय, लेखक काय, गवई काय, चित्रकार काय, किंवा चोर काय, सर्वच उपजत असावे लागतात. तुमच्या पैकीं पुष्कळांना एव्हांपासूनच वाटायला लागलं असेल सुद्धां, कीं आपण देखील कांहीं तरी पांढऱ्यावर काळं करावं म्हणून; पण तें काळं कदाचित् तोंडालाही लागून जन्माची काळोखी यायची. आधीं वाचनच किती तरी पाहिजे असतं आणि तें सुद्धां इंग्रजी. एक एक ऑथर इंग्रजींतला म्हणजे हें एक एक बडं प्रस्थ आहे. तुमची मराठी मंडळी म्हणजे त्यांच्यासमोर सूर्यापुढं असलेल्या काजव्यासारखी आहे. नाहीं म्हटलीं तरी रोज शें शंभर पुस्तकं आज इंग्रजींत प्रसिद्ध होत आहेंत, आणि तीं सुद्धां पुळचट पांचट नाहींत, कुठं धर्मशास्त्र, कुठं भाषाशास्त्र, कुठं मनुष्यांचा उत्क्रांतिवाद, कुठं सुंदर बोधपर कादंबऱ्या, असलीं विविध विषयांवर लिहिलेलीं विविध पुस्तकं आणि म्हणून बरं ते वाङ्मय एवढं संपन्न समजलं जातं ! मी स्पष्टच विचारतों; तें तुमचे डिकन्स बिकन्स घटकाभर बाजूला राहूंद्या, पण लिंडिंग ऑथर्सपैकीं तुमच्यापैकीं कोणी काय काय वाचलं आहे ? नाहींच माहीत असणार ! मुळीं आमची शिक्षणपद्धतीच सदोष अन् टाकाऊ आहे ना ! फार फार झालं तर तुम्हीं इकडे तिकडे अगणखी एखादं नांव घ्याल. बस्स, पुढं कारभार आटोपला ! माझा चुटकाच पहायचा असला तर त्यांत ट्वेनचा विनोद आहे,डॉईलचा सहजपणा आहे, जेरोमचा मार्मिकपणा आहे आणि चेस्टर्टनची खोंच आहे. आणि शिवाय सर्व चुटका ओरिजिनल आहे. आतां हीं सर्व नांवं म्हणजे Its Latin to you all, चुटक्यांना म्हणजे इंग्रजी वाङ्मयांत आज काय मान आहे ! चुटके नाहींत असं पुस्तक सांपडायचं नाहीं... हंसता मला ? हंसा बापडे, माझा स्वभाव आहे थोडा भडभड्या, म्हणून माहीत असलेलं सगळं तुम्हांला सांगून टाकतो. आज हंसतां अहां, उद्यां तोच तुम्हां सर्वांचा कॅरॅक्टर घेऊन प्रत्येकाला एकाद्या गोष्टींत उभं केलेलं पाहिलंत, कीं मग पळेल सर्वांच्या तोंडचं पाणी. आम्हां मासिकाच्या लेखकांचं मन म्हणजे कॅमेऱ्याचा लेन्स आहे. त्यावर काय उठलेलं असेल अन् काय नाहीं याचा नेम नाहीं. मग मात्र रडूं नका—"

मेंदुचे विकार व डोकें दुखणें यावर.

किं. १-२-०,] **ब्राम्ही तेल** [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा:—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळंत काढा:—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळकडू:—उपजल्यापासून देण्यास योग्य किं. ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायणें वगैरे औषधें तयार आहेत. एक आणा आला असतां रुग्ण पत्रिका, लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचना:—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांचा खप वाढल्यामुळें नक्कल सुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळीं या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयौषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.
दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने.

शर्टची बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोत्याची रु. ५. आंगठी रु. १; सळे जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. २॥; घडाळ्याचा छेडा रु. ३;

केंस काळे करण्याचा साबण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्याच्या बॉक्सला रु. १॥.

इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुडयासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. मुंईाडी,तव गिरगांव, अमृ

३२ वर्षें परीक्षा घेऊन शंका असेल तर नमुना फुकट मागवा. सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें

सुधासिंधु

कफ, खोकला, पटकी, दमा, शूल, संग्रहणी, अतिसार, पोट दुखणें, जुलाब, वांती वगैरे रोगांवर अनुपान शिवाय स्वादिष्ट औषध. किंमत प्रत्येक बाटलीस ८ आणे, पोष्टखर्च १ ते २ पर्यंत ७ आणे.

दद्रुगजकेसरी

गजकर्णाचें औषध

हेंही सरकारांतून रजिष्टर झालेलें औषध आहे. हें कांहीं त्रासाशिवाय २४ तासाच्या आंत आपला गुण दाखविणारें आहे. किंमत ४ आ. पोष्ट खर्च १ ते २ पर्यंत ७ आणे. एकदम १२ बाटल्या घेतल्यास २। रु. पोष्टखर्च माफ.

बालसुधा

मुलांस सर्दी, खोकला, आणि अपचन हें कधींही होऊं देत नाहीं. हें मुलांस बलवान करणारें गोड औषध आहे. किंमत १२ आणे. पोष्टखर्च ७ आणे.

आमची औषधें सर्व औषधें विकणाऱ्याजवळ मिळतात. कदाचित् तेथें न मिळाल्यास आमचे कडेस पत्र पाठवून मागवावें. पूर्ण माहिती करितां मोठा कॅटलॉग फुकट पाठवूं.

पत्ता:— **सुखसंचारक कंपनी, मथुरा.**

आमचा एजंट—**नरोत्तम गिरिधर** आ.कं. शेख मेमन-स्ट्रीट, **मुंबई नं.२**

जाहिरातीचे दर

पान	मुदत	दर
१	१ वर्ष	५ रु. (प्रत्येक वेळीं)
४	,,	३ रु. (,,)
४	,,	२ रु. (,,)

अरुण कार्यालय, २ री भटवाडी, मुंबई ४



घरची श्रीमंति

असली तर कदाचित् कृत्रिम उपायानें दांत बांधून घेतां येतील. पण असल्या भाडोत्री दातांनीं पचनक्रियेला बाध येतो व खऱ्या दातांचें काम त्यांच्या योगानें मुळींच होत नसतें. म्हणूनच वेळींच सावध होऊन आमची "**लालतारा**" टुथ पावडर लाऊन आपले दांत कणखर करा. लहान बा. ५ आणे. मोठी बा. १४ आ.

अमृतांजन (रजिस्टर्ड.)

हें ठणका, कळा, वेदना इत्यादि व्याधींवर अचूक गुणकारी आहे. आज २५ वर्षें यान्च्या एकसारख्या वाढत्या खपावरून याची सहज कल्पना होते. लाखों कुटुंबें आज अमृतांजन वापरीत आहेत.कारण तें सर्व प्रकारच्या वेदना, मुरगुळणें, संधिवात,कफ,सूज आणि अशाच प्रकारच्या पुष्कळ व्याधी निखालस




बऱ्या करितें. ह्मणून ज्यांनी तें अद्याप अनुभवलें नसेल त्यांनीं खात्री करून घ्यावी. किंमत १० आणे.व्ही. पी. खर्च निराळा.

दंतमंजन.

या मजेदार दंतमंजनानें दांत शुभ्र होतात, रक्त वाहणें थांबतें. हिरड्या मजबूत होतात व वास मधर येतो. प्रत्येक ड. कि. २ आणे

सर्व दुकानदारांकडे मिळेल. अगर

अमृतांजन डेपो, १०९ फ्रीयररोड, मुंबई.



किंमत ४ आणे.

जोड अंक.

अरुण कार्यालय,
२ री भटवाडी, मुंबई ४.

वा. व. ट. ख.
२। रुपये.

डॉ. जे. डी. कुळकर्णी यांचीं

जगाविख्यात "निवडक औषधें."

नं. १ **फिवरॉल**–सर्व जातींच्या साध्या-दोषी–विषारी-मुदती–सांथीच्या तापांवर अप्रतिम. किं. रु. १॥-

नं. ५ **मलेरिन**–अखिल हिंदुस्थानांतील पहिलेंच सर्वश्रेष्ठ–अत्यंत सोईस्कर ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. १।-

नं. ६ **मलेरिन नं २**–अल्पमोली पण खात्रीपूर्वक अत्यंत गुणी ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. -।॥-

नं १४ **हिस्टेरिन**–स्त्रियांच्या हिस्टेरिया–उन्माद–गुल्मादिकांवर सर्वोत्कृष्ट. किं. रु. ३

नं. १५ **थॅमिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट–हट्टी–प्राणघातक दम्यावरअमोलिक. किं. रु. ३

नं. १९ **जर्मिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट हट्टी-हाडींमासीं खिळलेल्या उपदंश गर्मीवर. किं. रु. ३

नं. २० **सँटोल**–प्रमेह--परम्यावर; लघवीची आग–तिडिक–जळजळ ५।६ तासांत बंद ! किं. रु. ३॥

नं. ३९ **एलिक्झीर शिलाजित कंपाउंड**–सर्व प्रकारच्या मूत्रदोषादि विकारांवर. किं. रु. ३

नं. ४२ **रास्ना कॉर्डियल**–अर्धांगवायू-पक्षाघात,कटिशूल, संधि– आमवातादिकांवर. किं. रु. ३

नं ४८ **मस्तकशूळावर रामबाण वडया**-असह्य मस्तकशूळ-अर्धशिशी ५ मिनिटांत बंद ! किं रु. -।॥-

नं. ४९ **वीर्योटोन गुटिका**–सर्वांग सुंदर धातुपौष्टिक; रक्त-मांस-मेंदू-बलवर्धक. किं. रु. २॥-

नं. ५० **चैतन्योटोन गुटिका**–यॉहिंबिनयुक्त; मर्दाईवर जगप्रसिद्ध निर्वाणीचा उपाय. किं. रु. ६

नं. ५१ **चैतन्योटोन तेल**–मर्दाईवर तात्कालिक व चिरकालिक बाह्योपचार किं. रु. ५

नं. ५४ **एलिक्झीर ऍन्टी कन्व्हलशन**–लहान मुलांच्या आंकडीवर प्रतिज्ञेचें औषध. किं. रु. २

नं. ७८ **वेदिक पेन बाम**–वातहारक, दुःखशामक, सूजनाशक, झटपट– चिरकालिक गुण. किं. रु. -।॥-

मोठा सचित्र कयाटलाग व नविन वर्षाचें सर्वांगसुंदर कयालेंडर १ आण्याचें तिकिट पाठविल्यास मोफत पाठवूं.

कुळकर्णी ऍण्ड सन्स, मुंबई नं.२.

अमृतधारा.

१ अमृतधारा.

कवि विनोद वैद्यभूषण पं० टाकुरदत्त शर्मा वैद्यकृत जगत्प्रसिद्ध औषधी–हें एकच औषध प्रायः सर्व रोगांवर यथाकाळ सेवनानें किंवा लावण्यानें लागूं पडतें. ज्वर, खोकला, इन्फ्ल्युएन्झा, प्लेग, म्यूमोनिया, कॉलरा, पडसें, अजीर्ण, वात पित्तादि शरीरिक व सर्प, विंचु आदि विषारी जंतूंच्या दंशावर, तसेंच डोकें, कान,नाक, दांत, पोट दुखणें व जखम वगैरे सर्व प्रकारच्या व्याधींना तात्काळ दूर करितो. सविस्तर वर्णन 'अमृत' ह्या पुस्तकांत दिलेलें असून तें मोफत पाठविलें जातें. मोठी बाटली किं० २।। लहान बाटली किं० १। रु० नमूना -।।- आणे.

'अमृतधारा'च्या मिश्रणानें साबु मलम व गोळ्या [गोड] तयार केलीं आहेत

२ अमृतधारा मलम.

सर्वप्रकारच्या त्वचेच्या रोगांवर केवळ अद्वितीय औषधी, कोणत्याही प्रकारची जखम, व्रण, ठेंच, फुटकुळी, दरद, खरुज, खरज्वा कडुफोड, हातपाय फुटणें गरमी, पर्मा तसेंच मुळव्याधीचे, विषारी जंतूंचे दंश, आग होणें, उष्णोदक किंवा तेजाब सारख्या द्रव्यानें पोळणें, भाजणें वगैरेवर हें मलम लावलें असतां तात्काळ गुण येतो. मोठमोठ्या जखमा देखील ह्या उपचारानें इतक्या त्वरित भरूं लागतात कीं त्यामुळें बडेबडे डॉक्टर चकित होत असतात. हें मलम चोळून लावलें असतां स्नायूंचें दुखणें वगैरे नाहींसें होतें. तात्पर्य अनेक प्रकारचे गुण देणारें हें अपूर्व मलम आहे. डबीची किंमत १ रु०

३ अमृतधारा साबू.

हा साबू तर केवळ अद्वितीय आहे. कारण रोज वापरण्याला तर तो उत्तम आहेच आहे. पण त्वचारोगांवरही गुणकारी आहे. पित्त, खरूज, गजकर्ण, खरज्वा, पुरळ, कंड, वगैरे नाबूद होतात. मुरकुडादि डांस, चिलटें यांच्या दंशावर व मुखावरील काळे ठिपके यांच्यावर गुणकारी ठरतो व मळ वगैरे साफ करण्यांत इतर साबूपेक्षां अधिक फायदाकारक आहे. शिवाय सुवासही मोहक आहे. वडी किंमत ५ आणे, बॉक्स किंमत १४ आणे.

४ अमृतधारा गोड गोळ्या.

कित्येकांना–विशेषतः स्त्रियांना औषध खाणें कठीण वाटतें; मुलांना तर औषधांचा मनस्वी कंटाळा असतो. ही गोष्ट लक्षांत घेऊन ह्या गोड गोळ्या तयार करण्यांत आल्या आहेत. ह्यामुळें कोणीही त्याचें आनंदानें सेवन करतो. कोणत्याही प्रकारच्या विलायती गोळ्यांपेक्षां ह्या अधिक गुणकारी आहेत.

अर्भकांस शूळ, दस्त, अजीर्ण, ज्वर, खोकला, फांसळीचा रोग आदि रोगांवर ह्या गोळ्या दिल्या जातात. १०० गोळ्यांची किंमत केवळ ४ आणे.

सविस्तर माहितीकरितां 'अमृत' पुस्तक मोफत मागवावें.

मॅनेजर:—अमृतधारा–औषधालय, अमृतधाराभवन, अमृतधारा-रोड
अमृतधारा डाकखाना, लाहोर.

पत्र किंवा तार पाठविणें असल्यास फक्त एवढा पत्ता पुरे आहे– -

" अमृतधारा, ९७ लाहोर. "

अनुक्रमणिका.

१	**निशा-वैभव** - (कु. सुमतीबाई दडकर)	...	१
२	**दिरंगाईचें रडगाणें**—(संपादकीय)...	...	२
३	**समेट**—(संपूर्ण गोष्ट) श्री. मो. ग. रांगणेकर	...	३
४	**खुडलेलीं फुलें**	...	१३
५	**मुलींचा संसार**—...	...	१५
६	**मुलांची मौज**	...	१९
७	**कालस्वभाव**—(सं. गोष्ट) वि. य. देसाई	...	२९
८	**समीरण**—' नक्षत्र '	...	३३
९	**बा विंध्यपर्वता !** - श्री. घ. शास्त्री	...	३५
१०	**काव्य आणि व्यवहार**—' मंगळमूर्ति '	...	३७
११	**क्षणभंगुर**—(चालू कादंबरी) ...	...	७७

अहो ! बेपत्ता झा—ले !

नाहीं हो ! पत्ता बदलला

लिंग्रस ब्रदर्स,

गोवर्धनदास बिल्डिंग, पोर्च्युगीज चर्च, गिरगांव—मुंबई

या ठिकाणीं गेले..


कडकी व शक्तीवर ४२ वनस्पतींचा गोड



अशक्त मुलें, स्त्रिया व पुरुषांना शरीर धष्टपुष्ट आणि सशक्त होण्यास हा काढा वापरा. किं १। रु.


पर्ल आणि कंपनी,

राणीचा बाग, मुंबई.



सर ग्यॅलेट यांचा पुतळा

—माथेरान



"चार्लोटि लेक"

—माथेरान

अरुण माला.

वर्ष २.] मे–जून १९२६ [अंक ९–१०.

निशा–वैभव

(कवयित्री–कुमारी सुमतीबाई दडकर.)

निशा–देविच्या हाराचीं । मोत्यें सुंदरशीं खाशीं ॥
भूषवितासी गगनाला । जन वदती 'तारे' त्याला ॥ १ ॥

चंद्र[1]कोर ही सुबक असे । कृष्ण–कुंतलीं खुलुनि दिसे ॥
मूद, केवडा कधिं वरती । 'तारा तुटला' जन वदती ॥ २ ॥

हिरक–वलय तें मृदुल करीं । रसिक जनाचें भान हरी ॥
माणिक बैसविलें वरती । 'मंगळ' जन त्याला वदती ॥ ३ ॥

जरिचा शालू शुभ ल्याली । दिव्याची पुतळी हंसली ॥
घर्म–बिंदु भालीं जमले । 'हिम कण' भूवरचे बनले ॥ ४ ॥

गज–गति आक्रमि मार्गाला । उतरे सागरिं स्नानाला ॥
मुक्त बाल रकंधीं रुळती । अग्रांतुनि थेंबे गळती ॥ ५ ॥

सागर–जठरीं स्थिर होती । 'मोत्यें' ऐसें जन वदती ॥
कुंकुम–पट लावी भालीं । 'उषा–देवि' म्हणती आली ॥ ६ ॥

---

१ चंद्राची कोर. हिला 'चंद्रकोर' नांवाचा जुन्या चालीचा दागिना असें कल्पिलें आहे.

दिरंगाईचें रडगाणें !

(संपादकीय)

मे व जूनच्या अंकाला लागलेल्या या अक्षम्य दिरंगाईबद्दल आम्हीं अत्यंत दिलगीर आहों आणि याबद्दल आम्हांला कोणी दोष दिला तर तो आम्ही अन्याय्य आहे असें मुळींच म्हणणार नाहीं. अंकाला आम्हीं बुद्धिपुरस्सर विलंब कधींतरी लाऊं काय याचा सूज्ञ वाचकांनीं आपल्या मनाशींच विचार करावा. आम्हीं मासिक केवळ पोटार्थी काढलें नाहीं हें आम्हीं वाचकांना वारंवार बजावीत आलों आहों. मासिक सर्वांगसुंदर व सात्विक लोकाभिरुचीला पात्र व्हावें ही आमच्या मनांत प्रबळ इच्छा आहे. या आमच्या लिहिण्यावर सूज्ञ वाचकांनीं सुतराम् संशय घेऊं नये. आमची गेल्या उभ्या वर्षाची व या पाऊण वर्षाची स्वकष्टार्जित कामगिरी पहावी आणि प्रेमळ वाचकांनीं आमच्या परिस्थितीबद्दल संथ मनानें विचार करावा अशी त्यांना सविनय विनंति आहे.

दिरंगाईचें रडगाणें कंटाळवाण्या पाल्हाळानें लिहिण्यापेक्षां थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे आम्हीं ज्या छापखान्यांत मासिक छापतों, त्या छापखान्याच्या इमारतीची दुरुस्ती सुरू व्हावयाला व बरसातीनें 'निष्ठूर' व्हावयाला एकच गांठ पडली आणि अर्धवट मोडक्या स्थितींत असलेल्या इमारतींत पाणीच पाणी होऊन छापखान्यांतील कामगारांचे व छपाईच्या सामानसुमानाचे जबरदस्त हाल झाले; आणि अशा निकृष्ट परिस्थितींत आमचें मासिकच नव्हें तर छापखान्यातर्फे नुकतेंच सुरू झालेलें दैनिक 'लोकहित' पावसाची गैरमर्जी दूर होऊन सारें स्थिरस्थावर होईपर्यंत, चालकांना कांहीं काल बंद ठेवावें लागलें ! 'अरुणा'च्या अंकाला विलंब लागल्याचें कारण त्रोटक स्वरूपांत आम्हांला फक्त अशा रितीनें वाचकांना नमूद करतां येईल.

'अरुणा'चे वर्गणीदार समंजस आहेत, असें वेळोवेळीं आमच्या अंकाला विलंब लागला असतां सुद्धां त्यानीं तिकडे प्रेमळपणानें दुर्लक्ष्य केल्यावरून आमच्या प्रत्ययाला आलें आहे. एरव्हीं वर्गणीदारानां आमच्या स्वत:च्या गैरसोयीशीं काय करावयाचें आहे ? त्यांच्या वर्गणीचें पुरें माप त्यांच्या पदरांत टाकावयाला आम्हीं त्यांचे बांधलेलेच आहों; आणि आम्हीं त्यांत मुळींच कसूर करणार नाहीं, यावरही त्यानीं भरंवसा ठेवावा.

जोड अंक काढण्याचें आम्हीं शक्यतों टाळण्याचा प्रयत्न करीत होतों. पण एक एक अंक काढावा तर जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांत चार अंक निघणें सर्वस्वी अशक्य आहे. आणि ३ऱ्या वर्षाचा आरंभ गेल्या वर्षाप्रमाणें सप्टेंबरपासूनच व्हावयास पाहिजे. अर्थात जोड अंक काढण्याशिवाय आम्हांला दुसरें गत्यंतरच राहिलें नाहीं. क्षमाशील वाचकांनीं व वर्गणीदारांनीं या अपरिहार्य अडचणीकडे जाणतेपणानें काणाडोळा करावा अशी पुन्हां एकदां त्यांना विनयपूर्वक विनंति आहे.

समेट

श्री. मो. ग. रांगणेकर.

प्रिय विमल, मुंबई, ता. १–३–२१

तुझें पत्र गेल्या रविवारींच मिळालें; पण कांहींना कांहीं अडचणीं उद्भवून तुला उत्तर लिहायलाच सांपडलें नाहीं. तूं मनांत म्हणत असशील कीं तुझी बनुताई बसली असेल मुंबईच्या मौजा मारीत ! पण खरंच सांगतें विमल, आम्हीं घरांत दोनच माणसं असलों तरी कामाचा पसारा आटोपतां आटोपत नाहीं.तुला इथला अनुभव आहेच. आतां तूं तिकडे चैनींत रहात असशील ! इकडल्यासारखं नवाला ठोके पडतानां संध्येला ठेवायची घाई नाहीं न् पहांटेला नळाखालीं घागर ठेवण्यासाठीं अर्ध्या झोंपेंतून लगबग उठायची धांदल नाहीं ! दिवसाचे सारे व्यवहार कसे अगदीं सावकाश, आणि चैनीनं चालले असतील ! मोठी भाग्याची बाई तूं ! जर कां 'इकडचं' न् तुझ्या पतिराजांचं भांडण झालं नसतं तर तुला तिकडे जायला कुठें मिळणार होतं, न् शांत चित्तानं दिवसाच्या कामाचा उरक कसा करायला मिळता न् मला हें पत्र लिहायचा तरी प्रसंग कां येता ? शेजारीं होतीस तेव्हां कसा आनंदानं वेळ जात होता पण ! कीनई मला त्याची नेहमीं नेहमीं आठवण होते न् वाटतं कीं हें मेलं भांडण कुठून उपस्थित झालं ! एखाद्या अफाट सागरांत एखादा नावाडी शांत चित्तानं आपली होडी वल्हवतानां मध्येंच वावटळ उठून ती होडी उलटावी तस्सं झालंय् तुझ्यामाझ्यांत ! उपमा चुकली का ग ही ? हंसूं नकोस बाई ! तूं पडलीस बडी लेखिका ! आम्हीं आपली कुठं चार बुकं वाचलीं आहेत, त्या मानानं वेडं वांकडं कांहीं तरी लिहितों झालं ! तुझीं पत्रं कीनई फार सुंदर असतात. मी ती कितीदां तरी त्याचीं पारायणं करीत बसतें. 'इकडनं' तुझी किती तरी प्रशंसा करायला होते आणि मला चिडवून चिडवून अगदीं रडकुंडीला आणायचं होतं. तरी मला तुझ्या सुंदर लिहिण्याचा हेवा वाटत नाहीं हो ! मला तुझं लिहिणं फार आवडतं. खरंच विमल, तुला एखादी युक्ति नाहीं का ग सुचत ? युक्ति म्हणजे अशी कीं—'इकडनं' आणि तुझे पतिराज— म्हणजे हें पहा—त्यांच्यांत भांडण झालंय् ना आणि–छेः बाई ! मला जें कांहीं तुला सांगायचं आहे तें लिहितांच येत नाहीं. शब्दच सुचत नाहीं आणि सुचला तर वाक्य धड सरळ कांहं लिहितां येत नाहीं. सगळा गोंधळ उडतो. बरें तें जाऊं दे ! मला तुला सांगायचं आहे म्हणजे असं कीं, ही जी दोघांत तेढ आली आहे ती तशीच राहिली तर जन्मभर टिकायची

तेव्हां म्हणत होतें तुला एखादी युक्ति नाहीं का सुचत ? 'इकडची' आणलीं तुमच्याकडील दाट मैत्री; न् आतां हें असं झालं तें मला तरी बाई बरं नाहीं वाटत ? कांहीं ना कांहीं करून ही मैत्री परत सांधली पाहिजे. तूं वाचलं आहेस फार, तेव्हां तुला एखादी युक्ति सुचते तर पहा बाई ! 'इकडचा' स्वभाव आहे अंमळ शांत आणि—रागाऊं नकोस—पण तुझें रामराव कीं नाहीं जरा तापट आहेत. तुला नाहीं असं वाटत ? आणि वाटलं तरीं तूं थोडीच कबूल करायचीस ? पण तें कसंही का असेना ! तुला एखादी युक्तिबिक्ति आठवली तर मला कळव. एकदां समेट झाला कीं तूं इकडे येशील आणि वेळ तरी जाईल माझा.

कांहीं उणं अधिक लिहिलं तर राग नको धरूं बरं ! पत्राचं उत्तर जरूर पाठव. वाट बघते आहे. 'तुमच्यांनां' नमस्कार सांग.

तुझी,
बनुताई

* * *

प्रिय बनुताई, रत्नागिरी ता. १८-३-२१

तुझं पहिलं पत्र पोंचून आज सतरा अठरा दिवस झाले. मला उत्तर लिहायचं विस्मरण झालं असेल या समजूतीनं तूं पुन्हां स्मरणपत्र पाठविलंस ! पण मीं कांहीं जाणून बुजून विलंब लावला नाहीं. मुंबईला तुला कामापुढें फुरसत मिळत नाहीं म्हणतेस तर इकडे इकडच्या तिकडच्या शेजारपाजारणीं गप्पागोष्टी मारायला येतात आणि त्यांच्या गांवकुटाळकीपुढें मला पत्रच लिहायला सवड सांपडत नाहीं. वरं, त्यांच्या गप्पांत तरी कांहीं तथ्य अगर सरळ साधेपणा असतो का ! सगळ्या एकजात चहाडखोर. एकीदोघी बऱ्या आहेत. पण त्या भडभडया स्वभावाच्या ! एकदां बोलूं लागल्या म्हणजे बोलणं चालूं ठेवायला त्यांनां विषयहि लागत नाहीं. मला बाई याचा कंटाळा आला आहे. त्यापेक्षां मुंबईचं गडबडीचं आणि आंखलेलं आयुष्य तरी बरं ! एकूण काय, तर तूं न मीं दोघीहि 'उद्योगी'च ! तुला कामामुळं पत्र लिहायला फुरसत सांपडत नाहीं न् मला रिकामपणामुळं सवड मिळत नाहीं.

तूं आपल्या पहिल्या पत्रांत जें 'इकडच्या' स्वभावाबद्दल लिहिलंस त्याच्यामुळें मी रागावलें न् पत्र लिहिलं नाहीं, असा तुझा समज झालेला दिसतो. पण तो साफ चुकीचा आहे. त्यांच्या स्वभावाची मला का ओळख नाहीं ? आणि असतांना तूं लिहिलेल्या खऱ्या गोष्टीबद्दल मी राग कां धरीन ? पतीच्या अंगीं एखादा अवगुण असतांना, तो दुसऱ्या कोणी उघडपणानें बोलून दाखवला तर वेडेपणानें तिकडे डोळेझांक करून सांगणाऱ्यावर संतापावें कां ? पति झाला म्हणून त्याच्या ठायीं इतकी अंधभक्ति काय कामाची ? ही मुळीं पतिव्रतेची व्याख्याच नव्हें ! आपल्या

पंतीच्या अंगचा एखादा दोष कोणी दाखवला तर तिला वाईट वाटणं साहजिक आहे; पण तेवढ्यासाठीं आततायीपणानें तिच्यावर चिडावं हें कांहीं न्याय्य नाहीं. मनुष्य सर्वगुणसंपन्न कसा असेल ? मी म्हणतें तुझ्या पतिराजांचा शांत स्वभाव हाहि एक दुर्गुण आहे. संभाषणांत एखादा वादाचा मुद्दा आला, आणि एक पक्ष जोराजोरानें शिरा ताणून बोलूं लागला म्हणजे प्रतिपक्षानं अगदीं शांत बसणें हें बावगं नसतं. कारण अशामुळें भांडणाऱ्या पक्षाचा संताप वाढत जातो आणि अखेर त्याचं अत्यंत अनिष्ट निष्पत्तींत पर्यवसान होतं. तेंच आपण प्रतिपक्षाच्या समजूतीसाठीं स्पष्टपणानें आणि मुद्दा धरून बोलूं लागलों म्हणजे भांडण मिटण्याचा बराच संभव असतो. नाहीं तर मूळ मुद्दा रहातो बाजूला आणि संतापलेला पक्ष मुद्दा सोडून वाटेल तसा कोठल्या कोठें भरमसाट वहात जातो.

इतकं मीं लिहिलं एवढ्याचसाठीं कीं तुला असं वाटूं नये कीं ' इकडे ' तापट म्हटल्याबद्दल मी रागावलें आहे ! खरी गोष्ट सांगितल्याबद्दल रागावणंच असमंजसपणाचं आहे आणि तुझ्यासारख्या जिवाभावाच्या मैत्रीणीशीं मी रागावणं शक्य तरी आहे का ? ' इकडचा ' स्वभाव कांहींसा तापट आंहे हें मलाहि कबूल आहे. पण दोघां मित्रांचं सम्मीलन कसं करावं हा अवघड प्रश्न आहे. नाहीं म्हणायला मला एक युक्ति सुचते आहे. पण ती खात्रीनं सफळ होईल याबद्दल मला भरंवसा नाहीं.

पुण्याला आपल्या वर्गातली यमू सरवटे—आपली मैत्रीण आहे ती तुला ठाऊकच आहे. तिचं परवांच मला पत्र आलं आहे. मीहि तिला वारंवार पत्रं पाठवित असतें. तिच्या वडिलांची–नानासाहेबांची न् ' इकडची ' चांगली ओळख आहे आणि 'इकडच्या'-बरोबर तुझे यजमानहि नेहमीं नेहमीं त्यांच्याकडे मागें जात तें तुला आठवतच असेल. तेव्हां मला एक युक्ति सुचली आहे. यमूचं अगदीं नानासाहेबांसारखं हस्ताक्षर आहे. कारण त्यांची 'इकडे' येणारीं पत्रं मी पाहिलीं आहेत. तेव्हां तिला एक पत्र 'इकडे' आणि दुसरं तुझ्या यजमानांच्या नांवावर नानासाहेबांच्या सहीनें पाठवायला सांगते. त्यांत दोघानांहि कुठल्या तरी महत्वाच्या कार्यासाठीं नानासाहेबानीं बोलावलं आहे असं कारण मी यमूताईला लिहायला सांगणार. आणि मग दोघेहि तिकडे एका घरांत गेले कीं नानासाहेबांच्या हें भांडण ओघानंच दृष्टोत्पत्तीला येईल आणि ते खांत्रीनं त्यांच्यांत तडजोड करतील. मात्र नानासाहेबानां यांतलें अक्षरहि कळतां कामा नये. अं !

युक्ति बरीच धाडसाची आहे.साधली तर दोघांचं पुन्हां संघटण होईल. पण साधली नाहीं तर–पण वाईटाचा विचारच कां करा आधीं ? भित्यापाठीं ब्रम्हराक्षस लागायचा. आतां हें लांबलेलं पत्र पुरें करतें. पण तुझ्या यजमानांना नानासाहेबांच्या सहीनं यमूचं

पत्र येईलं तेव्हां त्यानां 'आमंत्रण' स्वीकारण्यास भाग पाड. नाहींतर सारंच फिसकटायचं. आतां आणखी कांहीं लिहित नाहीं. कळावें.

तुझी,
विमल

* * * *

पुणें २३-३-२१

रा. रा. विश्वनाथपंत यांस सप्रेम नमस्कार वि. वि.

आज बरेंच दिवसांत आपली भेट अगर पत्र नाहीं. याचें कारण काय तें कळत नाहीं. रा. रामरावांचें पत्रहि फार दिवस आलेलें नाहीं. मला उतारवयामुळें प्रत्यक्ष तिकडे येऊन खुषखबर घेतां आली नाहीं. नाहीं तर मी इतके दिवस तसें केल्याशिवाय राहिलोंच नसतों. असो.

हें पत्र पाठविण्याचें मुख्य कारण हेंच कीं, आमचे भावी जामात नरहरपंत गद्रे यांना लग्नापूर्वी जेवण करण्याचा विचार आहे. आणि तो बेत येत्या शनिवारीं करावयाचें नक्की ठरवलें आहे. अगदीं खाशांतल्या मंडळींना मी पत्रं पाठविलीं आहेत. रामरावांनाहि रत्नागिरीस पत्र पाठविलें आहे. आतां त्यांची प्रकृति कशी काय आहे ? त्यांना मी अवश्य येण्याबद्दल लिहिलें आहे. आपण या विनंतीचा अनादर करूं नये. चारचौघांच्या भेटीगांठी होतील आणि दोन दिवस मौजेंत तरी जातील.

आपल्या येण्याची वाट पहात आहें. कळावें.

आपला,
नानासाहेब

* * *

प्रिय विमल, मुंबई २५-३-२१

काल सकाळीं नानासाहेबांकडून यमूचं (अर्थात नानाहेबांच्या सहीचं) पत्र आलं. त्यांत आपल्या जामातांना जेवण असल्यामुळें ' इकडे ' येण्यास आमंत्रण केलं आहे. यमूनं सबब मात्र छानच शोधून काढली यांत शंका नाहीं. मात्र आज सकाळीं एक नवीनच अडचण उपस्थित झाली आहे.

सकाळीं उशीर झाला तरी उठणं झालं नाहीं म्हणून मी उठवायला गेलें व जागें करण्यासाठीं अंगाला हात लावला. तों काय ? आगीसारखा हाताला चटका बसला. अंग तापानं फणफणून गेलं होतं. एकाएकीं काय झालं तें मला कळेना. रात्रीं झोंपतांना कसलीच कुरकुर नव्हती, पण सकाळीं ही अशी स्थिति पाहून मी घाबरून गेलें. काय

करावं तँच मला सुचेना. मी अगदीं बावरून गेलें. तशा स्थितींत शेजारच्या देशपांडयां-कडे जाऊन त्यांच्या विनूंला डॉक्टरला घेऊन यायला सांगितलं. माझा जीव तर नुसता खालीं वर होत होता. डॉक्टरनां पाहण्यासाठीं आंतून बाहेर अशा माझ्या सतरा खेपा झाल्या असतील. अखेर एकदाचे डॉक्टर आले न् त्यांनीं त्यानां नीट तपासलं. ताप साधाच होता, पण दोनचार दिवस कांहीं तो ओसरणार नाहीं, तेव्हां जरा जपून असावं. विशेष काळजी करण्यासारखं मात्र कांहीं नाहीं असं त्यांनीं सांगितलं. माझा जीव खालीं पडला. मी विनूला परत डॉक्टरबरोबर पाठवून औषध आणविलं. आतां ताप सकाळपेक्षां कांहींसा कमी आहे. स्वारीला आतां झोंप लागली आहे, तेवढयांत तुला पत्र लिहायला बसलें आहे. रामरावांना पत्र मिळालं असेलच आणि ते नक्की जातील असं तुझ्या गेल्या पत्रांत होतं. तर आतां तिकडे गेल्यावर बरीच गडबड होईल असं वाटतें. कारण नानासाहेबांन[1] यांतलं अवाक्षर देखील माहित नसणार आणि एकटे रामराव गेल्यामुळें आपल्याला साधाव-याचं होतं तें साधणं अशक्यच दिसतं. कारण 'इकडून' तर बिछान्यावरून उठवणार नाहीं; आणि उठवलं तरी पुण्याला जाणं अशा स्थितींत शक्यच दिसत नाहीं. तेव्हां पुढें काय होणार तें कांहीं कळत नाहीं; रामराव जाण्यासाठीं निघाले का ? पत्रोत्तर जरूर पाठव; वाट पहाते आहे. कळावें.

तुझी
बनुताई

* * *

प्रिय विमल, पुणें २९-३-२१

अनेक आशिर्वाद.

मी पुण्यास काल संध्याकाळीं येऊन पोहोंचलों. प्रवासाच्या दगदगीमुळें बराचसा त्रास झाला होता; पण रात्रीं शांत व भरपूर झोंप मिळाल्यामुळें आतां बरें वाटत आहे. तूं तिकडे एकटी असल्यामुळें काळजी वाटत आहे. प्रकृतीला जपत असावें व घर सोडून बाहेर कोणीकडे तरी जाण्याचा प्रसंग आला तर शक्य तों तो प्रसंग टाळावा. कारण केव्हां काय प्रसंग येईल सांगवत नाहीं.

अत्यंत आश्चर्याची गोष्ट लिहावयाची म्हणजे मला पहातांच नानासाहेबांना आश्चर्य वाटलें व 'आज इकडे कुठें झुकली स्वारी ?' म्हणून मला त्यांनीं प्रथमच प्रश्न केला. मी कांहीं थबकून उत्तर केलें, "आलों मेजवानी झोडायला दोन दिवस !" माझ्या येण्यानें त्यानां अतिशय आनंद झाला यांत शंका नाहीं. पण तो मी त्यांच्या आमंत्रणाचा स्वीकार केला म्हणून नव्हे; तर आज बऱ्याच दिवसांनीं भेट झाली म्हणून ! कारण आमंत्रण वगैरे

'सब झूट आहे.' मी त्यानां 'जांवईवुवा आले का' म्हणून विचारलें. तों एकदम ते चमकले व त्यांनीं मलाच विचारलें कीं "जांवईवुवा येण्याचें कारण काय मध्येंच?"

त्यांच्या या प्रश्नानें मी थक्कच झालों. मी पुन्हां विश्वनाथ वगैरे कोणाला आमंत्रण केलें आहे किंवा नाहीं याची त्यांच्याकडे विचारपूस केली. पण 'तुम्हांला ही सर्व मंडळी इकडे येणार म्हणून आधीं सांगितलें कुणी?.' असा त्यानींच मला उलट सवाल केला. मी अगदीं बावरूनच गेलों. तरी मला वाटत होतें कीं, नानासाहेब आपल्या स्वभावानुसार माझी थट्टाच करताहेत. म्हणून हंसतहंसत मी माझ्या खिशांतलें पत्र काढून त्यानां दाखवलें. पत्र वाचून ते माझ्यापेक्षांहि विस्मयचकित झाले. हा कसा घोंटाळा झाला तो त्यानांहि कळेना आणि मलाहि कळेना. ही कोणी तरी चेष्टा केली आहे असें त्यानीं मला निक्षून सांगितलें. आणि अगदीं तुला खरें खरें सांगतों विमल, ही थट्टा तुझ्या बनुताईच्या नवऱ्यानें–त्या विश्वनाथानं केली आहे, असं मला खात्रीनें वाटतं आहे. आणखी उठाठेव करायला आहे कोण? रत्नागिरीहून पुण्यासारख्या लांब ठिकाणीं बोलवून नेण्याइतकी क्रूर चेष्टा त्या विश्वनाथांतच संभवते. त्या दिवशीं भांडण झाल्यापासून मी विचार करीत होतों कीं विश्वनाथानं आपला दुष्टपणा दाखवायला अजून सुरवात केली नाहीं कशी? पण त्यानें अखेर आपल्या दुष्ट, पाजी स्वभावाचं दिग्दर्शन केलंच! आतां नानासाहेबांकडेच आलों म्हणून एक वेळ तिकडे काणाडोळा करतां आला, तरी जर एखाद्या परक्या इसमाकडे माझी अशी फजिती झाली असती तर त्याचा माझ्या मनावर केवढा आघात झाला असता?

मी उद्यांच मुंबईस विश्वनाथाकडे जाणार होतों, आणि त्याला खडसून याचा जाब विचारणार होतों. पण नानासाहेब दोन दिवस राहावयास सांगत आहेत व त्याप्रमाणें मी रहाणार आहे. मला तर राहून राहून वाटतें आहे कीं, विश्वनाथाशिवाय मला या बाबतींत कोणालाच जबाबदार धरतां येणार नाहीं. विश्वनाथाच्या विनोदी स्वभावाला यावेळीं ऊत यावयाला दुसरें एक कारण होतें; आणि तें म्हणजे परवांची एप्रीलची १ ली तारीख! मला 'एप्रील फूल' करण्यासाठीं त्यानेंच हा पाजीपणा केला आहे, हें निःसंशय आहे.

ठीक आहे! दोन तीन दिवसांनीं मुंबईस जाऊन सर्व हकीगत पत्रद्वारें तुला कळवीनच. तूर्त आणखी कांहीं नाहीं. कळावें.

तुझा,
रामराव

* * *

रा. रा. **नानासाहेब** यांस मुंबई ३१-३-२१

सा. न. वि. वि. तुमचें येण्याबद्दलचें पत्र चार पांच दिवसापूर्वीच मिळालें. पण एकाएकीं तापानें पछाडल्यामुळें मला जागचें हालणें सुद्धां जड होत आहे. मग आपलें आमंत्रण स्वीकारणें तर सर्वस्वी अशक्यच आहे. आपल्याकडे येण्याचें टाळण्यासाठीं मी तापाची सबब पुढें केली असा आपल्या मनांत कदाचित् संशय येईल; पण मला चाल-ण्याइतकी जरी शक्ति असती तरी मी असल्या सुप्रसंगीं येण्यास कधींच अनमान केला नसता. आपल्या जांवईबापूनांहि बऱ्याच दिवसानीं भेटण्याचा सुयोग आला होता व इतर मित्रांच्याहि फारा दिवसांनीं गांठीभेटीं झाल्या असत्या. पण या आकस्मिक अडच-णीनें मला जागच्या जागींच जखडून टाकलें आहे; आणि असल्या गोड प्रसंगीं मीच तेवढा गैरहजर रहावें याचें मला अत्यंत वाईट वाटत आहे. तरी याबद्दल मी मनःपूर्वक आपली क्षमा मागतो.

येणाऱ्या सर्व मित्रमंडळीस माझा सप्रेम नमस्कार सांगा. अशक्ततेमुळें हात लटलट कांपत आहे आणि मला जास्त कांहीं आतां लिहिवत नाहीं. कळावें.

आपला,

विश्वनाथ

* * *

"Reveal secret immediately on Vishwanath's address. Don't mention my nor Banu's name.

Vimal"

(आम्हीं केलेल्या कारस्थानाबद्दल तूं विश्वनाथपंतांना ताबडतोब पत्र लिहून कळव माझ्या अगर बनूच्या नांवाचा त्यांत उल्लेख करूं नको.—विमल)

* * *

पुणें ३१-३-२१

रा. रा. **विश्वनाथपंत** यांस कृ. सा. न. वि. वि.

एका बाबतींत आपली फसवणुक केल्यामुळें माझ्या मनाला अत्यंत विषाद वाटत आहे. मी आपली आणि रामरावांची फसवणुक केली ती कुठल्याही वाईट हेतूनें नव्हे. तुम्हीं माझ्या प्रिय मैत्रिणीचे पति आणि रामरावहि माझ्या विमलेचे यजमान. तुम्हां दोघांतहि अत्यंत प्रेमळ मित्रत्व वास करीत होतें. पण दैवदुर्विलासानें तुम्हां दोघांत भांडण उपस्थित होऊन जन्माचें वितुष्ट पडलें कीं काय अशी तुमची दोघांची वागणुक दिसली. माझ्या कानावर या गोष्टी येतांच मला त्याबद्दल अत्यंत वाईट वाटलें. कारण

किती झालें तरी बनुताई आणि विमल या मला सख्ख्या बहिणीपेक्षां जास्त प्रिय वाटतात. शाळेंत तर आम्हीं तिघीजणीं अगदीं एका बांकावर बसत असूं. आणि या माझ्या मैत्रिणींचे तुम्ही दोघे यजमान असल्यामुळें तुमच्यांत वैमनस्य उत्पन्न होणं हें पर्यायानें त्यांच्यांतीलच वितुष्ट आहे असें मी समजतें. मला आपल्यामधील या तेढीची गुणगुण लागली आणि त्या दोघींनाहि नकळत मी तुम्हां दोघानांहि आमच्या घरचें आमंत्रण दिलें. हेतु हा कीं, तुम्हीं दोघेजण आमच्याकडे आलां म्हणजे तुम्हां दोघांचीं एकमेकाबद्दलची वागणुक नानासाहेबांच्या–माझ्या वडिलांच्या लक्षांत यावीं व त्यानीं तुमच्यांत समेट घडवून आणावा. पण माझा हा डाव फसला. कारण तुम्हीं न येतां एकटे रामरावच आमच्याकडे आले. नानासाहेबांच्या व माझ्या हस्ताक्षरांत पुष्कळ साम्य असल्यामुळें यांत कांहीं गौप्य असेल असा संशयहि तुम्हांस येणें शक्य नव्हतें.

असो. झालें तें झालें. माझ्या अपराधाची आपण क्षमा करा. पण वाटेल तें करून आपल्या दोघांतलें पूर्वीचें प्रेम पुन्हां सजीव करून आपण दोघांत आलेली अढी दूर सारा अशी माझी आपणाला अत्यंत आग्रहाची विनंति आहे.

आणखी विशेष काय लिहूं ? माझ्या विनंतीप्रमाणें आपण मनावर घेऊन तुम्हां दोघांत सलोखा घडवून आणला असेल तर त्याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर मला व नानासाहेबांना दाखविण्यासाठीं आपण दोघे हातांत हात घालून आमच्या घरीं या.

कळावें. आपली फसगत केल्याबद्दल पुन्हां एकदां आपली क्षमा मागतें.

आपली

यमुना

* * *

प्रिय विमल, मुंबई ३-४-२१

सुटलें बाई एकदांची ! काय घोटाळा होईल न काय नाहीं ही जी मला विवंचना लागली होती ती सारी नाहींशी झाली आतां ! अगदीं आनंदाची बातमी तुला सांगायची म्हणजे दोघांतहि पुन्हां पहिल्यासारखी मैत्री उत्पन्न झाली ! सगळें सांगायचें तर सुरवात कशी करूं याचीच मला पंचाईत पडली आहे. मनांत सगळा गोंधळ माजला आहे आणि सारें सुसंबद्ध रीतीनें कसें लिहायचं तेंच मला कळत नाहीं. तरी प्रयत्न करून पहाते. हो, कारण तूंहि काय काय झालं तें ऐकायला उत्सुक झाली असशील !

म्हणजे असं झालं बघ, विमल, मी तुला 'इकड'च्या आजाराचं लिहिल्यावर नंतर दोन चार दिवस तहत ताप चढत उतरत होता. पांचव्या कीं सहाव्या दिवशीं जरा बरं

वाटायला लागलं आणि म्हणून त्यानीं माझ्याकडनं लेखनसाहित्य मागून घेऊन नानासाहेबांच्या (म्हणजे आपल्या यमूच्या) आलेल्या पत्राला उत्तर म्हणून एक कार्ड खरडलं. त्यांत आपल्या आजारपणामुळें आपणाला यायला मिळालं नाहीं असं लिहिलं होतं. पण पत्र तिकडे पुण्याला पोंचायच्या अगोदरच सकाळीं रामरावांची स्वारी दारांत उभी ! त्यांना पाहून आम्हां दोघांनाहि अत्यंत आश्चर्य वाटलं. 'इकडे' तर विशेषच आश्चर्यचकित व्हायचं झालं. मला रामराव पुण्याला जायला येणार हें थोडं तरी ठाऊक होतं; पण 'इकडे' त्याची गंधवार्ता मुळांच नसल्यामुळें त्यानां पाहून अति आश्चर्य वाटलं. कदाचित् आपल्या आजाराची कुठून ना कुठून खबर लागल्यामुळें रामराव आले असतील असा 'इकडचा' समज झाला; आणि रामरावानीं आल्याबरोबरहि उभ्या उभ्या प्रथम या आजाराबद्दल त्यांना दोनचार प्रश्न विचारले. पण नंतर हळुहळु स्वारी मुद्यावर आली. त्यानीं खिशांतलं पत्र काढून दाखवलं आणि आपला अपमान केल्याबद्दल तावातावानें बोलायला सुरवात केली.पण 'तिकडून' अगदीं शांतवृत्ति धारण केली होती.आणि तूं गेल्या एका पत्रांत 'इकड'च्या अति शांतवृत्तीबद्दल जी संभावना केलीस ती यावेळीं मला खरोखरच पटली. कारण रामराव 'इकडे'च अपमान केल्यावद्दल दोष देत असतांना यांची अगदीं एखाद्या तपस्व्यासारखी शांत मुद्रा पाहून मलाहि कसेंसेंच वाटायला लागलें. रामरावाप्रमाणें त्याच हस्ताक्षराचं आणि तशाच मजकुराचं आपणांसहि एक पत्र आलं असतांना तें यांनीं खिशांतून काढून दाखवूं नये का? मलाहि अगदीं धीर धरवेना. पण म्हटलं पुरुषा-पुरुषाच्या भांडणांत आपण कां उगाच तोंड घाला ! 'इकडे' हें रुचत नाहीं हें मला ठाऊक होतं म्हणूनच मी मोठ्या कष्टानं आत्मसंयमन करीत होतें.

अखेर अगदीं ऐन वेळेवर पुण्याहून 'इकडच्या' नांवावर यमूचं पत्र आलं. त्यांत तिनं हें सगळं कपटकारस्थान आपणच रचलं होतं असं लिहिलं होतं. आपल्या दोघींच्याहि नांवाचा त्यांत उल्लेख मुळींच नव्हता बाई ! हें सगळं तिला कसं कळलं कोण जाणें ! पण त्या पत्रानं मात्र मोठा अनर्थ घडून यायचा तो नाहींसा झाला. 'इकडून' तें पत्र वाचून रामरावांच्या हातांत देणं झालं.रामरावांना 'इकडच्या'पेक्षांहि जास्त आश्चर्य वाटलं आणि त्यांनीं 'इकडेही' आपणांसारखं पत्र आलं होतं कीं काय म्हणून विचारलं. आतां कोठें 'इकडून' तें पत्र रामरावानां दाखविण्यांत आलं ! झालं. सारा रहस्यस्फोट झाला. आपणांला हें पत्र प्रथमच न दाखविल्यामुळें रामरावानीं 'इकडे' बराच दोष दिला. तें पत्र पहिल्याप्रथमच वाचलं असतं तर सारा उलगडा झाला असता, असं रामराव म्हणाले; आणि तें कांहीं खोटं नाहीं. पण 'इकडचा' स्वभाव पडला अति शांत !

मात्र इतकं झाल्यावरहि दोघांत परत हा वाद उपस्थित झाला कीं यमूला ही बातमी दिली कोणी ? आणि तिच्या कानीं ही गुणगुण गेली असली तरी कोणाचं सहाय्य असल्याशिवाय यमू असलं धाडस करणार नाहीं हें दोघानांहि ठाऊक होतं. बोलतां बोलतां तूं न् मी यमूच्या मैत्रिणी म्हणून आमच्या दोघांच्या मदतीनं तिनें हा कट केला असावा असं दोघांनाहि वाटलं आणि त्यांत मुख्य सहाय्य माझंच असलं पाहिजे असं 'इकडून' सांगणं झालं. तर त्यापेक्षांहि जोरानें रामराव विमलच्या--म्हणजे तुझ्या सहाय्यामुळेंच यमूनें हें धाडस केलं असलं पाहिजे असं म्हणूं लागले. या वादांतून नविनच एखादं भांडण उपस्थित होईल या भीतीनें मी धीर करून पुढें झालें आणि सारं गुह्य सांगितलं. मग काय काय घडलं तें विमल, तुझ्यासारख्या कल्पक लेखिकेला सविस्तर का सांगितलं पाहिजे ? तुझे रामराव किनई कितीहि तापट असले तरी त्यांच्या मनांतलं काळंबेरं साफ नाहींसं झाल्यावर अगदीं दिलदार स्वभावाचे आहेत ,बरं का विमल ?

मात्र त्यांच्या या नव्या मैत्रीचं श्रेय कोणाला द्यायचं हें कळत नाहीं. मी मात्र प्रथमपासून तूंच या कपटनाटकांत प्रमुख भाग घेतला होतास हें सांगतांच तर ' इकडनं ' तुझी किती तारीफ न् प्रशंसा केली ! तूं ऐकायला असतीस कीं नाहीं म्हणजे तुला मूठभर मांस चढलं असतं !

असो. रामरावांच्या अति आग्रहामुळें आणि ' इकड'ची प्रकृतिहि अत्यंत अशक्त झाल्यामुळें आम्हीं सगळे रत्नागिरीला यायला दोन चार दिवसांत निघणार आहों. मात्र मला बाई राहून राहून हंसूं येतं कीं, नानासाहेबांच्या मार्फत ही मैत्री घडवून आणण्याचा आपला पहिला उद्देश राहिला बाजूला न् परस्पर दोघांनींच आपल्यांतला बखेडा नाहींसा केला. मात्र हें सारं गूढ नानासाहेबांना कळलं तर त्यानां हंसतां हंसतां पुरेवाट होईल.

या प्रकरणांत यमूची मात्र आपणाला फारच मदत झाली आहे आणि तिला सारी हकिगत लिहून आभारप्रदर्शनाचं पत्र मी पाठविलं आहे. आतां आणखी कांहीं लिहीत नाहीं. अगदीं बारीक सारीक माहिती ऐकायची तुला फार उत्सुकता लागून राहिली असेल. ती मी समक्षच येऊन पुरवीन. कळावें.

तुझी,

बनुताई

खुडलेलीं फुलें.

—शिक्षण, मनोविकास आणि श्रीमंति या सर्व दृष्टींनीं सारख्याच दर्जाची ठरतील अशा माणसांचें सुखविषयहि भिन्नभिन्न आणि परस्परांस निरर्थक वाटणारे आसतात, हा नेहमींचा अनुभव आहे. एकाला काव्याची विलक्षण आवड असते, काव्यवाचनापासून होणाऱ्या आनंदापुढें त्याला सारें जग तुच्छ वाटत असतें आणि पोटच्या मुलापेक्षांहि आपल्या काव्यग्रंथांना तो अधिकच जपत असतो; तर उलट कालीदासाच्या अगर भवभूतीच्या नाटकांतील एखादा श्लोक पुनःपुन्हा मनाशीं म्हणून आनंदानें नाचणाऱ्या त्या गृहस्थाला पाहून त्याची गणना शुद्ध मूर्खांत करावयास कमी करीत नाहीं. एखाद्याला संगीताविषयीं इतकी आसक्ति असते कीं, गायनवादनावांचून नाहींतर निदान त्याविषयींच्या गप्पा मारल्यावांचून घालविलेली एक घटकाहि त्याला असह्य वाटते. पण गवयाचें गायन एकाग्रतेनें ऐकत बसून त्याच्या गळ्यांतून निघणाऱ्या दर एक तानउपजेबरोबर "वाहवा" देतांना आणि माना डोलवितांना त्याला पाहून त्याचे कित्येक मित्र त्याच्या निरर्थक नादिष्टपणाची कींव केल्यावांचून रहात नाहींत.निदान आनंदानें बेहोष होण्यासारखें असें त्या गायनांत येवढें काय आहे असें आश्चर्य त्यानां वाटल्याखेरीज रहात नाहीं. आणि खरेंच, संगीतलोलुपतेची दृष्टी सोडून क्षणभर विचार केला तर संगीतांत येवढी मोहिनी ती काय आहे ? क्रिकेटच्या चौरंगी सामन्यांतील एखादा डाव सुरूं झाला म्हणजे क्रीडांगणावर जाऊन पहावें. प्रत्यक्ष खेळणाऱ्यांच्या ठायीं नसेल इतक्या तादात्म्यवृत्तीनें पंधरा वीस हजार प्रौढ प्रेक्षक खळ पहात असतात, मोठमोठीं वयस्क माणसें आनंदातिशयानें उभीं राहून रुमाल हवेंत उडवीत असतात; टाळ्या पिटीत असतात, ओरडत असतात. त्यांच्या बाजूचा एखादा गडी पडल्यावरोबर त्यांचे चेहेरे दुःखानें म्लान होतात आणि त्यांच्या बाजूची सरशी होत असलेली दिसतांच त्यांना हर्षाचें भरतें येतें. पण त्रयस्थांना त्यांचा तो हर्षोन्माद वेडाच्या लहरीसारखा वाटतो. आणि खरोखरच तसा विचार केला, तर चेंडूफळीच्या त्या खेळांत येवढें स्वारस्य तें काय असणार ? घोडयांच्या शर्यतीं खेळणारांच्या स्पेशल गाडया पण्यास येऊन धडकण्याच्या वेळीं स्टेशनवर जाऊन घटकाभर उभें रहावें. चाळिशीच्या पुढें गेलेले, दाढीमिशा फुटलेले–नव्हे, फुटणाऱ्या दाढीमिशा साफ काढणारे आणि चार पांच मुलांचे आईबाप सहज शोभतील असे पुरुष लहान मुलांप्रमाणें गाडी उभी रहाण्यापूर्वीच गाडींतून पटापट उडया टाकून धांवत सुटतात...इतर वेळीं ज्यांची क्षणभर भेट घ्यावयाची झाल्यास मोठमोठया

लोकांनाहि कचेरीच्या दारापाशीं घटकान्घटका तिष्ठत उभें रहावें लागतें असे बडेबडे कामगार लहानाहून लहान होऊन ओरडत आरडत पळत असतात! आपल्या दृष्टीला तो एकंदर गोंधळ शुद्ध वेड्यांचा बाजारसा वाटतो. आणि खरेंच तसें पाहिलें तर साध्या घोडदौडीच्या त्या दंगलींत देहभान विसरण्यासारखें तें येवढें काय आहे?...सारांश, लहान मुलांच्या भोळ्या वृत्तीची कींव करणाऱ्या प्रौढ माणसांची स्थिति त्या मुलांहून निराळी नाही.—**प्रो. ना. सि. फडके**, एम् ए. ("बालवृत्ति"—रत्नाकर)

* * *

—तूं आपले विचार कोणाकडे बोलून दाखवूं नकोस अगर एखादें अविचारी कृत्य करण्याचें साहस करूं नकोस. लोकांत तूं मिळून मिसळून वाग, पण त्यांतहि अतिशयोक्ति करूं नकोस. तुझ्या मित्रांपैकीं जे तावून सुलाखून निघाले आहेत त्यांना हृदयाशीं अगदीं जखडून ठेव; पण अर्धघटकेच्या परिचयानें उगीच एखाद्याच्या मित्रत्वाबद्दल पूर्ण खात्री बाळगूं नकोस. कोणाच्याही भांडणांत तूं पडूं नकोस; पण तसा प्रसंग आलाच तर सहनशील बनून प्रतिपक्षावर तुझ्या सद्वर्तनाची छाप पाड. कोण काय सांगतो तें ऐकत जा; पण तुझे स्वत:चे विचार फारच थोड्यांना सांग. कोणी उपदेश केला तर तो ऐक; पण तुला जें न्याय्य वाटतें तेंच करत जा. तुझ्या परिस्थितीप्रमाणें किंमती कपडे वापर; पण मनाला वाटतील ते कपडे करण्याच्या भानगडीत न पडतां तुला शोभतील असेच कपडे कर.कपडे मौल्यवान असले तरी ते रंगीबेरंगी आणि बेढब करूं नकोस. कारण मनुष्याच्या बाह्य वस्त्रावरून त्याची समाजांतली लायकी दिसून येते....कोणाचा ऋणको अगर धनकोहि बनूं नकोस. कारण ऋणामुळें जिवश्चकंठश्च मित्रांत सुद्धां फूट पडते आणि उसनवारी केल्यामुळें जन्माचें दारिद्र्य आणि विवंचना लागते. तूं स्वतःशीच सत्यभावानें वाग; म्हणजे तूं कोणाहि परक्याशीं लबाडीनें वागणार नाहींस ही खात्री बाळग.—**शेक्सपियर** (हॅम्लेट)

मुलींचा संसार

समान-हक्क

[श्री. एस्. बी. पाठक]

हल्लीं जिथें तिथें ह्या समान-हक्काचें बंड फारच बोकाळत चाललें आहे. शाळा, कॉलेजें, सभागृहें, नाटकाची रंगभूमि, फार काय पण चौपाटीच्या वाळवंटांत सुद्धां ह्या विषयावर चर्चा चाललेली असते. अर्थात हा विषय तसाच काहीं महत्त्वाचा असला पाहिजे असें मला वाटलें व तो कितपत खरा आहे हें ठरविण्याच्या तजविजीस मी लागलों कदाचित् लेखणीच्या चुकीनें शाई भलत्याच तऱ्हेनें ओतली जाऊन नाजुक दृष्टीच्या एखाद्या माणसास लागली तर लेखणीचा प्रतिनिधी ह्या नात्यानें मी त्याची आधींच क्षमा मागून ठेवितों. असो.

कोणत्याहि प्रश्नाचा विचार शारिरीक व धार्मिक दृष्ट्या करण्यापेक्षां देशाला हितकारक अशा दृष्टीनें करणें जास्त फायदेशीर होईल; आणि हा प्रश्न ह्या (अर्थात मुत्सद्देगिरीच्या) दृष्टीनें सोडवूं पाहतां कांहीं बाबतींत स्त्रियानां समान-हक्क देणें पुरुषवर्गाला भागच पडते. आतां हे हक्क कोणते तें पाहूं.

प्रथमतः कोणताहि मुत्सद्दी आपली नजर स्त्री-शिक्षणावर प्रथम वळविल. कारण बाकींच्या सर्व हक्कांची अंमलबजावणी व स्वीकारण्याची पात्रता शिक्षणांवाचून स्त्रियांच्या अंगीं येणें शक्य नाहीं. आतां हल्लीं दिल्या जाणाऱ्या शिक्षणांत–निदान मॅट्रीक पर्यंतच्या शिक्षणांत तरी पुष्कळ बदल करणे जरूर आहे. आतां हा बदल कोणता तें आमच्यापेक्षां आमच्या भगिनी-वर्गासच जास्त चांगलें कळेल. कारण कांहीं विवक्षित संस्थांच्या सेक्रेटरीखेरीज करून आमच्या ह्या सुशिक्षित भगिनीस इतरांबरोबर बोलण्यास संकोच तरी वाटत असला पाहिजे अथवा त्यानां वेळ तरी मिळत नसला पाहिजे. असो. माझ्या मतें स्त्री-शिक्षणांत कायद्याचें ज्ञानहि स्त्रियानां आवश्यक आहे.कारण त्या शिवाय त्यानां, त्यांच्याच वर्गाकडून म्हणा अगर पुरुषवर्गाकडून म्हणा–होणाऱ्या छळाचा प्रतिकार करितां येणें शक्य नाहीं. आजकाल आमचा भगिनीवर्ग बऱ्याचशा बाबतींत ह्या जुलमाखालीं आहे. हें समाजाचें परिक्षण करणारा कोणीहि मनुष्य निर्विवाद कबूल करील. शिवाय स्त्री–शिक्षणापासून दुसरा एक मोठा फायदा होतो; तो म्हणजे घरांतल्या लहान मुलांचें शिक्षण ! पुरुषवर्ग कितीहि प्रेमळ बनला तरी वेळीं प्रसंगीं त्याचा पुरुषी स्वभाव प्रकट झाल्याशिवाय रहात नाहींत. आणि त्यामुळें मुलें तितक्या

प्रेमळतेनें व आस्थेनें त्यांच्या जवळ केव्हांहि बसत नाहींत. पण स्त्री–वर्गाची गोष्ट अशी नाहीं. आई व बहिणीकडून तीच गोष्ट इतक्या प्रेमळतेनें शिकविली जाते कीं प्रेमळ मनाच्या त्या पवित्र आरशावर ती आपलें कायम ठशाचें प्रतिबिंब उठवितें. शिवाय आई व बहिणीजवळ (आई आणि वडील बहिण ह्यामध्यें माझी लेखणी फरकच मानित नाहीं) आपली कोणतीहि अडचण सांगण्यास त्याला केव्हांहि संकोच वाटत नाहीं. म्हणून त्यांचें शिक्षण आईजवळ झपाटयानें होतें. शिवाय परिस्थितीकडे लक्ष दिल्यास आजकाल पुरुष–वर्गास घरांतील लहान मुलाकडे लक्ष देण्यास वेळहि सांपडत नाहीं ! समान–हक्काच्या बाबतींत आमच्या भगिनी नेहमीं आमच्याच नांवानें खडे फोडित असतात. पण माझ्या प्रियभगिनींनो ! जर आपण खोल विचार केलात तर समान–हक्काच्या कार्यांत स्त्रियांच्याकडूनच प्रामुख्यानें जास्त अडथळे आणले जातात, असेंच आपणाला कळून येईल ! कारण कॉलेजच्या वातावरणांत असतां स्त्रियांना वाजवीपेक्षां जास्त मान दिलेला पाहून जरी एखादा तरुण भडकला तरी स्वतःला बायको पसंत करतानां कोणीही अशिक्षित स्त्री पसंत करणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. कारण बाहेरून दमून भागून आलेल्या पुरुषाला घरांतल्या इतर सर्व बाबी आपल्या गृहिणीने सावरून धरल्या तर त्या त्याला नको का आहेत ? आणि हें काम सुशिक्षित गृहिणींवांचून होणें फारसें शक्य नाहीं असें माझे तरी मत आहे. तेव्हां माझ्या मतें स्त्री–शिक्षणाच्या आड पुरुष येतात, हें म्हणणेंच निरधार आहे. आतां शिक्षणाचा फायदा कित्येक वेळेला भलत्याच रितीनें घेतल्यामुळें कदाचित एकाददुसरा पुरुष विरुद्ध जात असेल; पण अशी उदाहरणें फारच क्वचित्.

ज्याप्रमाणें एकाद्या दारुड्याचें दारूचें व्यसन सुटण्यास जसा मुख्य अडथळा त्याचाच असतो तद्वतच माझ्या मतें स्त्रियांच्या उन्नतीच्या मार्गांत मुख्य अडचण स्त्रियांचीच असते. इंग्लंड जेव्हां शिद्यांची गुलामगिरी कांढूं लागलें तेव्हां " आम्हांला स्वातंत्र्य नको " म्हणून सर्वांत मोठी आरड गुलामानींच केली. तीच स्थिति आज अबलोन्नतीची आहे. एकादा पुरुष जर स्त्रियांच्या उद्धारार्थ प्रयत्न करूं लागला तर त्याला सर्वांत जोराचा विरोध स्त्री–वर्गाकडूनच होत असतो. उदाहरणार्थ:–एकाद्या स्वार्थत्यागी तरुणानें (बाल-विधवेबरोबर) पुनर्विवाह केला तर त्याला बहुतेक भिक्षुकवर्गाकडून व गांवांतील अशिक्षित स्त्री–समाजाकडून जास्त विरोध केला जातो. पैकीं एकाला दक्षणा देऊन स्वस्थ बसविणें त्याला शक्य असतें; पण दुसऱ्याला शांत करणें त्याच्या आटोक्याबाहेरचें असतें. हेंच उदाहरण स्त्री–छळाच्या बाबतींतहि लागूं करता येईल. सुनेचा छळ जितका सासु करिते तितका सासरा करित नाहीं. आतां ह्या बाबतींत आम्ही पुरुष बऱ्याच वेळां दुर्लक्ष करतो; नाहीं असें नाहीं; आणि हा खरोखरच आमचा मूर्खपणा आहे !

हल्लीं कॉलेजांतील आमचा सुशिक्षित भगिनीसमाज, समान-हक्कांच्या बाबतींत जोरानें चळवळ करितांना दृष्टीस पडतो. पण दिलेल्या समान–हक्काची अंमल-बजावणी त्यांना करितां येत नाहीं. निदान समान–हक्काची त्यांची व्याख्या तरी निराळी असावी असें मला वाटतें. आजकाल आमच्या सुशिक्षित भगिनींचा कल पुरुषवर्गांत मिसळण्याऐवजीं त्यांच्यापासून शक्यतों दूरच राहण्याचा दिसतो. पुरुषानीं जरी त्यानां एखाद्या बाबतींत समानहक्क देण्याचा प्रयत्न केला तरी त्या तो नाकारण्याचा शक्य तितका प्रयत्न करित असतात. त्यावरून त्यानां समाज-हक्क पाहिजेत किंवा नकोत हाच आमच्या पुढयांत प्रश्न उभा राहतो ! माझ्या एका मित्रानें एका नवीन संस्थेंच्या बाबतींत आपल्याच बरोबर शिकणाऱ्या आपल्या ओळखीच्या एका सुशिक्षित भगिनीला संस्थेचें सभासद होण्यास विनंति केली; पण बिचाऱ्याला 'दुसऱ्या कोणीच स्त्रिया त्या ठिकाणीं नसतां मी एकटीच कशी येऊं ?" असें उत्तर मिळालें. प्रत्येक स्त्री जर हेंच उत्तर देऊं लागली तर बिचाऱ्याला कल्पांतापर्यंत सुद्धां स्त्री–सभासद मिळविण्याची आशा करावयाला नको पण माझ्या समान–हक्कप्रिय भगिनिनों ! तुम्हींच जर आपल्या सुशिक्षित बधूंशीं इतक्या तुटकपणें वागूं लागलां तर तुमच्या अडचणीं काय आहेत, तुम्हांला कोणत्या समान–हक्काची जरूरी आहे, काय केलें असतां तुमचीं दुःखें, अडचणी नाहींशा होतील वगैरे गोष्टी आम्हाला कशा कळणार ? आतां मोकळेपणाचा फायदा कित्येक वेळेला उभयपक्षांकडून भलताच घेतला जाईल हें मी कबूल करितों, पण अशीं उदाहरणे फारच क्वचित् ! आणि साधारणतः अशा व्यक्तिची पारख स्त्रिया चहेऱ्यावरून करितात असें जें शास्त्रज्ञांचें मत आहे तें सर्वांशीच खोटें असेलसें मला वाटत नाहीं. शिवाय मोकळेपणा जास्त वाढल्यास माझी खात्री आहे कीं दोघांनाही कोणतेंही काम करण्यास एकप्रकारचा हुरुप येईल. आपली एक बहिण आपल्या बरोबरीनें काम करण्यास तयार झालेली पाहून असा कोण नामर्द आहे कीं ज्याला कोणतेंहि अशक्य काम करण्यास उत्साह वाटणार नाहीं ? कार्यांत पराभूत झालों तरी निराश झालेल्या मनाला आशेचा ओलावा आणण्याकरितां एक प्रेमळ भगिनी सुहास्य वदनानें सज्ज आहे ही आनंददायी आशाच त्याला संकटाच्या सीमे–पार करिल. त्याप्रमाणे परस्पर दळणवळण जास्त वाढल्यास कॉलेजच्या आवारांत येतांच स्त्रीला पुरुष व पुरुषांना स्त्रीला पाहतांच जो एक चमत्कारिक-पणा वाटतो तो वाटणार नाहीं. एवढ्याचसाठीं माझ्या प्रिय भगिनीनों, आपल्या बांधवा-बरोबर सार्वजनिक कार्यांत भाग घ्या. पराभूत झाल्यामुळें निराश झालेल्या त्या त्यांच्या मनाला भगिनी–वात्सल्यानें उत्साही बनवा; त्यांच्या अंगिकृत कार्यांत त्यांना मदत करून "आम्हीं स्त्रिया समान–हक्काला आतां पूर्णपणे लायक आहोंत" हे त्यानां कृतीनें पटवून द्या; म्हणजे तुम्हांला लागतील ते समान-हक्क विनधोक तुम्हांला मिळालेच पाहि-

जेत. मग त्यांची अंमलबजावणी तुमच्याच अशिक्षित भगिनीमध्यें करणें तुम्हाला फारसें जड जाणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

["**मुलींचा संसार**" हें सदर मुख्यतः स्त्रियांसाठींच असलें तरी कांहीं स्त्रीविषयक बाबतींत स्त्रियांनीच एकांगीं विचार करण्यासारखें नसून पुरुषांचाहि त्यांत निकट संबंध पोंचतो; व स्त्रियांच्या कांहीं निराधार अगर चूक वाटत असलेल्या मतांबद्दल पुरुषांनीं विरुद्ध बाजूनें आपलीं मतें प्रसिद्ध करणें अपरिहार्य होते. एवढ्याचसाठीं सदर लेखाला '**मुलींच्या संसारांत**' स्थळ दिलें आहे. —**संपादक**]

आधुनिक देशभक्त !

नाहीं अन्तरशुद्धि दावित वरी राष्ट्रीय भक्ती बरी ।
खादी वापरि, वलगना बहु करी जाऊनि देशांतरीं॥
स्वार्थत्यागहि भासवी दृढ मनीं सत्कीर्ति–तृष्णा धरी ।
हा ! मातें नकळे असा नर कसा देशास या उद्धरी ? ॥ १ ॥

* * *

ऐक्यासाठिं उठे, जगीं लटपटे, आप्तेष्टिं या ना पटे ।
स्वातंत्र्याहि झटे परंतु परदास्यातें कदा न हटे ॥
वाटे कष्टचि तो म्हणोनि कृषिकर्मातें सदा हा विटे ।
हा ! हा ! ! पाहुनि देशभक्त जन हिन्दुस्थान दुःखें किटे ॥२॥

—लक्ष्मण सोनबा भांडारे

मुलांची मौज.

जादूची आंगठी

एका गरीब मनुष्याला तीन मुलगे होते आणि तिघेहि एका शेतकऱ्याच्या मुलीवर प्रेम करीत असत. पण त्याच मुलीवर एक श्रीमंत म्हातारा प्रेम करीत असून तिच्याबरोबर त्याचें लग्न होण्याचें ठरलें होतें. ते तिघेहि निराश झाले. पण त्या तिघांनीहि काय वाटेल तें करून तिच्याशींच लग्न करण्याचा निश्चय केला आणि सर्वांत मोठा मुलगा त्या मुलीला मागणी घालण्याकरितां बाहेर पडला. वाटेंत त्याला एक म्हातारी भेटली. तिनें विचारलें, "काय रे मुला, कुठें चाललास?" पण आपण घाईत असल्याचें सांगून तो तडक त्या मुलीच्या झोंपडींत गेला. त्यानें तिला मागणी घालतांच त्याची आणि आपल्या भावी श्रीमंत नवऱ्याची तुलना करून तिनें त्याची हेटाळणी केली. तेव्हां तो खट्टू होऊन झोंपडीबाहेर पडला.

दुसऱ्या दिवशीं दुसरा मुलगा त्या मुलीला मागणी घालण्यासाठीं आपल्या घराबाहेर पडला. वाटेंत त्याला तीच म्हातारी भेटली व तिनें आधल्या दिवशींचाच प्रश्न त्याला विचारला. पण बोलण्यास वेळ नसल्याचें सांगून घाईघाईनें तो झोंपडींत गेला. आधल्या दिवसाप्रमाणें यावेळींहि त्या मुलीनें या दुसऱ्या मुलाला निराश करून घालवून दिलें.

तिसऱ्या दिवशीं तिसरा मुलगा घराबाहेर पडला. त्याला आपणाला यश येईल असें मुळींच वाटत नव्हतें. कारण तो एरव्ही सुंदर दिसत असला तरी त्याचें नाक फार लांब होतें आणि त्यामुळें तो बेढब दिसत होता. वाटेंत त्या म्हातारीन त्याला पूर्वीप्रमाणेंच प्रश्न केला. पण आपल्या दोघां भावांप्रमाणें उत्तर न देतां तो गेला नाहीं. त्यानें म्हटलें, "म्हातारे, मी जातो आहे एका मुलीला मागणी घालायला. पण मला कांहीं त्यांत यश मिळणार नाहीं हें मला ठाऊक आहे. कारण माझें नाक फारच लांब आहे आणि त्यामुळें मी कांहींतरी दिसतो."

म्हातारीनें म्हटलें, "भिऊं नकोस मुला! ही अंगठी घे आणि 'लहान हो' असें म्हटलेंस कीं तुझें नाक लहान होईल आणि तूं फार सुंदर दिसशील. 'मोठें हो' असें म्हटलेंस म्हणजे तें मोठें होईल."

तिनें दिलेली आंगठी त्यानें घेतली व 'लहान हो' असें म्हणतांच त्याचें नाक अर्धा इंच लहान होऊन तो सुंदर दिसूं लागला. म्हातारीनें त्याला सांगितलें कीं ती अंगठी त्या मुलीकडे दे आणि 'मोठें हो' असें म्हण. म्हणजे तिचें नाक मोठें होत जाईल. ती लग्नाला कबूल होईपर्यंत तूं असें म्हणत रहा. म्हणजे शेवटीं तुझ्या मनाप्रमाणें होईल."

तो मुलगा ती आंगठी घेऊन त्या मुलीच्या झोंपडींत गेला. ती मुलगी घरीं नव्हती; म्हणून तो डोळे मिटून खुर्चीवर बसला. कांहीं वेळानें तो श्रीमंत म्हातारा आला आणि त्याने त्याच्या हातांत आंगठी पाहिली. त्या गरीब मुलाकडे ही सोन्याची आंगठी कोठून आली याचें त्याला आश्चर्य वाटून त्यानें ती त्याच्या हातांतून हलकेच काढून घेतली; पण त्यामुळें तो मुलगा जागा झाला. त्या म्हाताऱ्याच्या हातांत आपली आंगठी पाहून तो म्हणाला 'मोठें हो.' त्याबरोबर त्या म्हाताऱ्याचें नाक मोठें झालें. पुन्हां त्यानें 'मोठें हो' म्हटलें; त्याबरोबर त्याचें नाक आणखी लांब झालें. असें दोनचार वेळ म्हटल्यावर त्या म्हाताऱ्याचें नाक केवढें तरी मोठें दिसूं लागलें. तेव्हां तो म्हातारा घाबरून धांवत धांवत डॉक्टरकडे गेला. इतक्यांत ती मुलगी आली. त्या मुलाचें सुंदर रूप आणि लहान नाक झालेलें पाहून तिचें त्याच्यावर प्रेम बसलें. त्याच्या लांब नाकामुळेंच ती त्याच्याबरोबर लग्न करण्यास नाखूष होती; पण ती गैरसोय दूर होतांच ती त्याच्याशीं लग्न करण्यास कबूल झाली.

"मला एक हजार रुपये देशील तर तुझे नाक परत होतें तेवढें करीन." असें त्यानें त्या म्हाताऱ्याला सांगतांच तो कबूल झाला आणि त्या १००० रुपयांत त्याचें त्या मुलीबरोबर मोठ्या धामधुमीनें व थाटानें लग्न झालें व तीं दोघें सुखानें संसार करूं लागलीं.

बाललेखकांनों,

तुमच्यासाठीं '**मुलांची मौज**' या सदरांत आणखी कोणत्या सुधारणा करावयाच्या त्या लिहून पाठवा.

पाऊस कसा व कोठून येतो ?

"वः, इतकेंहि तुम्हांला कळत नाहीं ? हः हः हः, अहो पाऊस येतो आकाशांतून !"

एखाद्या मोठ्या माणसानें लहान मुलाला 'पाऊस कोठून येतो ?' असा प्रश्न विचारला तर तो त्याच्या अज्ञानाबद्दल हंसून असें उत्तर देईल. त्याला वाटेल, हा एवढा मोठा माणूस आणि असला 'साधा' प्रश्न आपणाला काय विचारतो ? पण माझ्या छोट्या मित्रा, हा प्रश्न साधा नाहीं. पावसाचे थेंब तयार होण्यापूर्वी काय काय गोष्टी घडतात त्या तुला सर्वच ठाऊक नसतील.

उष्णतेनें पाण्याची वाफ होते ही गोष्ट कांहीं कोणाला नव्यानें सांगावयास नको. सूर्याच्या उष्णतेनें समुद्रांतील पाण्याची वाफ होऊन वर वर जाते. हवामान ज्या प्रमाणांत असेल त्या प्रमाणांत हवा वाफ तोलून धरते. नंतर वाऱ्याच्या झोताबरोबर ती वाफ थंड प्रदेशांत तरंगत जाते व तेथें हवेपेक्षां ती जड झाल्यामुळें तिचें बारीक बारीक परमाणूंत रुपांतर होतें. ते परमाणू हवेत सदा तरंगणाऱ्या धुळीच्या बारीक कणांना चिकटून रहातात. असे बरेच कण एकीकडे झाले कीं आपण त्यांना ढग म्हणतो. हेच ढग हवेच्या वजनापेक्षां जड झाले कीं ते पावसाच्या रुपानें खालीं पडून ओढे, नद्या वगैरेंनां पाण्याचा भरपूर पुरवठा करतात व नद्यांचें पाणी अखेर समुद्राला मिळतें हे तुम्हांला ठाऊक असेंलच.म्हणजे मुळचें वाफेच्या रुपानें वर गेलेलें पाणी पुन्हां समुद्रांत येऊन मिळतें. हाच क्रम नेहमीं सारखा चालू असतो.

'मुलांची मौज'

या सदरांत तिसऱ्या वर्षीं आम्हीं नवीन, मनोरंजक व माहितीपूर्ण असा मजकूर घालणार आहों. तुम्हीं काय लिहून पाठवाल ?

नवें कोडें

(१) नंदनवन
(२) विदुर
(३) अरसिक
(४) बाणासूर
(५) सरस

या पांच शब्दांतील एकेका शब्दांत एका पांच अक्षरी गांवाच्या नांवाचें एक एक अक्षर लपलें आहे. अक्षरें शब्दांच्या अनुक्रमानेंच दिलीं आहेत.

(उत्तरें फक्त १४ वर्षांच्या आंतील वर्गणीदारांनीं पाठवावीं.)

कोडयाचें उत्तर

१०	४	१०
४		४
१०	४	१०

उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नावें:—श्री. द. भा. तेंडुलकर (माथेरान) वि. रा. सुखटणकर (मुंबई), वि. शं. दळवी (मुंबई) कु. कृष्णाबाई ना. रहाटे (मुंबई) श्री. वा. सांडू (मुंबई) म. दा. ओक (उमरावती) वा. आ. गांधी (मुंबई) म. कृ. नाडकर्णी (बडोदें) वै. च. तिगडी (कडोली)

तिसऱ्या वर्षासाठीं

नव्या तऱ्हेचीं कोडीं प्रसिद्ध होतील.

" मे महिन्याची सुटी कशी घालविली ? "

(श्री. वि. स. जोशी)

(बक्षीस पुस्तक—आत्मोन्नति)

रोज रोज शाळेंत जाण्याचा कंटाळा आल्यावर मे महिन्याची कधीं एकदां सुटी पडेल असें मला झालें होतें. परिक्षा होऊन मी इंग्रजी दुसरींत गेलों होतों आणि एक वर्षाचा अभ्यास करून आलेला शीण घालवण्यासाठीं मे महिन्याची ती लांबलचक रजा कधीं येईल असें मला झालें होतें. अखेर एकदा तो सोन्याचा दिवस उजाडला. शिपायानें आणलेली 'नोटीस' आमच्या मास्तरांनी वाचून दाखविली. ४१ दिवसांची रजा कशी घालवावयाची याचा आम्हीं तेथल्या तेथेंच आपापसांत विचार करूं लागलों. मला माझ्या बडोद्याच्या मामेभावाकडून आणि रत्नागिरीहून आतेभावाकडून सुटींत येण्यासाठीं पत्रें आलीं होतीं. पण वर्गांतल्या आमच्या 'कंपूनें' मुंबई सोडून कुठेंच न जाण्याचें ठरवलें आणि त्याप्रमाणें मला विचारूं लागलें. मला बडोद्याला अगर रत्नागिरीला जावयाची उत्कंठा वाटत असली तरी आपल्या सर्व मित्रमंडळीचा मुंबईतच राहून मौज करण्याचा विचार आहे हें पाहून मी माझी उत्सुकता दाबली आणि त्यांच्या म्हणण्यास कबूल झालों.

रजा पडल्यानंतर आम्हीं आमचा रोजचा कार्यक्रम आंखूं लागलों. आज हँगिंग गार्डनवर जावयाचें, उद्यां फुलाड्याला जावयाचें, परवां बोरवलीचा 'प्रवास' करावयाचा असे आम्हीं बरेच कार्यक्रम तयार केले. आणि त्याप्रमाणें आठ दहा दिवस करीतही आलों. पण नंतर पहातों तों काय ? आज सदाशिव घरून पत्र आल्यामुळें पुण्यास गेला, उद्यां गोविंद आईबापांनी सांगितल्यावरून कोल्हापूरास गेला, परवां वसईकर सुरतेस निघून गेला असा रोज एक एक मित्र आमच्या 'कंपू'तून कमी होऊं लागला. पहिल्याप्रथम सर्वांनीं जरी मुंबई सोडून न जाण्याचा निश्चय केला होता तरी आतां एक एक कारण उत्पन्न होऊन सर्वांनी पळ काढला. मी आणि दोघे, तिघेजण राहिलों; पण त्यांचाहि निराळाच रंग दिसूं लागला; आणि

दोन चार दिवसांनीं तर आमच्या 'कंपू' त मीच काय तो एकटा शिल्लक राहिलों. सर्वांनीं असें फसविल्यामुळें मला त्यांचा राग आला. मी आतां बडोद्याला अगर रत्नागिरीला जाईन म्हटलें तर सोबत कोणाचीच नव्हती. माझ्याबरोबर जाणारी मंडळी अगोदरच निघून गेली होती.

मी माझ्या दगेखोर मित्रांवर खूब रागावलों. मुंबईंत कोणी बोलायचालायला नसतांना मे महिन्याची रजा कशी घालवावी हें मला मोठें संकट वाटलें; पण अचानक वेळ घालविण्याचें एक साधन माझ्या हातीं आलें. आमच्या घरीं दारें, फडताळें वगैरे दुरुस्त करण्यासाठीं एक सुतार आला होता. तो भारी बोलका होता. मी त्याच्याजवळ बसून तो कसें काय सामान तयार करतो तें पाहात असें. हळुहळू आपणहि बसल्या बसल्या काहीं तरी तयार करावयाला शिकावें असें मला वाटूं लागलें आणि मी सुताराला आपणास सुतारकाम शिकवावयास सांगूं लागलों. त्यानेंही तें कबूल केलें. प्रथम त्यानें मला सर्व हत्त्यारांचीं नावें सांगितलीं. कुठल्या हत्त्याराचा कसा उपयोग करावयाचा तें त्यानें मला समजाऊन सांगितलें.त्याप्रमाणें मी प्रथम एक लहानशी चौकटी तयार केली. हळुहळु त्यानें फळी आंखून दिल्यावर मी एक लहानशी पेटी तयार केली. मला या कामांत मौज वाटूं लागली. मला थोडेंसें ड्रॉइंग येत असल्यामुळें मी पेन्सिलीनें नक्षीकाम काढून फळी कापूं लागलों, व चार पांच दिवसांतच एक सुंदरशी बिजागराची पेटी तयार केली. माझ्या लहानग्या भावाला खेळांतलें एक स्टूलहि मी करून दिलें.

असें होतां होतां अखेर सुटी संपली. आमचे सारे मित्र परत मुंबईला आले. जो तो आपण गेलेल्या ठिकाणचें रसभरित वर्णन सांगूं लागला. पण मुंबईला राहूनसुद्धां मी कसा मौजेंत आणि उपयुक्ततेंत वेळ घालवला तें सांगताच त्यानां आश्चर्य वाटलें. मी तयार केलेल्या वस्तु त्यानां दाखवतांच तर त्यानीं तोंडांत बोटेंच घातलीं. मीच त्या वस्तु स्वतःच्या हातानें तयार केल्या याच्यावर त्यांचा अद्याप विश्वासच बसत नाहीं. मग मुंबईला राहून मीच मौज मारली नाहीं का ?

लटकें दुकान.

(श्री. मुकुंद मोरेश्वर लोंढे)

मांडुनीया लटकेंच मी दुकान
द्यावयाला लोकांस सर्व धान्य ।
बसे घेउनियां तागडी लहान
कागदाची बनवूनि फार छान ॥१॥

घेइ वजनें बनवूनि खापऱ्यांची
पुडया बांधाया रास कागदांची ।
देइ बंधू लोकांस पदार्थांला
मीहि लागे लोकांस द्यावयाला ॥ २ ॥

उडे घाई मग आमुची किती ती
न्यावयाला सामान कितिक येती ।
कुणी साखर सांगेच द्यावयाला
कुणी बोले 'चल डाळ मोजण्याला' ॥ ३ ॥

कुणी येउनियां बैसती दुकानीं
भाव काढुनियां जातिही निघोनी ।
हिशेबांना करुनियां द्रव्य घेई
मोजण्याची पैसेहि उडे घाई ॥ ४ ॥

असें चाले हें आमुचें दुकान
मीच मालक म्हणुनियां येइ मान ।
जरी लटकें तरि खेळ खेळुनीयां
आम्हि शिकलों तें कामही कराया ॥ ५ ॥

———

शत्रुत्व आणि मित्रत्व.

(श्री. य. रा. वै.)

एका राजाजवळ दोन मजबूत शिकारी कुत्रे होते. त्यांना एकमेकापासून कांहीं अंतरावर जाडशा साखळदंडांनीं बांधून ठेवलेले असे. त्यांना सोडलें कीं दोघेहि एकमेकाच्या अंगावर चवताळून जात व एकमेकाचे लचके काढीत.

राजानें हें बरेच दिवस पाहिल्यावर त्यानें एका शहाण्या माणसाला आपल्याकडे बोलावून आणून विचारलें, "काय हो, हे दोघे कुत्रे एकमेकावर चवताळून जातात हें कांहीं बरें नाहीं. हे एकमेकाचें वैर सोडून अगदीं मित्रत्वाच्या नात्यानें वागतील असं करायला एखादी युक्ति नाहीं का ?" त्या शहाण्या माणसानें थोडा वेळ विचार करून म्हटलें, "मला एक युक्ति सुचते आहे. या दोघाहि कुत्र्यानां रानांत न्या आणि एखादा दांडगासा लांडगा दिसल्यावर त्या दोघांपैकीं एकाला त्याच्या अंगावर सोडा. असें झालें म्हणजे दुसरा कुत्राहि जाण्यास चळवळ करील, पण त्याला तसाच थोपवून धरा आणि तो लांडगा त्या कुत्र्यावर हल्ला करून त्याला जेरीस आणूं लागला कीं या दुसऱ्या कुत्र्याला सोडा. मग हे दोघेहि कुत्रे मिळून खात्रीने त्या लांडग्याला मारून टाकतील."

राजानें त्याप्रमाणें रानांत जाऊन केलें. लांडग्याच्या हल्ल्यानें पहिला कुत्रा अगदीं घायाळ होण्याच्या बेतांत आल्यावर दुसऱ्या कुत्र्यास सोडण्यांत आलें आणि त्या दोघानीं त्याचा फडशा उडवला. पण पहिल्या कुत्र्याला दुसऱ्या कुत्र्याचीवेळींच मदत मिळाल्यामुळें तो पहिला कुत्रा दुसऱ्या कुत्र्याबरोबर इतक्या सलोख्यानें व मित्रभावानें वागूं लागला कीं पुढें मरेपर्यंत त्य दोघांत कधींच भांडाभांड झाली नाहीं.

बालमित्रांनों, या गोष्टीपासून काय बोध घ्याल ?

बक्षिसाचा विषय.

आजीबाई बोलत बसल्या होत्या; बोलतां बोलतां त्यांनीं सर्व मुलांस विचारिलें "मुलांनों, तुम्हांला आईबापांच्या आज्ञेनुसार वागावेसें वाटतें कीं आपल्या इच्छेनुरूप वागावेसें वाटतें? दोहोंत बरें कोणतें व तें का, सांगा पाहूं!"

आजीबाईंच्या या प्रश्नास आमचे बालवाचक उत्तरें देऊं शकतील काय? बरोबर सांगणाऱ्यास आजीबाईंनीं बक्षीस देण्याचें कबूल केलें आहे.

(उत्तर फक्त अरुणमालेच्या १४ वर्षाच्या आंतील वर्गणीदारांनीच २० ओळीपर्यंत लिहून पाठविणें)

स्मरणशक्तीचा खेळ

माझ्या बालमित्रानों, तुम्हांला मधून मधून नेहमीं रजा मिळत असते. सुटी मनोरंजक रीतीनें घालवण्यासाठीं तुमचा खेळांचा कार्यक्रम तुम्हीं अगोदरच आंखण्यास सुरवात करतां. त्या खेळांत मी सांगतों त्या एका खेळाचें नांव घालाल का? पहा बुवा पसंत पडला तर!

हा खेळ कांहीं दांडगाईचा नाहीं, अगर धांवण्यापळण्याचाहि नाहीं. मात्र स्मरणशक्ति जास्त चांगली कोणाची आहे हें मात्र यावरून चांगलें अजमावतां येईल.

एका मोठ्या ताटांत बटण, मेणबत्तीचा तुकडा, गोटी, रबर, पेन्सिलीचा तुकडा असे १५-२० पर्यंत छोटे छोटे अनेक पदार्थ घालावे व सभोंवतीं मित्रमंडळीला बसवून त्यांच्या हातांत कागद पेन्सिल द्यावी. सर्व सभो-

वती बसले म्हणजे ताटावर रुमाल पसरावा व तो काढून सर्वांना ताटांतल्या वस्तु लक्षांत ठेवण्यास सांगाव्या. पुन्हां दोन मिनिटांनी ताटांतले पदार्थ रुमालानें झांकावे व सर्वांस ताटांत काय काय पदार्थ होते ते कागदावर लिहिण्यास सांगावें. ही मुदत सुद्धां फक्त दोन मिनिटेंच असावी. दोन मिनिटांनंतर सर्वांचे कागद घ्यावे व रुमाल काढून ताटांतल्या पदार्थांपैकीं प्रत्येकानें किती मांडले आहेत तें पहावें. जितके बरोबर असतील त्यांनी प्रत्येक पदार्थाला एक मार्क धरावा. पण एखादवेळीं ताटांत नसलेले पदार्थ सुद्धां, ते त्यांत असूं शकतील या भरंवशावर, लिहिण्यांत येतात. अशा वेळीं जितके पदार्थ चुकीनें मांडण्यांत आले असतील तितके मार्क कमी करावे.

शेवटीं ज्याचे मार्क सर्वांत ज्यास्त होतील तो जिंकला असें समजावें. खेळ ५ मिनिटांचा सुद्धां नसला तरी स्मरणशक्तीचें प्रमाण दाखविणारा आहे हें तुम्हांलाहि कबूल करावें लागेल. वाटेल तर करून पहा !

प्रिय बालमित्रांनों

तुम्हांपैकीं बऱ्याच जणांकडून अंकाला उशीर लागल्याबद्दल मला पत्रें आलीं. तुम्हांला 'अरुणाचा' अंक वाचण्याची अनिवार उत्कंठा असते हें मला पूर्णपणें ठाऊक आहे. व मलासुद्धां तुमच्या हातांत अंक अगदीं नियमीत द्यावा असें किती मनापासून वाटतें म्हणून सांगूं ? पण अजून कांहीं तसा योग येत नाहीं. आमचे वर्गणीदार अजून वाढावे तितके वाढले नाहींत. तुम्हीं मला या बाबतींत मदत करणार नाहीं का ? 'अरुणा' बद्दल तुम्हीं पत्रांत लिहितां त्याप्रमाणें खरोखरीच. तुम्हांला प्रेम वाटत असेल तर वर्गणीदारांसाठीं खटपट करा. वर्गणीदार मिळवून देणारांचीं नांवें आम्हीं अंकांत प्रसिद्ध करूं ! मग एवढें कराल ना ?

—संपादक.

आ द र्श	# काल–स्वभाव श्री. वि. य. देसाई.	आ द र्श

"जपून जा वरं बाळ!" अंत:करणाच्या कळवळ्यानें दिनकरची आई आपल्या लाडक्या बाळास सांगत होती. "चढतां उतरतांना सांभाळून..." ती स्फुंदत स्फुदत सांगूं लागली. तिनें डोळ्याला पदर लावला.

"असं काय करतेस आई? आज का मी कुठें लांबच्या पल्ल्यावर जातों आहे थोडाच! रोजचा कार्यक्रम! मग तुला आजच कां एवढं वाईट वाटत आहे? जा घरांत." हंसत हंसत आपल्या आईकडे पहात धडधड जिना उतरून दिनकरानें स्टेशनचा रस्ता सुधारला. दिनूची गाडी स्टेशनांतून निघाली; तरी ती सहृदय माता अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांनीं बराच वेळ स्टेशनकडे पहात उभी होती.

× × ×

विलेपार्लें स्टेशननजीकच एका छोट्याशा एक मजली घरांत दिनकर आपल्या आईसह राहात असे. दिनकर आपल्या आईचा एकुलता एक मुलगा होता. त्यामुळें दिनू म्हणजे त्या माऊलीचा प्राणच होता, यांत कांहीं नवल नाहीं. दिनूही नोकरीच्या पांच सहा तासांखेरीज करून बाकीचा सर्व वेळ आपल्या आवडत्या आईचें मनोरंजन करण्यास झटत असे. सुधारलेल्या वातावरणांत जरी दिनकराचें आजपर्यंतचें आयुष्य गेलें होतें, तरी त्याला पूर्णपणें कळून चुकलें होतें, कीं 'मातेच्या ममतेच्या शब्दांसारखें या जगांत दुसरें स्वर्गसुख नाहीं.'

दिनकर आज ऑफिसांत जावयास निघाला असतां त्याच्या आईच्या डोळ्यांत अश्रु आले याचें कारण आदल्या दिवशीं घडलेला एक विचित्र प्रकार हें होय. सुखदु:खाच्या संसारिक गोष्टी मातापुत्र संध्याकाळच्या वेळीं समाधनानें बोलत बसलीं होतीं. इतक्यांत चटकन कुणीकडूनशी दोघांच्या बरोबर मध्यभागीं एक पाल पडली! शिकल्या सवरलेल्या दिनकरच्या मनास त्याचें कांहींच वाटलें नाहीं. पण त्याच्या भोळ्याभाबड्या निरक्षर आईंच्या अंत:करणांत मात्र या प्रकारानें चर्र झालें. ती संबंध रात्र ती अघोर भविष्यावर विचार करीत अश्रु ढाळीत होती. पालीसारख्या अपशकुनी प्राण्यानें काय सांगितलें? दोघांच्या मध्यभागीं पडून शेवटच्या ताटातुटीचाच तिनें मूळ संदेश सांगि-

तला नाहीं ना ? माझ्या व दिनूच्या जगांतील या शेवटच्या वास्तव्याचें भविष्य तर तिनें केलें नाहीं ना ?

डोक्यांत विचाराची वावटळ सुरूं होती; आणि तिच्या डोळ्यांतून अश्रूंची झिरपणी सुरू होती.

उजाडलें. नेहमींप्रमाणें स्वयंपाक करण्यासासाठीं ती आंत शिरली. पण मनाच्या अस्वस्थतेमुळें तिच्या हातून मोठमोठ्या घोडचुका होत होत्या. जेवणाची वेळ झाली. दिनूबाळ पाटावर येऊन बसला. कांपऱ्या हातानें तिनें थोडें थोडें वाढलें; दिनूच्या चेहेऱ्याकडे पाहात ती मूक रूदन करूं लागली. तिच्या मनांत बालंबाल बिंबलें होतें कीं "दिनूची व माझी ही शेवटची भेट !"

दिनू ऑफिसांत गेला. वर सांगितल्याप्रमाणें कळवळ्यानें ती दिनूस सुखरूपपणें लवकर परत यावयास सांगत होती. दिनकरास वाटत होतें, "आई अतिशय भित्री !"

दररोजच्या क्रमानुसार दिवस जात होता. दिनूची आई मात्र आज कांहीं निराळीच बनली होती. दिनूबद्दल विचार करितां करितां तिच्या डोळ्यापुढें जुने दिवस उभे राहिले. आपले पतिराज असेच ऑफिसांत जात होते. इतक्यांत कोणीकडूनसें कोणीं चटकन शिंकलें. दैवानें आपला दुष्टावा साधला. आपला सौभाग्यतिलक परत कांहीं आपल्याला लाभला नाहीं. संध्याकाळच्या काळवेळीं आपल्या पतिराजाऐवजीं कोणी चौघा चांडाळांनीं आणलेलें आपल्या पतिराजाचें शव, भ्रमित मनानें जाऊन आपण त्या शवास मारलेली मिठी, मागूनच लाडक्या दिनूचें ओरडणें, इतक्यांत कोणीतरी आपल्याला आपल्या गाढ सुखापासून हिसकावून घेणें...तें दु:खचित्र तिच्या डोळ्यापुढें उभें रहिलें. मन:सागरांतून जोरजोरानें दु:खलहरी उसळूं लागल्या. हुंदके देत देत ती म्हणाली, " देवा, दिनूला सुखी राख म्हणजे झालं !"

संध्याकाळचे पांच वाजले. दिनू जर सुखरूप परत आला तर त्याला आज श्रीखंड पुरी वाढावयाची असें ती आपल्या मनांत म्हणत होती. दिनकराला श्रीखंड पुरी फार आवडत होती. उल्हसीत मनानें स्वयंपाक तयार करण्यासाठीं ती आंत शिरली. श्रीखंडपुरी तयार करून ती बाहेर आली. घड्याळांत सहाचे ठोके पडले. बाहेर आकाश अभ्राच्छादित होऊन वारा सोसाट्याचा वाहात होता. पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसत होतीं. दिनूची आई स्वयंपाकघरांतून बाहेर व बाहेरून स्वयंपाकघरांत घड्याळाकडे पाहून खेपा घालीत होती. हळू हळू सात वाजले, पाऊस जोरजोरानें पडूं लागला, बाहेर काळोख कभिन्न दिसत होता. दिनूची येण्याची वेळ झाली होती. दिनूची आई

गॅलरींत उभी राहून वाटेकडे टक लावून दिनूची वाट पाहात होती. दूरवर दिसणारें प्रत्येक माणूस तिला दिनूसारखेच वाटे.

थोडया वेळानें विजेच्या कडकडाटांत घड्याळांत आठाचे ठोके पडले. म्हातारीचें हृदय थरथर थरारूं लागलें. "दिनू सात वाजतां ठराविक वेळीं यावयाचा ! आठ वाजले. अजून कसा पत्ता नाहीं ?" तिच्या या प्रश्नास ढगांचा गडगडाट व विजेचा लखलखाट विशाल आवाजांत उत्तरें देत होते.

घड्याळाचा कांटा सारखा फिरत होता. ठोके वाजत होते, तसे तिच्या हृदयांतहि धडधड ठोके वाजत होते. पाऊस जोरजोराने वृष्टी करीत होता. तिची नजर तसल्या त्या पावसांत सचैल स्नान करीत स्टेशनवरून छत्र्याच्या काळ्या बुरख्याखालीं येणाऱ्या प्रत्येक माणसाकडे लागली होती. तिच्या उत्कंठीत मनाला प्रत्येक येत असलेला मनुष्य आपला दिनूच आहे असें वाटे. पण त्यानें दुसरी वाट पकडली कीं हजार फुटांच्या उंचीवरून एखाद्या खोल खोल दरींत पडल्यासारखें तिला वाटत होतें. मनाच्या या आशानिराशेच्या खेळांत केव्हांच चटकन दहाचे ठोके पडले.

दहा ठोके कानावर आदळल्यानंतर मात्र तिच्या जिवाची कालवाकालव होऊं लागली. दहा वाजले ! दिनू गेला तरी कुठें ? तिचें डोकें गरगर फिरूं लागलें. तिला दुसरें कांहीं सुचेना.तोंडानें पुटपुटत सर्व घरभर ती वेडया लहरींत फिरूं लागली.पाऊस 'धो धो' ओतत होता- काळोख 'मी मी' म्हणत होता, दुःखावेग असह्य होऊन ती तसल्याच पावसांत धडधड जिना उतरून काळोखांतूनच स्टेशनकडे धांवत निघाली. दरवाजावर असलेल्या तिकिटकलेक्टरच्या अंगावरून ती आंत शिरली. व अधिऱ्या मनानें प्रत्येक उतारूच्या तोंडाकडे निरखून पाहूं लागली. तिनें सर्व स्टेशन धुंडाळलें. तिला हवी असलेली वस्तू मिळाली नाहीं ! "दिनू दिनू"करीत सर्व प्लॅटफॉर्मवर वेडया लहरींत ती नाचूं लागली. लांबून कसलासा सू–सू आवाज ऐकूं येऊं लागला. स्टेशनांत मुंबईहून आलेली लोकलगाडी शिरली. वेडयाच्या लहरीनें नाचणाऱ्या दिनकरच्या आईनें चटकन् लाईनमध्यें उडी घेतली. 'हो हो हो' अशा गलबल्यांत गाडी भरर्‌दिशीं पुढें जाऊन उभी राहिली.

गाडींतील लोक भराभर उतरले व त्यांनीं रस्ता सुधारला. दिनकर गाडींतून गडबडीनें उतरून वर खालीं होणाऱ्या हृदयानें स्टेशनबाहेर पडला. आणि रस्त्यांतून झरझर चालत अखेर सताड उघडया असलेल्या आपल्या घरांत गेला. त्याच्या कांहीं उडाणटप्पू ऑफिस–मित्रांनीं त्याच्या इच्छेविरुद्ध त्यास "हॅरॉल्ड लॉईड'च्या शेवटच्या 'शो' ला खेंचून नेला होता. १०॥ वाजतां खेळ संपला तसा दिनकर आपल्या मित्रांच्या सोबतीला न राहातां स्टेशनवर धांवत निघाला.चटकन् त्याला गाडीही मिळाली.विलेपार्ले स्टेशनवर उतरतांच घरीं

धडधडणाऱ्या हृदयानें तो धांवत निघाला. पण उपयोग काय? त्यापूर्वीच त्याच्या आईनें गाडीखालीं उडी घेऊन जीवाचा शेवट करून घेतला होता! केवळ दोन मिनिटांचा फरक! पण त्या तेवढ्या अवकाशानें दोन प्रेमळ जीवांची कायमची ताटातूट केली! म्हातारीची वाणी एवीतेंवीं सत्य ठरली!

दुसऱ्या दिवशीं 'दुंदुभी' पत्रांत खालीलप्रमाणें मजकूर होता.

"चमत्कारीक दैवयोग"

"काल रात्रीं १२ वाजतां विलेपार्ले स्टेशनवर एका ४५ वर्षे वयाच्या प्रेमळ मातेनें आपल्या मुलाच्या उशिरां येण्यानें तो दिवंगत झाला अशा वेडया समजुतीनें वेडावून जाऊन आगगाडी स्टेशनांत शिरत असतां लाइनमध्यें उडी घेऊन आत्महत्या करून घेतली. पण दैवयोग हाच कीं ज्या गाडीखालीं उडी घेऊन तिनें जीवाचें मातेरें केलें त्याच गाडींतून तिचा मुलगा उतरला!! मुलाचें नांव दिनकर कुळकर्णी असून 'इन्कमटॅक्स ऑफिस'मध्यें तो काम करीत आहे."

वरीलप्रमाणें मजकूर वाचून दिनकर धाय धाय मोकलून रडत होता. दोनच मिनिटांचा फरक! पण त्या दोन मिनिटानीं त्याच्या आयुष्यांत किती घडामोड केली! मायेची आई नाहींशी झाली, आनंदी आयुष्य चिंताजनक ठरलें, आपला म्हणण्यास असें कोणीच राहिलें नाहीं. विचार करतां करतां त्याच्या डोळयांतून खळ खळ अश्रू वाहूं लागले.

'काल-स्वभाव' यापेक्षां कुठल्या निष्ठूरतेनें दृष्टीस पडणार?

माथेरान येथील दोन स्थळें.

सर म्यॅलेट यांचा पुतळा:—सर म्यॅलेट हे आपल्या परिवारासहित इ. स. १७५० त माथेरानच्या टेकडीवर येऊन उतरले व त्यानीं माथेरानच्या टेकडीची उपयुक्तता पटविली. माथेरान शहर वसविण्याकरितां त्यांनीं बरीच खटपट केली. त्यांच्या स्मरणार्थ हल्लीच्या म्युनिसिपालटीनें त्यांचा अर्ध पुतळा 'रूगबीपार्क' नांवाच्या क्रीडास्थानांत उभारला असून पुतळ्याच्या चबुतऱ्यावर त्यांच्या प्रयत्नाची माहिती दिली आहे.

चार्लोटी लेक:—ह्या तलावापासून सर्व माथेरानास पाण्याचा पुरवठा होतो. पाणी भरण्याकरितां तलावाच्या कांठावर नळ काढल असून तेथून बैलावरील पखालीनें सर्व गांवास पाणी पुरविलें जातें. तलावाकांठीं भाजीपालाही उत्तम व सर्व प्रकारचा होतो.

समीरण.

ले०—'नक्षत्र.'

वाऱ्याची लहानशी झुळुक लागल्याबरोबर मूक कलिका विकसीत झाली. पानें आनंदानें डोलूं लागली.

वसंताच्या आगमनाच्या वेळीं वाहणारी वाऱ्याची झुळुक झाडांस नवचैतन्य देते. निष्पर्ण झालेल्या वृक्षलतांवर पानांफुलांचा साज चढवून नटविते व सृष्टींत नवचैतन्याचे तेज आणते.

पावसाळ्याच्या शेवटीं धरणीवर हिरवें गर्द रान पसरलेलें असतें. त्या गालीच्यावर बागडणाऱ्या चिमुकल्या रानफुलांना वाऱ्याची झुळुक खेळवते. हिरवेंचार गवत पसरलेलें असतें, त्याला आनंदानें डोलवतें. पाण्यांत पडलेल्या सृष्टीच्या मोहक प्रतिबिंबास हालवून खेळवून नयनाल्हाद दृश्य निर्माण करते.

सायंकाळच्या वेळीं फिरावयास गेल्यावेळीं, टोपी काढून घेतली असतांना आपल्या अंगावरून गार वाऱ्याची झुळुक गेली म्हणजे आपलें मन गुंगून जातें. निसर्गाकडे कधींच लिक्ष न दिलेला मनुष्य सुद्धां वाऱ्याच्या त्या झुळकेनें आनंदीत होऊन क्षणभरच का होईना नसर्गाकडे प्रसन्न मुद्रेनें पाहत राहतो.

उन्हाळ्याच्या दिवसांत तापानें त्रस्त झालेल्या धरणीस वाऱ्याची झुळुक शांत करते, उन्हानें तापलेल्या मनुष्य व मनुष्येतर प्राण्यास अमृततुल्य सुख देते.

सकाळ संध्याकाळ बनांतून एक अस्पष्ट पण नादमधूर गार वारा गात असतो. त्या गानाची गोडी सृष्टीस आळवणारे सृष्टीचे भाटच जाणत ! वारा हा सृष्टीचा गायक आहे.

अफाट दर्यावरून एकलकोंडेपणानें जाणाऱ्या गलबतास वारा मदत करतो. प्रबल समुद्रास आपल्या इच्छेप्रमाणें नाचावयास लावतो.

फुलांवर तर वाऱ्याचे अनंत उपकार आहेत. जाई, जुई, मोगरा, गुलाब वगैरे सुंदर फुलांचा वास वाऱ्याच्या अभावीं जागच्या जागींच विरल पावला असता. स्वार्थी मानवानें वेडेपणानें फुलझाडांच्या बगीच्यास कुंपणाची मर्यादा घातली,तरी वारा कुंपणाची अमर्यादा करून त्यांचा परिमळ आजूबाजूस पसरवितो. उन्हानें करपून गेलेली कलिका वाऱ्याच्या प्रेमळ हस्तस्पर्शानें फिरून प्रफुल्लित होते.

सायंकाळच्या वेळीं आकाशांत ढगांची रंगपंचमी वाराच करतो. बालकाच्या मनाप्रमाणें आकाशांत क्षणोक्षणीं घडणाऱ्या फेरफारांचे चालकत्व वाऱ्याकडेच आहे. वारा ज्याप्रमाणें असा परोपकारी आहे त्याप्रमाणेंच तो विध्वंसकहि आहे. झाडांस ज्याप्रमाणें तो नवजीवन देतो त्याप्रमाणेंच त्यांच्या नाशासहि तोच कारणीभूत होतो. वाऱ्यासारखा स्वैरवृत्ती दुसरा कोणी नाहीं. पावसाळ्यांत हजारों झाडांस उन्मळून पाडाण्यास त्यास कांहींच वाटत नाहीं. तो समुद्रावरच्या लाटांस चलन देऊन गरीब बिचाऱ्या खलाशास एखाद्या अज्ञात खडकावर आपटून जलसमाधी देतो. ज्या फुलवेलीचें त्यानें संगोपन केलें, प्रेमानें कुरवाळलें, त्याच फुलवेलीचा आधार काढून घेऊन तिचा निर्दयपणानें चोळामोळा करून टाकतो.

जो जो परमेश्वराप्रमाणें सृष्टीचे तारण व मारण करणाऱ्या वाऱ्यासंबंधीं मन विचार करूं लागतें तों तों त्याच्या चमत्कृतीजन्य रूपाकडे पाहून मन मोहून जाते व मतीं गुंग होते.

तिसऱ्या वर्षाच्या—

नवीन सुधारणा

पुढील अंकांत वाचा.

बा विंध्यपर्वता !

विंध्यपर्वता ! व्यर्थ जन्म रे झाला आज तुझा; ।
लांबलचक तूं, पाय पसरुनी, झोंपा घेसि कसा ? ॥ १ ।

हिंदुभूमिचा मऊ बिछाना, लाभ तुला त्याचा;
याच्यावरि आडवा पसरसी, लज्जा तिळभरि ना ॥ २ ॥

गतकालाचा राक्षस अससी काय मला वाटे; ।
शंभर योजन आड पसरसी, अमुच्या तूं वाटे ॥ ३ ॥

अरबिसमुद्रामाजीं धुतले हात तुवां साचे; ।
पाय धुण्याला वंगदेशचा उपसागर नाचे. ॥ ४ ॥

बघ सह्याद्री, उभा ताठ तो; तूं अडवा निजसी; ।
पश्चिमभागीं तटबंदी तो; कार्यभंग करिसी ॥ ५ ॥

शत्रूंची करि वाट बंद तो पश्चिम भागाला ।
हितशत्रू तूं होसी साचा अमुच्या भाग्याला ॥ ६ ॥

शिरोमणी तूं, आत्मघातकी, मूर्ख, प्रधानांचा. ।
कंठमणी हा सह्याद्री बघ, उच्च विचारांचा. ॥ ७ ॥

बंधु तुम्ही रे तिघे: हिमालय, दुसरा तूं, सह्य. ।
अग्र, अनुज चढती पदवीला; अवनति तुज साह्य. ॥ ८ ॥

सह्यावरुनी हिमालयाला निघती जे मेघ ।
तुच्छ लेखुनी, तुझ्यावरूनी जाती निर्बंध. ॥ ९ ॥

गगनीं वारे गरगर घिरट्या घालित जे असती, ।
त्यांची:दृष्टी तुझ्याकडे बा ! वळते, जैं श्रमती. ॥ १० ॥

दमुनी, भागुनि, तुजवर जेव्हां विश्रांती घेती, ।
उंच उडत ते जाण्याकरितां धापा कीं देती; ॥ ११ ॥

कृपादृष्टि जैं करण्या वळती मेघ तुझ्यावरती; ।
कडेलोट जणुं होत तयांचा गगनापासूनी ! ॥ १२ ॥
पर्जन्याच्या धारा म्हणती खोल खोल आलों. ।
म्हणुनी दुःखानें अश्रूंचा लोट तयां येतो ! ॥ १३ ॥
मनीं महत्त्वाकांक्षा होती तुझ्या उंच व्हावें; ।
सूर्याची अडवून वाट कीं, जगांत मिरवावें. ॥ १४ ॥
परी नत्र तूं होसी जेव्हां अगस्त्य ऋषि आला, ।
त्याच्या वचनालागुन फससी, दक्षिणेस गेला. ॥ १५ ॥
भीड भिकेची बहिण समज, तूं ऊठ, ऊठ बा, रे ! ।
कार्या लागीं, महत्त्व जोडी, धीर मनीं धरि रे ! ॥ १६ ॥
येसाजी, तानाजी, बाजी, शिवराय, धनाजी ।
दाखिव ऐसा पुरुष एकतरि विंध्या ! तुजपाशीं. ॥ १७ ॥
राय—राजगड, सिंह, तोरणा, प्रतापगड गाजी, ।
दाखिव ऐसा किल्ला एकहि विंध्या ! तुजपाशीं. ॥ १८ ॥
कोठें तो सह्याद्री झिजवी देह स्वराज्याला ! ।
कोठें विंध्या ! दुष्टा, नीचा, ठावहि देसि ठगां. ॥ १९ ॥
मारेकरि पेंढारी, ठग जे, आश्रय त्यांस तुझा. ।
हा, हा, धिक्, धिक्, जीवित तूझें, लाज नसे तुजला. ॥२०॥
तुझा शिवाजी करिमब्रक्ष तो, छद्दू—तानाजी, ।
मारेकरि मावळे तुझे रे ! कैसा तूं पाजी. ॥ २१ ॥
विंध्याचल तूं ! अचल गुण तुझे, कशास तुज शिणवूं ? ।
मानवास तरि बुद्धी ध्याया ईशातें विनवूं. ॥ २२ ॥

श्री. घ. शास्त्री.

नाट्य-छटा	# काव्य आणि व्यवहार	'मंगळ-मूर्ति'

—बस् बस् ! अगदीं बरोबर ! काव्य आणि व्यवहार यांची फारकत असते हेंच खरं ! काव्य ! अहाहा ! तुम्हांला कल्पना नसेल राव, पण काव्यांत एकदां का मन रमलं कीं जगाची शुद्ध रहात नाहीं महाराजा ! मग जेवण नाहीं न् झोंप नाहीं ! नुसतं एक काव्य. बस्!आपला तो हा नाहीं का?...हं,हं;तोच. फार उमदा माणूस ! न् कविता काय करतो पण एक एक ! एहॅ ! नुसता गुंगवून सोडतो. एक एक ओळ तर अशी नादमधुर कीं मी नुसता डोलत रहातों. कालच्या कवितेंतली ती एक ओळ बुवा आपणाला फार पसंत पडली. काय बरं ता ? ...हं ! " अवघें जग हें असार बारे ! काव्याला अमरत्व जाण रे ! " फारच गोड अन् अर्थपूर्ण ओळ आहे बुवा ! काय आहे या जगांत टिकणारं ? दगड, धोंडे, का आपण माणसं ? दिवसाचे चोव्वीस तास आले न् गेले. जमाखर्च बघायचा न् शिल्लक पूज्य मांडायची. काव्यांत असलं कांहीं नाहीं. सारी बेफिकीरी न् आनंद. कसली काळजी नाहीं न् कांहीं नाहीं. पगार कधीं पडला, संपला किती, महिना संपायला दिवस शिल्लक राहिले आहेत किती न् उरलेले पैसे इतके दिवस पुरवायचे कसे, हींच तुमच्या आमच्यासारख्याला चिंता ! आतां काव्यांत पहा ! व्यवहार 'सब झूट' आहे... काय म्हणालीस ?...भाजीला पैसे पाहिजेत आठ आण्याचे ? म्हणजे आहे काय हें ? आठ आण्याची भाजी खायची श्रीमंती कधीं आली म्हणून विचार जा 'घरांत'!...काय मौज आहे पहा एक एक पंत ! नुसत्या भाजीला आठ आण्याचे पैसे ! झींट येऊन पडायचा एकादा माणूस ! व्यवहारांत अशी उधळपट्टी करून कसं चालेल ? आतां ठाकुरद्वारला गेलं तर दोन पैसे स्वस्थ नसती का भाजी पडली ? पण धोरण पाहिजे ना ? आजकाल जगांत दिवस काढायचे तें पदरीं थोडीशी अक्कल न् धोरण बांधून ! येऱ्या गबाळाचं टिकायचं नाहीं या जगांत ! बेटा कधींच खलास व्हायचा न् काय ? च् च्, वीट आला जगाचा पुरता. जगांत कसे दिवस काढायचे कळत नाहीं ! भाजी-पाल्याची तर ही महागाई न् खोलीचं भाडं तर साडे बारा रुपये ! एक पै नाहीं कमी करीत शिंचा घरवाला ! पहिल्या तारखेला पगार पडला कीं पैन्पै मांडलेला खर्च डोळ्या-पुढें ! तिसऱ्या दिवशीं साऱ्या पैशाची विल्हेवाट. अशा परिस्थितींत कसलं सुख न् कसली चैन ?... हो,तें कांहीं खोटं नाहीं.एके काळीं करीत होतों कविता.पण आतां या जंजाळांत पडल्यावर कसल्या कविता घेऊन बसलां आहां राव ? कविता करायला लागलों तर व्यव-हाराची फारकत व्हायची आणि बोलबोलतां भाजीपाल्यांत सुद्धां पैशा-दोन पैशांचा मघांसारखा चाट पडायचा ना ! इतकी श्रीमंति नाहीं बुवा आली आपल्यांत कविता करायला !...अगदीं अस्संच हो ! तुम्हीं सांगितलंत ना, तेंच खरं ! काव्य आणि व्यवहार यांची सदा फारकत असते हेंच खरं !...

(६)

अहाहा ! करुणाघना, तुझी लीला अतर्क्य आहे. अखेरीस या भोपळ्याला तूं माझ्या मदतीला पाठविलेंस. कांहीं हरकत नाहीं. आतां खुशाल हा पोटाशीं धरून, तुझी ही संकटांतील मदत हृदयाशीं कवटाळून बेधडक या पाण्यावर पडून राहीन. माझी खात्री आहे, या भोपळ्याच्या रूपानें तूं मला हात दिला आहेस. मला आतां कसली भीति बाळगायचें कारण नाहीं. आतां फक्त तुझ्या भक्तोचें गाणें गात हा भोपळा जिकडे मला नेईल तिकडे मी जाईन. मला हा तुझ्या रस्त्यावरच नेणार यांत शंका नाहीं. माझ्या पायाला जमीन लागली म्हणजे तूं दिलेल्या कृपाप्रसादाची–या भोपळ्याची एकतारी करून तिच्या मधुर आवाजांत तुझ्या कृपेचीं गाणीं गात मी मार्गक्रमण करीन.

(७)

ही पहा पहाट झाली. पक्षीगण तुझीं गाणीं गाऊं लागले. बायका पाणी आणण्याकरितां नदीतिरीं चालल्या.•त्या पहा, कित्येक जणीं घागरी घांसून पाण्यांत बुडवीत आहेत. घागरीचें तोंड पाण्यांत बुडवतांच हा "बुडबुड" असा आवाज कसला बरें ऐकूं येऊं लागला ? तूं तुझ्या सेवकाकरवीं हा शब्द काढीत आहेस हें खरें ना ? "बुडबुड" आवाज येतांच कांहीं बुडबुडे येऊन ते क्षणांत नाहींसें होतात. पण "बुडबुड" या आवाजाकडे कोणींच कसें लक्ष देत नाहींत ? या 'बुडबुड'चा अर्थ या अज्ञ पामरांना केव्हां कळणार ?

(८)

या सूर्यनारायणाला जास्त जास्त प्रखर होण्याला आज्ञा कर. तो जितका जास्त प्रखर होईल तितकी माझ्या शरीराबरोबर मनांतली घाण बाहेर निघून जाईल. अशा स्थितींत सायंकाळीं गार वारा वाहूं लागला, म्हणजे गार पाण्याचें स्नान करून मी मोकळा होईन. मग मला निर्मळ चित्तानें तुझें गीत गावयाला प्रसन्नता वाटेल. व अशा रितीनें तुझ्या पायापाशीं येण्याची पूर्ण पात्रता माझ्या अंगीं येईल.

(९)

"कानठळ्या बसल्या. कसला ग आजी हा गडगडाट ?"

" बाळ किनई वर्षांतून देवाघरीं एकदां लग्नोत्सव होत असतो. कधीं हा खूप दणदणाटांत होतो, तर कधीं साधा होतो. त्याचें हें दळण चाललें आहे हो. "

" मग आजी, हा मध्येंच होणारा लखलखाट ग कसला ?"

" बाळ, लग्नघरीं नळें चंद्रज्योती लावताहेत त्यांचा. "

" मग आजी, आपण त्याची मुलें आहोंत असें तूं म्हणतेस; मग लग्नाच्या वेळीं तो आपल्याला जेवायला ग कां बोलवीत नाहीं ? "

आजीनें म्हटलें, " असं काय म्हणतोस बाळ ? देवाच्या घरीं लहानापासून तर म्हाताऱ्याकोताऱ्यापर्यंत या जगांतले सर्व जेवायला येणार. इतक्या लोकांत एखाद्याची हयगय झाली तर हें देवाला कळल्यावर त्याला वाईट नाहीं का वाटणार ? म्हणून प्रत्येकाची शिवासामुग्री देव ज्याच्या त्याच्या घरांत पोंचती करतो. देवानं एकवेळची दिलेली सामुग्री आपल्याला एक वर्षभर पुरते. "

" आजी, पण आतां वरात ग केव्हां आपणाला दिसेल ? "

" निघेल थोडया वेळानें. जा झोंप पाहूं आतां. "

थोडया वेळानें जात्याचा आवाज ऐकूं येईनासा झाला आणि प्रकाश पडलेला मला दिसला. मी हळूंच खिडकींत जाऊन पाहिलें ! तर आकाशांत फुलें उधळली जात होतीं आणि नयनमनोहर असा एक पांढरा गोल पुढें पुढें जात होता. मी मनांत म्हटलें " देवाघरची वरात निघाली वाटतं! " आतां नवरदेव आपल्याला पहायला मिळेल म्हणून गुपचूप दार उघडून मी बाहेर जाऊन बसलों. फुलें पडत होतीं व दुसरीं दिसत होतीं. मी सारखा पहात होतों. पुष्कळ वेळ गेला. मी म्हटलें, अजून नवरदेवाचा पत्ता नाहीं ! पण पुन्हा माझ्या डोक्यांत विचार आला. " देवाघरची वरात इतकी मोठी ही असायची ! " कितीतरी वेळानें पूर्वेकडे निरनिराळे रंगाचे बावटे फडकलेले दिसू लागले. हळू हळू नवरदेवाची स्वारी पूर्वदिशीं मला दिसूं लागली. सगळीकडे आनंदी आनंद झाला. कित्येक भूपाळ्या म्हणूं लागले. पक्षी मधूर आवाज काढूं लागले. बहुतेकांच्या घरांतून जात्याचा आवाज, जात्यावर म्हटलेल्या ओंव्या माझ्या कानीं आल्या. मी मनाशींच म्हटलें, लग्न झालें; वरातही निघाली. काल रात्रीं इतकें दळण झालें आणि आतां यांच्या या दळणाचा काय उपयोग ?

(१०)

कोण ? मी नास्तिक ? खुशाल मला नास्तीक म्हणा.मी नास्तिक,कारण मी देवळांत येत नाहीं, भटांना दक्षणा देत नाहीं म्हणूनच ना ? एवढ्यावरूनच जर मला नास्तिक म्हणायचें असेल तर बेशक मला तसें म्हणा. देव भेटायला देवळांत कशाला जायला पाहिजे ? संगमरवरी देवळांत ज्याचा कळस सोन्याचा आहे, ज्याचें दरवाजे चांदीचे बनविले आहेत, अशा देवळांत जेथें अहोरात्र पूजाअर्चा चालली आहे, ज्याच्या अंगावर रत्नजडीत पोशाख आहे, जी मूर्ति पोटाची टिचभर खळगी भरण्या-करितां म्हणून शिल्पकारानीं भोळ्या भाविकांकडून वाटेल तसा पैसा घेऊन आपल्या कसबाची शिकस्त करून बनवली आहे अशा मूर्तीचें दर्शन घेतल्याशिवाय मला मोक्ष मिळणार नाहीं का ? जातिद्वेषामुळें ज्यांना देवळांत यायला मज्जाव आहे अशा, देवळाच्या जवळ बसलेल्या दीन दुबळ्या लोकांच्या करुणगीतापेक्षां तबला, पेटी, तंबोरा अशा निरनि-राळ्या सुस्वर वाद्यावर तुमच्या देवापुढें गायलेली पदें तुम्हांला जास्त वाटतात का ? गरीबांच्या कांटचाकुटयांच्या झोंपडयापेक्षां संगमरवरी दगडांची, सोन्याच्या कळसाची दवळें तुम्हांला जास्त प्रीय वाटतात का?या दीन दुबळ्या लोकांच्या अंत:करणापासून मिळा-लेल्या आशिर्वादापेक्षां नाना थापांनीं दुसऱ्यांकडून पैसे लुबाडणाऱ्या भटाभिक्षुकांचे मिळणारे आशिर्वाद तुम्हांला गोड वाटतात का ? वेडयानों ! भटांना एक मोहर देण्यापेक्षां दीन दुबळ्यांना जर तुम्ही एक पै द्याल तर त्या दुबळ्या जीवाचा मनाचा संतोष मोक्षाच्या मार्गांत तुमचा मित्र होईल !

स्टेशनरी लांकडी सामान व इतर उपयुक्त वस्तु

मिळण्याचें ठिकाण:—

व्ही. प्रभा आणि कंपनी

भटवाडी, मुंबई ४.

" धीर सोडून ? शालीन, तुला काय वाटलं ? मी एकदां नापास झालों म्हणून माझा धीर खचून गेला असं तुला वाटतं ? मुळींच नाहीं तसं."

" मग इतकी डोक्यांत राख कां घालायची ? पुन्हां बसलं म्हणून त्यांत लाज कसली ? "

" लाजेचा प्रश्न नाहीं शालीन इथें ! पण मला पुन्हा बसूं नये असंच वाटतं. "

" कां पण ? तुमच्या बाबांनीं तर लिहिलं आहे कीं पुन्हा तुम्हांला परीक्षेला बसायचं असलं तर त्याला त्यांची ना नाहीं म्हणून."

" मग तुला यांतून कसला सूर वहातो आहे असं वाटतं ? अगदीं स्पष्ट सांगायला त्यांचं मन कचरूं लागलं म्हणून त्यांनीं असं आडवाटेनें आपला हेतु कळवला असं तुला नाहीं वाटत ? "

" कावीळ झालेल्या माणसाला सारं पिवळंच दिसतं. "

" असं कसं म्हणतेस शालीन ? तसा बाबांच्या लिहिण्याचा अर्थ ध्वनित होत नाहीं का ? बरं एक तसं नसलं; म्हणून मी परीक्षेला पुन्हां बसणं कसं दिसेल ? "

" त्यांत लाज कसली बरं वाटायची ? एकएका वर्गांत चार चार, पांच पांच वर्षं रहाणारे थोडे थोडके का सांपडतील ? उगीच नाहीं तें मनांत आणायचं !" शालीन माझ्या कोटाच्या बटणाशीं खेळत म्हणाली.

" त्यांच्यापैकींच तूं मला एक समजतेस का ? चार चार वर्षं एकएका क्लासांत रहायचं म्हणजे बी. ए. होईपर्यंत अर्ध्या आयुष्यावर काळ लोटायचा. त्यांत काय अर्थ ? बरं मी म्हणतों त्या एकटया बी. ए. डिग्रींत तरी काय आहे ? ती डिग्री मिळाली म्हणजे कांहीं सरदारी अन् उमरावी मिळत नाहीं.'बिइंग गिव्हन् टु अंडरस्टँड'चें बंड्ल् खाकेंत मारून सगळीं ऑफिसं आणि बँका धुंडाळल्या पाहिजेतच. नाहींतर कुठल्या तरी शाळेंत कंठशोष करीत राहिलं पाहिजे. मग इतकीं वर्षं घालवून काय फायदा त्यांत ? बी. ए. झालों म्हणून कांहीं शें दोनशांची कुठल्या ऑफिसांतून ' ऑफर ' ही होणार नाहीं. मोठया मिनतवारीनें नोकरी लागलीच तर साठ एके साठचा आंकडा गिरवावा लागणारच. काय आहे उपयोग त्याचा ?"

" बरं, मग आतां तरी काय करणार ?"

" एक चांगला 'चान्स ' आला आहे. माझा एक खिश्चन मित्र आहे. तो ब्रुक बॉंड टी कंपनींत चांगल्या हुद्यावर आहे. मी सकाळीं त्याच्याकडे जाऊन आलों. एक जागा

मिळण्यासारखी आहे. पण ती फिरत्या एजंटाची. दरमहा शंभर रुपये पगार मिळणार. प्रवासाचा सारा खर्च त्यांचा. "

"शंभर रुपये म्हणजे कांहीं वाईट नाहीं. पण फिरता एजंट म्हणजे बाहेरगांवींच तुम्हांला रहावं लागणार." शालीन रडवें तोंड करून म्हणाली.

"होय. तेंच एक वाईट आहे. महिन्यांतून एखाददुसरा दिवस मुंबईला यायला मिळेल; पण इतके दिवस शालीन, तुझ्याशिवाय मी राहूं कसा ?" मी तिचे हात घट्ट आवळून म्हटलें. शालिनशिवाय बाहेरगांवीं एक दिवस घालवायचा म्हणजे केवढें संकट ? मग एजंट बनल्यावर तर महिनेच्या महिने तिच्याशिवाय काढावे लागणार. पण–पण नाहींतर करायचें काय ? कॉलेजांत जावयाचें नाहीं हें मी अगदीं ठाम ठरवलें होतें. मला आतां कॉलेजांत जाण्यांत मुळींच उत्साह वाटत नव्हता. बाबांची जरी तशी इच्छा होती तरी माझा मीच आदल्या रात्रीं बराच विचार केला होता. अशा उतार वयांत बाबांना आणखी किती त्रास द्यावयाचा ? मी कांहीं आतां लहान नव्हतों. हात पाय हालवले तर कांही मला उपाशी मरावयाची पाळी आली नसती. मग मी बाबांना कां त्रास द्यावा ? माझ्यासाठीं त्यांना अजून खर्चांत घालावयाचें हें मला बरें वाटेना. त्यांची मी कॉलेजांत जावें अशी इच्छा होती, तरी फक्त एवढ्या कारणासाठींच मला तें गैर वाटूं लागलें. मी मॅट्रिक पास झाल्यावर माझी बी. ए. पर्यंत जाण्याची इच्छा होती; पण आतां तोहि बेत मी रहित केला. बऱ्याच विचारांतीं मला कळून आलें कीं बी.ए. होऊन तरी काय करावयाचें ? मॅट्रिकमध्यें असतांना बी.ए. होण्यांत मोठा मान आहे असें मला वाटे.पण या दोन वर्षांत मी ज्या कांहीं बी. ए. पास झालेल्यांच्या गोष्टी ऐकल्या त्यानें तर माझी ती आवड अगदीं नाहींशी झाली होती. एखाद्या रिकाम्या जागेचा 'वास' लागला म्हणजे अर्ज घेऊन मोठ्या आशेनें दुसऱ्या कोणाला कळूं न देतां त्या ऑफिसांत जावयाचें,इतर उमेदवारांना दूर करून आपला अर्ज भीत भीत,'साहेबा'पुढें ठेवायचा आणि अखेर तिकडे निराशा वांटण्याला आली म्हणजें दुसऱ्या एखाद्या ठिकाणाचा शोध करण्यासाठीं जिवाची आटापीट करावयाची ! या कींव वाटणाऱ्या हाल अपेष्टांबद्दल विचार कर करून मला अत्यंत उद्वेग आला होता. आणि बी. ए. होण्यांत कांहीच अर्थनिष्पत्ति नाहीं हें 'तात्पर्य ' अखेर मी काढलें होतें. हेंच तात्पर्य मी शालिनीला पटवण्याचा प्रयत्न करीत होतों. आणि तें तिला कांहींसें पटत असलें तरी माझ्याइतकी तिच्यावर कुटुंबाची जबाबदारी नसल्यामुळें इतका खोल विचार करणें तिला शक्य नव्हतें. फक्त तिला माझ्याबद्दल वाटणारें प्रेम आणि जिव्हाळा माझ्याइतका सारासार आणि दीर्घ विचार करण्याला तिला प्रतिबंध करीत होता हें मला स्पष्ट कळत होतें. आपल्यावर आत्यंतिक प्रेम करणारें माणूस फक्त आपल्या प्रेमविषयाच्या सुखसोयी पहाण्याइतकेंच 'आपलपोटें' बनत असतें. असें करतांना यदाकदाचित् इतर माणसांना

कष्ट पडत असले तरी तिकडे डोळेझांक करण्याइतकें तें 'क्रूर' बनत असतें," हा अनुभविक सिद्धान्त आहे. आणि शालीनच्या बाबतींत तर हा स्वभाव मला ठळकपणानें दिसत होता. मी तिच्यापासून दूर न जातां पुन्हां कॉलेजांत जावें हा तिच्या विचाराचा प्रधान हेतू होता आणि माझ्या वडिलावर माझ्या खर्चाचा भार पडूं नये म्हणून मी नोकरी करावी हा गौण हेतु होता. याबद्दल तिला दोष देणें न्याय्य नाहीं हें मला कळत असून सुद्धां मी कर्तव्यनिष्ठुर बनून म्हटलें, "शालीन, यावेळीं तूं सूज्ञपणानें मला माझ्या या कटुकर्तव्यांत हातभार लावणेंच बरें नाहीं का ? तुझ्यासारख्याच माझ्या भावना असतांना मी त्यांना विरोध करून अंतःकरण किती घट्ट बनवण्याचा प्रयत्न करतो आहे, याची तुला कल्पना नसेल ! अशा वेळीं तुझ्या या रडण्यानें मी अजूनपर्यंत राखलेला धीर मात्र नाहींसा होईल. मला यापुढें शिकावंसं मुळींच वाटत नाहीं. मी बी. ए. होऊन विद्वान् व्हावं हीच जर तुझी केवळ इच्छा असेल तर विद्वत्ता कॉलेजच्या पदव्यावरच अवलंबून नाहीं हें लक्षांत ठेव. रिकाम्या वेळांत इतर पुस्तकें वाचून मला आपलं ज्ञान वाढवणं खात्रीनं शक्य आहे. शिवाय तुला पुन्हां सांगायचं म्हणजे एकटा माझ्याच शिक्षणाचा बाबांना खर्च चालवाव-याचा नसून माझ्यापाठीं मधु आणि प्रभा आहेत हें मला नको का पहायला ? माझ्या एक-टयाच्याच शिक्षणाला बाबानीं पैसा खर्च केला तर त्या दोघांची व्यवस्था काय ? त्याचाहि मला विचार करायला पाहिजे. खरं कीं नाहीं शालीन ?"

माझ्या निश्चयानें शालीनला वाईट वाटत होतें हें मला स्पष्ट दिसत होतें. पण माझ तरी त्याला नाईलाजच होता. तिला मी खूब शिकून विद्वान व्हावें असें वाटे. आणि मलाहि तिच्यासारखेंच वाटें. पण—

" ती नोकरी तरी खात्रीची आहे का ? " शालिनीनं आपल्या पायाकडचो नजर माझ्याकडे वळवून विचारलें.

" म्हणजे ? मी उद्यापासून म्हटलं तर उद्यां मिळते आहे. आणि मला वाटतं जर आतां माझं ठरलंच आहे तर उगीच विलंब लावून ही नोकरी हातची घालवूं देण्यापेक्षां ताबडतोब कामावर रुजूं व्हावं."

" ताबडतोब ?" तिच्या चेहऱ्यावर सभय आश्चर्य दिसत होतें. मी तिच्या तोंडावर येत असलेले केस पाठीं करीत म्हटलें,

" शालीन, वाईट कां वाटून घेतेस ? मला तरी तुझ्यापासून कुठें दूर व्हायला पाहिजे ? पण करायचं काय ?"

त्या दिवशीं तिची समजूत करतां करतां मला कितीतरी त्रास पडला.

प्रकरण ११ वें

संन्यासी

शालीनचा विरह सहन करणें हें कांही लहान सहान कांम नव्हतें. त्यासाठीं मी माझ्या मनाशीं कितीतरी निकरानें लढलों. तिच्याशिवाय किंत्येक महिने काढणें हा विचारच मला भंडावून सोडत होता. व्हिक्टोरियांतून बोरबंदरवर जातांना वाटेंत पन्नासदां मला वाटलें असेल कीं परत गाडी पाठीं फिरवून नोकरीवर रुजू होण्याचा बेत रहित करावा. कारण मी पंधरा दिवस नंदगांवला राहिलों तों माझ्या मनाला शालीनची किती तळमळ लागली होती ! मग आतां महिनेच्या महिने परगांवीं रहाणें म्हणजे माझ्यासारख्याला केवढें बिकट काम होतें ? मी मनावर ताबा ठेऊन एखादा महिना तरी काढीन कीं नाहीं याची मला शंकाच वाटूं लागली. मन रमवणारी मोहवश वस्तू दूर करण्याइतकें मनोधैर्य असण्याचें माझें तें वय नव्हतें. आणि म्हणूनच मला राहून राहून वाटत होतें कीं मी माझा निर्धार टिकवूं शकेन कीं नाहीं ?

प्रभाकर मला पोंचवावयाला येत होता. पण मीच मुद्दाम त्याला आडकाठी केली. माझ्या मनाचा निर्धार टिकवावयाचा होता तर त्याला स्टेशनवर येऊं न देणेंच जरूर होतें. त्याला निरोप देतांना माझ्या मनाची चलबिचल होणें सहाजिक होतें. त्या वेळीं माझ्या मनावर दाब ठेवतां येणें माझ्या स्वभावानुसार मला अगदीं अशक्य झालें असतें. माझी मायेची माणसें सोडून मी बाहेरगांवीं कुठल्या आशेनें जाणार होतों ? नंदगांवला जातांना आई, बाबा, मधु आणि प्रभा यांना पहाण्याचें तरी एक कारण मला माझ्या मनाला सांगतां आलें असतें. पण—पण मी आतां सगळीं गांवें हिंडणार तिकडे माझ्या मनाला ओढ लावणारें असें कोण होतें ? आणि म्हणूनच मी प्रभाकराला स्टेशनवर येऊं नको म्हणून सांगितलें. माझें उद्दिष्ट गांठण्यासाठीं माझें मन मला इतकें कठोर करणें अपरिहार्य होतें.

एक कर्णकठोर किंकाळी मारून गाडी स्टेशनमधून भग् भग् करीत निघाली. मी डोकें खिडकीबाहेर काढून पहात होतों. प्लॅटफॉर्मवरून कांहीं जण आपल्या हातांतला रुमाल काढून हालवीत गाडींतल्या आपल्या सुहृदांना खुणावीत होते. तर कांहींजण गाडीबरोबरच दृष्टिआड होत जाणाऱ्या आपल्या प्रिय माणसांकडे नुसते टक लावून पहात होते. गाडीचा वेग जसजसा वाढूं लागला व आंतली व्यक्ति अंधुक अंधुक दिसूं लागली तसतसा प्रत्येकजण पाठीं फिरून आपली वाट सुधारूं लागला.

माझ्याबरोबर स्टेशनवर कोणींच आलें नसल्यामुळें मी रुक्षपणानें, प्लॅटफॉर्मवरच्या माणसांकडे व मधून मधून गाडींतल्या माणसांकडे पहात बसलों होतों. त्यांच्या चेहऱ्यावर आळी पाळीपालटणाऱ्या विकारांवरून मी स्वतःच्या मनाशींच त्या त्या व्यक्तींचें नातें बांधत होतों व आपणाला इतक्या मायेनें निरोप देणारें कोणीच नसल्यामुळें कष्टी मनानें निःश्वास टाकीत होतों. प्रभाकर येत असतांना सुद्धां मन कठोर करून मी त्याला आडकाठी केली होती आणि म्हणूनच मला इतर लोकांप्रमाणें साधन असून सुद्धां मी कर्तव्यपराङ्मुख होऊं नये म्हणून जाणून बुजून मला पदरीं दुःख बांधावें लागत आहे याचें मला कितीतरी वाईट वाटत होतें. मुळांतच साधन नसतें तर ती दुःखाची आंच विशेष कठोर वाटली नसती; पण तशी वस्तुस्थिति असून सुद्धां माझें मन डळमळूं नये म्हणून मला त्याचा प्रतिकार करावा लागला याचें दुःख मला विशेष तीव्र भासत होतें.

अशा विषण्ण मनस्थितींत मी आमच्या डब्यांतल्या आसपासच्या व्यक्तींकडे पहात बसलों होतों. शालीन वगैरे मंडळीच्या विचारांपुढें, माझें त्यांच्या बोलण्याकडे लक्ष लागण्याइतकें मला मनःस्वास्थ्य नव्हतें. गाडींतली प्रत्येक व्यक्ति कुठल्या कुठल्या कारणासाठीं आपल्या आप्तमित्रांना सोडून दूर जात असावी याचा मी माझ्या मनाशीं वाटेल तसा संबंध जुळवीत होतों. परंतु त्यांच्यापैकीं एखादा तरी आपल्यासारखीच परिस्थिति ओढवल्यामुळें मुंबई सोडून जात असेल का असें मला कांहीं केल्या वाटेना—असलें संकट त्यांच्यापैकीं एखाद्यावर सुद्धां कोसळलें नसेल असें मला खात्रीपूर्वक वाटत होतें. जगांत कित्येकांवर बहुशा ओढवणारीं निर्दय संकटें, प्रत्यक्ष माझ्या अनुभवाला अजूनपर्यंत आलीं नसल्यामुळें, मला माझ्यावर सांप्रत ओढवलेली आपत्तीच जगांत एखाद्यावर ओढवलेल्या कुठल्याहि कठोर आपत्तीपेक्षां तीव्र व कष्टमय आहे असें मला वाटूं लागलें. मी विचार करूं लागल्यामुळें माझें डोकें अगदीं भडकण्याच्या बेतांत आलें.

स्टेशनापासून स्टेशनें येत होती आणि जात होतीं. आमच्या डब्यांतल्या उतारूंतहि अनेक विषयांवर गप्पा चालत होत्या. कांहींजण स्वस्थ चित्तानें बरोबर आणलेल्या कादंबऱ्या, नाटकें अगर वर्तमानपत्रें वाचण्यांत दंग झाले होते. डब्याच्या खिडक्यांतूनहि वाऱ्याची सुंदर झुळुक येत होती. डब्यांतल्या गलबल्यानें आणि गाडीच्या खडखडाटानें एकचित्त रहाणे सर्वस्वीं अशक्य असलें तरी माझ्या मनांतल्या उदास विचारांशीं मात्र मी तद्रूप होऊन गेलों होतों. स्वतःच्या मनाशीं मला मूक शब्दांनींच बोलावयाचें असल्यामुळें गाडीच्या खडखडाटापासून अगर डब्यांतल्या उतारूंच्या किलकिलाटापासून मला कांहींच अडथळा पोंचत नव्हता. उलटपक्षीं शांत वातावरणांत सुखदुःखाचे स्वैर विचार यावयाचे ते टळून या गलबलाटांत मला कटु विचारांशीच एकरूप होतां आलें.

माझ्या आनंदी आयुष्याचा शेवट आणि दुःखी दिवसाचा उगम परिक्षेंतील अंनपेक्षित अपयशापासूनच झाला होता. क्रमाक्रमानें आज शालीनला सोडून एजंटाचा क्लिष्ट धंदा करण्यांत त्याचें पर्यवसान झालें होतें. माझ्या घरीं आलेल्या विमा कंपनीच्या एजंटाची कींव करतां करतां बव्हंशीं मलाहि विधिघटनेनें त्याच्याच जातींत ढकललें! त्याच्याचसारखा आतां ज्याच्या त्याच्याकडे तोंड वेंगाडण्याच्या नोकरीचा मी बांधला गेलों होतों. आणि कालमानानें मी या धंद्यांत 'रुळल्यावर' मी किती रुक्ष धंदेवाईक मनुष्य बनेन व माझ्या पूर्व आयुष्याच्या निम्यानें तरी मला जुना आनंद उपभोगावयास मिळेल कीं नाहीं याचा मी विचार करीत होतों.

अखेर माझें डोकें अगदीं भणाणून गेलें. विचारांची नीट सांगड मला बांधतां येईना आणि त्यामुळें डोकें गरगरूं लागलें. दुःखमय गोष्टींचा अति विचार करणें अनिष्ट आहे हें कळत असून देखील मला वळत नव्हतें. मुख्य विचाराला धरून, त्याच्याशीं संलग्न असलेल्या अनेक विचारांनीं माझ्या डोक्यांत इतका घनघोर धुमाकूळ घातला होता कीं अखेर मुद्देसूद विचार करण्याइतकीहि मेंदूंत ताकद उरली नाहीं. कुठल्या कुठें तरी माझें डोकें वहात चाल्लें आणि कसल्या गोष्टीबद्दल माझा विचार करण्याचा रोख आहे हें अजमावण्यालाहि मेंदू कमताकद बनला.

"जय नारायण! दत्तगुरु जय!" स्वतःशींच पण शेजारच्याला ऐकूं जाईल अशा आवाजानें दत्तगुरूचें नाम उच्चारीत एक कांहीसे तरुण वयाचे बुवाजी हातांत एक भगव्या रंगाचें गाठोडें घेऊन कुठल्याशा स्टेशनवर आमच्या डब्यांत चढले. उतारूंच्या मनः-प्रवृत्त्यनुसार जो तो आपले शरीर विस्कळीत करीत आसपासची जागा व्यापूं लागला. हेतु हा कीं, बुवाजी जागा नाहीं म्हणून उतरून दुसऱ्या डब्यांत जातील. दत्तगुरुच्या गंभीर नामोच्चारानें माझे विचार तेथल्या तेथेंच थबकले आणि मी टक लाऊन त्याच्याकडे पाहूं लागलों.

"बेटा, थोडी जागा देतोस?" मी त्यांच्याकडे टक लाऊन पहात असलेला पाहून त्यानीं मला किंचित् हंसून विचारलें. बुवाजीच्या डोळ्यांत 'धूळ' फेंकण्यासाठीं हात पाय वेंगाटून वसलेल्या उतारूंबद्दल मला तिरस्कार वाटला आणि मी माझ्या डाव्या हाताला असलेली हँडबॅग काढून मांडीवर घेतली व त्यांच्यासाठीं जागा केली. थोडया वेळानें गाडी 'शीळ' वाजवून स्टेशनबाहेर पडली. बुवाजींच्या आगमनानें मध्यंतरीं अडथळा आलेलें उतारूंतलें 'संभाषण' गाडी चालूं होतांच पुन्हां सुरू झालें. बुवाजीहि मनांतल्या मनांत व मध्येंच मोठ्यानें दत्तगुरूचा घोष करीत होते. माझे पहिले विचार आतां बरेचसे विस्कळीत झाले होते, आणि मी इकडे तिकडे पहात वेळ काढीत होतो. मधूनमधून मी

बुवाजीकडे पहात होतों. केव्हां केव्हां त्यांची माझी नजरानजर होत होती आणि मी त्यांच्याकडे पहातों आहे हें त्यानां कळलें कीं "जय नारायण! नारायण जय!" असे सहास्य मुद्रेनें, ते मोठ्यानें पुटपुटत खिडकीबाहेर पाहत.

असा बराच वेळ गेला. माझ्या पहिल्या विचारांचा जोर आतां निम्म्यानींहि टिकला नव्हता. मन कशांत तरी गुंतावें म्हणून मी शेजारच्या उतारूंच्या गप्पा ऐकित बसलों. श्रोत्यांची अक्कल अजमावून त्याप्रमाणें कमी अधिक प्रमाणांत गप्पा झोंकण्यांत कांहीं 'शिष्ट' दंग झाले होत. एका उंचेल्याशा, क्षौर केलेल्या व केसाचे दोन झुबके टोपीच्या दोन्हीं बाजूस ठेऊन मधून मधून 'सेंटेड' रुमालानें तोंड पुसणाऱ्या एका तरुणाचा आवाज माझ्या आसपास प्रामुख्यानें ऐकूं येत असल्यामुळें त्याच्याकडेचें बऱ्याच जणांचे डोळे व कान लागले होते. नाटककंपन्याबद्दल आणि नटांबद्दल बोलतानां 'ललितकलादर्श मंडळी' ला आधुनिक नाटककंपन्यांत अग्रेसरत्वाचा मान देऊन पेंढारकरांच्या गायनांतला जीवंतपणा गंधर्वांच्याहि गायनांत सांपडत नाहीं हें खऱ्याखोट्या प्रसंगांनीं साधार सिद्ध करण्याचा प्रयत्न करतांना आपण व पेंढारकर हे कांहीं वर्षांपूर्वी एकाच शाळेंत व एकाच वर्गांत शिकत होतों हें तो मधून मधून 'श्रोत्यां'ना सांगीत होता. औरंगजेबाच्या गाण्याच्या ज्ञानाइतकेंच आधुनिक नटांबद्दल व कंपन्यांबद्दल माहितगार असलेले श्रोते त्या 'तज्ज्ञा'च्या या 'दांडग्या शोधा'नें विस्मयचकित होऊन त्याच्याकडे श्रद्धाळूपणानें पहात होते. त्यांचा मेंदूतला हा ढिलाईचा भाग ओलखून अस्तित्वांत नसलेल्या गोष्टींबद्दलहि बेगुमान बाता झोंकण्याचा मोह त्याला अनावर झाला. लोकविख्यात मृत व्यक्तीच्या पश्चात् त्यांच्या आपल्या गाढ परिचयाच्या कपोलकल्पित गोष्टी सांगून प्रसिद्ध होऊं पहाणाऱ्या एखाद्या फाटक्या माणसापेक्षांहि जिवंत व्यक्तीशीं संबंध जोडूं पहाणाऱ्या या व्यक्तीचें महत्व धाडसाच्या दृष्टीनें जास्त कौतुकास्पद आहे असें मला त्यावेळीं वाटलें;आणि या अफाट जगांत काय एक एक विचित्र मनुष्यस्वभाव दृष्टीस पडतो याचें मला मनाशींच हंसूं आलें.

"बेटा, तूं कुठें चाललास?" मी मान फिरवून डाव्या बाजूला पाहिलें. बुवाजी मनांतल्या मनांत पुटपुटत हंसऱ्या मुद्रेनें माझ्याकडे पहात होते.

"मी...मी सोलापूरला चाललों."

"सोलापूर? कां? सोलापूरला कां जातोस बेटा?"

"एका कंपनीचा एजंट झालों आहे मी नुकताच."

"शिक्षण किती झालंय्?"

"यंदाच इंटर 'फेल' झालों."

"मग परिक्षेला परत नाहीं बसलास? का अभ्यासाचा कंटाळा आला?"

" कंटाळा नाहीं. पण—"

" पण काय ? संकोच वाटतो तुला मला सांगायला बेटा ? " त्यानें माझ्याकडे हंसून पहात विचारलें. त्याच्या त्या सतेज आणि गंभीर मुद्रेकडे पाहून मला वाटत असलेला संकोच मी मनांतून काढून टाकला.

" म्हणजे असं झालं बुवाजी,—"

" बुवाजी ? " त्यानीं हंसत हंसत विचारलें.

" अं ?..... " मी गोंधळून त्यांच्याकडे पाहिलें.

" बेटा, माझ्या या भगव्या कफनीवरून मला बुवाजी म्हटलंस ? मी ती घातली नसती न् बूटपँट घालून तुझ्याकडे बसलों असतों तर तूं मला मिस्टर म्हटलं असतंस नाहीं ?" बुवाजी किंचीत् मोठ्यानें हंसून म्हणाले. मी त्यांच्या या हंसण्यानें बराचसा ओशाळलों; पण त्यांच्याकडे पाहून धीर करीत विचारलें, "मग आपण बुवाजी-संन्यासी नाहीं का ?"

" संन्यासी ? कपड्यावरून माणसाला या नखऱ्या जगांत ओळखायचं बेटा ? तो पाहिलास गप्पा मारतो आहे तो-उंचेलासा, झक्पक् ड्रेस करून बसला आहे तो ? कशी स्वारी थापा मारते आहे ? त्यानं हा असा माझ्यासारखा ड्रेस केला असता,डोकं गुळगुळीत केलं असतं तर तूं त्याला बुवाजी-संन्यासी म्हटलं असतंस ?" माझ्याकडे पाहून बुवाजी आपल्याशींच हंसत " नारायण नारायण " असें तोंडांतल्या तोंडांत पुटपुटूं लागले. त्यांचा हा बुद्धिवाद मला पूर्णपणें पटून मी हनवटीवर डावा हात टेकून खालीं पहात राहिलों.

" ऐकलंस बेटा ?" तो माझ्याकडे वळून गंभीरपणानें पहात म्हणाला. "नारळाच्या कठीण कवटीच्या आंत मऊ खोबरं मिळायचं असली उदाहरणं जगांत थोडी; पण सर्पाच्या मऊ व गुळगुळीत कातडयाच्या बुडाशीं जलाल विष सांपडायचं असलीं सत्यं फार. इतकं कशाला ? मला वर्ष दीड वर्षांपूर्वीं पहिलं असतंस तर मी याच्यापेक्षां उंची कपड्यांनीं सजलेला तुला दिसलों असतों. त्यावेळीं तुझ्या मनांत, आतां जशी माझ्याबद्दल कल्पना आली आहे, तशी आली नसती; पण या भगव्या कफनींत मला पाहिल्यावर तुला माझ्याबद्दल भक्तिभाव वाटायला लागला. खरं कीं नाहीं बेटा ?"

मी आ वासूनच त्याच्याकडे पाहत होतों.त्याच्या या गूढ बोलण्याचा मला कांहींच अर्थबोध होत नव्हता. जाड भगवी कफनी अंगांत घालणारा, कमरेभोवतीं तसल्याच जाड कापडाचें गुडघ्याएवढें 'धोतर' गुंडाळणारा, दाढी, मिशा आणि डोकीवरचे सारे केस 'हद्दपार' करून गुळगुळीत डोक्यानीं आपणाबरोबर बोलत असलेला संन्यासी एका वर्षापूर्वी बूट-स्टॉकिंग्ज् घालून, झक्पक् 'सूट' करून, केस 'पोमेड' नें वळवून सिगारेट ओढीत बसला असेल ही कल्पना मला असंभाव्य कोटींतली वाटं लागली ! मनुष्यांत

इतकी कांति खरोखरच होणें शक्य आहे काय याचाहि त्याच्याकडे प्रश्नसूचक नजरेनें पहात मी विचार करूं लागलों. माझी गोंधळलेली मनःस्थिति त्यानां कळून आलीशी दिसली. एकदां मोठ्यानें खांकरून ते खिडकीबाहेर थुंकले व पहिल्याच सस्मित चेहऱ्यानें माझ्याकडे पहात म्हणाले, " बेटा, असा गोंधळून जाऊं नकोस. माझें हें भयंकर परिवर्तन कां आणि कसें झालें तं ऐकलेंस तर, तुला माझ्या या वेषाबद्दल आणि माझ्या पूर्ण पालटलेल्या मनःस्थितीबद्दल आतांच्या निम्म्यानेंहि आश्चर्य वाटणार नाहीं. समजलास बेटा, मी कांहीं दिवसांपूर्वी एक प्रेमबद्ध तरुण होतों !"

" अं ? प्रेमबद्ध तरुण ? " मी आश्चर्यातिशयानें उद्गारलों. बुवाजींच्या आतांच्या चेहऱ्याकडे आणि वेषाकडे पाहून तशी कल्पनासुद्धां करणें अशक्य होतें.

" होय, मी प्रेमबद्ध तरुण होतों. कोणीहि सुखं भोगलीं नसतील इतकं प्रेमाचं सुख मी भोगल आहे आणि नशीब बलवत्तर असतं तर जन्मभर त्या स्वर्गीय सुखांत निमग्न झालों असतों. पण..." त्या पूर्वस्मृतीनें त्याचा सस्मित चेहरा साफ पडून गेला आणि त्यानें एक मोठा थोरला उसासा टाकला. पुढें काय झालें तें मला त्याच्या दुःखपूर्ण चेहऱ्यावरून कळलें असलें तरी मी आतुरतेनें त्याच्या तोंडचे शब्द ऐकण्यासाठीं त्याच्याकडे तटस्थ मुद्रेनें पहात राहिलों. त्यानें आपल्या जाडशा भगव्या रुमालानें डोळ्यावाटे पाझरलेलें पाणी पुसलें व जड स्वरांत म्हटलें, " पण नाहीं रे बेटा, जग हें क्षणभंगुर आहे.. कुठल्याहि सुखाशेची कल्पना अंतीं खरी ठरत नाहीं. हाताची पांची बोटं आपल्या मुठींत आहेत; तरी तींहि डोळ्यादेखत अलग होणार नाहींत असं छातीठोकपणानं म्हणायला यायचं नाहीं. इतकं हें जग चमत्कृतिपूर्ण अन् क्षणभंगुर आहे. कुठल्याहि वस्तूबद्दल शाश्वति न वाटणं एवढंच काय तें या जगांत शाश्वत आहे; बाकीं सारं-सारं क्षणभंगुर आहे !" त्याचें प्रत्येक वाक्य आणि वाक्यांतला प्रत्येक शब्द इतक्या अर्थपूर्णतेनें उच्चारला जात होता कीं त्याच्या मनांत उद्विग्न विचारांची कशी खळबळ उडाली आहे हें मला स्पष्ट स्पष्ट कळून येत होतें. मी त्याच्याकडे अगदीं सहानुभूतीच्या नजरेनें पाहूं लागलों.

"मी ज्या मुलीच्या प्रेमळ सान्निध्यांत दिवस घालवीत होतों ती माझी सहचारिणी झाली असती तर मी आजन्म सुखी झालों असतों; माझा थोरामोठ्यानीं हेवा केला असता. अशी ती रूपवती गुणी मुलगी होती."

"मग ? एकदम हा फरक कशानं झाला ?" मला धीर न होऊन मी एकदम विचारलें.

" तेंच सांगतों. आमचा हा शुद्ध प्रेमसंबंध कायम टिकावा अशी तिच्या गरीब आईबापाची कितीतरी इच्छा होती. आमचें आम्हांला तर खुद्द असेंच वाटत होतें. पण

माझ्या वडिलानां हा संबंध अप्रिय होता ! आमचे वडील पिढीजाद इनामदार, आणि त्यांचाच मुलगा मी, तुटपुंजा पगारांत आपला छोटासा संसार रुटुरुटु चालवणाऱ्या एका साध्यासुध्या माणसाची मुलगी इनामदाराच्या घरांत सून म्हणून आणावी हें त्यानां पसंत पडलें नाहीं. इतकेंच नाहीं तर त्यानां ही कल्पनाहि सहन होईना. माझ्या अपरोक्ष आणि केव्हां केव्हां माझ्या पुढचांत त्यानीं या मूर्ख निवडीबद्दल माझी कानउघाडणी केली. ही सारी गुणगुण त्यांच्या घरीं गेली. खरंच बेटा, अगदीं सच्छील देवमाणसं तीं ! माझे वडील या लग्नाविरुद्ध आहेत असं कळतांच त्या मुलीच्या बापानं मला एका वाजूला बोलावलं आणि कंठ दाटल्या स्वरांत म्हटलं, "जयवंतराव, तुमचे वडील सांगतात त्याप्रमाणें तुम्हीं तारेची आशा सोडून तुमच्या घराला शोभेल अशा एखाद्या मोठ्या खानदानी घराण्यांतली मुलगी आणून तिच्याशीं लग्न करा. म्हातारपणीं वडिलानां कष्ट देणं वरं नाहीं जयवंतराव ! आपल्या तोलाची माणसं पाहून व्यवहार करायला नको का ?' आणखी किती किती सांगून त्यानीं माझं मन वळवण्याचा प्रयत्न केला. त्यांचा उपदेश मला पटत होता; पण तसं वागणं माझ्या शक्तीवाहेरचं होतं. अखेर तीं माणसं माझ्यासाठीं निर्दय वनली कीं रे ! तारेनें आपण होऊन माझ्याशीं लग्न करण्यास नाकंबूल असल्याचं सांगितलं. त्यावेळीं तिचं मन पिळवट्न आलं होतं. मी वडिलांची अवज्ञा करूं नये म्हणून त्यानीं निर्लोभ मनानं अगदीं काळापेक्षां कठोर वनल्याचा आव आणून आपली मुलगी मला देण्याची इच्छा नाहीं असं स्पष्टपणानं सांगितलं. मी उद्विग्न मनःस्थितींत घरीं गेलों. वडिलांच्या या कृतीनं त्या गरीब आणि प्रेमळ माणसांना दुःख दिलं याचं मला अति वाईट वाटलं आणि वडिलांचा मनापासून संताप आला. आपल्या मुलीमुळें माझ्यांत आणि माझ्या वडिलांत वितुष्ट येऊं नये म्हणून तारेच्या आईबापानीं घाई करून एका गरीबशा कुटुंबांत तिला दिली. माझा मार्ग निष्कंटक करण्यासाठीं त्यानीं हा असा स्वार्थसंन्यास केला—आपल्या आणि तारेच्या आशा—इच्छांवर पाणी सोडलं !"

'बुवाजीं'चे डोळे डवडवून आले. अखेर अखेरचे शब्द त्यांच्या तोंडांतून मोठ्या प्रयासानें निघत होते. पूर्वप्रसंगाची सारीं कल्पनाचित्रें अदृश्य स्वरूपांत त्यांच्या डोळ्यासमोर उभीं राहिली असावीं असें मला त्यांच्या मुद्रेवरून वाटलें. प्रथमदर्शनीं मला त्यांच्याबद्दल वाटणारा भक्तिभाव बराचसा कमी होऊन त्यांच्याबद्दल आतां प्रेम व सहानुभूतिच ज़ास्त वाटूं लागलीं.

बराच वेळ आम्हीं दोघेहि जण स्वस्थ राहिलों. मी त्यांच्या बोलण्याची वाट पहात होतों; पण बोलण्याच्या पूर्वपदावर येण्याइतकें मनःस्वास्थ्य अजून त्यानां वाटत नव्हतें असें त्यांच्या मुद्रेवरून मला ताडतां येत होतें. पण तारेचें लग्न झाल्यानंतर 'बुवाजी'नीं विवाह केला कीं नाहीं हें कळण्याची मला उत्सुकता लागून राहिली असल्यामुळें मी आणखी

थोडा वेळ थांबून विचारलें, " मग तारेच्या विवाहानंतर तुम्हीं वडिलांच्या इच्छेनुसार लग्न केलंत ? "

" नाहीं. "

" नाहीं ? "

" नाहीं. लग्नाबद्दल माझी आसक्ति उडाली. स्वत: तारेनं आणि तिच्या आईबापानं मला समजाऊन सांगितलं तरी मी माझ्या मनांत पक्का निश्चय केला होता कीं यापुढें लग्नच करायचं नाहीं. तारेचा विवाह दुसऱ्याशीं करून मी वडिलांच्या आज्ञेप्रमाणें वागावं म्हणून माझा मार्ग तिच्या वडिलांनीं मोकळा केला असला तरी त्यांचा हा नि:स्वार्थपणा आणि माझ्या वडिलांचा तापटपणा याचा माझ्या मनावर इतका भयंकर परिणाम झाला कीं एका रात्रीं कोणाला न कळवतां सवरतां मी घराबाहेर पडलों आणि त्या वेळेपासून हा असा फटिंगासारखा सारखा भटकतो आहे. या नादान जगाचा मला इतका वीट आला आहे कीं, आत्महत्त्येचं पाप लागत नसतं तर तसंहि करून या जगापासून दूर झालों असतों. पण तें टाळण्यासाठीं आणि पुर्वस्मृति पूर्ण नष्ट व्हावी म्हणून असल्या भगव्या राकट वस्त्रांनीं मनांत सद्भावाची सुबुद्धि निर्माण करण्याचो संचय करतो आहे. आणि त्या प्रसंगानंतर आज दीड वर्षांनीं माझ्या इतिहासाची तुझ्यापुढेंच पहिली वाच्यता होते आहे. बेटा, तूं कधीं असल्या प्रेमांत सांपडला आहेस का ?"

अकस्मात आणि अनपेक्षित असा हा प्रश्न मला 'बुवाजीं'नीं विचारल्यामुळें मी एकदम चमकून त्यांच्याकडे पाहिलें.

प्रकरण १२ वे.

भवितव्य.

'बुवाजी'नीं हा प्रश्न बोलण्याच्या ओघांतच विचारला कीं मुद्दाम माझा 'इतिहास' कळण्यासाठीं विचारला हें पहाण्यासाठीं मी त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें. आपल्या प्रेमकहाणीच्या स्मरणानें त्यांच्या चेहऱ्यावर आलेली उद्विग्नता अजून तशीच होती. खिडकीच्या चौकटीवर टेंकलेल्या हाताच्या आधारावर आपले डोकें ठेऊन ते सचिंत मुद्रेनें माझ्याकडे पहात होते. त्यांच्या नजरेला नजर भिडवतां न येऊन मी पुन्हां खालीं पाहिलें.

" माझ्या प्रश्नाचं उत्तर नाहीं दिलंस ! " त्यांनीं तोच प्रश्न पुन्हां विचारल्यामुळें बोलण्याच्या ओघांत त्यानीं मला प्रथम विचारलें नसून त्यानां त्यांच्या प्रश्नाचें उत्तर माझ्याकडून खरोखरीच पाहिजे आहे याबद्दल मला संशय राहिला नाहीं. पण मला तसें वाटलें तरी त्यानां काय उत्तर द्यावें हा मला आतां प्रश्न पडला. त्यानीं आपली प्रेम

कहाणी माझी पूर्वी मुळींच जानपछान नसतांना सुद्धां सांगितली, तर अशा दिलदार माणसाकडे आपणालाहि हृदय उघडें करावयाला काय हरकत आहे असें मला वाटूं लागले. पण त्यानीं तसा धीर केला असला तरी माझ्या तोंडून शब्दोच्चार होणेंहि जड झालें. समानशीलाच्या दोन माणसांत दोघांना समान असलेल्या विषयाबद्दलचें अंतःकरणांत दूर दडून बसलेलें रहस्यहि सांगतांना एक प्रकारचा अननुभूत आनंद वाटत असतो आणि विशेषतः प्रेमविषयक गोष्टींत तर स्वर्गीय सुख वाटत असतें. पण असें असलें तरी प्रेमविषयक गोष्टीबद्दल बोलतांना लज्जेमुळें जी भीड वाटते तशी भीड इतर प्रसंगीं वाटत नाहीं. प्रेमरहस्य आपण रंगवून निरनिराळ्या तऱ्हेनें सांगावें आणि श्रोत्यानेंहि तें सावधानपणानें व मनापासून ऐकावें अशी आपल्या मनांत प्रबल इच्छा असली तरी प्रत्यक्ष तोंडांतून शब्द उच्चारण्यावेळीं मनाचा कांहीं कारण नसतां थरकांप होत असतो. शालिनीच्या रूपाचें, गुणाचें, सर्वांगाचें मोहक वर्णन करावें असें मला अतिशय वाटत होतें; पण ओंठाकडे आलेला शब्द कुठल्या तरी अदृश्य शक्तीने आंत ओढला जाऊन तसाच ओठांत घुटमळत राही.

बराच वेळ स्तब्ध रहाणेंहि अनुचित आहे असें वाटून मी माझें खवळलेलें मन स्थिरावण्याचा प्रयत्न करीत रुमालानें तोंड पुशीत म्हटलें, "तुमच्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं म्हणजे—असा प्रसंग वऱ्याच तरुणांवर येतो असं म्हणायला हरकत नाहीं."

"त्या वऱ्याच तरुणांत तूं मोडतोस का?" माझ्या चेहऱ्याकडे रोखून पहात त्यानें विचारलें.

"अं...हो!" मी घुटमळत आणि किंचित् अर्धवट स्वरांत म्हटलें.

"सुखी रहा! सुखी रहा बेटा! कसलीहि आपत्ति न येतां तूं आयुष्यांतली मौज लूट! पुस्तकी पाठ घोकून जगांतलीं तत्त्वं न् नितिमत्ता पाठ झालेल्या बडया विद्वानांना हा अक्षम्य गुन्हा वाटत असला तरी या भाववंधनाचं सुख त्यांच्या कोरडया ठणठणीत अंतःकरणाची कणाएवढी जागासुद्धां कधीं व्यापायचं नाहीं! आपल्या अकलेचा गाजावाजा करण्यांत अन् महत्त्व–मान्यतेचा टेंभा मिरविण्यांतच ज्यांचं आयुष्य रुक्षपणानं जायचं त्यानां हे दिलादिलाचे नाजूक लागेबांधे काय ठाऊक बेटा? मानमान्यता आणि जडजवाहीर मिळण्यासाठीं जगाशीं झुंजणाऱ्या माणसांचं जीवन माझ्या मतानं अत्यंत रुक्ष अन् नीरस आहे. जन्मांतलं रहस्य अशा माणसांना कळणं कल्पांतापर्यंतहि शक्य नाहीं. या माणसांनीं जगावं, झुंजावं आणि मरावं; यापलिकडे त्यांनीं माणुसकीचं चीज केलं आहे असं कोणीहि म्हणणार नाहीं. मेल्यानंतरहि स्वर्गांत जें अनुपम सुख भोगायचं भाग्य एखाद्या माणसाला मिळतं तो खरा माणूस, अन् त्यानंच माणुसकीचं खरं चीज केलं बेटा!"

'बुवाजी' एकदम बोलण्याचे थांबले. त्यांचें हें 'तत्व' मला पुरोपुर पटत होतें. शालीनबद्दल विचार करतांना 'बुवाजींच्या' विचारांपर्लीकडे सुद्धां माझी मजल जाऊन अननुभूत अशा नवख्या सुंदर अशा कुठल्या तरी वातावरणांत तरंगत असल्यासारखें मला त्यावेळीं वाटे. त्यावरून मला 'बुवाजी'च्या आतांच्या मनःस्थितीबद्दल नीट कल्पना आली.

दोन, चार मिनिटें स्तब्धतेंत गेलीं.गाडी आपल्या नेहमींच्या वेगानें जात होती आणि उतारूंच्याहि इकडल्या तिकडल्या गप्पांत अजून खळ पडला नव्हता. मधल्या एखाद्या स्टेशनावर गाडी उभी राहिली कीं कांहीं उतारू आपल्या सामानसुमानासह उतरत होते आणि नवीन उतारू धडपडत आंत येऊन त्यांच्या जागेची मालकी घेत होते. 'बुवाजी'-च्या तत्त्वाचा विचार करित या उतारूंपैकीं 'बुवाजी' म्हणतात त्याप्रमाणें माणुसकीला जागणारे कितीजण आहेत तें मी प्रत्येकाच्या चेहेऱ्याकडे निरखून पाहून ताडण्याचा प्रयत्न करीत होतों. प्रत्येकाकडे नजर फेकतां फेकतां माझें लक्ष सहज माझ्यापासून पांच दहा हातांवर पाठीमागें बसलेल्या एका व्यक्तीकडे गेलें. महेश्वराला तेथें पाहून मला जितकें आश्चर्य वाटलें तितकाच मला त्याच्याबद्दल तिरस्कार वाटला. मी झटकन माझी मान वर उचलली आणि 'बुवाजी'कडे पाहिलें. ते आपली मान पाठीं करून महेश्वराच्याच दिशेकडे पहात होते. त्यांच्या चेहऱ्यावर कसलाच विकार उमटलेला दिसत नसला तरी पण त्यांच्या मनांत कसली तरी भयंकर खळबळ उडत असून ते पहात होते त्या व्यक्तिमुळेंच त्यांची अशी मनःस्थिति झाली आहे असें मला त्यांच्या चेहऱ्यावरून ताडतां येत होतें. इतकी त्यांची नजर जादूनें खिळण्यासारखी त्या दिशेकडची कुठची व्यक्ति आहे ते मी त्यांच्या आणि 'बुवाजीं'च्या चेहऱ्याकडे पाहून अजमावण्याचा प्रयत्न करीत होतों.

कांहीं वेळानें त्यानीं एक दीर्घ उसासा टाकला आणि मान फिरवून माझ्याकडे पाहिलें.

"कोणाला पहात होतां तिकडे?" माझ्या तोंडून चटकन् शब्द निघाले.

"पहात होतों? हं:, असाच आपला एक!" शुष्कपणानें हंसून त्यानीं म्हटलें.

"तो केसाची वाटोळी टोपी घालून बसला आहे तो का?"

"हं! तूं ओळखतोस त्याला?"

"हो."

"होय?" त्यानीं एकदम चमकून विचारलें. मी आतां काय बोलतों इकडे त्यांचे कान आतां उत्सुकतेनें लागल्यासारखे दिसले.

"तो महेश्वर कारखानीस ना?"

"हो. तुझी कुठली ओळख?"

" ओळख ? आहे अशीच. पण तुम्हीं त्याला ओळखतां ? "

" होय. मघांशी मी तुला सांगितलं त्या तारेचा हा नवरा ! "

" काय ?" मी भान न राहून एकदम मोठ्यानें ओरडलों. आसपासचे उतारूहि माझ्याकडे वळून पाहूं लागले. 'बुवाजीं'कडून या उत्तराची मी स्वप्नांत सुद्धां अपेक्षा केली नसती. ज्यानें मध्यंतरीं प्रभाकराला नादीं लावलें होतें, ज्यानें शालीनशीं असभ्य वर्तन केलें होतें आणि जो चारचौघांत अनितिमान् आणि दुर्व्यसनी म्हणूत ओळखला जात होता तो स्वार्थ-संन्यास केलेल्या उदात्त अंत:करणाच्या तारेचा नवरा ! माझा माझ्या कानावरच विश्वास बसेना. माझ्या कानांनीं ऐकलें तें कांहीं तरी कीं बुवाजींच्या तोंडांतून निघालेले शब्द खरोखरी ते बोलले नसून निवळ भास होता हें मला कांहींच कळेना. माझें डोकें गरगरूं लागलें. महेश्वराबद्दल मला जो तिटकारा होता तो त्याच्या या नव्या नात्याच्या जाणीवेनें जास्तच वाढला. 'बुवाजी'नीं आपलें जें पूर्वचरित्र मला सांगितलें होतें त्यावरून मला तारेच्या उदात्ततेची बरीच कल्पना आली होती. आणि 'बुवाजीं'चा केवळ जीव कीं प्राण असलेली तारा महेश्वरासारख्या निंद्य मनुष्याची पत्नि व्हावी हें मला केवळ दैवदुर्विलसित वाटलें !

'बुवाजी' मलूल चेहऱ्याने आपल्या पुढचांतल्या काठीवर दोन्ही हात व तोंड ठेऊन बसले होते. त्यांच्या मनांत या वेळीं कसलें तुंवळ युद्ध चाललें असेल याची मला कल्पना करतां येत होती. कोणालाहि त्यांच्या करुण चेहऱ्याकडे पाहून त्यांची कींव आली असती. मला त्यांच्या दुर्भाग्यावद्दल आणि त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून जितकें भडभडून आलें त्यापेक्षां महेश्वराचे शिकदंर नशीब पाहून दैवघटनेचें आश्चर्य वाटलें. किती चंचल आणि दु:खपूर्ण हें जग आहे ! 'बुवाजीं'ची हकीगत कळण्यापूर्वी महेश्वराच्या या भाग्याबद्दल मी उदासीन राहिलों असतों पण 'बुवाजी'च्या प्रेमकहाणीनें माझ्या मनांत जें त्यांच्याबद्दल सहानुभूति आणि प्रेम उत्पन्न झालें होतें त्यामुळें या दोघांतला दक्षिणोत्तराइतका विरोध पाहून मला 'बुवांजां'बद्दल अत्यंत आपलेपणा आणि महेश्वराबद्दल दुप्पट तिरस्कार वाटूं लागला !

" बुवाजी, हा महेश्वर अत्यंत नीच मनुष्य आहे ! " मी त्या उद्वेगाच्या भरांत चटकन बोललों.

" अं ? " त्यांनीं वर मान उचलून दोन्ही भुंवया वर चढवून माझ्याकडे पाहिलें.

" महेश्वराची न् माझी चांगली जानपछान आहे. त्याच्यासारखा नीच माणूस मी पाहिला नव्हता आजपर्यंत."

" म्हणजे ? " मी बोललों त्यांतलें प्रत्येक अक्षरान् अक्षर त्यांचें आश्चर्य वाढवीत होतें.

" म्हणजे काय? आमच्या कॉलेजांत असतो हा ! कॉलेजांत त्याची कीर्ति भरपूर पसरली आहे आणि एखाद्या कुटुंबांत याचें येणेंजाणें सुरूं झालें कीं लवकरच कांहीं तरी तेथें ब्रह्मघोंटाळा उपस्थित व्हावयाचा ही खूणगांठ अगोदरच मनाशीं बांधून ठेवावी. "

मी उद्वेगाच्या भरांत भराभर बोलून गेलों; पण 'बुवाजीं'च्या मनावर त्याचा अगदीं विपरित परिणाम झाला. मी महेश्वराबद्दलच्या तिरस्कारानें हें सारें बोलून गेलों; पण 'बुवाजीं'ची आधींच प्रक्षुब्ध झालेली मनःस्थिति या नव्या आघातानें अत्यंत व्याकुळ झाली. आपल्या दुर्दैवाची कहाणी सांगून दुःखमग्न झालेलें त्यांचें अंतःकरण पूर्वपदावर येण्यापूर्वीच त्यांत आणखी मी सांगितलेल्या नव्या माहितीची भर पडल्यामुळें त्यांची मनःस्थिति अत्यंत अनुकंपनीय झाली. त्यांच्या काळवंडलेल्या मुद्रेवरून त्यांची मानसिक स्थिति मला ताडणें अशक्य नव्हतें. तारेचा विवाह आपल्याशीं न होतां दुसऱ्याशीं झाला या दुःखप्राय विचारानें त्यांच्या मनावर जितका परिणाम झाला होता त्यापेक्षां तिचा नवरा असला दुर्गुणाचा पुतळा आहे हें ऐकून त्यानां अपरिमित दुःख झालें. 'बुवाजी'सारखा भग्नहृदय मनुष्य आपल्या एकाकाळच्या पत्नीरूप असलेल्या तारेबद्दलच्या निराशेनें जितका दुःखी झाला होता, त्यापेक्षां तिच्या नव्या संसारांत तिला मिळालेला जोडीदार असा करंटा निघालेला पाहून शतपटीनें दुःखी झाला. या दुःखापुढें त्यांना आपल्या भग्नाशेचें दुःख मुळींच तीव्र भासलें नाहीं. उदात्त अंतःकरणाच्या धीरगंभीर व्यक्तिचा मनोधर्म असाच उच्च स्वरूपाचा असतो.

'बुवाजी'बद्दल नाना तऱ्हेचे विचार माझ्या मनांत येऊं लागले. 'बुवाजी' आणि महेश्वर या परस्परविरोधी स्वभावाच्या दोघां व्यक्तिंच्या सामन्यांत 'बुवाजीं'ची सत्याची बाजू लंगडी पडावी आणि महेश्वरासारख्या नीच मनोवृत्तिच्या माणसाची सरशी व्हावी हा जगाच्या न्यायाचा मला एक नमुना पहावयास सांपडला.या अफाट जगांत असले कटु अनुभव किती जणांच्या प्रत्ययास येत असतील आणि कितीजण 'बुवाजी'सारखे असे फटिंग बनून वणवण फिरत असतील याचें कल्पनाचित्र मी डोळ्यासमोर आणण्याचा प्रयत्न करूं लागलों. विचार करतां करतां माझ्या स्वतःबद्दलचा विचार माझ्या डोळ्यापुढें उभा राहिला. माझ्या अदृष्टांत काय आहे हें मी ताडण्याचा प्रयत्न करूं लागलों. वरवर पाहूं गेलें तर मलाच काय पण माझी संपूर्ण माहिती असलेल्या तिऱ्हाइतालासुद्धां माझें शालीनशीं लग्न होण्यांत कसलाच अडथळा उद्भवणें शक्य नाहीं असें वाटणे शक्य होते. पण 'बुवाजीं'चा पूर्वेतिहास चटकन् माझ्या नजरेसमोर उभा राहिला. तारेच्या सहवासांत सुखानंदांत मग्न असतां 'बुवाजी'नां तरी आपल्या दुर्भाग्याची पूर्वकल्पना झाली होती काय ? त्यावेळीं एखाद्या नाणावलेल्या फलज्योतिषानें जरी त्यांना त्यांच्यावर ओढणाऱ्या आपत्तीची जाणीव देण्याचा प्रयत्न केला असता तरी 'बुवाजी'नीं त्यांची शुद्ध मुर्खांत गणना करण्यासारखी त्यांची परिस्थिति होती. अज्ञाताच्या दाट पडद्याआड असले निष्ठूर भवितव्य दडून राहिलें

आहे हें 'बुवाजी'नां अगर त्याच परिस्थितींत असलेल्या दुसऱ्या एखाद्याला वाटण्याचें काय कारण होतें? पण असलीहि अकल्पित आणि वरवर पूर्ण अशक्य वाटणारी गोष्ट खरोखरीच घडून आली ना? मग आपल्याहि अदृष्टांत असलेंच कठोर भवितव्य कशावरून नसेल?

"देवाची इच्छा!" बुवाजींच्या तोंडून शब्द निघाले. मी एकदम दचकलों! आपल्या विचाराशीं तद्रूप होऊन त्यांच्या तोंडून हे शब्द अखेर निघाले असले तरी नुकत्याच माझ्या मनांत आलेल्या विचाराला प्रत्युत्तर म्हणून तर हे शब्द दैवी घटनेनें उच्चारले गेले नसतील ना अशी माझ्या मनाला हुरहुर वाटूं लागली. मी भयचकित मुद्रेनें त्यांच्याकडे पाहिलें. ते आपल्या मनांतल्या विचारांचा पसारा आटोपून आपल्या भगव्या रुमालानें आपले डोळे पुसीत होते. या विचारांत किती वेळ गेला हें मला कळलें नाहीं.

प्रकरण १३ वें

अदृष्ट.

"मी आतां पुढल्या स्टेशनवर उतरणार!" बुवाजी नीट बसून म्हणाले.

"पुढील स्टेशन कुठलं आहे?" मी बाहेर पहात विचारलें.

"धोंड!"

"तिकडे कशाला उतरणार?"

"तेंच माझं गांव आणि तुला सगळा माझा पूर्वेतिहास सांगितला तो याच गांवचा."

"मग परत तुम्हीं घरीं जाणार?" मी आश्चर्यचकित होऊन विचारले.

"छेः; घरीं जाणार नाहीं; पण त्या घरावरून एक फेरी मारून येणार आहे. तारेला एकदां पुन्हां पाहाणार आणि त्या एका दृष्टीक्षेपांत वर्षदीड वर्षांची उत्साहाची शक्ती सांठवून पुन्हा कुठें तरी जाणार!"

अरेरे!" 'बुवाजी'बद्दल दया येऊन चटकन माझ्या तोंडून उद्गार निघाला.

"अरेरे? माझ्याबद्दल तुला दया वाटली? माझ्या मनःस्थितीची तुला नीट कल्पना आली म्हणून तुझ्या तोंडून असा उद्गार निघाला. समानशील माणसानांच एकमेकाच्या व्याधि कळायला सोप्या जातात. माझ्याबद्दल तुला दया आली, तुझ्याबद्दल

दुसऱ्याला येईल, अशीच जगांत सगळीं माणसं असलीं तर वैर आणि द्वेषबुद्धि यांचा ठावठिकाणाहि रहाणार नाहीं. हो, तुझी हकिगत मला सांगितली नाहींस ? अन् तुझं नांव काय वरं ?

" जयवंत. "

" हं; माझ्यातुझ्यांत निदान नांवापुरतं तरी साम्य आहे. बरं, तुझी हकिगत सांग पाहूं ! " माझा पूर्वीचा संकोच आतां मुळींच राहिला नव्हता; पण अजूनपर्यंत त्याबद्दल वाच्यता करण्याचा पूर्वी कधींच प्रसंग आला नसल्यामुळें मी चाचरत कशीबशी सारी हकिगत सांगितली. माझी हकिगत ऐकल्यावर दोन, तीन मिनिटें कसला तरी विचार करित खिडकीबाहेर किलकिल्या डोळ्यानीं 'बुवाजी' पहात राहिले व नंतर माझ्याकडे वळून म्हणाले,

" काय रे जयवंत, शालीनशीं तुझं लग्न कधीं होणार ? "

" तें कांहीं सांगतां येत नाहीं. "

" पण होणार हें तरी नक्की ना ? "

" अं—हो ! " मी वावरून उत्तर दिलें.

" तुझ्या घरीं या लग्नाबद्दल वाच्यता झाली आहे का ? "

" घरीं ? लग्नाबद्दल कांहीं झाली नाहीं; पण मी शालीनच्या घरीं जातो येतो हें मीच त्यानां सांगितलं होतं. "

" मग तूं लग्न नक्की होईल म्हणून कसं म्हटलंस ? " 'बुवाजी' आपल्याशींच किंचित् हंसून म्हणाले.

" म्हणजे ? " त्यांच्या त्या प्रश्नानें आणि स्वत:शींच हंसण्यानें माझ्या मनांत भीति उत्पन्न होऊन मी विचारलें.

" म्हणजे असं बघ, तुझ्या घरीं या गोष्टीबद्दल कांहींच बोलणं चालणं झालं नाहीं न् तूं म्हणतोस लग्न नक्की होईल म्हणून ! "

" हो, बाबांना मी सांगितलं तर—तर —"

चटकन् एक पूर्व प्रसंग माझ्या नजरेसमोर उभा राहिला. गेल्या सुटींत मी नंदगांवला गेलों असतानां बाहेरून फिरून आल्यावर जिन्याजवळून माजघरांतील बाबांचे जे शब्द मी आडून ऐकले होते ते चटकन माझ्या डोळ्यापुढें नाचूं लागले आणि मला बोलावयाचे होते ते शब्द माझ्या तोंडांतच घुटमळत राहिले. मी बाबांना माझ्या या नव्या नात्याची माहिती सांगण्याइतका अगोदर धीट बनेन कीं काय, आणि यदाकदाचित् तितके धैर्य मी त्यावेळेपुरतें उसनें आणलें तरी माझ्या सांगण्यावरून त्यानीं पूर्वीच

ठरवलेली मुलगी ते नापसंत करतील कीं नाहीं याची मला शंका वाटली. बाबानां मी शालीनची आणि तिच्या इतर मंडळीच्या चांगुलपणाचो साक्ष पटवली तरी त्यानीं नंदगांवच्या देशमुखानां पूर्वी दिलेला शब्द मोडण्यास ते कबूल होतील असें मला मुळींच वाटेना. बाबानां अब्रूची चाड किती आहे हें मला ठाऊक होतें आणि त्यांच्या करारी स्वभावाचीही मला पुरोपुर जाणीव होती. मग असें असतानां मी कुठल्या खात्रीनें 'बुवाजी'नां सांगत होतों कीं माझें आणि शालीनच्या लग्नाचें नक्की ठरलें आहे ?

मी वाक्य पुरें न करतां मध्येंच कांही तरी आठवल्यासारखें करून स्तब्ध राहिल्यामुळें 'बुवाजी'नीं विचारलें, " जयवंत, मध्येंच गप्प कां राहिलास ? तुझ्या बाबांना तूं सांगितलंस तर ते कबूल करतील ना ?"

" नाहीं बुवाजी ! मला आतां त्याबद्दल अनिश्चिनी वाटते आहे." मी खालीं मान घालून म्हटलें.

" पाहिलंस ? मी म्हणत होतों तें हेंच. कुठल्याहि मनुष्यानें मला एखाद्या गोष्टीबद्दल खात्रीपूर्वक कांहीं सांगितलं कीं माझा त्याच्यावर थोडासुद्धां विश्वास बसत नाहीं. आणि त्याला निरनिराळे हजार प्रश्न विचारून त्याबाबतची अशक्यता सिद्ध करण्याचा मी प्रयत्न करतो. माझा तर आजकाल स्वभावच बनून गेला आहे कीं कुठलीहि गोष्ट शाश्वत -खात्रीलायक मुळींच नसावयाची. एखाद्याचें लग्न ठरल्यापासून तों प्रत्यक्ष त्याच्या गळ्यांत वधूची माळ पडेपर्यंत मी त्याच्या लग्नाच्या खात्रीबद्दल शंका काढत बसेन. म्हणून मी तुला प्रथम विचारलें कीं तुझ्या लग्नाचें खरोखरीच नक्की ठरलें आहे कीं काय ! कारण, कोणी सांगावं, उद्यां कदाचित् तिचं कांहींतरी बरं वाईट होईल, तिच्या घरच्या माणसांची बुद्धी फिरेल, तुझं मन पालटेल, तुझ्या घरची मंडळी या लग्नाला मोडता घालतील किंवा दुसरी कुठलीहि अनपेक्षित आपत्ती ओढवून हें ठरलेलं लग्न मोडेल ! "

" हूऽऽऽऽ " एक कर्कश किंकाळी मारून आगगाडी स्टेशनमध्यें शिरली. माझ्या अंत:करणांत धस्स झालें !

" चला, आलं स्टेशन. जयवंत बेटा, माझी ओळख विसरूं नकोस. मला डब्यांत चढावयाच्या पूर्वी नव्हतं वाटलं कीं माझ्यासारखाच एखादा मनुष्य आंत सांपडेल आणि तुझी तरी माझ्याबद्दल कुठून कल्पना असेल योगायोगाच्या गोष्टी आहेत या बेटा !"

"हं. " मी मलूल चेहऱ्यानें बाहेर पहात म्हटलें.

" असा हताश काय झालास, जयवंत ? तुला मी मघां सांगितलं त्याचं तुला वाईट वाटलं ? अरेरे ! मी उगाच बोललों तर ! माझ्या आतांशा या चमत्कारिक बनलेल्या स्वभावामुळें बोलण्याच्या भरांत मी माझं सारं मन मोकळं करतो. खरंच, माझ्या अदृष्टांत

जगाचा न्याय.

लेखक–पंडित विष्णु वाणी, चोपडा.

—पूर्वार्ध—

(विलासपुरांतील धनिकाग्रणी धनदास शेट यांच्या दुकानासमोरील देखावा. एक पंधरा सोळा वर्षांचा, दोनहि डोळ्यांनीं अंध असलेला हिंदु मुलगा 'आंधळ्याला पैसा विठोबाच्या नांवानं, पांडुरंगाच्या नांवानं द्या हो मायबाप' असा केविलवाणा हेल काढीत प्रवेश करतो.).

मुलगा–मायबाप, आंधळ्याला कांहीं द्या हो. तुमाला लई पुन्य लागील. जास्त नाहीं मागत बगा; एकच पैसा द्या शेट साहेब. गरिबाला फुटाणे खाऊन पाणी प्यायला आधार होईल ! (हात जोडून) दादा, एवढी कृपा करा बगा. माझा अंतरात्मा लई दुवा देयल !

धनदास—(शेपटीस केवळ ओझरता स्पर्श झाल्यानेंहि खवळणाऱ्या सर्पाप्रमाणें उसळून) भिकारड्या, तुझी फाजील लांबलेली जीभ चांगलीच आंखूड करावी लागेल ! चल, नीघ. मला तुझ्या आशिर्वादाची मुळींच आवश्यकता नाहीं...पुटपुटतोस काय असा? तुझ्यासारख्याच्या तळतळाटानं काय होणार आहे माझं ?

मुलगा–(लाचारपणानें) महाराज, पूर्वजन्मींच्या पापाचं प्रायश्चित म्हणून दुःखाच्या नरकांत बुचबुचणाऱ्या क्षुद्र कीटकाचा तळतळाट आपल्यासारख्या देवमाणसाचं काय करूं शकणार ? आणि तुमच्यावर जळफळण्याचा आम्हां फाटक्या अंगाच्या भिकारड्यांना तरी काय अधिकार ?

धनदास—(शिपायाकडे वळून) ए कुबड्या, लेकाच्या बसलास काय असा शुंभासारखा ? केव्हांची या पोरानं लावलेली टकळी ऐकूं नाहीं येत वाटतं ! इकडे ये,कान बसले असतील तर सळई घालून भोकं मोठीं करून देतो !—चल, हाकल त्याला ! या बेटयांना हात पसरायला लाज कशी नाहीं वाटत कुणास ठाऊक !

कुबड्या—(दुकानास झाडू लावीत असतां) चलरे भिकारड्या; तुला शरम कशी नाहीं वाटत ? तुझा विठोबा काय भिक मागण्यास शिकवतो होय ?

मुलगा—बाबारे, सगळ्या जगानें जरी मला निर्लज्ज म्हटलें तरी मला लाज कशी वाटणार ? पोटाच्या होळींत माझ्या लज्जेची राख कधींच झाली आहे ! माझा हा धंदाच झाला आहे आतां भीक मागण्याचा !

कुबडया—(दुकानांतील केर गोळा करून) अच्छा ! धंदेवाईक भिकाऱ्यांना देण्या-करितां आमच्यासारखे दातेही नेहमीं तत्पर असतात !—चल; घे.

असें म्हणत त्यानें त्या आंधळ्याच्या हातावर केर टाकला. त्यानें बोटांनीं चाच-पून काय आहे तें जाणलें.त्यावेळीं तो कांहीं बोलला नाहीं. पण त्याच्या हृत्पटलावर उमट-लेली प्रत्येक भावना त्याच्या चेहऱ्यावर अगदीं अक्षरशः चित्रित झालेली कोणाही सहृदय माणसास स्पष्ट दिसली असती. त्यानें कसेंबसें करून दुःखाचा आवेग आवरून आपलें त्रस्त मस्तक ओटीवर टेंकलें, व शून्यतेनें एक सुस्कारा सोडून अत्यंत केविलवाण्या स्वरानें तोंड वेंगाडून हात पसरीत तो म्हणाला, 'दादा, द्याहो, एकच पैसा द्या बघा ! करा एवढी कृपा आंधळ्यावर ! '

धनदास—भिकारड्या, चल, रस्ता धर आपला बऱ्या बोलानं ! भीक मागायला आलास ?जणूं कांहीं पेरूनच ठेवलं आहे तुझ्या बापदाद्यांनीं इथं ! आम्हीं अहोरात्र खपून रक्ताचं पाणी करतों तें तुझ्यासारख्या ऐतखाऊ गलेलठ्ठाकरितां नव्हे !

'खरंच शेटजी, असल्या गलेलठ्ठ टोळभैरवांना भिक्षा घालणं अगदीं वाईट ! दातृत्व पुण्यप्रद खरं; पण त्यांतहि पात्रापात्रतेचा विचार करणं अत्यावश्यक ! ' उपाध्येबुवा दैनिक दक्षिणेला हात पसरीत म्हणाले.

'पहाना पंत, कसा वाढला आहे पोळासारखा ! पण भिक्षा मागायची लज्जा वाटेल तर शपथ ! असल्या लठ्ठंभारतींनीं भिक्षा मागायचा बिनभांडवली धंदा पत्करल्यावर भिकार वाढून धंदा बसला, परतंत्रतेच्या अवजड शृंखला पायांत अधिक जोरानें आवळल्या तर त्यांत अनैसर्गिक असं काय झालं ?

मुलगा (स्वतःशींच)—देवांच्या नांवानं सोडलेल्या पोळांना जितक्या माणसांकडून चारा मिळतो त्याच्या चतुर्थांश माणसं देखील वर करून माझ्यासारख्या गरीबाच्या हातांत कधी-पसा टाकण्यास तत्पर होत नसतात,असं असतां देशाच्या दारिद्र्याला व पारतंत्र्याला आम्हींच कारणीभूत झालों हें विलक्षण कोडं परमेश्वराशिवाय कोण सोडवूं शकणार ?

'पहाना ! भीक मागायला निघाला; पण त्याच्या ठिकाणीं आढ्यता किती आहे ती ? असल्या फुकटखाऊ झोपा झोडणाऱ्या कुंभकर्णांना दान देणें म्हणजे दान देऊन पाप विकत घेण्यासारखंच आहे ! ' उपाध्येबुवा शास्त्रार्थ सांगूं लागले.

'शेटसाहिब, तुम्हीं हिंदू आहांत, मीही हिंदूच आहे. आम्ही दुसऱ्या कुणाजवळ हात पसरावेत ?आम्हां गरिबाचे मायबाप तुम्ही ! वाटेल तें म्हणा, आंधळ्याला परत लावूं नका. बघा. निदान पोटांत कोंबायला पसाभर कोंडा तरी द्या! पांडुरंग तुमचं कल्याण करील ! '

' शिव शिव ! या लोकांच्या लोंचटपणाची कमाल झाली बुवा ! ' शिवराईकरितां तासभर तोंडाची टकळी चालविणारे उपाध्येबुवा म्हणाले.

' कुबडया, दे ठोसा आणि हाकल पाहूं या पोराला इथून ! ' शेटजी राक्षसी आवाजांत ओरडले. त्याबरोबर कुबडयाची गाळण उडून त्याचे हात पुढें धांवले व त्यांनें आपल्या स्नायूंत किती शक्ति आहे यांची जाणीव त्या अंधळ्यास करून दिली ! त्याबरोबर तो कोलमंडूनच पडावयाचा; पण त्याचं नशीब शिकंदर म्हणून तो थोडक्यांत बचावला.

आंधळ्यास आतांपर्यंत अखिल जगतांत काळाकुट्ट अंधकार दिसत होता. पण आतां त्याच्या हृदयांतहि त्यास केवळ अंधार–अगदीं काळाकुट्ट अंधार दिसूं लागला. तशा स्थितींत तो जड पावलांनीं आपला मार्ग आक्रमण करीत होता.

' बेशरम ! पाजी कुठले ! ' अपूर्व दिग्विजय मिळविल्याप्रमाणें वाटून आनंदसागरांत पोहत शेटजी म्हणाले.

पण तो आंधळा ! तो अंधारांत कोठें चुकला अगर त्याचें दुसरें कांहीं झालें कुणास ठाऊक ! पण तो पुन्हां दिसला नाहीं खास.

—उत्तरार्ध—

' लेवो मौलवी साहेब ! ' पात्रापात्रतेचा विचार करून दान करणारे धनदास शेट हातांतील पैसा फेंकीत म्हणाले.

पण त्या मौलवीनें त्या पैशाकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं. तो तांब्याच्या पत्र्याचा आवाज ऐकतांच मानी मौलवीसाहेबांच्या पायांची आग मस्तकास गेली ! त्यानें आपल्या हातांतला लोखंडी चिमटा जोरानें खालींवर करून त्यास लावलेल्या कडयापासून होणाऱ्या खणखणाटांत कुराणांतल्या कलमा मोठमोठयानें म्हणण्यास आरंभ केला ! त्याची ती क्रूर मुद्रा, त्याचे ते सैतानी हावभाव व कर्णभेदक शब्दांचा तो कडकडाट हीं पाहतांच स्मशानांतल्या एखाद्या पिशाच्चाचें तांडवनृत्यच पहात असल्याचा प्रत्येकास भास होत होता !

मन व शरीर यांच्या द्वारें कोणींही शरीरास अगर अंतःकरणास दुःख दिलें तरी क्रुद्ध न होतां अगर त्याविषयीं मनांत द्वेषभाव न बाळगतां त्यास क्षमा करावी! क्षमेसारखं तीर्थ नाहीं असा आपला धर्म म्हणतो.'

'जाऊंद्या धनदासशेट. अहो, धर्माच्या कामांत असला अट्टाहास बरोबर नाहीं. जगांत कोणाच्या आशिर्वादानं येतं आणि आणि कुणाच्या कुदृष्टीनं जातं हें कोणीं सांगावं? शिवाय एवढं जळतं आहे, त्याचा उपयोग तरी काय?' एक हिंदू म्हणाला.

'अहो, तुमच्यासारख्या कुबेरांनीं दानधर्म करायचा नाहीं तर मग कुणीं? बारा तास पोटभर तुकडयाकरितां खप खप खपतात तेव्हां ज्यांच्या हातातोंडाची गांठ पडते असल्या दरिद्र्यांनीं कीं काय?' दुसऱ्या एकानें सवाल टाकला.

'शिवाय तुम्हीं दानधर्मकार्यीं संपत्तीचा विनियोग कराल तेवढेंच परलोकीं तुमच्या उपयोगीं येईल. लक्ष्मी चांचल्यप्रिय असल्यामुळें सत्कार्याचें द्वार तिला बंद झालें म्हणजे असत्मार्गानीं ती नष्ट होऊन तिच्या चिंततून प्रकट झालेलें पापाचें पिशाच्च मात्र मनुष्याच्या छातीवर नंगा नाच घालूं लागतें! मनुष्यानें कितीहि प्रयत्न केला तरी पाण्याची मोट बांधणं एक वेळ शक्य होईल; पण धनाची मोट छातीवर बांधून स्वर्गीत जाणं कधीं काळींहि शक्य होणार नाहीं!' तिसरा म्हणाला.

पहिला वळसा पूर्णपणें पचला हें जाणून तो फकीर पुढें म्हणाला, 'तो हक्क आज कायद्यानें जरी नष्ट झाला असला, तरी अल्लाकडून प्राप्त झालेला तो हक्क–मुसलमानांचा जन्मसिद्ध हक्क–ते कधींहि सोडणार नाहींत! मुसलमान हा भिक्षा मागण्यास मुळीं जन्मलेला नसून याचा जन्म सकल जगतास पददलीत करण्यासाठींच झाला आहे! पृथ्वीवर त्याचा जन्म होण्यापूर्वीच अल्लानें त्याच्यासाठीं पेरून ठेवलं आहे! (किंचित् थांबून) त्यांस त्याचा मनसोक्त उपभोग फक्त घ्यावयाचा आहे! ही सर्व सृष्टी अल्लानें त्याच्या उपभोगाकरितांच निर्माण केली आहे.' अशा प्रकारें दोन चार वळसे त्यानें भराभर दिले. आतां अखेरचा हिंदी- चैतन्याची अखेर करणारा वळसा द्यावयाचा म्हणून तो किंचित् थांबला. 'या भूपृष्ठावर ज्या ज्या म्हणून सुंदर वस्तु असतील त्या सर्वांचा भोक्ता एक महंमदीच आहे!'

आतांपावेतों स्वस्थ असलेले मुसलमान हाडें चघळणाऱ्या श्वानाप्रमाणें जिभल्या चाटूं लागले! एक तर बेहो षहोऊन म्हणाला, 'अगदीं सुंदरांत सुंदर–वसंत ऋतूंतल्या मोहोर आलेल्या आम्रतरूप्रमाणें जिच्या तारुण्यतरूस नुकताच बहार आलेला आहे, ज्या नुकत्याच टवटवलेल्या कमलिनीप्रमाणें प्रफुल्लित झाल्या आहेत, त्यांच्या जीवनसौरभाची पहिली लयलूट लुटण्याचा पहिला मानही—'

'दानासारखा परमधर्मच नाहीं ! अतिथि–मग तो कोणत्याहि जातीचा अगर धर्माचा असो तो—भिक्षा मागावयास आला असतां त्यास रित्या हातानें पाठविणें हें हिंदुधर्माचे ब्रीदच नव्हे !' चवथ्याला गप्प रहाणें अशक्य झालें.

अशा प्रकारें हें टीकांचें चऱ्हाट आणखी खूपच लांब वळलें जाऊन 'मिया मूठभर दाढी हातभर' असला प्रकार झाला असता ! पण मध्येंच शेटजींनीं खुणावल्या वरून कुबड्या फकिराजवळ जाऊन हळूच म्हणाला, 'मिया साहेब ! येथें तुम्हांस कांहींच मिळणार नाहीं. तेव्हां निष्कारण वेळ मोडण्यापेक्षां पुढें जाणेंच अधिक शहाणपणा–(जीभ चावून) नव्हें, हिताचें होईल !'

'पण माझा सवाल पूर्ण झाल्याविना मी येथून हलणार नाहीं !'

'पाहूं या तुझा सवाल कोण पूर्ण करतो ?' शेटजी पोकळ अवसान आणून म्हणाले.

'तूंच देशील व तुझ्यापासूनच घेईन. स्वर्गीतून तुझा बाप आला, तरी सोडणार नाहीं.' मौलवी चिमटयाच्या खणखणाटांत म्हणाला.

'याला म्हणतात आत्मनिष्ठा ! निष्ठेवांचून फल नाहीं !' एक हिंदु पूज्य भावानें थबथबलेल्या हृदयानें उद्गारला.

'जणूं काय याच्या बापाचं कांहीं येणंच आहे लोकांकडे !' गर्दीतून अस्पष्ट आवाज आला.

'केवळ येणंच नसून–हक्काचं येणं आहे ! व तो हक्क एके काळीं मुसलमानांनीं उपभोगिला आहे !' असें म्हणून मौलवी किंचित् थांबला.

'नंगेसे खुदा डरे ! असं म्हणतात, तें कांहीं खोटं नाहीं !' शेटजी उद्वेगानें म्हणाले.

'आणि म्हणूनच 'असंगाशीं संग नको घडो देवा' असं तुकोबा पांडुरंगाजवळ हात जोडून मागत आहेत. याउपर संग झालाच तर अशांना दुरूनच अगदीं कोपरापासून हात जोडावेत म्हणजे झाले ! 'दुर्जनं प्रथमं वंदे । सज्जनं तदनंतरम्' असं मुळीं विबुध-वाक्यच आहे !' उपाध्येबुवा म्हणाले. पण त्यांच्या दुटप्पीपणामुळे त्यांचा विवेकच त्याना हंसत होता. त्यांच्या मानसिक दौर्बल्याची पुसट जाणीव त्यांच्या हृदयास जाणवली देखील ! पण असले दुर्बल मनाचे लोक आपल्या दोषास्पद वर्तनावर देखील सभ्यपणाचा पांढरा मुलामा चढवून तें खरें नाणें म्हणून जगांत चालविण्याचा अट्टाहासानें प्रयत्न करतात ! तसाच प्रयत्न आतां त्यांनीं चालविला होता. ते म्हणाले 'वाचा मनसि कायेच दुःखेनोत्पाहितेनच । न कुप्यति न चाप्रीतिः सा क्षमा परि कीर्तिता ! सर्वेषामेव तीर्थानाम क्षान्तिः परमपूजिता ! तस्मात्पूर्वं प्रयत्नेन क्षान्तिः कार्या क्रियासु वै !' म्हणजे वाणी-

कांहीं वेळ असाच निघून गेला. दुकानासमोर तमासगीर मंडळी अधिकाधिक जमूं लागली. अखेर उदार धनदास शेट अर्धा आणा, पाऊण आणा करीत एक आण्या-पर्यंत आले !

मौलवीसाहेब आवेशानें म्हणाले, 'पैशा दोनपैशासाठीं हात पसरायला मी कांहीं बम्मन नाहीं ! शेटजी, पांच रुपये नद्द, एक लुंगी, एक कफनी व एक फेटा हा माझा सवाल आहे. फकीराचा सवाल पुरा करायला अल्ला समर्थ आहे !'

'मग आतां त्यानें आपला गाशा गुंडाळून ठेवलाय् वाटतें ?' गर्दीतून हळूच प्रश्न झाला.

'काफर ! सैतान ! मुसलमान व मुसलमानी धर्म याविरुद्ध कोणी ब्र उच्चारल्यास त्याला काय बक्षीस मिळतं हें माहीत नाहीं वाटतं तुला ?' चिमटयाचा जोरानें खणखणाट करीत मौलवी म्हणाला.

त्याबरोबर परधर्मसहिष्णु जातिहृदय न्यायनिष्ठुर हिंदूंना कसेंसेंच वाटूं लागलें. प्रत्येकाचें हृदय धडधडूं लागलें. पण तें भितीनें नाहीं ! तर एका हिंदूनें, परधर्मीतल्या कां होईना, पण एका पूज्य भावनेची अवहेलना करावी हें त्यास न साहून तें सारखें खालीं-वर करीत होतें ! सर्व धर्म आपापल्या परीनें श्रेष्ठ आहेत हें उच्च तत्व आपण मान्य करतों याबद्दल त्यांस मोठा अभिमान वाटत होता ! त्यांनीं हिंदुत्वास लांछनास्पद झालेल्या या प्रकाराबद्दल त्वरित निषेध प्रदर्शित केला !

'सकल जगताचा उत्पादक व नियंता परमेश्वर एकच असून राम, कृष्ण, महंमद, येशू या त्याच्या वेगवेगळ्या कालीं अवतीर्ण झालेल्या विभूति आहेत. तेव्हां त्यासंबंधीं अशी भाषा वापरणें म्हणजे त्या त्या विभूतिंचीच नव्हे, तर पर्यायानें परमेश्वराची अवहेलना करण्यासारखेंच होय !' कोणीसें बोललें.

'अहिंसा हें राष्ट्राचें ध्येयवाक्य असतां दुसऱ्यांचीं मनें दुखावतील, त्यांच्या पूज्य भावनांस बाध येईल असल्या प्रकारचें भाषण करणें हें अहिंसा तत्वाविरुद्ध असून पर्यायें राष्ट्रघातकीपणाचें लक्षण आहे !' दुसऱ्या एकानें त्यावर मल्लिनाथी केली.

'स्वराज्यसंपादन हा एकच हेतु आज देशापुढें असून त्यास हिंदुमुसलमानांच्या ऐक्याची आवश्यकता असतां, एका हिंदूनें मुसलमानांच्या पूज्य व्यक्ती व देवतांबद्दल अशी निंद्य भाषा वापरणें म्हणजे स्वातंत्र्याच्या पायावरच-ऐक्यावर-आघात करून हिंदुस्तानच्या पायांतील पारतंत्र्य-शृंखला अधिक आवळण्यास मदत करण्यासारखेंच होय !' तिसऱ्या एकानें साथ केली.

'यांत संशय तो कसला? हें तर कुराणांतच सांगितलें आहे! त्यांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, तुम्ही काफरांस मारा, मुसलमान करा, मुसलमान करतांना मारा, अगर मारून मुसलमान करा. पण काफरांचा नायनाट मात्र करा! त्यांच्या मूर्ती फोडा व गाईंचीं कुरबानी द्या.कारण जगांतील मूर्तींचा विध्वंस होऊन महंमदी धर्माचा प्रसार झाला म्हणजे अल्ला सकल स्वर्गिय सौख्यांसुद्धां भूतलावर अवतीर्ण होणार आहे! करितां धर्मप्रसार करितांना मरणास भिऊं नका. मरण आलं तर स्वर्गांत सुंदर पऱ्या व सौख्य यांचा लाभ होईल! आणि वांचलाच तर काफरांच्या घरांत वावरणाऱ्या पऱ्या अल्लानें तुमच्या करितांच .....!'

हे शब्द कानीं पडतांच भटजीबुवांच्या कानांचे पडदे तटातट तुटून हृदयही जळून गेलें. ते अगदी हीन दीन झाले; त्यांच्या नेत्रद्वयांतून गंगायमुनाचे पाट जोरानें वाहूं लागले. हृदयावर भार पडल्याप्रमाणे गुदमरलेल्या स्वरांत ते म्हणाले, 'शेटजी, तो काय मागतो त्याचे पैसे माझ्या नांवानं लिहा. पण त्या शिखानष्टास येथून एकदां घालवा! असल्या पागल बेअब्रूच्या लोकाशीं वितंडवाद घालून इभ्रतीस कलंक लावून घेणं हें योग्य नाहीं!'

भटजींची ती अवस्था पाहून अजूनपर्यंत टिकाव धरलेले धैर्य शेटजी अगदींच गलित बनले. आणि मन व विवेक हीं प्रतिक्षणीं हृदयावर आघात करून 'तूं असलें पापकृत्य आचरूं नकोस. यांतच तुझी खरी विटबना आहे. हें आचरण्यानेंच तुझ्या यशोमंदिरास खराखुरा कलंक लागणारा आहे!' अशा प्रकारें बजावीत असतां 'अं —आपल्या लोकांतला भाबडेपणा अद्याप गेला नाहीं ना? शिवाय दृही तर त्यांच्या सटवीसच पुजली आहे! तेव्हां आपण तरी काय करणार? हें काम काय एकाचेंच आहे?' अशा प्रकारें मनाची समजूत घालीत त्यांनीं केवळ 'नाईलाज',म्हणून फकिराचें माप त्याच्या पदरांत घातलें!

अनुप्रासांचा अवरोध

माधवाश्रम, मुंबई.

ता.....

सन्मान्य संपादक साहेब !

आजकाल अनुप्रासांची आवड अत्यंत फैलावली असल्यामुळें महनीय मराठी वाङ्मयाला जी अकालींच अवकळा आठवते आहे तिचा प्रसंगींच प्रतिकार करणें अत्यंत आवश्यक आहे व एतदर्थ महाराष्ट्र-साहित्याच्या जहाल जनकांनीं जमावा-जमावानें असल्या अश्लाघ्य अनुकरणाला जेरीला आणणें जरूर आहे. वाढत्या वयाचे वाकबगार वाङ्मयसेवकच नव्हे तर साहित्य-सागरांत सारासारविचाररहित असे सरसकट सारेच स्वंगसुकाळ नवशिके लेखक या अघटित आणि अत्यंत अनिष्ट आपत्तीच्या आधीन झाले आहेत. अनुकरण अवहेलनास्पद नसलें तरी त्याला अवमार्गानें अवलंबणें अन्याय्य आणि अप्रस्तुत आहे. वाटेल त्या वाक्यांत वहिवाटयनुसार बाराखडींतली बारा अक्षरें वापरून भलतीच बाष्कळ बडबड बडबडणें हें बडया बहादूर लेखकाचें लक्षण नव्हे ! तद्वतच् वाटेल त्या वाक्यांत नालायख नामाआधीं वाटेल तें वाऱ्यट विशेषण वापरणें वजनदार वाग्भटांना तरी तिरस्करणीय वाटेल. प्रसंगानुरोधानें प्रकट पावलेलें पदलालित्य जितकें गोड लागतें तितकेंच आद्याक्षराचे ओढून आणलेले अनुप्रास जलाल जहरासारखे जळजळीत भासतात. असल्या अनिष्ट आणि अहितकारक आपत्तीची आंच आपण आतांच अवधानानें आपणापासून अलोट अंतरावर ठेवली नाहीं तर महाराष्ट्राच्या मराठीचें जीवन जगणें जबर वाटतें ! परदेशांतील परकीयांची साहित्य-संपत्ति संपन्न आहे. त्या मानानें महाराष्ट्राची मायबोली मराठी मावळ्या मरणघटकेला आली आहे. हें तुमच्या आमच्यासारख्या साहित्यसेवकांनीं सहनशीलपणानें सोसणें संभवनीय तरी आहे काय ?

तरी मान्यवर महाशयानीं मनावर घेऊन भारतभूमीला भूषणभूत झालेल्या महाराष्ट्रीय मराठीला मानमरातबानें मढवून असल्या अर्थहीन अनुप्रासाच्या आणि दरेक नाठाळ नामामागें विपर्यस्त विशेषण वापरण्याच्या पाशवी पद्धतीला प्रतिबंध करावा अशी विनित विश्वनाथाची विनंति आहे. कळावें.

आपला आज्ञाधारक

विश्वनाथ ब. विजापूरकर.

टीप:—लेखकाची अनुप्रासाची 'मावड' दाखाणण्यासारखी आहे. त्याच्या कळकळीच्या लिहिण्यामुळें 'अनुप्रास-भक्त' जागे होतील काय ?—**संपा०** "**अ. माला**"

पोंच आणि अभिप्राय

संवगडी—(हस्तलिखित मासिक. रंगाऱ्याची चाळ, खडा माटुंगा, मुंबई) या हस्तलिखित मासिकाचा २ ऱ्या वर्षाचा पहिला खास अंक अभिप्रायाकरितां आमच्याकडे आला आहे. कांहीं लेख बरे आहेत. कवितांत 'विधिलिखित' कविता चांगली आहे. नाटयछटा म्हणजे नुसती प्रश्न आणि उत्तरें नव्हे हें लेखकानें लक्षांत ठेवावें. 'कल्याण स्टेशनावर' गोष्ट साधी आहे. 'सहसंपादकांना' अनुप्रासाची आणि 'धडाडधुम्' भाषेची अत्यंत आवड दिसते आणि उदयोन्मुख लेखकानें तर हे दोष अवश्य टाळले पाहिजेत. रा. पाटणकर यांची फोटोग्राफी निःसंशय वाखाणण्यासारखी आहे. अंकाचें बाह्यांगहि सुंदर आहे. 'प्रभूच्या चरणीं' वाचून सदर मासिकाचे निदान पांच सहा हजार तरी वर्गणीदार असावे असा त्यांतील वाक्यें मनाला भ्रम आणतात! 'कामिनिया ऑइल' आणि 'प्रभाकर कंदिल' यांची जाहिरात घालण्याचें प्रयोजन काय? खास अंक जाहिरातींविना सुना दिसतो म्हणून कीं एका स्त्रीचें आणि कंदिलाचें चित्र काढण्याची चित्रकाराला आवड उत्पन्न झाली म्हणून? जुजबी अभिप्राय न देतां अगदीं निर्भीडपणानें खास अंकाचें परिक्षण केलें याबद्दल राग न मानतां हे परिहार्य दोष टाळण्याची यापुढें संपादकद्वयानीं काळजी घ्यावी; म्हणजे यापेक्षांहि अंक सुंदर निघेल याबद्दल आम्हांला पूर्ण खात्री आहे. खास अंकाची या दृष्टीनें मांडणी चांगलीच झाली आहे. आम्हीं पाहिलेल्या अनेक हस्तलिखित मासिकांत रा. गुप्ते आणि रा.गुमास्ते यानीं चालविलेलें हें मासिक आम्हांला विशेष आवडलें.

न्याय! (रा. ना. वि. कुळकर्णी, 'महाराष्ट्र कुटुंब माला, ३९१, नारायण, पुणें,) 'माले'चें न्याय' हें ५ वें पुष्प आहे. कोर्टाची पायरी चढल्यापासून होणारे दुष्परिणाम दाखविण्यासाठीं ही कादंबरी लिहिली आहे. अर्थात विषयांत कांहीं नाविन्य नाहीं. या कादंबरींत गणपतरावाचें लुडबें पात्र घालून लेखकानें कादंबरी नीरस करण्याचा प्रयत्न केला आहे असें आम्हांला वाटतें. शिवाय गणपतरावांना या कादंबरींत 'ह्मिलन' करण्याचा लेखकाचा उद्देश असूनहि त्याच्या लुडब्या भाषापद्धतीमुळें तो नेभळट वाटतो आणि त्याच्या बोलण्यावर विश्वासून दामुअण्णा कोर्टाची पायरी चढतात याबद्दल तर दामुअण्णावरोबर लेखकाचीहि कींव करावीशी वाटते. सदर लेखकाच्या 'मजूर' कादंबरी-इतकी ही कादंबरी चांगली वठली नाहीं. किं. १ रुपया.

मेंदुचे विकार व डोकें दुखणें यावर.

किं. १-२-०,] ब्राम्ही तेल [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा:—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळंत काढा:—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.
बाळकडू:—उपजल्यापासून देण्यास योग्य किं. ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायणें वगैरे औषधें तयार आहेत. एक आणा आला असतां रुग्ण पत्रिका, लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचना:—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांचा खप वाढल्यामुळें नक्कल सुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळीं या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयौषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.
दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने.

शर्टची बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४॥; नथ मोत्याची रु. ५. आंगठी रु. १; सळे जोडी रु. १॥; बांगडया जोडी रु. २॥; घडाळयाचा छेडा रु. ३;

केंस काळे करण्याचा साबण

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्याच्या बॉक्सला रु. १॥

इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुडयासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. अमृतवाडी, गिरगांव मुंबई.

३२ वर्षें परीक्षा घेऊन शका असेल तर नमुना फुकट मागवा. सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें

सुधासिंधु

कफ, खोकला, पटकी, दमा, शूल, संग्रहणी, अतिसार, पोट दुखणें, जुलाब, वांती वगैरे रोगांवर अनुपान शिवाय स्त्रादिष्ट औषध. किंमत पत्येक बाटलीस ८ आणे, पोष्टखर्च १ ते २ पर्यंत ७ आणे.

दद्रुगजकेसरी

गजकर्णाचें औषध

हेंही सरकारांतून रजिष्टर झालेलें औषध आहे. हें कांहीं त्रासाशिवाय २४ तासाच्या आंत आपला गुण दाखविणारें आहे. किंमत ४ आ. पोष्ट खर्च १ ते २ पर्यंत ७ आणे. एकदम १२ बाटल्या घेतल्यास २। रु. पोष्टखर्च माफ.

बालसुधा

मुलांस सर्दी, खोकला, आणि अपचन हें कधींही होऊं देत नाहीं. हें मुलांस बलवान करणारें गोड औषध आहे. किंमत १२ आणे पोष्टखर्च ७ आणे.

आमची औषधें सर्व औषधें विकणाऱ्याजवळ मिळतात. कदाचित् तेथें न मिळाल्यास आमचे कडेस पत्र पाठवून मागवावें. पूर्ण माहिती करितां मोठा क्याटलॉग फुकट पाठवूं.

पत्ता:— **सुखसचारक कंपनी, थुरा.**

आमचा एजंट—**नरोत्तम गिरिधर** आ.कं. शेख मेमन स्ट्रीट, **मुंबई नं २**

जाहिरातींचे दर

पान	मुदत	दर
१	१ वर्ष	५ रु. (प्रत्येक वेळीं)
	,,	३ रु. (,,)
	,,	२ रु. (,,)

अरुण कार्यालय, २ री भटवाडी, मुंबई ४



घरची श्रीमंति

असली तर कदाचित् कृत्रिम उपायानें दांत बांधून घेतां येतील. पण अस्सल्या भाडोत्री दातांनीं पचनक्रियेला बाध येतो व खऱ्या दातांचें काम त्यांच्या योगानें मुळींच होत नसतें. म्हणूनच वेळींच सावध होऊन आमची "**लालतारा**" टुथ पावडर लाऊन आपले दांत कणखर करा. लहान बा. ५ आणे. मोठी बा. १४ आ.

अमृतांजन (रजिस्टर्ड.)

हें ठणका, कळा, वेदना इत्यादि व्याधींवर अचूक गुणकारी आहे. आज २५ वर्षें याच्या एकसारख्या वाढत्या खपावरून याची सहज कल्पना होते. लाखों कुटुंबें आज अमृतांजन वापरीत आहेत.कारण तें सर्व प्रकारच्या वेदना, मुरगुळणे, संधिवात,कफ,सूज आणि अशाच प्रकारच्या पुष्कळ व्याधी निखालस



बऱ्या करितें. ह्मणून ज्यांनी तें अद्याप अनुभवलें नसेल त्यांनीं खात्री करून घ्यावी. किंमत १० आणे.व्ही. पी. खर्च निराळा.

दंतमंजन.

या मजेदार दंतमंजनानें दांत शुभ्र होतात रक्त वाहणें थांबतें. हिरड्या मजबूत होतात व वास मधर येतो. प्रत्येक ड. कि. २ आणे **सर्व दुकानदारांकडे मिळेल.** अगर

अमृतांजन डेपो, १०९ फ्रीयररोड, मुंबई.

आर्यमहौषधालय. मु. पो. आंजलें

प्रोप्रायटर–डॉ. रंगनाथ कृष्णशास्त्री बिवलकर, एल् एच्. एम्. एस्.

कोकण प्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगप्रसिद्ध निर्दोष व रामबाण औषधें.

स्वर्णधात्री तैल हें चारोळी, बदाम, कंकोळ, एला, इ० वनस्पतींचीं सत्वें आणि उपयुक्त तैलें अशा अनेक पदार्थांनीं बनविलें असल्यानें याच्या मर्दनापासून अपस्मार, उन्माद, वेड, चक्कर इ. रोगांस जलद आराम पडतो. केशांस चोळिल्यानें केश काळे कुळकुळीत, तजेलदार, सडक, लांब व मृदु होऊन मेंदू शांत आणि रोगरहित बनतो. यानें मस्तकाचें टक्कल जातें. हें अंगास चोळून स्नान करीत गेल्यानें शरीराचा दुर्गंध, खरूज, गजकर्ण, शिबें, तसेंच तळपाय, तळहात, डोळे व मस्तक यांचा दाह, हे विकार खास बरे होऊन निद्रा चांगली येते आणि नेत्ररोग दुरुस्त होतात. बा. किं. १। रु.

थंडगार नेत्रांजन:—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, कांच वगरे डोळ्याचे एकंदर विकार ताबडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते ड. १॥ रुपया.

कर्णस्त्रावनाशक अप्रतीम तैल:—यानें कानाचे सर्व प्रकारचे व्रण तत्संबंधी इतर विकार त्वरित बरे होतात. बा. १ रु.

दंतरक्षक पूड—ही दंत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काल दुरुस्त करून दंत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. ड. ६ आ.

सूचना:—वरील औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचेचाळीस वर्षांत त्याचा लक्षावधि लोकांस अप्रतिम उपयोग झाला असून त्यांचा नेहेमी व फारच खप होत आहे. अनुभवानंतर खात्री पटेलच. औषधें माहितीच्या खर्ड्यासह रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. प्याकिंग व टपालखर्च वेगळा घाऊक घेणारास कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या आणि आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक देऊं. प्रकृतिमान कळविल्यास रोग निदान व योग्य चिकित्साही कळवूं. आमचीं औषधें वगैरे माल मागविणें, तो खालील बिनचूक पत्त्यावरच मागवावा.

कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य.

मु. आंजलें, ता. दापोली, जि. रत्नागिरी

समाजाची उन्नति

धार्मिक बलावर अवलंबून आहे ही गोष्ट सर्वमान्य आहे; आणि धार्मिक बल सणांचा सशास्त्र उपयोग करण्यावरच आहे हीहि गोष्ट तितकीच निर्विवाद आहे. आणि म्हणूनच विद्वान व अविद्वान, पुरुष व स्त्रिया, ब्राम्हण व ब्राम्हणेतर, सुधारक व पुराणप्रिय लोक या सर्वांस अत्यंत प्रिय होऊन बसलेलें, सणांच्या सोपपत्तिक माहितीचें सर्वश्रेष्ठ पुस्तक एकच आहे. आणि तें म्हणजे

ऋग्वेदीकृत

"आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचिन इतिहास"

किंमत २ रु. ८ आणे (कापडी बांधणी)

एक पाती व दोन पाती

सुप्रसिद्ध मालवणी चाकू

शिवाय मुलांचे लांकडी रंगीत खेळ, शिशवी फणेरी पेटया, चंदनाच्या फण्या व तऱ्हतऱ्हेचें कोरीव काम, देवादिकांच्या मूर्ति, शिवाय सर्व प्रकारचे

स्वदेशी स्टेशनरी सामान

निरनिराळ्या तऱ्हेचे साबण व इतर हरएक उपयुक्त वस्तु मिळण्याचें ठिकाण–

व्ही. प्रभा आणि कंपनी, भटवाडी, मुंबई ४.

Dr. J. D. Kulkarni's Success Makers.

अखिल हिंदुस्थानांत अत्यंत नांवाज-लेलीं पहिलींच.

कोणत्याही जातीच्या व सांथीच्या तापांवर

—विद्वान व नामांकित डॉक्टरांनीं अत्यंत वाखाणलेलीं—

डॉ. जे. डी. कुळकर्णी

यांचीं

सर्वांत सुंदर, शास्त्रीय, पद्धतशीर, अत्यंत सोईस्कर औषधें

फिवरॉल. सर्व जातींच्या व सांथीच्या तापांवर अप्रतीम. "अंगांत ताप असतांना द्यावयाचें." किं. रु. १।

मलेरिन. मलेरिया-ऍग्यू हिंवतापाचा जिवंत काळ एग्यूमिक्श्चर. "अंगांत ताप नसतांना द्यावयाचें." किं. रु. १।

मलेरिन नं २. अल्पमोली पण खात्रीपूर्वक, अत्यंत गुणी ऍग्यूमिक्श्चर. "सर्वत्रांस सारखेंच सर्वोत्कृष्ट गुणावह." किं. १२ आणे

या औषधांची सर्वत्र फार ख्याति असून एकटया मुंबई शहरांतच १०००० पेक्षां जास्त कुटुंबांत यांचा संग्रह व गरजपरत्वें वापर असतो. इतर "निवडक" औषधांचा ७५ पानांचा सचित्र कयाटलाग १ आण्याचीं तिकिटें आल्यास मोफत पाठवूं. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन.

तारेचा पत्ता:—"ॐकारोदय" "Om Karodaya" Bombay.

पोष्टाचा पत्ता:—**कुळकर्णी ऍण्ड सन्स, मुंबई नं. २.**

डॉ. एन्. व्ही. कुळकर्णी यांचीं अनुभविक शास्त्रशुद्ध औषधें



च्यवनप्राश.

(Improved Formula)

शक्ति, बुद्धि, कांती आणि वीर्य वाढविणारें **महान धातुपौष्टिक** औषध. धातुविकार, स्वप्नावस्था व दुबळेपणा, अशक्तता, कडकी व खोकला वगैरे विकार बरे करून शरीर जोमदार व तेजःपुंज बनवितो. एक रत्तल बरणी किं. रु. ५ अ. र. २॥ रु.

द्राक्षासव

(Extra Quality)

सारक, पाचक, पौष्टिक, तरतरी आणणारें स्वादिष्ट औषध. दमा, खोकला, कफ, सर्दी वगैरे विकार बरे करून भूक सपाटून वाढविते. १॥ रत्तल बा. १८१२. १ र. बा. १। रु. अर्धा रत्तल बा ८११.

नवीन औषध (रजिस्टर्ड) कितीही दिवसाचा नवा अगर जुना मलेरिया ताप यानें खात्रीनें जातो. या औषधानें मलेरियाचा ताप जाण्याची आम्हीं हमी देतों. बा. किं. १॥ रु.

पिपरीन (रजिस्टर्ड) कॉलऱ्यावर रामबाण औषध. १।२ भागांत उलटी व जुलाब बंद होतात; आमांशावरहि चांगला उपयोग होतो. बा. किं. १। रु

पॅकिंग व पोष्टखर्च निराळा.

मागविण्याचा पता:—**आयुर्वेदिक मेडिकल वर्क्स, मुंबई नं. १२**

Printed by A. A Moramkar at his Shree Laxmi Narayan Press,
364 Thakurdwar, Bombay 2
and Published by **M G. Rangnekar** at the
Arun Office, 2nd Bhatwadi, Girgaum, Bombay 4.

अरुण



किंमत ४ आणे.

जोड अंक.
अरुण कार्यालय,
२ री भटवाडी, मुंबई ४.

वा. व.ट.ख
२। रुपये.

डॉ. जे. डी. कुलकर्णी यांचीं
जगविख्यात "निवडक औषधें."

नं. १ **फिवरॉल**–सर्व जातींच्या साध्या दोषी–विषारी-मुदती–सांथीच्या तापांवर अप्रतिम. किं. रु. १॥-

नं. ५ **मलेरिन**–अखिल हिंदुस्थानांतील पहिलेंच सर्वश्रेष्ठ-अत्यंत सोईस्कर ऍग्यू मिक्श्चर. किं. रु. १।-

नं. ६ **मलेरिन नं २**-अल्पमोली पण खात्रीपूर्वक अत्यंत गुणी ऍग्यू मि. किं. रु. ॥।-

नं. १४ **हिस्टेरिन**–स्त्रियांच्या हिस्टेरिया-उन्माद-गुल्मादिकांवर सर्वोत्कृष्ट. किं. रु. ३

नं. १५ **थॅमिनन**-वीन अथवा अत्यंत जुनाट-हट्टी-प्राणघातक दम्यावर अमोलिक किं रु.३

नं. १९ **जर्मिन**–नवीन अथवा अत्यंत जुनाट हट्टी-हाडींमासीं खिळलेल्या उपदंश गर्मीवर किं. रु. ३

नं. २० **सँटोल**–प्रमेह–परम्यावर; लघवीची आग–तिडिक–जळजळ ५।६ तासांत बंद. किं. रु. ३॥

नं. ३९ **एलिक्झीर शिलाजित कंपाउंड**–सर्व प्रकारच्या मूत्रदोषादि विकारांवर. किं. रु. ३

नं. ४२ **रास्ना कॉर्डियल**–अर्धांगवायू-पक्षाघात, कटिशूल, संधि-आमवातादिकावर. किं. रु. ३

नं. ४८ **मस्तकशूळावर रामबाण वड्या** असह्य मस्तकशूळ अर्धशिशी ५ मिनिटांत बंद. किं रु. -॥।-

नं. ४९ **वीर्योटोन गुटिका**–सर्वांग सुंदर धातुपौष्टिक; रक्त मास मेंदू बलवर्धक किं. रु. २॥-

नं. ५० **चैतन्योटोन गुटिका**-यॉहिंबिनयुक्त; मर्दाईवर जगप्रसिद्ध निर्वाणीचा उपाय. किं. रु. ६

नं. ५१ **चैतन्योटोन तेल**–मर्दाईवर तात्कालिक व चिरकालिक बाह्योपचार किं. रु. ५

नं. ५४ **एलिक्झीर ऍन्टी कन्व्हलशन**–लहान मुलांच्या आंकडीवर प्रतिज्ञेचें औषध. किं. रु. २

नं. ७८ **वेदिक पेन बाम**–वातहारक, दुःखशामक, सूजनाशक, झटपट-चिरकाल-गुण, किं. रु. -॥।-

मोठा सचित्र कॅटलाग व नविन वर्षाचें सर्वांग सुंदर कॅलेंडर १ आण्याचें तिकिट पाठविल्यास मोफत पाठवूं.

कुलकर्णी ऍण्ड सन्स, मुंबई नं. २.

आबालवृद्धाचें मनोरंजन करून पोटाचा धंदा शिकविणारा

सचित्र नजरबंद शिक्षक.

भाग दुसरा:–यांत अमेरिका, इंग्लंड, जपान वगैरे देशांत **जाग्लिंग नजरबंद, पार्मिंग**–हातचलाखी, **कार्डट्रिक्स**–पत्त्याचे खेळ, **कॉइन ट्रिक्स**–नाण्याचे खेळ **हँकरचिफ ट्रिक्स**-हातरुमालाचे खेळ करून आश्चर्यानें थक्क करून सोडणाऱ्या चमत्कृतिपूर्ण खेळांची स्त्रियांनाही देखील हे खेळ सहज करतां येतील अशी त्यांना लागणाऱ्या साहित्याच्य. खुलाशासह खेळ करून दाखविण्याची सविस्तर व सप्रयोग माहिती. मागवून ही गुप्त विद्या शिका! नामांकित प्याजिशियन जादूगार व्हा!! हा धनोत्पादक धंदा करून पैसा व किर्ती मिळवा!!!
किंमत १॥ रु. व्ही. पी. १॥।=.

प्रो. ज्ञानामित्र, शनवार, पुणें–सिटी.

अरुण मालेचा

३ ऱ्या वर्षाचा १ ला अंक

या अंकांत येणारे कांहीं विषय.

१ द्रोह! (संपूर्ण गोष्ट)––रा. मो. ग. रांगणेकर.
२ बकुळा (कविता)––रा. गिरीश.
३ स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य.––सौ. गिरिजाबाई केळकर.
४ रविवर्मा (चरित्र)
४ वीरतनय!
५ जग काय आहे? (कविता)––श्री. दाते.
६ खुडलेलीं फुलें (श्री. कोल्हटकर, कै. गडकरी, दे. सावरकर)
७ मुलांची मौज
८ संन्यस्त! (चालू कादंबरी.)

[शिवाय अनेक विषय व चित्रें येतील.]

Except title page all the remaining pages printed by
N. G. Bendale Vidya Bhushan Press, Malegaom.

Published by—M. G. Rangnekar at the
Arun Office, 2nd Bhatwadi, Girgaum, Bombay 4.

अनुक्रमणिका.

			पृष्ठ
१	तिलकाष्टक	... ...	१
२	संपादकीय	... ...	३
३	हरवलेला बाळकृष्ण	(संपूर्ण गोष्ट)...	५
४	खुडलेलीं फुलें	... ...	१६
५	महिन्याची अखेर	(गोष्ट) ...	१८
६	मुलांची मौज	... ...	२७
७	साग्र संगीत	... ...	३५
८	कालधर्म	... ...	३८
९	मुलींचा संसार	... ...	४१
१०	क्षणभंगुर	(पुढें चालू) ...	९५

अहो ! बेपत्ता झा–ले !

नाहीं हो ! पत्ता बदलला

लिंग्रस ब्रदर्स,

गोवर्धनदास बिल्डिंग, पोर्च्युगीज चर्च,
गिरगांव–मुंबई, या ठिकाणीं गेले.

कडकी व शक्तीवर ४२ वनस्पतींचा गोड



अशक्त मुल, स्त्रिया व पुरुषांना शरीर धष्टपुष्ट आणि सशक्त होण्यास हा काढा वापरा.

किंमत १। रु.

पर्ल आणि कंपनी,

राणीचा बाग, मुंबई.

अरुणमाला

कै. लोकमान्य टिळक.



महाराष्ट्र हा पारतंत्र्यीं बुडाला।
दुहीच्या शिला बांधुनीया गळ्याला।
तया उद्धराया जनीं सिद्ध झाला
नमस्कार त्या बाळ गंगाधराला

"MOUJ"

अरुणमाला



“ आई ऽ ऽ ! ”

अरुण माला.

वर्ष २.] जुलै–आगष्ट १९२६ [अंक ११–१२.

तिलकाष्टक.

महाराष्ट्र हा भारतंत्र्यीं चुडाला ।
दुहीच्या शिळा बांधुनीयां गळ्याला ॥
तया उद्धराया जनीं सिद्ध झाला ।
नमस्कार त्या बाळ गंगाधराला ॥ १ ॥

करी पंडितांच्या पुढें वित्त नाच ।
कळावा कसा तीव्र दारिद्र्य कांच ॥
धना मारुनी लाथ ओढी जनाला ।
नमस्कार त्या बाळ गंगाधराला ॥ २ ॥

नभीं दाटले मेघ काळेकाभिन्न ।
गमे शिक्षितां भोग हें थोर पुण्य ॥
दिला त्याग सूर्यें मनाला उजाळा ।
नमस्कार त्या बाळ गंगाधराला ॥ ३ ॥

जनीं पल्वलें माजलीं, ओघ नाहीं ।
भली वाढली वालुका राष्ट्र दाही ॥
करी कोंपरानें तिथें सागराला ।
नमस्कार त्या बाळ गंगाधराला ॥ ४ ॥

चरावें स्वदेशीं, परां सत्व द्यावें ।
धनी लोंकरीचे दुज्यांना करावें ॥
अजापुत्रिं ऐशा करी जागृतीला ।
नमस्कार त्या बाळ गंगाधराला ॥ ५ ॥

विषाचा विषीं वैद्य देती उतारा ।
शिलांनीं शिलासंघ हो चूर सारा ॥
वरी राष्ट्रमोक्षार्थ कारागृहाला ।
नमस्कार त्या बाळ गंगाधराला ॥ ६ ॥

कुठें देशभक्ती जिला विश्व गात ।
कुठें राष्ट्रदेवी ? पडे कोंपऱ्यांत ॥
करी मंदिरा स्थापुनी पूजनाला ।
नमस्कार त्या बाळ गंगाधराला ॥ ७ ॥

धनाचा करी धूप नैवेद्य कीर्ति ।
धरी प्राण सिंहासनीं राष्ट्र मूर्ति ॥
जया पाहुनी लाज रत्नाकराला ।
नमस्कार त्या बाळ गंगाधराला ॥ ८ ॥

कुमार.

संन्यस्त

ही अत्यंत हृदयस्पर्शी कादंबरी

पुढील अंकापासून

वाचण्यास विसरूं नका !

साल अखेर

संपादकीय.

वर्ष ह्मणजे वारा महिने आणि वारा महिने ह्मणजे तीनशें पासष्ट दिवस असा **रूढ** हिशोब केला, तर इतक्या दीर्घ कालावधींत करावयाचें तरी काय, असा प्रश्न पडून निरुद्योगी मनुष्याला एकएक दिवस किती धीम्या चालीनें जातो आहे असें वाटेल, आणि दिवसाच्या चोविस तासांत आपल्या कामांत चूर असलेल्या मनुष्याला वर्ष तासाच्या गतीनें तर दौडत चाललें नाहींना, असा भ्रम उत्पन्न होईल. कालाची गति तींच अबाधित असली तरी मनुष्य त्याची कमी–अधिक चाल आपल्या प्राप्त कार्ययोजनेनें मापित असतो.

प्रस्तुतचा जोड अंक वाचकांच्या हातीं देतांच मासिकाच्या जननाला पुरीं दोन वर्षें झालीं ! अंकाला मधूनमधून विलंब लागत असतांहि पहिलें वर्ष कालच संपलें असावें असा भास होतो, तो यामुळेंच ! या दोन वर्षांच्या अवधींत आह्मांला मासिकाचे किती कटु अनुभव आले आणि कसकशी झीज सोसावी लागली याचा पाढा वाचला तर काल्पनिक अद्भुत कथांपेक्षां तो कदाचित् जास्त आश्चर्यकारक वाटून कोणाचा, प्रत्यक्ष अनुभवाभावीं सहजासहजीं त्याच्यावर विश्वास बसेल असें आह्मांला मुळींच वाटत नाहीं. कारण कोणी ह्मणाला तरी हेंच ह्मणेल कीं, या ४८ पानांच्या मासिकांत दगदग आणि कष्ट ते कसले ? वरवर पहाणाऱ्या बिचाऱ्या वाचकाला त्याच्या या सरळ प्रश्नाबद्दल दोष देणें अगदीं अयोग्य दिसेल. कारण पैशा दोन पैशाच्या एखाद्या वर्तमानपत्राच्या बाबतींत सुद्धां बारीक बारीक अनेक धागेदोरे आहेत असें प्रत्यक्ष अनुभव नसला तर, त्याला कसें वाटावें ?

शिवाय आजची परिस्थिति पाहिली पाहिजे. एक काळ असा होता कीं, बुभुक्षित वाचकांना एका दोघा मासिकावरच आपली वाचनाची भूक शमवावी लागे; आणि आतां एखाद्या नव्या–जुन्या–ग्राम्याग्राम्य नियतकालिकाखेरीज आठवड्याचा एकहि दिवस सुना जात नाहीं ! एका काळीं बाह्यांगावर नुसत्या ठळक ठशांत गांवठी पद्धतीनें मासिकाचें नांव घातलें जात असे; तर आजच्या सुधारलेल्या काळांत रंगी बेरंगी, चटकन डोळ्यांत भरणाऱ्या चित्रांशिवाय गबाळ पद्धतीनें बाह्यांग सजवणें अक्कलमंदतेचें आणि पर्यायानें दिवाळखोरपणाचें द्योतक आहे असें रसिक 'वाचक' प्रांजलपणानें ह्मणतात ! अर्थात असल्या अनिष्ट लोकाभिरुचीनें कांहीं फार आह्मांलाहि पछाडलें तर त्याला आमचा निरुपाय आहे असें कोण ह्मणणार नाहीं ? वादळी दर्यावरच्या निर्बंध नावेसारख्या हेलकावे खाणाऱ्या लोकाभिरुचीला आह्मींहि बळी पडण्यांत आमच्यावर यदाकदाचित् कोणी नामुष्कीचा आरोप लादला तरी 'अरुणा' च्या अंतरंगाकडे त्यांचें लक्ष्य जबरीनें खेंचून आणण्यासाठीं तरी

रूढ मार्ग स्वीकारणें अपरिहार्य होतें. दुःखांत सुख इतकेंच कीं केवळ चकाकणाऱ्या पृष्ट-भागावर हुरळून बुडाशीं कांहींच न मिळाल्यामुळें वाचकांची इतरत्र जी फसगत व निराशा होते तेवढी तरी आमच्या वाचकांची होत नसल्याचें कर्णोपकर्णी आमच्या ऐकण्यांत आलें आहे.

मासिकाची भिस्त वर्गणीदारांप्रमाणेंच थोडीफार लेखकवर्गावर आहे; आणि या बाबतात आह्मांला आमच्या लेखक–कविमित्रांकडून यथामगदूर सहाय्य मिळाल्यामुळें त्यांचे आभार मानणें जरूर आहे. महाराष्ट्राच्या पूर्व परिचयाच्या कांहीं उत्कृष्ट व प्रसिद्ध लेखकां-चा येत्या वर्षीं 'अरुणमाले' तर्फे वाचकाशीं परिचय करून देण्याचें आह्मीं आमच्या वाच-कांना आश्वासन देतों.

येत्या वर्षीं ज्या कांहीं सुधारणा करण्यांत येणार आहेत त्यांपैकीं कांहींचा नाम-निर्देश खालीं केला आहे:—

(१) आधुनिक विख्यात नाटककारांच्या निवडक नाटकांची मनोरंजक रीतीनें लिहिलेलीं संक्षिप्त कथानकें दर अंकांत यापुढें देण्यांत येणार आहेत.

(२) रविवर्मा, काशिनाथ रघुनाथ मित्र, जावजी दादाजी, अण्णा किर्लोस्कर, विवेकानंद, केशवराव भोसले, गडकरी वगैरे वगैरे वाङ्मय, संगीत, चित्रकला, मुद्रण-कला इत्यादि कलांत पारंगतता मिळविलेल्या आधुनिक सुविख्यात व्यक्तींची त्रोटक व मनोरंजक चरित्रें दर अंकांतून प्रसिद्ध होतील. हीं चरित्रें विशेष कुठेंच प्रसिद्ध झालेलीं नाहींत.

(३) आजच्या कांहीं राष्ट्रीय पुढाऱ्यांना **'राष्ट्राच्या उन्नतिसाठीं आजच्या तरुणानीं काय केलें पाहिजे ?'** हा प्रश्न विचारण्यांत आला आहे. त्याचीं उत्तरें आलीं कीं तींहि 'अरुणमालेंत' दर अंकांतून प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत.

(४) येत्या अंकापासून **'संन्यस्त'** ही कादंबरी सुरूं करण्यांत येणार आहे. ही कादंबरी ह्मणजे सर हॉलकेन यांच्या 'प्रॉडिगल सन' या कादंबरीचें, प्रधान हेतु शाबूत ठेऊन व योग्य ठिकाणीं आवश्यक फेरफार करून, सुंदर व मनोरंजक रूपांतर आहे.

(५) 'मुलांची मौज' या सदरांत गेल्या वर्षाप्रमाणें मजकूर देण्यांत येईल. शिवाय विमान, फोनोग्राफ, आगगाडी, टेलिफोन वगैरे अनेक यंत्रांची उत्पादकांसह मनो-रंजक माहिती, 'मुलांचें कुतूहल' वगैरे अनेक विषय येणार आहेत.

या नवीन सुधारणांशिवाय चित्रें, गोष्टी, प्रहसनें, विनोदी लेख, नाट्यछटा, गद्यकाव्यें, निबंध वगैरे अनेक विषय यंदाप्रमाणें येतील; शिवाय यंदा अंकाचा प्रसिद्धीकाल अनिश्चित होता. परंतु आतां दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत अंक प्रसिद्ध होईल अशी व्यवस्था केलेली आहे.

आह्मांला दोन वर्षें आमच्या प्रेमळ वाचकांनीं जसा धीर आणि प्रोत्साहन दिलें त-सेंच येत्या वर्षींहि द्यावें अशी त्यांना विनंति करून सर्वशक्ति जगदीशाला नमन करतो.

हरवलेला बाळकृष्ण.

[संपूर्ण गोष्ट]

पाऊस मुसळधार पडत होता. सर्वत्र घनांधकाराचें भीषण साम्राज्य पसरलें होतें. प्रथम मोत्याच्या दाण्याप्रमाणें भासणारे पावसाचे थेंब आतां चांगले मोठाल्या झुंबराच्या लोलकाप्रमाणें दिसत होते. पावसाच्या धों धों आवाजांत सोसाट्याच्या वाऱ्याचा घों घों आवाज मिसळून एक प्रकारचा गंभीर ब्रह्मांडपरिभ्रमणासारखा भासणारा आवाज मधून मधून घुमत होता. त्यावेळीं क्षणभर असें वाटे कीं एकाद्या लहान मुलीप्रमाणें धरित्रीमाता देखील आपल्याभोंवतीं गिरक्या घेतां घेतां आतां भोंवळ येऊन पडत आहे. कट्टया आशावादी इसमाच्या अन्तःकरणांत देखील निराशेचें साम्राज्य पसरलें जावें अशीच त्या वेळीं पंचमहाभूतांनीं एकंदर परिस्थिति निर्माण केली होती. अशा वेळीं गिरगांवांतील एका जुनाट चाळीच्या एका खोलींत तिशीचा अंमल पार पडलेला एक तरुण तळहातावर डोकें टेंकून हातानें समोरील टेबलावर पसरलेल्या एका कागदावर आडव्यातिडव्या रेघोट्या मारीत स्वस्थ बसलेला होता. त्याच्या कपाळावर पडलेलें आठ्यांचें जाळें, किंचित् खोल गेलेले डोळे, वक्र भृकुटि, वाढलेली दाढी यावरून तो सांप्रत सुस्थितींत नसावा हें स्पष्ट दिसत होतें. परंतु त्याच्या अंगकांतिवरून व चेहऱ्यावरील एकंदर रुबाबावरून त्याचें पूर्व आयुष्य बऱ्याच चैनींत व ख्यालीखुशालींत गेलें असावें हें मात्र स्पष्ट दिसत होतें.

" खरोखर दारिद्र्य ह्मणजे एक अजब चीज आहे. मनुष्यप्राण्याला पूर्वजन्मीचें पाप इहलोकीं भोगावयास लावणारें दारिद्र्यासारखें अमोघ शस्त्र परमेश्वराच्या हातीं दुसरें कुठलेंहि नसेल. उगाच नाहीं चारुदत्तानें दारिद्र्यापेक्षां मरणाला कवटाळण्यांत आनंद मानला. नोकरी सुटल्यापासून या खडतर दारिद्र्याच्या व भावी दुःस्थितीच्या यातना कशा इंगळ्याप्रमाणें टोंचीत आहेत ! परंतु एका अर्थी हें माझ्या कृतकर्मांचें प्रायश्चित्तच मीं भोगीत नव्हे काय ? ज्यावेळीं बाबासोहब घरमोडे होते आणि त्यांचा केवळ मित्र या नात्यानें त्यांच्या संपत्तीवर आह्मीं यथेच्छ चैन भोगीत होतों, ज्यावेळीं चारुदत्ताच्या मैत्रेयभटाप्रमाणें मसालेदार अन्नाचे ढेंकर देत होतों तेव्हां आमच्या अन्तःकरणांत गरीब लोकांविषयीं सहानुभूतीचा थोडा तरी अंश कधीं उत्पन्न झाला होता काय ? पैसा कुणाचा, चैन भोगीत असे कुणाच्या जीवावर आणि घमेंडी कोण ? ट्रॅम्बेंत एकादा मजूर माझ्या शेजारीं येऊन बसला तर त्याच्या घामट कपड्यांचा माझ्या रेशमी कोटाला स्पर्श होऊं नये ह्मणून मी अनेक वेळां ट्रॅममधून उत-.

रून व्हिक्टोरिया गांठलेली आहे. इतका त्यावेळीं माझ्या डोळ्यावर धूर होता. पण आतां या दरिद्री मिजासखोर संभाजीपेक्षां रस्त्यावरचा प्रामाणिकपणानें निढळाच्या घामानें मोल मजुरी करणारा हमाल शतपट बरा. आतां माझ्या खिशांत–या जगांत अवघे दोन रुपये शिल्लक आहेत. हेही दोन दिवसांनीं संपल्यानंतर पुढें वाट काय?"

मधून मधून सुरकोरे सोडीत तो तरुण अशा तऱ्हेचे उद्गार आपल्याशींच पुटपुटत होता. समोरील टेबलावर नुक्ताच रिकामा झालेला एक चहाचा पेला व एक कसल्यातरी पुडीचा कागद पडलेला होता. त्या कागदांत बांधून आणलेली वस्तु कधींच जठरार्पण झाली होती. तोच कागद हातांत घेऊन वेळ जाण्यासाठीं संभाजी त्यावरून आपले डोळे फिरवूं लागला. पुडीचा कागद कसल्या तरी पुस्तकाचें फाटकें पान होतें. कारण त्यावर एका बाजूस "दारिद्र्याची मीमांसा" असा मथळा होता. तो मथळा वाचतांच तो तरुण उपहासानें हंसला. "दारिद्र्याची रिकामी मीमांसा करण्यापेक्षां दरिद्री लोकांची पोटें कशा रितीनें भरतां येतील याचा कांहीं तरी उपाय हे लोक काढतील तर बरें" अशा तऱ्हेचे उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडले पण त्या कागदावरचीं कांहीं वाक्यें जरा उद्बोधक होतीं.

"लोभमूलानि पापानि" असें म्हटलें आहे तें सर्वस्वी खरें आहे. विसाव्या शतकाच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणें पहातां भांडवलशाहीचा लोभ जीं अनंत पापें प्रसवित असतो त्यांतील दारिद्र्य हें एक महापातक आहे. सर्व संपत्तीचा एकट्यानें उपभोग घेण्याचा हव्यास बाळगिल्यामुळें भांडवलशाहीच्या लोभाला दरिद्री मजूर वर्ग बळी पडत आहे. संपत्तीची समान वांटणी होत नसल्यामुळेंच श्रीमंत व गरीब हे भेद निर्माण होत असतात. दारिद्र्यानें पोटांत खाई पडली कीं मानवी मनोवृत्ति गुन्हे करण्याकडे प्रवृत्त होते व म्हणूनच समाजांत गुन्हेगार वर्ग निर्माण होतो, व बहुधा भांडवलशाहीच्याच जीवावर उठत असतो. या दृष्टीनें पहातां चोर, दरवडेखोर इत्यादि गुन्हेगार जाती समाजांतील श्रीमान् व प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या वर्गांचींच अपत्यें होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. दांभिक समाजाची रचना विषम असल्यामुळें अशा लोकांना सुधारण्याचे मार्गही मासलेवाईक बनलेले आहेत. हजारों लोकांचें रक्तशोषण करून जब्बर नफा खाऊन गब्बर बनलेला धनशेट प्रतिष्ठित समजला जाऊन समाजाच्या मानमान्यतेस पात्र ठरतो, तर पोटासाठीं क्षुल्लक चोरी करणाऱ्याला तुरुंगवास पत्करावा लागतो....."

"बस्स बस्स. पटलें आपल्याला. हीं वाक्यें अगदीं अक्षरशः खरीं आहेत. बस्स. आपण देखील आतां चोरी करणार. दुसरा उपाय नाहीं."

मनुष्याची ज्या तऱ्हेची मनोभूमिका व सभोंवतालचें वातावरण अगर परिस्थिति बनते त्याप्रमाणें त्याच्या मनावर इष्टानिष्ट परिणाम होतात. वास्तविक त्या पानांतून गुन्हेगारांना कशा तऱ्हेनें वागविलें असतां गुन्हे कमी होतील याचाच पुढें विचार केला होता. पण त्या

तरुणाला मात्र जणूं आपल्या मनांतल्या प्रश्नांचें उत्तर "चोरी करावी" असेंच मिळालें असें वाटल्यास नवल नाहीं.

संभाजी जागेवरून उठला. एकवार त्यानें खिडकीबाहेर नजर फेकली. बाहेर पावसाची अद्याप धुमश्चक्री सुरू होती. त्या तरुणानें एकदां विकट हास्य केलें. पुनः त्याला कसलीशी आठवण झाली. त्यानें आपल्या खिशांत चाचपून एक लहानसा कपटा काढला.

बक्षीस रुपये शंभर

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं मुंबईतील प्रख्यात श्रीमंत बाबासाहेब घरमोडे यांच्या देव्हाऱ्यांतील पूजेची बाळकृष्णाची मूर्ति कांहीं वर्षांपूर्वी चोरीस गेली आहे. ही मूर्ती अखंड पाचूची असून सुमारें हजार रुपये किंमतीची आहे. बाबासाहेब हयात असतांनाच ही चोरी झाली होती व त्याबद्दल पोलीसांत वर्दीही दिली होती. पण अद्याप तपास लागलेला नाहीं. मृत्युपूर्वी बाबासाहेबांनीं जें मृत्युपत्र केलें त्यांत वरील मूर्ति पुढें मागें सांपडल्यास खालीं सही करणारास बक्षीस देण्यांत यावी अशी इच्छा प्रदर्शित केली आहे. तरी या मूर्तीचा कायदेशीर मालक मीं आहे. तरी ही मूर्ति कोणास आढळून आल्यास तिचा तपास खालीं सही करणाऱ्यास कळविल्यास वरील बक्षीस देण्यांत येईल,

संभाजी गणेश गणपुले.

संभाजीनें तो कपटा पुनः एकदां वाचला. सुमारें महिन्यापूर्वी त्यानें ती जाहिरात दिली होती. जाहिरातींत निर्दिष्ट केलेल्या वस्तुचा अद्याप तपास लागला नव्हता. तरी वेड्या आशेनें ज्याच्या अंतःकरणांत थारा दिलेला असतो त्याला निव्वळ मनोराज्यांत विहार केल्यानें देखील आनंद वाटतो. संभाजीला तो जाहिरातीचा कपटा आज हजार रुपये किंमतीचा वाटत होता.

संभाजीनें तो कपटा खिशांत घातला. इतक्यांत शेजारच्या खोलींतून एक जोराच्या खोकल्याची किंकाळी ऐकूं आली व लागोपाठ "संभाजीराव" अशा कोणी तरी हाका मारल्या.

"हा आमचा शेजारीं आज मरतो आहे कीं काय?" असें कांहींसें पुटपुटत संभाजीनें मधलें दार उघडलें व शेजारच्या खोलींत प्रवेश केला. या खोलींत सर्व अंधार होता. एक लहानशी खाट खोलींत आडवी पडली असून उशालगत एक गोड्या तेलाची मिणमिण करणारी समई जळत होती. त्या समईच्या प्रकाशांत खाटेवर निजलेली व्यक्ति नीट दिसत सुद्धां नव्हती. त्या व्यक्तीनें आपलें सर्व अंग व चेहरा देखील पांघरुणाखालीं लपेटून घेतला होता. संभाजीच्या या शेजाऱ्यानें या जागेंत महिन्यापूर्वी बिऱ्हाड केलें होतें. ते

बहुधा सर्व दिवसभर बाहेर रहसे व रात्रीचा फक्त त्या खोलींत येई. त्यांतील दम्याची व्यथा फार असावी; कारण खोलींत अल्यावर तो जो खोकण्यास व कुंथण्यास आरंभ करी तो मध्यरात्र उलटेपर्यंत. संभाजीखेरीज तो कोणाशीं बोलत चालत देखील नसें. महिन्याच्या परिचयानंतर देखील संभाजीला त्याच्याविषयीं फारशी माहिती मिळाली नव्हती. गेले दोन दिवस तो जास्तच अजारी झाला होता.

"काय बाळाजी, आज कशी काय प्रकृति आहे?" खोलींत शिरल्याबरोबर संभाजीनें विचारलें.

"संभाजीराव, आज मला अखेरची वेळ जवळ येत चालली असें वाटूं लागलें आहे."

"म्हणजे?" संभाजीनें दचकून विचारलें.

"तसें कांहीं नाहीं. पण काय सांगू संभाजीराव, दर खोकल्याच्या उसळींसरशीं माझे प्राण अगदीं कासावीस होतात. असें वाटतें! केव्हां गुद्दा करीन त्याचा काय नेम!"

"हात्तिच्या! अशा तुमच्या अखेरच्या वेळा आजपर्यंत किती तरी झाल्या! तुम्हीं पुनः खडखडीत बरे व्हाल. असे घाबरतां काय?"

"घाबरत नाहीं म्हणा, पण संभाजीराव, मरणापूर्वी एक गुप्त गोष्ट तुम्हांला सांगावयाची आहे."

"कसली गुप्त गोष्ट?" संभाजीनें औत्सुक्यानें विचारलें.

"संभाजीराव, बाबासाहेब घरमोड्याकडील बाळकृष्णाच्या मूर्तीविषयीं तुम्हीं वर्तमानपत्रांतून जाहिरात दिली होती ना?"

"होय, होय! तुम्हाला त्याची माहिती आहे कीं काय?"

"होय. मला माहीत आहे. पण—पण माहिती म्हणजे मीच ती चोरली होती."

"अँ!" संभाजीच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडला.

"होय. मी ती चोरली खरी. पण आतां ती कोठें असेल कोण जाणे. मी त्या वेळीं बाबासाहेबांकडे पाणक्या म्हणून राहिलो होतो. देवघरांत नेहमीं जात येत असल्यामुळें ती पाचूची मूर्ति माझ्या मनांत भरली होती. ती पाचूची मूर्ति आपल्या संग्रही अस यापासून आपली भरभराट झाली असें ते वारंवार म्हणत. ह्या भरभराटीच्या स्वप्नानें व हजाराच्या किंमतीनें माझ्या तोंडाला पाणी सुटलें. त्यावेळीं बाबासाहेब स्वतःचें घर विकून शेट बुलाखीदासांच्या बंगल्यांत भाड्यानें रहावयास गेले होते. तुम्हाला माहीत असेल कीं बाबासाहेबांच्या संग्रहीं एक सुंदर चंदनी पेटी कशकुसरीचें उत्तम काम केलेली

अशी होती. मथुरेहून बाबासाहेबांच्या एका स्नेह्यानें एक जुनी वस्तु म्हणून त्यांना ती पाठविली होती. एकदां मी ती साफ करीत बसलों असतां खालच्या बाजूची एक पट्टी सहज दाबली गेली; त्यासरशीं चटकन् मधलाच एक कप्पा उघडला गेला. त्या दिवसापासून तो चोरकप्पा मला माहित झाला. शेवटीं एक दिवस ती पाचूची मूर्ति हळूच चोरून त्या चोरखणांत लपवून ठेवावी असा मी मनाशीं विचार केला व त्याप्रमाणें तो अंमलांतही आणला. माझी अशी कल्पना होती व अद्यापही आहे कीं तो चोरखण कोणाला माहित नसावा. असो. मीं मूर्ति त्या खणांत लपवून ठेवली खरी, पण कर्मधर्मसंयोग विचित्र! शेट बुलाखीदासांच्या मनांत ती चंदनी पेटी फार भरली होती व त्यांनीं ती बाबासाहेबांकडे विकत मागितली होती. दिलदार बाबासाहेबांनीं त्यांना ती बक्षीस देण्याचें ठरविलें. ती मूर्ति ज्या दिवशीं लपविली त्याच दिवशीं शेटजींनीं ती पेटी आपल्या घरीं नेली! त्यानंतर मग सर्वच बाजार आटोपला. ”

फार बोलल्यामुळें कीं काय बाळाजीला श्वास लागला. तो मोठमोठ्यानें खोकूं लागला. संभाजीच्या डोळ्यांत विचाराचें काहूर माजून राहिलें. डोळे मिटून निःस्तब्ध पडलेल्या बाळाजीकडे किंचित्काल पहात संभाजी हळुच म्हणाला.“ पण काय हो, ती मूर्ती त्याच ठिकाणीं अद्याप असेल काय? तुम्हाला काय वाटतें ?.”

“ असल सुद्धां ! कोणी सांगावें ! मला खात्रीलायक कसें सांगतां येणार ? ”

“ पण समजा, बुलाखीदासाच्या एकाद्या नोकराला तुमच्याप्रमाणच त्या चोरखणाचा शोध लागला तर त्याला ती मूर्ति सांपडण्याचा संभव आहे. ”

“ होय, संभव आहे खरा. ”

“ आणि मग ती तो दडवूनही ठेवील कदाचित् ! ”

“ हो, तेंहि शक्य आहे. ”

“ पण त्या मूर्तिवर माझा हक्क पोचतों कीं नाहीं ? ”

“ अलबत ! ”

“ बरें समजा, मी आतां बुलाखीदासाकडे गेलों आणि त्यांना सर्व गोष्टी समजावून सांगितल्या तर कदाचित् त्याला तुमची हरकत असेल ! कारण या प्रकरणांत तुमचे नांव बाहेर येतें. ”

“ हें पहा, माझें नांव शक्य तितकें दडवून तुम्हांला जें काय करावयाचें तें बेलाशक करा. आणि माझें नांव फुटलें तरी मी आतां मरतोंच आहें म्हणा. मला ती चोरी केल्या दिवसापासून सुख कसें तें पोचलें नाहीं. ”

“ मग मला बुलाखीदासाकडे जाऊन आपली वस्तु मागावयास कोणती हरकत आहे? ”

"तशी हरकत नाहीं, पण मला वाटतें यांत कित्येक गोष्टी विचरांत घेतल्या पाहिजेत. समजा, तुह्मी बुलाखीदसाकडे जाऊन सगळी हकीगत सांगितली आणि तुमचें न ऐकतां त्यानें तुह्माला झिडकारून दिलें तर तुह्मी काय करणार? किंवा तो तुह्माला दुसऱ्या एकाद्या वेळीं परत बोलावील आणि अगोदर आपण हल्लुच ती वस्तु काढून घेईल, तो तुह्मांला सुखासुखा ती वस्तु देईल असे मला वाटत नाही. द्रव्याचा मोह कोणाला नाहीं. माझ्या मतें उत्तम युक्ति ह्मणजे जशी मी ती वस्तु चोरून ठेवली तशींच चारून—"

"काय ह्मणतां? तर मग मी चोरी करूं?" संभाजीनें अडखळत विचारलें.

"हो, तेवढी तुमची छाती असली तर! आपल्या हक्काची वस्तु युक्तिप्रयुक्तिनें काढून घेण्यांत चोरी ती कसली?"

"बरं, मग हे कसं साधतां येणार? आपणच सांगा पाहूं."

"तें मी काय सांगूं? कोठूनही तुमची वस्तु तुह्मांला मिळावी ही माझी इच्छा. आणि तुह्मांला जर तसा प्रयत्न करावयाचा असेल तर उद्यांचा दिवस चांगला आहे. काल मी तपास केला तर बुलाखीदासाची मंडळी सुरतेला गेल्याचें मला कळलें आणि कालच तो स्वतः उज्जनीस व्यापारी कामासाठीं गेला आहे; तेव्हां त्याच्या बंगल्यांत सध्यां एकट्या माळ्याखेरीज कोणी नसणार. त्याचा मलबारहिलवरचा बंगला आपण पाहिलाच असेल. मधल्या थोरल्या जिन्यानें वर चढून गेलें कीं डाव्या बाजूला दिवाणखान्याला लागत जी खोली लागते ती त्याची बसण्याउठण्याची जागा. त्याच खोलींत बहुधा ती चंदनी पेटी असावी. मी सुद्धां ह काम केलें असतें. पण—"

इतक्यांत बाळाजीला पुनः जोराचा खोकला आला. त्या खोकल्यामुळें त्याचा जीव घुटमळ्यासारखा होऊं लागला. उगाच जास्त विचारपूस करून त्याला आतां अधिक त्रास देणें योग्य नाहीं असें वाटून संभाजी आपल्या खोलींत परतला.

त्याच्या डोक्यांत सारखे विचार उसळत होते. आपण चोरी करावी काय? किंवहुना आपल्या या प्रयत्नाला चोरी हें नांव देतां येईल काय? अशा परस्परविरोधी विचारांनीं त्याच्या डोक्यांत कल्लोळ उडविला होता. पण "बुभुक्षित किं न करोति पापं। क्षीणा जना निष्करुणा भवन्ति" या वचनाप्रमाणें त्याच्या मनांत उत्पन्न होणारे सारे सद्विचार दुसऱ्या क्षणीं जळून खाक होत असत. एकवार त्याला वाटे कीं आपण सरळ बुलाखीदासांना भेटून सारी हकीकत त्यांना कळवावी, पण दुसऱ्या क्षणीं त्याला असें वाटे कीं बुलाखीदासाचें 'वेपारी' मन आपल्याला अनुकूल झालें नाहीं तर! जर का त्यानें आपल्यासमक्ष पेटी उघडली व त्यांत कांहीं सांपडलें नाहीं तरी आपला त्यावर विश्वास बसणार नाहीं. शेवटीं दुसऱ्या दिवशीं बुलाखीदासाच्या बंगल्यावर जावयाचें व मग तेथें सुचेल त्याप्रमाणें वागावयाचें असा त्यानें आपल्या मनाशीं निश्चय केला.

ती रात्र त्यानें तळमळत जागून काढली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं शेजारच्या खोलीकडे पहातो तों दाराला कुलूप लांगलेलें दिसलें. आदल्या रात्रीं प्राणांतिक अवस्था झालेला इसम सकाळींच नाहींसा होतो हें काय? या लुच्यानें आपल्याला सर्व बनावट तर हकीगत सांगितली नसेल असाहि त्याला एकवार संशय आला. पण या दमेकरी लोकांचें हें असेंच घटकेंत बरें तर घटकेंत घरघर लागण्यापर्यंत पाळी! आपणाला फसवून त्या बिचाऱ्याला काय मिळणार, असा विचार मनांत येऊन त्यानें आपला पूर्वीचा बेत कायम केला.

× × × × ×

रात्रीचे दहा वाजण्याचा सुमार होता. पावसाची झिमझिम अद्याप चालू होती. अशा वेळीं बुलाखीदासाच्या बंगल्याच्या आवारांत एक व्यक्ति आसपास टेहळणी करीत होती. बंगल्याची एक खिडकी उघडी दिसली, तेव्हां तर आनंदातिशयानें त्या व्यक्तिनें टाळ्या पिटल्या. "काय असेल तें असो-ती मूर्ती मलाच मिळावी असाच परमेश्वराचाह[1] संकेत असावा. एरव्ही अशी छान संधि कां यत्ची?" असें पुटपुटत संभाजीनें एक पाय खिडकीवर चढविला; पण वर चढतांना आपण दुसऱ्याच्या घरांत चोरीच्या हेतूनें शिरत आहों हा विचार मनांत येतांच त्याचा बावरलेला हात चटकन एका तावदानावर आदळला. त्यासरशीं तें तावदान फुटून कांचेचा 'खळ्ळ' असा आवाज झाला. संभाजीनें चटकन खालीं उडी मारली व आवाराच्या बाहेर धूम ठोकली.

सुमारें पंधरा मिनिटें लपतछपत कानोसा घेत कोणी येत नाहींसें पाहून पुनः तो आंत आला. या खेपेस मात्र त्यानें खिडकीच्या आंत उडी टाकली. 'बेहत्तर आहे. हातीं घेतलेलें काम शेवटास नेणारच. उद्यां संभाजी हजाराचा मालक तरी होईल नाहींतर कडीतोडे घालून तुरुंगाकडे तरी रवाना होईल.' असें पुटपुटत हळूच जिना चढत तो वर आला. बाळाजीनें सांगितल्याप्रमाणें खरोखरीच वर खोली होती व काय चमत्कार? त्या खोलीचें दारही उघडलें होतें! आपण आज येणार म्हणून तर बुलाखीदासाच्या नोकरानें सर्व खोल्या सताड उघड्या नाहींत ना असाही विचार मनांत येऊन त्याला क्षणभर मौज वाटली. खिशांतून पेटी काढून त्यानें काडी पेटवली. समोर एका प्रशस्त टेबलाच्या बाजूलाच एका स्टँडवर ती चंदनी पेटी होती. संभाजीचें हृदय धडधडूं लागलें पण—अरे बापरे! एक व्यक्ति हातांत पिस्तूल घेऊन पुढ्यांत उभी! अरेच्चा! हा तर बुलाखीदास! पण हा येथें आला कसा? संभाजीनें बुलाखीदासास एक दोन वेळांच पाहिलें होतें. पण अनुमानानें तो बुलाखीदासच असावा अशी त्याची खात्री झाली

"हं खबरदार, एक पाऊल पुढें टाकशील तर पिस्तुलच झाडीन. काडी विझवूं नकोस. टेबलावरची मेणबत्ती पेटव."

बुलाखीदास अगदीं शांतपणें बोलत होता. संभाजी तर जागच्याजागीं अगदीं

थिजून गेला. त्यानें निमूटपणें शामदानांतील मेणबत्ती पेटवली. हा वेळपावेतों त्याची काडी हात भाजेतोंपर्यंत पेटली होती.

"हं, एकूण मी आवाज ऐकला तो खरा तर. भल्या गृहस्था, दरोडा घालावयाचा तो हल्ली तरी घालावा. विनाकारण माझ्या खिडकीचें तावदान फोडलेंस ना? तुला हा बंगला रिकामा असेल असें वाटलें होतें नाहीं?"

"होय." कपाळावरचा घाम पुसीत संभाजी ह्मणाला. आपण कोठून या पेचांत पडलों असें त्या बिचाऱ्याला झालें.

"पण तुझें नशिब पडलें वांकडें. त्याला तुझा तरी काय इलाज?" असें ह्मणून बुलाखीदासानें ताबडतोब टेलिफोनचा रिसिव्हर हातांत घेतला. हें पोलिसांना बोलावणें होय हें संभाजीनें ताबडतोब ओळखलें.

"कृपा करून जरा थांवा. मी हाडाचा चोर नाहीं. परिस्थितीनें मला चोर केलें आहे. जरा क्षणभर थांबाल तर मी आपणाला सर्व हकीगत नीट समजावून देईन."

"आतां क्षणभरानें पोलिस येईल; त्यांनाच नीट समजावून द्या."

"छे छे; असा उताविळपणा करूं नका. माझें ऐकून तर घ्या. आपणास बाबा-साहेब घरमोडे माहित असतील!"

बुलाखीदासाचा टेलिफोनवरील हात क्षणभर थवकला. संभाजीला जरा आशा वाटूं लागली.

"तो जसा तुमचा मित्र तसाच माझाही मित्र होता. त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत आपली बाळकृष्णाची मूर्ति मला बक्षीस दिली होती. तो आपणाला नकळत आपल्याकडे आहे ही गोष्ट मला कळल्यावरून मी इकडे आलों."

"वा! बनावट गोष्ट तयार करण्यांत देखील मोठा हुशार दिसतोस. भल्या माणसा, मृत्युपत्रानें दिलेली वस्तु माझ्याकडे कशी आली?"

"तीच सांगतों ना. आपल्याकडे ती नकळत आलेली आहे. बाबासाहेब हयात असतानांच ती चोरीला गेली होती व चोरानें ती आपल्याकडे लपविली"

"तें तुला कसें कळलें?"

"मला खुद्द त्या चोराच्या तोंडूनच नुक्तें कळलें."

बुलाखीदास क्षणभर विचारांत पडल्यासारखा दिसला. "छे. पण अद्याप माझी खात्री पटत नाहीं. ती वस्तु आतां कोठें आहे?"

"याच खोलींत आहे."

"मग कुठें आहे ती? मला कशी दिसत नाहीं?"

'ह्या चंदनी पेटींत.' हे शद्ब संभाजीच्या अगदीं ओंठावर आले होते. पण त्यानें ते परतले. न जाणो, आपलें गुप्त रहस्य कळण्याची खोटी कीं बुलाखीदास आपणाला हांकलून देऊन ती वस्तु हस्तगत करून घेईल!

"मला आपण परवानगी द्याल तर मी ती वस्तु आतां शोधून काढतों."

"हं हं. तें मात्र कांहीं चालणार नाहीं. या खोलींतील कोणत्याही वस्तूला मी हात लावूं देणार नाहीं."

"बरं आहे तर मग. जा, खुशाल पोलिसाला बोलवा. खात्रीनें ती वस्तु तुह्मांला माहित असावी. एरव्हीं आपण अशा गमजा चालविल्या नसत्या. येऊं द्या पोलिस. कांहीं हरकत नाहीं. मी पोलिसासमोर माझी वस्तु काढून दाखवीन. फार तर घरफोडीबद्दल मला शिक्षा होईल. पण माझी वस्तु तर मला परत मिळेल!"

संभाजीच्या या निर्वाणीच्या भाषणामुळें बुलाखीदास जरा नरम आल्यासारखा दिसला. तो शांतपणें ह्मणाला,

"हें पहा; तुह्मी खोटें बोलत असाल असें मी ह्मणत नाहीं. पण आपली वस्तु मिळविण्यास तुह्माला सरळ मार्ग असतानां तुह्मीं धडधडीत चोरीच्या मार्गाचा अवलंब केला कीं नाहीं?"

संभाजीला ही गोष्ट कबूलच होती; तो गप्पच होता.

"हें पहा;" बुलाखीदास पुढें ह्मणाला. "आपण कांहीं तरी तडजोड करूं या. ज्या अर्थी तुह्मी माझ्या घरांत शिरण्याचे एवढें धाडस दाखविलें त्यावरून पहातां तुह्मी आज पैशाच्या गरजेंत आहां असें दिसतें."

"होय, गरज कुठली–भुकेनें मरण्याची पाळी आली आहे मला!"

"होय ना? मग मी सांगतों तसें करा. तुमची वस्तु माझ्याकडेच असेल अशी तुह्माला खात्री देतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें ती माझ्याकडे नसेल अशी मलाही खात्री देववत नाहीं. ही गोष्ट सर्वस्वी तिऱ्हाइताकडून आपणाला कळली आहे तेव्हां आपण असें करूं. ती मूर्ति किंमतीची आहे असें तुह्मी ह्मणतां मी तुह्माला शंभर रुपये देतों. आणि तुह्मी मला ती वस्तु विकून टाका. जर कां तुह्मी सांगतां त्याप्रमाणें वस्तु मिळाली–बहुधा ती मिळणार नाहींच–तर मग तुमचें नशीब. पण मी तुह्माला आणखी शंभर रुपये देईन. नच मिळाली तरी मी तुमचे शंभर रुपये परत मागणार नाहीं. ही अट तुह्मांला कबूल नसली तर मी ताबडतोब तुह्मांला पोलिसाच्या स्वाधीन करणार."

बुलाखीदासाच्या या 'बेपारी' युक्तीनें संभाजी अगदीं हतबुद्धच झाला. त्याच्या

डोक्यांत ही कल्पना मुळींच आली नव्हती. आतां कसें करावें हा त्याला मोठाच प्रश्न पडला. न जाणो, मूर्ति असेल कीं नाहीं ? निदान आतां रोख शंभर रुपये तरी मिळताहेत ते कां सोडा ? पण लगेच हजार रुपयांची मूर्ति डोळ्यापुढें उभी राहून त्या मानानें शंभर अगर दोनशे रुपये कांहींच नव्हत असेंही त्याला वाटूं लागलें. दुसरा एक त्याला असा संशय येऊं लागला कीं बुलाखीदासाला त्या मूर्तीचा पत्ता लागला असावा. एरव्हीं तो इतका वठणीवर येऊन अशा तऱ्हेची भाषा कां बोलावा ? एक ना दोन हजारों विचार त्याच्या डोक्यांत येऊं लागले.

" बोला झटपट, काय विचार ठरला ?"

" बरं आहे, कांहीं हरकत नाहीं " तावडतोब बुलाखीदासानें एक जवळचा कागद ओढला,

" या कागदावर लिहून द्या कीं मी मूर्ति शंभर रुपयाला विकली. "

संभाजीला आतां मात्र पराकाष्ठेचा संताप आला. त्याला बुलाखीदासाविषयीं संशय वाटूं लागला. पण करतो काय ? तो विलक्षण पेंचांत पडला होता. दांतओंठ खात तो ह्मणाला,

" बरं आहे. पण मला अगोदर पैसे हातीं पडले पाहिजेत "

" कांहीं हरकत नाहीं. " तावडतोब बुलाखीदासानें जवळचें कपाट उघडून त्यांतून एक नोट काढून संभाजीच्या हातांत दिली व दौत लेखणी त्याच्या पुढ्यांत टेबलावर ठेवली.

संतापानें संभाजीनें कागद लिहिण्यासाठीं हातीं घेतला. या वेळीं बुलाखीदास कपाटाकडे तोंड करून आंतील कांहीं वस्तु व्यवस्थित ठेवण्यांत गुंतला होता.

मेणबत्तीचा प्रकाश त्याच्या तोंडावर पडला असतां संभाजी संतापानें त्याच्याकडे टक लावून पहात होता. मघांपासून त्याची नजर खालीं असल्यामुळें त्याला बुलाखीदासाला चांगल्या प्रकारें निरखतां आलें नव्हतें. आतां त्याला नीट पहात असतां त्याच्या डोक्यांत विद्युल्लतेप्रमाणें एक चमत्कारिक संशय येऊन गेला.

'बुलाखीदास आणि बाळाजी ही व्यक्ति एकच तर नसेल ?'

निरखून पहातां संभाजीला जास्तच संशय येऊं लागला. त्यानें मागचापुढचा विचार न करतां एकदम बुलाखीदासावर झडप घातली व त्याच्या हातांतलें पिस्तुल काढून घेतलें.

" हं खबरदार ! बुलाखीदास, आतां तुझी सारी करामत मला कळली. बाळाजी आणि तूं एकच. चोरी पचविण्यासाठीं हें सारें ढोंग केलेंस वाटतें ? खात्रीनें तूंच त्या मूर्तीची चोरी केली असावीस. माझ्या जाहिरातीमुळें पोलिस तपास सुरूं होऊन आपल बिंग चवाठ्यावर येईल या भीतीनें तूं हीं सोंगें घेऊन मला फसविण्याचा घाट घातलास काय ?

सांग, सांग, तूंच तो दमेकरी बाळाजी कीं नाहीं? आतां मीच बोलावतों पोलिसाला आणि तुझ्या साऱ्या कर्मांचा पाढा वाचतों. ”

क्षणाक्षणानें संतापासरसा संभाजी बुलाखीदासाचा गळा दाबीत होता. बुलाखीदासाचे डोळे पांढरे झाले.

“ अरे बापरे! माफ करा. संभाजी, माफ करा. माझा अपराध मी कबूल करतों. कृपा करून पोलिसाच्या वाटेला जाऊं नका. माझ्या अब्रूवर घाला आणूं नका. मी तुमची मूर्ति परत देतों. सोडा सोडा. ”

“ अगोदर मूर्ति कोठें आहे ती सांग. ”

“ सांगतो. सांगतो. ज्या कपाटांतून मीं आतां नोट दिली त्याच टिकाणीं आहे. ” बुलाखीदासाचा हात घट्ट धरून संभाजीनें कपाटांत हात घातला. पहिल्यांदाच त्याचा हात मूर्तिवर पडला आनंदातिशयानें ती मूर्ति त्यानें बाहेर काढली. मेणबत्तीचा मंद प्रकाश त्या मूर्तिवर पडून त्यांतून किरणाची प्रभा दिसूं लागली. मूर्ति घट्ट हृदयाकडे धरून बुलाखीदासाला ढकलून संभाजी स्वस्थ मनानें बाहेर पडला. त्याला कोणीही अटकाव केला नाहीं.

तो आपल्या चाळीजवळ आला. आज त्याला सर्व सृष्टी प्रसन्न भासत होती. इतक्यांत त्याचा हात आप या खिशाजवळ गेला. अघा बुलाखीदासानें दिलेली शंभराची नोट त्याच्या खिशांतच होती. हंसत संभाजीनें ती बाहेर काढून कंदीलाच्या प्रकाशांत पाहिली. पाहिली तर हजाराची नोट! बुलाखीदासानें चुकून शंभराची ह्मणून त्याच्याजवळ दिली. संभाजीनें आनंदोद्गार काढला.

“ बाळकृष्णा, तुमच्या मूर्तिनें प्रथमच आपला प्रभाव दाखविला! ”

क्षणभंगुर

ही या वर्षाची अत्यंत चटकदार कादंबरी पुस्तक रुपानें तयार आहे. किंमत ट. ख. सह १ रुपया २ आणे.

खुडलेलीं फुलें.

—तरुण प्रणयी जनांच्या सुखसंवादाच्या वेळीं कुलीन आणि गंभीर वृत्तीचा काळपुरुष मर्यादशीलपणानें ओशाळून चोरट्या पावलीं भराभर चालता होतो, आणि दुःखप्रसंगीं कष्टी जीवाचें सांत्वनपर समाधान करण्यासाठीं थोर मनानें त्याच्याजवळ तिष्ठत वसतो. दुःख जितकें मंदगति आहे तितकेंच सुख चंचल आहे. या मृत्युलोकच्या वस्तींत सुखाचा संसार इतका क्षणभंगुर आहे कीं, कधींकधीं पहिल्या चुंबनानें गालावर लाली येते न येते तोंच ती शेवटच्या वियोगाच्या अश्रूंनीं धुवून काढण्याची घाई होते. सुखाच्या आयुष्याप्रमाणें गुणधर्महि चंचलवृत्ति असतात. सुखाच्या सृष्टींतला प्रेमाचा घोंट ओठांनां अमृताचा आस्वाद देतो, आणि जिभेवर जाण्यापूर्वीच जहराप्रमाणें जाळायला लागतो. सुंदर तारा अक्षय आहेत पण दुर्लभ आहेत; आणि सहज लाभण्यासारखीं फुलें क्षणिक आहेत; म्हणून मानवी सृष्टींत सुखस्थिति पहाण्याच्या लोभानें विधात्यानें त्या दोघांचे प्रमाणशीर गुण घेऊन स्त्रियांचे सुंदर नेत्र निर्माण करून पाहिलें तर त्यांत त्याची सर्वस्वी निराशा झाली. त्या गुणाऐवजीं स्त्रियांच्या सुंदर नेत्रांत तारांची दुर्लभता आणि फुलांची क्षणभंगुरता मात्र दिसून येऊं लागल्या ! —कै० रा० ग० गडकरी (भाववंधन)

—ज्या ठिकाणीं बोलणाराच्या वचनांत अर्थचमत्कृति असते व ती अर्थचमत्कृति केवळ आत्मगुणानेंच हास्योत्पादक होते, अशा वचनास **कोटी** किंवा **चतुरालाप** असें म्हणतात. विनोदवचनामध्यें व कोटीमध्यें हा मुख्य फरक आहे कीं, विनोदवचनांत जें हास्य उत्पन्न होतें, तें केवळ अर्थचमत्कृतीच्या आत्मगुणानें होत नाहीं, तर तदंतर्गत जे पदार्थ त्यांच्या परस्पर असंवद्धतेनें, किंवा परिस्थितीच्या व त्यांच्या मिळूनं उत्पन्न होणाऱ्या असंवद्धतेनें उत्पन्न होतें. कोटी व विनोदवचन यांमध्यें दुसरा एक फरक आहे तो हा कीं, कोटी ही होतां होईतों फार थोड्या शब्दांत ग्रथित असतें. (Brevity is the soul of wit-Shakespeare) किंबहुना ती जितक्या थोड्या शब्दांत ग्रथित असेल, तितकी बहार अधिक, असा नियम आहे. विनोदाचें तसें नाहीं. विनोद बहुधा एकाद्या दुसऱ्या वचनांत किंवा वाक्यांत संपूर्ण किंवा पक्व असा क्वचीतच होतो. व तो परिस्थितीजन्य असंवद्धतेवर जेव्हां अवलंबून असतो, तेव्हां तर जितक्या विस्तृत वचनांत ग्रथित असेल तितका तो अधिक बहारदार असतो. हा भेद कोटी व विनोदवचन या दोन पदार्थांची पुढें जी कांहीं थोडीं उदाहरणें दिलेलीं आहेत, तीं वाचलीं असतां विशेष कळून येईलच. परंतु नुसता लक्षणभेद लक्षांत घ्यावयाचा असल्यास तो भेद निरनिराळ्या रीतींनीं व्यक्त

करितां येईल. कोटीचा संबंध बहुधा बुद्धि व कल्पना यांशीं असतो. विनोदाचा संबंध मनोभावांशीं विशेष असतो. कोटींत बुद्धितेज चमकतें व विनोदांत मनोभावांची जागृती होऊन तद्द्वारा अर्थ हृदयांत शिरतो. दुसऱ्या एका दृष्टीनें असें म्हणतां येईल कीं, कोटीचें स्वारस्य तिच्या चापल्यांत असतें. एखाद्या सुरुंगाप्रमाणें तिचा बार इतक्या अनपेक्षित रीतीनें उडून जातो कीं, तो होऊन गेल्यावर ऐकणारा डोळे चोळून आपणावर म्हणजे आपल्या बुद्धीवर हा एकदम कसा घाला पडला, असें आश्चर्य करीत रहातो. व क्षणांत दृश्य होऊन अदृश्य झालेल्या विद्युत्तेजाप्रमाणें कोटी ही बुद्धीस चकविते. जी गोष्ट आपण एरवीं कबूल करण्यास पुष्कळ आढेवेढे घेतले असते, तीच गोष्ट कदाचित् कोटीचे द्वारानें आपल्या मनांत प्रविष्ट झाली असतां आपल्यास चटदिशीं पटते. कोटीचा आदि व तिचा अंत, हीं दोन्हीं एका क्षणांतच होतात व तसें होणें जरूरही असतें. कोटी करावयाची म्हणून होत नसते. तिला अवचित प्रसंग मिळावा लागतो. व हा प्रसंग जाणूनबुजून आणितां येत नाहीं, तर बोलण्यांत किंवा लिहिण्यांत अगदीं ओघानेंच यावा लागतो.—न. चिं. केळकर.

(सुभाषित आणि विनोद.)

पिंपळदकर यांचे हातमागावरील
इरकली लुगडें फक्त ११ रु.
अहिल्या पातळ फक्त ७॥ रु.
माल घरोघर दाखविण्याची खास व्यवस्था केली आहे.
पत्ता:—पिंपळदकर.
प्रार्थनासमाज, गिरगांव.
फक्त दोन रुपये रोख भरून नमुने मागवा.
अ. ३

महिन्याची अखेर

(श्री० 'मंगळमूर्ति')

प्रवेश पहिला.

[कपाऊला 'सतराशें आठ आंठ्या घालून अगदीं गळलेल्या चेहऱ्यानें विसूभाऊ ऑफिसांतून घरीं येतात. अंगांत काळा कीं कसलासा लांबलचक डगला, त्याच्या आंत तशाच कुठल्याशा रंगाचें जाकीट, त्याच्या आंत पट्टीच्या गळ्याचें उघडें शर्ट, त्याच्या आंत 'उघड उघड' दिसणारे काळे गंजिफ्रॉक. काखोटीला सतरा ठिकाणीं भलीं थोरली ठिगळें लावलेलीं व बाकीच्या ठिकाणीं कंटाळा आल्यामुळें तशींच राहूं दिलेली छत्री. विसुभाऊ आल्याचा 'वास' लागतांच बिळांतल्या उंदरासारखीं बाहेरून, आंतून, इझिचेअरखालून, बिछान्याच्या वळकटीआडून विसूभाऊंचीं 'पिलें' किलबिल करीत त्यांना बिलगतात.]

ठमी:—भाऊ, मला भावली आणलीत ? भाऊ—

नमी:—भाऊ, मला हालवा आणलात ?

रामू:—नी भाऊ, मला—मला—मला—(त्याला काय मागावें तेंच सुचत नाहीं. ती संधी साधून बाकीचीं 'पिलें' आळीपाळीनें वरपक्षाइतक्या मागण्या करतात. विसुभाऊंना या गलबल्यांत कांहींच ऐकूं येत नसल्यामुळें ते प्रेताइतक्या गंभीरतेनें इझिचेअरवर पडून रहातात. अखेर 'पिल्लें' दमतात व श्वास टाकीत स्वस्थ उभीं रहातात. सीतामाई प्रविष्ट.)

सीता:—अगबाई, कधीं आलांत ?

विसु:—(कोंकराच्या लीनतेनें) हा आतांच आलों.

सीता:—मग आंत येऊन सांगायला काय झालं होतं ? माणसाला कळायचं बाई तरी कसं, कोण आलं न् कोण गेलं तें ? मेली मी एकटी कित्ती कित्ती आणि कुठं कुठं म्हणून पाहूं ? मेलीं हीं पोरं खायला उठलीं आहेत ! सबंध दिवस राब राब न मर मर ! अन् त्यांत तुम्हांलाहि आलां कीं नाहीं तें पाह्यला सतरांदा बाहेर यायचं म्हणजे माणसाला मेला जीव आहे कीं नाहीं ? चहा हवा असला तर आंत यावं नी घेऊन जावा. आणून द्यायला कोण ठेवली आहे वाटते दासी सेवेला ? (विसुभाऊंना

ऑफिसांतल्या कामानें आलेला शीण आणि थकवा पार नाहींसा होऊन त्यांच्यांत तरतरी येते.) आणि चहाची साखर आणलीत का ? आतां चहा कसला करायचा माझ्या हाडाचा ? (हाडांत साखरेचा गुण असतो कीं काय याची संशोधकदृष्टीनें चिकित्सा करीत असल्यासारखा विसुभाऊचा चेहरा होतो.) आणि भाजी काय आणलीत संध्याकाळला ? का आलांत तसेच हात हालवीत ? बाई—बाई—बाई ! आतां गडी तरी ठेवा एखादा तुमच्यानं झेंपत नाहीं तर ! का उद्यांपासनं मीच जाऊं कोट न् टोपी घालून बाजारांत ? (' पिल्लें ' प्रश्नसूचक नजरेनें एकमेकांकडे पहातात.)

विसुभाऊः—बाजारांत येतांना पंचाईत होतें; पण चांगली भाजीच नाहीं मिळाली.

सीताः—(मानेला एक भयंकर हिसडा देऊन) हो, मिळत नाहीं भाजी मुंबईसारख्या ठिकाणीं ? एवढी थोरली मुंबई न् म्हणे भाजी नाहीं मिळाली चांगली! आणि चांगली चांगली ती काय ? उंच्या उंच्या भाज्या खायला जसा राजाचाच राजवाडा पडला आहे कीं नाहीं ! मिळेल ती भाजी खायची ! नसते डौल कशाला हवेत ? म्हणे चांगली भाजी नाहीं मिळाली ! (नंतर दोन्हीं पक्ष पुढें वाद कसा वाढवावा तें न कळून स्तब्ध राहतात)

विसुः—('प्रतिपक्षा'चा कोप कितीसा कमी झाला आहे तें चेहऱ्यावरून हुडकून काढण्याचा प्रयत्न करून भीत भीत) आज कोणाचं पत्र बित्र कांहीं आलं-

ठमीः—हो , बा ।, मामा येणार म्हणून त्यांचं पत्र-

सीताः—(आपल्या विस्मरणाचा ठमेनें हा असा फायदा घेतलेला पाहून चवताळून) ठमे, जरा थांबशील कीं नाहीं ? जरा थांबतीस तर मेली असतीस का ? मेलं माणूस हापिसांतून दमून भागून येतं, कांहीं पहाते आहेस कीं नाहीं ? हो चालती इथून. (आपल्याबद्दल ही आपल्या सहचारिणीचा ' सहानुभूति ' पाहून अननुभूत आश्चर्यानें ' आ ' वासून विसुभाऊ सितामाईकडे पहातात.) ऐकलं का ? आज नानूचं पत्र आलय् कीं मी दिवाळीची सुट्टी घालवायला इथं उद्यां सकाळीं येतोय ! (आपल्या 'हक्का'ची ठमेनें 'पायमल्ली' केल्यामुळेंच आपल्या सहचारिणीचा ठमेवर कोप झाला असावा असा विसुभाऊ या वाक्यानें तर्क करितात.) किनई त्याला एकवीस दिवसांची सुट्टी आहे. इथं यावं असं त्याला फार फार वाटतय. आणि मी म्हणते आला तर चार दिवस बरें तरी जातील.

विसुभाऊः—(खवळून) बरे ? तो आला म्हणजे बरे दिवस जातील ? अग, गेल्या दिवाळींत आला तेव्हां त्यानें कसकसा त्रास दिला तो पाहिलास न् म्हणतेस तो आला कीं दिवस बरे जातील ! त्या कपाटाचा एवढा जाड आरसा फोडला तो अजून लावायला मिळत नाहीं; त्याच्या वीस दिवसाच्या सुट्टींत त्यानें आम्हांला दिव्याच्या चार नव्या चिमण्या घ्यायला लावल्या; घरांतले नेहमींच्या वापरांतले कांचेचे

पेले फोडून मुद्दाम राखून ठेवलेले पेले बशा पेटींतल्या काढायला लावल्या; या रामूच्या नाकांतोंडांतून भळभळ रक्त वाहयला लावून आमचे डोळे पांढरे करण्याची वेळ-आणली; चांगलं उंची उंची सामान (नानूच्या 'पूर्वेतिहासा'चा पाढा वाचण्यांत दंग असेलल्या विसुभाऊंचें पत्नीकडे लक्ष जातें आणि बोललेलें वाक्य पुरें न होतां तोंडांतल्या तोंडांत पुढले शब्द घुटमळत रहातात)

सीताभाई (रुद्रावतार):—हं, हं, चालूंदे नानू-पुराण. जीभ कां आखडली मध्येंच? अगदीं जिभेवर नाचत होते नाहीं शब्द? काय मेलं एक एक तरी! नानूनं असं नुकसान केलं तें काय अन त्याची आरड ओरड ती किती! कोणाला वाटायचं या नानूनं असं केलं तरी काय! एखादा राजवाडा लुटला का सावकाराच्या तिजोरीवर दरवडा घातला का कोणाचं जडजवाहीर लुटलं का कोणाचे प्राण घेतले? काय, झालं तरी काय? बाई, बाई, शर्थ झाली. नानू तो केवढासा आणि त्यान कुठें चिमणीन् पेले फोडले त्याच अवडंबर केवढं माजवलंय्? अगदीं 'स्वतः'लाच गहाण ठेवायला लावाय्इतकं त्यानं नुकसान केलं असेल नाहीं? आणि म्हणे रामूच्या तोंडून आणि नाकांतून रक्त वाहायला लावलं! काय बाई एकेक आळ तरी! मेलीं, पोरंच बरीं कीं नाहीं? घांवतां चालतानां बघायला नको आणि जमिनीवर आदळलं कीं आला दुसऱ्यावर आळ! जसा कांहीं हा कार्टा नंतर कधीं जमिनीवर आदळलाच नाहीं! त्यावेळीं नानू होता, घातला त्याच्यावर दोष! बरं झालं तो यायच्या अगोदरच काय तें वीष ओकलात; नाहींतर तो आल्यावर बिच्यान्यावर वसकन् ओरडला असतां तर त्या धक्कयानंच पोराचा प्राण जायचा! (पूर्वी कधीं न वाटलेलें आश्चर्य यावेळीं विसुभाऊंना वाटतें. कपाटाच्या जाड काचेचाही आडदांडपणानें प्राण घेणारा नानू आपल्या नुसता 'वसकन् ओरडण्यानें' प्राणाला मुकायचा ही गोष्ट त्यांना एखादी इमारत कळसापासून उलट पायापर्यंत बांधण्यांत आली या गोष्टीपेक्षांहि जास्त आश्चर्याची वाटते.) काय मेलं तरी! कुठें चार दिवस मौजेनं घालवावे म्हणून नानू यायला पहातोय् तर ही अशी अवस्था!

ठमी:—(लडिवाळपणानें) बाबा, येऊं दे ना मामांला! तो आला किनई म्हणजे—

सीता:—(तिला आपल्याजवळ ओढून घेऊन) नको ग बाई! ठमे, तो आला किनई म्हणजे, सगळ्या कपाटांचे आरसे फुटतील, घरावरच्या कौलांचा चक्काचूर होईल, जमिन सगळी उकरून निघेल न् घरांत दिवे रहायचे नाहींत, कपबशा फुटतील आणि काय नाहीं नाहीं तें होईल! चल तूं बाई! त्यापेक्षां नाहींच आला तर!

विसु:—(नरम पडून अडखळत) त-तसं नाहीं क-कांहीं! तो आला त-तर

सीता:—अंहं! कशाला यायला पाहिजे? कपबशा फोडायला कीं पोरांच्या नाकांतोंडांतून रक्त भळभळ वहावयाला हा—

विसुः—च् च् त–तसं नाहीं.

सीताः—च् च् नको न् कांहीं नको. आतांच कोणाकडून तरी तार करवते कीं यायची कांहीं गरज नाहीं.

विसुः—पण हें बरं नाहीं. कारण दिवाळीची सुटी मर्जेत घालवण्यासाठीं म्हणून तो येईन म्हणतोय तर आतां त्याला असं सांगणं कसं दिसेल ? छेः छेः हें बरें नाहीं.

सीताः—पण सगळी नासधुस होईल त्याची काय वाट ? उगीच—

विसुः—छेः छेः ग. असा कांहीं तो आतां लहान राहिलाय ? ते दिवस गेले. आतां तो एक वर्षानंतर केवढा तरी शहाणा झाला असेल. असं कुठें भलतंच झालंय ?

(समेट होतो ! नानूनें यावयाचा 'ठराव' एक मतानें मंजूर होतो !)

प्रवेश दुसरा.

['मामा येणार' म्हणून पोरें आनंदानें उड्या मारून आरडाओरड करीत आहेत; पण त्यांच्या धिंगामस्तीकडे आनंदांत मग्न असलेल्या सीतामाई दुर्लक्ष करीत आहेत. विसुभाऊ बाहेरच्या खुर्चीवर बसून भवितव्यतेबद्दल विचार करीत आहेत व मधून मधून कॅलेंडरकडे पहात आहेत. इतक्यांत घोड्यांच्या टापाचा आवाज होतो आणि दारापुढें एक व्हिक्टोरिया उभी रहाते.]

ठमीः—मामा आला ! मामा आला ! !

रामूः—अग ए आई, मामा आला ग .

विसुभाऊः—(गंभीरपणानें) अग ए, नानू आला हं ! पाणी आण तांब्यांतून. (सीतामाई हातांत तांब्या घेऊन येतात. अर्धा तुमान घालून नानूची स्वारी खालीं उतरते.)

सीताः—(त्याला खिशांतून पाकीट काढतांना पाहून) हं हं ! तूं नको देऊस पैसे ! ठाऊक आहे मोठा पैसेवाला आहे तो ! हं, गाडीवाल्याचे पैसे द्यायचे हं ! (विसुभाऊ गंभीर चेहऱ्यानें पाठीं फिरून खिशांतले पाकीट काढतात.) ती ट्रंक आणि बिछाना आण इकडे. (नानू ट्रंक घेऊन येतो. ओट्यावर ठेवतां ठेवतां ती नमीच्या पायावर पडते. ती किंचाळते.)

नमी—इ ऽ ऽ ऽ आई ग ! मामानं ट्रंक ठेवली पायावर.

सीताः— गप बैस नेम. आतां तुला मामा बघ काय काय देईल ते ! उगी रहा. हं, नानू हातपाय धू. (हातपाय धुण्यासाठीं नानू जमिनीवरचा तांब्या उचलतो; पण अर्ध्यावरच तो त्याच्या हातांतून निसटतो व जमिनीवर पाणीच पाणी होतें. तांब्याला भलें मोठें 'पोंच' येतें. विसुभाऊ सीतामाईकडे पहातात. सीताबाई दुसरें पाणी आणतात व नानू परत पाय धुतो)

नानूः—(टोपी पलीकडच्या गाद्यांवर भिरकावून कोट टेबलावर फेंकून) ताई, कांहीं तरी खायला दे चल भूक अशी सपाटून लागली म्हणून सांगूं !

सीताः—दम खारे ! घरून आईनं कांहीं बरोबर खायला दिलं नव्हतं वाटतं गाडींत ?

नानूः—कसलं ! कुठे दोन चपात्या, चार लाडू, बटाट्याची भाजी न् कुठें सहा सात केळीं एवढं कायतें दिलं होतं.

सीताः—मग पुण्याहून इथं यायला तुला तेवढं नाहीं पुरलें वाटतं ?

नानूः—म्हणजे, ताई, तूं मला आपला राम्या समजतेस कां एखादं लहान पोर समजतेस ? एवढ्यांनीं व्हायचं आहे काय ? मला गेल्या वर्षांचा नानू समजूं नकोस. एका वर्षांत केवढी तरी भूक वाढली आहे माझी ! (सीतामाई कौतुकानें हंसतात; विसुभाऊ सचिंत मुद्रेनें कॅलेंडराकडे पहातात.)

सीताः—बाकी न नू गेल्या वर्षापेक्षां यंदा वाळलेला दिसतो, नाहीं ?

विसुः—हं:—

सीताः—आतां त्याला चांगलं खायाला घालून परत पाठविलं पाहिजे; म्हणजे घरींसुद्धां सगळ्यानां आश्चर्य वाटावें.

विसुः—(शुष्कपणानें हसून) हं.

सीताः—हो, खरंच, नानू, तुला बदामी हालवा आवडतो नाहीं ? हिंगण्याला मिळत नसेल तुला ?

नानूः—छेग. तिकडे कुठचा हालवा न् बिलवा ! सगळं कांहीं तें इथंच आतां बदामी हलवा न् मैसूर, श्रीखंडपुरी, बासुंदी, बर्फी पेढे.....(विसुभाऊ प्रत्येक नांवाबरोबर जास्त जास्त सर्द होत जातात.)

सीताः—कांहीं भिऊं नकोस तूं. तुला सगळं कांहीं मिळेल इथें. (पत्नीच्या आश्वासनानें विसुभाऊंना श्वासोच्छ्वास सुद्धां कांहीं वेळ करतां येत नाहीं.)

प्रवेश ३ रा.

[विसुभाऊ ऑफिसांतून विषण्ण मनानें येतात. पायऱ्यांवर जोडयांचा 'चटचट' आवाज ऐकूनहि ' पिल्लां ' पैकीं कोणीच धांवत येत नसलेलें पाहून त्यांना आश्चर्य वाटतें. ते गुपचुप वर येऊन आपलें पागोटें, डगला वगैरे काढून खुर्चीवर बसतात. आंतल्या खोलींत कोणीतरी बोलत असल्यासारखें वाटल्यामुळें ते तिकडे कान देतात.]

नानू:--याद राख ठमे ! माझें नांव जर का सांगितलंस तर मघांसारखा गुद्दा देईन. आणि हें पाहिलंस कारे राम्या, भाऊ आले कीं त्यांच्याकडे बर्फीचा हट्ट धरायचा मोठमोठ्यानें रडायचं. समजलं कां? गप्प राहिला तर दांत पाडीन. मी जातों बाहेर आतां. (नानू बाहेर येतो. कांहींसा दचकून, पण हंसरा चेहरा करण्याचा प्रयत्न करीत) अरेच्चा ! कधीं आलांत भाऊजी ? ताईग, भाऊजी आले हं ऑफिसांतून. (घाडघाड पायऱ्या उतरून बाहेर जातो. सीतामाई येतात.)

सीता:—अं ? कधीं आलां ? न् असें बाहेरच कां बसलां ?

विसु:--न--नाहीं. आपला अ--असाच बसलोंय्.

सीता:—मग चहा हवा का ?

विसु:—हं. असला तर आण. नाहींतर कांहीं नको. आपलीं ठमी न् कुठें गेलीं सगळीं ?

सीता:—आहेत आंत बसलेलीं.ठमे,राम्या,बाहेर या कीं रे पोरांनों! सबंध दिवस मेलं घरांत बसून खा खा खात सुटायचं ! (ठमी कपाळावर पट्टी लावून बाहेर येते. रामूच्या ढोपरावर व ढोपराखालीं पिवळें गर्द वेखंड झरवून लावलेलें दिसत आहे.नमीच्या गळ्यावरून एक फडका बांधला असून त्यांत एखाद्या जखमी शिपायाप्रमाणें तिचा डावा हात अडकवलेला आहे. हाताच्या उजव्या कोपराला चुना लावला आहे.)

विसु:—र्र ऽ ऽ ऽ ! हें काय झालंय् पोरांना ?

सीता:—त्यांचं कर्म, दुसरं काय ? पोरांना कितीवेळां सांगितलं कीं धिंगामस्ती करूं नका; पण ऐकतील तर मरतील ना ! इकडे धांव, तिकडे धांव, इकडे उडी मार, तिकडे पळ असा सारा दिवस पोरांचा गोंधळ चाललेला असतो. मग मरतील नाहीं तर काय ?

विसु:— (आपल्या पत्नीच्या ' मीमांसे'कडे दुर्लक्ष करून) बघूं कुठें लागलं तुला रामू ! च्, ढोपर अगदीं खरचटलं आहे कीं रे ! काय करीत होतास ?

रामू:—[हुंदके देत] क-कीनई म-म-मा-मानं ख-खालीं प-प-पाडलं !

सीताः—(त्याच्यावर हात उगारून) काय म्हटलस ? नानूनं मारलं ? गेला होतास कशाला मरायला ? एके ठिकाणीं बसायला काय झालं होतं ? अं ?

रामूः—(हुंदके अनावर होऊन) म–मी अ–आपण होऊन न–न–नव्हतों गेलों. त–त्यानंच –मल —

ठमीः—होय हो भाऊ ! अन् मला पण मी बसलें होतें तिथून उठवलं नी—

नमीः—न् मला उगीचच्या उगीच खुर्चीवरून ओढून खालीं आदळली ! (तिघेही आळीपाळीनें हुंदके देऊन रडतात. सीतामाई त्यांच्याकडे ' खाऊं कीं गिळूं ' या नेहमींच्या मुद्रेनें पहातात. विसुभाऊंचा भृकुटिभंग होतो. बऱ्याचशा विचारांची त्यांच्या मनांत गर्दी होते, व अखेर ज्वालामुखीप्रमाणें त्यांचा स्फोट होतो.)

विसुः—हें नानूनं चालंवलय् तरी काय ? त्याचा काय विचार आहे ? या आदळआपटीचा अर्थ तरी काय ? आज पोरांचे हातपाय मोडले उद्यां त्यांचा प्राण घ्यायचा! आतां हें उघड्या डोळ्यांनीं किती दिवस बघायचं? आल्या दिवसापासून त्यानं मोडतोड तर चालवलीच आहे पण आतां पोरांचींच हाडं मोडायचा विचार दिसतो. तरी पहिल्यापासून मी तुला सांगत होतों ! पण तूं केवढ्यानें गुरगुरलीस आणि म्हणालीस कीं गेल्या वर्षासारखाच कां नानू अजून राहिला आहे ? गेल्या वर्षा-सारखा कांहीं राहिलाय् नाहीं. पण एक पाऊल पुढें टाकलंय मात्र. दिवटा पोर!

सीताः—हं, दिवटा बिवटा म्हणायचं कारण नाहीं माझ्या माहेरच्या माण-सांना ! समजलांत ?

विसुः—दिवटा नाहीं तर काय ? एवढा पंधरा वर्षांचा घोडा झाला आणि त्याला रांगणाऱ्या पोराएवढीसुद्धां अक्कल नाहीं ? हीं पोरं तीं केवढीशीं आणि त्यांच्या-कडे धिंगामस्ती करतो काय न् मोडतोड करतो काय ? कांहीं थोडीशी तरी शरम वाटते आहे ?

ठमीः—(हुंदके द्यावयाचे विसरून धाष्टर्यानें) नी भाऊ, मघां आम्हांला दटा वत होता कीं, भाऊकडे बर्फीसाठीं हट्ट धरा; नाहींतर दांत पाडीन म्हणून.

सीताः—(अकाळविकाळ चेहरा करून) कधीं ग ठमडे ?

विसुः—मी स्वतः माझ्या कानांनीं ऐकलं आहे समजलीस ? मी ऑफिसांतून आलों तेव्हां ही स्वारी त्या पोरांना आंत धमक्या देत होती ! म्हणे बर्फी पाहिजे आज आठ दिवस झाले, रोज कांहीं ना कांहीं चाललंय् ! आज श्रीखंड पुरी, उद्यां बदामी हालवा, परवां बर्फी,–चाललंय् एकएक दिवस ! जसा कांहीं राजवाडाच पडलाय् कीं नाहीं ? महिन्याची ही अशीं अखेर आलेली, नेहमींचा खर्च भागतां भागतांनाच काय नाकीं नऊ येतात ते बघतेस, न् पुन्हां याच्यासाठीं रोज एकएक पदार्थ आणा-यला सांगतेस ? तुला तरी काय वाटतं कीं नाहीं ? त्याच्या पुढ्यांत असं बोललीस

म्हणजे मला कांहींच करतां येत नाहीं. कारण उद्यां जाऊन घरीं सांगायचा आपले भाऊजींनीं फार हाल केले. पण तुला तरी जरा अक्कल पाहिजे होती. तो आल्याच्या दुसऱ्या दिवशीं पंधरा रुपये एका मित्राचे उसने घेतले आहेत आणि काल पुन्हां दहा रुपये दुसऱ्या एकाकडून घेतले. हा प्रसंग मी अजून येऊं दिला नव्हता. पण तुझ्या या दिवट्या नानूनं—

सीताः—(आंतल्या आंत ज्वालामुखीसारखें धुमसत) बरं बरं ! त्याला आल्यावरोबर सांगते कीं तूं निघून जा बाबा. तुझ्यामुळें आतां वारंट सुटायची वेळ आलीय !

(ओट्यावहिर व्हिक्टोरिया येऊन उभी रहाते. आंतून विसुभाऊशेजारचे गोविंदराव ताडकन् उडी मारून उतरतात.)

गोविंदः—(लगबगीनें वर येऊन) हं. विसुभाऊ बिछाना घालायला सांगा न् डॉक्टरकडे पळा अगोदर !

विसुः—क-काय, झालं काय ? आणि गाडींत कोण आहे ?

गोविंदः—अहो, तुमचा नानू आहे आणि रस्त्यावर एका मवाल्याबरोबर मारामार करीत होता. त्या दांडगटानें याच्या नाकातोंडावर गुद्दे मारून याला रक्त-बंबाळ करून टाकलंय्. तुम्ही डॉक्टरला जाऊन बोलवा आधीं, पण अगोदर त्याला बिछान्यावर निजवूंया. चला (दोघेहि गाडीकडे जातात व रक्तानें चेहरा माखलेल्या नानूला आंत आणून सीतामाईनीं पसरलेल्या बिछान्यावर झोंपवतात. विसुभाऊ थोड्या वेळानें डॉक्टरास आणतात.)

डॉक्टरः—(रोग्याला तपासून झाल्यावर) नाकावर बसलेला गुद्दा भयंकर आहे. फार काळजी घेतली पाहिजे. चेहऱ्याला वेखंड झरवून लावा. रात्रीं ताप बराच चढेल आणि तो जोर बराच वेळ राहील असं मला वाटतं. ('स्टेथॉस्कोप' कोटाच्या आंतल्या खिशांत ठेवीत ठेवीत डॉक्टर बाहेरच्या व्हिक्टोरियांत जाऊन बसतात. विसुभाऊहि औषध आणण्यासाठीं त्यांच्याबरोबर जातात.)

प्रवेश ४ था.

(नानूची आपल्या घरीं जाण्याची तयारी. बाहेर व्हिक्टोरिया उभी आहे. त्याची ट्रंक व वळकटी गड्यानें आंत नेऊन ठेविली आहे. नानू कपडे घालून बाहेर ओट्यावर उभा आहे. सर्वजण बाहेर आलीं आहेत.)

सीताः—जा बरं नानू आतां. आल्यासारखं कांहीं चीज झालं नाहीं. आला होतास त्यापेक्षां वाळून गेला आहेस. मी तुला चांगला गुटगुटीत करून परत पाठवणार होते पण हें मध्येंच कायं त्रांगडं उपस्थित झालं कोण जाणें !

नानूः—(बेफिकीरीनें) जाऊं दे तें ! पण त्या मवाल्याला एक गुद्दा असा दिला आहे कीं जन्मभर विसरायचा नाहीं तो आतां. बरं, मी जातों आतां. बरं भाऊजी. ए राम्या, येतोस का आमच्याकडे.

रामूः—न–न–नको. (विसुभाऊआड घाबरून उभा रहातो. नानू जाऊन गाडींत बसतो व गाडी चालूं होते.)

सीताः—(गाडी दृष्टीआड झाल्यावर सुस्कारा टाकून) आतां कांहीं वर्षभर येत नाहीं.

विसुः—(भुंवया चढवतील तितक्या वर चढवून) म्हणजे परत पुढल्या वर्षी येणार कीं काय ? मग मला उद्यांपासून पोरांबाळांसकट वर्षभर अर्धपोटीं राहिलं पाहिजे !

सीताः—(झणकाऱ्यानें) इतकं कांहीं हें करायला नको.

विसुः—नको म्हणजे ? तुला काय त्याचं ? तूं नुसत्या 'ऑर्डर्स' सोडीत बस-शील कीं बदामी हलवा आणा, बर्फी आणा न् अमुक आणा न् तमुक आणा ! पण मला त्याची आतांपासून काळजी केली पाहिजे. नुसता महिनाभर राहून गेला आणि मला जवळजवळ शाण्णव रुपयांच्या खर्चांत आणलं ! समजलीस ? आला त्यावेळीं महि-न्याची अखेर आली होती आणि त्या वेळेपासून मला सारखी महिन्याची अखेर भासते आहे; आणि आतां ती कितीतरी महिने भासणार आहे ?

(प्रसंगानें मनुष्य धीट कसा बनत जातो हें गबाळ विसुभाऊंचें धाष्टर्य दाखवतें, आणि पदरांत पुरें माप घातल्यावर जहांबाज तोंडाला कशी खीळ बसते हें सीता-माईची थंड पडलेली जीभ दाखवते.)

मुलांची मौज.

अश्रूंचीं रत्नें.

(श्री. वि. रा. देशपांडे.)

एक सरदार एका समुद्रकांठानें फिरत होता. फिरता फिरता किनाऱ्यापासून जवळजवळ दहा पंधरा हातांवर, एक माशासारखा विद्रूप प्राणी दिसला. तो मासा बराच दांडगट असून त्याची शेपटी लांब होती. तो आपल्या अंगावर कदाचित् चालून येईल या भीतीनें सरदारानें म्यानांतून आपली तरवार बाहेर काढली. पण त्यानें तरवार काढलेली पाहून तो मासा म्हणाला, "महाराज, मला मारण्याचें श्रम कां घेतां उगीच ? मी आणखी थोडा वेळ या रेतींत असा पडून राहिलों कीं आपोआपच मरणार!" त्यानें दीनवाणीनें उद्गारलेले हे शब्द ऐकून सरदाराला त्याची दया आली आणि त्यानें विचारलें, " तूं पाण्यांतून असा रेतीवर कां पडला आहेस ? "

मासा म्हणाला, " मी आपण होऊन मुळींच आलों नाहीं. देवमासा माझ्यावर रागावला आहे; आणि त्यानें मला समुद्राबाहेर हांकून लावलें आहे. "

सरदाराला त्याची करुणा आली आणि त्यानें त्याला उचलून घेऊन आपल्या घरीं आणलें व बाजूच्या एका तलावांत त्याला सोडलें. नंतर प्रत्येक दिवशीं सरदार त्या तलावाकडे येऊन त्या माशाला खावयाला घालीत असे.

पुढें कांहीं दिवसांनीं त्या सरदाराचें एका मुलीवर प्रेम बसलें. पण त्यानें तिला दहा हजार रत्नें आणून दिल्याशिवाय ती लग्नाला कबूल होईना. सरदाराला मोठें संकट पडलें. स्वतःचें घरदार व मालमत्ता विकून टाकली तरी थोडीं रत्नें विकत घेणें सुद्धां शक्य झालें नसतें. मग दहा हजार रत्नें कोठून आणावयाची ?

सरदार अगदीं निराश झाला व भूक तहान विसरून याच गोष्टीचा विचार करीत बिछान्यावर पडून राहिला. ही त्याची स्थिती त्या माशाच्या लक्षांत आली. तो एका रात्रीं आपल्या तलावांतून बाहेर आला व त्या सरदाराच्या खोलींत शिरला. त्याच्याकडे बघून दुःखी मुद्रेनें तो सरदार म्हणाला, " आतां यापुढें आपली दोघांची कायमची ताटातूट होणार ! "

त्याचे ते उद्गार ऐकून तो मासाही कष्टी झाला आणि तो अश्रूं गाळूं लागला. पण काय आश्चर्य ! त्याच्या अश्रूचा प्रत्येक थेंब म्हणजे एकएक तेजस्वी रत्न होतें ! सरदार आनंदानें एकदम उठून उभा राहिला व मोठ्यानें म्हणाला, " शाबास ! तूं मला माझ्या संकटांतून खात्रीनें वाचवशील ! आणखी रड. "

सरदाराला दहा हजार रत्नें पाहिजे असल्यामुळें त्यानें त्या माशाला आणखी रडण्यास सांगितलें. पण तो मासा म्हणाला " मला माझ्या इच्छेप्रमाणें वाटेल तेव्हां रडतां येत नाहीं. जेव्हां माझ्या अंतःकरणाला खरोखर कळवळा येईल तेव्हां आपोआप माझ्या डोळ्यांतून अश्रू येतात आतां तुम्ही आनंदांत आहां तर मला कळवळा कसा येईल ? "

पण सरदारानें आपणाला रत्नांची कां जरूरी आहे तें सांगतांच तो मासा थोडा वेळ विचार करून म्हणाला, " तसं आहे तर मला पुन्हां या तलावांतून माझ्या जुन्या घरीं-म्हणजे त्या समुद्रांत न्या. म्हणजे माझ्या या आवडत्या तलावाला सोडून जावें लागत असल्यामुळें मल मनापासून वाईट वाटेल व मला रडूं येईल. "

त्याप्रमाणें त्या सरदारानें एक मोठा डबा आणला व त्यांत त्याला घालून समुद्राकडे नेलें. तलाव सोडल्यापासून त्या माशाच्या डोळ्यांतून अश्रू पाझरूं लागले व समुद्राकिनाऱ्याजवळ येईपर्यंत सरदाराला पाहिजे होतीं त्यापेक्षां जास्त रत्नें मिळालीं. समुद्राजवळ येतांच तो देवमासा किनाऱ्याजवळ आला आणि म्हणाला, " चल तुला क्षमा केली आहे. आमच्याबरोबर तूं पुन्हां समुद्रांत ये. '

त्याप्रमाणें तो परत समुद्रांत गेला आणि सरदार तीं रत्नें घेऊन त्या मुलीजवळ आला आणि त्यानें तिच्याशीं लवकरच लग्न लावलें.

"तुम्हांला आईबापांच्या आज्ञेप्रमाणें वागावेसें वाटतें, कीं स्वतःच्या इच्छेप्रमाणें वागणें आवडतें ?"

[गेल्या अंकांतील बक्षिसाचा विषय]

(कुमारी विजया)

मी अगदीं खात्रीनें सांगतें कीं आम्हां मुलांतुल्लींपैकीं फारच थोड्यांना आपल्या आईच्या सांगण्याप्रमाणें वेळोवेळीं वागावेंसें वाटेल. मोठीं माणसें सांगतात तें आपल्या कल्याणाचें असतें असें अपण पुस्तकांत वाचतों खरें; पण मी माझ्या वाचक-मैत्रिणींना विचारतें कीं समजा, तुमच्या शेजारच्या मुली तुमच्याकडे सागरगोट्यांनीं खेळावयाला अगर झिम्मा, फुगडी खेळायला रजेच्या दिवशीं आल्या आणि तुमच्या आईनीं तुम्हांला खेळूं दिलें नाहीं तर तुम्हांला आईचा राग नाहीं का येणार? सागरगोटे खेळतांना तुमच्या बांगड्या फुटतील, झिम्मा, फुगडी खेळतांना तुम्ही चक्कर येऊन पडालबिडाल असें आईला वाटल्यामुळें तुम्हांला तिनें खेळूं नका म्हणून सांगितलें तर त्यावेळीं तुम्हांला काय वाटेल? ती आमच्या कल्याणासाठीं तसें सांगत असली तरी आपणाला नाखूष केल्यामुळें आपण तिच्यावर रागावीत नाहीं का? मला नाहीं वाटत तसें त्यावेळीं कोणाला वाटत नसेलसें. निदान मला तरी त्यावेळीं आईचा असा राग येतो! आई मोठी असल्यामुळें तिला झिम्मा-फुगडी खेळायला मिळत नाहीं; आणि म्हणून ती आम्हांलाहि खेळायला देत नाहीं असें सुद्धां मला फार राग आला म्हणजे वाटावयाला लागतें! पण तें खरें नाहीं हो! कारण मीच एकदां आईच्या सांगण्याविरुद्ध वागल्यामुळें फुगड्या खेळतां खेळतां तोल जाऊन खालीं पडलें होतें आणि माझें अंग त्यामुळें किती दिवस तरी दुखत होतें! तेव्हां मात्र मला वाटावयाला लागलें कीं आईनें सांगितलें तें कांहीं खोटें नव्हतें. पण त्या दुखण्यांतून बरी झाल्यावर पुन्हां माझे ते विचार कुठल्या कुठें नाहींसे झाले!

खरें म्हटलें तर आईच्या सांगण्याप्रमाणें वागण्यांत आपलें हित असतें; पण तें आपणाला एखादी दुखापत वगैरे झाली म्हणजेच कळत असतें!

शिवाय आईनें आपणावर केवढे उपकार केले आहेत ते आपण "थोर तुझे उपकार" या कवितेंत वाचले नाहींत का? तिनें आपणाला जन्म दिला नसता, लहानाचें मोठें केलें नसतें, खाऊंपिऊं घातलें नसतें तर आपण आज फुगड्या आणि झिम्मा खेळण्याइतक्या मोठ्या झालों असतों का? पण आपण तें सारें विसरून जातों. ती कविता आपणाला आज म्हणायला सांगितली तर एकावर एक चढाओढीनें ती तालसुरावर व मोठ्यानें पाठ म्हणूं. पण त्यांतला अर्थ ध्यानांत घेऊन आपण वागतों का? आपणापैकीं फारच थोड्या जणी तशा वागत असतील. आणि आम्हांला तसें वागावेसें वाटत नाहीं हें कांहीं खोटें नाहीं. कारण आम्हांला अमुक एखादी गोष्ट करावीशी वाटणार, आणि आई ती करूं नको' म्हणून सांगणार. मग आम्हांला तरी तसें वागावेसें कसें वाटेल? त्यावेळीं आपण तिच्यावर रागावणेंहि शक्य आहे आणि 'थोर तुझे उपकार' ही कविताहि विसरणें शक्य आहे. मात्र हें बरें नाहीं हें आपणाला नंतर कळत असतें.

[कु विजया हिनें आपले स्पष्ट विचार मांडल्याबद्दल आम्हीं तिला 'मुलींची सीता' हें पुस्तक बक्षिसादाखल दिलें आहे. आपले खरे विचार आपल्या घरच्या माणसांना कळले तर तीं रागावतील म्हणून तिनें आपलें फक्त 'कु. विजया' असेंच नांव प्रसिद्ध करण्यास लेखासोबतच्या पत्रांत लिहिलें आहे! इतर बालवर्गणीदारांनीं सुद्धां आपले खरे विचारच यापुढें लिहिण्याचा प्रयत्न करावा.

संपादक]

बक्षिसाचा विषय.

पुढील अंकाकरितां--म्हणजे ३ऱ्या वर्षाच्या पहिल्या अंकाकरितां खालील बक्षिसाचा विषय नेमला आहे. १२ वर्षांच्याआंतील वर्गणीदारांसाठीं).

" सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोपेपर्यंत तुम्हीं काय करीत असतां" तें मनोरंजक रीतीनें लिहून पाठवा.

(वरील विषय " अरुणमालेचें " एक पान भरेल एवढा लिहून पाठवावा. **मात्र तिसऱ्या वर्षीं वर्गणीदार रहाणाऱ्यांनींच बक्षिसासाठीं प्रयत्न करावा.** आणि त्याप्रमाणें त्यांनीं लेखाबरोबरच्या पत्रांत लिहून कळवावें.)

चालण्याचा वेग कसा ओळखावा ?

बरीचशीं मुलें जमलीं म्हणजे कांहीं जण आपण फार जलद चालतो म्हणून बढाई मारतात. तेव्हां त्यांचा चालण्याचा वेग खरोखरीचा किती आहे तें पहाण्यासाठीं पुढील युक्ति योजावी.

एक लांब ८० ते १०० यार्डाइतकी लांब-दोरी घ्यावी आणि एका टोंकाला शिसें अगर तसेंच एखादें जाड वजन बांधावें. नंतर वजन बांधलेल्या टोंकापासून ४४ फूट अंतरावर दोरीला गांठ मारावी. नंतर त्या अंतरापासून पुढें ४४ फूट अंतरावर दुसरी गांठ मारावी अशा दोरीचें दुसरें टोंक येईपर्यंत गांठीं माराव्या. नंतर उजव्या हातांत घड्याळ घ्यावें आणि वजन असलेलें दोरीचें टोंक खालीं जमिनीवर ठेऊन नेहमींच्या चालीनें सरळ चालूं लागावें व अर्धें मिनिट झालें कीं तेथेंच थांबून परत पाठीं फिरावें व आपणाला वाटेंत एकंदर किती गांठीं लागल्या त्या मोजाव्या. त्या अर्ध्या मिनिटांत जितक्या गांठीं लागतील तितक्याच मैलाचें माणसाचें तासाचें प्रमाण समजावें म्हणजे एकंदर तीन गांठीं लागल्या तर तो मनुष्य एका तासाला तीन मैल चालूं शकेल असें समजावें.

आतां हें मोजमाप खरें कसें तें पहा. अर्ध्या मिनिटांत आपणांला जितक्या गांठी लागतात तितकेच मैल एकादा माणूस एका तासाला चालतो हें आपणांस सिद्ध करावयाचें आहे. एक मैल म्हणजे ५२८० फूट किंवा १७६० यार्ड. आतां ४४ फूट हा ५२८० फुटाचा १२० वा भाग आहे हें भागाकार करून तुम्हांला आढळून येईल. त्याचप्रमाणें अर्धें मिनिट हा एका तासाचा १२० वा भाग आहे. अर्थात् एका मिनिटाच्या १२० व्या भागाला आपण जितके मैल चालूं शकतो त्या प्रमाणांतच आपण एका तासांत चालू शकूं. प्रत्यक्ष करून पाहिल्याशिवाय अगर वर लिहिलेल्या ओळी नीट लक्ष लाऊन वाचल्याशिवाय तें तुमच्या ध्यानांत येणार नाहीं.

सूर्यवाणी.

(चालः – तूं टाक चिरुनि ही मान)

झट चला, फिरा मागें । सूड उगवा ॥ धृ० ॥
चांद येथुनी उपटा हिरवा । निशाण तें रोंवा
निर्लज्ज मराठे बनले ।
निर्विर्य मावळे झाले ।
शौर्य, धैर्य सर्व गळालें ।
पळा, पळा बांगड्या भरोनि नारींसम मिरवा ।

तानाजी पडला असतां ।
कां रणांगणातुनि पळतां ।
शरम कीं न वाटे चित्ता ?
माय भूमिचे पांग फेडण्या । देहा या ठेवा ।

हें रक्त नव्हे शूरांचें ।
हें धैर्य नव्हे वीराचें ।
ह्या चीज करा बिजलीचें ।
"हरहर" ही गर्जना करोनि । शत्रूला पळवा ।

तरवार हातिं घेवोनि ।
जय भवानी सत्या स्मरुनि ।
जीवाशाही मोडोनी ।
मारा, अथवा मरा तुम्हीं हो । सत्कीर्ती मिळवा ।

तानाजी पडला त्याचा ।
सत्वरीं सूड ध्यायाचा ।
दृढानिश्चय तो सर्वांचा ।
करा लौकरीं, उपसा खड्गां । दुष्टावरि फिरवा. ।

मावळे मराठे भाई ।
कच खाणें शोभत नाहीं ।
शत्रूशीं करोनी घाई ।
घाला कंठस्नान तयाला । सुमार्ग हा धरवा ।

स्वार्थावरि पाणी सोडा ।
शत्रूची कौंडी फोडा ।
यमसदना त्याला धाडा ।
हाणा, मारा. ठोका तुम्हीं शत्रूला नमवा ।

जरि मृत्यु येइ समरांत ।
सद्गती मिळे स्वर्गांत ।
कवि पोवाडे गातात ।
देशाकरितां देह असे हा । म्लेंछांना तुडवा ।

व्हा पुढें, घुसा गर्दींत ।
ये गर्दन जी मार्गांत ।
बिनदिक्कत ती छाटीत ।
मार्गांतूनी चला झराझर । छातीनें निधड्या ।

म्यां कापियले ते दोर ।
कां पळतां ऐसे दूर ? ।
शत्रुशीं लढा घनघोर ।
ठिकऱ्या ठिकऱ्या उडवुनि त्यांच्या । कौंडाणा मिळवा ।

श्री. शंकर बाळाजी दाते.

कोड्याचें उत्तर.

" नंदुरबार "

उत्तरें बरोबर पाठविणारांचीं नांवें:—

श्री. वै च. निगडी, द कृ नेसरकर, द. भा. तेंडुलकर, श्री. वा. सांडू, कुमारी कृष्णाबाई ना. रहाटे, कुमारी गजराबाई, ब्रा. देव्हारे, कुमारी कृष्णाबाई राजे, स. वा. रानडे, भि. वा. साठे, कु. यमुना परांजपे, 'वसंतात्मजा,' वि. वा. परब, ना. भ. लवाटे, कु. प्रेमा भांडारे, श्री. य कमतनूरकर, भा. य कीर्तने, वा. आ. गांधी, कु. सुमति ना. नाईक, पांडुरंग ना. नाईक, वि. शं. दळवी.

नवें कोडें

(ले.-लक्ष्मीकांत भा. परुळकर)

' का मनुष्याला दम्याचा विकार होता. एके दिवशीं त्या झटक्यानें तो एकाएकी मेला. तेव्हां त्यानें मरतेवेळीं त्याच्या मालकीचे ४५ घोडे आपल्या चौघां मुलांनीं वाटून घ्यावे असें मृत्युपत्रांत लिहिलें होतें त्याप्रमाणें त्यांची वाटणी करण्यासाठीं ते चौघेहि आपल्या बापाच्या सावकार मित्राकडे गेले. त्यानें मृत्युपत्र उघडलें. त्यांत असें लिहिलें होतें ४५ घोड्यांपैकीं $\frac{1}{2}$ पहिल्याला; $\frac{1}{4}$ दुसऱ्याला; $\frac{1}{7}$ तिसऱ्याला व $\frac{1}{8}$ चौथ्याला द्यावे. तर त्या सावकारानें ते घोडे कसे वाटले असतील ?

धांदली स्वभाव

एके दिवशीं रामूला त्याच्या आईनें दोन पैसे देऊन सांगितलें कीं, " रामू, दुकानांतून १ पैशाच्या सबंध सुपाऱ्या व १ पैशाच्या अर्ध्या सुपाऱ्या घेऊन ये. " रामू नीट सर्व न ऐकतां दुकानांत गेला व १ पैशाच्या सबंध सुपाऱ्या आणि १ पैशाच्या अर्ध्या (३ पै) घेऊन आला व त्या त्यानें आईजवळ दिल्या; आई म्हणाली, "अर्ध्या सुपाऱ्या कोठें आहेत ? " तेव्हां रामूनें ३ पै दिल्या व म्हणाला, " अर्ध्या आणावयास सांगितल्यास त्या आणल्या. " त्यानें " अर्ध्या सुपाऱ्या " यांतला सुपाऱ्या हा शब्द ऐकिलाच नव्हता. आई रागें भरल्यावर मग तो खट्टू झाला !

कु० कृष्णाबाई दामोदर राजे.

[११]

एक लहान मुलगी रडत रडत चालली होती. तिचे केस पिंजारलेले होते व कमरेला तिनें एक फाटका परकर गुंडाळला होता.

मी तिला विचारलें, " बाळ, तूं कां रडतेस ? "

ती म्हणाली, " माझी आई..."

" बाळ तुझी आई कुठं गेली ? "

" घरीं गेली " तिनें हुंदके देत उत्तर दिलें.

" तूं कोणाची " मी प्रश्न केला

" माझ्या बाबांची. "

" तूं रहातेस कुठें ? "

" माझ्या घरीं " तिनें उत्तर दिलें.

हा मी, माझें घर, माझी आई, माझे बाबा, अगदीं या लहान मुलीपासून तो कंबर वांकलेल्या म्हाताऱ्यापर्यंत सगळ्यांत भरला आहे. हे जगच्चालका, जें कांहीं आहे तें तूं आहेस. तूंच माझी आई, तूंच माझा बाप, आणि तूंच माझें घर. सर्व कांहीं आहे तें तुझेंच आहे, आणि म्हणूनच तूं माझा आहेस !

[१२]

हा रस्त्यानें मन मानेल तशी बडबड करीत कोण चालला आहे ? काय, हा वेडा आहे ? मी तर म्हणतों याच्या आयुष्यांतल्या सारखी मौज दुसरी कशांतच नाहीं ! हा कोणाचा बांधलेला नाहीं. सुखदुःखाची याला कल्पना नाहीं. हा रडावेसें वाटेल तेव्हां रडतो आणि हंसावेसें वाटेल तेव्हां हंसतो हंसें आणि रडें त्याला सारखेंच. अगदीं परस्परविरोधि भावांचा हा मूर्तिमंत पुतळा नाहीं असें कोण म्हणेल ? सरकारच्या तुरुंगांतील अगदीं कठोर शिक्षा हा हंसत भोगील तर सार्वभौम राजाचे सिंहासन हा कवडीमोल ठरवील. सूर्यनारायण अगदीं प्रखर तेजानें तळपत असतां अनवाणी रस्त्यांतून चालत जाऊन हा सूर्याचा गर्व उतरवील तर भी मी म्हणणाऱ्या थंडींत अंगांत एक कपडाहि न घालतां हा हंसत बागडत स्वतःचीं गाणीं गात बसेल. धों धों पडणाऱ्या पावसांत हा वाटेल तितका वेळ वर मान करून उभा राहील. तुमच्या कपटी

जगाची याला कल्पना नाहीं. देवघरचा हा एक आनंदी प्राणी आहे. देवा! मला तूं याच्यासारखा वेडा कां केला नाहींस? हा वेडा कीं याला वेडा म्हणणारे आम्ही वेडे!

[१३]

मित्रा तुला "मित्र" असें कां म्हणतात?

सूर्य आपल्या तेजानें अंधःकाराचा संहार करून साऱ्या जगाला नवजीवन देण्याचें कर्तव्यकर्म नेहमीं करीत असतो. मित्र हें सूर्याचेंच एक नांव आहे.

माझ्या गडया, तुला मित्र म्हणतात तें याच कारणानें बरें! तुझेंहि कर्तव्य-कर्म हेंच. मी चुकत असेन तर तूं आपल्या शक्यनुरूप माझी चुकी दाखऊन, मला मार्गदर्शक होशील का?

[१४]

आकाशांत तारांचा नाच चालला होता. मी एका दगडावर बसलों होतों. दूर अंतरावर मला एक झाड दिसलें. अहाहा! काय त्या झाडाचीं फुलें! नुसतीं चमचम करीत होतीं. जणूं काय तारकांचेंच तें झाड होतें. मला त्या फुलांचा मोह उत्पन्न झाला. मी त्या झाडाकडे जाऊ लागलों. ठेंचा लागतच होत्या; पण माझें सर्व लक्ष त्या झाडाकडे होतें. जों जों त्या झाडाच्या जवळ जाऊं लागलों तों तों त्या झाडाचीं फुलें जास्तच झळकतांना मला दिसूं लागलीं. इतक्यांत पहाटेचा गार वारा वाहूं लागला. आणि जगन्मित्रानें हंसत हंसत हळूच वर डोकें काढलें. झटकन पहातां पहातां झाडाचीं फुलें नाहींशीं झालीं! मला तेथें एक पिंपळाचें झाड दिसूं लागलें. अरेरे! किती मूर्ख मी! ताऱ्यांचें तेज पिंपळाच्या पानांवर पडल्यामुळें तीं पानें मला फुलासारखीं दिसलीं आणि मी मोहानें माझ्या मनाची फसवणूक करून घेऊन इतका वेळ व्यर्थ दवडला. बा सूर्या! तूं मला वेळेवर जागें केलेंस. मित्रा! मला नेहमीं असाच मार्गदर्शक हो.

[१५]

तो पहा समोर वखारवाला गिऱ्हाइकाकरितां लांकडे मोजीत आहे! एका पारड्यांत त्यानें लोखंडी वजनें घातलीं आहेत व दुसऱ्या पारड्यांत तोलाकडे रचीत आहे. शेवटीं एक जाडसें लांकूड त्यानें त्या पारड्यांत घातलें, तसें वजनाचें पारडें उचललें जाऊन दोन्ही पारडीं सारखीं झालीं. त्या जाड लाकडाला वाटलें कीं आपल्या मुळेंच तें दुसरें पारडें वर उचललें गेलें. त्याला गर्व झाला. हे देवा, त्या गरिबाला काय माहीत कीं तुझ्या घरीं असाच कांटेतोल न्याय आहे!

गिऱ्हाइकानें तीं लांकडे घरीं नेऊन प्रथम तेंच जाड लाकूड जाळ चांगला टिकेल म्हणून प्रथम चुलींत घातलें! हळूहळू सर्व लांकडांची तींच गत झाली! कोळसे व राख शिल्लक राहिली व तीही मातीमोल झाली!

भंगेल वृत्ती तव.

काळे भोर समोर मेघ दिसती, आकाश ते व्यापिलें
चंद्राची नव कोर, ती उगवली-अस्तास गेली परी
तारे खिन्नपणें नभीं विररती औदास्य हें स्थापिलें
आशा घोर वनांत मार्ग चुकला जावें कुठें मी तरी ?
झाडें गर्द सभोंवतीं पसरलीं हे किर्र नांदे वन
वायूनें डुलती नितांत लतिका, साशंक माझें मन
वाटे श्वापद कीं मला हुडकिते-कोणी दिसेना परी
दिप ज्योत दिसे, पुढें उगवली आशा नवी अंतरी
माझी ती वतनें सुरेख सुमनें आहेत आनंदित
बाळे ती असतील शांत चिमणी दारापुढें खेळत
तूं पाहून दुरून येशिल मला भेटावया धांवत
आनंदून तुझ्यापुढें करिन मी सारें खुलें हृद्गत
घेसी मोहक गोड तान करिसी; कांहीं मनीं आठव
झाले दुःख तरी कथूं तुजकसे भंगेल वृत्ती तव

—रमेश.

आ कालधर्म. आ

द 'यशवंतात्मज' द

र्श र्श

"जा, मर" हातांत असलेली पाटी दूर भिरकावून देऊन मधूच्या तोंडांत दोनचार फडाफड लगावीत, तोंडानें अद्वातद्वा बोलत मी खुर्चीवरून उठलों! "काय कारटा पण जन्माला आलाय्! याच्यापेक्षां जन्मतांच मेला असतास तर उत्तम झालं असतं? कर्मचांडाळा, फत्तर, पाषाण, बेअकल....."

"असं काय करतोस बाळा? मधूला बेदम मारल्या कारणानें कळवळून आई बाहेर येऊन बोलूं लागली! "असं मारणं बरं नव्हे रे बाळ! लहान मूल आहे. त्याला समजावून सांगितलं पाहिजे, उगीच मारण्यांत आणि अद्वातद्वा बोलण्यांत काय....."

"गप्प बैस! तुला काय समजतं आहे त्याच्यांत उगीच मध्यें मध्यें लुडबुड-ण्यांत अर्थ नसतो!" रागानें बेफाम बनलेल्या माझ्या मनांतून वाटेल तसे उद्गार निघत होते. टोपी डोक्यावर ठेवून मी धाडधाड पाय आपटीत दिनकरकडे निघून गेलो.

पाय नेत होते म्हणून मी चालत होतों. पण माझें मन मात्र पूर्वेतिहासाचें चित्र रंगविण्यांत गढून गेले होतें. हाय! किती आमचें खडतर तकदीर! अभ्यासाच्या आनंदाच्या जगांत वावरत असतांच कठोर दैवानें बाबांना आमच्यापासून हिसकावून नेलें. त्यावेळचा प्रसंग नुसता आठवला तरी अंगावर शहारें थरारतात. संसाराचा बोजा वाहण्याचें काम माझ्यासारख्यावर अल्पवयांत येऊन पडलें, पण त्याला काय करणार? हृदयाशीं कवटाळून धरून डोक्यावर अमृतमय उष्ण अश्रूंचा वर्षाव करीत करीत आईनं स्फुंदत स्फुंदत सांगितलें, "बाळ, "हरी ठेवील तसें राहिलें पाहिजे! शोक काय कामाचा?" आई सांत्वन करूं लागली, तसा मला जास्त जास्तच हुंदका येऊं लागला! पोरकट स्वभाव नाहींतर हृदय घट्ट करून मलाच उपदेश करणाऱ्या त्या माऊलीवरच केवढें आकाश कोसळलें होतें त्याची मला कल्पना झाल्याविना राहाती ना?

माझ्यावर पोसण्याची जबाबदारी पडलेल्या माझ्या कुटुंबांत फक्त आई, मी, मधू व सुधा; मधू मराठी दुसरी यत्ता शिकत असून छोटी सुधा अगदींच अजाण ७ सत्यामुळें आईजवळच असे.

नशिबाच्या मोठ्या शिकस्तीनें मिळालेल्या नोकरीवर अकालींच मोठा बनलेला मी संसार चालवीत होतो. मात्र एरवीच्या व आतांच्या माझ्या स्वभावांत महदंतर पडलें होतें पूर्वीचा माझा आनंदी, हंसरा स्वभाव लोपून सदा सर्वदा पुढें कसें होणार या चिंतेच्या चिंतनांत असल्यामुळें माझा स्वभाव तिरसट, अविचारी असा बनला होता; स्वभावाचें परिवर्तन होणें परिस्थितीवर अवलंबून असावें.

आज ऑफिसांतून घरीं आल्यावर मधूनें मला पाटीवर केलेलें गणीत दाखविण्यास आणलें होतें. गणित साफ चुकलें होतें म्हणून मी त्यास समजाविण्याचा प्रयत्न करूं लागलों. पण सांगण्यावा माझा दोष असो किंवा न समजण्याचा त्याचा दोष असो. मधूला तें मुळींच समजेना. कितीतरी वेळां सांगितलें तरी त्याला समज म्हणून येईना. ऑफिसाच्या कामानें अगोदरच दगदगलेला माझा जीव या कारणानें अधिकच चिडखोर बनला व शेवटीं प्रकरण हातघाईवर व अद्वातद्वा शिव्यांवर आलें ! आई पुढें बोलण्यास आली. तिलासुद्धां आजपर्यंतचा मानापमान बाजूस सारून कांहींतरी बरळलों ! मी.....

दिनकरचें घर लागलें शून्य हृदयानें मी घरांत शिरलों. दिनकर खुर्चीवर बसून लहान इंदूबरोबर खेळण्यांत गुंतला होता. मी आंत जातांच दोघानींही माझ्याकडे पाहिलें. छोटया इंदूचें तें निसर्गतः गोड स्वरूप पाहून माझें मन अगदीं मोहून गेलें. चटकन् मी इंदूला उचलून घेतलें व मटामट कितीतरी मुके घेतले. पण इतक्यांत एक विचार मनांत आला. परकी इंदू मला मनोहर वाटली; पण माझी छोटी सुधा ? ती तरी थोडी सुंदर ! आणि गुण तरी किती वाखाणण्यासारखे ! माझा मधुकरही.....कितीं हुषार ! किती चाणाक्ष–आणि अशा रत्नांचा मला अभिमान असावयास पाहिजे होता; पण मी आज त्याला .....

इतक्यांत दिनकराची आई माझ्याजवळ आली, व "जगदीश, दिनकरला आतां वेळ नाहीं, तेव्हां जरा बाजारांत जाऊन भाजी आणशील का ?" माझ्यानें नाहीं म्हणवेना. मुकाट्यानें मी बाजारांत गेलों. मात्र मनांत विचार चालले होते. आई नुसती मघाशीं मृदू शब्द बोलली तर मी तिला फडाकड कांहींतरी बोललों ! मात्र परकी अशा दिनकराच्या आईनें मला अगदींच अप्रिय असें कृत्य करावयास सांगितलें तर मात्र मुकाट्यानें मान लववून मी करण्यास तयार झालों ? अँ S S कितीतरी हें नवल. माझी प्रेमळ माता मला अप्रिय व्हावी ! मात्र दुसऱ्यांनीं सांगितलेलें मुकाट्यानें करूं लागलों; माझी लाडकी सुधा, मधुकर मला नकोशीं झालीं पण इंदुसारखी दुसऱ्याच्या मुलांचे मी मटामट चुंबन घेऊं लागलों ! किती कृतघ्न मी ! पश्चातापानें माझीं अर्धी अर्धीक पापें जळून गेलीं.

कशीबशी बाजारांतून भाजी आणून टाकून मी घरचा रस्ता सुधारला ? खालीं मान घालून आंत शिरलों ? मधूला हृदयाशीं कवटाळून आई अश्रू ढाळीत होती, "आई" म्हणून मी कांपऱ्या आवाजानें हांक मारली ! आईनें माझ्याकडे पाहिलें, पाण्यानें डबडबलेल्या डोळ्यांची ती तिची कारुणमुद्रा पाहून माझें हृदय तिळतिळ तुटलें. अेरेरे किती मी माझ्या आईला दुखवलें ! मी जवळ हांक मारली. आई ! पण उत्तर नाहीं. मला अगदीं जमिनींत गाडल्यासारखें झालें. मी अगदीं आईजवळ बसलों व कळकळीनें विचारलें " आई माझा राग आला का तुला ?" खरोखरच मी कृतघ्न आहे. मी तुला आतां नाहीं नाहीं तें बोललों. पण त्या मला तूं क्षमा करशील अशी माझी पक्की खातरी आहे. मग आई तुला नाहीं कां माझी दया येत ! किती झालों तरी मी एरंडासारखा वाढलेला अजाण आचरट कोंवळा पोर. मग .....

"बाळ", आईला अखेरीस माझी दया येऊनच कीं काय कोण जाणे अगदीं मृदु स्वरांत ती बोलूं लागली. "तूं तरी त्याला काय करणार ? कालधर्मच आहे ! हा चार पैसे कमवायला लागल्यावरोबर तुला जास्त शहाणपणा आल्यासारखा वाटला! पण त्याला शहाणपणा नाहीं म्हणत ! अडाणी आचरटपणा म्हणतात त्याला ! पण आजकालचे इंग्रजी शिकलेले तरुण तुम्ही. आम्हीं काय जुन्यापुराण्या अडाणी गांवढळ बायका. अम्हाला काय तुमच्यापेक्षां अधिक समजणार? कालधर्म म्हणतात तो यालाच.!'

" नको आई." मी अगदीं दीनवाण्यास्वरानें विनवूं लागलों, " आतां अधिक बोलून माझ्या होरपळत असलेल्या हृदयास अधिक दुखवूं नकोस. मी अगदीं शतशः अपराधी आहे. "

" तसें नव्हेरें बाळ ! पण मघांशीं मधूस मारतांना कसले ग सले कुशब्द बोलत होतास तें तुला माहीत तरी आहे का ? त्या कुशब्दांनींच माझ्या हृदयाला पीळ पाडवून डोळ्यांतून पाणी काढलें. तो बघ कसा मघांपासून मुळुमुळु रडत आहे तो. तुझ्या शिवाय आतां त्यांना कोणी त्राता आहे का ?" परत आईच्या डोळ्यांत अश्रू चमकूं लागले; कसें कोणास ठाऊक माझ्याही डोळ्यांत खळकन् पाणी आलें. चटकन् मधू जवळ जाऊन त्याला उचलून पोटाशीं धरत मी त्यास कुरवाळूं लागलों, " मधू, रागावलास का माझ्यावर ? " माझ्या डोळ्यांतून खळकन् खालीं पाणी सांडलें.

मधूच्या रडक्या तोंडावर हास्य दिसूं लागलें. " नाहीं रे दादा, मी रागावणार कशाला " ? मला एका प्रकारचें समाधान वाटलें. इतक्यांत सुंदर सुधा माझ्याजवळ येऊन अगदीं मला बिलगून उभी राहिली. चटकन् मधूला बाजूस सारून मी त्या चिमुकल्या देवमूर्तीस उचलून घेतलें व पटापट कितीतरी मुके घेतले ! सुधा मला कितीतरी मनोहर वाटली. इतक्यांत ती कोमल स्वरानें म्हणाली " दादा तूं लडत कशाला होतास?" मला हसूं आलें. परत तिला हृदयाशीं कवटाळून मी कितीतरी चुंबनें घेतलीं कोणास ठाऊक. इतक्यांत आई म्हणाली "बाळा, रात्र झाली जेवावयास चल."

जेवण चाललें होतें पण माझ्या मनांत विचार चालला होता. आई म्हणाली तो "कालधर्म" म्हणजे काय ?

मुलींचा संसार.

सौ० मालिनीबाई रानडे

" आई व मुलांची जोपासना. "

आईबाप मुलांला जरी जन्म देत असले तरी मुलांची जोपासना करण्याची जबाबदारी विशेषतः आईवरच असते. कुटुंबाच्या उपजीविकेसाठीं बापाला दिवसांतला बराचसा भाग घराबाहेरच काढावा लागतो आणि त्यामुळें मुलांकडे लक्ष देणें त्याला तितकेसें शक्य होत नाहीं. आणि त्याबद्दल त्यांना दोष देणेंहि शहाणपणाचें होणार नाहीं. उलटपक्षीं आईला सबंध दिवस घरांतच काढावयाचा असल्यामुळें मुलांवर नजर ठेवण्याची जबाबदारी ओघानेंच तिच्यावर पडते आणि त्यांत तिनें कसूर करणें हें सुगृहिणीचें लक्षण नाहीं. स्वयंपाक करणें, पतीची सेवा-शुश्रुषा करणें आणि इतर आवश्यक गृहकृत्यें करण्याबरोबरच मुलांना इष्ट वळण लावणें हें तिचें एक अत्यंत महत्त्वाचें कर्तव्य असतें. मात्र इतक्या कसोटीनें हीं कर्तव्यें आम्हांपैकीं किती बायका अमलांत आणीत असतील ही बरीक विचार करण्यासारखी गोष्ट आहे ! नवसासाया-साच्या पहिल्या मुलाचे लाड करण्यास एखादी बायको माघार घेत असेल असें वाटत नाहीं. अपत्य-प्रेमाचा सारा ओघ त्यावेळीं तिकडे लोटत असतो. पण या लाडांमुळें मुलें बिघडावयाचीं हें ठरूनच गेलें आहे आणि त्या बाबतींत त्यांच्या आईला दोष देणें चूक होणार नाहीं. आईचें अपत्यप्रेम पाहून पहाणाऱ्याला जितका आनंद होतो तितकेंच लाडाचा मर्यादातिक्रम होत असलेला पाहून त्याचा अनिष्ट शेवट लक्षांत येऊन दुःख होतें. त्यावेळीं स्नेहांध झालेल्या आई-ला त्या अनिष्ट शेवटाचा विचार करावासा वाटत नाहीं. त्या वेळचा तिचा उत्कट आनंद पाहून कठोर अंतःकरणानें आपण तिला त्याची जाणीव करून देणें आपलें कर्तव्य असतें. पण त्यावेळीं तात्त्विक विचारांची तिला गरज वाटत नाहीं आणि एखाद वेळ मुलांचे फाजील लाड घातुक आहेत असा तिच्या मनांत विचार डोकावला तर त्यावेळेपुरतें तिला महत्त्व वाटत असेल तेवढेंच.

पण मुलांना त्यांच्या इच्छेप्रमाणें वागू देणें जसें अनिष्ट असतें तसेंच न देणें हेंहि अनिष्ट असतें. त्यांच्या नीतिमत्तेला अहितकारक वळण न लागण्यासाठीं जशी आईनें त्यांच्यावर सक्त नजर ठेवली पाहिजे तसेच त्यांचा बौद्धिक विकास आणि

जिज्ञासेची तृप्ति करण्यासाठीं त्यांना स्वैर वावरूं देणेंहि अत्यंत आवश्यक असतें. कित्येक गोष्टीबद्दल आपण त्यांना माहिती देऊन त्यांचें समाधान करण्याचा प्रयत्न करूं लागलों तर त्यांना एखादवेळ तितकेंसें कळणार नाहीं; पण त्यानीं स्वतःच तो प्रश्न सोडण्याचा प्रयत्न केला तर त्यांना फार सुलभ रीतीनें तो प्रश्न सुटतो. पोहावयाचें कसें तें त्यांना आपण समजाऊन द्यावयाचा प्रयत्न करूं लागलों तर ते 'आपण पाण्यांत बुडत कां नाहीं, पाण्यावरच कां तरंगतों. नुसत्या हातांनीं आणि पायांनीं पोहता कसें येतें' असे कितीतरी प्रश्न विचारून भंडावून सोडतील पण तेंच त्यांना कोणाबरोबर तरी पोहण्यासाठीं नदीवर पाठवलें व ते पोहण्याचा प्रयत्न करूं लागले, म्हणजे त्यांना आपोआपच त्यांच्या एक एक प्रश्नाचा उलगडा होत जातो. हीच गोष्ट अनेक बाबतींत लागू करतां येईल.

मुलांना बालवयांत कांहीं बाबतींत त्यांच्या मनाप्रमाणें वागूं देणेंच श्रेयस्कर असतें. केवळ शिक्षणाच्या उद्देशानें त्यांना थोडासा समज आला न आला तोंच शाळेंत पाठविणें अत्यंत विघातक आहे आणि तशा स्थितींत त्यांना शाळा म्हणजे बंदीखाना वाटणें शक्य आहे. कदाचित् हा त्यांचा समज त्यांच्या मनांत दृढमूल होऊन पुढें सुद्धां त्यांची शिक्षणाबद्दल नावड आणि अनास्था दिसून येईल. त्यांच्या कोंवळ्या मनावर शाळेंतील शिक्षण कांहींच इष्ट संस्कार करूं शकत नाहींत उलट हा जुलमाचा रामराम असल्यामुळें त्या वयांतली त्यांची चौकस बुद्धिहि नष्ट होते आणि तो तर एक मोठा तोटा आहे. मुलांचा बुद्धिविकास होण्याला शाळेंतल्या शिक्षणापेक्षां घरबसल्या त्यांच्या दृष्टीस पडणारे निरनिराळे कुतूहलोत्पादक प्रकारच जास्त उपयोगी पडतात. त्यावेळीं त्यांना मन मानेल तसें खेळू करूं दिल्यास त्यांना केवढा तरी उत्साह वाटत असतो आणि आपण होऊनच त्यांना निरनिराळे प्रश्न स्वतःच्या बुद्धीनें सोडविण्याची आणि शिकण्यासवरण्याची आवड आपोआप उत्पन्न होते. आणि क्वचित् नेहमींच्या वयांपेक्षां दोन तीन वर्षें उशीरा त्याला शाळेंत घालावें लागलें तरी त्यानें घरीं व आसपास जें ज्ञान संपादन केलें असेल तें त्या शाळेंत मिळणाऱ्या ज्ञानापेक्षां कितीतरी पट जास्त उपयुक्त होणें निखालस संभवनीय आहे. म्हणूनच मी सांगतें कीं, मुलानें लवकर लवकर शाळेंतल्या परीक्षा पास होण्याच्या इच्छेनें चौथ्या पांचव्या वर्षींच शाळेच्या कैदखान्यांत त्याला डांबून टाकण्यापेक्षां त्याच्या बौद्धिक विकासासाठीं आणि जिज्ञासेची जागृति आणि तृप्ति होण्यासाठीं त्याला दोन चार वर्षांनंतर शाळेंत पाठवणेंच त्याच्या हिताचें आहे.

तसं होतं म्हणून प्रत्येकजण माझ्यासारखाच कमनशिबी कसा असेल ? जयवंत, मी मघां बोललों तें सारं विसरून जा हं ?"

"बुवाजी" आपलें गांठोडें घेऊन उठले. मीहि बॅग माझ्याजागेवर ठेऊन त्यांना पोचवण्यासाठीं दरवाजापर्यंत आलों. ते खालीं उतरले आणि स्टेशनच्या बाहेर पडले. गार्डानें बावटा फडकवल्यावर गाडी सुरू झाली आणि धुराचे भपकोर टाकीत स्टेशनांतून बाहेर पडली. मी दरवाजाजवळच्या खिडकींतून बाहेर डोकावून त्यांच्या अंधुक अंधुक होत चाललेल्या आकृतीकडे पहात राहिलों. तेवढ्या वेळांत माझ्या मनांत हजारो विचार येऊन गेले असतील. 'बुवाजी' दृष्टीआड होतांच मी शून्य मनानें परत माझ्या जाग्यावर येऊन बसलों. महेश्वर बसला होता त्या ठिकाणीं पाहिलें तों तोहि तेथें नव्हता. तोहि घोंड स्टेशनवर उतरला असावा असा मी तर्क केला.

आतां माझ्या डोक्यांत विचाराचा नुसता धुमाकूळ माजला होता. 'बुवाजीं'चें अशाश्वतेचें तत्त्व मला पूर्णपणें पटलें असल्यामुळें त्यांनीं माझ्या बाबतींत वर्तवलेलें भविष्य तरी कां खरें होऊं नये असें मला वाटूं लागलें. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें खरोखरीच माझ्यावर अचानक एखादी आपत्ति ओढवणार नाहीं कशावरून ? त्यांच्या वडिलांनीं त्यांच्या लग्नांत मोडता घातला; तसा प्रसंग माझ्यावरहि येणार नाहीं कशावरून ?

माझ्या डोक्यांत, हजार प्रश्न नाचूं लागले आणि एकाचेंहि मला समर्पक उत्तर देतां येईना. 'बुवाजीं'च्या भाषणांतला शब्दन् शब्द मला पटत होता. डब्यांतून उतरतांना अखेर त्यानीं माझें सांत्वन करण्याच्या हेतूनें मला आवडतीलसे शब्द उच्चारले असले तरी तेवढ्यावरून माझ्या डोक्यांत थैमान घालणारे विचार पार नष्ट होणें असंभवनीय होतें. 'कावा' बघून रडावयाचें थांबणाऱ्या लहान बालकासारखा मी अज्ञ नव्हतों. तसें असतें तर 'बुवाजीं'च्या सांत्वनपर भाषणानें माझी अस्वस्थता नाहींशी झाली असती. पण 'बुवाजी'नीं आपलें स्वतःचें पूर्वचरित्र सांगून माझ्या मनांत क्षणभंगुरत्वाचें तत्त्व इतक्या खोल बिंबवलें होतें कीं, माझ्या चालू परिस्थितीबद्दल चांगल्या बाजूनें विचार करण्याचा माझ्या मनांत चुकून सुद्धां विचार येत नव्हता. 'बुवाजीं'च्या प्रत्येक शब्दाला व्यापक आणि विस्तृत स्वरूप देऊन तें तत्त्व मनांत खोल रुजून तेथेंच कायमचें स्थायिक करण्याकडेच माझ्या विचाराचा कल जात होता. त्या विचाराला दुसरी चांगली बाजू असूं शकेल याचें मला पूर्ण विस्मरण झालें होतें. मनुष्याच्या मनांत एखाद्या चिंत्य गोष्टीबद्दल विचार घोळूं लागला म्हणजे अशुभ तेवढें त्याच्या प्रथम मनांत येतें. आणि तें एकदां आलें म्हणजे त्याला मनांतून काढून टाकण्याचें बाजूलाच राहून उलट त्या विचाराला बळकटी आणण्याचाच तो नकळत प्रयत्न करीत असतो. बाबा माझ्या लग्नाविरुद्ध जाणें शक्य आहे हें मला ठाऊक असतांहि माझ्या मनांत तसा विचार पूर्वी कधींच आला नव्हता. पण आतां 'बुवाजी'नीं माझ्या मनांत तसल्या विचारांचें एकदा बीज रोंवल्यावर त्याच्यावर निरनिराळ्या

अशुभ विचारांचें शिंचन करून त्याची वाढ करण्याचाच खटाटोप मला नकळत मी करूं लागलों.

सोलापुरीं येईपर्यंत माझें मन पक्कें निराशवादी बनलें. करूं नये तितका त्या गोष्टीबद्दल विचार केल्यामुळें माझ्या मनावर भलताच विपरित परिणाम झाला होता. 'बुवाजीं'ना फक्त त्यांच्या विवाहाच्या बाबतींतच आत्यंतिक निराशा वाटली असली तरी इतर बाबतींत त्यांचें मन निराशावादी बनलें नसेल असें मला वाटलें; पण मला या जगांत इतर एकाद्या इच्छेप्रमाणें साफल्य मिळणें खरोखरीच शक्य आहे हें सुद्धां मुळींच पटेना. 'बुवाजीं'ना निराशेचा कटु अनुभव खरोखरीचाच मिळाल्यामुळें त्यांचें मन जितकें विषण्ण व नीरस झालें असेल त्याच्या शतपटीनें कल्पित निराशेच्या नुसत्या विचारानें मला विषण्णता वाटूं लागली. 'बुइल पॉवर' अगर 'आत्मशक्ती'नें कित्येक अशक्य गोष्टी शक्य केल्याचा इतिहास माझ्या वाचनांत अनेकदां आला होता; पण उलट अर्थानें मानसिक शक्ति दुर्बळ करून कल्पित भविष्य खरोखरीचेंच शक्य करणारा असा मीच प्रथम जन्माला येणार कीं काय हा विचार माझ्याबद्दल कोणाच्या-ही मनांत आला असता. पण माझ्या मनांत मात्र त्यावेळीं तो आला नाहीं. कारण 'बुवाजीं'नीं सांगितलेल्या तत्त्वाचा मनांतल्या मनांत गाढ अभ्यास करून माझा असाच पुरता ग्रह होऊन गेला होता कीं, माझ्या मनांत माझ्या अदृष्टाबद्दल येणाऱ्या कल्पना नुसत्या कल्पना नसून तसें घडून येणें अगदीं अपरिहार्य आहे! तसें घडून आलेंच पाहिजे असें मी माझ्या मनाला एका अर्थानें बजावीतच होतों! चांगल्या गोष्टीबद्दल यशाची केलेली अपेक्षा बहुशा केव्हांच सत्य ठरत नाहीं; पण एकाद्या आपत्तीबद्दल मनांत चुकून आलेल्या विचाराला सुद्धां हटकून मूर्त स्वरूप येत असतें. हें मला ठाऊक असल्यामुळेंच मी शक्य तो चांगल्या चांगल्या गोष्टीबद्दल विचार करण्याचा प्रयत्न करीत होतों. पण प्रयत्न करीत होतो एवढेंच! चांगला विचार चुकून देखील माझ्या मनांत येत नव्हता.

माझ्या मनस्वास्थ्यांत अल्पावकाशांत इतकी विलक्षण क्रांति करणाऱ्या 'बुवाजीं'ना इतर कोणीहि दूषण दिलें तरी याबद्दल मी त्यांना जबाबदार धरण्यास पूर्ण नाकबूल होतो. रात्रीचा अवेळीं पोपट बोलूं लागला अगर दिवसाच्या उजेडांत घुबड दिसलें तर आपण आपल्या मनाशींच एखाद्या अशुभ आपत्तीचा विचार करीत असतों. पण या बाबतींत पोपटाला अगर घुबडाला दोष देणें अयोग्य असतें. त्यांचीं ती कृति बुद्धिपुरस्सर होत नसून तो ईश्वरी योजनेचा पूर्व संकेत आहे, असाच आपण त्यापासून निष्कर्ष काढीत असतो. अर्थात् 'बुवाजीं'ची भेट इतर कुठल्याहि मनुष्याच्या दृष्टीनें हानिकारक ठरत असली तरी माझ्या भावी आयुष्यांतल्या एका जबरदस्त आपत्तीची अगाऊ जाणीव करण्याच्या हेतूनेंच परमेश्वरानें त्यांना पाठवलें असावें असें मला वाटूं लागलें. भर आनंदांत धुंद असतांना अकस्मात् एखादी आपत्तीची वावटळ आली तर त्या जबरदस्त धक्क्यानें विपरीत परिणाम व्हावयाचा तो टाळण्यासाठीं परमेश्वर

हीं अशीं केव्हां केव्हां योजना करीत असतो. त्यामुळें पुढचें दुःख सहन करण्याची थोडी तरी घमक अंगीं येऊन अनिष्ट परिणामापासून किंचित् मुक्तता मिळत असते. आणि याच योजनेनें परमेश्वरानें 'चुवाजीं'ची व माझी भेट करून दिली होती असें मला ठाम वाटूं लागलें.

प्रकरण १४ वें.

संकेत

"माई!"

"काय हो नाना?"

"थोडं पाणी आहे का?"

"पाणी? देतें हं! चहा करतां वाटतं?"

"हं."

"बरं आहे आपलं तुम्हांला? साखरेचा खर्च व्हायचा तेवढाच. बाकी चहा आपल्या घरचाच!" माई हंसत हंसत म्हणत पाणी आणण्यासाठीं उठल्या. माझ्या हातीं तांब्या देतां देतां माझ्या चेहऱ्याकडे पाहून त्या किंचित् आश्चर्यानें म्हणाल्या, "अं! काय हो नाना, चेहरा असा लालट कसा दिसतोय्! अन् असे कांपतासे?"

"नाहीं, थोडी थंडी वाजतेय, ताप यायचं चिन्ह दिसतंय." मी तांब्या घेत म्हटलें. "मग चला, मी चहा करून देतें तुम्हांला. मला सांगूं नये का? तुमचं तरी इकडे कोण आहे?"

खरेंच, माझें इकडे कोण आहे? वाळींत टाकल्यासारखा मी असा सोलापूरीं एकटा येऊन पडलो होतों. दिवसभर गांवांत निरनिराळ्या लहान मोठ्या दुकानीं विचारपूस करीत फिरावें आणि संध्याकाळीं हुरश करीत खोलींत येऊन पडावें एजंटा-सारख्या धंद्याचा सराव नसल्यामुळें दुकानाच्या मालकांना साखर पेरून कसें खुलवावें यांत मी अगदींच अनभिज्ञ होतों. चहा हवा अगर नको अशी इतर गिऱ्हाइकें दुकान-दाराजवळ विचारपूस करतात तशी करावयाची आणि त्यानें मान हालविली कीं पुढें कसलीच घास धीस न करतां दुकानच्या पायऱ्या उतराव्या! हातांतल्या बॅगेंत असलेले निरनिराळ्या चहाचे नमुने लोचटपणानें दाखविण्याइतकेंसुद्धां मला धैर्य होत नव्हतें. तरी एजंटाच्या धंद्याचें बीज मला कळत असल्यामुळें रात्रौ बिछान्यावर पडल्या पडल्या दुसऱ्या दिवशीं कसें बोलावयाचें व काय बोलावयाचें याचा तर्जुमा मी मनाशींच ठरवीत होतों. आणि हा प्रकार दर दिवशीं घडत होता!

या धंद्यांत मी नालायख आहे हें मला पुरतेपणीं कळून चुकलें होतें. तरी पण मी शक्य ते कष्ट घेत होतो. एकदोन आठवड्यानंतर माझी भीड किंचित् चेपत चालली आणि तिसऱ्या आठवड्यांत मी एकदोन गिऱ्हाइकेंहि मिळविलीं. पण हें मी सारें मनाविरुद्ध झगडून करीत होतो. 'बुवाजीं'बद्दलच्या आणि माझ्या भवितव्यतेबद्दलच्या विचारांनीं माझ्या मनावर भयंकर दडपण पडलें होतें आणि सबंध दिवस उन्हांतान्हां-तून सबंध गांव पायाखालीं घालावा लागल्यामुळें मर्यादेबाहेर शारिरीक कष्ट होत होते. अंतर्बाह्य मी असा कष्टून गेलों होतों. प्रभाकराच्या, शालीनेच्या अगर घरून आलेल्या एखाद्या पत्रानें माझ्या मनाला कांहीं क्षण विरंगुळा पडे तितकाच माझ्या खोली शेजारी रहाणाऱ्या माईंबरोबर आणि रघुनाथाबरोबर संध्याकाळच्या वेळीं गप्पा मार-तानांहि माझ्या मनाची अस्वस्थता थोडी नाहींशी होत असे; पण एरव्ही तिन्ही काळीं आणि बिछान्याला पाठ लागली कीं, नाहीं नाहीं ते विचार मनांत येऊन हैराण करीत

"आतां स्वस्थ पडून रहा हं नाना ! मुळींच उठायचं नाहीं. कांहीं हवं नको तें मला सांगत जा."

मी वळकटी उशाशीं घेऊन सतरंजीवर पडतों. माईंनीं स्टोव्ह पेटवून वर पण्याचें तपेलें ठेवलें. स्टोव्हचा 'भों' असा आवाज निघत होता. डावा हात डोक्या-वर आडवा टाकून मी स्टोव्हच्या लाल प्रकाशाकडे शून्य मनानें पहात बसलों होतों. रिकामें बसलें कीं भलभलते विचार डोक्यांत येऊन कपाळ दुखूं लागतें याचा मला वारंवार प्रत्यय येत असल्यामुळें तें टाळण्यासाठीं म्हणून खिशांतलें शालीनचें आलेलें पत्र पुन्हां एकदां वाचण्याच्या निमित्तानें मी उठूं लागलों.

" अहं, नाना, उठायचं नाहीं अगदीं म्हणून सांगितलं ना तुम्हांला ?" माला पुन्हां खालीं निजवीत माई म्हणाल्या.

" हो पण मला खिशांतलं पत्र पाहिजे आहे ! "

" मग मी देतें. तुम्ही मुळींच उठायचं नाहीं. हें घ्या पत्र " माईंनीं खिशांतलें पत्र काढून माझ्याकडे दिलें आणि पाण्याला आधण आल्यामुळें पाण्यांत चहा टाकण्यासाठीं त्या लगबगीनें स्टोव्हकडे गेल्या. मी शालीनच्या पत्राच्या या वेळपर्यंत पांच कीं सहा आवृत्त्या केल्या होत्या; पण इतर कांहींहि वाचण्यापेक्षां तिचें पत्र वाचावयाला घेतलें तर मनाची अस्वस्थता जास्त प्रमाणांत नाहींशी होत असे असा मला वेळोवेळीं अनुभव आला होता. आणि म्हणूनच यावेळीं तिच्या पत्राचीं पुनरावृत्ति करण्याखेरीज कपाळशूळ अगर ताप हटणें दुरापास्त आहे असें मला वाटूं लागतें.

पाकिटांतलें पत्र काढन मी वाचण्यास सुरवात केली.

कृ. सा. न. वि. वि.

आपलं पत्र वेळेवर मिळालं. आपणाला सबंध दिवस दगदग पडते, याचं मला किती वाईट वाटतं म्हणून सांगूं ? काम तरी इतकं कंटाळवाणं आणि निलाजरेपणाचं आहे ! त्यापेक्षां मी म्हणतें पंचवीस रुपयांवर ऑफिसांत रखडणारे कारकून तरी बरे ! निदान एका जागेवर निवांतपणें बसायला तरी मिळतं. पण हें काम म्हणजे शुद्ध हमाली. वणवण रस्त्यावर आणि दुकाना–दुकानांनीं फिरत रहायचं; आणि तशांत दुकानदारांजवळ कंठशोष करीत बसायचं ! गेल्या पत्रांत आपण सारी हकीगत लिहिली आहे तां वाचून किनई मला चैन देखील पडेना. बरं इतकंहि करून घरीं आल्यावर मायेची माणसं तरी पहायला मिळताहेत का ? तर तेंहि सुख नाहीं. खोलींच कुलुप काढायचं आणि खिन्नपणानं खोलींत जायचं ! नुसता विचार देखील अंग असें शहारून टाकतो ! इकडे असतांना तुम्हीं एकटे रहात होता तरी आम्हीं सर्वजण इकडे असल्यामुळें तुम्हांला एकलकोंडेपणाचं मुळींसुद्धां दुःख झालं नसेल. पण तिकडे आम्हींहि नाहीं न् घरचीं माणसं देखील नाहींत. असो. नाशिबीं आलं त्याला मान तुकवायला हवी. परिक्षेचा 'रिझल्ट लागायच्या पूर्वी असं स्वप्नांत देखील नव्हतं. पण कधीं काय होईल याचा काय नियम आहे ? आपण आगगाडींतल्या 'बुवाजीं'च्या तोंडचे जे उद्गार लिहून पाठवले आहेत त्यांत बघा, काडीचंहि असत्य नाहीं. देवाची करणी सदान्‌सदा ही अशीच असते.

पण पुरें झालं हें रडगाणं ! तुम्हांला सबंध दिवस चालून चालून थकवा आला असेल आणि त्यांत माझं हें रडगाणं कशाला ? आपण प्रकृतीलामात्र जपायचं. उगीच शक्तीबाहेर कष्ट करूं नयेत. मी तिकडे असते किनई, तर आपणाला थकल्यासारखं मुळींच वाटूं दिलं नसतं. आपण बाहेरून आल्याबरोबर सुहास्य मुखानें आपलं स्वागत केलं असतं आणि कपडे वगैरे काढून आपण खुर्चीवर बसला कीं मग ओल्या फडक्यानें आपलं तोंड अन् हात पुसले असते. मग पेल्यांतला चहा बशींत ओतून ती आपल्या ओठाजवळ धरली असती न् मग—

पण नको बाई ! कोणीं हें पत्र वाचलं बिचलं तर तो काय म्हणेल ? लग्नाआधींच मुंबईकडल्या मुली आपल्या नवऱ्याला कसली न् कसलीं पत्रं पाठवीत असतात असा ठपका यायचा !

अण्णांना परवापासून थोड थोडा ताप येतोय्. बांकी सारी मंडळी खुशाल आहेत. आपलं पत्र परवां दुपारीं साडे बारा वाजतां माझ्या हातीं पडेलच. पोष्टमन तरी मेला इतका द्वाड आहे ! अगोदर आसपासच्या घरचीं पत्र देतो. न् सगळ्याशेवटीं आमचं पत्र आणून देतो तेव्हां त्याचा अस्सा राग येतो पण !

बरं, आणखी लिहायला कांहीं नाहीं, कळावें.

आपली आवडती

शालीन.

मी तें पत्र वाचून छातीवर दोन्ही हातांत घट्ट धरून ठेवलें, आणि डोळे मिटून शालीनच्या पत्रांतल्या एक एक वाक्यार्चे चिंतन करूं लागलो, यावेळीं ती घरीं काय करीत असेल माझ्यासारखीच तीं माझ्या पत्रांचीं पारायणें करीत असेल का पत्र वाचून झाल्यावर ती तें आपल्या पोलक्याच्या खिशांत ठेवते कीं आपल्या ट्रंकेंत.

"हं, नाना, हा चहा घ्या; म्हणजे हुशारी वाटेल तुम्हांला." माईनीं चहाचा प्याला माझ्या पुढ्यांत आणून ठेवला. मी माझ्या तद्रींतून जागा झालों आणि तिच्या दृष्टीला तें पत्र पडलें कीं काय या विचारानें बावरून हळूंच अंगावरच्या पांघरुणाखालीं मी लोटून दिलें

चहा घेतल्यावर माझ्या अंगांत बरीच तरतरी आली. मी पुन्हां वळकटीला टेंकून पडल्यावर माईना जाण्यास सांगितलें. पण त्या जाण्यास तयार होईनात. मला स्वस्थ झोंप लागल्याशिवाय आपण उशाजवळून हालणार नाहीं म्हणून त्यानीं मला निक्षून सांगितलें आणि मी नको नको म्हणत असतांहि माझें डोकें हळुहळु चेपूं लागल्या. माझ्यासाठीं त्यांना श्रम पडत असलेले पाहून मला कसेंसेंच वाटत असलें तरी पण त्यानीं दटावून सांगितल्यावर पुन्हां त्यांच्याशीं त्याबाबतींत हुज्जत घालणें मला चमत्कारिक दिसूं लागलें.

* * * *

त्या रात्रीं मला फणफणून ताप भरला. या कुशीवरून त्या कुशीवर माशासारखा मी नुसता तळमळत राहिलों होतों. जीभ कोरडी ठणठणीत पडली होती पाणी आणण्यासाठीं मला उठवतहि नव्हतें. तरी रात्र बरीच झाल्यामुळें आसपास चिटपाखरूं सुद्धां नसल्यामुळें मला तशाच स्थितींत कण्हत रहाणें प्राप्त होतें. आईबाप, सगेसोयरे असतांना आज मी एकाएकीं असा दूर तळमळत पडल्याचें पाहून मला कसेंसेंच वाटूं लागलें. या घटकेला असा तृषार्त होऊन दुबळेपणानें जमिनीशीं जखडलें असतानां आई, बाप, भाऊ, आप्तेष्ट यांपैकीं एकाचा सुद्धां मला या जगांत उपयोग होऊं नये याचें मला अपरिमित दुःख वाटलें. मायेच्या आप्तेष्टाशिवाय जगांत अगदीं उघड्या पडलेल्या माणसापेक्षां माझ्या यावेळच्या यातना अत्यंत दारुण होत्या. रक्ताच्या नात्याची आणि जिव्हाळ्याच्या नात्याची अशी माणसें अस्तित्वांत असूनसुद्धां त्यांच्यापैकीं एकाचाहि मला यावेळीं उपयोग होत नव्हता कीं माझ्या या वेळच्या परिस्थितीची त्यांच्यापैकीं एकालाही जाणीव नव्हती. या मध्यान्ह रात्रीं सगळीं सुशांत झोंपली असतील आणि सुखस्वप्नांत दंग होऊन गुंगत असतील. पण त्यांच्यापैकीं एकालाही माझ्या परिस्थितीचें स्वप्न पडत नसेल कीं यावेळीं माझ्या तोंडांत पाणी घालण्याकरितांही कोणी येण्याचा विचारहि मनांत आणीत नसेल ! यावेळीं उभ्या जगांतलें रक्ताच्या आईबापापासून तों क्षुल्लक जानपछान असलेल्या व्यक्तींपर्यंत प्रत्येक माणूस मला निरुपयोगी होतें. निष्प्रेम आयुष्य कंठणाऱ्या जगांतल्या एकाद्या सड्याफटिंगापेक्षां या परिस्थितींतले माझें दुःख दुःसह होतें.

माझ्या मनांत भलभलतेच विचार डोकाऊं लागले. अशा एकांत ठिकाणीं, आप्तेष्टांपासून दूर टाकून, फणफणाऱ्या तापानें अंगाची लाही लाही करून हालचाल करण्यासही असमर्थ बनवण्यांत निष्ठूर काळाचा काय दुष्ट हेतु असेल? माझ्या आशाळलेल्या जीवाला कष्टवून अंतकाळच्या अशा दारुण वेदना मला अनुभवविण्यांत कठोर काळाचें कसले अंतिम ध्येय साधणार आहे? अशा एकांत ठिकाणीं या घटकेला माझें कांहीं बरेंवाईट झालें तर काय होईल? एखादी अनपेक्षित आपत्ति ओढवून माझ्या आयुष्यांत क्रांति करणारी 'बुवाजीं'नी म्हटलेली हीच तर ती काळवेळ नसेल? खरोखरच विधीसंकेत तसा असला तर–त–र–

माझ्या डोळ्यापुढें काळ्या निळ्या रेघा दिसूं लागल्या. रात्रीच्या भयाण अंधारांत आणि रातकिड्यांच्या किर्र आवाजांत मी डोळे ताठून वर छताकडे बघत राहिलों. त्या निःशब्द ठिकाणीं माझा श्वासोच्छ्वास केवढ्या तरी मोठ्याने होत असलेला मला ऐकूं येऊं लागला. असला अशुभ विचार डोक्यांतून हद्दपार करण्यासाठीं मी डोळे गच्च मिटून घेऊन सबंध डोक्यावरून पांघरूण घेतलें.

ती रात्र मला किती तरी भयंकर गेली.

प्रकरण १५ वें.

मधली स्थिती.

सकाळीं आठ, सव्वा आठाच्या सुमारास मी डोळे उघडले. उशाशीं रघुनाथ बसला होता. मी मान फिरवून त्याच्याकडे पाहिलें.

"किती वाजले?"

"सव्वा आठाला पांच मिनिटें कमी आहेत."

"अं? इतका वेळ मी झोपलों होतों?" मला स्वतःलाच याचें आश्चर्य वाटलें. पण रात्रीं दीड दोन पर्यंत माझा डोळ्याला डोळा लागला नव्हता हें त्यावेळीं माझ्या लक्षांत आलें नाहीं.

"आपला ताप रात्रीं बराच चढला होता वाटतं?"

"कशावरून?"

"अंग अजून कढत लागतंय्" त्यानें माझ्या कपाळावर उजवा हात ठेऊन म्हटलें.

"हुं."

"तोंड धुवायला उठतां ना ?"

"हुं" मी पांघरूण पायाकडे लोटलें आणि केसावरून हात फिरवून उठून बसलों. एका रात्रींत मी बराच निःशक्त झालों होतों. तापाच्या जोराबरोबर मानसिक यातनांची भर पडल्यामुळें महिने महिने बिछान्याला खिळलेल्या एखाद्या रोगट आजाऱ्यासारखा मी दिसत होतो. आधाराशिवाय मला बसवेना म्हणून मी सरकत सरकत पाठीं जाऊन भिंतीला टेंकून डोळे मिटून बसलों रघुनाथानें एक भांडें पुढ्यांत ठेऊन एका तांब्यांतून तोंड धुण्यासाठीं पाणी आणून दिले. कसे बसें तोंड धुवून मी टॉवेलनें तोंड पुसलें. मला एवढ्या हालचालीनें सुद्धां कितीतरी थकवा आला होता. डोळे मिटल्या मिटल्या मी मनांत विचार करीत होतों, या आजारांत माझी आईनें कशी शुश्रुषा केली असती, मधूनें माझी कशी काय निगा राखली असती, प्रभाकर, त्याची आई, शालीन—

"उठलां नाना ?" माई हातांत चहाचा प्याला घेऊन आंत आल्या. "हा कढत कढत चहा घ्या; म्हणजे तुम्हांला बरींच हुषारी वाटेल." त्यांनीं चहाचा प्याला माझ्या पुढ्यांत ठेवला. आणि चहा बशींत ओतून बशी माझ्या तोंडाकडे नेली चहा पिऊन झाल्यावर मला बरींच हुषारी वाटली.

पण दुपारीं पुन्हां तापानें एकाएकीं उचल खाल्ली. थर्मामिटर न लावतांसुद्धां ताप पांच साडेपांच डिग्रीपर्यंत चढला असावा असें मला खात्रीपूर्वक वाटत होतें. तापलेल्या डांबराच्या रसांतून कढत कढत वाफ निघावी तशी माझ्या अंगांतून निघते आहे कीं काय असा मला भास होऊं लागला. माझ्या आसपास कोणी बसलें असतें तरी त्याला त्या ऊष्ण वाफेचा चटका बसून तो अंमळ दूर गेला असतां रसरशीत आगीवरच्या कढईंत ठेवल्यासारखा माझ्या जीवाचा कोंडमारा होऊं लागला. आधल्या रात्रीपेक्षां यावेळीं मला चमत्कारिक वाटूं लागलें. रात्रीच्या निसर्गदत्त शीतलतेंत तापाचा प्रखरपणा किंचित् मंद वाटत होता ; पण दुपारच्या तापलेल्या उन्हाचें भपकारें खोलींत येऊन रखरखींत वाळूंत पडलेल्या माशासारखी माझी तळमळ होत होती. दोन, चार मिनिटें बिछान्यावर पाठ टेंकून निजलों कीं ती भाजून निघाल्यासारखी होऊन मी कुशीवर वळे. त्या क्षणा-दोन क्षणापुरतें किंचित् बरें वाटे; पण पुन्हां पहिलाच प्रकार होऊन दुसऱ्या कुशीवर वळल्याशिवाय उपाय होत नव्हता. अशा रीतीनें सबंध शरीर नुसतें शेकून निघालें होतें आणि अंगातल्या ऊष्णतेनें गादीहि तापून निघाली होती. माझ्या आसपासचें सारेंच वातावरण संतप्त, कढत बनून गेलें होते. यावेळीं कुठल्या तरी गारशा विहिरींत जाऊन डुंबावें अशी प्रबळ इच्छा माझ्या मनांत येऊं लागली. बर्फाच्या लाद्यांचा बिछाना करून त्यावर गारसें पडावें आणि बर्फाचें थंडगार पाणी घटाघटा घशाखालीं उतरवून ही असह्य तळमळ शांत करावी असें मला वाटूं लागलें.

उठवत नव्हतें तरी असेल नसेल तो जोर एकवटून मी बिछान्यावर उठून उभा राहिलों. डोळ्यापुढें अंधारी आल्यासारखें वाटल्यामुळें दोन्ही हात भिंतीवर ठेऊन मी त्यांच्यावर डोकें टेकलें, आणि थोडया वेळानें भिंतीच्या आधारानें एक एक पाऊल पुढें टाकून मोरीपर्यंत गेलों आधल्या दिवशीं सकाळचें भरून ठेवलेलें पाणी तसेंच होतें. जवळचाच पेला घेऊन मी ढसढसा दोन पेले पाणी घेतलें. तें गार पाणी पोटांत गेल्यावर मला किती तरी आराम वाटला. पुन्हां हळुहळु मी बिछान्यावर येऊन पडलों.

दहा पंधरा मिनिटांनीं पुन्हां माझी तळमळ सुरू झाली. बिछाना पुन्हां तापून निघाला आणि घशालाहि कोरड पडली. या अवस्थेंत किती काळ तळमळत पडावयाचें हेंच मला कळेना. आजाराची मला मुळींच संवय नसल्यामुळें या दग्ध स्थितींत जाणारा प्रत्येक क्षण मला गुदमरून टाकीत असल्यासारखा वाटत होता. शरीराला अगर मनाला आराम आणणारी अशी एकहि वस्तु आसपास नव्हती काय केलें असतां या दारुण यातना शांत होतील तें मला कळेना ध्यानीं मनीं नसतां या कसल्या दुःसह संकटांत मी सांपडलो होतो ! शालीन, प्रभाकर आणि सुहृदांना सोडून येणें जीवावर आलें असतांना मन घट्ट करून केवळ कर्तव्य विन्मुख न होण्यासाठीं मी इकडे येऊन मानसिक व्यथेंत तळमळत असतांना अकस्मात या आजारानें उचल खाऊन मला जर्जर केल्याचें मला जास्त दुःख झालें ! दिवसभर धंद्यांत मन दंगल्यावर मानसिक व्यथेचा जो विसर पडे तो या रिकाम्या वेळीं नाहींसा होऊन उगाच लहान लहान प्रसंगाचें स्मरण करून मी त्याच्यावर विचार करूं लागलों. शालीनबरोबर असतांना घडलेले प्रसंग, नंदगांवला जातानां शालीनच्या बाबतींत केलेलें माझें पाहिलें धाष्टर्य, नंदगांवशीं कुसुमबद्दल वाटणारें प्रेम, त्यानंतरची तिची व माझी झालेली ताटातूट, तिचें मुंबईस आलेलें पत्र—

पत्राची आठवण होतांच आपलें अजून उत्तर न गेलेलें पाहून तिच्या मनाची काय स्थिति झाली असेल हा विचार माझ्या मनांत आला. स्त्रियांच्या मनांत ही भावना किती खोल मूळ धरून बसते हें मला ठाऊक असल्यामुळें माझ्या या हलगर्जीपणाचा तिच्या अंतःकरणावर केवढा वज्र घात झाला असेल याची मला कल्पनासुद्धां सहन होईना तशा मनःस्थितींतल्या यातना कांहीं अंशीं मीहि अनुभवल्या असल्यामुळें त्याचें दारुणत्व मला कल्पनेनें अजमावतां येत होते. आणि पुरुषापेक्षां बायकांचें मन जात्याच कोमल असल्यामुळें कुसुमच्या बाबतींत मी असें कठोरपणाचें-राक्षसीपणाचें वर्तन केलें याचें मला आतां वाईट वाटूं लागलें. अविचारानें माझें आधींच तापलेलें डोकें भडकून गेलें आणि मेंदूचा स्फोट होऊन डोक्याच्या चिंधड्या चिंधड्या उडतात कीं काय असें मला वाटूं लागलें. पश्चात्तापानें दग्ध झालेल्या अंतःकरणांतून डोळ्यांवाटें दुःखाश्रु पाझरूं लागले. दुःखाचा एकदम स्फोट होऊन अशा परिस्थितींत मोठमोठ्यानें रडूं येतें तें टाळण्यासाठीं मी श्वासनिरोध करून आवंढे गिळूं लागलों.

माझ्या कपाळाच्या शिरा फुगून तट्ट झाल्या होत्या डोक्यांतील रक्त सळसळूं लागलें. दग्ध अंतःकरणाचा कोडमारा होऊन माझें डोकें चढून गेलें. अंतर्बाह्य होणारी ही आग असह्य होऊन मी बिछान्यावरून जामिनीवर लोळत गेलों.

* * * *

त्यावेळीं दिवसाचा कुठचा प्रहर होता हें मला कळणें शक्य नव्हतें. डोळे ताठ उघडून सभोंवतालच्या परिस्थितीचें आकलन करण्याइतका समज मला त्या स्थितींत नव्हता. मीं एकदां डोळे उघडले आणि पुन्हां पापण्या आपोआप डोळ्यावर पडून ते बंद झाले. त्या निमिषार्धांत जे काय माझ्या दुबळ्या दृष्टीस पडलें तें एवढेंच—कोणी तरी बूट तुमान घातलेला मनुष्य एका खुर्चीवर बसला होता, त्याच्याजवळ दोघेजण कोणीसे बोलत उभे होते आणि माझ्या उशाशीं माझ्या डोक्यावर हात ठेऊन आणखी एक कोणीसें बसले होतें. एवढ्यावरून मला कांहींच अर्थबोध होत नव्हता अगर त्या परिस्थितीचें ज्ञान करण्यास विचारशक्ति लुली पडल्यामुळें असमर्थ होती. तेवढ्या वेळांत माझ्या डोक्यांत एकच कल्पना डोकाऊन गेली असेल तीं एवढीच कीं मी कुठल्या तरी भयंकर आजारानें पछाडून गेलों होतों!

प्रकरण १६ वें.

"उघडलेन् हं डोळे!' कोणीतरी बोलल्याचें माझ्या कानीं आलें.

"अं?" असें ह्मणत कोणी बांगड्या वाजवीत माझ्या दिशेनें येत असल्यासारखें मला वाटलें. येणाऱ्या माणसाची ओळख पटवून घेण्याकरितां मी डोळे एकवार गच्च मिटून पुन्हां उघडले आणि पहातों तों माझ्याडोक्यावर हात ठेऊन आई उभी? आश्चर्यानें माझ्या भुंवया किंचित् वर गेल्या. आई इकडे कशी, मी कुठें आहे, पाहिल्या प्रथम बोललें तें कोण? मी किंचित् मान वळवून पाहिलें, तों माझ्या उशाशीं बाबा बसलेले! बाबांचा चेहरा काळवंडून गेला होता, डोळे खोल आणि तांबडे लाल दिसत होते. दाढी बोटभर वाढून चेहरा विद्रुप दिसत होता.

मी फिरून आईकडे पाहिलें. तीहि एखाद्या आजारी माणसासारखी दिसत असून तिच्या चेहऱ्यावर मलूल कळा आली होती. माझ्या अंगांत अशक्तता भयंकर आली असली तरी त्यावेळच्या परिस्थितीचा विचार करण्याइतका मनाला आराम आणि उत्साह वाटत होता.

"जया!" आईनें माझ्या कपाळावरून हात फिरवीत मला हांक मारली. मी तिच्याकडे निश्चल दृष्टीनें पहात राहिलों.

"मला ओळखलंस कां?" तिच्या पहिल्या हांकेला शब्दांत उत्तर न मिळाल्यामुळें तिनें फिरून विचारलें.

"हो–" माझ्या तोंडून अस्फुट शब्दोच्चार झाला.

"कोण मी?"

"अ–आ–" मी बोलण्याचा प्रयत्न करीत म्हणालों.

"तुला आतां बरं वाटतं ना?"

मी मानेनेंच 'होय' म्हटलें. मी शुद्धीवर आहे यार्चे तिला प्रत्यंतर आल्यावर तिचा मावळलेला चेहरा बराच प्रफुल्लित झाला. माझ्या तोंडावरून हात फिरवीत ती माझ्याकडे आणि मी तिच्याकडे कितीवेळ तरी पहात होतो

"माई, जया शुद्धीवर आला कीं हो!" दरवाजांतून आंत आलेल्या व्यक्तीला उद्देशून आई म्हणाली. ती व्यक्ती पुढ्यांत येतांच तिला मी कोठेंतरी पाहिल्यासारखें मला वाटूं लागलें.

"रघुनाथ आहे कां घरांत? डॉक्टरकडे जाऊन त्यांना कळवायला हवं. या सुमाराला हा जागा होईल असा त्यांचा अंदाज होता.'

"रघुनाथ आहे घरांत. मी सांगते जायला त्याला."

रघुनाथाचा उल्लेख ऐकल्यावर माझ्या डोक्यांत थोडथोडा प्रकाश पडूं लागला. माई पुन्हां आंत आल्यावर तिच्या चेहऱ्याकडे नजर जातांच मला चटकन् तिची ओळख पडली. हळुहळु मला पूर्व प्रसंग पुसट पुसट आठवूं लागले आणि मी आसपास त्यांची शहानिशा करून घेण्याकरितां पाहूं लागलों. मी एका खाटीवर झोंपलों होतो, बाजूला दोन खुर्च्या होत्या, एका खुर्चीवर आईसबॅग, औषधाच्या बाटल्या, कोलन वॉटरची बाटली आणि थर्मामिटर ठेवलें होतें. कोंपऱ्यांत स्टोव्ह आणि दोन, चार भांडीं दिसत होतीं. मी अजून सोलापुरींच माझ्या खोलींत असल्याची माझी खात्री झाली. खाट, खुर्च्या वगैरे अपरिचित वस्तु माझ्या आजारपणांत कोणाजवळून तरी मागून आणल्या असाव्या असा मी तर्क केला.

मी शुद्धीवर येऊन आठ, नऊ दिवस झाले होते. ताप नव्याण्णव आणि शंभर डिग्री यांतच घुटमळत होता. पण आतां तापाची फिकीर मुळींच नव्हती. मलाहि थोडथोडें बोलण्याची शक्ति आली होती. माझे शक्य तों सारे व्यवहार पडल्या पडल्याच होत. डॉक्टरनीं मला उठण्यास मनाई केली असून आई, बाबा, माई मला काय हवें नको तें विचारून मला उठूं न देतां माझ्या साऱ्या इच्छा अंमलांत आणीत. बाबांची आणि आईचीहि प्रकृति अलोचन जाग्रणानीं आणि काळजीनें क्षीण झाली होती. तरी पण मला थोडथोडें बरें वाटूं लागत असलेलें पाहून त्यांच्या चेहऱ्यावर

समाधानाची झांक मारत असेलली मला स्पष्ट दिसत होती. माझा हा आजार किती दिवस लांबला होता. बाबा आणि आई इथें केव्हां आली, त्यांना इकडे कोणी आणलें, त्यांना इकडे येण्याची गरज कां उत्पन्न झाली, मधु वगैरे कुठें आहेत वगैरे प्रश्नांचीं उत्तरें मला अजून सुटलीं नव्हतीं. म्हणून मी एकदां दुपाराच्या वेळीं, बाबा झोंपलेले पाहून आईला विचारलें, " आई. मला ताप येऊन किती दिवस झाले ग ?"

"ताप येऊन ? बघ ना, जवळजवळ मला वाटतं कांहींतरी महिना दीड महिना झाला !"

"अं ? दीड महिना ? " मी किंचित् मान बिछान्यावरून उचलून आश्चर्यांतिशयानें विचारलें. " आई, दीड महिना मला ताप येत होता ? "

"हो नाहींतर काय ? आम्हांला तार आली न् आम्हीं आलों तेव्हां—"

" तार ? मी नव्हती तार करायला सांगितली ! " मी पाहिल्यापेक्षां दुप्पट आश्चर्यानें म्हटलें ?

" तूं काय सांगणार ? शुद्धीवर असशील तर ना ? जेव्हां कीं नाहीं ताप साडे पांचपर्यंत चढला न् तूं कांहींच्या बाहींच अहोरात्र बडबडूं लागलास तेव्हां दुसऱ्याच दिवशीं माईच्या रघुनाथानं तार केली." "अस्सं !" मी सुस्कारा टाकून म्हटलें.

" तार पाहिल्यावर तर माझं धाबंच दणाणलं. मधून् प्रभा यांना शेजारच्या रमाबाईच्या स्वाधीन केलं न् आम्हीं तावडतोब स्टेशन गांठलं इथं येईपर्यंत सुद्धां मला धीर निघत नव्हता. आम्हीं आलों त्यावेळीं तूं कांहींतरी बडबडत होतास आणि रघुनाथ डोक्यावर आइसबॅग ठेऊन बसला होता. माई न् रघुनाथ भारी उमदी माणसं बरं जया ! तीं इथं नसतीं तर काय होतं न् काय नाहीं याचा कांहीं नेम नव्हता !" आई एक दीर्घ निःश्वास टाकून म्हणाली.

"पण काग आई, मी रोज बडबडत होतो कां ग ?"

" म्हणजे ! आमच्या तोंडचं तर पाणीच पळून गेलं होतं कांहींच्या बाहींच बडबडायला लागलास तेव्हां !"

' असं काय बडबडत होतो ग मी ?" मी उत्सुकतेनें विचारलें.

" ते का आम्हीं लिहून घेतलं आहे ? आणि घेणार तरी किती ? अहोरात्र आज इतके दिवस बडबडत होतास तें टिपून् घ्यायला एखादा कारकूनच ठेवावा लागला असता. " आई हंसून म्हणाली.

" पण मी कुठल्या विषयावर बोलत होतों तें नाहीं का ग तुला सांगतां येणार ?" माझी उत्सुकता अगदी अनावर झाली होती.

पंण तुझ्या बोलण्याचा मेळ बसेल तर ना ? एकदां म्हणतः होतास 'मी तुला पत्र पाठविलें नाहीं, ही माझ्या हातून मोठी चूक झाली. तुझ्या मनावर याचा केवढा तरी परिणाम झाला असेल. मी दुष्ट आहे, चांडाळ आहे असं काय मनाला वाटेल तें बोलत होतास. कोणाच्या पत्राचं रे उत्तर पाठवायचं होतं ? "

" असंच. " मी किंचित् हंसल्यासारखें करून म्हटलें.

" आणि तूं त्या दिवशीं तर काय एखाद्या साधूसारखा मोठा उपदेश करीत होतास. काय म्हणे 'जगांतली प्रत्येक वस्तु नाश पावणार आहे, मनुष्याच्या इच्छेसारखं कधीं कांहींच होत नसतं. ईश्वर नेहमीं मनुष्याच्या इच्छेविरुद्ध वागत असतो, केव्हां काय होइल याचा नियम नसतो; या घटकेला हा समुद्र कशावरून आटणार नाहीं, घर कशावरून कोसळणार नाहीं. मी कशावरून मरणार नाहीं' असं कांहींच्या बाहींच बरळत होतास ! "

"मग त्यांत काय खोटं आहे आई ? मी एकाएकी भयंकर आजारी झालों याचं मला पहिल्या प्रथम स्वप्न तरी पडलं होत का ? " मी हंसून विचारलें.

" चल, बोलूं नकोस वेडयासारखं कांहींतरी ! " आई रागावल्यासारखें दाखवून म्हणाली. माझ्या मरणाची कल्पनासुद्धां तिला असह्य वाटत होती. आणि तिच्या दृष्टीनें पाहिलें तर तें बरोबरच होतें. माझ्यापेक्षां तिनें जगांत कितीतरी जास्त वर्षें काढलीं असलीं तरी माझ्या मनःस्थितीसारखी तिची मनः-स्थिति बनण्यास तिच्या उभ्या आयुष्यांत तसा एकहि प्रसंग ओढवला नसेल. पण माझ्या मनांत चटकन् एक विचार आला कीं, माझ्या तरी असा कोठला प्रसंग अनुभ-वाला आला आहे कीं त्यामुळें मी जगाच्या शाश्वतेबद्दल शंकित रहावें ? 'बुवाजीं'ची भेट होईपर्यंत तसल्या विचाराची नुसती कल्पनासुद्धां माझ्या मनाला शिवल्याचें मला स्मरण होईना. माझें मन जगाबद्दल जें विटून गेलें, मानवी इच्छेविरुद्ध ईश्वर नेहमीं खटा-टोप करीत असतो हें तत्त्व जें माझ्या मनांत खोल रुजलें होतें तें तत्त्व विरक्त 'बुवाजीं' ची गांठ पडल्यावरच त्यांच्या अणुरेणूंतून बाहेर पडणारी निराशेची आणि अशाश्वतेची बोली ऐकण्यावेळची माझी मनःस्थिति अत्यंत अनुकंपनीय आणि कुठल्याहि विचाराचा परिणाम घडवून आणणारी अशी लवचिक बनली असल्यामुळें त्यांच्या भाषणांतला शब्दन् शब्द त्यांच्यापेक्षांही माझ्या मनांत तीव्रतेनें ठसला होता. मनुष्याच्या कल्प-नेच्या भरारीपेक्षां प्रत्यक्ष घडणारी वस्तुस्थिति मर्यादित प्रमाणांत घडत असते. त्यामुळें निराशेच्या प्रत्यक्ष कटु वस्तुस्थितीचा अनुभव घेतलेल्या 'बुवाजीं' पेक्षां केवळ त्याची कल्पना करून अशाश्वतेचें तत्त्व मनांत ठाम ठसवणाऱ्या मला निराशेची तीव्रता जास्त प्रमाणांत दिसून येत होती. नाहींतर तसेंच म्हटलें, तर असा कुठला दारुण प्रसंग माझ्यावर ओढवला होता कीं त्यामुळें जगाचा पार्श्वभाग मी इतक्या काळ्याकुट्ट रंगानें रंगवावा ? 'बुवाजीं'चा प्रेमभंग होऊन ते उभ्या जगाबद्दल

विरक्त बनले म्हणून तसलीच जबर आपत्ति माझ्यावर ओढवेल याला काय प्रमाण होतें ? ' बुवाजी'सारखे आशाभंगाचे प्रसंग जगांत घडतानांच इच्छासाधनाचे प्रसंग सुद्धां हरहमेष घडत असतात हें विसरून कसें चालेल ? आणि असेंच जर आहे तर मी यशस्वी व्यक्तींच्या यादींत आपलें नांव न घालतां आपण 'बुवाजी'च्या कोटींतच आपणांस ढकलण्यास कां प्रवृत्त आहे ?

जवळ जवळ दीड महिन्याच्या बेशुद्धींत मला पारख्या असलेल्या विचारांची पुन्हां माझ्या डोक्यांत येरझार होऊं लागली. पण आज कितीतरी दिवसांनीं माझ्या मनांत येणाऱ्या विचारांना शुभ आणि शक्यतेचें स्वरूप आलें होतें ! प्रत्येक विचाराबद्दल माझ्या मनांत येणाऱ्या अशुभ कल्पनांचें उच्चाटन होऊन जग निराशेपेक्षां आशेच्या जोरावरच चाललें आहे असें मला राहून राहून वाटूं लागलें.

प्रकरण १७ वें.

'बुवाजी'ची भेट झाल्यापासून तों या घटकेपर्यंतच्या विचाराच्या संधिकालांत जगाबद्दलची मी तिरस्कारानें ठरविलेली व्याख्या खोटी आहे असं मला वाटूं लागल्यापासून मला बराच आराम वाटूं लागला. आजारीपणांत आनंदाचे विचार मनांत आले असतांना सुधारणेची आशा औषधांच्या सहाय्यानें अपेक्षिलेल्या कालावधीपेक्षां जलद खरी ठरत असते याचें मला त्यावेळीं प्रत्यंतर येऊं लागलें. उठण्याबसण्याच्या श्रमानें सुद्धां जे मला थकल्यासारखें वाटें त्याचें या सुखद विचारानें मला विस्मरण झाल्यासारखेंच झालें.

संध्याकाळीं साडेपांच, सहाची वेळ होती बाबा औषध आणण्यासाठीं डॉक्टरकडे गेले होते आई सुपांत तांदूळ घेऊन निवडीत बसली होती. विचार करतां करतां चटकन् मला कांहींसें आठवून मी विचारलें, " आई, माझीं पत्रंबित्रं कांहीं आलीं आहेत का ?"

" पत्रं ? हो, खरंच ! थांब, देतें हं. " असें म्हणत तिनें सूप मांडीवरचे उचलून जमिनीवर ठेवलें आणि ती उठली. तिनें बाबांचे खिसे धुंडाळले ; पण तिला पत्रें सांपडलीं नाहींत.

" नाहीं बुवा सांपडत; त्यानींच आपल्या खिशांत ठेवलीं होतीं मला वाटतं ते घालून गेले त्या कोटाच्या खिशांत तीं असतील. दोन् पत्रं न् दोन तारा—"

" तारा ?" मी दचकून म्हटलें.

"हो, दोन ताराहि आहेत. ते आले कीं मी देतें घेऊन त्यांच्याकडून" असें म्हणून ती पुन्हां तांदूळ निवडण्यांत निमग्न झाली.

मला आतां बाबा कधीं एकदां येतील असें वाटूं लागलें. तारा कसल्या असाव्या याचा मला कांहीं तर्क करतां येईना. पत्र अगर तार यावयाची म्हणजे, ब्रुक बाँड टी कंपनीच्या मुंबईच्या ऑफिसांतून अगर शालीनीच्या घरून. पण हीं दोन पत्रें आणि दोन तारा ह्यांच्यापैकीं कोणाकडून आल्या असाव्यात याचें मला ठाम उत्तर मिळेना. माझ्या आजारामुळें मला माझ्या धंद्याचा जम कसा काय वसला आहे आणि मी एकंदर गिऱ्हाइकें किती मिळविलीं आहेत याचा तपशील देतां आला नव्हता. तेव्हां ऑफिसकडून पत्र अगर तार येणें संभवनीय होतें. पण आलेलीं दोन्हीं पत्रें आणि दोन्ही तारा ऑफिसमधून आल्या नसाव्या असें मला खात्रीपूर्वक वाटूं लागलें. त्यांतली एखादी तरी तार आणि पत्र शालीनच्या घरून आलें असावें असें मला राहून राहून वाटूं लागलें-तसा माझा पुरता ग्रह झाला!

आतां मला एक दुसरीच काळजी जडली. महत्त्वाच्या आणि निकडीच्या कामासाठीं तार करण्याचा प्रघात आहे, तर मग शालीनच्या घरून आलेल्या तारेंत असा कसला महत्त्वाचा आणि निकडीचा मजकूर आहे? त्यांच्यावर एखादी आपत्ति तर कोसळली नसेल, आण्णांना ज्वर येतो म्हणून शालीनच्या गेल्या एका पत्रांत होतें, त्यानेंच तर उचल खाल्ली नसेल, अशा कितीतरी सभय शंका माझ्या डोक्यांत घोळूं लागल्या.

"नंदगांवला जायची तयारी करा हं!" छत्री खुंटीला अडकवून बाबा आंत येत येत म्हणाले. "नंदगांवला?" आई निवडलेल्या तांदळांचें सूप घेऊन उठत आश्चर्यानें उद्गारली.

"हो, जयाला ताबडतोब हवाबदल करायला हवा. उद्यांच इथून निघायला डॉक्टरनीं सांगितलंय."

पण जयाला प्रवासाचा त्रास नाहीं का होणार?"

"अहं! मी ते डॉक्टरनां विचारलं. तितकी शक्ति आतां त्यांच्या अंगांत आली आहे असं ते म्हणाले. मग उगीच उशीर कशाला? आवराआवर करायला कांहीं फारसा वेळ नाहीं लागायचा. आहे काय असं अगोदर?"

"बरं!" असं म्हणून आई स्वयंपाकाच्या तयारीला लागली. बाबांचा पहिला शब्द ऐकतांच आतां झटकन पत्राबद्दल विचारावें हा माझा विचार पुढल्या संभाषणानें मनांतल्या मनांतच जिरला. आई 'बरं' म्हणून गेल्यावर बाबांना पत्राबद्दल विचारावें

असें मला वाटलें. पण ते कपडे वगैरे काढून नळावर हातपाय धुंवावयास जातांच मी तसाच स्तब्ध राहिलों.

" आई, बाबांकडनं तीं पत्रं न् तारा घेतस ना ?"

थोड्या वेळानें मी आईला उद्देशून म्हटलें.

' अरे हो. खरंच. थांब नळावरनं येऊंदे त्यांना."

थोड्या वेळानें बाबा ओलेत्या पायांनीं आंत आले आणि खुंटीवरच्या पंचानें ते पुसत पुसत खुर्चीवर बसले.

" हें पहा किनई, जयाचीं तीं पत्रं न् तारा आल्या आहेत ना, त्या त्याला ह्व्या आहेत."

" पत्रं ? हो, खरंच. कुठं बरं मी ठेवलीं आहेत तीं ?" बाबा आठवूं लागले. मी त्यांच्याकडे अगदीं सकरुण उत्सुकतेनें बघत होतों. त्यांनीं उठून आपले खिसे चांचपले, आसपास पाहिलें व शेवटीं कंटाळून म्हणाले, " आतां उद्यां नंदगांवला गेल्यानंतरच देईन तुला. आतां मला नाहीं शोधवत. समजलं जया ?"

" हं." मला पत्रें आणि तारा हस्तगत करून घेण्याची उत्कट इच्छा वाटत असली तरी तसें बाबांना न सांगतां मी गुपचुप राहिलों. पण मला एकसारखी आतां तळमळ लागून राहिली कीं त्या पत्रात काय मजकूर असेल ?

* * * *

नंदगांवला येईपर्यंत मला प्रवासाची दगदग झाली होती तरी आमच्या घरीं आल्यावर मला आल्हाद वाटूं लागला. गावांतून गाडी जातांना दृष्टीस पडणारीं घरें, विवक्षित झाडें, अंगणें मला पूर्वस्मृति देऊं लागलीं. संध्याकाळच्या थंड वेळीं आमची गाडी जात असल्यामुळें चहूंकडे कसें गार वाटत होतें. अखेर ती आमच्या घरापुढें उभी राहिली आणि बाबा आणि आई खालीं उतरलीं. सामान वगैरे ओट्यावर नेऊन ठेवल्यावर मी हलकेच घाडीखालीं उतरून हळुहळु घरांत आलों. आसपासच्या घरीं आमची वर्दी लागून विचारपूस करण्यासाठीं एकएकजण येऊं लागले. प्रभा तर पुष्कळ दिवसांनीं आईला व बाबांना भेटल्यामुळें आनंदानें उड्या मारत होती.

गांवांतल्या गांवांत शुभाशुभ बातमी तात्काळ पसरण्यास सोयीवार पडत असल्यामुळें माझ्या आजारामुळें आई आणि बाबा सोलापुरीं गेले आहेत हें अर्ध्याअधिक गांवाला ठाऊक होतें. रस्त्यानें येणाऱ्या जाणाऱ्या माणसांच्या नजरेस आम्हीं पडून आम्हीं आल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली.

दुसऱ्या दिवशीं उजाडल्यापासून बाबांचे मित्र, माझे मित्र, आईच्या परिचित शेजारपाजारिणी माझ्या आजाराचा वृत्तान्त ऐकण्यास येऊं लागल्या. प्रत्यक्ष मला

फारच थोडें बोलावें लागत असलें तरी स्त्रीस्वभावानुसार आई तें वर्णन घोळून घोळून येत्याजात्याला सांगीत होती. तिला पुन्हां पुन्हां तेंच तेंच बोलण्याचा कंटाळा तर येत नव्हताच; पण तिचीं कांहीं कांहीं वाक्यें वारंवार माझ्या कानीं पडल्यामुळें मला मुखोद्गत झालीं होतीं.

दीड महिन्याच्या गैरहजेरींत तुंबून राहिलेल्या निरनिराळ्या कामांचा उरक करतां करतां बाबांच्या नाकीं नऊ आले. इकडून तिकडे आणि तिकडून इकडे त्यांची सारखी धांवपळ होत होती. आधींच त्यांचा थकलेला जीव या दगदगीनें अगदीं जेरीस येई. तरी पण नंदगांवच्या हवेच्या जोरावर त्यांना काम करण्यास उत्साह येत होता.

जवळ जवळ आठ दिवस या गडबडींत गेले. मला सोलापुरीं आलेल्या पत्रांचा आणि तारांचा अजून विसर पडला नव्हता. तरी पण बाबाकडे त्यांची विचारपूस करून थकून भागून आल्यावर त्यांना पुन्हां तीं शोधण्याचें कष्ट देण्याचें माझ्या जीवा" वर येऊन मी तें काम दुसऱ्या दिवसावर ढकलीत असे, आणि अशी चालढकल होत होत आठ दहा दिवसांचा अवधि लोटला होता.

नंदगांवच्या हवेचा माझ्या शरीरप्रकृतीवर फारच चांगला परिणाम होऊन त्यांत झपाट्यानें सुधार पडूं लागला. मला घरांतल्या घरांत चांगलें हिंडूं फिरूं येत होतें. बाबा घरांत नसतांना पत्रांसाठीं मी त्यांचे खिसेहि शोधून पाहिलें, पण मला त्यांत कांहींच सांपडलें नाहीं.

त्या दिवशीं रविवार होता. पांच, साडेपांच वाजून गेले होते. बाबा कोठें तरी बाहेर जाण्यासाठीं म्हणून कपडे घालीत होते. आज मी निश्चय केला होता कीं वाटेल तें करून बाबांजवळून तीं पत्रें आणि तारा घ्यावयाच्या. रुमाल बांधण्यासाठीं हातांत घेतांच मी कांहींसें आठवल्यासारखें करून त्यांना विचारलें "बाबा, माझीं दोन पत्रं न् दोन तारा सोलापूरच्या मुक्कामावर असतांना आल्या होत्या ना?

"मग? तुला दिल्या नाहींत का त्या? अर्रर्र! माझ्या ट्रंकेंतच आहेत वाटतं? अजून-पर्यंत कां नाहीं मागितलीस?" असें म्हणत जानव्याला अडकवलेल्या किल्लीनें त्यानीं बाकावर ठेवलेली ट्रंक उघडली आणि आंतल्या कप्यांत ठेवलेलीं पत्रें आणि तारा काढून माझ्या हातीं दिलीं. तीं हातांत घेतांना माझी किती दिवसांची तरी इच्छा आज पूर्ण झाल्यासारखें मला वाटत होतें. मी तीं कोटाच्या आंतल्या खिशांत घालून ठेवलीं आणि बाबा बाहेर निघून जातांच कांहीं वेळानें आईला 'नदीवर जातों' म्हणून सांगून कपडे घालून बाहेर पडलों.

* * * *

एका होडीच्या आडोशाला वसून मी खिशांतलीं चारींहि पाकिटें काढून मांडीवर घेतलीं. अधीरतेनें तारेचें पाकीट उघडून मी आंतला कागद वाहेर काढला व झटझट त्याच्यावर नजर फिरविली.

"why delay, expect immediate reply D'Souza"

मी अपेक्षिल्याप्रमाणें पाहिली तार पत्र पाठविण्यास लागलेल्या माझ्या विलंवामुळें कंपनीकडून आली होती. झटकन् मी दुसरी तार घेऊन पाकिटांतला कागद बाहेर काढला.

"Shalin very serious. Start immediately—

Prabhakar"

माझ्या डोळ्यापुढें चक्कर आल्यासारखें मला वाटूं लागलें. शालीन एकाएकीं अत्यवस्थ होण्यास काय कारण झालें? तार करण्यापूर्वी तिची प्रकृति नादुरुस्त असल्याचें मला एकहि पत्र कसें आलें नाहीं?

चटकन् मला मांडीवरच्या पाकिटांची आठवण झाली. मी घाबरलेल्या हातानें पाकिट फोडलें आणि आंतलें पत्र उलगडून वाचण्यास सुरवात केली.

कृ. सा न. वि. वि.

आपणांस माझं मागचं पत्र मिळालंच असेल. त्याचं उत्तर अजूनहि आपण पाठविलं नाहीं, तेव्हां मी समजावें तरी काय? आपण इथून जातांना हेंच कबूल केलं होतं वाटतं? आपलं पत्र असं वाटेल तेव्हां आपण पाठवाल तर मीहि पण तसंच करीन बरं!

गेल्या पत्रांत आण्णांना वारीक वारीक ज्वर येत असल्याचं मी लिहिलं होतं. आतां त्यांत भरच पडत चालली आहे. डॉक्टरचं औषध सुरू आहे. परवां तर त्यांचा ताप पांच पर्यंत चढला होता. डॉक्टरना आणलं होतं. त्यानीं त्यांना नीट तपासलें. 'तापाची विशेषशी फिकिर नाहीं; पण छातींत कफ होऊं पहातोय्' असं त्यानीं दादाला सांगितलं. काल संध्याकाळीं परत ते येऊन गेले. अण्णांना जपण्यास सांगून दिलेलं औषध अगदीं वक्कशीर घालायला आम्हांला त्यानीं बजाऊन सांगितलं आहे. खोकतानां त्यांचे भयंकर हाल होतात. खोकला आल्यासारखें त्यानां वाटून ते खोकण्याचा प्रयत्न करतात; पण कफ थोडासुद्धां वाहेर न पडतां त्या हालचालीनें त्यांच्या पाठींत भयंकर वेदना उत्पन्न होतात. छातीवर व पाठीवर शेक चालूं केला आहे. पण अजून त्यांत उतार पडला नाहीं. त्यांच्या पाठींत काय होत आहे हें त्यानांहि सांगता येत नाहीं आणि आम्हांलाहि ताडतां येत नाहीं. खोकण्यावेळचे त्यांचे हाल मात्र आम्हांला बघवत नाहींत. खोकण्यावेळीं जो एक ध्वनि उत्पन्न होतो तो अंगावर शहारे आणण्यासारखा असतो.

आपणांला मी एक विनंति करते; तेवढी माझी इच्छा आपण पुरवाल का? तुम्हीं जर इकडे आला तर आम्हांला केवढी तरी मदत होईल. एकट्या दादावर सगळा भार पडल्यामुळें त्याच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम होतो कीं काय अशी मला भिती पडते आहे. तुम्हीं इकडे असला तर आम्हांलाहि धीर येईल आणि दादाच कामहि हलकं होईल. आपणाला रजा मिळेल का? यावेळीं तुम्हीं इकडे असावं असं मला किती तरी वाटतं आहे. येतां येणं शक्य असेल तर विलंब न करतां ताबडतोब निघून या.

बाकी सर्व मंडळी ठीक आहेत.

आपली आवडती,

शालीन.

पत्र वाचून झाल्यावर मी तें मांडीवर ठेवलें. आणि शुष्क नजरेनें नदीच्या रुंद पात्राकडे पहात राहिलों. शालीनच्या अत्यवस्थ प्रकृतीबद्दलची प्रभाकरची तार आणि शालीनचें आण्णाच्या आजाराबद्दलचें पत्र यांचा कसा मेळ बसवावा याचा मी मनांत विचार करीत होतों. शालीनच्या प्रकृतीबद्दलच्या भीतियुक्त आशंकेबरोबर आतां अण्णाबद्दल काळजी उत्पन्न होऊन माझें अंतःकरण या अकस्मात् आलेल्या दोन आघातांखालीं दबून गेलें. दोघांच्या प्रकृतीबद्दलची नंतरची माहिती मला कळली नव्हती. खिन्न मनानें मी तें पत्र खालीं ठेऊन दुसरें पाकिट फोडलें. या अखेरच्या पत्रांत माझ्यासाठीं कसलें दुर्दैवाचें ताट वाढून ठेवलें आहे कोण जाणें, या विषण्ण विचारानें तें पत्र वाचण्यास मी सुरवात केली.

प्रिय जयवंत यांस—

शालीननें तुला तीं. अण्णांच्या अत्यवस्थ प्रकृतिबद्दल लिहून तुला येणें शक्य असेल तर येण्यास विनंति केली होती. पण तूं आला नाहींस. कां तें मी काय सांगणार? तुं धंद्यांत अडकलेला मनुष्य आहेस. तुला परवानगी मिळाली तरच तूं येणार. कसेंहि असलें तरी तुला इकडे येतां आलें नाहीं एवढें मात्र खरें

अत्यंत दुःखाची गोष्ट तुला कळवायची म्हणजे मी, शालीन आणि वसंत अण्णांना सहा दिवसांपूर्वीपासून कायमची आंचवलों आहों! शालीननें तुला त्यांच्या आजारीच बारीक सारीक माहिती गेल्या पत्रीं दिलीच होती. त्यानंतरचें दोन तीन दिवस फारच भयंकर गेले आणि चवथ्या दिवशीं पहांटे साडे चारवाजतां जोराचा श्वासोच्छ्वास होऊं लागून नंतर तो बंद झाला तो कायमचाच! ध्यानीं मनीं नसतां अकस्मात् आमच्यावर हा घाला पडला आहे! असो. देवाची इच्छा! तशांत तूं इथें असतास तर आमच्या—निदान शालीनच्या दुःखाला तरी विरंगुळा पडता! कारण परवांपासून तिचीहि प्रकृति अस्वस्थ झाली असून तिच्या अंगांत ताप आहे. अण्णा-

च्या निधनानें तिच्या हृदयावर भयंकर परिणाम झाला आहे. तूं आलास तर तिला थोडा तरी आराम वाटेल. नाहींतर तिचें दुखणें कुठच्या थराला जाईल कांहीं सांगवत नाहीं. तुझ्या येण्यानें तिचें थोडें तरी सांत्वन होईल. रजा मिळत असो नसो, तूं कांहीं केल्या येण्याचा राहूं नकोस ! तुला प्रसंगाची जरूर आणि महत्त्व कळतेंच आहे. मी एकटा असल्यामुळें बावरलों गेलों आहे.

बाकी सर्व ठीक चाललें आहे. कळावें.

तुझा,

प्रभाकर.

माझें डोकें गरगर फिरूं लागलें. त्या कुटुंबांत एवढी भयंकर उलथापालथ होऊन मला ती आज इतक्या दिवसांनीं कळते आहे, हा माझ्या दुर्दैवाचा कडेलोट होता ! त्यांनीं वेळेवर तार पाठवून आणि पत्रें लिहून कळविलें असतांना सुद्धां मी मुळींच न आलेलों पाहून अगर माझ्याकडून कांहींच खुलासेवार पत्र न मिळालेलें पाहून त्यांना माझ्याबद्दल काय वाटलें असेल ? माझ्या जीवावरच्या दुखण्याची त्यांना गंधवार्ताही नसल्यामुळें मी हा बुद्धीपुरस्सर दुष्टपणा केला आहे असें त्यांना कां वाटूं नये ? यापुढें कदाचित् मी साऱ्या प्रकरणाचा खुलासा करून माझें निरापराधित्व सिद्ध केलें तरी आण्णाच्या मृत्युकालें आणि शालीनच्या अत्यवस्थ स्थितींत सर्वांचा माझ्याबद्दल किती विपरीत ग्रह झाला असेल ? त्या प्रसंगीं माझी किती निकडीची जरूर होती.

पण हें माझ्या स्वतःपुरतें होतें. माझें निरपराधित्व सिद्ध केल्यानंतर त्यांचा माझ्याबद्दलचा ग्रह बदलतो हा सांत्वनाचा विचार फक्त माझ्यापुरताच होता. पण त्यापेक्षांहि माझ्या डोक्यांत शूळ उठविणारा भयंकर विचार येत होता कीं शालीन आसन्नमरण स्थितींत असतांना मला आलेल्या तारेनंतरची हकिगत काय असेल ! शालीनला देवानें वांचविलीं कीं-कीं—

माझें सर्वांग अंग शहारून गेलें, डोकें असह्य भणाणून गेलें. डोळ्यांतून आग येत असल्यासारखें मला वाटूं लागलें. शालीनच्या विनवणीवरूनहि मी अण्णांच्या बाबतींत तिला आणि प्रभाकराला हातभार लावण्यासाठीं गेलों नाहीं. नंतर काय झालें, काय नाहीं याचीहि विचारपूस करण्याइतकी मी माणुसकी दाखविली नाहीं, आणि शालीनच्या अत्यवस्थ स्थितींत तार येऊनहि मी न जाण्याचा राक्षसीपणा केला ! खरेंच, त्यांना काय वाटलें असेल, आपत्काळीं माझा हा तोंडचुकारपणा पाहून प्रभाकराला काय वाटलें असेल, त्याच्या आईला काय वाटलें असेल, शालीनला काय वाटलें असेल ? माझ्या या टाळाटाळीनें शालीनच्या हृदयाला धक्का बसून मनांत कुढत कुढत, भग्नहृदयानें तिनें इहलोकची यात्रा खरोखरीच आटोपली असेल तर, तर तिचा असंतुष्ट आत्मा कसा तळमळत असेल ?—

मला माझा हुंदका आवरतां येईना. मी ढळाढळा अश्रू ढाळूं लागलों. उर भरून येऊन, दुःखावेगानें छाती फुटून येते कीं काय असें मला वाटूं लागलें. नदी-किनाऱ्यावरच्या मोकाळ्या वाळवंटांत मी बसलों होतों तरी एखाद्या अरुंद ठिकाणीं कोंदट हवेंत हात पाय आखडून गुदमरून बसल्यासारखें मला वाटत होतें. कधींहि न अनुभवलेली भयंकर मनःस्थिति आणि दारुण यमयातना यावेळीं माझा लचका काढीत होती. अक्राळ विक्राळ चेहऱ्याचे, भाल्यासारख्या तीक्ष्ण लांब-लचक सुळ्यांचे भयानक यमदूत चहूंबाजूंनीं माझ्यावर गिल्ला करून माझ्या अंगचे, लचके तोडताहेत असा भीषण देखावा माझ्या दृष्टीसमोर दिसू लागला! मनांतल्या मनांत मी खूब कढलों, खूब रडलों.

"प्रभाकर?" मी बेभानपणानें ओरडलों. ध्यानीं मनीं नसतां पुढ्यांत प्रभाकराला उभा असलेला पाहून मी भयचकित झालों. माझ्या डोळ्यांवर माझा विश्वासच बसेना. ही वस्तुस्थिति कीं विचारातिरेकानें उत्पन्न केलेली कल्पनासृष्टीतली अदृश्य प्रतिमा! मी जोरानें माझ्या डोळ्यावरून हाताचीं बोटें फिरवून ते तांबडेलाल केले.

"जयवंत!"

"प्रभाकर!" आम्हीं दोघेहि आश्चर्यानें एकमेकाकडे निश्चल दृष्टीनें पहात राहिलों. मिनिटभरानें माझे डोळे भरून आले. तोहि खालीं मान घालून हातांतली काठी वाळूंत खुपसीत निर्हेतुक दृष्टीनें तिकडे पाहूं लागला. पहातां पहातां त्याचें लक्ष्य माझ्या मांडी-वरच्या पत्राकडे गेलें. त्याला प्रथम किंचित् आश्चर्य वाटून नंतर त्याच्याहि डोळ्यांत अश्रू उभे राहिले. मी त्याला हाताला धरून खालीं बसवले.

"प्रभाकर! इकडे कधीं आलास?" मी कंपित स्वरांत विचारलें.

"पांच सहा दिवस झालें!" त्यानेंहि त्याच स्वरांत उत्तर दिलें.

"एकटाच आलास कीं—"

"नाहीं. माझ्याबरोबर आई न् वसंतहि आलीं आहेत."

"आणि-आणि-शालीन ना-" माझ्या तोंडून शब्दोच्चारहि होईना. माझा कोणीतरी गळा तर दाबून धरला नाहीं असा मला भ्रम पडला.

"शालीन? ती कायमचीच आम्हांला सोडून गेली आहे!" त्यानें दीर्घ निःश्वास टाकून म्हटलें.

माझ्या आयुष्याचें एक जिव्हाळ्याचें सुखस्वप्न संपलें! मला खूब खूब रडावेंसें वाटलें; पण माझ्या हृदयाचा कोंडमारा होऊन गेला होता. रडावयाचें तितकें मी अजूनपर्यंत रडून घेतलें होतें. आतां मला हुंदके येत नव्हते कीं डोळ्यांतून अश्रू पाझरत नव्हते. हुंदके देण्याइतकी मला आतां शक्ति उरली नव्हती; आणि डोळ्यांतले अश्रू आटून गेले होते. मला काय करावें तें सुचत नव्हते. माझ्या डोक्यांतले विचार

"आणि-आणि-शालीन ना-" माझ्या तोंडून शब्दोच्चारहि होईना. माझा कोणीतरी गळा तर दाबून धरला नाहीं असा मला भ्रम पडला.

"शालीन? ती कायमचीच आम्हांला सोडून गेली आहे!" त्यानें दीर्घ निःश्वास टाकून म्हटलें.

माझ्या आयुष्याचें एक जिव्हाळ्याचें सुखस्वप्न संपलें! मला खूब खूब रडावेंसें वाटलें; पण माझ्या हृदयाचा कोंडमारा होऊन गेला होता. रडावयाचें तितकें मी अजूनपर्यंत रडून घेतलें होतें. आतां मला हुंदके येत नव्हते कीं डोळ्यांतून अश्रू पाझरत नव्हते. हुंदके देण्याइतकी मला आतां शक्ति उरली नव्हती; आणि डोळ्यांतले अश्रू आटून गेले होते. मला काय करावें तें सुचत नव्हते. माझ्या डोक्यांतले विचार

पार नष्ट झाले होते; तरी पुन्हां बऱ्याचशा विचारांच्या धुमश्चक्रीनें मस्तक भडकून जावें तसा मला अनुभव येत होता. माझी यावेळची मनःस्थिति अत्यंत अनुकंपनीय बनली होती.

आम्हीं दोघेहि कांहीं काळ स्वस्थ बसलों होतों. माझ्या डोक्यांत कसल्या विचारांची खळबळ उडाली होती याचा मला निर्णय करतां येत नव्हता आणि प्रभाकराच्या मनांत यावेळीं कसले विचार धांगडधिंगा घालित असतील याचाहि मला अर्थबोध होण्याला कांहींच साधन नव्हतें. तरी पण त्याची ही गंभीर मुद्रा पाहून माझ्याबद्दल आलेला विकल्पच तर यावेळीं त्याच्या मनांत घोळत नसेल असा मला त्या स्थितींतहि संशय आला.

" प्रभा, मला हीं पत्रं आज मिळालीं हें तुला खरं तरी वाटेल का ?" मी बऱ्याच वेळानें धीर करून विचारिलें. त्यानें आपल्या गालावरचा हात काढून माझ्याकडे आश्चर्यानें पाहिलें.

" तुझी आणि शालीनचीं पत्रं हीं आतां मला मिळालीं आहेत."

" म्हणजे ? तीं पाठवून तर बरेच दिवस झाले ! "

" हो. पण मध्यंतरीं मी अतिशय आजारी होतों. आणि त्यावेळीं मी बेशुद्ध स्थितींत असल्यामुळें बाबानीं तीं पत्रें आपल्याकडे ठेवलीं होतीं. तीं मला आज मिळालीं '

" अस्सं का ? अरेरे ! " प्रभाकराच्या मनांत कसलासा विचार येऊन त्यानें सकरुण दृष्टीनें माझ्याकडे पहात म्हटलें.

" तुम्हांला वाटलें असेल कीं मी जाणूनबुजून अगर रजा मिळत नाहीं म्हणून आलों नसेन. "

" हो, खरेंच— "

" पण प्रभा, मला अण्णापुढें आणि शालीनपुढें असल्या शंभर नोकऱ्यांची सुद्धा पर्वा नव्हती. " मी त्याला बोलूं न देतां माझें वाक्य पुरें केलें.

" तुझ्याबद्दल माझी खात्री आहे जया. पण माझी परिस्थितीच इतकी चमत्कारिक होतीं कीं तुझा हा चुकारपणा पाहून माझ्याच काय, पण आईच्या आणि शालीनच्या मनांतहि तुझ्याबद्दल विकल्प आला होता. अण्णांच्या वेळीं तुझी जितकी जरूरी होती त्यापेक्षां शतपटीनें शालीनच्या आजारांत होती. अण्णांच्या निधनानें तिच्या हृदयावर जो उपघात झाला होता तो नुसता या चमत्कारिक वर्तनानें द्विगुणीत झाला होता. त्यांत भर घालण्याकरितांच कीं काय कुसुमच्या—म्हणजे आमच्या मामेबहिणीच्या मृत्यूची बातमी तिच्या कानावर आदळली ! त्या आचारांत, तिच्या अखेर अखेरच्या तासांत तुझी तिची नुसती दृष्टिभेट होती तरी हें संकट टळण्याची एकवेळ अपेक्षा होती. पण-आतां काय ? व्हायचें तें होऊन गेलें !" प्रभाकर एक

दीर्घ सुस्कारा टाकून म्हणाला. कुसुमच्या मृत्यूची आणखी एक अशुभ बातमी माझ्या बावरलेल्या कानावर आदळली. माझा एक महिन्याचा जीवावरचा आजार, आण्णांचा अंत, त्या धक्क्यानें आणि माझ्या गैरहजेरीनें झालेला शालीनचा काल, एकवेळ माझ्या हृदयावर वर्चस्व गाजवणाऱ्या कुसुमचें निधन हीं सारीं संकटें माझ्यावर एकदम कोसळलीं होतीं! ह्या सर्व अशुभ बातम्यांचा माझ्या मनावर भडिमार होणारी ती घटकाच माझ्या आयुष्यांतली निष्ठुर दुर्दैवाची वेळ होती की ज्या ठिकाणीं माझ्या कानावर या अशुभ बातम्या आदळल्या तें नदीचें वाळवंटच अपेशी होतें? अजूनपर्यंत ज्या अशुभ विचारांचें अस्तित्व समूळ नष्ट करण्यासाठीं मी नेहमीं झगडत असे. त्यांनीं वस्तुस्थितींत आपलें सत्यत्व पटवल्यामुळें माझ्या अंतःकरणाशीं त्यांची आतां जन्माची सांगड बांधली होती! आतां मी कुठल्या आशेच्या जोरावर त्यांना प्रतिबंध करूं? जयाचा पार्श्वभाग काळ्याकुट्ट रंगानें रंगलेला नाहीं हें प्रतिपादन करावयाला माझ्याजवळ काय आधार होता? 'बुवाजी'च्या तत्त्वाचें मिथ्यत्व सिद्ध करण्यासाठीं मला कुठला पुरावा पुढें करतां येईल? मानवी संकल्पाशीं ईश्वरी सत्तेचा विरोध असतो याचा पडताळा पटवण्यास आतां कसल्या साधनांची जरूरी होती?

त्या प्रक्षुब्ध आवेगांत मी मोठ्यानें ओरडून म्हणालों, "प्रभाकर, अलम दुनियेतली प्रत्येक वस्तु नाशवंत आहे हेंच खरें!"

मी ताडकन् बसल्याठिकाणावरून उठून तसाच विमनस्क स्थितींत कुठें तरी चालूं लागलों!

—समाप्त—

पोंच आणि अभिप्राय.

भारत मेळा—पद्यावली (प्र. ना. वा. बेलोसे. १७४ जे. के. बिल्डिंग नं. ८, गांवदेवी, मुंबई) यंदाच्या गणेशोत्सवापासून स्थापन झालेल्या या मुलामुलींच्या मेळ्याची पद्यावली अंतर्बाह्य सुंदर सजली आहे. 'दे हाता' 'निशिदिनीं' या लोकप्रिय चालीवर केलेलीं पदें गोड आहेत. कारकुनांची हलाखाची स्थिति आणि सद्यःकाळांतील वशिल्याचे 'गोडवे' 'कारकून' या पद्यमय प्रहसनांत चांगले गाइले आहेत. सहकारी पतपेढ्यांचें महत्त्व 'हा खरा वीर' या छोट्याशा नाटकांत फारच उत्कृष्ट रीतीनें दर्शविलें आहे. विचाऱ्या अजाण मुलांच्या तोंडीं व्यक्तिविषयक टीका आणि मेलगाडी-सारखी लेखकाचें चातुर्य (?) दाखवणारी लांबलचक वाक्यें कोंबून त्यांची दमछाटी करण्याच्या 'मोहा'पासून अलिप्त राहून सहकारी पतपेढ्यांचा उपयुक्त आणि लोकहिताचा असा निव्हाळ्याचा प्रश्न घेऊन तो मनोरंजक रीतीनें सोडविल्याबद्दल सदर लेखकाचें अभिनंदन केलें पाहिजे. मेळ्यातील बहुतेक सर्व मुलें गोड गळ्याचीं असून कु. शांता मणेरीकर हिच्या गाण्यांतली माधुरी श्रोत्यांना निःसंशय तल्लीन करून टाकते असें अनुभवास आलें आहे. संग्राह्यतेच्या मानानें पद्यावलीची १ आणा किंमत अल्प आहे.

राष्ट्रीय मेळा—पद्यावली (प्र. के. अ. धुर्ये, ५ हनुमान बिल्डिंग प्रॅटरोड, मुंबई) गेल्या वर्षी येथें स्थापन झालेल्या या मेळ्यानें यंदाहि गणेशोत्सवांत आपलें दुसरें वर्ष साजरें केलें. कुमुद-बांधव, केशव व अस्नोडकर या 'सुप्रसिद्ध कवि' (!!!) नीं या पद्यावलींत आपलीं कवनें छापून घेतलीं आहेत. रा. सारोळकरांचा 'पुन्हां हिंदु' हा संवाद चांगला वठला आहे. 'साहेब व तोंडपुजा' हा गेल्या वर्षांचाच पद्यमय संवाद यंदाहि पुस्तकांत समाविष्ट केला आहे. रा. अस्नोडकरांचा 'अगबाई महार' हा संवाद सदर पद्यावलींत प्रसिद्ध करण्यास कसली 'अपरिहार्य' अडचण आली ते प्रकाशकानीं गुलदस्तांतच ठेवलें आहे. किंमत २ आणे थोडी जास्त वाटते.

कुंजविहारी—(सं. रा. सी. द. आजगांवकर, सावंतवाडी) सदर छोट्या. मासिकाचा २ ऱ्या वर्षाचा १ ला अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. मासिक मुलांचें आहे असें जाहीर केल्यानंतर मोठ्या लेखकांचे लेख प्रसिद्ध करणें अनवश्यक आहे. तशांत ते मुलांना उपदेशपर म्हणून लिहिलेले असले तर तें वाजवी मानतां आलं असतें. कुमार काव्यनाद यानीं आपल्या कवितेच्या शिरोभागीं 'गज्जल' असा शब्द लिहून बंडखोरपणाच केला आहे. कारण सबंध कवितेंतली एखादी ओळ 'गज्जलां'त बसवतांना फारच खटाटोप करावा लागतो. कित्येक ओळींबद्दल तर पूर्ण औदासिन्य वाटतें. सध्यांच्या मासिकांच्या हलाखीच्या काळांतहि 'कुंजविहारी' नेटानें चालवल्याबद्दल संपादकाचें अभिनंदन करणें जरूर आहे. 'कुंजविहारी'ला २ रें वर्ष सुखानें जावों असें आम्ही इच्छितों.

डॉ० केतकरकृत 'परागंदा' रा. साठेकृत 'शाकाहार की मासाहार' वगैरे पुस्तकावर पुढील अंकीं अभिप्राय देण्यांत येईल.

क्षणभंगुर.

[अरुणमालेतून २ ऱ्या वर्षी क्रमशः
प्रसिद्ध झालेली कादंबरी.]

अरुण कार्यालय,
२ री भटवाडी, मुंबई ४.

प्रकाशक
मो. ग. रांगणेकर.



घरची श्रीमंती

असली तर कदाचित् कृत्रिम उपायानें दांत बांधून घेतां येतील. पण असल्या भाडोत्री दातांनीं पचनक्रियेला बाध येतो व खऱ्या दाताचें काम त्यांच्या योगानें मुळींच होत नसतें. म्हणून वेळींच सावध होऊन आमची "**लाल तारा**" टुथ पावडर लाऊन आपलें दांत कणखर करा. लहान बा. ५ आणे. मोठी बा. १४ आणे.

अमृतांजन (रजिस्टर्ड).

हे ठणका, कळा, वेदना इत्यादि व्याधींवर अचुक गुणकारी आहे. आज २५ वर्षें याच्या एकसारख्या वाढत्या रूपावरून याची सहज कल्पना होते. लाखों कुटुंबें आज अमृतांजन वापरीत आहेत. कारण तें सर्व प्रकारच्या वेदना, मुरगळणें, संधिवात, कफ, सूज आणि अशाच प्रकारच्या पुष्कळ व्याधी निखालस बऱ्या करिते. म्हणून ज्यांनीं तें अद्याप अनुभवलें नसेल त्यांनीं खात्री करून घ्यावी. किंमत १० आणे. ही. पी. खर्च निराळा.



दंतमंजन

या मजेदार दंतमंजनानें दांत शुभ्र होतात रक्त वाहणें थांबतें. हिरड्या मजबूत होतात व वास मधुर येतो. प्रत्येक ड. किं. २ आणे

सर्व दुकानदारांकडे मिळेल. अगर **अमृतांजन डेपो** १०९ फ्रीयर रोड, मुंबई.

अरुणमाला

सर्वसाधारण वाचकांसाठीं, स्त्रियांसाठीं
व मुलांसाठीं

उपयुक्त व मनोरंजक मासिक

दर अंकांत येणारा मजकूर

सर्वसाधारण वाचकांसाठीं:—चटकदार गोष्टी, विनोदी लेख, नाट्यछटा, आधुनिक नाटककारांच्या नाटकांचीं संक्षिप्त कथानकें, चरित्रें, चालू कादंबरी, प्रहसनें, निबंध, गद्यकाव्य, कविता वगैरे,

स्त्रियांसाठीं:—" मुलींचा संसार " या सदरांतील स्त्री विषयक चर्चेचा उहापोह.

मुलांसाठीं:—लहान लहान गोष्टी, विमान, फोनोग्राफ, टेलिफोन वगैरे यंत्रांची मनोरंजक माहिती, कोडीं, वक्षिसाचे विषय, कविता, " मुलांचें कुतुहल ", शास्त्रीय चमत्कारांचीं चित्रें व इतर मनोरंजक मजकूर.

आर्ट पेपरवर सुंदर चित्रें,

वा. व. ट. ख. सह २। रुपये

अरुण कार्यालय,
२ री भटवाडी, मुंबई ४.

३२ वर्षें परीक्षा घेऊन शंका असेल तर नमुना फुकट मागवा. सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें.

सुधासिंधु

कफ, खोकला, पटकी, दमा, शूल, संग्रहणी, अतिसार, पोट दुखणें, जुलाब, वांती वगैरे रोगांवर अनुपान शिवाय स्वादिष्ट औषध. किंमत प्रत्येक बाटलीस ८ आणे, पोष्टखर्च १ ते २ पर्यंत ७ आणे

दद्रुगजकेसरी

गजकर्णाचें औषध

हेंही सरकारांतून रजिष्टर झालेलें औषध आहे. हें कांहीं त्रासाशिवाय २४ तासांच्या आंत आपला गुण दाखविणारें आहे. किंमत ४ आणे. पोष्टखर्च १ ते पर्यंत ७ आणे. एकदम १२ बाटल्या घेतल्यास २। रु. पोष्टखर्च माफ.

बालसुधा

मुलांस सर्दी, खोकला, आणि अपचन हें कधींहि होऊं देत नाहीं. हें मुलांस बलवान करणारें गोड औषध आहे. किंमत १२ आणे पोष्टखर्च ७ आणे.

आमचीं औषधें सर्व औषधें विकणाऱ्यांजवळ मिळतात. कदाचित् तेथें न मिळाल्यास आमचे कडेस पत्र पाठवून मागवावें. पूर्ण माहिती करितां मोठा कयाटलॉग फुकट पाठवूं.

पत्ताः—सुखसंचारक कंपनी, मथुरा.

आमचा एजंट—नरोत्तम गिरिधर आ कं. शेख मेमन स्ट्रीट, मुंबई नं. २

जाहिरातीचे दर.

पान	मुदत	दर
१	१ वर्ष	५ रु. (प्रत्येक वेळीं)
$\frac{1}{2}$	,,	३ रु. (,,)
$\frac{1}{4}$	,,	२ रु (,,)

अरुण कार्यालय, २ री भटवाडी, मुंबई ४

मेंदूचे विकार व डोकें दुखणें यावर.

किं. १-२-०,] **ब्राम्ही तेल** [०-१०-०, ०-६-०

जागरण अगर मानसिक श्रम करणारांस अत्यंत उपयोगी

बाळबाळंतिणीकरितां औषधें.

बाळंत काढाः—दहा दिवसांत घेण्याचा–किं. १४ आणे.

बाळंत काढाः—दहा दिवसानंतर घेण्याचा–किं. १४ आणे.

बाळकडूः—उपजल्यापासून देण्यास योग्य किं ४ आणे.

आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायणें वगैरे औषधें तयार आहेत. एक आणा आला असतां रुग्णपात्रिका, लहान कॅटलॉग पाठवूं.

सूचनाः—ब्राम्ही तेल व टिकाऊ तयार काढे मूळ आमचे असून यांचा खप वाढल्यामुळें नक्कल मुरू झाली आहे. तरी बाटल्या घेते वेळी या आमच्या असल्याबद्दल खात्री करून नंतर घ्याव्या.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स आयौंषधी कारखाना, चेंबूर, जिल्हा ठाणें.

दुकान व दवाखाना—ठाकुरद्वार–मुंबई, पो. नं. २

रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने.

शर्टचीं बटणें रु. ३; चंद्राहार रु. ४; गोटजोडी रु. २॥; पाटल्या जोडी रु. २॥; वज्रटीका रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु; ४॥; नथ मोत्याची रु. ५; आंगठी रु. १; सळे जोडी रु. १॥; बांगड्या जोडी रु. २॥; घडाळ्याचा छेडा रु ३;

केंस काळे करण्याचा साबण.

यानें केंस काळे होऊन कायम रहातात. ३ डब्याच्या बॉक्सला रु. १॥

इमिटेशन मोतीं.

हीं मोतीं हुबेहुब खऱ्या प्रमाणें असून टिकाऊ व जड आहेत नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुडयासाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

मगनलाल के. आणि कंपनी. अमृतवाडी, गिरगांव मुंबई.

Dr. J. D. Kulkarni's Success Makers.

अखिल हिंदुस्थानांत अत्यंत नांवाजलेलीं पहिलींच.

कोणत्याही जातीच्या व सांथीच्या तापांवर

—विद्वान् व नामांकित डॉक्टरांनीं अत्यंत वाखाणलेलीं—

डॉ. जे. डी. कुलकर्णी

यांचीं

सर्वांगसुंदर, शास्त्रीय, पद्धतशीर, अत्यंत सोईस्कर औषधें

फिवरॉल. सर्व जातींच्या व सांथीच्या तापांवर अप्रतीम. " अंगांत ताप असतांना द्यावयाचें " किं. रु. १।

मलेरिन. मलेरियाएँग्यु हिंवतापाचा जिवंत काळ एग्यूमिक्श्चर. " अंगांत ताप नसतांना द्यावयाचें. " किं. रु. १।

मलेरिन. नं. २. अल्पमोली पण खात्रीपूर्वक, अत्यंत गुणी एँग्यूमिक्श्चर. " सर्वत्रांस सारखेंच सर्वोत्कृष्ट गुणावह. " किं. १२ आणे. या औषधांची सर्वत्र फार ख्याती असून एकट्या मुंबई शहरांतच १०००० पेक्षां जास्त कुटुंबांत यांचा संग्रह व गरजपरत्वें वापर असतो. इतर " निवडक " औषधांचा ७५ पानांचा सचित्र कॅट. लाग १ आण्याचीं तिकिटें आल्यास मोफत पाठवूं. व्यापऱ्यांस भरपूर कमिशन.

तारेचा पत्ता:—"ॐकारोदय" " Om Karodaya "
Bombay.

पोष्टाचा पत्ता:—कुळकर्णी ऐँण्ड सन्स मुंबई नं. २.

कितीहि जुना अगर नवा मलेरियाचा ताप घालविण्याची हमी.

डॉ. एन्. व्ही. कुळकर्णी यांचें

मलेरिया तापावर रामबाण

नवीन औषध.

रजिस्टर्ड

औषधांतील नवीन सोई:—नवीन औषधांच्या बाटलीबरोबर (१) जुलाबाचें औषध. (२) उलटी बंद होण्याचें औषध. (३) तापांत डोकें जड होतें, दुखतें, व चक्कर येतें, त्यावर लावण्यासाठीं औषध, अंगांत ताप असतां घेण्याचें औषध. (५) व पुन्हां ताप येऊं नये म्हणून घेण्याचें औषध अशीं निरनिराळीं पांच औषधें आहेत. औषध भरपूर चार दिवस पुरणारें आहे. व त्यानें ताप निखालस जातो. **म्हणूनच या औषधानें ताप जाण्याची आम्हीं हमी देतो.** बाटली किं. रु. १॥

मागविण्याचा पत्ता:—**आयुर्वेदिक मेडिकल वर्क्स मुंबई नं. १२**

ब्रँचिस:—गिरगांव बॅकरोड व दि लाईड रोड आणि मुंबईतील प्रसिद्ध दुकानदार व केमिस्ठ यांजकडे मिळेल.

Printed by—G. K. Gokhale, Secretary,
Shri Ganesh Printing Works, Poona City.
Published by—M. G. Rangnekar at the
Arun Office, 2nd Bhatwadi, Girgaum, Bombay 4.

Dr. J. D. Kulkarni's Success Makers.

अखिल हिंदुस्थानांत अत्यंत नांवाजलेलीं पहिलींच.

कोणत्याही जातीच्या व सांथीच्या तापांवर

—विद्वान व नामांकित डॉक्टरांनीं अत्यंत वाखाणलेलीं—

डॉ. जे. डी. कुळकर्णी

यांचीं

सर्वांग सुंदर-शास्त्रीय.पद्धतशीर-अत्यंत सोईस्कर औषधें.

फिवरॉल. सर्व जातींच्या व सांथीच्या तापांवर अप्रतीम "आंगांत ताप असतांना द्यावयाचे." किं. रु. १।

मलेरिन. मलेरिया-एग्यू हिंवतापाचा जिवंत काळ एग्यू नाशक. "आंगांत ताप नसतांना द्यावयाचें." किं. रु. १।

मलेरिन नं २. अल्पमोली पण खात्रीपूर्वक, अत्यंत गुणी एग्यूमिक्श्चर. "सर्वांस सारखेंच सर्वोत्कृष्ट गुणावह." किं. १२ आणे.

या औषधांची सर्वत्र फार ख्याति असून एकट्या मुंबई-शहरांतच १०००० पेक्षां जास्त कुटुंबांत यांचा संग्रह व गरजपरत्वें वापर असतो. इतर "निवडक" औषधांचा ७५ पानांचा सचित्र कॅटलाग १ आण्याचीं तिकिटें आल्यास मोफत पाठवूं. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन.

तारेचा पत्ता:—"ॐकारोदय" 'Om Karodaya" Bombay.

पोष्टाचा पत्ता:—**कुळकर्णी ॲण्ड सन्स, मुंबई नं. २.**

डॉ. एन्. व्ही. कुळकर्णी यांच अनुभविक शास्त्रशुद्ध औषधें.



च्यवनप्राश.

(Improved Formula)

शक्ति, बुद्धि, कांती आणि वीर्य वाढविणारें **महान धातुपौष्टिक** औषध. धातुविकार, स्वप्नावस्था व दुबळेपणा, अशक्तता, कडकी व खोकला वगैरे विकार बरे करून शरीर जोमदार व तेजःपुंज बनवितो. एक रत्तल बरणी किं. रु. ५ अ. र. २॥ रु.

द्राक्षासव

(Extra Quality)

साकर, पाचक, पौष्टिक, तरतरी आणणारें स्वादिष्टऔषध. दमाखोकला, कफ, सर्दी वगैरे विकार बरे करून भूक सपाटून वाढवितें. १॥ रत्तल बा. १८१२; १ र. बा. १। रु. अर्धा रत्तल बा. ८११.

नवीन औषध (रजिस्टर्ड) कितीही दिवसाचा नवा अगर जुना मलेरिया ताप यानें खात्रीनें जातो. या औषधानें मलेरियाचा ताप जाण्याची आम्हीं हमी देतों. बा. किं. १॥. रु.

पिपरीन (रजिस्टर्ड) कॉलऱ्यावर रामबाण औषध. १।२ भागांत उलटी व जुलाब बंद होतात; आमांशावरहि चांगला उपयोग होतो. बा. किं. १। रु.

पॅकिंग व पोष्टखर्च निराळा.

मागविण्याचा पत्ता:—**आयुर्वेदिक मेडिकल वर्क्स, मुंबई नं. १२**

Printed by **A. A. Moramkar** at his Shree Laxmi Narayan Press, 364 Thakurdwar Bombay 2.
and Published by **M. G. Rangnekar** at the **Arun** Office, 2nd Bhatwadi, Girgaum, Bombay 4.

